# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१२/२०१७** **दिनांक १४.११.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १४.११.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४१००/ २०१७, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १४.११.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०५. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दूध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

त्याचप्रमाणे मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर, सदस्य यांनी यांनी ईमेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१४.११.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. परंतु या बैठकीस मी हजर रहाणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.१४.११.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर सकाळी ११.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक २३.१०२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९१४** दिनांक २३.१०२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.८६८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना विनामुल्य रुग्णसेवा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे या रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रुग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना रुग्णांच्या बिलाच्या रकमेतून इनसेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन+ ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इनसेंटीव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेंटीव्ह लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रु.१२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच नव्याने भरती होणाऱ्या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इनसेंटीव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णांना विनामुल्य रुग्णसेवा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे या रुग्णालयामध्ये रुग्णांची संख्या जास्त असते. सदरहू रुग्णालय ग्रामीण भागातील असल्यामुळे तज्ञ डॉक्टर्स कमी वेतनावर काम करत नाहीत व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या वेतनाबरोबर तुलना करीत आहेत. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये रुग्णसेवा संपुर्णपणे मोफत केलेली असल्याने सदर डॉक्टरांना रुग्णांच्या बिलाच्या रकमेतून इनसेंटीव्ह देणे शक्य नाही. त्यामुळे एक विशेष बाब म्हणून व श्री साईबाबा रुग्णालयाशी तुलना करुन श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना त्यांचे मुळ वेतन+ ग्रेड पे यावर २००% असा फिक्स इनसेंटीव्ह लागु करणेत यावा. हा इन्सेंटीव्ह लागू केल्यास संस्थानवर अंदाजे प्रति माह रु.१२ लाख मात्र आर्थिक बोजा पडेल, त्यास मान्यता देण्यात आली. **परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मंजुरी घेण्यात येऊन, त्यानंतर सदरहू इन्सेंटिव्ह संबंधीतांनाआदा करणेत यावा.**

तसेच नव्याने भरती होणाऱ्या स्थायी, मानधनावर, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी त्याचप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व प्रशासकीय पदांना प्रस्तावात नमुद केलेल्या नियमावलीप्रमाणे इनसेंटीव्ह लागु करणेत यावा व ७ वा वेतन आयोग लागू झाल्यानंतर या इन्सेंटीव्हमध्ये बदल करणेसाठी प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**(२) निर्णय क्र.८६९-**

प्रस्तावात नमुद केलेल्या १) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर २) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक ३) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर ४) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद या रक्तपेढयांना मंदिर परिसरामध्ये रक्त संकलनास परवानगी दिलेली आहे. यामधील जिल्हा रुग्णालय, अहमदनगर या रुग्णालयामध्ये गैरप्रकार होत असल्याचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी ज्या रक्तपेढयांनी रक्तसंकलनासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे, अशा रक्तपेढयांना संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी, असे प्रशासनाने मत मांडले. परंतु समिती सदस्यांनी असे मत मांडले की, रक्तसंकलनासाठी परवानगी द्यावयाच्या सर्व रक्तपेढयांचे Due diligence करुन घेण्यात यावे व Due diligence करुन ज्या रक्तपेढया सर्व कागपत्रांची पुर्तता करतील व सेवाभावी वृत्तीने रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देतील, अशा रक्तपेढयांनाच संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**प्रस्तावात नमुद केलेल्या १) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, अहमदनगर २) जिल्हा रुग्णालय रक्तपेढी, नाशिक ३) जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर ४) दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद या रक्तपेढयांना मंदिर परिसरामध्ये रक्त संकलनास परवानगी दिलेली आहे. यामधील जिल्हा रुग्णालय, अहमदनगर या रुग्णालयामध्ये गैरप्रकार होत असल्याचे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी ज्या रक्तपेढयांनी रक्तसंकलनासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे, अशा रक्तपेढयांना संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी, असे प्रशासनाने मत मांडले. परंतु समिती सदस्यांनी असे मत मांडले की, रक्तसंकलनासाठी परवानगी द्यावयाच्या सर्व रक्तपेढयांचे संस्थानच्या हेल्थ कमिटीने Due diligence करुन घ्यावे. Due diligence मध्ये रक्तपेढया थॅलेसेमिया रुग्णांना मोफत रक्त पुरवठा करतात का व इतर रुग्णांना काय दराने रक्त उपलब्ध करुन देतात हे प्रामुख्याने पहावे. Due diligence झाल्यानंतर ज्या रक्तपेढया दर आकारणी पत्रासह सर्व कागपत्रांची पुर्तता करतील व सेवाभावी वृत्तीने रुग्णांना रक्त उपलब्ध करुन देतील, अशा रक्तपेढयांनाच संस्थान परिसरामध्ये रक्तसंकलणासाठी परवानगी देण्यात यावी. तसेच समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले यांनी जिल्हा रुग्णालय, अहमदनगर येथील रक्तपेढीचे Due diligence व तेथे घडलेल्या गैरप्रकाराची चौकशी**

**करावी व चौकशीतील निष्कर्षाच्या अनुशंगाने त्यांना रक्तसंकलनासाठी परवानगी देणेबाबत निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**(२) निर्णय क्र.९००-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी जागेची पहाणी करुन, त्या जागेचे स्थान, उपयुक्तता, त्यावरील अतिक्रमण याविषयी खात्री करुन सविस्तर फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२४ अन्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचे ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र संस्थान जमीनींच्या अत्यंत लगत असलेने सदरची जमीन संस्थानसाठी खरेदी करणेचे ठरलेले आहे, त्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच ज्या जमिनींवर संस्थानसाठी आरक्षण टाकणेत आलेले आहे, त्या जमिनींचा, नकाशासह प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०१.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.९१५** दिनांक ०१.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांना जाक्र.एसएसएस/एसएसबीएच/अधि/११८७/२०१३, दि.२१ जानेवारी २०१३, रोजीच्या पत्रान्वये दि.१६ फेब्रुवारी २०१३ ते दि.१५ फेब्रुवारी २०१४ या एका वर्षाच्या कालावधीसाठी, एकूण १२५ सफाई कामगार करीता कार्यादेश देण्यात आला होता. त्यांनतर सदर कामाची मुदत संपुष्टात येत असल्याने व नविन निविदा प्रकिया पुर्ण होणेस काही कालावधी अपेक्षित धरुन निविदेतील पान नं.०९ वरील मुद्दा क्र.४१ नुसार जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/बी.एम.डब्लु.एम/७११०/२०१४, दि.०५ फेब्रुवारी २०१४ रोजीच्या पत्रान्वये पुढील २ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतरही काही तांत्रीक कारणास्तव जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/ बी.एम.डब्लु.एम/५४८/२०१४, दि.२८ एप्रिल २०१४ रोजीच्या पत्रान्वये, सदर कामास दि.१५ एप्रिल २०१४ पासून पुढे नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत मंजुर दरात मुदतवाढ दिलेली होती.

दि.१९ सप्टेंबर २०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०८ निर्णय क्र.६६५ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रक्कम रु.२,२८,००,०००/- अपेक्षित खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून मा.व्यवस्थापन समितीचे दि २७ मार्च २०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२२५ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी, मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांना इकडील जाक्र.एसएसएस/ एसएसबीएच/ पीआरओ/१/६८/२०१७ दि.१२ एप्रिल २०१७ रोजीचे पत्रान्वये व ई-मेलव्दारे दि.०१ मे २०१७ ते दि.३० एप्रिल २०१८ या एका वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला होता.

मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी निविदा कालावधीत मंजुर दरात काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने सदरचा कार्यादेश रद्द करुन त्यांची बयाणा रक्कम जप्त करणेकामी व नविन ई-निविदा प्रक्रिया

राबविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४.०५.२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४ व निर्णय क्र.४४२ अन्वये, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुणालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामीच्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे. श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांना कार्यादेश देण्यात येऊनही त्यांनी आजतागायत कामास सुरूवात केलेली नाही. यावरुन ते सदरहू काम करणेस असमर्थ आहेत, असे निदर्शनास येते. याकरीता त्यांना देण्यात आलेला कार्यादेश रद्द करणेत येऊन, त्यांची संस्थानकडे असलेली रु.२,२८,०००/- मात्र बयाणा रक्कम जप्त करणेत यावी. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुणालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी”, असा निर्णय झाला होता.

उपरोक्त निर्णयानुसार नविन ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन ई-निविदा दाखल करण्याची मुदत दि.२० जुन २०१७ ते १० जुलै २०१७ रोजी सायं.०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. तसेच दि.२३ जुन २०१७ रोजी प्रि-बीड मिटींग घेण्यात आली. प्रि-बिड मिटींगमध्ये विविध निविदाधारकांनी उपस्थित केलेल्या शंकाबाबत दि.०३ जुन २०१७ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निरसण करण्यात आले. त्यानंतर ई-निविदेस कमी प्रतिसाद मिळाल्याने दि.१८ जुलै २०१७ ऑनलाईन ई-निविदा दाखल करणेस मुदत वाढ देण्यात आली होती. त्यानुसार ऑनलाईन ०४ निविदा आलेल्या आहेत. सदर निविदांच्या प्राप्त झालेल्या हार्ड कॉपींचा तपशिल खालील प्रमाणे :-

| **अ.नं.** | **निविदा धारकांचे नाव** | **प्राप्त ठिकाण व दिनांक** |
|---|---|---|
| १ | सीएलआर फॅसीलीटी सर्व्हीसेस, पुणे | सामान्य प्रशासन विभाग, दि.१० जुलै २०१७ |
| २ | बक्षी सेक्युरीटी ॲण्ड सर्व्हीसेस, मुंबई | श्री साईबाबा हॉस्पिटल, दि.१३ जुलै २०१७ |
| ३ | बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे | सामान्य प्रशासन विभाग, दि.१३ जुलै २०१७ |
| ४ | स्पिक-एन- स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई | श्री साईबाबा हॉस्पिटल, दि.२० जुलै २०१७ |

उपरोक्त प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक ई-निविदा दि.०४ ऑगस्ट २०१७ रोजीच्या खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात आलेल्या आहेत. पात्र झालेल्या निविदाधारकांचे कमर्शियल बिड दि.०४ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या मा.खरेदी समिती सभेसमोर समक्ष उघडण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| **अ.नं.** | **निविदा धारकांचे नाव** | **वार्षीक दर** |
|---|---|---|
| १ | सीएलआर फॅसीलीटी सर्व्हीसेस, पुणे | २,९९,२२,१४४/- |
| २ | बक्षी सेक्युरीटी ॲण्ड सर्व्हीसेस, मुंबई | २,३३,६०,८८०/- |
| ३ | बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे | २,७७,८८,०५०/- |
| ४ | **स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई** | **२,३२,९९,७०४/-** |

वरील तुलनात्मक दरांचे तक्त्यात मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे दर निम्नतम येत आहे. तरी मे.स्पिक-एन- स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे बरोबर चर्चा वाटाघाटी करून निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाचे यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांचे वार्षिक रु.२,३२,९९,७०४/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **साईआश्रम भक्तनिवास येथे मेन्टेनन्स कामासाठी रंग मटेरीअल खरेदी करणेकामी प्राप्त वाणिज्यिक प्रस्तावांवर निर्णय घेणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (त्र) अन्वये, भक्तांना निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय–** दि.३०/११/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ७७० अन्वये "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावत नमूद केलेप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्सकामी आवश्यक असलेले रंग मटेरीअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन सदर प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासून साई भक्तांकरीता खुला करण्यात आलेला आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत प्रकल्पातील इमारतीचे बांधकाम देणगीदाखल करणेत आले आहे. सदर इमातरीचे बांधकामाकरीता त्यांचेमार्फत ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स, दिल्ली यांची नियुक्ती करणेत आली होती. ठेकेदार यांचा या कामाचा दोषदायीत्व कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. सदरचा दोषदायीत्व कालावधी संपुष्टात आलेपासून सदर प्रकल्पाचे व इमारतींचे मेन्टेनन्स संस्थानमार्फत करण्यात येत आहे. साई आश्रम भक्तनिवास येथे एकूण १५३६ खोल्या आहे. त्यामध्ये सततच्या वापराने रंगकामाचे मेन्टेनन्स निघत असते. भक्तांना तातडीने सेवा-सुविधा पुरविणेकामी सदरचे काम तातडीने करणे आवश्यक असल्याने याकामी रक्कम रु. २,७९,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्ताव-** याकामी दि.१३/०२/२०१७ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये विहीत पध्दतीने पुरवठादारांना पत्र देऊन दरपत्रके मागविणेत आली होती. सिलबंद दरपत्रके सादर करणेसाठी पुरवठादारांना दि२१/०३/२०१४७ अखेर मूदत देण्यात आली होती. विहीत मूदतीत ०८ दरपत्रके प्राप्त झाली होती. सदर प्राप्त दरपत्रके दि.०३/०४/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेतआले होते. तथापी दरपत्रकांमध्ये रंग मटेरीअल खरेदीकरीता दोनच कंपन्या नमूद केलेल्या असल्याने सदर दरपत्रके रद्द करुन नव्याने सुधारीत दरपत्रके मागविणेचे ठरले. तदनंतर याकामी दि.१३/०५/२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये, वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई- निविदा मागविणेत आल्या होत्या. पुरवठादार यांना ई-निविदा अपलोड करण्याचा कालावधी दि.२७/०५/२०१७ ते दि.०६/०६/२०१७ अखेर असा ठेवण्यात आली होता सदरहु कालावधीत ०३ ई-निविदा अपलोड झालेल्या होत्या त्यापैकी ०२ पुरवठादार पात्र झाल्याने याकामी फेर ई-निविदा मागविणेचे ठरले तदनंतर दि.२२/०६/२०१७ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर फेर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेत आल्या पुरवठादार यांना ई-निविदा अपलोड करण्याचा कालावधी दि.१४/०८/२०१७ ते दि.२४/०८/२०१७ अखेर असा होता. सदर कालावधीत खालील ०३ ई-निविदा अपलोड झालेल्या आहेत.

| **अ.नं.** | **पुरवठादाराचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२ | युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक |
| ०३ | श्री साईदिप हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, कोपरगांव |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक ईनिविदा मा. खरेदी समितीचे दि.३०/०८/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त तीनही ठेकेदार पात्र झाले आहेत.

| **अ.नं.** | **पुरवठादाराचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२ | युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक |
| ०३ | श्री साईदिप हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, कोपरगांव |

उपरोक्त ०३ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यीक निविदा) दि.०४/१०/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, तयांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **पुरवठादाराचे नांव/ गांव** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | ३,२३,४५६/- | -- |
| ०२ | युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक | ३,१२,३६६/- | -- |
| ०३ | श्री साईदिप हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, कोपरगांव | **२,९०,३००/-** | **निम्नतम** |

उपरोक्त तपशिलानुसार उपरोक्त निविदाधारकांपैकी पुरवठादार श्री साईदिप हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, कोपरगांव यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना पुरवठा आदेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्स कामासाठी रंग मटेरीअल खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील श्री साईदिप हार्डवेअर ॲण्ड मशिनरी, कोपरगांव यांचे रु.२,९०,३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**०३ कचरा वाहतुकीकरता टाटा कंपनीचे एलपीके-९१२ टिप्पर हे नविन वाहन खरेदी करणेकामी प्राप्त पुरवठादारांचेदरपत्रकापैकी निम्नतम दर देणारे पुरवठादारास पुरवठा आदेश देणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

कलम १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष् आदेशास अधीन राहून , संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्यीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

१. कलम २१(१) मध्ये विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयक अधिनियम, १९६१ च्या तुरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करणत येईल,--

(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावना-** सध्या संस्थान मधील कचरावाहतुकी करीता टाटा ४०७ (हायड्रोलिक टिप्पर सह)हे वाहन वापरात असून सदरचे वाहन ११ वर्षे जुने झालेले असल्याने सदर वाहनांची जाहिर लिलावाने विक्री करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि १९/९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६४८ नुसार तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडील पत्र क्र. सासंवि/१०१७/२५/प्रक्र२८/का१६ दि १४/०७/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली असून लिलावाबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे.

यामुळे कचरा वाहतुकीचे कामात अडचण येऊ नये याकरीता सध्याच्या वाहनांची जाहिर लिलावाने विक्री होणे पुर्वी नविन वाहन खरेदी करणे आवश्यक असलेने याकामी टाटा कंपनीचे एलपीके-९१२ सहा टायर हायड्रोलिक टिप्परसह खरेदी करणेस मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेपुढेसादर करण्यात आला होता. या सभेत निर्णय क्रं.७२० नुसार , "कचरा वाहतुकीकामी टाटा कंपनीचे एलपीके-९१२ (इंजिन-४९७ टीसीआयसी- सीआर) ६ टायर व हायड्रोलिक टिप्पर सुविधा असलेले नविन वाहन खरेदी करणेकामी विहित पध्दतीने दरपत्रके मागविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली." असे ठरले आहे.

यानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/३१७८/२०१७ दिनांक १५/०९/२०१७ अन्वये टाटा कंपनीचे अधिकृत पुरवठादारांकडून दिनांक २५/०९/२०१७ अखेर दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणेकरीता सदरचे पत्र संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

याकामी मुदतीत प्राप्त झालेली चार पुरवठादारांची दरपत्रके खरेदी समितीचे दिनांक ०४/१०/२०१७ रोजीचे सभेत उघडण्यात आलेली असून त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | शुभयान मोटर्स प्रा.लि. अहमदनगर | स्टरलिंग मोटर्स नाशिक | बाफना ॲटोमोटीव्ह आंबेगांव(बु.) कात्रज | **सतिष मोटर्स प्रा.लि. वाळूंज औरंगाबाद** |
|---|---|---|---|---|
| एक्स शोरुम किंमत | १४२७६२८.०० | १४२८३८५.०० | १३५४०९६.०० | १२७१३००.०० |
| विमा | ४३९६०.०० | ४२५९६.०० | ४५०००.०० | ३९८२७.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सी आर टी एम | २०००.०० | १०००.०० | १२००.०० | २८००.०० |
| टि.सी.एस | १४२७६.०० | १४२८३.०० | १३५४१.०० | १२७१३.०० |
| हॅन्डलींग चार्जेस | ----- | ३०००.०० | ०० | ०० |
| एकुण | १४८७८६४.०० | १४८९२६४.०० | १४१३८३७.०० | १३२६६४०.०० |
| डिस्काऊंट | १२५०००.०० | ०० | ०० | ०० |
| **एकूण रक्कम** | १३६२८६४.०० | १४८९२६४.०० | १४१३८३७.०० | **१३२६६४०.००** |
| शेरा | L-2 | L-4 | L-3 | **L-1** |

**विभागाचा अभिप्राय-** वरील दरांचा विचार करता सतीष मोटर्स प्रा. लि. वाळूंज, औरंगाबाद यांनी उपरोक्त वाहनांकरीता दिलेले दर रु १३,२६,६४०.०० (अक्षरी रु..तेरा लाख सव्हीस हजार सहाशे चाळीस मात्र) निम्नतर असून ते स्विकारण्यात येऊन त्यांना सदर वाहनाचा पुरवठा आदेश देण्यास खरेदी समितीने मान्यता दिलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थीक विषय इ छाननी करुन अनुमान-** महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियम पुस्तीकेतील ३.२.३ (दरपत्रकाच्या आधारे खरेदी) मध्ये, "कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि , मोटार वाहन (कार) खरेदी रु.१ कोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निवीदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी." असे तरतूद आहे.

**मागणी:-** उपरोक्त प्रमाणे टाटा एलपीटी-९१२ टिप्पर खरेदी कामी सतिष मोटर्स प्रा. लि. वाळूंज, औरंगाबाद यांनी देऊ केलेले निम्नतम दर रु १३,२६,६४०.०० (अक्षरी रु..तेरा लाख सव्हीस हजार सहाशे चाळीस मात्र) स्विकारण्यात येऊन त्यांना पुरवठा आदेश देणेबाबत मा व्यवस्थापन समितीस शिफारस करणे करीता सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**कचरा वाहतुकीकरता टाटा कंपनीचे एलपीके-९१२ टिप्पर हे नविन वाहन खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या खरेदी प्रकियेमधील निम्नतम दरधारक सतिष मोटर्स प्रा.लि., वाळूंज, औरंगाबाद या कंपनीचे प्रतिनिधी श्री.संजय बावीस्कर हे त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, त्यांनी चर्चेअंती दरपत्रकातील सी आर टी एम ची रक्कम रु.२८००/- मात्र कमी केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कचरा वाहतुकीकरता टाटा कंपनीचे एलपीके-९१२ टिप्पर हे नविन वाहन खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील सतिष मोटर्स प्रा.लि., वाळूंज, औरंगाबाद यांचे एकत्रित रु.१३,२३,८४०/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

०४ **लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता प्लॅस्टीक क्रेटस् खरेदीकामी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील विषय नं.६६ व निर्णय क्र.५८६ अन्वये, लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता प्लास्टीक क्रेटस् खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यास अनुसरून उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये, प्लास्टीक क्रेटसबाबतची दरपत्रके बंद पाकीटामध्ये मागविण्याबाबत संस्थानच्या संकेतस्थळावर जाहीरात प्रसिद्ध करणेबाबत दि.२५/०९/२०१७ रोजी आय.टी. विभागास पत्र दिले.

त्यास अनुसरून संदर्भीय क्र.०३ अन्वये दरपत्रके मागविण्याबाबत जा.नं एसएसएस/वशी/लाडूप्रसाद-२९२५/ २०१७ दि.०१/०९/२०१७ रोजी पत्रान्वये दरपत्रके पाठविणेबाबत पुरवठा धारकांस कळविण्यात आले होते. त्यामध्ये ०८ पुरवठाधारकांनी प्लॅस्टीक क्रेटस् खरेदी करून पुरवठा करणेबाबत बंद पाकिटात दर कळविले होते. सदरची बंद पाकिटे दि.२१/०९/२०१७ रोजीच्या खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात आले असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | पुरवठादाराचे नाव | **Neelkamal** प्रती क्रेटस् साठीचा दर | **Aristo** प्रती क्रेटस् साठीचा दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे.युनियन ट्रेडींग कंपनी,नाशिक | ९६०/- | - |
| ०२ | मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | ९९५/- | - |
| ०३ | मे.रिद्धी इंटरप्राइजेस, नाशिक | १४५३/- | **६५४/-** |
| ०४ | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | १५००/- | - |
| ०५ | मे.कुसुमा इंटरप्राइजेस, नाशिक | १६००/- | - |
| ०६ | मे.विजय नॉव्हेल्टीज, नाशिक | ९३२/- | - |
| ०७ | मे.महेश इंजिनिअरिंग, नाशिक | ९१४/- | - |
| ०८ | मे.निलकमल लिमिटेड, नाशिक | **७७४/-** | - |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये मे.रिद्धी इंटरप्राइजेस, नाशिक यांचे Aristo कंपनीचे क्रेटससाठी रक्कम रु.६५४/- हे न्युनतम दर आलेले आहेत व सदरचे कंपनी साठी केवळ एकच पुरवठादाराने दर कळविले आहेत. मात्र निलकमल कंपनीचे ०३ पेक्षा जास्त पुरवठादार असल्यामुळे त्यांचेपैकी मे. निलकमल लिमिटेड, नाशिक यांचे रु.७७४/- असे निम्नतम दर आलेले आहेत. उपरोक्त तक्त्यामध्ये Aristo व Neelkamal या दोन्ही कंपनीचे दर निम्नतम आलेले आहेत. त्यांच्या क्रेटसचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | **Aristo Crate** | **Neelkamal Crate** |
|---|---|---|---|
| ०१ | मटेरियल | PPCP (Polypropylene Co-Polymer) | HDPP 90% (High-density poly Proplin) & LLDP 10% (Low-density poly Proplin) |
| ०२ | साईज | 540X390X340 | 540X360X340 |
| ०३ | वजन | 1.950 kg | 2.150 kg |
| ०४ | क्षमता | अलवचिक (Hard Plastic Material) | लवचिक (Soft Plastic Material) |
| ०५ | इतर | Banana Crate (all side are net) | Without Bottom all sides are net |
| ०६ | वाहतुक क्षमता | वहानामध्ये कमी क्रेटस् बसतात | वहानामध्ये जास्त क्रेटस् बसतात |
| ०७ | दर | मार्केट किंमतीपेक्षा (दुप्पट) अधिक दर | मार्केट किंमतीच्या तुलनेत वाजवी दर |

वरीलप्रमाणे तपशिल लक्षात घेता मे.निलकमल लिमिटेड या कंपनीचे क्रेटस दिलेल्या माहितीवरुन टिकाऊ, मजबुत व Flexible आहेत, त्यामुळे लवकर खराब होणार नाहीत, तसेच लाडु निर्मिती विभागाकडे यापुर्वीचे याच कंपनीचे क्रेटस सध्या वापरात आहेत. तसेच त्यांनी दि.०६/१०/२०१७ चे मेलद्वारे ते दरपत्रकातील दर ७७४/- ऐवजी रू.६५०/- (G.S.T सह) या दराने संस्थानला पोहोच (Door Delivery) करणार असल्याबाबत कळविले आहे.

त्यास अनुसरुन मे.निलकमल लिमिटेड, नाशिक यांना अंतीम पुरवठा आदेश देणेकामी मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरीता प्लॅस्टीक क्रेटस् खरेदीकामी मे.निलकमल लिमिटेड यांचे जी.एस.टी.सह प्रती नग रु.६५०/- (Door Delivery) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**०५ श्री साईबाबांनी वापरलेल्या मुळ पादुकांचा विमा उतरविणेबाबत.**

श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

त्याअनुषंगाने, जे सर्व सामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाहीत, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देशामध्ये ठिकठिकाणी साईभक्तांना दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात, असा उपरोक्त संदर्भान्वये निर्णय झालेला

आहे. त्यास अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत महाराष्ट्रासह देशभरातील विविध राज्यांमध्ये साईबाबांच्या मुळ पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

त्यासअनुसरुन, श्री साईबाबांच्या मूळ पादुका देशात दर्शनासाठी पाठवितांना त्याचा विमा उतरविण्यात यावा, असे लेखाशाखा विभागास कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने, श्रींच्या मूळ पादुकांचा विमा उतविणेकामी चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्याना पत्राव्दारे तसेच ई-मेलव्दारे कळविण्यात आले होते. त्यानुसार चारही विमा कंपन्यानी श्रींच्या पादुकांची किंमत कळवावी म्हणून कळविले होते. परंतु, श्रींच्या मुळ पादुकांची किंमत (सदरच्या पादुका ह्या बाबांनी स्वतः वापरल्या असल्याने ते अमुल्य असून त्याची किंमत ठरविणे अशक्य आहे.) होत नसल्यामुळे, सदर चारही विमा कंपन्यांनी पादुकांचा विमा उतरविणेस असमर्थता दर्शविली आहे. तसेच श्रींच्या मुळ पादुकांची किंमत कळविल्याशिवाय विमा उतरविता येणार नाही, असे ई-मेलव्दारे त्यांनी संस्थानला कळविलेले आहे.

त्यामुळे जोपर्यंत मुळ पादुकांचा विमा उतरविला जात नाही, तोपर्यत मुळ पादुका दर्शनाचे कार्यक्रम स्थगित ठेवावे किंवा कसे याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

तरी सदरचा प्रस्ताव हा माहितीस्तव व पुढील योग्य त्या निर्णयार्थ मा.स्थानिक उपसमितीच्या सभेसमोर सविनय सादर.

**श्री साईबाबांनी वापरलेल्या मुळ पादुकांचा विमा उतरविणेकामी आजचे उपसमिती सभेत विविध विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलविणेत आले होते. आजचे उपसमिती सभेसमोर श्री.विजय थोरात, शाखाधिकारी, युनायटेड इन्शुरंन्स कंपनी हे उपस्थित होते. त्यांनी कळविले की, विमा उतरविणेसाठी या पादुकांचीकिंमत निश्चित करावी लागेल, तरच त्यांचा विमा उतरविता येईल.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांनी वापरलेल्या मुळ पादुका अमुल्य असून त्यांची किंमत होऊ शकत नाही, याकरीता व्यवस्थापन समितीच्या दिनांक २०.०८.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६८६ अन्वये मंजुरी दिलेल्या पादुका दर्शन सोहळयाच्या नियमावलीमधील विमा उतरविणेबाबतची अट क्र.१२ रद्द करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

०६ **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा करणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमामधील क्रमांक १७ (१) व १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – नवीन प्रस्ताव**

**प्रास्तविक –**श्री साईबाबासंस्थानचे शैक्षणिक संकुलात सालाबाद प्रमाणे १४ नोंव्हेबर रोजी बालदिन साजरा करण्यात येत असतो. सदरचा बालदिन हा प्रत्येक शाळा आपआपले शालेय वेळापत्रकानुसार आपआपले शालेय क्रिडांगणावर साजरा करत असतात यामध्ये विद्यार्थ्यांकरवी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात तसेच रांगोळी, चित्रकला, हस्तकला, नाटयकला, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते व आनंदी वातावरणात उत्साहात साजरा केला जातो. सर्व शैक्षणिक संकुलाकडे खालीलप्रमाणे विभाग असून खालीलप्रमाणे अंदाजे विद्यार्थी संख्या आहे.

| अ.नं. | विभाग | विद्यार्थी संख्या | वर्ग तपशिल |
|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण संस्था | ४५० | औद्यगिक क्षेत्र एकूण 11 ट्रेड कोर्स चे विद्यार्थी |
| २ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल | २६०० | ज्यु.व सिनी केजीव इयत्ता 1 ली 10 वी |
| ३ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर | ७६० | इयत्ता 5 वी 10 वी |
| ४ | श्री साईबाबा ज्युनियर कॉलेज | १३५० | इयत्त 11 वी 12 वी |
| | **एकूण अंदाजे विद्यार्थी संख्या** | **५१६०** | |

प्रस्ताव क्रं.- १) शालेय स्तरावर १४ नोव्हेंबर बालदिन साजरा करावयाचा झाल्यास त्याबाबतचे नियोजन खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | इं. मि. स्कुल | तपशिल |
|---|---|---|
| १ | ज्युनियर व सिनीयर केजी | चित्र रंगविणे व फनी गेम |
| २ | इयत्ता १ ली ते ४ थी | विविध वेशभूषा करणे व सांस्कृतीक दर्शन घडविणे व फनी गेम |
| ३ | इयत्ता ५ वी ते ६ वी | चित्र काढणे व चित्र निवड करुन प्रदर्शन भरविणे व फनी गेम |
| ४ | इयत्ता ७ वी | रांगोळी काढणे / फनी गेम |
| ५ | इयत्ता ८ वी ते १० वी | हस्तकला प्रदर्शन / चित्रकला स्पर्धा / कोलाज वर्क व प्रदर्शन |
| | **कन्या विद्या मंदीर** | |
| १ | इयत्ता ५ वी ते ७ वी | फनी गेम |
| २ | इयत्ता ८ वी ते १० वी | रांगोळी स्पर्धा / फनी गेम |
| | **औद्यगिक प्र. संस्था** | |
| १ | सर्व ट्रेडचे विद्यार्थी | निबंध व रांगोळी स्पर्धा / फनी गेम |
| | **कनिष्ठ महाविद्यालय** | |
| १ | इयत्ता ११ वी १२ वी | निबंध व रांगोळी स्पर्धा / फनी गेम |

उपरोक्त स्पर्धा ही शालेय स्तरावर आयोजित करावयाचे झाल्यास प्रत्येक शाळेने आपआपल्या क्रिडांगणांवर उपक्रम घेऊन बालदिन साजरा करता येईल. तसेच यादिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत म्हणून शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुष्प गुच्छ देता येईल. शाळेच्या इमारतीचे आतील बाजूस व बाहेर क्रीडांगणावर शक्य होईल त्या ठिकाणी पताका, फुगे, फुले वापरुन शाळेची सजावट करता येईल. तसेच यादिवशी विद्यार्थ्यांना रंगीत कपडे घालणेस परवानगी देता येईल. सदरचा खर्च प्रत्येक विभागाचे वार्षिक किरकोळ खर्च बजेट मधून करता येईल.

**प्रस्ताव क्रं.- २ शैक्षणिक संकुलामार्फत एकत्रीत साजरा करावयाचे झाल्यास त्याबाबत खालीलप्रमाणे नियोजन करता येईल.**

१. श्रीसाईबाबा कन्या मंदीर वगळाता सर्व शाळा या सकाळ व दुपार असे दोन सत्रात भरविण्यात येत असल्याने एकूण अंदाजे ५००० विद्यार्थी एकाच वेळेत शाळेत आणावे लागतील व स्कुलबस सेवा पुरविता येणार नाही. लहान विद्यार्थ्यांना पालकांसमवेत शाळेत आणावे लागतील तसेच कन्या विद्या मंदीर शालेय वेळ बदलावी लागेल.

२. संपूर्ण शैक्षणिक संकुल विद्यार्थी संख्या विचारात घेता इ. मि.स्कुल व कन्या विद्या मंदीराचे पुर्व बाजूस असलेल्या हिरवळीचे ग्रांऊडवर १०० बाय १०० आकाराचा मंडप व्यवस्था करावी लागेल. याकरीता वाढीव खर्च होण्याची शक्यता नाकरता येत नाही. तथापि सदरचा कार्यक्रम सकाळी ०८ ते ११ या वेळेत नियोजन करावा लागेल, जेणेकरुन मंडप टाकण्याची आवशकता भासणार नाही. तसेच मुलांना रंगीत कपडे घालण्यास परवानगी देता येईल.

३. शैक्षणिक संकुलाचे स्टेजवर संस्थानकडे आलेली साऊंड सिस्टम वापरता येईल.

४. सदर कायर्क्रमास विशेष आकर्षण म्हणून मॅझीक शो किंवा कठपुतली शो चे आयोजन करता येईल.

५. सदर दिवशी शिक्षकांमार्फत व विद्यार्थ्यांमार्फत स्टेजवर सांस्कृतीक कार्यक्रम घेता येईल.

६. सदरचे कार्यक्रमाचे दिवशी अनाथ आश्रमातील विद्यार्थी निमंत्रीत करुन त्यांचा विद्यार्थी अथवा उपस्थित मान्यवरांचे शुभहस्ते सत्कार करता येईल तसेच सत्कारात त्यांना पुष्प गुच्छ व प्रसाद म्हणून बुंदी पॅकेट देता येईल.

७. मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहनपर बौद्धीक देणे हा कार्यक्रम करता येईल.

८. सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी वर्ग यांना अल्पोपहार म्हणून शिरा व पोहे देता येईल.

उपरोक्तप्रमाणे बालदिनाचे नियोजन करता येईल.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार शासन निर्देश तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ छाननी करुन अनुमान –**शालेय व्यवस्थापनाचा भाग म्हणून करणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय–** तरी उपरोक्त प्रस्ताव १ किंवा २ नुसार बालदिनाचे नियोजन करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने उपरोक्त प्रस्तावामधील पर्याय क्र.१ प्रमाणे दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी बालदिन साजरा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

०७ **दिनांक १० नोव्हेंबर, २०१७ रोजी साई भजनसंध्या कार्यक्रम करणेसाठी परवानगी मिळणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री.पारस जैन (गायक), शिर्डी यांनी दि.१८ व २१/१०/२०१७ रोजीचे मा.कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात, दिल्लीहून २०० ते ४०० साईभक्त दि.१०/११/२०१७ रोजी शिर्डीस येत आहेत. सदर दिवशी साई भजनसंध्या कार्यक्रमासाठी त्यांनी संस्थानचे श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे सायं.७ ते रा.९.३० या वेळेत भजनसंध्या करण्याची परवानगी मागितली आहे. सदरच्या पत्रावर मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य, श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी "श्री.बागवे पहावे" असा अभिप्राय देऊन सदरचे पत्र शताब्दी कक्षाकडे दिले आहे.

श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

**प्रस्ताव:-** शताब्दी वर्षातील आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे वेळापत्रकात दि.१०/११/२०१७ रोजी कोणताही कार्यक्रम प्रस्तावित नाही. तथापि मंदिर विभागातर्फे होणारा श्री.ईश्वर क्षेत्रम,

हैद्राबाद यांचा कुचीपुडी नृत्याचा कार्यक्रम नियोजित आहे. सदर कार्यक्रम दुपारी ३ ते ५.३० या वेळेत घेता येईल व श्री.पारस जैन, शिर्डी याचा कार्यक्रम सायं.७ ते ९.३० या वेळेत आयोजित करता येईल.

तरी दि.१०/११/२०१७ रोजी सायं.७ ते रा.९.३० या वेळेत श्री.पारस जैन, शिर्डी यांचा साईभजन संध्या कार्यक्रम तसेच त्याच दिवशी दुपारी ३ ते ५.३० या वेळेत श्री.ईश्वर क्षेत्रम, हैद्राबाद यांचा कुचीपुडी नृत्याचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे मंदिर विभागामार्फत आयोजित करणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी वर्षातील आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये दि.१०/११/२०१७ रोजी सायं.७ ते रा.९.३० या वेळेत श्री.पारस जैन, शिर्डी यांचा साईभजन संध्या कार्यक्रम तसेच त्याच दिवशी दुपारी ३ ते ५.३० या वेळेत श्री.ईश्वर क्षेत्रम, हैद्राबाद यांचा कुचीपुडी नृत्याचा कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**०८ माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन

संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर वेळापत्रकातील माहे ऑक्टोबर २०१७ मधील प्रस्तावित कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडलेले आहेत. आता माहे नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी कलाकार निश्चिती करणे आवश्यक आहे. यासाठी खालील तक्त्यात मोफत सेवा देणारे कलाकार तसेच मानधन घेऊन सेवा देणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे.

| अ. नं. | दिनांक | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ११/११/२०१७ सायं.७ ते रा.१० | डॉ.स्वाती दैठणकर | पुणे | 9423508254 | तेजोनिधी – स्वामी विवेकानंद डान्स ॲण्ड ड्रामा | १० | ७५,०००/- + जाणे व येणे प्रवास खर्च किंवा संस्थान देईल ते मानधन | मा. श्री.प्रताप भोसले सो. यांची शिफारस |
| २) | २५/११/२०१७ सायं.७ ते रा.१० | विश्वनाथ ओझा | श्रीरामपूर | 9422226211 | साईभजन | | मोफत | मा. श्री.प्रताप भोसले सो. यांची शिफारस |
| ३) | २३/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | डॉ.प्रवीण गावकर | पणजी | 9422058154 | साईनाद | ५४ | | स्वतंत्रपणे टिपणी सादर करण्यात आलेली आहे. |
| ४) | २४/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | अशोक हांडे | मुंबई | 9821082804 | हिंदी साईभजन | | | मा.विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| ५) | २५/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | साईलिला नाटक (हिंदी) मनोज शर्मा | बालाघाट (म.प्र.) | 9300984678 7000563395 | हिंदी नाटक | ४० | फक्त प्रवास खर्च १,२०,०००/- | |
| ६) | २६/१२/२०१७ सायं.७ ते रा. ८ | आदीवासी कांबडवने व महिला फुगडी नृत्य मंडळ | शिंगणवाडी (लव्हाळवाडी) अकोले | 8600502580 | नृत्य व फुगडी | २० महिला व ३० पुरुष | फक्त प्रवास खर्च १५,०००/- | आदिवासी कलाकार असल्याने त्यांना कमीतकमी प्रवास खर्च द्यावा असे वाटते. |
| | सायं.८ ते रा. १० | चामुंडेश्वरी फुगडी मंडळ | कुडाळ, जि.सिंधुदुर्ग | 9834604011 | लोकनृत्य | ५० | फक्त प्रवास खर्च ५०,०००/- | मध्यमवर्गीय कलाकारअसून ते दूरवरुन येणार असल्याने त्यांना कमीतकमी प्रवास खर्च द्यावा असे वाटते. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७) | २७/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | अ) अनंत पांचाळ | मुंबई | 9930126327 | हिंदी साईभजन | १५ | प्रवास खर्च २५,०००/- | |
| | | ब) हरिश ग्वाला | मुंबई | 9867491499 | हिंदी साईभजन | १० | प्रवास खर्च ४५,०००/- | |
| | | क) धीरज पांडे | नागपूर | 9890071198 | हिंदी साईभजन | २० | मोफत | |
| | | ड) बादल बात्रा | नागपूर | 9579883339 | हिंदी साईभजन | १५ | मोफत | |
| ८) | २८/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | ओम श्री साईनाथ मराठी नाटक | मुंबई | 9820041182 | मराठी संगितमय नाटक | ५५ | १,२५,०००/- | |
| ९) | २९/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | सप्तरंग चॅरीटेबल ट्रस्ट (डॉ.भारत जेठवाणी) | नांदेड | 9975025270 | लोकनृत्य | २० | मोफत | |
| १०) | ३०/१२/२०१७ सायं.७ ते रा.१० | अ) श्री सच्चिदानंद आप्पा | मुंबई | 9820148678 | साईभजन | १० | मोफत | साईभक्त श्री.नारायण मुंदडा आयोजनाचा खर्च करणार आहेत. 9322114999 |
| | | ब) हमसर हयात निजामी | दिल्ली | 9818100108 | हिंदी साईभजन | | ४,५०,०००/- | |
| | | क) नवीन प्रभाकर | मुंबई | 9773119898 | मिमीक्री | १० | ५,००,०००/- | |
| | | ड) रविंद्र साठे | | 9821503690 | साई भजन | | २,००,०००/- | |
| ११) | ३१/१२/२०१७ सायं.७ ते रा.९.३० | अ) अजित कडकडे | | | साईभजन | | | |
| | | ब) अनुपमा देशपांडे | मुंबई | 9820124795 | भजन | | १,५०,०००/- | |
| | | क) सुदेश भोसले | मुंबई | | | | | मा.विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| | | ड) नितिन मुकेश | मुंबई | | | | | मा.विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |
| १२) | ३१/१२/२०१७ रा.९.३० ते रा.१२ | अ) दिलीप शडंगी | रायपूर (छत्तीसगढ) | 7354454444 9437184763 | हिंदी साईभजन | २५ | प्रवास खर्च ३१,०००/- | |
| | | ब) श्रावण बाळा | मुंबई | 9664198852 | साईभजन | २५ | प्रवास खर्च २१,०००/- | |
| | | क) पंकज श्रीवास्तव | दिल्ली | 974727852 | साईभजन | | प्रवास खर्च १५,०००/- | |
| | | ड) अनुराधा पौडवाल | मुंबई | | | | | मा.विश्वस्त श्री.जयकर सो. यांची शिफारस |

तरी माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील कलाकारांबाबतच्या माहितीच्या तक्त्याचे अवलोकन करणेत आले व त्यामधील मोफत कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांच्या कार्यक्रमांचा शताब्दी वर्षातील आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये समावेश करणेत यावा. तसेच ज्या कलाकारांनी मानधनाची रक्कम कळविलेली नाही, अशा कलाकारांचे मानधन शिफारस करणाऱ्या समिती सदस्यांकडून माहिती घेऊन त्याचा खर्च तसेच इतर विनामुल्य पुरविणेत येणाऱ्या सोयी सुविधांवर होणारा खर्च याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

०९ **शताब्दी कालावधीत आर्ट ऑफ लिव्हींगचे गायक कलाकार श्री.अमेय डबली व इतर, मुंबई तसेच श्री.भुषण मालु व इतर, अहमदनगर यांचे कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री.शेखर मुंदडा, सल्लागार, आर्ट ऑफ लिव्हींग, महाराष्ट्र यांनी त्यांचे दि. ३१/१०/२०१७ चे पत्रात आर्ट ऑफ लिव्हींगचे गायक श्री अमेय डबली आणि इतर, मुंबई व श्री भुषण मालु आणि इतर, अहमदनगर यांचे अनुक्रमे दि. ३०/११/२०१७ व दि. २१/१२/२०१७ रोजी सायंकाळी आयोजित करणेबाबत कळविले असून, यात त्यांनी प्रवास खर्च, राहण्याची व्यवस्था व भोजनाची व्यवस्था संस्थानने करणेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात

शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

याबाबत समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांच्या प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर वेळापत्रकात माहे माहे नोव्हेंबर २०१७ दि.११/११/२०१७ व दि.२५/११/२०१७ तसेच डिसेंबर २०१७ मध्ये दि.२३/१२/२०१७ ते ३१/१२/२०१७ मध्ये आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमांसाठी कलाकार निश्चिती व त्यांचे मानधन ठरविणेबाबत मा.स्थानिक उपसमितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सदरहु प्रस्तावात कळविलेनुसार आर्ट ऑफ लिव्हींगचे गायक श्री अमेय डबली आणि इतर, मुंबई यांचा कार्यक्रम दि. ३०/११/२०१७ रोजी व श्री भुषण मालु आणि इतर, अहमदनगर यांचा दि. २१/१२/२०१७ रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत कार्यक्रम श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करता येईल. सदर ठिकाणी संस्थानची साऊंड सिस्टीम यंत्रणा उपलब्ध करुन देता येईल. कार्यक्रमाचे मानधनाची त्यांनी मागणी केलेली नाही. मात्र श्री अमेय डबली आणि इतर, मुंबई यांनी रुपये ४०,०००/- व श्री भुषण मालु आणि इतर, अहमदनगर यांनी रुपये ३०,०००/- असे एकूण रुपये ७०,०००/- मात्रच्या प्रवास खर्चाची मागणी केलेली आहे. तसेच त्यांनी कळविलेप्रमाणे निवासाची व भोजनाची व्यवस्था संस्थानला मोफत करावी लागणार आहे.

तरी आर्ट ऑफ लिव्हींगचे गायक श्री अमेय डबली आणि इतर, मुंबई यांचा कार्यक्रम दि ३०/११/२०१७ रोजी व श्री भुषण मालु आणि इतर, अहमदनगर यांचा दि. २१/१२/२०१७ रोजी कार्यक्रम श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करणेस, त्यांना अनुक्रमे ४०,०००/-, ३०,०००/- याप्रमाणे रुपये ७०,०००/-प्रवास खर्च देणेस तसेच त्यांची निवासव्यवस्था, चहा, पाणी, नाष्टा, व्ही.आय.पी. कक्षात प्रसादभोजन, दर्शन/ आरती, सत्कार आदी व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेच्या प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी वर्षातील आयोजित धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये आर्ट ऑफ लिव्हींगचे गायक श्री अमेय डबली आणि इतर, मुंबई यांचा कार्यक्रम दि ३०/११/२०१७ रोजी व श्री.भुषण मालु आणि इतर, अहमदनगर यांचा कार्यक्रम दि.२१/१२/२०१७ रोजी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करणेस व त्यांना अनुक्रमे ४०,०००/-, ३०,०००/- मात्र प्रवास खर्च देणेस मान्यता देण्यात यावी. तसेच त्यांची निवासव्यवस्था, चहा, पाणी, नाष्टा, व्ही.आय.पी. कक्षात प्रसादभोजन, दर्शन/आरती, सत्कार आदी व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

१० **दिनांक ०१ जानेवारी, २०१८ रोजी सुप्रसिध्द पार्श्वगायक श्री.सुखविंदर सिंग व सजदा सिस्टर्स या कलाकारांचा कार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये

आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे, "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री.मंगेश वामनराव त्रिभुवन, नगरसेवक, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी दि.२४/१०/२०१७ रोजीचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात, "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त सुप्रसिद्ध पार्श्वगायक श्री.सुखविंदर सिंग व सजदा सिस्टर्स या कलाकारांनी दि.१ जानेवारी २०१८ रोजी श्री साईबाबा समाधी नजीक असलेल्या पारायण मंडप (१६ गुंठे) या ठिकाणी आपली कलारुपी विनामुल्य सेवा देण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तरी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेने हि सेवा देण्याची परवानगी द्यावी हि नम्र विनंती" असे कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

याबाबत समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांच्या प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर वेळापत्रकात माहे माहे नोव्हेंबर २०१७ दि.११/११/२०१७ व दि.२५/११/२०१७ तसेच डिसेंबर २०१७ मध्ये दि.२३/१२/२०१७ ते ३१/१२/२०१७ मध्ये आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमांसाठी कलाकार निश्चिती व त्यांचे मानधन ठरविणेबाबत मा.स्थानिक उपसमितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

दि.०१ जानेवारी २०१८ रोजी कोणताही सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तावित नाही. श्री.मंगेश वामनराव त्रिभुवन यांचे विनंती अर्जान्वये नवीन वर्षाचे शुभारंभप्रसंगी सुप्रसिद्ध पार्श्वगायक श्री.सुखविंदर सिंग व सजदा सिस्टर्स यांनी श्री साईबाबा समाधी मंदिर शताब्दीमंडपात विनामुल्य कार्यक्रम करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

तरी दि.०१ जानेवारी २०१८ रोजी सायं.७ ते रा.१० या वेळेत श्री.सुखविंदर सिंग व सजदा सिस्टर्स या कलाकारांचा कार्यक्रम श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करणेस तसेच त्यांची मोफत निवासव्यवस्था, चहा, पाणी, नाष्टा, व्ही.आय.पी. कक्षात प्रसादभोजन, दर्शन/आरती, सत्कार आदी व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेच्या मान्यतेस्तव सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि.०१ जानेवारी २०१८ रोजी सायं.७ ते रा.१० या वेळेत श्री.सुखविंदर सिंग व सजदा सिस्टर्स या कलाकारांचा कार्यक्रम श्रीसाईबाबा समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे आयोजित करणेस मान्यता देण्यात यावी. तसेच त्यांची निवासव्यवस्था, चहा, पाणी, नाष्टा, व्ही.आय.पी. कक्षात प्रसादभोजन, दर्शन/आरती, सत्कार आदी व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**११ संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पारपाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१६ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे, संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई- निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली."*

**प्रस्तावनाः** संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच दिपावली, नाताळ, उन्हाळा, पावसाळयाचे कालावधीत, तसेच संस्थान मार्फत वेळोवेळी आयोजित विविध कार्यक्रमाचे वेळी मंडप व्यवस्था केली जाते. याकामी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेडींग, स्टेज, कनात, कमानी इ. अनुषंगीक व्यवस्था करणेत येते. सदर व्यवस्था करणेकामी उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे सभेत रक्कम रु.४३,५२,२३५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२९/०९/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत खालील ९ मंडप ठेकेदारांनी ऑनलाईन ई- निविदा अपलोड केल्या होत्या .

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद |
| २. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर |
| ३. | निकिता सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औरंगाबाद |
| ४. | न्य जगदंबा मंडप डेकोरेटर्स,वावी, ता. सिन्नर |
| ५. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर |
| ६. | जेस आयडीयाज प्रा. लि., मुंबई |
| ७. | मेहेत्रे डेकोरेटर्स, अ.नगर |
| ८. | बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर, निमोण |
| ९. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर |

उपरोक्त अपलोड करणेत आलेल्या ई-निविदा दि.०४/१०/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहेत. उघडणेत आलेल्या ई– निविदांमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता सर्व ठेकेदार पात्र आहे. वरील पात्र ई- निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.३१/१०/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, ठेकेदार यांनी देऊ केलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ)** वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | १,६८,३१,८९६/- | - |
| २. | निकिता सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औरंगाबाद | ८७,९४,९७८/- | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | जेस आयडीयाज प्रा. लि., मुंबई | १,९४,९५,०९०/- | - |
| ४. | मेहेत्रे डेकोरेटर्स, अ.नगर | १,३८,८०,८५१.८४ | - |
| ५. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | ४९,६२,५४५/- | - |
| ६. | बालाजी मंडप अॅण्ड डेकोरेटर, निमोण | ४७,६३,९०५.८० | - |
| ७. | न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स,वावी, ता. सिन्नर | ४२,०८,१३२.६४ | - |
| ८. | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | **३६,९९,०१५.५०** | **निम्नतम** |
| ९. | रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | ४०,८३,२९९.७५ | - |

वर नमूद व्यवस्थेसाठी ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे दर निम्नतम असून, सदरची व्यवस्था त्यांचेमार्फत करुन घेता येईल.

**ब)** तसेच साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ या कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी फक्त दर मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नाव** | **दर** | | | **एकूण** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **४ दिवस** | **८ दिवस** | **११ दिवस** | | |
| १. | कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अ.नगर | १६/- | २४/- | २६/- | ६६/- | - |
| २. | निकिता सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औरंगाबाद | १५/- | २०/- | २५/- | ६०/- | - |
| ३. | जेस आयडीयाज प्रा. लि., मुंबई | ४०/- | ५०/- | ६५/- | १५५/- | - |
| ४. | मेहेत्रे डेकोरेटर्स, अ.नगर | ०० | **१.९०** | **१.१८** | ३.०८ | - |
| ५. | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर | १६/- | १५/- | १५/- | ४६/- | - |
| ६. | बालाजी मंडप अॅण्ड डेकोरेटर, निमोण | १४/- | १६/- | १७/- | ४७/- | - |
| ७. | न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स,वावी, ता. सिन्नर | **७/-** | १०/- | १२/- | २९/- | - |
| ८. | ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद | १३/- | १३/- | १५/- | ४१/- | - |
| ९. | रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर | १२/- | १५/- | १७/- | ४४/- | - |

वर नमूद व्यवस्थेतील ४ दिवसांकरीता मंडप उभारणीकामी मंडप ठेकेदार न्युजगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर यांचे दर निम्नतम आहे. तसेच ८ व ११ दिवसांकरीता मंडप उभारणीकामी मंडप ठेकेदार मेहेंत्रे डेकोरेटर्स, अ.नगर यांचे दर निम्नतम आहे. सदर व्यवस्था निम्नतम दरानुसार करुन घेता येईल. त्यासाठी न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी, व मेहेंत्रे डेकोरेटर्स, अ.नगर यांना सभेपुढे चर्चेसाठी बोलविता येईल.

**प्रस्तावः-** संस्थान मार्फत वर्षभरात साजरे करणेत येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी मंडप ठेकेदार ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे निम्नतम दरानुसार येणारे रक्कम रु.३६,९९,०१५.५० मात्रचे खर्चास व याकामी त्यांना कार्यादेश देणेस तसेच ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तसेच साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ या कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्था करणेकामी मागविणेत आलेल्या दरानुसार मंडप ठेकेदार न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी, व मेहेंत्रे डेकोरेटर्स, अ.नगर यांचेशी वरील व्यवस्थेचे दराबाबत चर्चा करुन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ मध्ये नमुद केलेप्रमाणे, संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ऋतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे एकत्रित रु.३६,९९,०१५.५० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा व ऐनवेळी**

**आवश्यकतेनुसार वाढीव मंडप अथवा इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी.**

**तसेच प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेले, साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ या कालावधीत संस्थान परिसरात साईभक्तांचे तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ४, ८ व ११ दिवसाचे एकत्रित दर मागविणेत आलेले होते. परंतु मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर यांनी ४ दिवसांसाठीचे दर भरलेले नाहीत तसेच ८ व ११ दिवसांकरीता प्रति दिवसाचे दर देऊ केलेले आहेत, त्यामुळे त्यांना अपात्र करणेत येऊन, याकामीच्या निविदाप्रकियेमधील निम्नतम दरधारक न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी, ता. सिन्नर यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील दर स्विकारणेत येऊन, प्रस्तावितकामीचा त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप अथवा इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

१२ **द्वारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या दरांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापनसमितीचेसभेतीलनिर्णय:**

०१. मा. त्रिसदस्य समिती सभा दिनांक १५ मार्च, २०१४ निर्णय क्र.१८६.

०२. मा .व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ मार्च, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२४ (७).

०३. मा .व्यवस्थापन समितीचे दिनांक २५ जुलै, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२१.

**प्रस्तावना:** द्वारावती निवासस्थान समोरील गार्डन मध्ये असलेल्या रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक बसवून रस्ता (पाथवे) तयार करणेसाठीयेणारे अंदाजे रु.१२,२९,९००/- खर्चाचे प्रस्तावासमा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.१८६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सदर कामासाठी बाहेरील ठेकेदाराकडून करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सूचना प्रसिध्द करणेत येऊन, दि.२५/०९/२०१७ अखेर ई-निविदा मागविणेत आल्या आहेत. याकामी एकुण १० ई-निविदा प्राप्त झाल्या असून, प्राप्त ई-निविदेचा लिफाफा क्र.०१ (Technical bid) दि.०४/१०/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडणेत येऊन, त्यांचा छाननी अहवाल केला असता, त्यामध्ये एकुण ०७ ठेकेदारांनी पात्रतेचे निकष पूर्ण केले असल्याने, पात्र झाले आहेत. पात्र ठेकेदारांचे ई-निविदेचा वाणीज्यीक देकार (Commercal bid) दि.३१/१०/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडणेत आला असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Name of Bidders | Quated | | Remark |
|---|---|---|---|---|
| | | Percentage | Amount | |
| 01. | Manoj Construction, Nashik | -5.16% | 11,66,437.28 | |
| 02. | Shri. D. B. Phopse, Vaijapur | -22.10% | **9,58,092.20** | L-1 |
| 03. | AkshayLobhajiKatore, Ahmednagar | -0.99% | 12,17,724.12 | |
| 04. | Infini Engineers And Contractors, kothrud, Pune. | +6.37% | 13,08,244.77 | |
| 05. | Sai Engineering Works, Vaijapur | +13.85% | 14,00,241.30 | |
| 06. | ShesheraoLaxmanraoPawar, Aurangabad | -20.11% | 9,82,567.21 | |
| 07. | KasamIliyasKacchi, Manmad | +1.86% | 12,52,776.27 | |

**प्रस्ताव:** विषयांकीत कामासाठी वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ई-निविदेमध्ये श्री.डी.बी. फोपसे, वैजापूर यांनी देऊ केलेले दर (रु.९,५८,०९२.२०) निम्नतम स्वरुपाचे आहेत. तरी त्यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवव्यवस्थापनसमितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती निवासस्थान समोरील गार्डनमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी श्री.डी.बी. फोपसे, वैजापूर यांचे रु.९,५८,०९२.२० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा व सदरहू काम पुर्ण करणेसाठी त्यांना एका महिन्याची मुदत देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

१३ **श्रींचे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या Digitalization यंत्रणेचे करणेकरीता आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, साहित्य/ वस्तु खरेदी करणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांतील ऑनलाईन प्राप्त वाणिज्यीक तुलनात्मक तक्त्यास अनुसरुन निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्याच्या शिफारशीबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद–** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६-१७(१) संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.–** दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र.१४३.

**प्रास्ताविक-** साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभतेने व्हावे याकरीता मंदिर परिसरात Live Darshan यंत्रणा कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर यंत्रणा कार्यान्वित करुन २० वर्ष होवुन गेलेले आहेत व बरेचसे साहित्य हे कालबाहय झाल्याने मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणेचे Digitalization करणेकरीता विविध प्रकारचे साहित्य, सॉफ्टवेअर विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवुन खरेदी करणेकरीता व त्याकरीता येणारे अंदाजे रक्कम रु.९१,२८,२९८/- + All Taxes मात्रचे खर्चाचे मान्यतेसतव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दि. २५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ०८, निर्णय क्र.१४३ अन्वये सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवुन, "मंदिर परिसरात सध्या कार्यान्वित असलेली Live Darshan, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग यंत्रणा नविन अद्यावत करणेकरीता प्रस्तावात नमुद केलेले साहित्य / सॉफ्टवेअर विहीत पद्धतीने ई-निवीदा मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली" त्यास अनुसरुन, सदर प्रस्तावामधील नमुद केलेले साहित्य, सॉफ्टवेअर खरेदी करणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी दि.२५/०४/२०१७ ते दि.१५/०५/२०१७ अखेर दि.०८/०४/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निवीदा प्रक्रीयेत ०३ निवीदाधारकांनी सहभाग घेतलेला होता. सदर ई-निवीदांतील निवीदाधारकांचे प्राप्त तांत्रिक लिफाफे दि.०७/०६/२०१७ रोजी मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेले असुन सदर निवीदाधारकांचे कागदपत्रांची (Hardcopy) तपासणी केली असता तीनही निवीदाधारक पात्र ठरत होते. परंतु ऑनलाईन प्राप्त कागदपत्रांची तपासणी केली असता दोन निवीदाधारक अपात्र ठरले आहे. त्यामुळे दि.०४/०९/२०१७ ते दि.२०/०९/२०१७ अखेर दुस-या वेळेस ई-निवीदा मागविण्यत आलेल्या आहेत. सदर ई-निवींदांचे प्राप्त झालेले तांत्रिक (Technical Bid) लिफाफे दि.०४/१०/२०१७ रोजी खरेदीचे समितीपुढे उघडण्यात आलेले असुन त्यांचे वाणिज्यीक (Commercial Bid) लिफाफे दि.३१/१०/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडण्यात आलेले आहेत. त्याबाबतचा तांत्रिक व वाणिज्यीक तपशील खालीलप्रमाणे –

**तांत्रिक (Technical Bid) पात्रतेबाबत गोषवारा -**

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव व पत्ता | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १. | मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई | पात्र |
| २. | मे. कैलास एजन्सी, श्रीरामपुर | पात्र |
| ३. | मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी | पात्र |
| ४. | मे. टाईमवॉच इन्फोकॉम इंडीया प्रा.लि., न्यु दिल्ली | पात्र |

**ब) वाणिज्यक (Commercial Bid) तुलनात्मक तक्ता–**

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव व पत्ता | ई-निवीदेतील प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१.** | **मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई** | **८२,०४,७३०/-** | **निम्नतम दर आहेत** |
| २. | मे. कैलास एजन्सी, श्रीरामपुर | १,४५,९२,२३७/- | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | मे. साईराम डिजिटल कलर लॅब, राहुरी | १,०७,८५,६००/- | -- |
| ४. | मे. टाईमवॉच इन्फोकॉम इंडीया प्रा.लि., न्यु दिल्ली | १,२९,६०,५३१/- | -- |

तरी, उपरोक्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १ मधील मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई यांचे दर रु.८२,०४,७३०/- (अक्षरी रक्कम रुपये ब्याऐंशी लाख चार हजार सातशे तीस) निम्नतम असल्याने श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization करणेकरीता आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, साहित्य/वस्तु, खरेदी करणेकामी मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर सविनय सादर करत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** तांत्रिक व आर्थिक.

**मागणी–** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त वाणिज्यक तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. १ मधील मे.ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई यांचे दर रु.८२,०४,७३०/- (अक्षरी रक्कम रुपये ब्याऐंशी लाख चार हजार सातशे तीस) निम्नतम असल्याने श्रीं चे LIVE दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या यंत्रणेचे Digitalization करणेकरीता आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, साहित्य/वस्तु, खरेदी करणेकामी मे. ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई यांना पुरवठा आदेश देणेच्या शिफारसीकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी, ही नम्र विनंती.

**श्रींचे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या Digitalization यंत्रणेचे करणेकरीता आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, साहित्य/ वस्तु खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेसमोर चर्चेअंती त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या दरावर ५% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे लाईव्ह दर्शनासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या Digitalization यंत्रणेचे करणेकरीता आवश्यक असलेले सॉफ्टवेअर, साहित्य/ वस्तु खरेदी करणेकामी मे.ईमरजन्सी इलेक्ट्रॉनिक्स सेक्युरीटी प्रा.लि., मुंबई यांचे रु.७८,००,०००/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

१४ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व वार्ड/ विभागांसाठी लागणारे Liquid Medical Oxygen Gas Plant साठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२०१२ निर्णय क्र.३० अन्वये सदर प्लॅन्टची क्षमता वाढवून 13KL करण्यात येऊन त्यांचे दरमहा भाडे रक्कम रु.३४८७५/- सर्व करांसह असे ठरवून सदर प्लॅन्ट ०५ वर्षाकरीता रुग्णालयात बसिवण्यात यावे असे ठरले होते त्यानूसार M/s.Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५७०८ दि.०१/०२/२०१२ रोजी नविन कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानूसार दि.३१/०८/२०१२ पासून सदर Liquid Medical Oxygen Gas Plant श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे. दि.३०/०८/२०१७ रोजी सदर Liquid Medical Oxygen Gas Plant चा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्यामुळे सदर Liquid Medical Oxygen Gas Plant नव्याने बसवावा लागणार आहे.

त्यामुळे उपरोक्त Liquid Medical Oxygen Gas Plant विहित पध्दतीने ई - निविदा मागवून बसविणेस व त्याकरीता येणा-या प्रस्तावित प्रती महिना रक्कम रु.१८,९९३/- याप्रमाणे भाडे कळविलेले आहे. त्यांचे दरानूसार पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.११,३९,५८०/- (अक्षरी रु.– अकरा लाख एकोणचाळीस हजार पाचशे ऐंशी मात्र) इतका खर्च भाडेकरीता अपेक्षित आहे. तसेच गॅस सिलेंडरसह खरेदीकामी Per Cubic करीता १२.७८/ sm3 इतके रुपये दर असून सध्याच्या वापरानूसार प्रती महिना रक्कम रु.१,९२,३६५/- या प्रमाणे एकूण पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.१,१५,४१,९००/- (अक्षरी रु. – एक कोटी पंधरा लाख एक्केचाळीस हजार नऊशे मात्र) असे एकूण रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक

कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐशी मात्र) चे खर्चास तसेच ई- निविदा मागवून खरेदीस मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.१०४ अन्वये उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दि.२६/०६/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२६/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार दि.१०/०८/२०१७ पर्यंत दोन ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तसेच Prebid Meeting मधील बदल हे उशीराने अपलोड झाल्यामुळे निविदाधारकांना निविदा भरता आलेल्या नाहीत त्यामुळे निविदाधारकांनी मुदतवाढ देणे बाबत दूध्वनीद्वारे विनंती केलेली होती. त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरहू ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यास अनूसरुन एक ई निविदा प्राप्त झाली अशा एकूण तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा आजचे खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडून ई-निविदेतील तांत्रिक बाबी वित्त विभागामार्फत तपासून मिळणेस मान्यता असावी.

सदरहू प्राप्त झालेल्या ०३ Online तांत्रिक ईनिविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर तीनही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनातमक तक्ता तयार करण्यात आलेला असून बायोमेडीकल विभागामार्फत तपासून घेण्यात आलेला आहे. त्यानुसार तीनही निविदा पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Inox Air Products Pvt.Ltd., Navi Mumbai |
| 02 | M/s. Linde India Ltd., Navi Mumbai |
| 03 | M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai |

तरी वरीलप्रमाणे पात्र तीनही Online कमर्शियल ई-निविदा दि.३१/०१/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या अूसन सदर निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे –

| **Sr. No** | **Description of Work / Item(s)** | **No. of Qty** | **Units** | **Inox Air Products Private Limited** | | **Praxair India Pvt. ltd.** | | **Linde India Limited** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **Rate** | **Amount** | **Rate** | **Amount** | **Rate** | **Amount** |
| 1 | Basic Gas Price, Per SM3 | 1.00 | Sm3 | 16.23 | 16.23 | 14.00 | 14.00 | 16.73 | 16.73 |
| 2 | Facility Charge per month | 1.00 | Per Month | 26845.00 | 26845.00 | 23600.00 | 23600.00 | 0.00 | 0.00 |
| 3 | One Time Installation Charges | 1.00 | 1 Unit | 118000.00 | 118000.00 | 0.00 | 0.00 | 118000.00 | 118000.00 |
| 4 | Total Gas Cost for 5 Year (App. 17000.00 SM3 Per Month * 60) | | | | 16554600.00 | | 14280000.00 | | 17064600.00 |
| 5 | Facility Charges for 5 Years (for 60 Month) | | | | 1610700.00 | | 1416000.00 | | 0.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Total amt for 5 Years (for 60 Month) (3+4+5)** | | | | **18283300.00** | | **15696000.00** | | **17182600.00** |

सदर प्रस्ताव जानेवारी २०१७ मध्ये सादर केलेला असून त्यावेळचे गॅसचा वापर प्रती महिना १५ हजार SM3 इतका होता त्यानुसार पाच वर्षाकरीता अंदाजे रक्कम रु.१,२६,८१,४८०/- इतका खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती.

परंतू दरम्यानच्या काळात नवीन SICU १० बेडचे चालू झाले तसेच रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सध्या गॅसचा वापर प्रती महिना १७ हजार SM3 इतका झाला आहे. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे रक्कम रु.१५६९६०००/- इतका खर्च पुढील पाच वर्षाकरीता अपेक्षित आहे. म्हणजेच Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी रक्कम रु.३०१४५२०/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे. (रक्कम रु. रक्कम रु.१५६९६०००.०० - १,२६,८१,४८०.०० = ३०१४५२०.००)

तरी उपरोक्तप्रमाणे निम्नतम दर धारक M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे बरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास व येणारी जास्तीची रक्कम रु.३०१४५२०/- इतक्या खर्चास मान्यता घेणेसाठी शिफारस मा. व्यवस्थापन समिती कडे करणेसाठी प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे सादर.

**सदरहू विषयावर चर्चा सुरु असताना असे निदर्शनास आले की, प्रस्तावितकामी येणाऱ्या खर्चास व्यवस्थापन समितीची मंजुरी मिळाल्यानंतर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन १० बेडचे SICU युनिट चालू झाले असल्यामुळे रुग्णांची संख्या वाढलेली आहे व त्यानुशंगाने Liquid Medical Oxygen Gas चा वापरही वाढलेला आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन १० बेडचे SICU चालू झाल्यामुळे रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. याकरीता Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामीचा सुधारित प्रस्ताव पुढील व्यवस्थापन समितीसमोर मंजुरीसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१५ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट करीता लागणारे कन्झुमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट करीता कन्झुमेबल स्पेअर्स पार्ट खरेदीस व याकामी येण-या रक्कम रु.४४,८९,३६९/- (अक्षरी रक्कम रु. चौरेचाळीस लाख एकोणनव्वद हजार तीनशे एकोणसत्तर मात्र) चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०२/२०१३ निर्णय क्र.२२९ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरहू खरेदीस मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील अॅप्लीकेशन क्रमांक ६६४८ दि.१७/०७/२०१५ अन्वये खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा विक्रीची मुदत दि.१२/०१/२०१६ ते दि.२७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यानुसार एकूण ०६ निविदाधारकांनी निविदा Upload केलेल्या होत्या. प्राप्त ०६ Online निविदा तसेच तांत्रीक सिलबंद निविदा दि१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. त्यापैकी पात्र असलेल्या ०४ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.१५/०७/२०१६ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडण्यात आल्या होत्या.

मा.उपसमितीचे सभेतील मान्यतेने निम्नत्तम दरधारक M/s.Lub Dub Medical Technology Pvt. Ltd., Chennai व M/s. Saitrons (Medical Equipments) Loni यांना एकुण रक्कम रु.७,१६,९५२.५० इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून अंदाजे रक्कम रु.२५,१४,६८८.८७ इतक्या रक्कमेच्या उर्वरीत ८८ आयटमकरीता दि.३१/०८/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट करीता लागणारे कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीतील ८८ आयटमकरीता वर्तमान पत्रात जाहिरात जाहिरात देण्यात येऊन दि.२०/०२/२०१७ ते १३/०३/२०१७ या कालावधीत ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या होत्या, तर

दि.१६/०३/२०१७ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. तसेच अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांना ई-मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकही ऑनलाईन ई-निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.१४/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये शासन नियमवलीनुसार प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु त्यास अनुसरुन एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.२७/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आली होती, त्यास अनुसरुन दोन ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 01 | Saitrons Medical Equipments, Loni |
| 02 | Excel Corporation, Nashik |

वरीलप्रमाणे जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०२ तांत्रिक ई-निविदा दि.१९/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत व त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून तो बायोमेडीकल इंजिनियरींग विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त खरेदीकामी पात्र असलेल्या ०२ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.३१/१०/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात एकुण ८८ आयटमपैकी ७० आयटमकरीता दर प्राप्त झालेले असून त्यामधील ६३ आयटमकरीता M/s. Saitrons Medical Equipments, Loni या एकाच निविदाधारकाचे दर प्राप्त झालेले आहेत, तर सात आयटमकरीता दोन्हीही निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून त्यामध्ये M/s. Saitrons Medical Equipments, Loni यांचेच दर निम्नत्तम येत आहेत, त्यामुळे एकुण ७० आयटमकरीता M/s. Saitrons Medical Equipments, Loni यांना पुरवठा आदेश दयावा लागेल व याकामी रक्कम रु.३१,९४,९३०/- (अक्षरी रु.एकतीस लाख चौ-यान्नव हजार नऊशे तीस मात्र) इतका खर्च येईल तर एकुण ८८ आयटमपैकी उर्वरीत १८ आयटम फेर ई-निविदा मागवून खरेदी करावे लागतील. उपरोक्त खरेदीकामी प्रस्तावित मंजुर रक्कम रु.४४,८९,३६९/- पैकी रक्कम रु.७,१६,९५२.५० इतक्या रक्कमेचे प्रथमतः पुरवठा आदेश देण्यात आलेले असून सध्या रक्कम रु.३७,७२,७१६/- इतकी प्रस्तावित मंजुर रक्कम शिल्लक आहे.

तरी M/s. Saitrons Medical Equipments, Loni यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.३१,९४,९३०/- (अक्षरी रु.एकतीस लाख चौ-यान्नव हजार नऊशे तीस मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठी तसेच उर्वरीत १८ आयटम फेर ई-निविदा मागवून खरेदीकामीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रूमेंट करीता लागणारे कन्झुमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रकियेमधील निम्नतम दरधारक M/s. Saitrons Medical Equipments, Loni हे त्यांनी दिलेल्या दरांवर चर्चा करणेसाठी आजचे उपसमिती सभेत उपस्थित होते. उपसमिती सभेसमोर त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या दरांवर ७% सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रूमेंट करीता लागणारे कन्झुमेबल स्पेअरपार्ट खरेदीकामी M/s. Saitrons Medical Equipments, Loni चर्चेअंती देऊ केलेले अंतीम निम्तनम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे या खरेदीमधील उर्वरित १८ आयटमसाठी फेर ई-निविदा मागविण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१६ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त श्री रामनवमी उत्सवामध्ये महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव

आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः-**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८९–

"श्री रामनवमी उत्सवामध्ये कुस्ती स्पर्धा आयोजित करणेबाबत समिती सदस्य मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे यांनी महाराष्ट्र केसरी व हिंद केसरी स्पर्धा शिर्डी येथे आयोजित करणेसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक संबंधीतांकडून प्राप्त करून घेऊन मा. व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत याबाबतचे सादरीकरण व सविस्तर सादर करावा."

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३६–

सदरहू विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत पै.वैभव विलास लांडगे, अहमदनगर जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर हे त्यांच्या सहका-यांसह उपस्थित होते. त्यांनी शताब्दी कालावधीत शिर्डी येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करावे,अशी विनंती केली व त्यासाठी अंदाजे रु.६०-७० लाख मात्र खर्च संस्थानने करावा, अशी विनंती सभेस केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी कालावधीत महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे शिर्डी येथे आयोजन करणेकामी खुपच जास्त खर्च येत आहे. हा खर्च कमी कसा करता येईल, याचे विवरण पै. वभव लांडगे, अहमदनगर यांचेकडून लेखी स्वरूपात घ्यावे, असे ठरले.

**प्रस्तावना–** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.

श्री समाधी शताब्दी वर्ष अत्यंत भक्तीमय आणि साईस्मरणपूर्ण असावे या उद्देशाने समाधी शताब्दी वर्षात विविध धार्मिक-सांस्कृतिक-सामाजिक कार्यक्रम आयोजिले जाणार आहेत. परंतु याबरोबरच अशा एखाद्या कार्यक्रमाचे आयोजन करावे ज्यायोगे साईबाबांच्या व्यक्तिमत्वाच्या एखाद्या पैलूचही स्मरण होईल, याच उद्देशाने शिर्डी येथे अतिशय भव्य अशा कुस्ती स्पर्धा भरवाव्यात असा मा.व्यवस्थापन समितीचा मानस आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे वरील निर्णयात ठरलेप्रमाणे कुस्ती स्पर्धेचे आयोजन करणेकरीता अपेक्षित खर्चाचा अंदाज येणेकरीता महाराष्ट्र राज्य कुस्तिगीर परिषद यांना दि११.०९.२०१७ रोजी पत्र पाठविण्यात आले होते. त्यानंतर दि.२५.०९.२०१७ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत ठरलेप्रमाणे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सलग्न संस्था अहमदनगर जिल्हा तालीम संघ यांनी खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक कळविलेले आहे :

| अ.नं. | तपशिल | अधिकारी/पदाधिकारी संख्या |
|---|---|---|
| १. | अ) तालीम संघ X १६ कुस्तीगीर (३३ जिल्हा + ११ मनपा) | ७२० |
| | ४५ तालीम संघ X २ व्यवस्थापक | ९० |
| | ४५ तालीम संघ X २ मार्गदर्शक | ९० |
| २. | ब) तांत्रिक अधिकारी (पंच) | १२५ |
| ३. | क) पदाधिकारी व प्रतिनिधी | ९० |
| ४. | नामांकित कुस्तीगीर | ४० |
| ५. | इ) भारतीय कुस्ती संघ निरीक्षक – २<br>भारतीय शैली कुस्ती महासंघ – २<br>महाराष्ट्र ऑलिपींक निरीक्षक – १ | ०५ |
| | **एकूण संख्या :** | **११६०** |

**खर्चाचे अंदाजपत्रक**

| अ.नं. | तपशिल | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रवास खर्च व पंच मानधन –<br>अ) पंच (तांत्रिक अधिकारी) मानधन, बस व रेल्वे भाडे<br>ब) पदाधिकारी, नामांकित कुस्तीगर, निरीक्षक – प्रवास खर्च | ६,००,०००/- |
| २. | आखाडा(स्पर्धेचे स्थळ)<br>अ) २ गादी + १ माती = ३ आखाडे (५० X १५०)<br>ब) प्रेक्षक गॅलरी – ५० हजार प्रेक्षकांसाठी)<br>क) स्टेज (६० X २०) | ४०,००,०००/- |
| ३ | ड) पंच – टी शर्टस, कॅप्स इ.२०० X ४०० | ८०,०००/- |
| ४ | स्पर्धेचे साहित्य - वाहतुक खर्च<br>अ) २ मेंटस- (आतरराष्ट्रीय)<br>१ आखाडा- ( माती)<br>वजनकाटे -६ | ७५,०००/- |
| | ब ) बॅटस – ६ सेटस<br>घड्याळे – ६ नग<br>गुण पत्रके, वैद्यकीय फॉर्मस, स्टेशनरी | २५,०००/- |
| ५ | सर्टिफीकेटस, स्कोरशिट, स्टेशनरी व इतर साहित्य | ५०,०००/- |
| | **एकूण खर्च :** | **४८,३०,०००/-** |

**प्रस्ताव:-** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद (अहमदनगर जिल्हा तालिम संघ) यांनी सही नसलेल्या पत्रान्वये शिर्डी येथे आयोजित करावयाच्या कुस्ती स्पर्धेसाठी उभाराव्या लागणा-या सोयी-सुविधा इत्यादी बाबी कळविलेल्या आहेत. तसेच मा. श्री वाकचौरे साहेब विश्वस्त यांनी सदर प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करावा असे निर्देश दिले आहेत.

**१) एकूण स्पर्धक** (कुस्तीगीर (७२०), नामाकिंत कुस्तीगीर (४०) व पंच, मार्गदर्शक, व्यवस्थापक) – एकूण संख्या- **१,१६०**

**२) कुस्तीस्पर्धेसाठी अंदाजित खर्च:-**

| अ.नं. | तपशील | अंकी खर्च रुपये | अक्षरी रुपये |
|---|---|---|---|
| १. | प्रवास खर्च व पंच मानधन<br>(प्रवास खर्च पंच मानधन रुपये ५ लाख व रुपये १ लाख महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद या नावाने धनादेश द्यावा लागेल) | ६,००,०००/- | सहा लाख |
| २. | आखाडा (स्टेडीयम) - ५० हजार प्रेक्षकांसाठी<br>(संपूर्ण सभामंडपासाठी कमीत कमी ४० लाख रु. खर्च आहे. मेहेत्रे मंडप डेकोरेटर्स यांना महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा अनुभव आहे.) | ४०,००,०००/- | चाळीस लाख |
| ३. | पंच – टी शर्टस, कॅप्स इ.<br>(सदर टी. शर्टस, कॅप्सचे वाटप शिर्डी संस्थानमर्फे करणे बंधनकारक आहे) | ८०,०००/- | ऐंशी हजार |
| ४. | स्पर्धेचे साहित्य – वाहतुक खर्च | ७५,०००/- | पंचाहत्तर हजार |
| ५. | बॅटस ,घड्याळे, गुणपत्रके, वैद्यकीय फॉर्मस, स्टेशनरी | २५,०००/- | पंचविस हजार |
| ६. | सर्टिफीकेटस, स्कोरशिट, स्टेशनरी व इतर साहित्य<br>(सदर रक्कम महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद या नावाने धनादेश द्यावा लागेल) | ५०,०००/- | पन्नास हजार |
| | **एकूण :** | **४८,३०,०००/-** | **अठ्ठेचाळीस लाख, तीस हजार** |

कुस्ती स्पर्धेत सहभागी होणा-या ११६० व्यक्तिंची संस्थानमार्फत ५ दिवसाकरीता निवास/चहा-नाष्टा/ भोजन सुविधा विनामुल्य द्यावयाचे ठरल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| अ.नं. | तपशील | अंकी खर्च रुपये | अक्षरी रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | कुस्ती स्पर्धेत सहभागी होणा-या ११६० व्यक्तिंची भोजन व्यवस्था | १,१६,०००/- | एक लाख सोळा हजार |
| ०२ | चहा,पाणी,नाष्टा | ९०,०००/- | नव्वद हजार |
| ०३ | साईधर्मशाळा निवास व्यवस्था | १,१६०००/- | एक लाख सोळा हजार |
| | **एकूण :** | ३,२२,०००/- | तीन लाख बावीस हजार |

तरी शताब्दी कालावधीत श्री रामनवमी उत्सवामध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे शिर्डी येथे आयोजन करावयाचे ठरल्यास खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

१) कुस्ती स्पर्धेत सहभागी होणा-या ११६० व्यक्तिंची संस्थानमार्फत ५ दिवसाकरीता निवास/चहा-नाष्टा/भोजन इ. सुविधा संस्थान मार्फत विनामुल्य पुरविणेकामी अंदाजे रक्कम रु.३,२२,०००/- मात्रचे खर्चाबाबत निर्णय घेणे.

२) कुस्ती स्पर्धेत सहभागी होणा-या ११६० व्यक्तिंची दर्शन, आरतीबाबत सुविधा देणेकामी ११६० X रु.२००/- प्रमाणे एकूण रु.२,३२,०००/- मात्रचे येणा-या अंदाजे खर्चाबाबत निर्णय घेणे.

३) सत्कारासाठी शॉल, स्मृतिचिन्ह याबाबत निर्णय घेणे.

४) उपरोक्त खर्चाशिवाय महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद (अहमदनगर जिल्हा तालिम संघ) यांनी कळविलेल्या रक्कम रु.४८,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबत निर्णय घेणे.

५) महाराष्ट्र राज्य कुस्ती परिषदेची सलग्न संस्था अहमदनगर, जिल्हा तालीम संघ, यांनी त्यांच्या प्रस्तावात स्पर्धेचा कालावधी नमुद केलेला नसल्याने स्पर्धेचा कालावधी बाबत निर्णय घेणे.

तरी शताब्दी कालावधीत श्री रामनवमी उत्सवामध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे शिर्डी येथे आयोजन करणेकामी वर नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे सलग्न संस्था अहमदनगर जिल्हा तालीम संघ, यांचेकडून प्राप्त झालेल्या (सही नसलेल्या) प्रस्तावावर विचार विनिमय होऊन निर्णयासाठी सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर चर्चा करणेसाठी आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर पै.वैभव विलास लांडगे, जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर हे त्यांच्या सहकाऱ्यांसक उपस्थित होते. त्यांनी डिसेंबर-२०१७ मध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करणेबाबत सभेस विनंती केली. परंतु या स्पर्धेसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधांसाठी उभारणेकामी अत्यंत कमी कालावधी असल्यामुळे डिसेंबर २०१७ मध्ये या स्पर्धा आयोजित करणेत येऊ नये, असे समितीचे मत झाले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पै.वैभव विलास लांडगे, जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर यांच्या विनंतीनुसार डिसेंबर २०१७ मध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन करणेकामी अत्यल्प कालावधी असल्यामुळे सध्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धांचे आयोजन न करता, फेब्रुवारी अथवा मार्च- २०१८ मध्ये राष्ट्रीय कुस्ती स्पर्धांचे आयोजन करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना असे ठरले की, दि.२१ ते २४ फेब्रुवारी या कालावधीमध्ये समाधी शताब्दी निमित्ताने शिर्डी येथे कुस्ती स्पर्धांचे आयोजन करणेत यावे. त्यासाठी जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर यांना संस्थानमार्फत ठराविक रक्कम ठरवून द्यावी व उर्वरित खर्च त्यांनी करावा याबाबत विस्तृत चर्चा करणेसाठी जिल्हा कुस्ती संघटना, अहमदनगर यांचे प्रतिनिधींना पुढील उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**१७ मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे शिफारस केली, ती मान्य करण्यात आली.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो) यांनी दि.३१.१०२०१७ रोजीचे पत्रान्वये विनंती केलेली आहे की, त्यांना दि.१७.१२.२०१७ ते दि.२१.१२.२०१७ या कालावधीमध्ये शिर्डी येथे ऑल इंडिया फेडरेशन ऑफ युनिव्हरसिटी ॲण्ड कॉलेज टिचर ऑर्गनायझेशन यांची २९ वी वैधानिक राष्ट्रीय परिषद या कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असून या कार्यक्रमासाठी विविध राज्यांमधून

येणाऱ्या जवळपास २००० व्यक्तींसाठी साईआश्रम भक्तनिवास येथे ४५० साध्या व ५० वातानुकूलीत खोल्या सशुल्क मिळाव्यात.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो) यांच्या मागणीप्रमाणे त्यांना दि.१७.१२.२०१७ ते दि.२१.१२.२०१७ या कालावधीमध्ये साईआश्रम भक्तनिवास येथे ४५० साध्या व ५० वातानुकूलीत खोल्या सशुल्क उपलब्ध करुन देण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करणे व त्याची रुपरेषा ठरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

**----** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाची सुधारित रुपरेषा ठरविणेत येऊन अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने नियोजन करणेत येत आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान मार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जाणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल त्या दृष्टीकोनातून संस्थानचे विविध विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्येएकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे असा मा.व्यवस्थापन समितीचा मानस असलेने, शताब्दी वर्षातील धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकातील धार्मिक कार्यक्रमामध्ये माहे डिसेंबर – २०१७ मध्ये दि.२३ व२४ डिसेंबर – २०१७ रोजी देश विदेशातील साईमंदिरांची जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद (ग्लोबल साईटेंम्पल समिट) आयोजनाचा समावेश केलेला

होता. सदर वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६८२ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

दि.२६/१०/२०१७ रोजी मा.उपजिल्हाधिकारी यांचे कक्षात याकामी आढावा बैठक घेणेत आली आहे. सदरहू बैठकीमध्ये जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र हे फक्त दि.२३/१२/२०१७ रोजी एकच दिवस साईनगर येथे आयोजित करणेत येणार आहे, असे निर्देश दिले आहेत.

तरी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र आयोजित करणेतकामी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) शिर्डी येथे जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र हे एका सत्रात घ्यावे अथवा दोन सत्रात घेण्यात यावे.

२) शिर्डी येथे विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करावयाची जागा निश्चित करणे.

३) उपरोक्त दोन्ही कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करणे. (सोबत कार्यक्रमाचा मसुदा)

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र साईनगर मैदान येथे चार सत्रामध्ये आयोजित करणेचे ठरले व त्याची खालीलप्रमाणे रुपरेषा ठरविली.**

**पहिल्या सत्रामध्ये उद्घाटन समारंभ राहील, या सत्राच्या सुरुवातीस प्रास्तविक मुख्यकार्यकारी अधिकारी करतील, त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय, कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व मा.उपराष्ट्रपती महोदय यांची भाषणे ठेवावीत.**

**दुसरे सत्र हे देशातील साईमंदिरांच्या प्रतिनिधींची परिषद असेल. या सत्राची सुरुवात व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा.श्री.चंद्रशेखर कदम हे करतील व समारोप समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे करतील. तसेच निवडक १० मंदिरांचे प्रतिनिधी मनोगत व्यक्त करतील.**

**तिसरे सत्र हे विदेशातील साईमंदिरांच्या प्रतिनिधींची परिषद असेल. या सत्राची सुरुवात समिती सदस्य मा.ॲड्मोहन जयकर हे करतील व समारोप समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले करतील. तसेच निवडक १० मंदिरांचेप्रतिनिधी मनोगत व्यक्त करतील.**

**चौथे सत्र समारोपाचे राहील, या सत्राची सुरुवात समिती सदस्य मा.बिपीनदादा कोल्हे करतील व समारोप मा.अध्यक्ष महोदय यांचे राहील तसेच समिती सदस्या मा.सौ.योगिता शेळकेपाटील या आभार प्रदर्शन करतील.**

**या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, पालकमंत्री, अहमदनगर, विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य, राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग, व खासदार, शिर्डी लोकसभा मतदारसंघ यांना निमंत्रित करणेत यावे.**

**मा.उपराष्ट्रपती यांचा सत्कार मा.अध्यक्ष महोदय यांनी, मा.उपराष्ट्रपती यांच्या पत्नी यांचा सत्कार समिती सदस्या मा.सौ.योगिता शेळकेपाटील यांनी, मा.मुख्यमंत्री यांचा सत्कार मा.उपाध्यक्ष यांनी, पालकमंत्र्यांचासत्कार समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, विरोधी पक्षनेते यांचा सत्कार मा.ॲड्मोहन जयकर व इतर मान्यवरांचा सत्कार उपस्थित असलेल्या उर्वरित समिती सदस्यांनी करावा.**

**उपरोक्त सत्र २ व ३ मधील मनोगत व्यकत करण्यासाठी नोंदणी झालेल्या साईमंदिरांच्या प्रतिनिधींमधून प्रशासन शाखेमार्फत १०-१० प्रतिनिधींची निश्चिती करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांना चर्चासत्रास बोलविणेसाठी मंदिरांचीनिश्चिती करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या

सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

**----** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाची सुधारित रुपरेषा ठरविणेत येऊन अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने नियोजन करणेत येत आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान मार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल त्या दृष्टीकोनातून संस्थानचे विविध विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक,सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्येएकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे असा मा.व्यवस्थापन समितीचा मानस असलेने, शताब्दी वर्षातील धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकातील धार्मिक कार्यक्रमामध्ये माहे डिसेंबर – २०१७ मध्ये दि.२३ डिसेंबर – २०१७ रोजी देश विदेशातील साईमंदिरांची जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद (ग्लोबल साईटेंम्पल समिट) आयोजनाचा समावेश केलेला होता. सदर वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ व दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६८२ व ७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे.

गतवर्षी दि.११/१२/२०१६ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्र आयोजित करणेत आले होते. त्यावेळी संस्थानकडे नोंदणी केलेल्या जगभरातील सर्व साई मंदिराचे प्रतिनिधी यांना चर्चासत्रासाठी बोलविणेत आले होते.

दि.०२/११/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे अध्यक्षतेखाली लेंडीबागेतील ‘०’ सभागृहात दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी होणा-या जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रासाठी करावयाचे कार्यवाहीबाबत आढावा बैठक आयोजित करणेत आली होती. सदरहू बैठकीमध्ये कोणत्या साईमंदिरांचे प्रतिनिधीस बोलवावे याबाबत मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

तरी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्र आयोजित करणेकामी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) दि.११/१२/२०१६ रोजी चर्चासत्रासाठी बोलविणेत आलेल्या तसेच त्यानंतर नोंदणी करणेत आलेल्या जगभरातील सर्व साईमंदिरांच्या प्रतिनिधीना दि.२३ डिसेंबर २०१७ चर्चासत्रसाठी बोलवणेबाबत. (सोबत यादी)

२) मा.अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व मा.विश्वस्त यांचे माहिती/संपर्क असलेल्या साईमंदिरांचा समावेश करणे.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांना चर्चासत्रास बोलविणेसाठी मंदिरांची निश्चिती करणेकामी, संस्थानकडे रजिस्ट्रेशन केलेल्या साईमंदिरांच्यायादीचे अवलोकन करणेत आले व या यादीमधील सर्व साईमंदिरांनानिमंत्रित/ आवाहन करणेत यावे.**

**तसेच या चर्चासत्रासाठी साईमंदिरांना नाव नोंदणी करणेकरीता संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर फॉर्म उपलब्ध करुन देण्यात यावा. या फॉर्ममध्ये संबंधीतमंदिरामध्ये श्रींच्या समाधीची प्रतिकृती आहे का व संबंधीतमंदिर अथवा अध्यक्ष/ विश्वस्त/ पदाधिकारी यांचेवर गुन्हे दाखल आहेत का, अशा आशयाचे कॉलम समाविष्ट करणेत यावे. यापैकी ज्या मंदिरांमध्ये श्रींच्या समाधीची प्रतिकृती असेल अथवा ज्या मंदिरांच्या अध्यक्ष/ विश्वस्त/ पदाधिकारी यांचेवर गुन्हे दाखल असतील, त्यांची नोंदणी रद्द करणेत यावी. याप्रमाणे जी मंदिरे प्रथम नाव नोंदणी करतील, अशा देशातील ९५० व विदेशातील ५० मंदिरांची नोंदणी करण्यात यावी, त्यानंतर होणारी नोंदणी स्विकारली जाणार नाही. तसेच नोंदणीकृत साईमंदिरांच्याप्रतिनिधींची निवास, भोजन व फक्त दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०५** **शिर्डी येथे दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजीत देश-विदेशातील साई मंदिरांच्या चर्चासत्राच्या कार्यक्रम पत्रिकेचा मसुदा निश्चित करणे व छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७७.
३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१९.
६. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक -७५०

**प्रस्तावना-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येतआहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात

शिर्डीमध्येभक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच मा. व्यवस्थापन वेळोवेळी झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक तयार करणेत आले आहे.

सदर वेळापत्रकात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये दि.२३ व २४ डिसेंबर रोजी शिर्डी येथे देशविदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त तथा पदाधिकारी यांचे चर्चासत्राचा कार्यक्रम नमूद केला आहे. सदर नमूद कार्यक्रमाचे आयोजन साईनगर मैदानावर करणेत येत असून कार्यक्रमाचे उदघाटन मा.श्री.व्यंकय्या नायडू, उपराष्ट्रपती भारत गणराज्य यांचे शुभहस्ते होणार आहे.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने श्री साईबाबांच्या कार्याच्या प्रचार –प्रसाराच्या दृष्टीकोनातून माहे डिसेंबर, २०१७ मध्ये दि.२३ डिसेंबर रोजी शिर्डी येथे देशविदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त तथा पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करणेत आले आहे. सदर चर्चासत्रातून देशविदेशातील साईमंदीरात राबविले जाणारे दैनंदिन कार्यक्रम व उपक्रम तसेच शिर्डी येथे साईबाबा संस्थान राबवित असलेले उपक्रम याबाबत चर्चा होईल. जेणेकरुन सदर चर्चासत्राव्दारे विचारांची देवाण घेवाण होईल व श्रींच्या कार्याचा प्रचार प्रसार होईल. हा या कार्यक्रमाचे आयोजना मागील उद्देश आहे.

सदर कार्यक्रमाचे उदघाटन कार्यक्रमासाठी मा.श्री.व्यंकय्या नायडू, उपराष्ट्रपती भारत गणराज्य हे उपस्थित राहणार असून याचबरोबर सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवरांना निमंत्रीत करणे उचित होईल असे मत आहे.

१. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य
२. महाराष्ट्र शासनाचे सर्व मा. मंत्री महोदय
३. मा. विरोधी पक्ष नेते
४. मा. अध्यक्ष, विधान सभा व विधान परिषद
५. अहमदनगर जिल्ह्यातील सर्व मा. खासदार व मा. आमदार
६. संस्थानच्या सल्लागार समितीचे सदस्य/छाननी समिती अध्यक्ष
७. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीचे सर्व सदस्य
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा उप समितीचे सर्व सदस्य
९. संस्थानचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त
१०. अहमदनगर जिल्हा –जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य
११. अहमदनगर जिल्हयाच्या सर्व शासकिय/निमशासकिय विभागाचे वरीष्ठ अधिकारी
१२. स्थानिक मा. नगराध्यक्ष, मा. नगरसेवकव ग्रामस्थ
१३. देणगीदार साईभक्त
१४. याशिवाय मा. व्यवस्थापन समितीने सूचविलेले मान्यवर.

तरी माहे डिसेंबर २०१७ मध्ये दि. २३/१२/२०१७ रोजी आयोजित कार्यक्रमासाठी उपरोक्त नमूद मान्यवर निश्चिती तसेच सदर कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका मसूदा तयार करणेसाठी खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

१. सदर कार्यक्रमासाठी सन्माननीय अतिथी, कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे यांची निश्चिती करणे.
२. आयोजित कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका छपाईसाठी पत्रिकेचा मसूदा, मुखपृष्ठ, कलर व अक्षरांचा फॉन्ट निश्चित करणे.
३. मान्यवर निश्चिती करणे.
४. निमंत्रण पत्रिका छपाई प्रती निश्चित करणे.
५. आयोजित कार्यक्रम माहिती पुस्तिकेत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार परिस्थितीनुरुप किंवा आयत्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी होणा-या बदलानुसार ऐनवेळी नविन पत्रिकेची छपाई करणेपूर्वी, मसूदा अंतिम करणे आदिबाबत मार्गदर्शन घेणेकामी स्थानिक मा. विश्वस्तांची नेमणूक करणे.

६. आयोजित कार्यक्रम निमंत्रण पत्रिका छपाईकामी छपाई धारकांकडून कोटेशन मागविणेस मान्यता देणे तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

७. मा. विश्वस्तांना प्रत्येकी किती पत्रिका द्याव्यात याबाबत निर्णय घेणे.

८. माहिती पुस्तिका मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त तसेच मान्यवर आदिंना संबंधीत विभागाकडून वितरीत करणेस मान्यता देणे.

९. याशिवाय खालीलप्रमाणे निमंत्रण पत्रिका छपाई मसूद्यास मान्यता देणे अथवा दिलेल्या बदलानुसार निमंत्रण पत्रिकेची छपाई करणे.

**मसूदा मान्यतेसाठी-**

**~~~: सस्नेह निमंत्रण :~~~**

विश्वविख्यात संत श्रीसाईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या दिवशी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साई इतिहासातील या महत्वपूर्ण घटनेचे महत्व लक्षात घेऊन दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ हा संपूर्ण कालावधी श्रीसाईबाबा संस्थानच्या वतीने **"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष"** म्हणून साजरेकरण्यात येत आहे. यानिमित्ताने समाधी शताब्दी वर्षात होणा-या कार्यक्रमांची माहिती तसेच विचार वकल्पनांचे अदानप्रदान व्हावे या उद्देशाने जगभरातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे एकदिवसीय चर्चासत्र शनिवार दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी श्रीक्षेत्र शिर्डी येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, त्यासाठीहे अगत्याचे निमंत्रण....!

**जागतिक साई मंदीर विश्वस्त परिषद**
**उदघाटन समारंभ**

**शुभहस्ते**
**मा. श्री. व्यंकय्या नायडू**
उपराष्ट्रपती, भारत गणराज्य

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा. श्री.------------------**

**सन्माननीय उपस्थिती**

**मा. श्री.-------------------** **मा. श्री.-------------------**

**मा. श्री.-------------------** **मा. श्री.-------------------**

**वार/दिनांक:- शनिवार दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी,**
**वेळ :- सकाळी १०.०० वा.**
**स्थळ:-साईनगर मैदान, बस स्टॅण्ड समोर, शिर्डी**

**~~~: प्रमुख उपस्थिती:~~~**

**मा. ना. श्री. -------------------------** **मा. ना. श्री. ----------------------------**
**-------------------------** **--------------------------**

| | |
|---|---|
| **मा. ना. श्री. -------------------------- --------------------------** | **मा. ना. श्री. ----------------------------- -----------------------------** |
| **मा. श्री. --------------------------- ---------------------------** | **मा. श्री. ----------------------------- -----------------------------** |
| **मा. श्री. ------------------------- ---------------------------** | **मा. श्री. ----------------------------- ------------------------------** |
| **मा. ना. श्री. ---------------------------- ---------------------** | |
| **~~~:आयोजक/निमंत्रक :~~~** | |
| **मा. श्री. ------------------------- -------------------------** | **मा. श्री. ----------------------------- -----------------------------** |
| **मा. श्री. ------------------------- -------------------------** | **मा. श्री. ----------------------------- -----------------------------** |

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.९१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजीत देश-विदेशातील साई मंदिरांच्या चर्चासत्राच्या कार्यक्रमासाठी प्रस्तावात नमुद केलेल्यांपैकी खालील मान्यवरांना निमंत्रित करणेत यावे.**

१. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य
२. अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री
३. मा. विरोधी पक्ष नेते
४. राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग
५. शिर्डी मतदार संघाचे मा.खासदार
६. संस्थानच्या छाननी समितीचे अध्यक्ष
७. सल्लागार परिषदेवर शासनाकडून नियुक्त केलेले कायदेशीर सल्लागार
८. स्थानिक मा. नगराध्यक्ष, मा. नगरसेवक
९. संस्थानकडील उपलब्ध यादीमधील प्रतिष्ठीत ग्रामस्थ

**तसेच निमंत्रण प्रस्तावित निमंत्रण पत्रिकेमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष, मा.मुख्यमंत्री महोदय व सन्माननीय उपस्थितीमध्ये मा.पालकमंत्री, अहमदनगर, मा.विरोधी पक्षनेते, राज्यमंत्री, विधी व न्याय विभाग व शिर्डी मतदारसंघाचे विद्यमान खासदार तसेच आयोजक/ निमंत्रक यामध्ये विश्वस्त मंडळ व त्याखाली संस्थान अधिकारी यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले व याप्रमाणे निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०६** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने दि.२३.१२.२०१७ चे चर्चासत्रासाठी देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांना ओळखपत्र व बॅचेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोंबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीमध्ये साजरे

केले जाणार आहे. या संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल त्या दृष्टिकोनातून संस्थानचे विविध विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजी सभेत सादर करणेत आलेल्या प्रारुप धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकास मान्यता देणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने, समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्ये एकाचवेळी राबविले जावेत, तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तिमय वातावरण राहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजीत करणेचा निर्णय दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत घेतलेला आहे.

त्या अनुषंगाने, संदर्भिय पत्रान्वये चर्चासत्राकरीता उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ सदस्य तसेच संस्थान व्यवस्थापनाचे अधिकारी/ पदाधिकारी यांचेसह देशविदेशातील साईमंदिराचे प्रतिनीधी यांना बॅचेस व ओळखपत्र संस्थानमार्फत उपलब्ध करुन दयावयाचे झाल्यास त्याकरीता यापुर्वीचे नमुना प्रमाने बॅचेस व ओळखपत्र तयार करुन घेता येईल त्याकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **नग(अंदाजे)** | **प्रति नग दर (अंदाजे)** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|---|
| ०१ | बॅचेस | १०० | ८०/- | ८,०००/- |
| ०२ | ओळखपत्र | २५०० | ५०/- | १,२५,०००/- |
| | | | **एकुण** | १,३३,०००/- |

**मागणी**:- १) उपरोक्त तपशिलानुसार बॅचेस व ओळखपत्र तयार करुन घेणेस/ खरेदी करणेस मान्यता मिळावी.

२) देशविदेशातील साईमंदिराचे विश्वस्त व पदाधिकारी यांना ओळखपत्र दयावयाचे झाल्यास याकामी विहित पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या एकुण रक्कम रु.१,३३,०००/- (अक्षरी एक लाख तेहतीस हजार रु.मात्र) पर्यंतचे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३.१२.२०१७ चे चर्चासत्रासाठी देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांना ओळखपत्र व बॅचेस देणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

**विषय नं.०७** **श्री क्षेत्र शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित चर्चासत्रासाठी येणाऱ्या देशातील साईमंदिरांचे प्रतिनिधी/ पदाधिकारी यांची साईआश्रम भक्तनिवास विभागात दोन दिवस विनामुल्य निवासव्यवस्था करणे व त्याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६८२. "तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क, ड, व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु. ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली."

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा संस्थान मार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधी मध्ये साजरे केले जाणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होणेसाठी तसेच संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण राहणेसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

**मागणी:-** दि.२७/०९/२०१७ रोजीच्या जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम-शताब्दी/ २६१९/ २०१७ आदेशान्वये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ नुसार दि.२३/१२/२०१७ ते २४/१२/२०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांचे शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करण्यात येणार असलेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर चर्चासत्र एक दिवस असुन त्यासाठी येणा-या देश-विदेशातील साई मंदिर प्रतिनिधींची निवासव्यवस्थासाईआश्रम भक्तनिवास विभागात विनामुल्य करणेबाबत दि.२७/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सुचित करण्यात आले असुन वेळोवेळी उदभवणा-या कामांसाठी येणा-या आर्थिक बाबींच्या मान्यता संबंधीत विभागांनी वेळेत घेण्यासाठी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे त्वरीत सादर करणेबाबत निर्देश दिले आहे.

त्यानुसार साईआश्रम भक्तनिवास विभागात सदर चर्चा सत्रासाठी येणा-या साईमंदिर प्रतिनीधींची विनामुल्य निवासव्यवस्था करणेकामी दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत सुमारे १००० खोल्यांसाठी ऑनलाईन रुम आरक्षण बंद करण्यात आलेले असुन सदर चर्चासत्रासाठी येणा-या प्रतिनिधींच्या निवासव्यस्थेकरीता येणा-या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| खोली प्रकार | आरक्षित खोल्या | सेवाआकार(२४ तासांकरीता) (०३ व्यक्तींसाठी) | एक दिवसाचा खर्च रुपये | दोन दिवसाचा खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| **AC** | ३०० | ५०० | १,५०,०००/- | ३,००,०००/- |
| **NAC** | ७०० | २०० | १,४०,०००/- | २,८०,०००/- |
| **एकुण** | **१०००** | **---** | **२,९०,०००/-** | **५,८०,००/-** |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**तक्त्यात नमुद केले प्रमाणे अंदाजे ३०० ए.सी व ७०० नॉन.ए.सी अशा दोन्ही मिळून १००० खोल्या सदर चर्चासत्रासाठी येणा-या देशातील साईमंदिर प्रतिनिधींना दिल्यास खोल्यांमध्ये प्रत्येकी ३ व्यक्तीया प्रमाणे दोन दिवसांसाठी निवासव्यवस्था केल्यास रु.५,८०,०००/- (अक्षरी-पाच लाख ऐंशी हजार रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी, जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/२६१९/२०१७ दि.२७/०९/२०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशातील अ.नं ६ अन्वये "चर्चासत्रासाठी उपिस्थत राहणा-या देशातील साईमंदिराचे अधिकारी/ पदाधिका-यांनी निवासाची व्यवस्था विनामुल्य करणेत यावी. याबाबत माहीती तंत्रज्ञान विभागाशी समन्वय साधुन पुरेशा खोल्या उपलब्ध होतील याबाबत दक्षता घेण्यात यावी" असे नमुद केले आहे.

त्यानुसार, सदर चर्चासत्रासाठी उपस्थित राहाणा-या देशातील साईमंदिर प्रतिनिधींची साईआश्रम भक्तनिवास विभागात अंदाजे ३०० ए.सी व ७०० नॉन.ए.सी अशा दोन्ही मिळून १००० खोल्यांमध्ये विनामुल्य निवासव्यवस्था करण्यात येणार असल्याने, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील निवासव्यवस्थेसाठी येणा-या रु.५,८०,०००/- (अक्षरी- पाच लाख ऐंशी हजार रुपये मात्र) खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित चर्चासत्रासाठी येणाऱ्या देशातील साईमंदिरांचे प्रतिनिधी/ पदाधिकारी यांची साईआश्रम भक्तनिवास विभागात दोन दिवस विनामुल्य निवासव्यवस्था करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.५,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.०८** **श्री क्षेत्र शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित चर्चासत्रासाठी येणाऱ्या परदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधी/ पदाधिकारी यांची द्वारावती भक्तनिवास विभागात दोन दिवस विनामुल्य निवासव्यवस्था करणे व त्याकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्ताविक:-** व्दारावती भक्तनिवास विभागाकडे असणा-या ८० ए.सी.व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांच्या निवासासाठी वापरात आहे. व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये भक्तांची गर्दी वर्षभर कायम असते. व्दारावती विभागातील खोल्या ८० % ऑनलाईन बुकींगव्दारे साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहे. तसेच २० % खोल्या देणगीदार साईभक्तांना तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत व्ही. आय. पी. यांचेसाठी देण्यात येत असतात. तसेच शिल्लक असलेल्या खोल्या प्रत्यक्ष काऊंटरवर आलेल्या साईभक्तांना देण्यात येतात. व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील खोल्या १०० % (पुर्ण क्षमतेने) दररोज खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात.

श्री साईबाबा यांचे महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधी मध्ये साजरे केले जाणार आहे.संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तिमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर२०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेचा निर्णय मा.व्यवस्थापन व्यवस्थापन समितीचे दि.२०/८/२०१७ रोजीचे सभेत घेणेत आलेला आहे.

सन २०१६ मध्ये दि.१०/१२/२०१७ ते दि. १२/१२/२०१७ अखेर जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ही परदेशातील साईमंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांची व्दारावती भक्तनिवासमध्ये विनामुल्य निवासव्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी २८ वातानुकुलिन खोल्यांमधून ५३ प्रतिनिधी निवासासाठी होते. व्दारावती भक्तनिवासमध्ये वातानुलित खोलीचा २४ तासांकरिता साठी सेवाआकार रुपये– ९००/- आहे.

**मागणी**:- व्दारावती भक्तनिवास मध्ये ८० वातानुलित खोल्या असून दि.२८/१०/२०१७ पर्यंत दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर १० खोल्या ऑनलाईन आरक्षित झालेल्या आहेत. शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर२०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या चर्चासत्रासाठी परदेशातून येणा-या साईमंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांची व्दारावती भक्तनिवास मधील वातानुकुलित खोल्यांमधुन विनामुल्य निवासव्यवस्था करता येईल. त्यासाठी दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर ४८ तासांकरिता उर्वरित ७० वातानुकुलित खोल्या आगाऊ आरक्षित ठेवता येतील. विनामुल्य खोल्या उपलब्ध करुन दिल्यास सेवाआकार पोटी खालीलप्रमाणे रक्कम रुपये- **१,२६,०००**/ इतका खर्च येईल.

| अ. नं. | उपलब्ध वातानुकुलित खोली संख्या | सेवाआकार प्रति खोली | विनामुल्य देय कालावधी खर्च रक्कम | विनामुल्य पोटी खर्च रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ७० खोल्या | २४ तासांकरिता- ९००/-<br>४८ तासांकरिता- १,८००/- | दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७<br>एकूण कालावधी - ( ४८ तास )<br>रुपये -१,८००/- X ७० खोल्या = १,२६,०००/- | रुपये-१,२६,०००/- |

**विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत**:- शिर्डी येथे दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी होणा-या चर्चासत्रासाठी निमंत्रित केलेल्या परदेशातील सर्व साईमंदिरांच्या अधिकारी/पदाधिकारी यांची व्दारावती भक्तनिवास मधील वातानुकुलित खोल्यांमधुन विनामुल्य निवासव्यवस्था करता येईल. त्यासाठी दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर ४८ तासांकरिता उपलब्ध असलेल्या ७० वातानुकुलित खोल्या आगाऊ आरक्षित ठेवता येतील.त्यास विनामुल्य पोटी उपरोक्त प्रमाणे रुपये- १,२६,०००/- (अक्षरी रुपये-एक लाख सव्वीस हजार मात्र) खर्च येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे दि.२२/१२/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर ४८ तासांकरिता विनामुल्य वातानुकुलित खोल्या देणे, त्यासाठी उपलब्ध असलेल्या ७० वातानुकुलित खोल्या त्वरीत आगाऊ आरक्षित करणे तसेच विनामुल्य पोटी खर्च रक्कम रुपये- १,२६,०००/- (अक्षरी रुपये- एक लाख सव्वीस हजार मात्र) चे खर्चास मान्यतेसाठी निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.९२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित चर्चासत्रासाठी येणाऱ्या देशातील साईमंदिरांचे प्रतिनिधी/ पदाधिकारी यांची द्वारावती भक्तनिवास विभागात दोन दिवस विनामुल्य निवासव्यवस्था करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.१,२६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- द्वारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.०९** **जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणाऱ्या साई मंदिर पदाधिकाऱ्यांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास येथील ऑनलाईन रुम बुकींग व्यवस्था दि. २२ ते २४ डिसेंबर, २०१७ पर्यंत बंद ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :-कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

प्रास्ताविक :-मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रारुप धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकास मान्यता देणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने, समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्ती मय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेचा निर्णय दि.२०.०८.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेतलेला आहे.

दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी आयोजित करणेत येणा-या जागतिक साईमंदिरांचे चर्चासत्रात भाग घेणा-या भारतीय प्रतिनिधींची निवासव्यवस्था संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे व परदेशी साई मंदिर प्रतिनिधींची निवासव्यवस्था द्वारावती भक्तनिवासस्थान येथे करणे प्रस्तावित आहे. सबब, या दोन्ही ठिकाणच्या रुम दि.२२ ते २७ डिसेंबर, २०१७ पर्यंत आरक्षीत करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील एकूण १५३६ रुमपैकी १२२८ रुम (८०%) व द्वारवती भक्तनिवासस्थान येथील एकूण ३१६ रुमपैकी २५२ रुम (८०%) साईभक्तांसाठी संस्थानचे online.sai.org.in या वेबसाईटद्वारे ऑनलाईन बुकींगसाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जागतिक साईमंदिरांचे चर्चासत्रात भाग घेणा-या भारतीय प्रतिनिधींची निवासव्यवस्था संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे व परदेशी साई मंदिर प्रतिनिधींची निवासव्यवस्था द्वारावती भक्तनिवासस्थान येथे करणे प्रस्तावित असल्याने सद्यस्थितीत सुरू असलेली ऑनलाईन रुम बुकींग व्यवस्था दि.२२ ते २४.१२.२०१७ या कालावधीमध्ये बंद ठेवणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जागतिक साईमंदिरांचे चर्चासत्रात भाग घेणाऱ्या भारतीय प्रतिनिधींची निवासव्यवस्था संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे व परदेशी साई मंदिर प्रतिनिधींची निवासव्यवस्था द्वारावती भक्तनिवासस्थान येथे करणे प्रस्तावित असल्याने सद्यस्थितीत सुरू असलेली ऑनलाईन रुम बुकींग व्यवस्था दि.२२ ते २४.१२.२०१७ या कालावधीमध्ये बंद ठेवणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जागतिक साईमंदिरांचे चर्चासत्रात भाग घेणा-या भारतीय प्रतिनिधींची निवासव्यवस्था संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे व परदेशी साई मंदिर प्रतिनिधींची निवासव्यवस्था द्वारावती भक्तनिवासस्थान येथे करणे प्रस्तावित असल्याने सद्यस्थितीत सुरू असलेली ऑनलाईन रुम बुकींग व्यवस्था दि.२२ ते २४.१२.२०१७ या कालावधीमध्ये बंद ठेवणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.९२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणाऱ्या साई मंदिर पदाधिकाऱ्यांची निवासव्यवस्था करणेसाठी साईआश्रम व द्वारावती भक्तनिवास येथील ऑनलाईन रुम बुकींग व्यवस्था दि. २२.१२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दि.२४.१२.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत बंद ठेवणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजीत केलेल्या देश-विदेशातील साई मंदिरांचे विश्वस्त, प्रतिनिधींचे चर्चासत्रासाठी सुत्रसंचालकाची व्यवस्था करणे व चर्चासत्रासाठी उपस्थित राहणाऱ्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींची दर्शन/ आरतीची व्यवस्था निशुल्क करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (२) मधील

(ठ) मध्ये "श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील, तसेच (ड) मध्ये श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल" अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय व उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये

**अ)** दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेले देश विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधींचे चर्चासत्रासाठी सुत्रसंचालकाची व्यवस्था करणेबाबत कळविले आहे. सदरचा कार्यक्रमास जगभरातील साईमंदिराचे विश्वस्त, पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित राहणार असून या कार्यक्रमासाठी भारत गणराज्याचे मा.उपराष्ट्रपती महोदय उपस्थित राहणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उत्कृष्टरित्या होणे आवश्यक आहे. तरी सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालनासाठी खालील पर्यायाचा विचार करता येईल.

**१)** सदरचे कार्यक्रमासाठी सुत्रसंचालन करणा-या व्यावसायीक प्रतिनिधींची मानधन देवून नेमणूक करावी.

**२)** सदरचे कार्यक्रमासाठी सुत्रसंचालन करणेकामी सेवाभावी (विनाशुल्क) सुत्रसंचालन करणा-या प्रतिनिधीची नेमणूक करावी

**३)** सदरचे कार्यक्रमासाठी सुत्रसंचालन करणा-या संस्थान कर्मचा-यांपैकी कोणाची नेमणूक करावी.

दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमासाठी सेवाभावी (विनाशुल्क) सुत्रसंचालन करणेसाठी पुणे येथील सुत्रसंचालिका श्रीमती.कश्यता अनिल भाटीया यांनी तयारी दर्शविली आहे. यापुर्वी मागील वर्षी ११ डिसेंबर, २०१६ रोजी झालेल्या साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे व दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.राष्ट्रपती महोदयांच्या उपस्थितीत पार पडलेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे उदघाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन त्यांनी सेवाभावी (विनाशुल्क) केलेले आहे.

तरी दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे कार्यक्रमासाठी सुत्रसंचालकची नेमणूक करणेबाबत निर्णय घेणेसाठी, तसेच

**ब)** सदरचे चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींची दर्शन/ आरतीची व्यवस्था निशुल्क करणेस मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्याता असावी.

**मागणी–** दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे कार्यक्रमासाठीसुत्रसंचालकाची नेमणूक करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** तरी दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमासठी सुत्रसंचालकची नेमणूक करणेस व याकामी (आवश्यकता असलेस) येणा-या खर्चास मान्यता असावी. तसेच सदरचे कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या देश-विदेशातील साईमंदिरांच्या प्रतिनिधींची दर्शन/आरतीची व्यवस्था विनाशुल्क करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करणेसाठी सुत्रसंचालिका श्रीमती.कश्यता अनिल भाटीया, पुणे यांची विनाशुल्कसेवा घेण्यात यावी व त्याची निवास, भोजन व दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. तसेच चर्चासत्रासाठी उपस्थित राहणाऱ्या देश-विदेशातील साईमंदिरांचेप्रतिनिधींची, त्यांचे ओळखपत्र पाहून फक्त एक वेळेस दर्शन व्यवस्था निशुल्क करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी आवश्यकता भासलेस येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.११** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे चर्चासत्राकामी उपस्थित देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचे अल्पोपहार व प्रसादभोजनाचे मेनू निश्चित होऊन, त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- महाराष्ट्र शासनाने पुर्नघटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियम "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनूसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवायचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक :- दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय.

प्रस्तावना :- उपरोक्त विषयांकितकामी, संदर्भिय क्रं.१ नूसार, श्री साईबाबा यांच्या समाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने, समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदीरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी जगभरातील सर्व साई मंदीराच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजीत करणेचा निर्णय मा.व्य.समिती दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत घेतलेला आहे.

संदर्भिय अं.नं.२ नूसार उपरोक्त चर्चासत्रासाठी उपस्थित राहाणारे साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांची अल्पोपहार, भोजन व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करावयाची आहे. याबाबत दि.२६/१०/२०१७ रोजी मा.उपजिल्हाधिकारी श्री घोडे पाटील यांचे समवेत विभागीय अधीक्षक यांचे सभेत, दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी होणा-या जागतिक चर्चासत्रकामी उपस्थित जगभरातील सर्व साई मंदीराचे विश्वस्त, अधिकारी, पदाधिकारी, साईभक्त यांना द्यावयाचे अल्पोपहार व भोजनातील पदार्थाबाबत निश्चिती करुन घेवुन त्यानूसार पदार्थ देण्यात यावेत. यासाठी येणा-या खर्चाचा प्रस्ताव सादर करुन मान्यता घेण्यात यावी असे आदेश वजा सुचना करण्यात आलेल्या आहेत.

मागील वर्षी अशाच प्रकारे देश-विदेशातील साईभक्तांचे चर्चासत्र दि.११ डिसेंबर-२०१६ रोजी संस्थानचे वतीने आयोजीत करणेत आलेले होते. त्यावेळीही उपस्थित मान्यवरांची मा.व्य.समितीची मान्यता घेवून नामांकित केटरर्सकडून विविध पध्दतीने दरपत्रके मागविणेत आलेले होते. सदर चर्चासत्रकामी २५०० ते ३००० व्यक्तींची सकाळी अल्पोपहार, दुपारी जेवण व रात्रीचे जेवणाची मागील पानावर नमूद केलेप्रमाणे व्यवस्था करणेत आलेली होती. त्याकामी प्रत्यक्ष रक्कम रु.१,५०,०००/- व वितरीत करणेकामी रु.२,७५०००/- इतका खर्च आलेला होता.

तसेच NRI व परदेशातून येणारे साईभक्त यांचेकरीता अंदाजे २००-२५० व्यक्तींसाठी कॉन्टीनन्टल फुडची व्यवस्था हॉटेल साई पॅलेस,मुंबई चे मालक श्री रवि शेट्टी यांनी कोणताही मोबदला न घेता स्वत:हाचे उपस्थितीत त्यांचे शेफ (कुक) आणून देणगी स्वरुपात केलेली होती.

अल्पोपहार व्यवस्थेकामी पदार्थ - १) इटली २) मेंदुवडा ३) सांबर ४) खोबरा चटणी ४) उपमा ५) पोहे ६) शिरा,

सकाळचे जेवण - १) मटर पनीर २) बटाटा चटणी ३) कांदाभजी ४) सिताफळ रबडी,५) जिलेबी ६) पापड ७) चटणी ८) सलाड ९) डाळ भात १०) व्हेज बिर्यानी ११) चपाती १२) साधी पुरी

रात्रीचे जेवण - १) डाळ २) भात ३) खिचेडी ४) कढी ५) लाडु ६) चपाती ७) मिक्स भाजी ८) पिठले ९) पापड १०) चटणी ११) सलाड

त्याचप्रमाणे आता, दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी होणा-या जागतिक चर्चासत्रकामी अंदाजे २५०० ते ३००० उपस्थित जगभरातील सर्व साई मंदीराचे विश्वस्त, अधिकारी, पदाधिकारी, साईभक्त यांची सकाळी अल्पोपहार दुपारी व रात्रौ प्रसादभोजन व्यवस्था कार्यक्रम स्थळी दोन सत्रात करता येईल. चर्चासत्रकामी वरील

उपस्थित मान्यवरांची, NRI व परदेशातून येणा-या भक्तांची अल्पोपहार व भोजनातील पदार्थ निश्चित होणे गरजेचे आहे.

तदनंतर नामांकित केटरर्सकडून खालीलप्रमाणे अल्पोपहार व भोजनातील पदार्थ तयार करणेकामी विविध पध्दतीने दरपत्रके मागविता येतील.

सदर चर्चासत्रकामी येणा-या मान्यवरांची दि.२२ डिसेंबर-२०१७ चे रात्रौ अंदाजे १००० ते १५०० व्यक्तींची भोजनव्यवस्था साईआश्रम भाग-०१ येथील स्वयंसेवी प्रसादभोजन कक्षामध्ये रात्रौ १०.०० पर्यंत मोफत करता येईल.

मागणी:- प्रास्तविकनूसार देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त, अधिकारी/पदाधिकारी यांच्या प्रतिनिधींची तसेच NRI व परदेशातून येणा-या भक्तांची अल्पोपहार व भोजनव्यवस्था कार्यक्रमस्थळी करावयाची आहे. अल्पोपहार व प्रसादभोजन+कॉन्टीनन्टल फुड (ठरवलेले मेनू) तयार करणेसाठी लागणारा गॅस, भांडी, आचारी व आचारी मदतनीस यांचे स्वतंत्र दरपत्रक मागविता येईल. उपरोक्तप्रमाणे पदार्थ तयार करणेकामी (मजुरी रकमेसाठी) नामांकित केटरर्सकडुन विविध पध्दतीने दरपत्रके मागवुन अल्पोपहार व भोजनाची सुविधा पुरविता येईल. त्याकामी अंदाजे रक्कम रु.२,९५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- तरी श्रींचे शताब्दी महोत्सव निमित्त दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त, अधिकारी/पदाधिकारी तसेच NRI व परदेशातून येणा-या भक्तांची अल्पोपहार, प्रसादभोजन पदार्थ+कॉन्टीनन्टल फुड तयार करणेकामी (गॅस,भांडी,आचारी व आचारी मदतनीससह फक्त मजुरी रक्कम) उच्च प्रतिचे नामांकित केटरर्सकडून विविध पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे मजुरी रक्कम रु.२,९५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच चर्चासत्रकामी निश्चित झालेले पदार्थ तयार करणेकामी आवश्यक लागणारा भाजीपाला व किराणा माल, मिनरल वॉटर, दुधजन्य पदार्थ, फळे इ. खरेदी विभागाकडून खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी उपरोक्त विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे चर्चासत्राकामी उपस्थित देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचा कार्यक्रमाच्या दिवशीचा अल्पोपहार व दुपारच्या प्रसादभोजनाचे मेनू प्रशासकीय स्तरावर निश्चित करणेत यावे व प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ते पदार्थ बनवून घेणेकामी उच्च प्रतिचे नामांकित केटरर्सकडून विविध पध्दतीने मजुरीची दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले. तसेच त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. यावेळी अशीही सुचना करणेत आली की, चर्चासाठीच्या उपस्थितांची दि.२३ डिसेंबर रोजी रात्रीचे व अगोदरच्या दिवशीची (दि.२२ डिसेंबर रोजीची) प्रसादभोजन व्यवस्था श्री साईप्रसादालयामध्ये मोफत करणेत यावी.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवामध्ये दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे चर्चासत्राकामी उपस्थित देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचे अल्पोपहार व प्रसादभोजन व्यवस्थेकामी वाढपी केटरर्स, बुफे स्टॉल वगैरे सुविधा पुरविणेकामी येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- महाराष्ट्र शासनाने पुर्नघटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियम "समितीची कर्तव्य व अधिकारी " या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेची मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनूसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवायचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:- दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय.

प्रस्तावना :- उपरोक्त विषयांकितकामी, संदर्भिय क्रं.१ नूसार, श्री साईबाबा यांच्या समाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१

ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालवधीमध्ये साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने, समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदीरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी जगभरातील सर्व साई मंदीराच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजीत करणेचा निर्णय मा.व्य.समिती दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत घेतलेला आहे.

संदर्भिय अं.नं.२ नूसार उपरोक्त चर्चासत्रासाठी उपस्थित राहाणा-या साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांची अल्पोपहार,भोजन व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करावयाची आहे. याबाबत दि.२६/१०/२०१७ रोजी मा.उपजिल्हाधिकारी श्री घोडे पाटील यांचे समवेत विभागीय अधीक्षक यांचे सभेत, दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी होणा-या जागतिक चर्चासत्रकामी उपस्थित जगभरातील सर्व साई मंदीराचे विश्वस्त, अधिकारी, पदाधिकारी, साईभक्त यांना द्यावयाचे अल्पोपहार व भोजनातील पदार्थांबाबत निश्चिती करुन घ्यावी. निश्चिती झालेले पदार्थ वितरीत करणेकामी व्ही.आय.पी वाढपी केटरर्स, आकर्षक सजावट केलेले बुफे कॅनॉपी काऊंटर, राऊंड टेबल्स लावून आकर्षक भोजनव्यवस्था करण्यात यावी. यासाठी येणा-या खर्चाकामी मा.व्य.समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करुन मान्यता घेण्यात यावी असे आदेश वजा सुचना करण्यात आलेल्या आहेत.

मागीलवर्षी अशाच प्रकारे देश-विदेशातील साईभक्तांचे चर्चासत्र दि.११ डिसेंबर-२०१६ रोजी संस्थानचे वतीने आयोजीत करणेत आलेले होते. त्यावेळीही उपस्थित मान्यवरांची मा.व्य.समितीची मान्यता घेवून नामांकित केटरर्सकडून विविध पध्दतीने दरपत्रके मागवून अंदाजे २५०० ते ३००० व्यक्तींची सकाळी अल्पोपहार, दुपारी जेवण व रात्रीचे जेवण वितरीत करणेकामी रक्कम रु.२,७५०००/- इतका खर्च आलेला होता.

त्यानूसार दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी होणा-या जागतिक चर्चासत्रकामी अंदाजे २५०० ते ३००० उपस्थित जगभरातील सर्व साई मंदीराचे विश्वस्त, अधिकारी, पदाधिकारी, साईभक्त यांना द्यावयाचे अल्पोपहार व भोजनातील पदार्थ वितरीत करणेकामी व्ही.व्ही.आय.पी वाढपी केटरर्स, आकर्षक सजावट केलेले कॅनॉपी बुफे काऊंटर, राऊंड टेबल्स लावून आकर्षक भोजनव्यवस्था करण्यात यावी. याकामी संस्थानमार्फत विद्युत पुरवठा करुन स्थानिक/बाहेरील नामांकित केटरर्सकडून अल्पोपहार व भोजनातील पदार्थ वितरीत करणेकामी विविध पध्दतीने दरपत्रके मागविता येतील.

मागणी:- प्रास्तविकनूसार देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त, अधिकारी/पदाधिकारी अंदाजे २५०० ते ३००० प्रतिनिधींची अल्पोपहार व भोजनव्यवस्था कार्यक्रमस्थळी या ठिकाणी करावयाची आहे. अल्पोपहार व प्रसादभोजन पदार्थ वितरीत करणेकामी व्ही.व्ही.आय.पी वाढपी केटरर्स, आकर्षक सजावट केलेले बुफे कॅनॉपी काऊंटर, राऊंड टेबल्स लावून आकर्षक भोजनव्यवस्था करणे गरजेचे आहे. त्याकामी लागणारे साहीत्य वापरुन व निश्चित झालेले पदार्थ वितरीत करणेकामी नामांकित केटरर्सकडुन विविध पध्दतीने दरपत्रके मागविता येईल. त्याकामी अंदाजे रक्कम रु.२,९०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख नव्वद हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- तरी श्रींचे शताब्दी महोत्सव निमित्त दि.२३ डिसेंबर-२०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त, अधिकारी/पदाधिकारी यांचे अल्पोपहार, प्रसादभोजन पदार्थ वितरण (सर्व्हीस देणेकामी) करणेकामी व्ही.व्ही.आय.पी वाढपी केटरर्स, फुलांची आकर्षक सजावट केलेले बुफे कॅनॉपी काऊंटर, आकर्षक राऊंड टेबल्स लावून भोजनव्यवस्था करणेकामी उच्च प्रतिचे नामांकित केटरर्सकडून विविध पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे मजुरी रक्कम रु.२,९०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख नव्वद हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी उपरोक्त विषयाची टिपणी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजीचे चर्चासत्राकामी उपस्थित देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचे अल्पोपहार व प्रसादभोजन व्यवस्थेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाढपी केटरर्स, बुफे स्टॉल वगैरे सुविधा पुरविणेकामी उच्च प्रतिच्या नामांकित केटरर्सकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे होणाऱ्या चर्चासत्रासाठी उपस्थित राहणाऱ्यांना चहा, दुध, कॉफी व पाणी बॉटल मोफत पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी शताब्दी वर्ष दि.०१/१०/२०१७ ते १८/१०/२०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जात आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहुन श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल त्या दृष्टीकोनातून संस्थानचे विविध विभागांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजी सभेत सादर करणेत आलेल्या प्रारूप धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमास मान्यता देणेत आलेली आहे.त्या अनुषंगाने,समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपूर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे,नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिराच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित होत असले बाबत कॅन्टीन विभागास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार कॅन्टीन विभागामार्फत खालील प्रमाणे व्यवस्था करता येईल.

**व्दारावती भक्तनिवासस्थान कडील व्यवस्था**

| दिनांक | चहा | कॉफी | दूध | बिस्कीटे | पाणी बॉटल | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २२/१२/२०१७ | १०० | २५ | २५ | २ बॉक्स | २५ बॉक्स | |
| २३/१२/२०१७ | १५० | ५० | ५० | | | |
| २४/१२/२०१७ | ५० | २५ | २५ | | | |
| एकुण | ३०० | १०० | १०० | २८८ | ६०० | |
| दर | २.०० | ३.०० | ३.०० | ५.०० | ५.०० | |
| एकुण रूपये | ६०० | ३०० | ३०० | १४४० | ३००० | ५६४०/- |

**साईआश्रम भक्तनिवासस्थान कडील व्यवस्था**

| दिनांक | चहा | कॉफी | दूध | बिस्कीटे | पाणी बॉटल | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २२/१२/२०१७ | १००० | ३०० | २०० | २० बॉक्स | १५० बॉक्स | |
| २३/१२/२०१७ | १५०० | ९०० | ६०० | | | |
| २४/१२/२०१७ | ३०० | १०० | १०० | | | |
| एकुण | २८०० | १३०० | ९०० | २८८० | ३६०० | |
| दर | २.०० | ३.०० | ३.०० | ५.०० | ५.०० | |
| एकुण रूपये | ५,६००/- | ३,९००/- | २,७००/- | १४,४००/- | १८,०००/- | ४४,६००/- |

**साईनगर मैदान - कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थितांकरीता**

| दिनांक | चहा | कॉफी | दूध | बिस्कीटे | पाणी बॉटल | एकुण रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २३/१२/२०१७ | २००० | ५०० | ५०० | २० बॉक्स | १५० बॉक्स | |
| दर | २.०० | ३.०० | ३०० | ५.०० | ५.०० | |
| एकुण रूपये | ४,०००/- | १,५००/- | १,५००/- | १४,४००/- | १८,०००/- | ३९,४००/- |
| कंत्राटी कर्मचारी | १२ X दर रू. ४१५/- प्रति दिवशी | | | | | ४,९८०/- |
| | | | | | एकुण रूपये | ९४,६२०/- |

दि.२३/१२/२०१७ रोजी होणा-या देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष,विश्वस्त,पदाधिकारी यांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्रासाठी उपस्थितीत राहणा-यांकरीता वरील प्रमाणे व्यवस्था विनामुल्य करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रूपये ९४,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकरीता सविनय सादर.

**निर्णय क्र.९२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष, विश्वस्त व पदाधिकारी यांचे चर्चासत्रासाठी उपस्थित राहणाऱ्यांना चहा, दुध, कॉफी व पाणी बॉटल मोफत पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९४,६२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जगभरातील सर्व साई मंदिरांचे विश्वस्तांच्या चर्चासत्राचे उद्घाटन कार्यक्रमाकरीता मा.उपराष्ट्रपती महोदय, भारत सरकार उपस्थित राहणार असलेने या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार कार्यालयीन वाहने भाडोत्री तत्वावर घेणे व याकामी येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१. कलम १७(१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष् आदेशास अधीन राहून , संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्यीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे , ही समितीची कर्तव्ये असतील.

२. कलम २१(१) मध्ये विश्वस्तव्यस्थेचा निधी, आयक अधिनियम, १९६१ च्या तुरतुदींना अधिन राहुन, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करणत येईल,--

(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी , पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) श्री साईबाबांच्या शिकविणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना-** श्री साईबाबांचे समाधीस २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असलेने या शताब्दी वर्षात दिनांक २३/१२/२०१७ रोजी साईनगर शिर्डी येथे जगभरातील सर्व साईमंदिराच्या विश्वस्तांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले आहे.

या कार्यक्रमास मा उपराष्ट्रपती महोदय उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाकरीता मा अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त, अधिकारी यांचेकरीता वाहन व्यवस्था करावी लागणार आहे.

सध्या वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली कार्यालयीन वाहने व त्यांचा वापर याबाबत तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहनाचा तपशिल | संख्या | वापर |
|---|---|---|---|
| | टाटा सुमो | ०१ | वापरण्यास योग्य नाही.<br>लिलावास प्रस्तावीत आहे. |
| | महिंद्रा लोगान- | ०१ | वापरण्यास योग्य नाही.<br>लिलावास प्रस्तावीत आहे. |
| | टाटा नॅनो | ०१ | प्रसादालयातील दैनंदिन नैवेदय व<br>इतर स्थानीक कामाकरीता वापर |
| | महिंद्रा झायलो | ०१ | स्थानीक कामाकरीता वापर<br>लिलावास प्रस्तावीत आहे. |
| | एकूण | ०४ | |
| ब. | इनोव्हा कार | ०४ | कार्यालयीन कामी वापर |
| | महिंद्रा बोलेरो | ०१ | कार्यालयीन कामी वापर |
| | महिंद्रा एक्सयुव्ही | ०१ | कार्यालयीन कामी वापर |
| | महिंद्रा टीयुव्ही. | ०१ | कार्यालयीन कामी वापर |
| | स्विप्ट डिझायर | ०१ | कार्यालयीन कामी वापर |
| | महिंद्रा स्कॉर्पीओ | ०१ | कार्यालयीन कामी वापर |

| | | | |
|---|---|---|---|
| | टोयोटा अल्टीज | ०१ | कार्यालयीन कामी वापर |
| | एकूण | १० | |

मा उपराष्ट्रपती महोदय यांचे शिर्डी येथील दौ-या निमित्त आयोजित कार्यक्रमासाठी खालील प्रमाणे वाहनांची आवश्यकता भासणार आहे.

| मा अध्यक्ष, मा उपाध्यक्ष व मा विश्वस्त | अधिकारी | प्र.अधिकारी, प्रसादालय, चौकशी निवासस्थान व इतर विभाग | एकूण |
|---|---|---|---|
| ०७ | ०५ | ०४ | १६ |

वरील प्रमाणे वाहनाची निकट लक्षात घेता दिनांक २३/१२/२०१७ रोजी ५ वाहने (इनोव्हा, तवेरा व तत्सम) भाडोत्री तत्वावर घ्यावे लागतील. तरी याकामी वाहने भाडोत्री तत्वावर घेणे बाबत. निर्णय होणेस विनंती आहे.

याकामी आवश्यकतेनुसार भाडोत्री तत्वावर वाहने घेतल्यास याकरीता अदांजे रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे भाडोत्री तत्वावर वाहने घेणे व याकामी येणारे खर्चा बाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जगभरातील सर्व साई मंदिरांचे विश्वस्तांच्या चर्चासत्र कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थापन समिती सदस्य यांचे वापरासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इनोव्हा वाहने एक दिवसासाठी भाडोत्री तत्वावर घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू वाहने ज्यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत, त्यांना कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१५** **श्री साईबाबांच्या समाधीस सन- २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असलेने दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिरांचे अध्यक्ष व पदाधिकारी या उपस्थित निमंत्रीतांना चर्चासत्र प्रसंगी प्रकाशने विभागामार्फत द्यावयाचे साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि. ३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८४४ (०१) अन्वये दि. ११.१२.२०१६ रोजी झालेल्या जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित निमंत्रीतांना चैनसह बॅग देणेबाबत प्रथम २००० नग खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु.१४५/- प्रमाणे रक्कम रुपये. २,९०,०००/- मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता प्राप्त झालेने त्यानुसार चैनसह बॅग खरेदीची कार्यवाही करण्यात येऊन, कार्यक्रम संपन्न झालेला आहे.

**प्रस्ताव:-** जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी/२६१९ /२०१७ दि. २७.०९.२०१७ अन्वये श्री साईबाबांचे समाधीस सन-२०१८ मध्ये दि.१८.१०.२०१८ रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहेत. सदर कार्यक्रमाचे औचीत्य साधून मा. व्यवस्थापन समितीने दि.०१ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ अखेर शताब्दी वर्ष साजरे करणेबाबत निर्णय घेतला असून, त्यासाठी स्वतंत्र शताब्दी कक्ष स्थापन करण्यात येऊन, शताब्दी वर्षात भक्तांसाठी वेगवेगळे कार्यक्रम सेवेत रुजू करणेबाबत नियोजीत आहे व त्याचाच एक भाग म्हणून देशात व विदेशात श्री बाबांच्या पादूका भक्तांचे दर्शनार्थ पाठविणेकामी प्रथमत: माहे ऑक्टोबर-२०१७ मध्ये गोवा, दिल्ली येथे श्री च्या पादुकांना दर्शनार्थ भव्य सोहळयास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शताब्दी वर्षात आनंदमय, भक्तीमय वातावरण निर्मिती तयार झालेली आहे.

सदर कार्यक्रमांचा एक भाग म्हणून संपुर्ण वर्षभरात साजरा केले जाणारे विविध धार्मीक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे अयोजन करण्यात आले असून, माहे डिसेंबर २३ रोजी देश-विदेशातील साईमंदिराचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना आमंत्रित करुन, सदर चर्चा सत्रात साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार-प्रसार होऊन, शताब्दी वर्षात भक्तिमय वातावरण निर्मिती होण्याकरीता चर्चासत्र आयोजित करण्यात येत आहे.

मा. उपजिल्हाधिकारी सो. यांचे कक्षात झालेले दि.२६.१०.२०१७ रोजीचे सभेप्रसंगीचे निर्देशानुसार वरील कार्यक्रमासाठी उपस्थित राहणारे अध्यक्ष व पदाधिकारी यांना कार्यक्रमाचे ठिकाणी मा. अध्यक्ष महोदय व सदस्य तसेच निमंत्रीतांकडून काही सूचना अथवा विचारांचे नोंदी घेणेकामी एक फोल्डर, नोट पॅड व पेन असे छोटया आकारातील चांगल्या प्रकारचे खरेदी करुन चर्चेवेळी देता येईल असे मत आहे.

**मागणी:-** त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीत चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

१) उपस्थित निमंत्रितांना फोल्डर व त्यातील अनुषंगीक साहित्यासह खरेदी करुन द्यावे किंवा कसे ? याबाबत निर्णय होणेस विनंती.

२) खरेदी करुन द्यावयाचे झालेस, खालील मुद्यांबाबतही निर्णय होणेस विनंती.

अ) फोल्डर लेदर, कॅनव्हॉस, प्लॉस्टिक व रेगझीन कुठल्या प्रकारात खरेदी करावे.

ब) फोल्डरचा रंग कुठला असावा.

क) फोल्डर साधारण किती किंमतीचे असावे.

ड) किती फोल्डर संख्या नग खरेदी करावेत.

**विभागाचा अभिप्राय:-** करिता मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वरील अ.नं. १ व २ बाबत निर्णय होऊन खरेदी बाबत मान्यता असल्यास, येणा-या अंदाजे अपेक्षीत खर्चास व त्यासाठीचे दरपत्रक मागविणेस व कार्यक्रमाचा कालवधीची तारीख जवळ आलेने तातडीचे काम म्हणून निम्नत्तम दर देऊ केलेल्या दरधारकास कार्यादेश पारित करणेस मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२८** **सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, दि.११.१२.२०१६ रोजी झालेल्या जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित निमंत्रीतांना देण्यात आलेले फोल्डर (बॅग) चा नमुना सभेस दाखविणेत आला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.११.१२.२०१६ रोजीच्या चर्चासत्र प्रसंगी देण्यात आलेल्या फोल्डर सारखे फोल्डर दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्रकामी उपस्थित निमंत्रीतांना देण्यात यावे व त्यामध्ये प्रकाशने विभागाने सभेसमोर सादर केलेले 3D फोटो (without frame) भेट म्हणून ठेवण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१६** **शताब्दी महोत्सवानिमित्त जागतिक साई मंदिर परिषद उपस्थित मान्यवर व मंदिर प्रतिनिधी यांच्या सत्कारासाठी मंदिर विभागामार्फत साहित्य निश्चित करणे व त्यासाठी आवश्यक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येत आहे. संदर्भीय आदेशान्वये या अनुषंगाने संपूर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा व भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेचा निर्णय दि.२०/०८/२०१७रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेतलेला आहे.

**प्रस्ताव:-** त्या अनुषंगाने चर्चासत्राकरीता मंदिर विभागामार्फत खालीलप्रमाणे नियोजन करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**अ)** दि.२३-२४.१२.२०१७ रोजी होणारे चर्चासत्राकरीता मा.उपराष्ट्रपती महोदय हे येत असल्याने त्यांचे दर्शनाचे व मंदिरामधील सत्कार साहित्याबाबत निश्चित होणेस व याकामी होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच समाधी मंदिरातील मान्यवरांचे सत्कार कोणाच्या हस्ते करण्यात येणार आहे याबाबत निर्णय होणेस विनंती.

मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे सत्काराकरीता दि.०१/१०/२०१७ रोजी मा.महामहिम राम नाथ कोविंद, राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे सत्काराप्रमाणे श्रींची पावडर मार्बल मूर्ती सागवाणी लाकडी बॉक्ससह देता येईल (बॉक्स बांधकाम विभागामार्फत तयार करता येईल, त्याकामी अंदाजे रु.१,५००/- प्रत्येक बॉक्स). तरी याकामी बांधकाम विभागामार्फत विहीत पद्धतीने स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन्स मागवुन बॉक्स तयार करुन घेणेस व वार्षिक पुरवठादार यांचेकडुन मुर्ती खरेदी करणेस मान्यता असावी ही विनंती. याकामी सत्काराकरीता (मोठे) ०५ नग-०५ नंबर पवडर मूर्ती- सागवाण लाकडी बॉक्ससह व (मध्यम)१५नग-०४नंबर मुर्ती-सागवाण लाकडी बॉक्ससह तयार करुन घेणेकामी अंदाजे रक्कम रु.३०,०००/-(अक्षरी रुपये तीस हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षीत

आहे. तसेच मुर्ती वार्षिक पुरवठादार यांचेकडुन खरेदी करता येईल. अथवा मा.व्यवस्थापन समिती ठरवेल त्याप्रमाणे सत्कार साहित्य खरेदी करणेस व होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**ब)** दि.२३-२४.१२.२०१७ रोजी निमंत्रीत करण्यात आलेले जगभरातील साईमंदिरांचे प्रतिनिधी यांना पुर्वी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६"मध्ये दिल्याप्रमाणे प्रत्येकी वेलवेट पट्टे देण्यात आले होते. याही वेळेस सदर वेलवेट पट्टे द्यावे किंवा कसे? याबाबत निर्णय व्हावा. प्रतिनिधींना सत्कार प्रित्यर्थ प्रति नग रु.११/- प्रमाणे ३००० नग वेलवेट पट्टे खरेदीकरीता एकूण अंदाजे रक्कम रु.३३,०००/- (अक्षरी रुपये तेहतीस हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी वेलवेट पट्टे सत्कार प्रित्यर्थ प्रतिनिधी यांना द्यावे किंवा कसे? याबाबत निर्णय व्हावा व याकामी होणा-या अंदाजे रक्कम रु.३३,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तरी याकामी विहीत पद्धतीने स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन्स मागवुन वेलवेट पट्टे खरेदी करणेस मान्यता असावी ही विनंती.

**क)** "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" मध्ये प्रतिनिधी यांना रुम देतांना ३ नंबर पावडर मार्बल मुर्तीचे सन्मानचिन्ह तयार करुन देण्यात आले होते. याही वेळी निमंत्रीत प्रतिनिधी यांना त्याच पद्धतीचे सन्मानचिन्ह द्यावे किंवा कसे? याबाबत निर्णय व्हावा. अथवा इतर काही सन्मानचिन्ह/फोटो द्यावे याबाबत निर्णय होणेस विनंती. निमंत्रीत प्रतिनीधी यांना मागीलप्रमाणे सन्मानचिन्ह देण्याकरीता वार्षिक मुर्ती पुरवठादार यांचेकडुन खरेदी करता येईल. यापुर्वी तयार करण्यात आलेले "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" चे शिल्लक असलेले ७००नग सन्मानचिन्ह देणेस मान्यता असावी. मुर्तीखालील लाकडी बॉक्स खरेदी करीता अंदाजे प्रति नग रु.१४०/-प्रमाणे २०००नग खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.२,८०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख वीस हजार मात्र) एवढा खर्च अपेक्षीत आहे. तरी निमंत्रीत प्रतिनिधी यांना सन-२०१६ प्रमाणे सन्मानचिन्ह द्यावे किंवा कसे? याबाबत निर्णय व्हावा. अथवा इतर काही सन्मानचिन्ह किंवा फोटो द्यावे याबाबत निर्णय होणेस विनंती. याकामी विहीत पद्धतीने स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन्स मागवुन सन्मानचिन्ह खरेदी करणेस व त्याकामी होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**ड)** त्याचप्रमाणे निमंत्रीत प्रतिनिधी यांना साहित्य वाहनेकरीता कापडी पिशवी खरेदी करावी लागेल. तरी ३०००नग कापडी पिश्व्या खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.९,०००/-(अक्षरी रुपये नऊ हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तरी निमंत्रीत प्रतिनीधी यांचे साहित्य नेणेकरीता पिशवी द्यावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती. तसेच याकामी स्थानिक दुकानदार यांचेकडुन कोटेशन्स मागवुन पिशवी खरेदी करणेस व होणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता खरेदी विभागामार्फत पिशवी खरेदीची प्रक्रीया चालू आहे. कार्यक्रमाचे पुर्वी सदर खरेदीची कार्यवाही पुर्ण झाल्यास सदर पिश्व्या खरेदी विभागामार्फत घेता येतील.

**इ)** जागतिक प्रतिनिधी चर्चासत्राचे सत्काराचे वेळी तसेच मान्यवरांचे स्वागताकरीता सनई-चौघडा वादक व तुतारी वादक नेमणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार सनई-चौघडा वादक नेमणेकरीता अंदाजे रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तरी जागतिक प्रतिनिधी चर्चासत्राकरीता सनई-चौघडा वादक नेमणेस व याकामीचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

<u>उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मंदिर विभागामार्फत करावयाच्या खरेदीचा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे-</u>

| अ.क्र | तपशील | अंदाजे दर (प्रति नग) | एकूण आवश्यकता | एकूण खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **अ** | मान्यवरांचे सत्कारासाठी लाकडी बॉक्स | १५०० | २० नग | ३०,०००/- | बांधकाम विभागामार्फत कोटेशन्सने खरेदी |
| | ५ नंबर पावडर मुर्ती | ४३०/- | ०५ नग | २,१५०/- | **वार्षिक पुरवठादारमार्फत** |
| | ४ नंबर पावडर मुर्ती | १४०/- | १५ नग | २,१००/- | **वार्षिक पुरवठादारमार्फत** |
| **ब** | वेलवेट पट्टे (१.२५मीटर) | ११/- | ३००० नग | ३३,०००/- | कोटेशन मागवुन खरेदी |
| **क** | प्रतिनिधी सत्काराकरीता ३नंबर पावडर मुर्ती | ९०/- | २००० नग | १,८०,०००/- | **वार्षिक पुरवठादारमार्फत** |
| **ड** | प्रतिनिधी सन्मानचिन्ह तयार करणेसाठी लाकडी ब्लॉक (बैठक) | १४०/- | २००० नग | २,८०,०००/- | कोटेशन मागवुन खरेदी |
| **इ** | साहित्याकरीता कापडी पिशवी | ०३/- | ३०००नग | ९,०००/- | कोटेशन मागवुन खरेदी |

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** तरी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या प्रतिनिधी यांचे चर्चासत्राकरीता उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अक्र.**अ)** ते **इ)** प्रमाणे सत्कार साहित्य निश्चित होणे व सत्कार कोणी करावा हे निश्चित होणेस तसेच उपरोक्त नमूद सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस व सत्काराकरीता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे वार्षिक निविदाधारकाकडुन मुर्ती खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साई मंदिर परिषदेस उपस्थित राहणाऱ्या मान्यवर व साई मंदिरांचे प्रतिनिधी यांना देण्यात येणाऱ्या फोल्डरमध्ये वेलवेटचे पट्टे व श्रीडी फोटो भेट म्हणून देण्यात यावा. मान्यवरांच्या मंदिरामधील सत्कारासाठी नेहमीप्रमाणे मुर्ती, शॉल व उदी पाकिट इ. साहित्य देण्यात यावे, असे ठरले. तसेच त्यासाठी आवश्यक विहीत पध्दतीचा अवलंब करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रासाठी येणाऱ्या मान्यवर व मंदिरांचे प्रतिनिधी यांचा सत्कार करणेकामी स्मृतीचिन्ह (मेमोन्टोज)/ मुर्ती/ फोटो खरेदीकामी धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

1. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.
2. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.
3. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.
4. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे समंत करणेत आलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्ताने दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते ३१ऑक्टोंबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे, असे ठरले आहे.

*२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५८ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.*

**----------** शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा. मुख्यमंत्री तसेच संत महंत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेत यावे याचबरोबर आयोजित होणा-या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रीत करणेत यावे.

**-----------**समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय

वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

**प्रस्तावः-** त्यानुसार दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा कार्यक्रमांचे उदघाटन व ध्वजारोहणप्रसंगी मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांना निमंत्रित करणेत आले होते. त्यावेळी उपस्थित अतिथीना संस्थानतर्फे स्मृतीचिन्ह देण्यात आले आहे. आता शिर्डी येथे दिनांक २३ व २४ डिसेंबर, २०१७ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजित करणेत येणार आहे. सदरहू कार्यक्रमाच्या उदघाटनासाठी मा.उपराष्ट्रपती महोदय भारत गणराज्य उपस्थित राहणार आहेत. तर समारोपाच्या कार्यक्रमास मा. पंतप्रधान यांना निमंत्रीत करणेबाबत नियोजन करणेत येत आहे तसेच याचबरोबर वर्षभरातील विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रसंगी प्रवचनकार, संत मंहत यांना निमंत्रीत करणेत येणार आहे सदर कार्यक्रमाकरीता उपस्थित महत्वाचे अतिथींनाही स्मतीचिन्ह देण्याचे नियोजन आहे.

तसेच जे सर्व सामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी सोहळयाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश- विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमाकरीता उपस्थित असणा-या महत्वाच्या अतिथींना देखील (मा.मुख्यमंत्री, मंत्रीगण व इतर मान्यवर) संस्थानतर्फे स्मतीचिन्ह द्यावे लागतील. यासाठी चांगल्या प्रतीचे स्मृतीचिन्ह खरेदी करावे लागणार आहेत.

यापुर्वी दि.०१ ऑक्टोबर,२०१७ रोजीश्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षातील कार्यक्रमांचे उदघाटन व ध्वजारोहणप्रसंगी मा.राष्ट्रपती, भारत सरकार यांना निमंत्रित करणेत आले होते. त्यावेळी उपस्थित अतिथीना मे. बालाजी डिझाईल कॉन्सेप्ट प्रा. लि., दिल्ली यांचेकडून खालील प्रमाणे स्मृतीचिन्ह खरेदी करुन देण्यात आले आहेत.

| अ.नं. | तपशील | दर रुपये | आवश्यक नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | MDF Window Frame Size 4 | १८,७२९/- | १ | १८,७२९/- |
| २. | MDF Window Frame Size 3 | ८,५९९/- | १५ | १,२८,९८५/- |
| | | | **एकुण रु.-** | **१,४७,७१४/-** |

आता शताब्दी सोहळा वर्षाभरासाठी लागणारे निमंत्रित मान्यवरांना स्मृतीचिन्ह खरेदीकामी मे. बालाजी डिझाईल कॉन्सेप्ट प्रा. लि., दिल्ली यांचेकडे वेगवेगळया साईजचे दरांची विचारणा केली असता, त्यांनी ई-मेलव्दारे खालीलप्रमाणे चालू व नवीन दर कळविलेले आहेत.

| अ.नं. | तपशील | दर रुपये |
|---|---|---|
| १. | MDF Window Frame Size 4 | १८,७२९/- |
| २. | MDF Window Frame Size 3 | ८,५९९/- |
| ३. | MDF Window Frame Size 2 | २,९९९/- |
| ४. | MDF Window Frame Size 1 | १,९९९/- |

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षाचे कार्यक्रमासाठी अतिथींना स्मृतीचिन्ह देणेबाबत खालीलबाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयातील वर्षभराच्या निरनिराळया धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहणा-या मान्यवर/ अतिथींना स्मृतीचिन्ह देणेबाबत निर्णय घेणे. (सोबत यादी)

२) श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा वर्षभरासाठी लागणा-या कार्यक्रमासाठी कोणत्या साईजचे किती नग स्मृतीचिन्ह खरेदी करावे याबाबत निर्णय घेणे.

तरी स्मृतीचिन्हाबाबत धोरणात्मक निर्णय होणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद चर्चासत्रासाठी येणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करणेकामी समिती सदस्य मा.ॲड्मोहन जयकर यांनी सुचविलेले २० नग साईमंत्र व प्रतिमा (साईज ३० से.मी. X ४० से.मी.) यांची विहीत पध्दतीने खरेदी करणेत यावी, असे ठरले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.१८** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी साईनगर मैदान येथे स्टेज, मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी विविध बाबी व पर्यायांवर निर्णय घेणे, तसेच त्यासाठी येणाऱ्या खर्चास व विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ख) अन्वये, " रूढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे'' अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ड) अन्वये, " श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे'' अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयी-सुविधा उभारणे. तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्टचे आयोजन करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील व श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.

दि.११ डिसेंबर, २०१६ रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र साई आश्रम परिसरात आयोजित करणेत आले होते. त्यानुषंगाने सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात पून्हा एकदा देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रम तसेच साई भजन संध्या आयोजित करणेत येत आहे, जेणेकरून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. देश-विदेशातील साई मंदिरांचे अंदाजे २५०० अधिकारी /पदाधिका-यांची बैठक व्यवस्था होईल एवढया आकारमानाचा आवश्यकतेनुसार वॉटरप्रुफ सुशोभित मंडप उभारणेबाबतची कार्यवाही करणेबाबत शताब्दी कक्ष यांनी इकडील विभागास कळविले आहे. साई आश्रम परिसरात टेंसाईल फॅब्रीक शेड उभारणी करणेत येत आहे तसेच साई मंदिरांचे चर्चासत्र कार्यक्रमासाठी दि.२३/१२/२०१७ रोजी मा. उप राष्ट्रपती हे देखील उपस्थित राहणार आहेत. त्यामूळे सदर कार्यक्रम हा मा. राष्ट्रपती महोदय यांचे दि.०१/१०/२०१७ रोजीचे कार्यक्रम स्थळाचे ठिकाणी म्हणजेच साईनगर येथिल मैदानावर आयोजीत करणेबाबत मा. उप जिल्हाधिकारी यांचे दि.२६/१०/२०१७ रोजीचे कार्यालयीन बैठकीत सूचना देण्यात आली आहे.

साईनगर येथिल मैदानावर मंडप टाकून विषयांकीत कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे त्याकरीता मंडप व्यवस्थेसाठी खालीलप्रमाणे ०३ पर्यायांबाबत विचार करता येईल.

**<u>पर्याय (अ)</u> :- डोम मंडप (कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि. २३/१२/२०१७ – ०१ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **डोम मंडप व्यवस्था:-** वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी २७' उंची व दोन्ही बाजूस १२' उंची असलेला डोम मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेटची बिछायत इ. (लोखंडी स्ट्रक्चर व कैच्या). | १००'X२६०' | २६,००० चौ. फुट | २५/- | **६,५०,०००/-** |
| | | | | **(अ) एकुण रु.** | **६,५०,०००/-** |

**<u>पर्याय (ब)</u> :- सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था**
**(कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि. २३/१२/२०१७ - ०१ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप :-** वॉटरप्रुफ छत असलेला सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप, आतिल बाजूस सुशोभित | १००'X२६०' | २६,००० चौ. फुट | ३०/- | **७,८०,०००/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कापड, मध्यवर्ती ठिकाणी २२' ते २४' उंची व दोन्ही बाजूस १५' ते १६' उंची असलेला मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस ८' ते १०' उंची सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेटची बिछायत इ. (लोखंडी स्ट्रक्चर, ९" पाईप, पत्रा व कैच्या). | | | | |
| | | | **(ब) एकुण रु.** | | **७,८०,०००/-** |

**<u>पर्याय (क)</u>:- ताडपत्रीचे छत असलेला मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था (कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि.२३/१२/२०१७ – ०१ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **ताडपत्रीचे छत असलेला मंडपाची व्यवस्था:-** वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी २२' ते २४' उंची व दोन्ही बाजूस १५' ते १६' उंची असलेला मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस ८' ते १०' उंची सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेटची बिछायत इ. (लोखंडी स्ट्रक्चर, पाईप, ताडपत्री व कैच्या). | १००'X२६०' | २६,००० चौ. फुट | १५/- | **३,९०,०००/-** |
| | | | | **(क) एकुण रु.** | **३,९०,०००/-** |

**ड) सोफे, खुर्च्या, एलईडी स्क्रिन, बॅरेकेडींग, स्वागत कक्ष इ. व्यवस्था करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**
**(कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि.२३/१२/२०१७ – ०१ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | **स्वागत कमानी:-** २'X२' आकाराच्या बॉक्सटाईप स्वागत कमानी उभारणे. (रुंदी - २०', उंची - २०'). | --- | ०२ नग | ८०००/- | १६,०००/- |
| ०२ | पांढरे शुभ्र व स्वच्छ कव्हरसह हाताच्या पी. व्ही. सी खुर्च्या पुरविणे. | --- | २००० नग | १०/- | २०,०००/- |
| ०३ | श्री सिटर एस. एस. सोफा कुशनसह व त्याकरीता पांढरे शुभ्र व स्वच्छ कापड लावणे. | --- | ५० नग | ४००/- | २०,०००/- |
| ०४ | फ्लेक्स बॅनर व इतर प्रिटींग खर्च. | --- | --- | --- | ७५,०००/- |
| ०५ | व्ही.आय.पीं करीता व्यासपीठावर टु सिटर डनलॉप प्रिमियम सोफे ठेवणे. | --- | २५ नग | १८००/- | ४५,०००/- |
| ०६ | व्ही.आय.पीं करीता व्यासपीठावर टी पॉय ठेवणे. | --- | ०३ नग | १,५००/- | ४,५००/- |
| ०७ | लाकडी बल्ल्यांचे बॅरेकेडींग ५' उंचीचे | ३०० | र. फुट | ७५/- | २२,५००/- |
| ०८ | लोखंडी बॅरीकेडस्-४' उंचीचे | १५०० | र.फुट | ४०/- | ६०,०००/- |
| ०९ | स्वागत कक्ष व माहीती कक्ष - ०४ युनिटकरीता प्रत्येकी ०४ खुर्च्या व ०२ टेबलसह मंडप व्यवस्था. | १०'X१०' | ४०० चौ. फुट | ३०/- | १२,०००/- |
| १० | साईनगर मैदान येथे ८X१२ चे दोन नग व १०X२०चे ०२ नग, साईआश्रम भक्तनिवास येथे ८X१२ चे ०१ नग, श्री साईप्रसादालय येथे ८X१२ चे ०१ नग या प्रमाणे रायझर स्कॅनसह एलईडी स्क्रिन बसविणे तसेच व्हिडीओ शुटींग कॅमेरे ०४ नग व एच.डी. मिक्सर ०१ नग याप्रमाणे व्यवस्था करणे. | | | | १,६०,०००/- |
| | | | **(ड) एकुण रु.** | | **४,३५,०००/-** |

**इ) स्टेज, पीव्हीसी खुर्च्या (कव्हर सह), साऊंड सिस्टीम व विद्युत व्यवस्था करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

**(कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि.०१/०१/२०१८ – १० दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **स्टेज व्यवस्था:-** ८०'X४०' साईजचे जमिनीपासून ०४ फुट उंचीचे भक्कम स्टेज उभारणे, स्टेजवर लाल रंगाचे कारपेट, दोन्ही बाजूने भक्कम पाय-या लावणे, स्टेजला बॅकड्रॉपसाठी गडद रंगाचे सुशोभित कापड लावणे. (स्टेजवरील १००'X६०' साईजचे मंडपसह) | ८०'X४०' | ३२०० चौ. फुट | ८०/- | २,५६,०००/- |
| २ | हाताच्या पी. व्ही. सी खुर्च्या पुरविणे. | --- | १००० नग | ८०/- | ८०,०००/- |
| ३ | साऊंड सिस्टीम व स्टेज लाईटस् / इफेक्ट लाईटस् व्यवस्था करणे. | --- | --- | --- | ६,००,०००/- |
| ४ | मंडप व स्टेजकरीता लाईट, फॅन, जनरेटर इ. विद्युत व्यवस्था करणे. | --- | --- | --- | २,१२,०००/- |
| | | | **(इ) एकुण रु.** | | **११,४८,०००/-** |

**फ) साईमंदिरे चर्चासत्र कार्यक्रमाचे मुख्य दिवशी भोजन व्यवस्थेकरीता खालीलप्रमाणे मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. (कालावधी दि. २३/१२/२०१७ ते दि. २३/१२/२०१७ – ०१ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जेवणाकरीता मंडप व्यवस्था:-** प्लास्टीक ताडपत्रीचा वॉटरप्रुफ छत असलेला भक्कम मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, खांब पट्टी, मंडपाच्या आतील छत नवीन पांढ-या स्वच्छ कापडाद्वारे तयार करणे. मंडपामध्ये व्हेन्टीलेशनची व्यवस्था करणे. मध्यवर्ती ठिकाणी किमान १५' उंची व बाजूस १२' उंची असलेला मंडप, तसेच मंडपाचा मधला गाळा किमान ४५' ते ६०' रुंदीचा असणे आवश्यक, सर्व बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात पी. व्ही. सी. मॅटींग बिछायत इ. (लोखंडी पाईप/ कैची स्ट्राक्चर इ. सह). | ९०'X१८०' | १६,२०० चौ. फुट | १५/- | २,४३,०००/- |
| २ | **किचनकरीता शेड व्यवस्था:-** पत्र्याचे छत असलेले भक्कम शेड उभारणे, शेडची मध्यवर्ती ठिकाणी १५' ते १६' उंची व दोन्ही बाजूस १२' ते १४' उंची आवश्यक, सर्व बाजूस कनात इ. (लोखंडी पाईप व लाकडी बल्ली स्ट्रक्चर इ. सह). | ७५'X४५' | ३३७५ चौ. फुट | १५/- | ५०,६२५/- |
| ३ | जेवण व किचन मंडपमध्ये विद्युत प्रकाश व्यवस्थेकरीता सी.एफ.एल, फॅन इ. विद्युत व्यवस्था वायरींगसह करणे. | ---- | ---- | ---- | ४०,०००/- |
| ४ | बिगर हाताच्या पी.व्ही.सी खुर्च्या पुरविणे. | ---- | १००० नग | ९/- | ९,०००/- |
| | | | | **(फ) एकुण रु.** | **३,४२,६२५/-** |

**प्रस्ताव:** वर नमूद केलेप्रमाणे मंडप व्यवस्थेसाठी ०३ पर्याय प्रस्तावित करणेत येत आहेत. तसेच स्टेज,भोजन मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था हि तीनही पर्यायांसाठी सारखीच प्रस्तावित आहे. त्यानुसार सदर ०३ पर्यायांसाठी अपेक्षित असलेल्या एकुण खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पर्याय क्र. | व्यवस्थेचा तपशिल | रक्कम (रू.) | GST 18% | एकूण खर्च रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|
| १ | डोम मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था तसेच भोजन मंडप (अ+ड+इ+फ) | २५,७५,६२५/- | ४,६३,६१२/- | ३०,३९,२३७/- |
| २ | सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप, स्टेज व इतर अनुषंगीक व्यवस्था तसेच भोजन मंडप (ब+ड+इ+फ) | २७,०५,६२५/- | ४,८७,०१२/- | ३१,९२,६३७/- |
| ३ | ताडपत्रीचे छत असलेला कापडी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था तसेच भोजन मंडप (क+ड+इ+फ) | २३,१५,६२५/- | ४,१६,८१२/- | २७,३२,४३७/- |

शिर्डी येथे साईनगर मैदानावर देश विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र, शिर्डी महोत्सव कार्यक्रम तसेच साई भजन संध्या आयोजीत करणेसाठी मंडप व्यवस्थेकरीता उपरोक्त पर्यायांपैकी एका पर्यायाची निश्चिती होऊन सदरकामी खालील बाबींवर निर्णय होणे अपेक्षित आहे.

१) स्टेजची साईज:- ८०' X ४०' अथवा ६०' X ४०' यापैकी अथवा अन्य साईज निश्चित होणेस विनंती.

२) मंडपची साईज:- १००'X२६०' इतकी धरण्यात आलेली आहे, ती अथवा अन्य साईज निश्चित होणेस विनंती.

३) मंडपाचा प्रकार:- डोम मंडप अथवा पत्रा- सुपरस्ट्रक्चर मंडप अथवा साधा ताडपत्री मंडप यापैकी एक पर्याय निश्चित होणेस विनंती.

४) स्टेज बॅकड्रॉप फ्लेक्स बोर्डमध्ये करणे अथवा स्पेशल स्टेज डेकोरेशन स्पेशलाईज्ड एजन्सीकडून करुन घेणे याबाबत निर्णय होणेस विनंती. स्टेज डेकोरेशन स्पेशलाईज्ड एजन्सीकडून करावयाचे झाल्यास त्यासाठी येणारे जादा खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

५) मा.उपराष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे राजशिष्टाचारानुसार ऐनवेळी आवश्यक ती अतिरिक्त कामे करणेस मंजुरी मिळणेस विनंती.

तरी वरील बाबींवर व पर्यायांबाबत निर्णय होणेस, तसेच त्यासाठी येणारे खर्चास व सदरचे कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रमासाठी साईनगर मैदान येथे उपरोक्त प्रस्तावातील व्यवस्थेच्या तपशीलामधील पर्याय २ मध्ये नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. याचबरोबर स्टेजशेजारी २ ग्रीन रुमही तयार करणेत याव्यात. सदरहू मंडप व स्टेज १० व ग्रीन रुम २ दिवस ठेवण्यात यावा. तसेच त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास व मा.उपराष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे राजशिष्टाचारानुसार ऐनवेळी आवश्यक ती अतिरिक्त कामे याच मंजुर दराने करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१९** **दि.२३ डिसेंबरच्या आयोजित चर्चासत्र कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेकामी रु.१,२५,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणे, तसेच फुल सजावटदारांकडून दरपत्रके मागवून फुल सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 या कालावधी साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्ये एकाच वेळी राबविले जावेत, संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवन कार्याचा व विचारांचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच संपुर्ण वर्षभर भक्तिमय वातावरण राहावे यासाठी 23 डिसेंबर 2017 रोजी जग भरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेत येत आहे. सदर कार्यक्रमासाठी श्री साईबाबा मंदिराचे देशातील, विदेशातील महत्त्वाचे व्यक्ती तसेच संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व विश्वस्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप जिल्हाधिकारी, उप कार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकिय अधिकारी, सर्व प्र अधिक्षक/ विभाग प्रमुख उपस्थित असणार आहे. त्यामुळे सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करुन सुशोभीकरण करावयाचे आहे. तसेच आलेल्या मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके व गुलाब फुले खरेदी करावयाची आहेत.

मागणी- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने दि.23 डिसेंबर 2017 रोजीच्या आयोजीत चर्चासत्र कार्यक्रमाच्या ठिकाणी खालीलप्रमाणे बुके, गुलाब फुले व फुलांची सजावट करावयाची आहे.

| अ.नं | तपशिल |
|---|---|
| 01 | 40 X 30 फुट मापाच्या स्टेजच्या समोरील बाजूस फुलांचा पट्टा लावणे, (जरबेरा, ऑर्कीड व कार्नेशन एकत्रीत) |
| 02 | स्टेजवर फुलांच्या माळा सोडणे |
| 03 | 20 फुट कमानीला फुलांची सजावट करणे (तोरण) |
| 04 | स्टेजवर पाठीमागील बाजुस बॅनरवर फुलांच्या माळा सोडणे |
| 05 | 80 नग गुलाब बुके (राऊंड बुके) |
| 06 | 1 ते 1.5 फुट ऊंचीचे काटे काढलेले डंच गुलाब (2500 नग) |

तरी उपरोक्त प्रमाणे बुके, गुलाबफुले खरेदी करणेकामी व कार्यक्रमाच्या स्टेजला फुलांची सजावट करणेकामी साधारणत: अंदाजे रु.1,25,000/- (एक लाख पंचविस हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी परिसरातील फुलसजावट करणारे कारागीर यांचेकडुन विहीत पध्दतीने कोटेशन घेऊन न्युनत्तम दराने सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करता येईल. किंवा जर कोणी साईभक्तांनी देणगी स्वरुपात फुलांची सजावट करुन देणेस तयार असल्यास त्यांना फुल सजावटीसाठी परवानगी देता येईल.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थिक विषय आहे.

विभागाचा अभिप्राय/- श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने दि.23 डिसेंबर 2017 रोजी आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके, गुलाब फुले खरेदी करणे व फुलांची सजावट करणेकामी परिसरातील फुलसजावटदरांकडुन कोटेशन मागविणेस तसेच आलेले कोटेशन मा. खरेदी समिती पुढे उघडुन न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.1,25,000/- (एक लाख पंचविस हजार) मात्र खर्चास मान्यता मिळणेस किंवा सदरची फुलसजावट साईभक्तांनी देणगी स्वरुपात करुन दिल्यास त्यांचेकडुन फुल सजावट करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके, गुलाब फुले खरेदी करणे व फुलांची सजावट करणेकामी परिसरातील फुलसजावटदरांकडुन कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजेरु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमख)

---

**विषय नं.२०** **दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजीत केलेल्या देश-विदेशातील साई मंदिरांचे विश्वस्त, प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमासाठी स्थानिक मिडीयाचे प्रतिनिधींना निमंत्रित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद -**महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय.

**प्रस्ताविक –** उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या देश विदेशातील साई मंदिरांच्या विश्वस्त, प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमासाठी मिडीयाचे प्रतिनिधींना निमंत्रीत करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार मागील वर्षी दिनांक ११ डिसेंबर २०१६ रोजी आयोजित केलेल्या साई टेम्पल समिट कार्यक्रमाचे वेळी प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे स्थानिक प्रतिनिधींना कार्यक्रमाचे वृत्तसंकलनासाठी उपस्थित रहाणेबाबत निमंत्रित करण्यात आले होते. तसेच मागील वर्षीचे साई टेम्पल समिट

कार्यक्रमासाठी काही साईभक्त पत्रकार हे साई मंदिरांचे प्रतिनिधीसह कार्यक्रमाचे वृत्तसंकलनासाठी उपस्थित राहीले होते. त्यावेळी इतर राज्यातून स्वतः होवून आलेल्या साईभक्त पत्रकारांची दर्शन/आरती, भोजन व निवासाची व्यवस्था संस्थान मार्फत विनाशुल्क करण्यात आली होती. त्याप्रमाणे याही वर्षी दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या साई मंदिराच्या प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमाचे वृत्तसंकलनासाठी स्थानिक प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या प्रतिनिधींना निमंत्रीत करणेबाबत आदेश व्हावेत तसेच या चर्चासत्र कार्यक्रमाचे वृत्तसंकलनासाठी स्वतः होवून येणा-या देशातील साईभक्त पत्रकार, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधींची दर्शन/ आरती, भोजन व निवासाची व्यवस्था विनाशुल्क करावी असे मत आहे.

**मागणी–** दिनांक २३ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या साई मंदिराचे प्रतिनिधींचे चर्चासत्रासाठी स्थानिक प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या प्रतिनिधींना निमंत्रीत करणेबाबत व वृत्तसंकलनासाठी स्वतः होवून येणा-या देशातील मिडीयाचे प्रतिनिधींची दर्शन/आरती, भोजन व निवासाची व्यवस्था विनाशुल्क करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** दिनांक २३ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या साई मंदिराच्या प्रतिनिधींचे चर्चासत्रासाठी स्थानिक प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या प्रतिनिधींना निमंत्रीत करणेबाबत निर्णय व्हावा. तसेच दिनांक ११ डिसेंबर २०१६ रोजी आयोजित ग्लोबल साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे वृत्तसंकलन करणेसाठी स्वतः होवून आलेल्या देशातील प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधींची दर्शन/आरती, भोजन व निवास व्यवस्था संस्थानमार्फत विनाशुल्क करण्यात आली होती. त्याचप्रमाणे दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित केलेल्या देश-विदेशातील साई मंदिरांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमाचे वृत्तसंकलन करणेसाठी स्वतः होवून उपस्थित राहणा-या देशभरातील साईभक्त पत्रकार, प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाच्या प्रतिनिधींची दर्शन/आरती, भोजन व निवासाची व्यवस्था संस्थान मार्फत विनाशुल्क करणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजीत केलेल्या देश-विदेशातील साई मंदिरांचे विश्वस्त, प्रतिनिधींचे चर्चासत्र कार्यक्रमासाठी परदेशातूनही साईभक्त येणार असल्यामुळे या कार्यक्रमाची विस्तृत प्रसिध्दी होणेकरीता स्थानिक मिडीयाबरोबरच बाहेरील मिडीया प्रतिनिधींनाही निमंत्रण देण्यात यावे व कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या मिडीयाच्या प्रतिनिधींची निवास, कार्यक्रमाच्या ठिकाणी भोजन तसेच मंदिरामध्ये फक्त दर्शनाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२३.१२.२०१७ रोजी साईभजन संध्या कार्यक्रम निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितिची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

“श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले.”

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत असे ठरले.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे प्रस्ताव स्वतंत्रपणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत असे ठरले आहे.

दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी सायं.७ ते १० या वेळेत आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी मोफत सेवा देणारे कलाकार तसेच मानधन घेऊन सेवा देणारे कलाकार यांचे पर्याय खालील तक्त्यात नमूद केले आहे. या पर्यायांमधून कार्यक्रमासाठी एका कलाकाराची निवड करता येईल.

| अ.नं. | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | डॉ.प्रवीण गांवकर | पणजी | ९४२२०५८१५४ | साईनाद | ५४ | | मा.व्यवस्थापन समितिसमोर स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| २) | नीरज शर्मा | दिल्ली | ९८९१४७१०६६ | साईभजन | १० | सहयोगी कलाकारांचा मानधन व प्रवास खर्च ५१,०००/- | |
| ३) | पंकज श्रीवास्तव | दिल्ली | ९८११२७४१४८ | साईभजन | ७ | सहयोगी कलाकारांचा फक्त प्रवास खर्च १५,०००/- | |
| ४) | मुकूल बंधु | कानपूर | ९३३५३२२४२० | साईभजन | १२ | मोफत | |
| ५) | दिलीप शडंगी | रायपूर, छत्तीसगड | ७३५४४५४४४४<br>९४३७१८४७६३ | हिंदी साईभजन | २५ | फक्त प्रवास खर्च ३१,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६) | सक्सेना बंधु | दिल्ली | ९८१००२८१९२ | साईभजन | १२ | मोफत | मा.विश्वस्त श्री.वाकचौरे सो. यांची शिफारस |

तरी दि.२३ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२३.१२.२०१७ रोजी, समिती सदस्य मा.ॲड्मोहन जयकर यांनी सुचविलेले रुपकुमार व सोनाली राठोड यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेत यावा व त्यांना रु.२,८०,०००/- + प्रवास खर्च मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२३.१२.२०१७ रोजी "साईनाद" या संगीतमय साईभजन कार्यक्रमाचे आयोजन करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

३) मा.स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत प्रस्तावित केलेल्या "साईनाद" कार्यक्रमाचे आयोजनासाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु.१३ लाख ही अधिक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी ठेवावा असे ठरले.

**प्रस्तावना:-** ध्वनी इव्हेंटस्, पणजी, गोवा यांनी दि.३०/१०/२०१७ रोजीच्या ई-मेलद्वारे, "श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र देणारे श्री साईनाथ अवघ्या विश्वाची आई म्हणजे श्री साई माऊली, समतेचा आणि ममतेचा हाक

देणारे श्रीसाईनाथ महाराज श्रीसाईबाबांचा हाच विश्वशांतीचा धागा पकडुन आम्ही "साईनाद" हा संगीताचा कार्यक्रम सादर करीत आहोत. एकुण ५४ कलाकाराने साज चढवलेल्या ह्या कार्यक्रमात पाश्चिमात्य व भारतीय संगीताचा मिलाफ आहे. भारतीय लोकवाद्यांचा वापर करुन वेगवेगळ्या साईधुनवर भारतीय शास्त्रीय संगीताच्या सुरांची बरसात केलेली आहे. ख-या अर्थाने फ्युजन असलेला हा कार्यक्रम श्रवणीय आहे" असे कळविले आहे. तसेच या ई-मेल सोबत त्यांनी "साईनाद" या कार्यक्रमाची स्क्रीप्टही पाठविली आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

ध्वनी इव्हेंटसचा "साईनाद" हा संगीताचा कार्यक्रम आहे. दोन तासाच्या या कार्यक्रमामध्ये पाश्चिमात्य व भारतीय संगीताचा मिलाफ आहे. या कार्यक्रमामध्ये एकुण ५४ कलाकार सहभागी असून भारतीय लोकवाद्यांचा वापर करुन वेगवेगळ्या साईधुनवर भारतीय शास्त्रीय संगीताच्या सुरांचा समावेश आहे.

"साईनाद" कार्यक्रम दि.२३/१२/२०१७ रोजी आयोजित करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन "साईनाद" कार्यक्रमाचे आयोजनासाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु.१३ लाख ही अधिक असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी ठेवावा असे ठरले होते.

आता दि.०३/११/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे ध्वनी इव्हेंटस् यांनी "साईनाद" कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे सुधारीत खर्चाचा तपशिल कळविला आहे.

**A) "साईनाद" कार्यक्रमासाठी कलाकार मानधन व इतर खर्च :-**

| Sr.No. | Particulars | Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Honorarum (All Artists) | 6,00,000/- |
| 02 | Transportation & Meals, all permits, toll (In Transit) (2 AC buses for 3 nights) | 3,00,000/- |
| 03 | Sound Engineer (Inclusive of Travel) | 50,000/- |
| | **Total Amound (A) :-** | **9,50,000/-** |

याबरोबरच संस्थानकडून "साईनाद" कार्यक्रमाचे आयोजनासाठी साऊंड सिस्टीम, कलाकारांची निवासव्यवस्था, जेवण याबाबत व्यवस्था होणेसाठी कळविले आहे. सदर बाबींसाठी संस्थानकडून होणा-या अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**B) "साईनाद" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अतिरिक्त खर्च:-**

| अ.नं. | खर्चाचा तपशिल | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | कलाकारांसाठी निवासव्यवस्था (५४ कलाकार)<br>साई आश्रम भक्तनिवास येथे ३ दिवस (१८ रुमस् X रु.२००/- प्रतिदिन) | १०,८००/- |
| | **एकुण रक्कम (B) :-** | **१०,८००/-** |
| | **एकुण रक्कम (A+B) :-** | **९,६०,८००/-** |

तरी उपरोक्त साईभजन कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) "साईनाद" कार्यक्रमासाठी आदा करावयाची रक्कम रु.९,५०,०००/- मात्र (सर्व शासकीय करांसह एकत्रित मानधन) तसेच संस्थानमार्फत होणा-या अतिरिक्त अंदाजे रक्कम रु.१०,८००/- मात्र अशा एकुण रक्कम रु.९,६०,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देणे.

२) "साईनाद" हा कार्यक्रम साईनगर मैदान येथे दि.२३/१२/२०१७ रोजी जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठीच्या स्टेज व मंडपात सायं.७ ते १० या वेळेत आयोजित करणे.

३) संस्थानमार्फत कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांची मोफत दर्शन ,चहा, नाष्टा, प्रसादभोजन व्यवस्था करणे.

४) ई-मेलमध्ये कळविलेनुसार सदर कार्यक्रमासाठी मानधनाच्या ५० टक्के रक्कम ॲडव्हान्स म्हणून देणे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात दि.२३/१२/२०१७ रोजी ध्वनी इव्हेंटस् यांचा "साईनाद" हा कार्यक्रम आयोजित करण्यासाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निर्णय क्र.९३४ अन्वये दि.२३.१२.२०१७ रोजी साईभजन संध्या कार्यक्रम निश्चित करणेत आलेला असल्यामुळे सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२४.१२.२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचे कार्यक्रमाचे आयोजनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यातील दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावेत असे ठरले आहे.

**प्रस्तावना:-** श्री.अशोक हांडे, मुंबई यांनी त्यांचे दि.२४/०६/२०१७ व दि.०४/११/२०१७ रोजीचे ई-मेल द्वारे, चौरंग संस्थेचा "मराठी बाणा" हा कार्यक्रम मराठी संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविणारा संगीताचा एक भव्य उत्सव आहे. तसेच आमच्या ग्रुपमध्ये तंत्रज्ञांसह सुमारे १५० कलाकार असतात. अडीच तास चालणा-या या कार्यक्रमामध्ये १५ मिनिटांचा मध्यांतर आहे.

सदर कार्यक्रमासाठी श्री.अशोक हांडे यांनी रक्कम रु.१०,५०,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये दहा लाख पन्नास हजार मात्र) शुल्क असणार आहे. यामध्ये प्रयोगाचे मानधन, सेटींग व प्रवास खर्च यांचा समावेश असणार आहे. तसेच संस्थानला त्यावर १८% जीएसटी ची रक्कम आदा करावी लागणार आहे.

तसेच संस्थानकडून स्टेज (Size 80' x 44' and Height 5' as per our technical specifications & Layout), Trussing, Sky Folding, Generator Sets या बाबी पुरविल्या जाव्यात. कार्यक्रम निश्चितीसाठी एकुण रक्कमेच्या ५०% ॲडव्हान्स रक्कम द्यावी लागेल व उर्वरीत रक्कम कार्यक्रमाच्या १५ दिवस अगोदर द्यावी लागणार आहे. सदर कार्यक्रमाची व्हीडीओ शुटींग किंवा ऑडीओ रेकॉर्डींग करण्याची परवानगी असणार नाही. कार्यक्रमाचे फक्त फोटो काढता येणार आहेत, असे कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

दि.०१/११/२०१७ रोजी मा.स्थानिक उपसमितीचे सभेपुढे "मराठी बाणा" हा कार्यक्रम दि.२४/१२/२०१७ रोजी आयोजित करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन "मराठी बाणा" या कार्यक्रमाचे आयोजनासाठी त्यांनी कळविलेली रक्कम रु.२० लाख ही अधिक असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी ठेवावा असे ठरले होते.

आता दि.०४/११/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी खालीलप्रमाणे खर्चाचा सुधारीत तपशिल कळविला आहे.

**A) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी श्री.अशोक हांडे, मुंबई यांनी कळविलेला कलाकार मानधन व इतर खर्च :-**

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Show Remuneration, Setting, Travelling etc. | 10,50,000/- |
| | GST (18%) | 1,89,000/- |
| | **Total Amount (A) :-** | **12,39,000/-** |

याबरोबरच श्री.अशोक हांडे यांनी "मराठी बाणा" कार्यक्रमाचे आयोजनासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबी कळविल्या आहेत. त्यासाठी संस्थानकडून होणा-या अतिरिक्त खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**B) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी संस्थानकडून होणारा अतिरिक्त खर्च :-**

| Sr.No. | Particulars | Approximate Amount Rs. |
|---|---|---|
| 01 | Trussing (Size 80' x 40') | 35,000/- |
| 02 | Sky Folding (8' x 8' with Height 32') | 8,000/- |
| 03 | Generators – 03 Generators for setting the lights one day before the show and 05 Generators at the time of show. All should be silent of 125 KVA (Rent – Rs.8,000/- per day, Diesel Exemption – Per hour 12 Litres.) | 1,00,000/- |
| 04 | Green Rooms – 04 Gents and 03 Ladies (Rs.8,000/- Per Green Room) | 56,000/- |
| 05 | Mobile Toilet – 02 Gents and 02 Ladies (Rs.400/- per mobile toilet per day | 3,200/- |
| 06 | Accommodation – 150 Artistes (50 Rooms x Rs.200/- x 2 Days) | 20,000/- |
| 07 | Other Necessary Arrangements (local transportation etc.) | 1,00,000/- |
| | Total :- | 3,22,200/- |
| | GST (18%) | 57,996/- |
| | **Total Amount (B) :-** | **3,80,196/-** |
| | **Total Amount (A) :-** | **12,39,000/-** |
| | **Grand Total (A+B) :-** | **16,19,196/-** |

तरी "मराठी बाणा" या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) "मराठी बाणा" या कार्यक्रमाचे आयोजन करावा किंवा कसे याबाबतचा निर्णय घेणे.

२) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी आदा करावयाची रक्कम रु.१२,३९,०००/- मात्र (जीएसटी सह) तसेच संस्थानमार्फत होणा-या अतिरिक्त अंदाजे रक्कम रु.३,८०,१९६/- मात्र अशा एकुण रक्कमेसह रक्कम रु.१६,१९,१९६/- मात्रचे खर्चास मान्यता देणे.

३) "मराठी बाणा" हा कार्यक्रम साईनगर मैदान येथे दि.२४/१२/२०१७ रोजी जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठीच्या स्टेज व मंडपात सायं.७ ते १० या वेळेत आयोजित करणे.

४) "मराठी बाणा" कार्यक्रमासाठी Size – 80' x 44' and Height 5' as per technical specifications आकारात स्टेज पुरविणे.

(दि.२३/१२/२०१७ रोजी आयोजित जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी मा.उपराष्ट्रपती महोदय उपस्थित राहणार आहेत. त्याकामी बांधकाम विभागाकडून स्टेजसाठी तीन पर्याय मंजुरीसाठी सुचविण्यात आले आहेत.)

५) संस्थानमार्फत कार्यक्रमासाठी आलेल्या कलाकारांची मोफत दर्शन व्यवस्था करणे.

६) ई-मेलमध्ये कळविलेनुसार सदर कार्यक्रमासाठी मानधनाच्या ५० टक्के रक्कम ॲडव्हान्स म्हणून देणे. (कोणत्याही कार्यक्रमासाठी ॲडव्हान्स रक्कम देण्याची तरतूद नाही)

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात दि.२४/१२/२०१७ रोजी चौरंग संस्थेचा "मराठी बाणा" या कार्यक्रमाचे आयोजनाबाबतचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.२४.१२.२०१७ रोजी श्री.अशोक हांडे यांचा मराठी बाणा हा कार्यक्रम आयोजित करावयाचा माणस आहे, परंतु या कार्यक्रमासाठीचा खर्च खुपच जास्त असल्यामुळे रु.१० लाख मात्र खर्चामध्ये (मानधनासह) कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का व मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे कार्यक्रमासाठी तयार करणेत आलेल्या स्टेजवर कार्यक्रम करणेस तयार आहेत का, याची विचारणा संबंधीतांनाकरणेत यावी व या एकत्रित खर्चामध्ये श्री.अशोक हांडे कार्यक्रम करणेस तयार असतील, तर त्यांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.३१.१२.२०१७ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य

देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

३) मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभरात वेगवेगळ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल यादृष्टीने कामकाज चालू आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७५० अन्वये मान्यता मिळालेली आहे. मा. स्थानिक उपसमितीचे दि.०१/११/२०१७ रोजीचे सभेत माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०१७ मध्ये आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये दि.२३, २४ व ३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा असे ठरले.

दि.३१ डिसेंबर २०१७ रोजी रा.७ ते ९.३० व ९.३० ते १२ या वेळेत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी खालील तक्त्यात नमूद मोफत सेवा देणारे कलाकार तसेच मानधन घेऊन सेवा देणारे कलाकार यांची यादी नमूद केली आहे. या पर्यायांमधून दि.३१ डिसेंबर २०१७ रोजीच्या दोन कार्यक्रमांसाठी कलाकारांची निवड करता येईल.

**अ) सायं.७ ते ९.३०**

| अ.नं. | प्रस्तावित कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कलाप्रकार | कलाकार संख्या | मानधन रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | विजय साखरकर | मुंबई | ९८२१३९३३२३, ९८२०२१५८११ | साई-स्वर गीत संध्या | ३० | फक्त प्रवास खर्च ३५,०००/- | शालेय शिक्षणमंत्री मा.श्री.विनोद तावडे यांचे विकाअ श्री.सुनिल शिंदे यांची शिफारस |
| २) | रविंद्र साठे | मुंबई | ९८२१५०३६९० | साई भजन | | २,००,०००/- | |
| ३) | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | भजन | १५ | फक्त प्रवास खर्च २५,०००/- | |
| ४) | श्रावण (बाळा) इंगळे | मुंबई | ९६६४१९८८५२ | साई भजन | २५ | फक्त प्रवास खर्च २१,०००/- | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५) | साई दृष्टी | मुंबई | ९८६७७२०३०८ | साईभजन | १२ | मोफत | |
| ६) | विशाखा पार्सेकर | मुंबई | ९८२००३७४७८ | साई गितांजली | २५ | फक्त प्रवास खर्च १८,०००/- | |

**ब) रात्री ९.३० ते १२**

| **अ.नं.** | **प्रस्तावित कलाकाराचे नांव** | **ठिकाण** | **संपर्क** | **कलाप्रकार** | **कलाकार संख्या** | **मानधन रु.** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | दिलीप शडंगी | रायपूर, छत्तीसगड | ७३५४४५४४४४ ९४३७१८४७६३ | हिंदी साईभजन | २५ | फक्त प्रवास खर्च ३१,०००/- |
| २) | नीरज शर्मा | दिल्ली | ९८९१४७१०६६ | साईभजन | १० | सहयोगी कलाकारांचा मानधन व प्रवास खर्च ५१,०००/- |
| ३) | पंकज श्रीवास्तव | दिल्ली | ९८११२७४१४८ | साईभजन | ७ | सहयोगी कलाकारांचा प्रवास खर्च १५,०००/- |
| ४) | अनुपमा देशपांडे | मुंबई | ९८२०१२४७९५ | भजन | १२ | सहयोगी कलाकारांचा मानधन व प्रवास खर्च १,५०,०००/- |
| ५) | संजीव कुमार | दिल्ली | ७५०३७६६४८६ | साईभजन | १२ | मोफत |
| ६) | कैलास हरेकृष्णदास | नागपूर | ९५४५८९७३०८ | साईभजन | १२ | मोफत |

तरी दि.३१ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित करावयाच्या साईभजन संध्या कार्यक्रमासाठी कलाकार व त्यांचे मानधन ठरविणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.९३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये दि.३१.१२.२०१७ रोजी सायंकाळी ०७.०० ते ९.३० पर्यंत रविंद्र साठे, मुंबई यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करुन त्यांना एकत्रित रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात यावे व रात्री ०९.३० ते १२.०० वाजेपर्यंत नीरज शर्मा, दिल्ली यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करुन त्यांना एकत्रित रु.५१,०००/- (सहयोगी कलाकारांचे मानधन व प्रवास खर्च) मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

विषय नं.२५ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये दि.०१.०१.२०१८ रोजी महारक्तदान शिबीराचे आयोजन करणेबाबत.**

प्रस्ताव- **<u>अधिनियम २००४ मधील तरतुद</u>–** कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**<u>व्यवस्थापन समिती ठराव क्र.</u>–** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्र.६८२.

**<u>प्रास्तविक-</u>** महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि.१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. आणि त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या

पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्सवी वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. परंतु हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त साईभक्तांचा हा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

साईसमाधी शताब्दी सोहळा अधिक संस्मरणीय आणि अर्थपुर्ण व्हावा या उददेशाने श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालये विभागाने शताब्दी वर्षात जगभरात रक्तदान संकल्प राबविण्याचे ठरविले आहे.

तरी यानिमित्ताने दि.०१/०१/२०१८ या दिवशी शिर्डी येथे महारक्तदान शिबीर घेणेचे श्री साईबाबा संस्थानने ठरवले आहे.

महारक्तदान शिबीर पार पाडण्यासाठी बांधकाम विभाग , विदयुत विभाग,मेकॅनिकल विभाग,जनसंपर्क कार्यालय, आय.टी.विभाग, कॅन्टीन विभाग, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, वाहन, साईआश्रम-१, श्री साईप्रसादालय, साईभक्त निवासस्थान, कामगार विभाग, मध्यवर्ती औषध भांडार, बगीचा विभाग, मंदीर विभाग, बी.व्ही.जी. इंडीया लि., प्रकाशने विभाग, श्री साईनाथ रुग्णालय इ. विभागांनामार्फत योग्यती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान-** मा.व्यवस्थापन सभा दि.२०/०८/२०१७, निर्णय क्रं.६८२ परिशिष्ट -अ

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** दि.०१/०१/२०१८ रोजी आयोजित होणा-या महारक्तदान शिबीराच्या अनुषंगाने खालील निर्देशीत केलेल्या विषयांवर निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

१) महारक्तदान शिबीराचे ठिकाण व वेळ निश्चीत करणे.

२) ठिकाण निश्चीत केलेनंतर महाराष्ट्रामध्ये एकुण २९० रक्तपेढया कार्यरत आहेत.यापैकी रक्तदान शिबीरात सहभागी करण्यात येणा-या रक्तपेढयांची निश्चीती व्हावी. (सोबत महाराष्ट्रातील सर्व रक्तपेढयांची यादी जोडलेली आहे.)

मा.अध्यक्ष महोदय यांचेशी केलेल्या चर्चेनुसार महारक्तदान शिबीरासाठी साधारणपणे २५ रक्तपेढया सहभागी कराव्यात व प्रत्येक रक्तपेढीस १०० बाटल्या रक्त गोळा करणेस परवानगी दयावी असे ठरले होते. त्या अनुषंगाने समाविष्ट करणेत येणा-या रक्तपेढयांची निश्चीती करुन मिळावी.

३) रक्तपेढीचा सहभाग नोंदविल्यानंतर साधारणपणे एका रक्तपेढीला किती बेड देणेत यावेत याबाबत संख्या निश्चीत करणेत यावी.

४) सदर महारक्तदान शिबीराचे उदघाटन करावयाचे झाल्यास त्याचे स्वरुप कसे असावे, तसेच योग्य त्या मान्यवर व्यक्तींची व वक्त्यांची देखील निवड करुन मिळावी.

५) रक्तदान शिबीरामध्ये जास्तीत जास्त रक्तदात्यांचा सहभाग नोंदविणेकामी रक्तपेढींशी संलग्न रक्तदान शिबीर संयोजक, शिर्डी व परिसरातील सर्व महाविदयालये, साईदर्शनासाठी येणा-या सर्व पालखी मंडळांना व तसेच जागतिक स्तरावर सर्व साईमंदीरांना पत्र दयावे किंवा कसे याबाबत निर्णय व्हावा.

६) रक्तदात्यांना रक्तदात्यांना मानचिन्हे व सर्टिफिकेट व मानचिन्हे दयावेत किंवा कसे? तसेच रक्तदात्यांची मोफत व्यवस्था व्ही.आय.पी.दर्शनाची व्यवस्था करावी किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

७) लायन्स क्लब इंटरनॅशनल (नगर जिल्हा) यांनी त्यांच्या संस्थेचे देखील शताब्दी वर्ष असलेमुळे श्री साईबाबा संस्थानच्या शिबीराच्या उपक्रमात सहभाग नोंदविणेकामी पत्र दिलेले आहे. तरी लायन्स क्लब इंटरनॅशनल जिल्हा नगर यांना सदर महारक्तदान शिबीरात सहभागी करावे किंवा कसे ? याबाबत देखील निर्णय व्हावा. (सोबत लायन्स क्लब इंटरनॅशनल यांचे पत्र जोडले आहे.)

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे शिबीराचे ठिकाण, वेळ, रक्तपेढयांची निश्चीती करुन आमंत्रण देणेस तसेच रक्तदान शिबीर संयोजक, पालखी मंडळे, महाविदयालये यांना शिबीरात सहभागी होणेकामी आवाहन पत्र देणे.

तसेच वेगवेगळया साईमंदिरांना याच दिवशी त्यांचे स्तरावर शिबीर राबविण्यास आवाहन पत्र देणे. तसेच रक्तदात्यास रक्तदानानंतर प्रत्येकी सर्टिफिकेट व मानचिन्ह ३००० नग खरेदी करणेस व संस्थानच्या इतर विभागांकडुन शिबीरासाठी लागणाऱ्या अनुषंगिक बाबींची व त्या अनुषंगाने होणा-या आर्थिक खर्चास मान्यता होणेस विनंती.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३१ डिसेंबर, २०१७ रोजी रात्री साईनगर मैदानावर शिर्डी महोत्सवाचे आयोजन करणेत आलेले असल्यामुळे दि.०१ जानेवारी, २०१८ रोजी तेथे महारक्तदान शिबीर घेण्यासाठीचे स्ट्रक्चर उभारणे शक्य होणार नाही. याकरीता महारक्तदान दान शिबीर साईनगर मैदान येथे दि.३० डिसेंबर, २०१७ रोजी सकाळी ०८.०० वाजता आयोजित करणेत यावे, असे ठरले. त्यानुशंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१) या रक्तदान शिबीरामध्ये रक्तसंकलन करणेसाठी सर्व समिती सदस्यांनी दि.३० नोव्हेंबर पर्यंत रक्तपेढयांची निवड करुन द्यावी. या रक्तपेढयांची संख्या २५ पर्यंत असावी व त्यांना प्रत्येकी दोन कॉटस् उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**२) सदर महारक्तदान शिबीराचे उदघाटन समिती सदस्य व स्थानिक मान्यवरांच्या हस्ते करणेत यावे.**

**३) रक्तदान शिबीरामध्ये जास्तीत जास्त रक्तदात्यांचा सहभाग नोंदविणेकामी रक्तपेढींशी संलग्न रक्तदान शिबीर संयोजक, शिर्डी व परिसरातील सर्व महाविदयालये, साईदर्शनासाठी येणाऱ्या सर्व पालखी मंडळांना व तसेच जागतिक स्तरावर सर्व साईमंदीरांना पत्र देण्यात यावे.**

**४) रक्तदात्यांना मोफत व्ही.आय.पी. दर्शनाबरोबरच सर्टिफिकेट व दिनदर्शिका- २०१८ भेट स्वरुपात देण्यात यावी.**

**५) लायन्स क्लब इंटरनॅशनल (नगर जिल्हा) यांनाही सदर महारक्तदान शिबीरात सहभागी करुन घेण्यात यावेत.**

**६) या महारक्तदान शिबीरास विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी संस्थानचे संकेतस्थळावर व टाटा स्काय तसेच इतर टी.व्ही. चॅनेलवर त्याचप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी.**

**७) या महारक्तदान शिबीराच्या अनुषंगाने मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये साई ब्रम्हनाद स्वरमंच शिर्डी यांच्या कार्यक्रमाचा समावेश करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८२ खालीलप्रमाणे,
"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावे त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटीव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५० खालीलप्रमाणे,

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कायक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."

**प्रस्तावना:-** श्री.प्रा.रवींद्र पिंगळे, संस्थापक, साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांनी जा.नं.एसबीएस-०९/२०१७ दि.१७/१०/२०१७ रोजीचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात, "श्री साईबाबा संस्थानमध्ये साई समाधी शताब्दी महोत्सवास अतिशय उत्साही वातावरणात सुरुवात झालेली आहे. वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन श्री साईबाबा संस्थानने केलेले असून त्यामध्ये साई भजनाचे देखील आयोजन केलेले आहे. साई ब्रह्मनाद स्वरमंच हा शिर्डी येथील स्थानिक स्वरमंच असून यात सुमारे १५ कलाकार असून यातील सर्व कलाकार हे संगीताचे उच्च शिक्षण घेतलेले असून गेल्या सुमारे १५ वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. साईबाबांचे दरबारात या मंचाने अनेक कार्यक्रम विनामूल्य सादर केलेले आहेत. भारतातही या मंचाने गेल्या पाच वर्षात विविध प्रसंगी सुमारे ३०० पेक्षा अधिक कार्यक्रम सादर केलेले असून आगामी काळातील अनेक कार्यक्रम बुक झालेले आहेत. प.पूज्य साईनाथांच्या कृपाशिर्वादाने आतापर्यंत या मंचाची अतिशय चांगली वाटचाल झालेली आहे. या मंचात हार्मोनियम, तबला, मृदंग, सिंथेसायझर, ऑक्टोपॅड, गायक, गायिका, सूत्रसंचालिका असे सुमारे १५ कलाकार सहभागी असतात असे नमूद करुन या कार्यक्रमासाठी साधारणपणे रु.५१,०००/- मानधन मिळावे किंवा मानधनाची रक्कम आपणास योग्य वाटेल ती आम्हास मान्य असेल." असे कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी (विजयादशमी) १०० वर्षे पूर्ण होत आहेत. श्री साईबाबा संस्थानच्यावतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करीत आहे. या कालावधीमध्ये विविध प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

साई ब्रह्मनाद स्वरमंच हा शिर्डी येथील स्थानिक स्वरमंच असून यात सुमारे १५ कलाकार आहेत. यातील सर्व कलाकार हे संगीताचे उच्च शिक्षण घेतलेले असून गेल्या सुमारे १५ वर्षापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. साईबाबांचे दरबारात या मंचाने अनेक कार्यक्रम विनामूल्य सादर केलेले असून त्यातील काही कार्यक्रम हे परदेशी कलाकारांसह सादर केलेले आहेत. भारतातही या मंचाने ३०० पेक्षा अधिक कार्यक्रम

सादर केलेले आहेत. या मंचात हार्मोनियम, तबला, मृदंग, सिंथेसायझर, ऑक्टोपॅड, गायक, सूत्रसंचालिका असे सुमारे १५ कलाकार सहभागी होणार आहेत. सदरचा कार्यक्रम हा साधारणपणे २ ते ३ तासांचा आहे. यामध्ये मराठी, हिंदी, साई भजन, इतर संतांचे अभंग, गौळण, भारुड, कव्वाली, भावगीत भक्तीगीत, शास्त्रीय भजनाचा समावेश आहे. साई ब्रह्मनाद स्वरमंच,शिर्डी यांनी कार्यक्रमासाठी साधारणपणे रक्कम रु.५१,०००/- मानधन कळविले आहे. तथापि संस्थान देईल ती मानधनाची रक्कम स्विकारण्यास तयार आहेत.

तथापि उपरोक्त साईभजन कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांचा साईभजन कार्यक्रम आयोजित करावा किंवा कसे याबाबतचा निर्णय घेणे.

२) साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांच्या कार्यक्रमासाठी खालील नमूद केलेल्या तारखांमधून एक तारीख निश्चित करणे.

| अ.नं. | महिना | उपलब्ध तारखा | अ.नं. | महिना | उपलब्ध तारखा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जानेवारी २०१८ | १३/०१/२०१८, २६/०१/२०१८, २७/०१/२०१८ | ०५ | मे २०१८ | १२/०५/२०१८ |
| ०२ | फेब्रुवारी २०१८ | १०/०२/२०१८, २४/०२/२०१८ | ०६ | जून २०१८ | २३/०६/२०१८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | मार्च २०१८ | १०/०३/२०१८, २५/०३/२०१८, २६/०३/२०१८ | ०७ | जुलै २०१८ | १४/०७/२०१८, २६/०७/२०१८, २८/०७/२०१८ |
| ०४ | एप्रिल २०१८ | १४/०४/२०१८, २८/०४/२०१८ | ०८ | ऑगस्ट २०१८ | ११/०८/२०१८, २५/०८/२०१८ |

३) साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांना सदर कार्यक्रमासाठी द्यावयाची मानधनाची रक्कम ठरविणे.

४) सदर कलाकारांची संस्थानतर्फे मोफत दर्शन, चहा, पाणी, नाष्टा, प्रसाद भोजन व्यवस्था करणे.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात साई ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी यांचा साईभजन कार्यक्रम आयोजनाबाबतचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांमध्ये साई ब्रम्हनाद स्वरमंच शिर्डी यांच्या कार्यक्रमाचा समावेश करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. या कार्यक्रमामधील कलाकारांची संस्थानतर्फे दर्शन, चहा, पाणी, नाष्टा, प्रसाद भोजन व्यवस्था मोफत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत श्री शिवकृपानंद महाराज यांचे सत्संग कार्यक्रमाची दिनांक निश्चिती व त्याकामी येणाऱ्या खर्चाच्या सर्व समावेशक बाबींवर विचार विनिमय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन सभा निर्णय-**

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली. तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन यांचे परिशिष्ठ ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननीकरुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार / परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले. या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी,अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विदयुत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था व आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणरा खर्च व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले आहे.

सदर प्रारुप वेळापत्रकातील सामाजीक कार्यक्रमांमध्ये सप्टेंबर २०१७ मध्ये दि.१८/०९/२०१८ ते २५/०९/२०१८ या कालावधीत आदरणीय सदगुरु श्री शिवकृपानंद स्वामी, नवसारी, गुजरात यांचा ध्यानधारणा व अनुभूती या विषयावर आधारीत प्रवचन कार्यक्रम आयोजित केला आहे. याबाबत त्यांना जा. नं. एसएसएसटी/बांधकाम/-शताब्दी कक्ष /२९९७/२०१७, दि.०५/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये निमंत्रीत केले आहे. सदर पत्रास अनुसरुन त्यांनी दि. ०७/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदर कार्यक्रमास उपस्थित राहणेस सहमती दर्शविलेली असून निमंत्रण पत्राचा स्विकार केला, असे कळविलेले आहे.

**प्रस्ताव**: श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती(सेवा संस्था) ट्रस्ट यांनी दि.१८/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये "शिबिरासाठी देश –विदेशातील सुमारे ०२ लक्ष भाविक भाग घेतील. सप्टेंबर महिन्यात पावसाची दाट शक्यता असल्याने साधकांना पावसाचा त्रास होईल. तसेच शिबिराची सुरुवात शुक्ल पक्षात होणे व त्याची समाप्ती पौर्णिमाला होणे अत्यंत चांगले मानले जाते. यासाठी शिबिराची तारीख १) २२/०५/२०१८ ते दि. २९/०५/२०१८ किंवा २) २३/०४/२०१७ ते ३०/०४/२०१७ निश्चित करुन शिबिराचे आयोजन दररोज सांय. ०६.३० ते ०८.३० यावेळेत करावे, असे नमूद करुन या महाशिबिरासाठी पुज्य गुरुदेव कोणत्याही प्रकारचे मानधन घेणार नसलेबाबत कळविलेले असून सदर पत्रात कार्यक्रमाची बैठक व्यवस्था, स्टेज, साऊंड सिस्टीम, माहिती केंद्र, मेडीकल चेकअप कॅम्प, एलईडी स्क्रीन आदि बाबी नमूद केल्या असून यासाठी संस्थानला खालीलप्रमाणे अंदाजीत खर्च करावा लागणार आहे.

TENTATIVE SCOPE FOR DECORATOR

| SR | DESCRIPTION OF ITEM | QTY | MEASURE | RATE | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| | **FOR 8 DAY MAHASHIBIR** | **SQFT** | | | |
| **I** | **STAGE AREA** | | | | |
| 1A | P.P. GURUDEV STAGE-FULLY CARPETED - 60 FT x 30 FT x 10 FT HEIGHT | **1800** | SQFT | 110.00 | 1,98,000.00 |
| 1B | P.P.GURUDEV'S STAGE BACK DROP ( HT 2O' ) | **1200** | SQFT | 12.00 | 14,400.00 |
| 1C | RAMP - FULLY CARPETTED WITH SIDE - GIRDERS FULLY COVERED - 80' x 4' | **320** | SQFT | 80.00 | 25,600.00 |
| 2A | FULLY CARPETED P.P. GURU MAA STAGE - 12' x 12' ( HT -10' ) WITH STAIRCASE | **144** | SQFT | 110.00 | 15,840.00 |
| 2B | P.P.GURU MAA'S STAGE BACK DROP ( HT 10' ) | **120** | SQFT | 12.00 | 1,440.00 |
| 2C | RAMP - FULLY CARPETTED WITH SIDE - GIRDERS FULLY COVERED - 40' x 4' | **160** | SQFT | 80.00 | 12,800.00 |
| 3 | PARKING LOUNGE ON BACK OF STAGE - L 200' X D 100' COVERED BY 10' CLOTH PARTITION | **540** | RFT | 60.00 | 32,400.00 |
| 4 | FULLY CARPETED-BHAJAN STAGE - 20' x 20' ( HT - 4') WITH STAIRCASE | **400** | SQFT | 45.00 | 18,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | FULLY CARPETED ANNONCEMENT STATGE - 12' X12' ( HT- 8') WITH STAIRCASE | **64** | SQFT | 80.00 | 5,120.00 |
| 6 | VIDEO SHOOTING PODIUMS - 6' x 6' x 7.5' HT x 2 NOS | **72** | SQFT | 80.00 | 5,760.00 |
| **II** | **SITTING AREA** | | | | |
| 1 | PVC NET CARPET FOR 100000 PEOPLE - L 1000' x W 600' | **600000** | SQFT | 3.50 | 21,00,000.00 |
| 2 | MATRESSES WITH WHITE COVER FOR VIPS - 2000 INVITEES/VIP | **1200** | NOS | 560.00 | 6,72,000.00 |
| 3 | MOULDED CHAIRS FOR OLD/HANDICAP | **1000** | NOS | 80.00 | 80,000.00 |
| **III** | **SAHITYA PENDAL -2 NOS** | | | | |
| 1 | MANDAP WITH PIPE STRUCTURE - L 60' X W30' 2 NOS | **3600** | SQFT | 20.00 | 72,000.00 |
| 2 | PVC Net Flooring - L 60' X W30' 2 NOS | **3600** | SQFT | 3.50 | 12,600.00 |
| 3 | TUBE LIGHTS ( For 8 Days) | **32** | NOS | 13.00 | 3,328.00 |
| 4 | CEILING FANS ( For 8 Days) | **32** | NOS | 53.00 | 13,568.00 |
| 5 | HELOGEN LAMPS ( For 8 Days) | **8** | | 60.00 | 3,840.00 |
| 6 | POWER POINTS ( For 8 Days) | **5** | NOS | 10.00 | 400.00 |
| **IV** | **EXHIBITION PENDAL** | | | | |
| 1 | MANDAP WITH PIPE STRUCTURE - L 120' X W30' | **3600** | SQFT | 20.00 | 72,000.00 |
| 2 | PVC Net Flooring - L 120' X W30' | **3600** | SQFT | 3.50 | 12,600.00 |
| 3 | TIN SHED COVERED FROM ALL SIDES WITH DOOR AND LOCKING FACILITIES L30' X30' | **900** | SQFT | 20.00 | 18,000.00 |
| 4 | TUBE LIGHTS ( For 8 Days) | **32** | NOS | 13.00 | 3,328.00 |
| 5 | CEILING FANS ( For 8 Days) | **32** | NOS | 53.00 | 13,568.00 |
| 6 | HELOGEN LAMPS ( For 8 Days) | **8** | NOS | 60.00 | 3,840.00 |
| 7 | POWER POINTS ( For 8 Days) | **5** | NOS | 10.00 | 500.00 |
| **V** | **ILLUMINATION OF THE STATGES COMPLETE GROUNG** | | | | |
| 1 | METAL LIGHTS ( For 8 Days) | **20** | NOS | 81.00 | 12,960.00 |
| 2 | PAAR LIGHTS ( For 8 Days) | **20** | NOS | 85.00 | 13,600.00 |
| 3 | HELOGEN LAMPS ( For 8 Days) | **200** | NOS | 60.00 | 96,000.00 |
| 4 | LED PAAR LIGHT ( For 8 Days) | **20** | NOS | 60.00 | 9,600.00 |
| 5 | HIRING OF GENERATOR (250KVA) ( For 8 Days) | **1** | NOS | 70,000.00 | 56,000.00 |
| 6 | DIESEL EXPENSE ( For 8 Days) | **50Litr/hrs x 8 hrs** | | 60.00 | 1,92,000.00 |
| **IV** | **MISCELLENEOUS** | | | | |
| 1 | TABLES WITH CLOTH COVERING+ FRILLS | **200** | NOS | 600.00 | 1,20,000.00 |
| 2 | MOULDED CHAIRS | **400** | NOS | 80.00 | 32,000.00 |
| 3 | MAIN GATES | **2** | NOS | 10,000.00 | 20,000.00 |
| 4 | SMALL GATES | **6** | NOS | 500.00 | 30,000.00 |
| | **SUB TOTAL** | | | | **39,93,092.00** |
| | | | | **GST(18%)** | **7,18,756.56** |
| | **GRAND TOTAL** | | | | **47,11,848.00** |

उपरोक्त बाबींचा विचार करता शिवकृपानंद महाराज, योग प्रभा भारती सेवा संस्था ट्रस्ट, नवसारी, गुजरात यांचा महाशिबिर (प्रवचन) कार्यक्रमाचे आयोजन करणेसाठी सुमारे रु. ४७,११,८४८/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. या कार्यक्रमासंदर्भात योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्टयांचे व्यवस्थापकीय विश्वस्त, श्रीमती शर्मिला पाटील यांनी त्यांचे दि.०१/११/२०१७ रोजीचे पत्रात संस्थानने त्यांचे इच्छेनुसार खर्चाचे आयोजन करावे, उर्वरित खर्चाचे आयोजनाबाबत आम्हांस कळविणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार कार्यक्रमाचे आयोजनासाठी खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे :

१) श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती(सेवा संस्था) ट्रस्ट यांनी पत्रात नमूद केलेप्रमाणे दि.१८/०९/२०१८ ते दि.२५/०९/२०१८ हि कार्यक्रम तारीख रद्द करुन मे-२०१८ मधिल दि.२२/०५/२०१८ ते दि. दि. २९/०५/२०१८ किंवा एप्रिल -२०१८ मधील दि. २३/०४/२०१७ ते दि.३०/०४/२०१७ तारीख निश्चित करणे.

(तथापी उपरोक्त नमूद तारखांमधून माहे दि. ५ ते ७ एप्रिल २०१७ कालावधीत श्री अवधुत शिवानंद महाराज यांचे शिवयोग सत्सं कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहे.)

२) श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती(सेवा संस्था) ट्रस्ट यांनी त्यांचे दि.०१/११/२०१७ रोजीचे पत्रात "संस्थानने त्यांचे इच्छेनुसार खर्चाचे आयोजन करावे, उर्वरित खर्चाचे आयोजनाबाबत आम्हांस कळविणे हि विनंती असे नमूद केले आहे. तरी उपरोक्त नमूद खर्चात संस्थानने कोणता खर्च करावा किंवा कसे याबाबत निर्णय घेणे.

३) प्रवचन कार्यक्रमासाठी आठवडाभरात देश-विदेशातील सुमारे ०२ लक्ष भाविक येणाचा अंदाज असल्याने, या कार्यक्रमासाठी श्री साई प्रसादालय शेजारील शेती महामंडळाची ३२ एकर जागा भाडयाने घ्यावी लागेल. या जागेचे एका दिवसाकरीता प्रती एकर रुपये १,०००/- (कुंभमेळा कालावधीतील दर) नुसार ३२ एकर करीता रुपये ३२,०००/- नुसार ८ दिवस जागेकरीता रुपये २,५६,०००/- मात्र इतके अंदाजीत खर्चाबाबत निर्णय घेणे.

४) कार्यक्रमाचे ठिकाणी चहा, पाणी, नाष्टा, बिस्किटे, प्रसाद भोजन इत्यादी व्यवस्था करणे.

५) शिवकृपानंद महाराज व त्यांचे सेवेसाठी असणारे इतर ०८ साधक तसेच स्टेज, साऊंड सिस्टीम आदि व्यवस्था पाहणारे २५ ते ३० मुख्य कार्यकर्त्यांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत करणे.

६) सदरहु कार्यक्रमाचे ठिकाण, बैठक व्यवस्था, स्टेज व्यवस्था, साऊंड सिस्टीम, माहिती केंद्र, भोजन व्यवस्थाइतर अनुषंगीक व्यवस्थातसेच योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांचा या कार्यक्रमाकरीता संस्थानच्या आर्थिक सहभाग निश्चितीबाबत मा. व्यवस्थापन समितीची मान्यतेने स्थानिक समिती गठीत करणे.

तरी शिवकृपानंद महाराज, योग प्रभा भारती सेवा संस्था ट्रस्ट, गुजरात यांचा प्रवचन कार्यक्रम आयोजित करणेसाठी त्यांनी नमूद केलेल्या उपरोक्त बाबींवर सुमारे रु .४७,११,८४८/- + शेतीमहामंडळ जमिनीच्या जागेचे भाडे रुपये २,५६,०००/- असे एकूण रुपये ४९,६७,८४८/- (एकोण पन्नास लाख, सद्रुसष्ट हजार, आठशे अठ्ठेचाळीस) मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. यासाठी त्यांचे बजेटनुसार येणा-या सर्व समावेशक, जागेचे भाडे व ऐनवेळी उद्भवणा-या प्रासंगिक खर्चावर तसेच उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय व कार्यक्रमाची तारीख निश्चित होणेसाठी सदरच्या प्रस्तावावर विचार विनिमय व्हावा, हि विनंती.

**निर्णय क्र.९४०** **सदरहू विषयावरील चर्चेच्या वेळी, श्री शिवकृपानंद महाराज यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी ५०,००० भक्तांचा कार्यक्रम करणेचा मानस व्यक्त केला व अशा प्रकारची शिबीरे आयोजित करण्यासाठी त्यांनी अंदाजे रु.१५ ते २० लाख मात्र खर्च येतो, असे नमुद केले. तसेच सदरहू कार्यक्रम मोकळया जागेत करावयाचा असल्यामुळे मार्च महिन्यामधील वेळ मिळावा, अशी सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीत दि.२३ ते ३० एप्रिल, २०१८ या कालावधीमध्ये श्री शिवकृपानंद महाराज यांचा सत्संग कार्यक्रम आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र सदर कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती शर्मिला पाटील, व्यवस्थापकिय विश्वस्त, योग प्रभा भारती (सेवा संस्था) ट्रस्ट यांनी स्वत: करावे. त्यासाठी येणाऱ्या खर्चापैकी फक्त रु.१५,००,०००/- एवढा खर्च संस्थानने सहन करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२८** **श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या

सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड) श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५८

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९४

"श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाट्यप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासून घ्यावी, असे ठरले."

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७०

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३१

"सबका मालिक एक है" या महानाट्याची स्क्रिप्ट, मुळ श्री साईसच्चरित्र ग्रंथाचा सखोल अभ्यास असणा-या तज्ञांकडून तपासून घेण्यात यावी, असे सर्व सदस्यांचे मत झाले. याकरीता साईचरित्राचा अभ्यास असणारे संस्थानमधील कायम कर्मचारी श्री.मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री.नवेंदू मराठे, लिपीक तसेच साईलिला द्वैमासिकाचे माजी संपादक श्री.विद्याधर ताठे यांचेकडून सदरहू महानाट्याची स्क्रिप्ट तपासून घेण्यात यावी. तसेच दि.१ ऑक्टोबर, २०१७ रोजी मान्यवरांच्या हस्ते श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या ध्वजस्तंभाचे अनावरण करण्यात येणार आहे. त्यामुळे 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे आयोजन दि.१ ऑक्टोबर,२०१७ रोजी न करता पुढे करण्यात यावे.

**प्रस्तावना:-** श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे दि.२८/११/२०१६ व दि.२२/०७/२०१७ चे पत्रानुसार साई चरित्रावर आधारीत "सबका मालिक एक है" या प्रकाश (Light) आणि ध्वनी (Sound) हिंदी महानाट्याचे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजन करण्यासाठीचा प्रस्ताव दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.६९४ अन्वये रक्कम रु.९ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या नाट्यप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासुन घ्यावी, असे ठरले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३१ नुसार महानाट्याची स्क्रिप्ट तपासणेबाबत संबंधीतांना पत्र देण्यात आली आहेत.

त्यानंतर दि.०२/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारे Travelling, Transporting इत्यादीकामी रु.३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) अग्रीम देण्याची मागणी केली होती. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला असता, निर्णय क्र.७७० अन्वये महानाट्याच्या प्रयोगासाठी साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांना रु.३ लाख मात्र अग्रीम रक्कम देता येणार नाही, याबाबत संबंधीतांना कळविण्यात यावे, असे ठरले आहे. त्यानुसार संस्थानचे जा.नं.एसएसएस/बांधकाम शताब्दी/ ३२१३/ २०१७, दि.१८/०९/२०१७ नुसार कळविण्यात आले आहे.

**प्रस्तावः-** साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे "सबका मालिक एक है" हे हिंदी महानाट्य श्री साईबाबांचे जीवनावर आधारित असल्याने श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार होणार आहे. आता श्री.सोमेश्वर बालपांडे यांनी दि१८/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये 'सबका मालिक एक है' या महानाट्याच्या आयोजनाकरीता संस्थानकडून आवश्यक असलेल्या खालील मुलभूत बाबींची पुर्तता करुन मिळणेसाठी विनंती केली आहे. सदरहू कामी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च येणार आहे.

| अ.नं. | खर्चाचा तपशिल | अंदाजित खर्च रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदनावर मुरुम टाकून स्वच्छ व सपाट करुन देणे (संस्थानचे बांधकाम विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | २०,०००/- |
| ०२ | प्रेक्षकांच्या बसण्याची व्यवस्था आणि बॅरीकेडींग – स्त्री व पुरुष प्रेक्षकांसाठी स्वतंत्र आसन व्यवस्था करावी (२००० व्यक्तिंसाठी) तसेच रंगमंचाच्या पुढील भागात रंगमंचापासून ३० फुट 'D' आकारात बॅरीकेडींग (संस्थानचे बांधकाम विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | १०,०००/- |
| ०३ | स्टेजच्या मागील भागात ०६ मेकअप रुमसह १५ X ३० फुट सुसज्ज म्हणजेच कारपेट ग्राऊंड, १५० खुर्च्या कलावंतांसाठी, ३० – २ फुट X ४ फुट टेबल्स (संस्थानचे बांधकाम विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | १०,०००/- |
| ०४ | स्टेजच्या मागील भागात २ मोबाईल युरिनल्स कलावंतांसाठी. (संस्थानचे बांधकाम विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | ९,०००/- |
| ०५ | रंगमंचाच्या मागील पूर्ण भाग सायडींग व बॅरीकेडींगने बंद करणे. (संस्थानचे बांधकाम विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | ४,०००/- |
| ०६ | जनरेटर्स इंधनसह १२५ के.व्ही.ए., ६५ के.व्ही.ए., १० के.व्ही.ए., ६५ के.व्ही.ए. व १२५ के.व्ही.ए. (२ दिवस), १० के.व्ही.ए. (११ दिवस), ०६ मोठे फॅन, १६ हॅलोजन (संस्थानचे विद्युत विभागाने समक्ष सांगितलेप्रमाणे) | ७४,०००/- |
| ०७ | कलावंतांच्या राहण्याची व्यवस्था :-<br>अ) १५ कलाकारांची (११ दिवस) (याकरीता ०२ हॉल)<br>ब) ०२ कलाकारांसाठी (८ दिवस) ए.सी. रुम्स – ०२ रुम्स<br>क) ३० कलाकारांसाठी (४ दिवस) ए.सी. रुम्स – १५ रुम्स द्वारावती भक्तनिवास<br>ड) ११४ कलाकारांसाठी (३ दिवस) – ३० रुम्स (१० ए.सी. व २० नॉन ए.सी. रुम्स) | <br>८,०००/-<br>१५,०००/-<br>५४,०००/-<br>३१,५००/- |
| ०८ | सुरक्षा रक्षक (महिला व पुरुष) – ११ दिवस तीन शिफ्टमध्ये २ सुरक्षा रक्षक, ३ दिवस तीन शिफ्टमध्ये १० सुरक्षा रक्षक, प्रेक्षकांसाठी वेगळी सुरक्षा व्यवस्था. | ८०,०००/- |
| ०९ | प्रयोग प्रत्येकास व्यवस्थित दिसावा याकरीता LED ची व्यवस्था करावी – ०४ वॉल्स किमान | १,२०,०००/- |
| १० | इतर आवश्यक व्यवस्था | १,००,०००/- |
| | एकुण:- | ५,३५,५००/- |
| | जी.एस.टी. (१२%) | ६४,२६०/- |
| | **एकुण अंदाजित खर्च :-** | **५,९९,७६०/-** |

'सबका मालिक एक है' या महानाट्याच्या प्रयोगाचे संस्थानने आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) सदर महानाट्याच्या प्रयोगाची तारीख निश्चित करणे.

२) सदर महानाट्याचे प्रयोगासाठी जागेची निश्चिती करणे.

३) सदर महानाट्याचे प्रयोगासाठी संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबींसाठी अंदाजे रक्कम रु.५,९९,७६०/- मात्र चे अतिरिक्त खर्चास मान्यता देणे.

४) कलाकारांची चहा, पाणी, नाष्टा, प्रसादभोजन व दर्शनाची व्यवस्था करणे.

तरी महानाट्याचे आयोजन करावयाचे झाल्यास मा.व्यवस्थापन समितीने यापुर्वी मान्यता दिलेली मानधनाची रक्कम रु.९,००,०००/- अधिक संस्थानकडून आवश्यक असलेल्या बाबींसाठी अतिरिक्त अंदाजे रक्कम रु.५,९९,७६०/- अशा एकुण रक्कम रु.१४,९९,७६०/- मात्र खर्चास मान्यता घेणेसाठी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजनाकामी मानधनाव्यतिरिक्त कार्यक्रमाच्या अनुशंगाने इतर बाबींसाठी अंदाजे रु.५,९९,७६०/- मात्र खर्च येत असून हा खर्च खुपच जास्त आहे. याकरीता "सबका मालिक एक है" महानाटयाचे आयोजन करणेकामी श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांना पुर्वी ठरलेल्या रु.९,००,०००/- मात्र मानधनामध्ये इतर बाबींसाठी जादा रु.२,००,०००/- मात्र**

**रक्कम देण्यात यावी व या कार्यक्रमाची संस्थानकडून करावयाच्या बाबींसह इतर सर्व व्यवस्था त्यांनी करावी, असे त्यांना कळविणेत यावे. या रकमेमध्ये कार्यक्रम सादर करणेस ते तयार असतील तर सदरहू कार्यक्रम श्री रामनवमी उत्सवाच्या पहिल्या दिवशी दि.२४ मार्च, २०१८ रोजी आयोजित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.२९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक वेळापत्रक छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७७.
३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१९.
६. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५४, ६७१, ६७२.
७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक- ६८२
८. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक -७५०
९. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेत विषय क्रं. ०९ मध्ये (मा. सदस्यांच्या सुचनांबाबत) खालीलप्रमाणे शिफारस मान्य केली आहे.

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षातील धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व पादुका दर्शन सोहळयाच्या कार्यक्रमाची पुस्तिका आकर्षक स्वरुपात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

**प्रस्ताव –**श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन केल्यास संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीकोनातून आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वितेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या बैठकातील निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

अ) संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांसाठी केलेले जाहीर आवाहन.

आ) मा.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५/०२/२०१६ रोजी शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे समवेत झालेली बैठक.

इ) धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेबाबत संस्थानचे समन्वय विभागांची दि. २४/०६/२०१६ रोजी झालेली बैठक.

ई) मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची इव्हेंट मॅनेजमेंटसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली असल्याने त्यांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे ४० दिवसांचे दिवसागणिक दिलेले वेळापत्रक.

उ) शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम-उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त यांच्या सुचना वजा अभिप्राय प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी संपन्न झालेली जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच साईभक्तांकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा अभिप्राय यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त नमूद केलेल्या वेळोवेळी झालेल्या बैठकांतील निर्णयानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास अंतिम स्वरुप देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला सदर प्रस्तावावर निर्णय क्रमांक ७५० पुढीलप्रमाणे समंत करणेत आला आहे.

*“श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७ -१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले.”*

सदर वेळापत्रकाची माहिती पुस्तिका छपाई करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेत विषय क्रं. ०९ मध्ये (मा. सदस्यांच्या सुचनांबाबत) खालीलप्रमाणे शिफारस मान्य करण्यात आली आहे.

“श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षातील धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व पादुका दर्शन सोहळयाच्या कार्यक्रमाची पुस्तिका आकर्षक स्वरुपात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.”

तरी शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमाची माहिती पुस्तिका तयार करणेसाठी खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

१. आयोजित कार्यक्रमाचे माहिती पुस्तिका छपाईसाठी पुस्तिकेचा मसूदा, मुखपृष्ठ, कलर व अक्षरांचा फॉन्ट निश्चित करणे.

२. आयोजित कार्यक्रम माहिती पुस्तिकेत मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार परिस्थितीनुरुप किंवा आयत्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी होणा-या बदलानुसार प्रत्येक महिन्यास किंवा एकदाच एकूण किती प्रती छपाई करावी याबाबत निर्णय घेणे.

३. आयोजित कार्यक्रम माहिती पुस्तिका छपाईकामी छपाई धारकांकडून कोटेशन मागविणेस मान्यता देणे तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

४. माहिती पुस्तिका मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त तसेच मान्यवर आदिंना देणेस वितरीत करणेस मान्यता देणे.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित केलेल्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची पुस्तिका न छापता, सदरहू कार्यक्रमाची माहिती व वेळापत्रक संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३०** **सन २०१८ मधील संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम १९ मध्ये 'भक्तमंडळ' या शीर्षाखाली खालीलप्रमाणे तरतूद करणेत आलेली आहे-

(१) समारंभ, उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी, आश्रयदाते, आजीव सदस्य, सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाचा प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात, धर्म अथवा लिंग कोणतेही असेल तरी, भक्त मंडळांचे सदस्यत्व देण्यात येईल.

परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पुर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

(३) भक्त मंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्य विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील, समिती, भक्त मंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

संस्थान व्यवस्थापनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) भक्त मंडळ विनियम, २०१३ पारित केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार या मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

(१) भक्त मंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने, फॅक्स, ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

(२) वर उल्लेख केलेल्या तिन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदी प्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.

(३) हे विनियम लागू होण्यापूवीचे आश्रयदाते आणि आजिव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालू राहतील.

उपरोक्त ३ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार सन २०१७ अखेर संस्थान वूयवस्थापना मार्फत साज-या करणेत आलेल्या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्रीपुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत आलेल्या आहेत. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा. मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येते. सध्या १,८०,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद असून, सभासद संख्येत वाढ किंवा घट होऊ शकते.

सन-२०१७ मध्ये साजरा करण्यात आलेल्या तीनही उत्सवांच्या पत्रिका छपाई कामी रु. ११,६१,०००/- मात्र खर्च आलेला आहे.

**प्रस्ताव:-** प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका छपाईकामी दरपत्रके मागविणेस मान्यता घेऊन टिपणी सादर करणे, निमंत्रणपत्रिकेचा मसुदा मान्य करुन घेणे, छपाई (प्रेस) धारक यांचे कडून दरपत्रक मागविणे तुलनात्मक तक्ता तयार करणे, निम्नतम दरधारकास छपाई कामी कार्यादेश देणे, सर्व निमंत्रण पत्रिकांना घडया घालणे, पाकीटावर पत्ते प्रिंट करणे, पाकिटे चिटकविणे, फ्रॅंकिग करणे, पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे इ. कामे करावे लागतात. तसेच निमंत्रण पत्रिका निमंत्रकांना वेळेत पोहच होणे आवश्यक आहे. या भक्तमंडळाचे सभासद संपुर्ण देश-विदेशात आहेत. या मध्ये कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात हजारो सभासद संख्या आहेत.

संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा उत्सवाच्या पत्रिका हया आर्ट पेपरवर (130 GSM) व पाकीट आर्ट पेपर (90 GSM) या कागदाच्या प्रकारावर छपाई करता येईल.

शताब्दी उत्सवाची सांगता दसरा उत्सवाने होणार असल्याने, भक्तमंडळाचे सभासदांना चांगल्या प्रकारची पत्रिका छपाई करावी लागणार आहे, ज्याप्रमाणे दसरा उत्सव २०१७ ची पत्रिका छपाई करण्यात आली होती त्याप्रमाणे पत्रिकेसाठी आर्ट पेपरवर (२५० GSM) व पाकीट आर्ट पेपर (१३० GSM) कागदावर छपाई करता येईल असे मत आहे.

उपरोक्त परिछेदांत विवेचन केल्यानुसार, सन-२०१८ मध्ये साज-या होणा-या तीनही उत्सवांसाठी पत्रिका छपाई करुन घेणेसाठी अंदाजे रु.१५ लाख मात्र इतका खर्च येईल.

सन-२०१८ साठी पत्रिका छपाई करणेसाठी काढण्यात येणा-या निविदा दरपत्रकांमध्ये पुढील बाबी विचारात घेता येतील. या मध्ये पत्रिका, पाकीट छपाई करणे, पत्रिकेची घडी घालून पत्रिका पाकीटात भरुन देणे. पाकीटांना गमटेप वापरणे. या मुद्दयांचा समावेश करता येईल. यामुळे आमंत्रितांना वेळेत पत्रिका पोहच होण्यास मदत होईल व वेळ वाचेल असे नम्र मत आहे.

तरी सन-२०१८ मधील संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या उत्सवासाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन, विहीत प्रसिध्द ई-निविदा अंतिम निर्णय घेणेकामी, तसेच याकामी रक्कम रु.१५,००,०००/- (रु.पंधरा लाख) मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१८ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणाऱ्या उत्सवासाठीच्या पत्रिका व पाकीटे छपाई करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमासाठी निमंत्रित कलाकार व मान्यवर यांना मोफत निवास, भोजन व दर्शन/ आरती व्यवस्था उपलब्ध करुन देणे व त्यांचा सत्कार करणे यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७७.
३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१९.
६. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५४, ६७१, ६७२.
७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक- ६८२
८. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक -७५०
९. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेत विषय क्रं. ०९ मध्ये (मा. सदस्यांच्या सुचनांबाबत) पुढीलप्रमाणे शिफारस मान्य केली आहे. "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षातील धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व पादुका दर्शन सोहळयाच्या कार्यक्रमाची पुस्तिका आकर्षक स्वरुपात प्रसिध्द करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

सदर कार्यक्रमांचे स्वरूप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन झालेल्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त नमूद केलेल्या वेळोवेळी झालेल्या बैठकांतील निर्णयानुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकास अंतिम स्वरूप देणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला सदर प्रस्तावावर निर्णय क्रमांक ७५० अन्वये *"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७ -१८ या कालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन त्यास अंतिम स्वरुप देण्यात आले."* असा निर्णय पारीत झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयांनुसार सदर वेळापत्रकात देशभरातील विविध नामांकित कलाकार, किर्तनकार, पवचनकार तथा विविध राज्यातील कला संस्कृति दर्शविणा-या कार्यक्रमांचा समावेश करणेत आलेला आहे. तसेच दि.२३, २४ डिसेंबर, २०१७ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद तसेच दि. १८ ऑक्टोंबर, २०१८ रोजी शताब्दी समारोपाचा भव्य कार्यक्रम आयोजित करणेत आलेला आहे. सदर कार्यक्रमांसाठी विविध क्षेत्रातील नामवंत मान्यवरांना निमंत्रीत करणेत येणार आहे

**प्रस्ताव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन केले असून सदर कार्यक्रमांसाठी आलेले निमंत्रीत कलाकार, किर्तनकार, प्रवचनकार तसेच सदर कार्यक्रमांसाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत केले जाणार आहे

तसेच दि.२३, २४ डिसेंबर, २०१७ रोजी जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद कार्यक्रम आयोजित केलेला असून सदर कार्यक्रमासाठी मा. उपराष्ट्रपती महोदय, भारत गणराज्य उपस्थित राहणार असून त्यांचे समवेत मा. मुख्यमंत्री व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे. याशिवाय दि.१८ ऑक्टोंबर, २०१८ रोजी शताब्दी समारोप कार्यक्रमासाठी मा. पंतप्रधान महोदय उपस्थित राहणार त्यांचे उपस्थितीत श्रींच्या टपाल तिकीटाचे अनावरण होणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमांसाठी विविध क्षेत्रातील मान्यवर मंत्री महोदय, अधिकारी पदाधिकारी उपस्थित राहणार आहे.

तरी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे शताब्दीचे संपूर्ण वर्षभर आयोजित कार्यक्रमांसाठी निमंत्रीत कलाकार व मान्यवर यांना खालीलप्रमाणे सोयी –सुविधा पुरविणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे गरजेचे आहे.

१. शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमासाठी मोफत सेवा देणारे निमंत्रीत कलाकार, प्रवचनकार, किर्तनकार व त्यांचे सहकारी कलाकार यांची मोफत प्रसाद भोजन, निवास, दर्शन/आरती, वाहन व्यवस्था तसेच सत्कार आदि व्यवस्था करणेबाबत निर्णय घेणे.

२. शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमासाठी सशुल्क सेवा देणारे निमंत्रीत कलाकार, प्रवचनकार, किर्तनकार व त्यांचे सहकारी कलाकार यांची मोफत प्रसाद भोजन, निवास, दर्शन/आरती, वाहन व्यवस्था तसेच सत्कार आदि व्यवस्था करावी किंवा कसे याबाबत निर्णय घेणे.

३. शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांसाठी आलेल्या निमंत्रीत कलाकार व त्यांचे सहकारी यांना चहा पाणी, बिस्कीटे व नाष्टा देणेबाबत निर्णय घेणे.

४. शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांसाठी आलेल्या निमंत्रीत मान्यवरांची प्रसादभोजन, निवास, दर्शन/ आरती तसेच सत्कार आदि व्यवस्था करणे.

५. शताब्दी वर्षात आयोजित कार्यक्रमांसाठी आलेल्या निमंत्रीत मान्यवरांना सत्कार म्हणून शॉल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, श्रींचा फोटो आदि देणेबाबत निर्णय घेणे.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम विनामुल्य सादर करणाऱ्या निमंत्रित कलाकारांची चहा- पाणी, निवास, भोजन व दर्शन व्यवस्था संस्थानतर्फे मोफत करणेत यावी. तसेच मानधन घेऊन, कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांची फक्त दर्शनव्यवस्था संस्थानमार्फत मोफत करणेत यावी. त्याचप्रमाणे या विनामुल्य व**

**मानधन घेऊन कार्यक्रम करणाऱ्या कलाकार व मान्यवर यांना 3D फोटो, साईचरित्र ग्रंथ, उदी व लाडू प्रसाद पाकिट भेट देण्यात येऊन, त्यांचा सत्कार करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३२** **शताब्दी निमित्त हैद्राबाद येथे एक लाख साईभक्तांकरवी बाबांची शेजारती एका सुरात गाण्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बुकात होणेसाठी आयोजित कार्यक्रमास संस्थानचे व्यवस्थापन समिती सदस्य व अधिकारी उपस्थिती समवेत साई पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणे.**

**प्रस्ताव-** **संस्थान अधिनियमातील तरतूद-** कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्ताव –** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि. १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या अनुषंगाने देशात व परदेशात विविध ठिकाणी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून साई श्रीनिवास, मॅनेजीग ट्रस्टी, DJ Television and Marketing Pvt. Ltd., Hydearbad यांनी त्यांचे ०१/१०/२०१७ रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

"आम्ही नव्याने नमो टिव्ही, तेलगु चॅनल सुरु करीत आहे. हा एक उपग्रह चॅनल आहे. या चॅनलवर धार्मिक स्वरुपाचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येणार आहे.त. श्री साईबाबा शताब्दी वर्षातील कार्यक्रम या चॅनलवर प्रसारीत करण्यात येणार आहेत.

आम्ही शताब्दी महोत्सवानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमाचे नियोजन करीत आहोत. या संदर्भात संस्थानचे आम्हांला सहकार्य, मदत तथा मार्गदर्शन आवश्यक आहे. या अंतर्गत आम्ही एक योजना आखत आहोत की, सिंकदराबादमध्ये एक लाख साईभक्त ७ दिवसांसाठी श्री साईचरित पारायण कार्यक्रमात जोडले जातील. प्रत्येक दिवशी पारायण संपल्यानंतर बाबांची आरती गाण्यात येईल. पारायणाच्या शेवटच्या दिवशी हैद्राबादमधील सर्वात मोठया स्टेडीयमपैकी एका स्टेडीयममध्ये एक लाख साईभक्तांकरवी बाबांची आरती एका सुरात गाण्याचा विश्व विक्रम करण्यात येईल. हा कार्यक्रम सन २०१८ मधील गुरुपौर्णिमा उत्सवादरम्यान होईल.

या कार्यक्रमाकरीता श्री अनिल कुमार कोलानुकोंडा, चेअरमन एयुएमसाई संस्थान, मेलबोर्न, ऑस्ट्रेलिया श्री चंगाती साईबाबा, मुख्य संपादक, साई परिवार, तेलगु मॅगझिन यांनी आमच्याशी संपर्क केला असून, आम्ही त्यांचे मार्गदर्शन घेणार आहोत.

या कार्यक्रमात सहभागी १ लाख साईभक्ताकरवी साईंची आरती गायनांची नोंद इतिहासात होणेसाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसचे प्रतिनिधी यांना आमंत्रित करणार आहोत

म्हणून आम्ही संस्थानचे व्यवस्थापन समितीला व अधिकारी वर्ग यांना या कार्यक्रमास भाग घेणेसाठी आमंत्रित करीत आहोत. आम्ही आपल्या प्रतिसादाची प्रतिक्षा करीत आहोत."

**प्रस्तावना** : DJ Television and Marketing Pvt. Ltd., Hydearbad यांनी त्यांचे पत्रात श्री साई समाधी शताब्दी वर्षात सन २०१८ चे गुरपौर्णिमा उत्सवादरम्यान हैद्राबाद येथील मोठया स्टेडीयमवर एक लाख साईभक्ताकरवी बाबांची आरती एका सुरात गाण्यात येणार असून, त्याची नोंद गिनीज बुकात होणेकरीता गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रतिनिधींना कार्यक्रमस्थळी बोलाविणार आहे. या कार्यक्रमाकरीता नमो टिव्ही चॅनल यांनी संस्थानचे सहकार्य, मदत व मार्गदर्शन मागीतले आहे. त्याचप्रमाणे संस्थानचे व्यवस्थापन समिती व अधिकारी यांना या कार्यक्रमाकरीता उपस्थित राहणेबाबत, त्यांनी विनंती केली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय** : नमो टिव्ही तेलगु चॅनल, हैद्राबाद यांचेमार्फत आयोजित करावयाच्या बाबांचे महाआरतीचा कार्यक्रम दि. २६/०७/२०१८ ते २८/०७/२०१८ या गुरुपौर्णिमा उत्सव कालावधीत होणार असल्याचे त्यांनी त्यांचे पत्रात कळविले आहे. सदर कालावधीत शिर्डी येथेही गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येतो. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांचे पत्रात संस्थानकडून कुठल्या प्रकारचे सहकार्य, मदत व मार्गदर्शन मिळावे बाबत स्पष्ट उल्लेख केला नाही.

तरी श्री साई समाधी शताब्दी कालावधीतील गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ मध्ये नमो टिव्ही तेलगु चॅनल यांचेमार्फत हैद्राबाद येथे एक लाख साईभक्तांकरवी बाबांची आरती एका सुरात गाण्याची नोंद गीनीज बुकात करणेसाठी आयोजित कार्यक्रमास संस्थानचे सहकार्य, मदत व मार्गदर्शन मिळणेकामी तसेच मा. व्यवस्थापन

समिती व अधिकारी उपस्थित राहणेबाबत केलेल्या विनंतीवर चर्चा होऊन, पुढील निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.९४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी निमित्त हैद्राबाद येथे एक लाख साईभक्तांकरवी बाबांची शेजारती एका सुरात गाण्याची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बुकात होणेसाठी आयोजित कार्यक्रमाचे संस्थानचे व्यवस्थापन समिती सदस्य, अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांचे उपस्थिती समवेत श्रींच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु त्यांच्या कार्यक्रमाचे स्वरुप व याकामी त्यांना संस्थानचा काय सहयोग अपेक्षीत आहे, याच्या तपशीलासह त्यांना पुढील सभेसमोर सादरीकरणासाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३३** **श्री शिरडी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांचे मेदान्ता हॉस्पिटल, गुडगावमार्फत घेण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये श्री साईबाबा संस्थान यांनी सहयोगी आयोजक होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

1. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.
2. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.
3. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.
4. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:** श्री शिर्डी साई दरबार साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषीत केलेल्या पत्रात दि.०३ व ०४ डिसेंबर, २०१७ रोजी शिर्डी येथील ए.के. गोंदकर मैदानावर मेदान्त हॉस्पीटलमार्फत फ्री मेडीकल चेकअप कॅम्प आयोजित करणेत येणार आहे. सदर कार्यक्रमामध्ये पुढीलप्रमाणे कॅम्पमध्ये सुपरस्पेशालिटी मेदान्त हॉस्पीटलमार्फत सुविधा देण्यात येणार आहे.

1. Cardiologists
2. Oncologist
3. Neurologist
4. Orthopedic Surgeon
5. 3 Nursing Staff (Female)
6. 3 Technician
7. GDA
8. 2 Coordinators

सदर कॅम्पचे तपासणीकामी खालील सुविधा संस्थानकडून मोफत मिळणेबाबत कळविणेत आले आहे.

1. Registration
2. Blood Pressure Check Up
3. Blood Sugar
4. ECG (if recommended)
5. Doctors Consultation
6. Echo (if recommended)
7. X-Ray Chest

उपरोक्त सुविधेबरोबरच

१) मशिनरी/साहित्याकरीता आवश्यक विद्युत पुरवठा पुरविणे .
२) रुग्णांना मार्गदर्शन करणेकामी साई सेवकांची नेमणूक करणे.
३) कॅम्पची प्रसिद्धी करणे.
४) कॅम्पकरिता उपस्थित डॉक्टर्स व इतर मान्यवरांचा सत्कार करणे.
५) कॅम्प समारोप कार्यक्रमाचे नियोजन करणे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

श्री साईबाबांचे सामाजिक व अध्यात्मिक कार्यासंबंधी जागृती करणेकरीता दि०३ व ०४ डिसेंबर २०१७ रोजी मेदान्त हॉस्पीटलमार्फत फ्री मेडीकल चेकअप कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. सदर कॅम्प कार्यक्रमासाठी आयोजन करणेकामी संस्थानमार्फत खालील सुविधा मोफत पुरवाव्या लागतील.

१. कॅम्पचे ठिकाणी मशिनरी/साहित्य करीता आवश्यक विद्युत पुरवठा करणे.
२. कॅम्पचे ठिकाणी रुग्णांना मार्गदर्शन करणेकामी ४-५ साईसेवकांची नेमणूक करणे.
३. कॅम्पची प्रसिद्धी करणे.
४. कॅम्पकरीता उपस्थित डॉक्टर्स व इतर मान्यवरांचा सत्कार करणे.
५. कॅम्प समारोप कार्यक्रमाचे नियोजन करणे.
६. Registration
७. Blood Pressure Check-Up
८. Blood Sugar
९. ECG (if recommended)
१०. Doctors Consultation
११. Echo (if recommended)
१२. X-Ray Chest

**विभागाचा अभिप्राय:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे श्री साईनाथ रुग्णालय (३०० बेड) व श्री साईबाबा रुगणालय (२५० बेड) ही चालविली जातात. संस्थानचे दोन्ही रुग्णालयात उपरोक्त अध्यक्ष श्री शिर्डी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांनी मागणी केलेप्रमाणे सर्व विभाग, तपासण्या व उपचार उपलब्ध आहेत. त्यामुळे नव्याने सदर शिबीराची आवश्यकता असल्याचे दिसत नाही. तसेच त्यांचे मागणीप्रमाणे रजिस्ट्रेशन करणेकामी लागणा-या आवश्यक त्या तपासण्या सद्यस्थितीत रुग्णालयात होऊ शकत नाहीत. याकरीता अतिरिक्त मनुष्यबळ, मशिनरी व इतर लॅब केमिकल्स सद्यस्थितीला उपलब्ध करता येत नाहीत असे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय अधिक्षीका यांचे मत आहे

तरी अध्यक्ष श्री शिर्डी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांनी फ्री मेडीकल चेकअप कॅम्प घेणेसाठी उपरोक्त नमूद केलेल्या मागण्या या आर्थिक बाबींशी निगडीत असल्याने सदर बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री शिरडी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांचे मेदान्ता हॉस्पिटल, गुडगावमार्फत घेण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये श्री साईबाबा संस्थान सहयोगी होण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु या शिबीरासाठी रुग्णांची नाव नोंदणी त्यांनी करावी व ज्या रुग्णांना आजार निघेल, अशा रुग्णांचा पुढील पुर्ण उपचार मेदान्ता हॉस्पिटल, गुडगाव यांनी मोफत करावा, याबाबत चर्चा करणेसाठी श्री शिरडी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांचे प्रतिनिधींना बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३४** **श्री शिरडी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांनी दि.०३.१२.२०१७ रोजी आयोजित केलेल्या जागृकता महासंमेलनास संस्थानने निशुल्क सोयी-सुविधा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **संस्थानअधिनियमातील तरतूद**: कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना**: अध्यक्ष, अन्तर्राष्ट्रीय श्री सांई धर्म (मानव धर्म) जागरुकता महासम्मेलन -२०१७ तथा श्री शिरर्डी सांई दरबार, सांई गॉव सपनावत (उत्तर प्रदेश) यांनी मा. कार्यकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि. ०६/११/२०१७ रोजीचे पत्रात "श्री साईचे महासमाधी वर्ष व मार्गशिर्ष पौर्णिमानिमित्त रविवार, दि. ३ डिसेंबर २०१७ रोजी बाबांचे सामाजिक व अध्यात्मिक कार्यासंबंधी भक्तांना जागृत करणेकरीता 'साई धर्म (मानव धर्म) जागरुकता महासंमेलन' शिर्डी येथे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी ९ हजार साईभक्त उपस्थित राहणार असून, सदरचा कार्यक्रम शिर्डी येथिल ए. के. गोंदकर मैदानावर आयोजित करणेत येणार असून सदर कार्यक्रमांचे संस्कार चॅनल वरून थेट प्रसारण करणेत येणार आहे असे नमूद करुन सदर कार्यक्रमासाठी संस्थानने खालील सेवा निशुल्क द्याव्यात असे कळविलेले आहे.

| अ.नं. | आवश्यकता | संख्या | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | सुरक्षा कर्मचारी | २० | ८,३००/- |
| ०२ | सफाई कर्मचारी | १० | ४,१५०/- |
| ०३ | मोबाईल टॉयलेट | ०४ | १,६००/- |
| ०४ | महत्वाच्या व्यक्तींसाठी मोफत व्हीआयपी पासेस | २० | ४,०००/- |
| ०५ | महत्वाच्या व्यक्तींसाठी मोफत व्हीआयपी रुम्स | १० | ९,०००/- |
| ०६ | अग्निशमन वाहन | ०१ | २५,०००/- |
| ०७ | पिण्याचे पाण्याचे टॅकर | ०१ | २,५००/- |
| ०८ | उदीप्रसाद पॅकेट | ५०० | ०.०० |
| ०९ | पुजासाहित्य पुजारी | ०१ | ५००/- |
| १० | शिर्डी परिक्रमेच्या सुरुवातीस संस्थानचे अधिकृत व्यक्तीकडून कार्यक्रमाची सांयकाळी ०४.०० वाजता उदघोषणा करणे | | |
| | | रक्कम रुपये- | ५५,०५०/- |
| | | जीएसटी (१८%) | ९,९०९/- |
| | | एकूण रक्कम रुपये - | ६४,९५९/- |

**प्रस्ताव**: श्री साईबाबा यांच्या समाधीस ऑक्टोबर-२०१८ मध्ये १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येतआहे, जेणे करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने कामकाज चालू आहे.

त्याच धर्तीवर आयोजकांनी बाबांचे सामाजिक व अध्यात्मिक कार्यासंबंधी साईभक्तांना जागृत करणेकरीता दि.३ डिसेंबर २०१७ रोजी ए.के. गोंदकर मैदान, शिर्डी येथे 'साई धर्म (मानव धर्म) जागरुकता महासंमेलन' आयोजित करण्याचे निर्धारित केले आहे. सदर महासंमेलन कार्यक्रमासाठी ९ हजार साईभक्त उपस्थित राहणार असून महासंम्मेलनाचे समारोपप्रसंगी 'शिर्डी परिक्रमा'चे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी उपरोक्त सुविधा मोफत पुरवाव्यात अशी मागणी केली आहे. परंतु सदरचा कार्यक्रम हा खाजगी स्वरुपाचा आहे. सदर सुविधा पुरविणेचे झालेस या कामी अंदाजे रु. ६५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी अध्यक्ष, अन्तर्राष्ट्रीय श्री सांई धर्म (मानव धर्म) जागरुकता महासम्मेलन -२०१७ तथा श्री शिरर्डी सांई दरबार, यांचे मागणीप्रमाणे उपरोक्त नमूद बाबींची पुर्तता करावी किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, 'शिर्डी परिक्रमा' ही सदर संस्थेची खाजगी बाब आहे, त्यामध्ये संस्थानने सहभाग घेतल्यास, अशा प्रकारचा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करावा लागेल व या नवीन प्रथा संस्थानने सुरु करु नयेत, असे समितीचे मत होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३५** **श्री शिरडी साई दरबार, साई गाव सपनावत (एन.सी.आर.) यांचे दि.०३.१२.२०१७ रोजी शिर्डी परिक्रमा व ७२ तासांच्या अखंड समाधीचा शताब्दीमध्ये समावेश करुन प्रचार-प्रसार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **संस्थान अधिनियमातील तरतूद**: कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना**: संयोजक, सांई दरबार, सांई गांव सपनावत (एन.सी.आर.) यांचे दिनांक ०६/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये साईभक्तांकरीता शिर्डी क्षेत्र मथुरा, अयोध्या, महाबलेश्वर, गया, काशी, उज्जैनप्रमाणे पावन भूमी आहे. त्यानुसार २०११ पासून मार्गशिर्ष महिन्यातील पौर्णिमेच्या रात्री ७२ तासांचे अखंड साईनाम जप साई गॉव, सपनावत येथे करण्यात येत आहे. स्थानिक साईभक्त या कार्यक्रमात भाग घेत असतात. इतिहासामध्ये साईचे ७२ तास खुप महत्वाचे मानले जातात. कारण की सन १८८६ मध्ये मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला ७२ तासांची समाधी घेतली आहे. सबब त्यांनी खालीलप्रमाणे विनंती केली आहे:

(१) संस्थानमार्फत शिर्डी परिक्रमाच्या कार्यक्रमाचा शुभारंभ मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला (दि. ३ डिसेंबर २०१७) करण्यात यावा.

(२) संस्थानमार्फत भविष्यात सदर कार्यक्रमाचा वार्षिक उत्सवामध्ये समावेश करावा.

(३) बाबांचे समाधीनिमित्त ७२ तासांचे अखंड साई नाम जाप संस्थानमार्फत सुरु करावेत.

(४) संस्थानमार्फत शिर्डी परिक्रमाचा निर्धारित मार्गाचा प्रसार-प्रचार भक्तापर्यंत पोहचवावा

**प्रस्ताव** : श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. श्री शिरडी सांई दरबार, सांई गॉव सपनावत (एन.सी.आर.) यांनी कळविलेलया पत्रात 'शिर्डी परिक्रमा' व '७२ तासांचे साई नाम जप' दि. ३ डिसेंबर २०१७ रोजी संस्थानतर्फे आयोजित करणेबाबत तसेच भविष्यातही सदर कार्यक्रमांचे प्रसार-प्रचार होणेसाठी त्यांचा वार्षिक उत्सवामध्ये समावेश करणेबाबत कळविले आहे.

तथापि सदर पत्रात नमूद केलेप्रमाणे संस्थानचा प्रत्येक उत्सव हे पुर्वापार चालत आलेल्या रितीरिवाजाप्रमाणे सुरु आहे. यामध्ये प्रस्तावात दिलेल्या सूचनेप्रमाणे आता वार्षिक उत्सवात 'शिर्डी परिक्रमा' व '७२ तासांचे साई नाम जप' यांचा अंतर्भाव करणे उचित ठरणार नाही.

तरी श्री शिरडी सांई दरबार, सांई गॉव सपनावत (उत्तर प्रदेश) यांचेमार्फत शिर्डी येथे मार्गशिर्ष महिन्यातील पौर्णिमेला दि. ३ डिसेंबर २०१७ रोजी संस्थानमार्फत 'शिर्डी परिक्रमा' व '७२ तासांचे साई नाम जप' या कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत व यापुढे अशा सूचनांबाबत कायमस्वरुपी धोरणात्मक निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सन २०१७-१८ निमित्त शिर्डी परिसरातील रस्ते विकसीत करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ पोट कलम २ (१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वतव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा यांसारख्या पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविणेसाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल. अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थाप समितीचे सभेतील निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७९ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्ताने शिर्डी परीसरातील कोण- कोणते रस्ते विकसीत करावयाचे हे समिती ठरविल व समितीने निश्चित केलेले रस्ते संस्थान स्वत: विकसीत करेल. याकरीता सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले."*

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार करुन नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर कृती आराखडा अंतिम करुन केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१मार्च, २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये कृती आराखडयास मान्यता मिळालेली आहे.

सदरहू कृती आराखडयामध्ये शिर्डी परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर व जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील संस्थान व महाराष्ट्र शासन निधितुन प्रस्तावित व द्वितिय प्राधान्य गटातील केंद्र सरकारचे निधीतुन प्रस्तावीत किंमतीचा घोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कार्यकारी विभागाचे नांव | प्रथम प्राधान्य गट (रु. कोटीत) | द्वितिय प्राधान्य गट (रु. कोटीत) | एकूण (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर | ३४.५१ | ५३८.७० | ५७३.२१ |
| ०२ | जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर | ५६.८० | २२०.५० | २७७.३० |

उपरोक्त निधी मागणी करणारा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे पूर्वतयारीकरीता संस्थान, शिर्डी नगरपंचायत व सर्व शासकीय विभागांचे संबंधित अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीत उत्सव काळात साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने शिर्डी येथे होणा-या गर्दीचा विचार करता शिर्डी परिसरातील रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सुचना केलेल्या आहेत.तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी आपत्ती व्यवस्थापन नियोजनाकरीता घेतलेल्या बैठकीत शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असलेने, गर्दीचे नियोजनाकरीता रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सूचना केल्या आहे.

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्र.प्रशा/५२५९/२०१७ दि.०१/०९/२०१७ पत्रान्वये खालील रस्त्यांचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने संस्थान मार्फत याकामी रक्कम रु.२४ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन मिळावा जेणेकरुन सदरची कामे वेळत पूर्ण करता येतील असे कळविले आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३००.०० |
| २ | नांदुर्खी ते प्रामा – ८ (इजिमा.८५) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १५०.०० |
| ३ | गोदावरी वसाहत ते रुई ( प्रजिमा.९१) कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १७५.०० |
| ४ | रुई ते पिंपळवाडी रस्ता ( प्रजिमा.८८) कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १००.०० |
| ५ | पिंपळवाडी एकरुखे गणेशनगर वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ६ | रांजणगांव खु ते खडकेवाके रस्ता ( प्रजिमा.९२) कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३५०.०० |
| ७ | नांदुर्खी साकुरी रस्ता ( प्रजिमा.१०) कि.मी. १०/५०० ते १२/५०० व २४/०० ते २८/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३२५.०० |
| | **एकूण रक्कम रुपये लक्ष -** | **२४००.००** |

उपरोक्तप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी सादर केलेला वरील रस्त्यांचे दुरुस्तीचे कामासाठी संस्थानकडून निधी मिळणेसबाबतचा प्रस्ताव दि.०८/०९/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले होते.

**आता** मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता यांनी मा. मुख्यमंत्री महोदय व प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना अग्रेषित केलेल्या दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्राव्दारे श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आपत्कालीन परिस्थितीमध्ये खालील पर्यायी रस्त्यांची सुधारणा होणेबाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३००.०० |
| २ | नांदुर्खी ते प्ररामा – ८ (इजिमा.८५) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १५०.०० |
| ३ | गोदावरी वसाहत ते रुई ( प्रजिमा.९१) कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १७५.०० |
| ४ | रुई ते पिंपळवाडी रस्ता ( प्रजिमा.८८) कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १००.०० |
| ५ | पिंपळवाडी एकरुखे गणेशनगर वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १३००.०० |
| ६ | रांजणगांव खु ते खडकेवाके रस्ता ( प्रजिमा.९२) कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३५०.०० |
| ७ | नांदुर्खी साकुरी रस्ता ( प्रजिमा.१०) कि.मी. १०/५०० ते १२/५०० व २४/०० ते २८/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३२५.०० |
| | **एकूण रक्कम रुपये लक्ष -** | **२७००.००** |

कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी क्रसासंवि-१०१७/ १६४०/ प्र.क्र.१८२/ का.१६ दि.०९ ऑक्टोबर, २०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१. *श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिरडीत होणारी श्री साईभक्तांची वर्दळ व संभाव्य गर्दी विचारात घेऊन, प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जा उन्नत झालेल्या रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्याकडे सादर केलेल्या रस्ता सुधारणा प्रस्तावाला विशेष बाब म्हणून तात्काळ मंजूरी देऊन निधीची तरतुद करण्याची विनंती केली आहे .*

२. *प्रस्तुत प्रकरणी मला आपणास असे कळविण्याचे निर्देश आहेत की, मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा.विरोधी पक्ष नेता यांनी त्यांच्या दि.२९/०९/२०१७ रोजीच्या पत्राव्दारे विनंती केल्याप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेल्या प्रस्तावामध्ये वरील ७ रस्त्यांच्या दुरुस्तीच्या आवश्यक्ता आणि सदर रस्त्यांची शताब्दी कालावधी मधील उपयुक्तता याबाबींचा साकल्याने विचार करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुषंगाने उचीत कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.*

तरी वरीलप्रमाणे रस्ते शिर्डीकडे येणा-या रस्त्यांना जोडणारे रस्ते आहेत. सदरचे रस्ते वाहतूकीचे दृष्टीने उपयोगी आहेत. करीता सदरहू रस्त्यांची कामे संस्थानमार्फत हाती घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित रस्त्यांपैकी शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्त्यावर साईभक्तांची ये-जा राहते, याकरीता शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे या रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना रु.३ कोटी मात्र निधी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेने संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले व उर्वरित रस्त्यांबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सन २०१७-१८ निमित्त शिर्डी परिसरातील रस्ते विकसीत करणेसाठी जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ पोट कलम २ (१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वतव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेले आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा यांसारख्या पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविणेसाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल. अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थाप समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७७९ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"... यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्ताने शिर्डी परीसरातील कोण - कोणते रस्ते विकसीत करावयाचे हे समिती ठरविल व समितीने निश्चित केलेले रस्ते संस्थान स्वत: विकसीत करेल. याकरीता सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले."*

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये येणाऱ्या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार करुन नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर कृती आराखडा अंतिम करुन केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१मार्च, २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये कृती आराखडयास मान्यता मिळालेली आहे.

सदरहू कृती आराखडयामध्ये शिर्डी परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर व जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील संस्थान व महाराष्ट्र शासन निधितुन प्रस्तावित व द्वितिय प्राधान्य गटातील केंद्र सरकारचे निधीतुन प्रस्तावीत किंमतीचा घोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कार्यकारी विभागाचे नांव | प्रथम प्राधान्य गट (रु. कोटीत) | द्वितिय प्राधान्य गट (रु. कोटीत) | एकूण (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर | ३४.५१ | ५३८.७० | ५७३.२१ |
| ०२ | जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर | ५६.८० | २२०.५० | २७७.३० |

उपरोक्त निधी मागणी करणारा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे पूर्वतयारीकरीता संस्थान, शिर्डी नगरपंचायत व सर्व शासकीय विभागांचे संबंधित अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीत उत्सव काळात साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने शिर्डी येथे होणाऱ्या गर्दीचा विचार करता शिर्डी परिसरातील रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सुचना केलेल्या आहेत.तसेच मा.

जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी आपत्ती व्यवस्थापन नियोजनाकरीता घेतलेल्या बैठकीत शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असलेने, गर्दीचे नियोजनाकरीता रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सूचना केल्या आहे.

त्यानुसार जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांनी जा.क्र.कार्या ४/ प्रशा २/ ४०/ १७ दि.०१/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शाखा अहमदनगर यांना अग्रेषित केलेल्या पत्रात खालील ४ रस्त्यांचे कामासाठी रु.१.६८ कोटी निधीची आवश्यकता असून, जिल्हा परिषदेकडे रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे निधीची उपलब्धता झाल्यानंतरच सदर कामे करण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करता येईल असे नमूद केले आहे. सदरहू पत्राची प्रत माहीतीस्तव इकडील कार्यालयास सादर केली आहे.

| **अ.नं.** | **रस्त्याचे नांव** | **रस्त्याचा दर्जा** | **अंदाजित रक्कम (लक्ष)** |
|---|---|---|---|
| १. | डो-हाळे- कनकुरी-शिर्डी प्र.रा.मा.८ ला मिळणारा इजिमा ९ रस्ता कि.मी. ०/००० ते ७/३०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | इजिमा ९ | ६७.३० |
| २. | प्ररामा ८ सावळीविहीर बु.- वेस ते रांजणगांव देशमुख रस्त्यासाठी कि.मी. ०/००० ते ७/५०० मध्ये मुरुमी साईड पट्टया तयार करणे. ता. राहाता | इजिमा १४ | ४.२८ |
| ३. | प्ररामा ८ (धर्मशाळा रोड) ते कालवा (Canal) मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | योजनाबाहय | ४४.३५ |
| ४. | नांदुर्खी बु. ते निमगांव- को-हाळे रस्ता कि.मी.०/००० ते ६/००० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | ग्रा.मा.११० | ५२.७३ |
| | | **एकूण -** | **१६८.६६** |

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शाखा-अहमदनगर यांना अग्रेषित केलेल्या पत्रात नमूद केलेली एकुण ०४ रस्ते सुधारणेसाठी अंदाजे रु.१.६९ कोटी इतका निधी संस्थानकडून मिळणेस विनंती केली आहे. परंतू त्याचे प्रस्तावातील अ. नं.०१ व ०४ हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचे प्रस्तावात सुध्दा नमूद केलेली असल्याने, जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांचे प्रस्तावातून वगळून अ.नं.०२ व ०३ चे रस्ते सुधारणेसाठी रक्कम रु.४८.६३ लक्ष इतकी रक्कम होते.

उपरोक्तप्रमाणे जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांनी सादर केलेला वरील रस्त्यांचे दुरुस्तीचे कामासाठी संस्थानकडून निधी मिळणेसबाबतचा प्रस्ताव दि.०८/०९/२०१७ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. त्यानुसार सदरहू प्रस्ताव तुर्त स्थगीत ठेवणेत यावा असे ठरले होते.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात शिर्डी शहराकडे येणा-या रस्त्यांना जोडणारे रस्ते तसेच अपत्कालीन परिस्थीतीमध्ये शिर्डी शहरातील वाहतुकीकरीता पर्यायी रस्ते म्हणून त्यांची सुधारणा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या रस्त्यांपैकी अ.नं.१ चा रस्ताच फक्त साईभक्तांच्या सोयीचा असून, या रस्त्याचे कामासाठी उपरोक्त निर्णय क्र.९४९ अन्वये निधी उपलब्ध करुन देण्यास मंजुरी दिलेली आहे. उर्वरित रस्ते साईभक्तांच्या वहिवाटयाचे नसल्यामुळे सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.३८** **शिर्डी शहरातील रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम२१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८/१०/२०१८ रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहेत. या निमीत्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मार्फत दि.०१/१०/२०१७ ते दि.१८/१०/२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे.या शताब्दी वर्षामध्ये श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार करुन नियोजनबध्द कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर कृती आराखडा अंतीम करुन केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१/०३/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, विधान भवन, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये कृती आराखड्यास मान्यता मिळालेली आहे.

सदरहू कृती आराखड्यामध्ये शिर्डी परिसरातील रस्ते विकसीत करणेसाठी शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील संस्थान व महाराष्ट्र शासन निधीतून प्रस्तावित व द्वितीय प्राधान्य गटातील केंद्र सरकारचे निधीतून प्रस्तावित किमतीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **कार्यकारी विभागाचे नांव** | **प्रथम प्राधान्य गट (रु. कोटीत)** | **द्वितीय प्राधान्य गट (रु. कोटीत)** | **एकुण (रु. कोटीत)** |
|---|---|---|---|---|
| ०१. | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | २५.९० | १६०.८७ | १८६.७७ |

त्या अनुषंगाने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचेकडील जा.क्र. नप./टि.क्रं.८/२४२७/२०१७ दि.२०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. शिर्डी नगरपंचायतीद्वारे शहरातील विकसीत करावयाच्या रस्त्यांचे सर्व्हेक्षण करुन शताब्दी महोत्सवाच्या पूर्वी करता येण्यासारखी रस्त्यांची कामे निश्चित केलेली आहेत. सदर कामे तातडीने करणेसाठी आज रोजी नगरपंचायतीकडे निधी उपलब्ध नाही. सबब श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमीत्तने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेकडील मंजूर रक्कम रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यातील शिर्डी नगरपंचायतसाठी प्राधान्यने करावयाच्या रु.१४६.१७ कोटी इतक्या रकमेपैकी कृती आराखड्यामध्ये समाविष्ट असलेल्या शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ क-२१ (२)–ii अन्वये सद्यस्थितीत नगरपंचायतीला रु.१०.०१८ कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती आहे. सदर प्रस्तावास विश्वस्त व्यवस्थापन मंडळाची मंजूरी मिळालेनंतर तांत्रीक मंजूरीसह सविस्तर अंदाजपत्रके आपणांकडे सादर करण्यात येतील."

वरीलप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेल्या प्रस्तावात एकुण ३८ रस्ते समाविष्ट असून, त्यांची लांबी १६.१४ कि. मी. व रुंदी ४.५० मीटर आहे. त्यासाठी रु.१०.०१८ कोटी इतके अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे.

**प्रस्ताव:** शिर्डी नगरपंचायत यांनी शिर्डी शहर उपनगरातील १६.१४ कि. मी. लांबीचे एकुण ३८ अंतर्गत रस्ते विकसीत करणेसाठी रु.१०.०१८ कोटी इतक्या निधीची अनुदान स्वरुपात मागणी केली आहे. तरीश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार अनुदान देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५१** **आजचे सभेत उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते, त्यांनी सभेसमोर शिर्डी शहरातील २७ रस्ते करावयाचे आहेत, अशी माहिती सभेसमोर दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र आर्थिक अनुदान शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.३९** **शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणाऱ्या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करणेसाठी अनुदान देणे.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि. ०६.०२.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्रामध्ये त्यांनी श्री साईबाबा संस्थानने शिर्डी शहरातील विविध देवदेवतांची मंदीरे ताब्यात घेण्याच्या बदल्यात संपूर्ण शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी रु. २५ लाख रुपये प्रति महिना शिर्डी नगरपालिकेला कायमस्वरुपी द्यावेत. शिर्डी शहराचे जसे नागरीकरण वाढेल तशी या पैशात संस्थानने वाढ करावी. अशी मागणी सौ. योगिता अभय शेळके पाटील, अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी व विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी केलेली आहे.

**संस्थानतर्फे अनुदान देणेबाबात अधिनियमातील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** दि. २५.०२.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. १५७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये श्रीं चे दर्शनासाठी देश विदेशातून साईभक्त येत असतात.यामुळे शिर्डी शहर स्वच्छ असायला हवे. परंतु शिर्डी नगरपंचायतीकडे निधीची कमतरता असल्यामुळे ते संस्थानच्या मदतीशिवाय काम करू शकत नाही. याकरिता उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.

परंतु शिर्डी शहराचे स्वच्छतेकरिता त्यांनी केलेल्या खर्चाची रक्कम खुपच जास्त आहे. याकरिता संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व इतर अधिकारी यांची मिळून समिती गठीत करण्यात यावी. या समितीने शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रत्यक्ष येणारा खर्च निश्चीत करावा व त्याबाबतचा परिपूर्ण अभ्यास करून फेरप्रस्ताव समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने दि. ०५.०५.२०१७ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बैठक झाली. त्या बैठकीस संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी,श्रीमती रुबल अग्रवाल, डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी, श्री बाबासाहेब घोरपडे, मुख्यलेखाधिकारी, श्री दिलीप उगले, प्रशासकीय अधिकारी, श्री आर बी आहेर, उपकार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, श्री अशोक वाळूंज, प्र. कामगार व विधी अधिकारी, श्री संजय गायकवाड प्र. अधिक्षक आरोग्य विभाग, श्री सुधाकर कुलकर्णी, लिपीक आरोग्य विभाग तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मा. सौ. योगिता शेळके, नगराध्यक्षा, श्री अभय शेळके, श्री देसले श्री भागवत शेज्वळ बैठकीस हजर होते. सदर बैठकीमध्ये शिर्डी शहर स्वच्छतेसाठी नगरपंचायतीने मागणी केलेल्या रु. २५ लाख मात्रच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील संयुक्तबैठकीतील निर्णय:-** शिर्डी नगर पंचायत यांचेमार्फत शहरातील कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे, स्वच्छता करणे इ. साठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर निविदा उघडल्यानंतर येणारे दर स्विकारून निविदाधारकाला कार्यारंभ आदेश देणेबाबत नगरपंचायतीचा ठराव नगरपंचायतीने संस्थानला द्यावा. सदर निविदा प्रक्रियेनुसार येणारे दर किंवा नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम रु. २५/- लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती प्रतिमाह अनुदान म्हणून देणेबाबत व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेबाबत निर्णय झाला तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानकडून स्वच्छतेसाठी देण्यात आलेल्या अनुदानाचा विनीयोग त्याच कामासाठी करण्यात आलेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थानला प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला द्यावे असे ठरले.

**शिर्डी नगरपंचायतीने नव्याने सादर केलेला प्रस्ताव** :-

**प्रास्तविक :-** शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचा दि ०३.११.२०१७ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यात नगरपंचायतीने शिर्डी नगरपंचयात ही 'क' वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या अंदाजे ४५००० इतकी आहे. श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता दररोज येणा-या साईभक्तांची संख्या ५० ते ७५ हजार तर उत्सवकाळात साईभक्तांची संख्या २ ते ३ लाख होते. त्यामुळे शहरात वर्षभर येणा-या साईभक्तांकडून तसेच शहरातील नागरिकांकडून देखील मोठया प्रमाणावर कचरा होत असतो.

इतर नगरपरिषदांच्या तुलनेत शिर्डी शहरात स्वच्छतेबाबत विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. व त्यासाठी विशेष यंत्रणा लावणे देखील गरजेचे आहे. यापूर्वी शिर्डी नगरपंचयातीद्वारे तसे प्रयत्न करण्यात आलेले

नव्हते. साईभक्तांना व शहरातील नागरीकांना येथे होणा-या अस्वच्छतेचा त्रास होऊ नये यासाठी, शिर्डी नगरपंचायतीद्वारे स्वच्छताविषयक कामाची व्याप्ती मोठया प्रमाणावर वाढवून व यासाठी मनुष्यबळ व आवश्यक यंत्रणा बंधनकारक करून शिर्डी शहर स्वच्छतेबाबत शिर्डी नगरपंचातीने हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी दैनीक लोकमत या वर्तमानपत्रात दि. २६.०९.२०१७ रोजी तसेच फेर ई – निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीकडे एकूण तीन ई- निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | संतगाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, गुलाबनगर, दापोडी, पुणे | मे. गुरूजी इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. मिरा भाईंदर, जि. ठाणे | मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. बी.व्ही. जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन विषयक साफसफाईची सर्व कामे प्रती महा ठोक पद्धतीने करणे | रु. ६०,७५,७५१/- प्रतिमहा | रु. ६५,६५,६६५/- प्रतिमहा | रु. ४२,५१,५९९/- प्रतिमहा |

उपरोक्त तक्त्यांचे अवलोकन केले असता मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. बी.व्ही.जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे यांचे दर न्युनतम आलेले आहेत. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

**मागणी:-** तरी शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी न्युनतम दराची निवीदा रक्कम रु. ४२,५१,५९९/- प्रतिमहा पुढील ५ वर्षाकरिता नगरपंचायतीस मिळावी. अशी विनंती शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय :-**

१) शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी शहर स्वच्छतेसाठी, शिर्डी नगरपंचायतीने मागविलेल्या निविदा प्रक्रियेनुसार येणारे दर किंवा नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम रु. २५/- लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रतीमाह अनुदान देणेबाबतचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने, गठीत केलेल्या समितीने, घेतला असून याबाबत व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेचा निर्णय झाला आहे. तरी समितीने प्रस्तावीत केलेली व उर्वरीत रक्कम रु. १७,५१,५९९/- याबाबत निर्णय होणे अपेक्षीत आहे.

२) शिर्डी नगरपंचायत, दररोज शिर्डी येथे येणा-या साईभक्तांकडून कोणताही अधिभार/कर घेणार नाही याचे नगरपंचायतीकडून हमीपत्र घेण्यात यावे.

३) शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी लागणारे कर्मचारी, अद्यायावत मशिनरी, वाहने इ. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी स्वतः उपलब्ध कराव्यात.

४) गोळा होणा-या कच-याची योग्य रितीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी नगरपंचायतीची राहील.

५) कचरा गोळा केल्यानंतर तो टाकण्यासाठी जागेची उपलब्धता करणेची सर्वांगीण जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीची राहील.

६) संस्थानकडून यापुर्वी नगरपंचायत हद्दतील मंदिराच्या लगतच्या भागाचे स्वच्छतेसाठी संस्थानमार्फत दररोज ४० कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येत होते. आता विषयांकीत स्वच्छतेची रक्कम ज्या महिन्यापासून नगरपंचायतीस देणेस सुरवात होईल, त्यानंतर स्वच्छतेसाठी देण्यात येत असलेले वरील प्रमाणे ४० कर्मचारी नगरपंचायतीस स्वच्छतेसाठी नगरपंचायतीस देणे बंद करण्यात येईल.

७) नगरपंचायतीने मंदीरपरिसर, संस्थानच्या विविध इमारती, भक्तनिवास, प्रसादालय, शैक्षणीक संकुल लगत नगरपंचायत हद्दीतील भागाची स्वच्छता प्राधान्याने करणे बंधनकारक राहील.

८) मंदिरालगचे पिंपळवाडी रस्ता,पालखीरस्ता, नगर मनमाड रस्ता प्रसादालय रस्ता, विविध भक्तनिवासस्थाना समोरील रस्त्यावरील जागेवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही अथवा तात्पुरत्या स्वरुपात व्यवसाय करु देणार नाही. त्याची हमी नगरपंचायतीकडून घेण्यात येईल.

९) संस्थान मार्फत नगरपंचायत यांना प्रवेशकरापोटी देण्यात येत असलेली वार्षिक रक्कम रु. ४०लाख बंद करण्यात येवून, सन २०१२-२०१३ पासुनची प्रलंबीत असलेली थकबाकीची रक्कम शिर्डी नगरपंचायत संस्थानकडे मागणार नाही. याबाबतचे शिर्डी नगपंचायत यांनी तसे हमीपत्र लिहून द्यावयाचे आहे

१०) संस्थानकडून स्वच्छतेकामी देण्यात आलेल्या अनुदानाचा विनीयोग साईदर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर महत्वाचे रस्ते, सार्वजनिक मोकळया जागा, सार्वजनिक इमारती व मंदीर भोवतीचा परिसर इ. ठिकाणी स्वच्छता करण्यात आली असल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शिर्डी नगरपंचायतीने संस्थानच्या आरोग्य विभागाला प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

११) संस्थानच्या आरोग्य विभागाने उपयोगिता प्रमाणपत्राचे अवलोकन केलेनंतर प्रत्येक महिन्याचे मागणी घेऊन देयक लेखाशाखेस सादर करावे.

१२) आरोग्य विभागाने देयक सादर केलेनंतर लेखाशाखेकडून शिडी नगरपंचायतीस अनुदान देण्यात येईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.९५२** **उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेसमोर शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक, अधिकारी व बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कंपनीचे प्रतिनिधींना बोलविणेत आले होते. सभेने शिर्डी नगरपंचायतीने राबविलेली ई-निविदा प्रक्रिया व टेंडर डॉक्युमेंटचे अवलोकन केले. त्यामध्ये घंटागाडी व कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आढळून आली. परंतु संपुर्ण शिर्डी शहर स्वच्छतेच्या दृष्टीने त्याची आवश्यकता असलेबाबत नगराध्यक्षा व बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी सभेस सांगितले. यावर यापुर्वीच्या ठरावानुसार शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी शहर स्वच्छतेसाठी प्रतिमाह रु.२५ लाख मात्र अनुदान देण्याचे ठरलेले आहे, परंतु ई-निविदा प्रक्रियेमध्ये रु.४२,५१,५९९/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, याकरीता शिर्डी नगरपंचायतचे नगरसेवक/ अधिकारी व बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी एकत्रित चर्चा करुन यामधील काही बाबी कमी करुन, दर कमी करणेचा प्रयत्न करावा, अशा सुचना अध्यक्ष महोदय यांनी दिल्या. परंतु त्यांचे चर्चेअंती दर कमी होऊ शकले नाही, काही बाबी कमी केल्यास स्वच्छतेच्या कामावर त्याचा परिणाम होईल, अशी विनंती नगरसेवकांनी केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणाऱ्या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे करणेसाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रति माह रु.३५,००,०००/- मात्र अनुदान देण्यात यावे व ही रक्कम प्रत्येक महिन्यास त्यांना आदा करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच उर्वरित रक्कम शिर्डी नगरपंचायतीने ठेकेदारास आदा करावी. तसेच याबाबत करावयाच्या करारनाम्यासंदर्भात अटि/ शर्ती निश्चित करणेत याव्यात व सदर प्रस्तावास छाननी समितीच्या पुर्व परवानगीने महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात येऊन, त्यानंतर सदर रक्कम दरमहा अदा करणेस सुरुवात करावी.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४०** **शिर्डी नगरपंचायतीस पंचतारांकीत दर्जाच्या सुलभ शौचालय निर्मितीसाठी अनुदान म्हणून रु.१६,९५,५८७/- मात्र रक्कम देणे.**

**प्रस्ताव-** सौ. योगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून श्री साईबाबा संस्थानने पंचतारांकीत दर्जाच्या सुलभ शौचालयाची निर्मिती करून "Pay & Use" तत्वावर चालविणेस देणेबाबत कळविले आहे. यासाठी नगरपंचयातीने नांदुर्खी रस्त्यालगत स. न. १७० मधील जागा निश्चित केली आहे.

सदर कामासाठी तांत्रिक मान्यता प्राप्त आहे, परंतु निधी उपलब्ध नाही. तसेच केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून निधी उपलब्धनसल्याचे त्यांचे पत्रात नमूद केले आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत निधी उपलब्ध झाल्यास हे पंचतारांकित शौचालय सार्वजनिकस्वरुपाचे बांधता येईल व त्याचा वापर साईभक्त तसेच नागरिकांना करता येईल. त्यासाठी पंचतारांकित दर्जाच्या सुलभ शौचालयासाठी संस्थानने शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु. १६,९५,५८७/- मात्र अनुदान देणेबाबतची विनंती शिर्डी नगरपंचायतीने केलेली आहे.

**संस्थानतर्फे अनुदान देणेबाबात अधिनियमातील तरतुद**:- श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने,

स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** मा.मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत श्री साईबाबा शताब्दी महोत्सव तृतीय आढावा बैठक दि.०६.०७.२०१७ रोजी झाली सदर बैठकीत दिलेल्या निर्देशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी नगरपंचायतीच्या विविध प्रकल्पांसाठी निधी देतांना कर्ज स्वरुपात न देता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४, मधील तरतूदीप्रमाणे अनुदान स्वरुपात द्यावा. असे निर्देश दिलेले आहेत.

तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी नगरपंचायतीस पंचतारांकीत दर्जाच्या सुलभ शौचालय निर्मितीसाठी रु.१६,९५,५८७/- मात्र अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४१** **संस्थानमार्फत हाती घेण्यात येणाऱ्या विविध बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सल्ला सेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनेलची स्थापना करणेकामी प्राप्त प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थाच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७ अन्वये संस्थानमार्फत हाती घेण्यात येणा-या विविध बांधकाम प्रकल्पांकरीता आर्किटेक्चरल सेवा घेणेसाठी आर्किटेक्ट पॅनल नेमणेकरीता RFP (Request for Proposal) मागविणेस तसेच याकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत आली.

**प्रस्तावना:-** संस्थानमार्फत साईभक्तांचे सुविधेकरीता विविध बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात येतात. विविध प्रकारचे विकास प्रकल्पांसाठी (उदा.भक्तनिवास, शैक्षणिक इमारती, रुग्णालये, प्रसादालय, थीमपार्क, लॅण्डस्केपींग, इंटेरियर इ.) वेगवेगळे आर्किटेक्ट, कन्सल्टंट यांची आवश्यकता असते या सर्व प्रकल्पांकरीता अहवाल तयार करणे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करणे याकरीता संस्थानमार्फत यापुर्वी नामांकित आर्किटेक्टस यांचा अनुभव व त्या क्षेत्रातील विशेष प्राविण्य यांचे आधारे नेमणूक करण्यात येत होती.

आता प्रस्तावित करण्यात येत असलेल्या विकास प्रकल्पांकरीता आर्किटेक्टक नेमणुकीसाठी RFP (Request for proposal) मागविणेत येतात. त्यामुळे प्रत्येक प्रकल्पासाठी आर्किटेक्ट नेमणुकीकरीता वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे व इतर कार्यवाहीसाठी अधिक कालावधी लागतो. त्यासाठी संस्थान मार्फत आर्किटेक्ट पॅनल तयार करुन विकास प्रकल्पाचे स्वरुपानुसार त्या-त्या क्षेत्रात काम करणा-या आर्किटेक्ट/ कन्सनल्टंट यांची नेमणूक केल्यास प्रकल्प लवकर हाती घेता येईल.

संस्थानमार्फत नियोजित प्रकल्पांसाठी खालील टप्प्यांप्रमाणे आर्किटेक्ट पॅनल तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | Class A - | For works above | - | Rs.50 Crores |
| 2) | Class B - | For works upto | - | Rs.50 Crores |
| 3) | Class C - | For works upto | - | Rs.05 Crores |
| 4) | Class D - | For works upto | - | Rs.50 Lakhs |

याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सिलबंद अर्ज सादर करण्याची अंतिम मूदत दि.०४/०५/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. सदरहू मूदतीत खालीलप्रमाणे ९० सिलबंद प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

| Sr.No | Name of Architect Firm |
|---|---|
| 1. | L. J. Purani and Associate, Ahmeadabad |
| 2. | Ratan J. Batliboi Consultant Pvt. Ltd., Mumbai |
| 3. | G. D. Sambhare & Co., Mumbai |
| 4. | Mitimitra Consultants Pvt. Ltd., Pune |
| 5. | Gian P. Mathur & Associates Pvt. Ltd., New Delhi. |
| 6. | D. O. Nikam, Pune |
| 7. | D. V. Joshi & Company, Mumbai |
| 8. | Deore Dhamne Architects, Nashik |
| 9. | Binesh Sukumar Architects & Planners, Kochi |
| 10. | Impact Design Group, Mumbai |
| 11. | Design Ideas, Mumbai |
| 12. | Ballal Engineering Pvt. Ltd., Mumbai |
| 13. | Archinova design inc., Thane |
| 14. | Archivista Engineering Pvt. Ltd., Pune |
| 15. | Dynamic Projects Pvt. Ltd., Kolkata |
| 16. | Flying Elephant Studio, Bangalore |
| 17. | Elements Architects, Mumbai |
| 18. | Chougule Architect's, Nashik |
| 19. | Kabre Consultant, Nashik |
| 20. | Architect Arvind Vaidya, Sangmner |
| 21. | Sachin Gandhi & Associates, Ahmedabad |
| 22. | Prashant Kulkarni & Associates, Pune |
| 23. | Aakar Abhinav Consultants Pvt. Ltd., Navi Mumbai |
| 24. | Sushil Deshmukh and Associates, Aurangabad |
| 25. | Avinash G. Kothawade, Nashik |
| 26. | Elegance Architects, Pune |
| 27. | Shristi Consulting Service, Faridabad |
| 28. | Sarayan Turnkey Solutions, Mumbai |
| 29. | Shirish Barve, Jalgaon |
| 30. | Dahad & Deo Associates, Jalgaon |
| 31. | CP & DS Associates, Gaziabad |
| 32. | Parelkar Ovalekar Parpia, Mumbai |
| 33. | Jayant Kolte Architects, Nashik |
| 34. | Kabre Chaudhari Architects, Nashik |
| 35. | Sai Project Consultant, Mumbai |
| 36. | Rupali & Vivek Javkhedkar Architects, Nashik |
| 37. | Vijay N.Nikam, Nashik |
| 38. | RT & Associates Private Ltd., Noida |
| 39. | Sandip Gurav & Asociates, Wai |
| 40. | Designer People, Nashik |
| 41. | Ajinkyatara Consultants architects & engineers, Nashik |
| 42. | Nirmaan Architects, Thane |
| 43. | Rugved Architectural Consultancy, Mumbai |
| 44. | Z axis, Architects & Designers, Pune |
| 45. | Om Sai Consultant, Ahmednagar |
| 46. | Archi Dimcnsions, Pune |
| 47. | Practice Architects, Navi Mumbai |

| | |
|---|---|
| 48. | Saif Ahmed G. Sayyad, Sangamner |
| 49. | JK Architects & Associates, Shirdi |
| 50. | Swapnil Chavan & Associates, Satara |
| 51. | Dhruvtara Consultants, Ahmednagar |
| 52. | Ar. Archana Deshmukh, Pune |
| 53. | Metadesign India Pvt. Ltd., Mumbai |
| 54. | GOMA Engineering & Consultancy, Ahmedabad |
| 55. | Ar. Kaanchan M. Patil, Space Makers, Sangali |
| 56. | Jaju-Kabra & Associates, Sangamner |
| 57. | Mukesh Sharma & Associates, Aurangabad |
| 58. | Space Consultancy, Sakuri Tal. Rahata |
| 59. | Ar. Ravikiran Dake, Vasturachana, Kopargaon |
| 60. | Archineers, Nashik |
| 61. | PD Archtect, Hingoli |
| 62. | Jeetendra Kharote Assocate, Nashik |
| 63. | Infra Consults, Mumbai |
| 64. | Sangeeta V. Jhanwar, Nashik |
| 65. | axii design consultants pvt.ltd., Pune |
| 66. | Vipul Nikam, Architects & Planning Consultants, Pune |
| 67. | Planwell Architects, Mumbai |
| 68. | LPFLEX Sign Systems India Pvt. Ltd., Chennai |
| 69. | Ramesh Edwankar Associates, Mumbai |
| 70. | Supreme Engicons (India) Pvt. Ltd., Mumbai |
| 71. | Environs, Pune |
| 72. | Ujjval Fadia, Ahmedabad |
| 73. | Ajay Kale Architects & Interior Designers Pvt. Ltd., Pune |
| 74. | Rohit Shinkre Architects, Mumbai |
| 75. | Niteen Parulekar Architects Pvt. Ltd., Mumbai |
| 76. | Pravinkumar R. Malpani, Nashik |
| 77. | Virtus Project Consultants, Sangamner |
| 78. | Vivek Dixit, Pune |
| 79. | Bhutada Consultants, Shrirampur |
| 80. | Tare and Associates, Nashik |
| 81. | Sthapati, Planners & Developers Pvt. Ltd., Aurangabad |
| 82. | Kishor Patil & Associates, Nashik |
| 83. | Kaushal Karkhanis & Associates, Nashik |
| 84. | Design Consultants Architects, Kothrud pune |
| 85. | S.D.I. Consultants, Pune |
| 86. | Shirish Dasnurkar & Associates, Pune |
| 87. | H.M. Kadam and Associates, Pune |
| 88. | Area Consultants, Pune |
| 89. | Precision Precast Solutions Pvt. Ltd. , Pune |
| 90. | Aakar Design Consultance Pvt. Ltd. Gurgaon |

दि.०४/०५/२०१७ पर्यंतचे प्रस्ताव जमा करण्याचे अंतिम मूदतीतनंतर खालील १३ आर्किटेक्ट संस्थांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. दि.०६/०५/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत झालेल्या चर्चेनुसार उशिरांने प्राप्त झालेले खालील प्रस्ताव गृहीत धरण्यात आलेले नाहीत.

| Sr.No | Name of Architect Firm |
|---|---|
| 1 | Vitan, Ahmedabad |
| 2 | Consulting Development Services, Kolkata |
| 3 | Vishwanath & Associates, Bangalore |
| 4 | Associated Architects, Pune |
| 5 | Group Phi Architects & Designers, Pune |
| 6 | Space Matrix, Bangalore |
| 7 | Ishita Architect Consultants, Indore |
| 8 | Architect Hafeez Contractor, Mumbai |
| 9 | Rudrabhishek Enterprises Pvt. Ltd., UP |
| 10 | Collage Design, Mumbai |
| 11 | Land Mark Design Group, Pune |
| 12 | Space Ace, Gurgaon, Haryana |
| 13 | Satya Architects, Gurgaon |

**प्रस्ताव–** वर नमूद केलेप्रमाणे आर्किटेक्ट संस्था तसेच व्यक्ती यांचेकडून एकूण १०३ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी ९० प्रस्ताव विहित मूदतीत प्राप्त झालेले असून १३ प्रस्ताव विहीत मूदतीनंतर उशिराने प्राप्त झाले आहेत. प्रस्तावातील अटींमध्ये मूदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत, असे स्पष्ट नमूद आहेत. त्यामुळे सदर उशिराने प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारता येणार नाहीत.

तसेच महाराष्ट्र शासन, सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रसीएटी २०१७/ प्र.क्र८/ इमा-२ दिनांक १२ एप्रिल, २०१७ मध्ये विविध सल्लागारांच्या कामाच्या जाहिराती काढतांना यासर्व निविदा सूचनांमध्ये Empanel न झालेल्या सल्लागारांनाही निविदा प्रक्रीयेत भाग घेता येईल अशी तरतूद करावी, असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे वरिलप्रमाणे आर्किटेक्ट पॅनेल स्थापन करणे उपयुक्त होणार नाही असे मत आहे. तरी त्यासाठी सदर आर्किटेक्ट पॅनेल नेमणुकीची प्रक्रिया रद्द करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सार्वजनीक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रसीएटी २०१७/ प्र.क्र८/ इमा-२, दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजीच्या शासन निर्णय विचारात घेता, उपरोक्त आर्किटेक्ट पॅनेल नेमणुकीची प्रक्रिया रद्द करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.४२** **नियोजीत शैक्षणिक संकुलाच्या बांधकामासाठी जागा निश्चित करणे व संबंधीत आर्किटेक्टचे सादरीकरण.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय-**

**१)** मा. त्रिसदस्य समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९४१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच, सदरहु कामी या क्षेत्रातील नामांकित व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले."

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६४ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे वरिष्ठ महाविद्यालय (Senior College) सुरु करणेकरीता जागा निश्चित करणेत यावी व त्यानंतर वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेसाठी शासनास काय आवश्यक आहे, यासह सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच तोपर्यंत शासनाचे बृहद आराखड्यामध्ये नोंद होणेसाठी ऑनलाईन अर्ज करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

३) मा. त्रिसदस्य समितीचे दि.२६/०४/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५३१ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी असे ठरले "

४) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१२ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान संचलित सध्याची शैक्षणिक संकुले तसेच भविष्यामध्ये नियोजित शैक्षणिक संकूलांची एकाच ठिकाणी उभारणी करणेत यावी, असे समितीचे मत झाले. सबब सदरहु प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले."

**प्रस्तावना-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे पुढीलप्रमाणे शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. १)श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, शिर्डी २)श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी ३)श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी ४)श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यापैकी इंग्लिश मेडीयम, कन्या विद्या मंदीर व औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्या इमारती शिर्डी सर्व्हे नं. १०८, १०९ मधिल संस्थान मालकीचे जागेत आहेत. परंतु कनिष्ठ महाविद्यालयाला कायमस्वरूपी इमारत उपलब्ध नसल्याने त्याचे वर्ग सध्या मौजे निमगांव को-हाळे गट नं. १७२ मधील साईआश्रम भाग-२ चे एका इमारतीत भरविण्यात येत आहेत. तसेच सध्याचे शैक्षणिक संकुलातही वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे वर्गांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे इंग्लिश मेडीअम स्कुलचे वर्ग दोन सत्रात भरवावे लागत आहेत. या बाबींचा विचार करून संस्थान संचलित सर्व शैक्षणिक संस्थांकरीता एकाच ठिकाणी कायम स्वरूपी असे अद्ययावत शैक्षणिक संकूल उभारणेसाठी प्रस्ताव सादर करावा अशी सूचना तात्कालीनमा.अध्यक्ष व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दिल्याहोत्या. तसेच याकरिता जागा निश्चित करणेसाठी मा. अध्यक्ष, मा. सदस्य तथा- जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी यांनी निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनींची पाहणी केली. सदर पाहणी दरम्यान मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. १८३ मधील जागा नियोजित शैक्षणिक संकुलासाठी निश्चित करणेत यावी असे ठरले होते.

मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता येथिल संस्थान मालकीचे गट नं. १८३ मधील जागेचे क्षेत्र ५ हेक्टर ४० आर इतके आहे. या जागेत संस्थानच्या वरील सर्व शैक्षणिक संस्थांकरीता, वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, सांस्कृतिक हॉल, क्रिडांगण, वाहनतळ इत्यादी पायाभूत सोयी-सुविधा अंतर्भूत असलेल्या नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९४१ अन्वये याकामासाठी सदरक्षेत्रातील नामांकीत व अनुभवी अशा आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावी असे ठरले.त्यानुसार आर्किटेक्ट डी. ओ. निकम यांना संस्थान जा.क्र.५३५८/२०१४ दि.२४/०२/२०१४ अन्वये विषयांकित प्रकल्पासाठी प्राथमिक नकाशे तयार करून, सदर प्रकल्पासाठी त्यांचे फीचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले होते.

याबाबत दिनांक ०१/०३/२०१४ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांचे उपस्थितीत मौजे निमगांव को-हाळे ता. राहाता येथील संस्थानचे गट नंबर १८३ मधील जागेत शैक्षणिक संकुलाचे बांधकाम करणेबाबत बैठक आयोजित केली होती. त्यावेळी चारही शैक्षणिक संस्थेच्या प्राचार्यांनी नियोजित प्रकल्पाबाबत त्यांच्या गरजां विषयी माहिती दिली. त्यानुसार आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांनी सदरहू प्रकल्पासाठी प्राथमिक संकल्पन आराखडे तयार केले असून त्याचे दि.२६/०६/२०१४ रोजीचे त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादरीकरण केले. यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Particular | Junior College | Saibaba English medium School | Saibaba KanyaVidyaMandir |
|---|---|---|---|---|
| 01. | Class Rooms | 30 | 77 | 30 |
| 02. | Office Cabin/Staff Room | 07 | 08 | 07 |
| 03. | Sports/Music Room | --- | --- | 02 |
| 04. | Store Room | 08 | 10 | 08 |
| 05. | Indoor Play Area/ Multipurpose Hall/ Gymnasium/ Workshop/ Cultural/Conference Hall | 06 | 09 | 05 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 06. | Lab/Library/Examination Center/<br>Drawing Hall | 07 | 16 | 07 |
| 07. | Her Toilet Block | 04 | 10 | 08 |
| 08. | His Toilet Block | 04 | 10 | --- |
| 09. | Proposed built up area in sq.mtr. | 11860.12 | 25442.05 | 11860.12 |

याशिवाय जिमखान्यासाठी स्वतंत्र इमारत प्रस्तावीत आहे. यामध्ये स्विमिंग टॅंक (मिनी ऑलिपींक) बॅडमिंटन हॉल, ऑडीटोरीअम, जिम्नॅशिअम, टेबल टेनीस हॉल, कॅरम रुम, पूल रुम, सेस रुम, इ. समाविष्ट असतील.सदरहू सभेतील निर्णय क्र. ५३१ अन्वये प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केलेप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

त्यानुसार याकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मान्यतेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेत आला होता. सदर अर्जावर दि.०४/१२/२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

PER COURT:-

1) Vide the present application, the applicant committee is seeking permission to take appropriate decision with regard to construction of educational complex in survey no.183 situated at NimgoanKorhaleTq. Rahata and for that purpose, permit the committee to spend necessary amount required for the purpose of construction of educational complex.

2) We have heard the learned counsel for the respective parties.

3) Firstly, the committee will have to arrive at a conclusion about the expenditure that is required for the same. At present, we allow the applicant committee to take appropriate decision with regard to construction of an educational complex in survey no.183 situated at Nimgaon-Korhale. If the same is permissible as per plan and as per rules and regulations of the Grampanchayat, then the applicant shall seek necessary permission of appropriate authority, prepare lay out plan of the construction, thereafter appoint architecture and also the approximate expenditure that would be required and before proceeding with any work shall seek permission of this Court with regard to expenditure to be made.

4) Civil application is disposed of.

मौजे निमगाव को-हाळे येथील भूसंपादनाने मिळालेल्या शेती महामंडळाच्या जमिनी (४५ हे. ६४ आर) या प्रादेशिक विकास योजनेत हरीत विभागात दर्शविलेल्या असल्याने त्या रहिवास विभागात समाविष्ट करणेकामी मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि२४/०१/२००८ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर जमिनीपैकी गट नं.१७२,१८३ व १८६ या जमिनी दि.२१/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये ना विकास विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेत आले आहे.

दरम्यान नव्याने बिरेगांव शिवारातील मंजूर विकास आराखडयातील संस्थान शैक्षणिक संकुलाकरीता ६ हे. ५५ आर. आरक्षीत आहे. या क्षेत्रापैकी आरक्षण नं.२२, सर्व्हे नं.२१२ पैकी व २१३ पैकी श्री.पतिंगराव शेळके, श्री.साहेबराव शेळके व श्री.बाजीराव शेळके यांचे मालकीची २ हे. १७ आर जमिन संस्थानने खरेदी केलेली आहे.

नियोजीत शैक्षणिक संकूलाचे एकुण प्रस्तावित बांधकाम क्षेत्रफळ ५२१७३ चौ.मी इतके आहे. यात श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा ज्यु. कॉलेज व जिमखाना इमारतींची समावेश असेल. इमारतीचे बांधकाम, विदयुतीकरण, फर्निचर, रस्ते, लॅण्डस्केप व आर्किटेक्ट फी यासह प्रकल्पाकरीता प्राथिमक ढोबळ अंदाजानुसार रक्कम रू.१२९ कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे जमिनीत शैक्षिणीक संकुल उभारणेसाठी येणा-या खर्चास व या प्रकल्पासाठी आर्किटेक्चरल सेवा घेणेकरीता आर्किटेक्ट डि.ओ. निकम, पुणे यांची नेमणूक करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील वर नमूद निर्णय क्र.७१२ अन्वये संस्थान संचालित सध्याची शैक्षिणिक संकुले तसेच भविष्यामध्ये नियोजीत शैक्षणिक संकुलांची एकाच ठिकाणी उभारणी करण्यात यावी, असे समितीचे मत आहे. त्यामुळे सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा असा निर्णय झाला आहे.

**प्रस्ताव –**शिर्डी विकास योजना आरक्षण क्र.२२ अन्वयेसंस्थान शैक्षणिक संकुलाकरीता आरक्षित ६ हेक्टर ५५ आर क्षेत्रापैकी संस्थानने २ हेक्टर १७ आर जमिन खरेदी केली आहे. सदरहु जागेत नियोजित शैक्षिणक संकुलाचे बांधकाम करावयाचे झाल्यास उर्वरीत आरक्षित क्षेत्र खरेदी/ भुसंपादनाचे माध्यमातुन घ्यावे लागेल.त्यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे.

तरी श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं. १८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत करणेसाठी मान्यता मिळणेस तसेच आर्किटेक्ट डी. ओ. निकम, पुणे यांचेमार्फत सदर प्रकल्पाच्या आराखड्यांचे सादरीकरण पाहून निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९५५ **संस्थानसाठी नवीन अद्ययावत शैक्षणिक संकुलाची उभारणी करणेकामीचे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे हे आजचे सभेत सादरीकरण सादर करणेसाठी उपस्थित होते. सभेने सादरीकरणाच्या हार्ड कॉपीज पाहिल्या व या शैक्षणिक संकुलामध्ये वरीष्ठ महाविद्यालयाचा समावेश करणेत यावा, ऑडीटोरीयम हॉल प्रवेशद्वाराशेजारी घेण्यात यावा व तो एक हजार क्षमतेचा असावा व सर्व प्रकारच्या खेळांची मैदाने तयार करणेत यावीत, तसेच आवश्यक वाढीव FSI शासनाकडून मंजूर करुन घ्यावा, अशा सुचना केल्या.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे गट नं. १८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत संस्थानसाठी नवीन अद्ययावत शैक्षणिक संकुलाची उभारणी करणेत यावी. तसेच या शैक्षणिक संकुलाची उभारणी करणेकामीचे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांना समक्ष देण्यात आलेल्या सुचनांचा अंतर्भाव करुन, सादरीकरणाची सॉफ्ट कॉपी सर्व समिती सदस्यांना पाठविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.४३ मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद–** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय–** मा. व्यवस्थापन समीतीचे दि.२८/०४/२०१७रोजीचे सभेतील नि. क्र.२७९.

**प्रस्तावना –** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी केलेल्या करारनाम्यानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ० ६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिलॲप्लिकेशन दाखल केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे.

याप्रकरणी तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तीमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तीची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी." असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी दि.१९/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

This is with reference to the captioned Agreement executed between us in respect of the proposed Saibaba Multimedia Theme Park, our letter dated 3rd March 2017 addressed to your Trust regarding termination of the said Agreement and your letter dated 11th April 2017 in this regard.

As mentioned earlier, the Shri Saibaba Sansthan Trust (Trust) has failed inter alia to make payments due to us under the Agreement from a period as long as November 2012, amounting to a failure by the Trust in complying with their obligations under the Agreement. Moreover, even after having been notified of its default, the Trust failed to remedy its default and / or breach in the manner provided in the Agreement.

Without prejudice to the above, the alleged impediment for non-payment of our dues, cited in your letter dated 11th April 2017 and not admitted by us, was never notified to us promptly at the appropriate time. In fact, the Trust should clearly have been aware of any such alleged deficiency and/ or defects in its authority and/ or powers and/ or capacity at the time of engaging our services under the Agreement and consequently has also committed breach of warranty given under the Agreement.

In light of the above and particularly the Trust's failure to remedy its long-standing default, the Agreement stands terminated by virtue of the provision of Clause 25.2 of the Agreement reproduced herein below:

**"Termination of the Agreement:**

25.2 If either party fail to comply with the obligations set out in this Agreement and fails to remedy that failure within 20 Business Days of receiving written notice from the other party to do so, the party not failing to comply with its obligations under this Agreement may suspend Works or terminate this Agreement by written notice to the other party without prejudice to any other rights of action or remedies it may have under this Agreement."

Without prejudice to the above, Laservision Limited reserves all its rights, claims, demands and/ or remedies in law that may be available to them against the Trust and nothing contained herein above should be deemed a waiver thereof.

**प्रस्ताव :** तरी मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे उपरोक्त टर्मिनेशन पत्राबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील तज्ञ वकिलामार्फत याबाबत सल्ला मागविणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.४४** **मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे.

याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

"The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.
2. We would like toknow the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017."

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

*".. मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा याचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.*

*तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी."* असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला आहे. मा. व्यवस्थापन समितीच्या उपरोक्त निर्णयाबाबत मा. उच्च न्यायालयास अवगत करावे लागणार आहे.

मे. लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी दि.१९/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

This is with reference to the captioned Agreement executed between us in respect of the proposed Saibaba Multimedia Theme Park, our letter dated 3rd March 2017 addressed to your Trust regarding termination of the said Agreement and your letter dated 11th April 2017 in this regard.

As mentioned earlier, the Shri Saibaba Sansthan Trust (Trust) has failed inter alia to make payments due to us under the Agreement from a period as long as November 2012, amounting to a failure by the Trust in complying with their obligations under the Agreement. Moreover, even after having been notified of its default, the Trust failed to remedy its default and / or breach in the manner provided in the Agreement.

Without prejudice to the above, the alleged impediment for non-payment of our dues, cited in your letter dated 11th April 2017 and not admitted by us, was never notified to us promptly at the appropriate time. In fact, the Trust should clearly have been aware of any such alleged deficiency and/ or defects in its authority and/ or powers and/ or capacity at the time of engaging our services under the Agreement and consequently has also committed breach of warranty given under the Agreement.

In light of the above and particularly the Trust's failure to remedy its long-standing default, the Agreement stands terminated by virtue of the provision of Clause 25.2 of the Agreement reproduced herein below:

**"Termination of the Agreement:**

25.2 If either party fail to comply with the obligations set out in this Agreement and fails to remedy that failure within 20 Business Days of receiving written notice from the other party to do so, the party not failing to comply with its obligations under this Agreement may suspend Works or terminate this Agreement by written notice to the other party without prejudice to any other rights of action or remedies it may have under this Agreement."

Without prejudice to the above, Laservision Limited reserves all its rights, claims, demands and/ or remedies in law that may be available to them against the Trust and nothing contained herein above should be deemed a waiver thereof.

लेजर व्हिजन लि., यांचेशी दि.१२/०५/२०११ रोजी केलेल्या करारामधील अट क्र.३१- Mediation Followed by Arbitration (International) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

31.1 A party claiming that a dispute has arisen must give written notice to the other parties within 10 business Days specifying the nature of the dispute.

31.2 On receipt of the notice specified, the parties to the dispute must within 30 Businesss Days of receipt must seek to resolve the dispute.

31.3 In the event of a dispute between Laservision and the Trust, the parties agree to first make every attempt to settle the matter by mediation. An independent and impartial mediator will be selected by agreement of both parties.

31.4 For the purpose of this Agreement and to avoid any misunderstanding between the parties, the parties agree to equally share all costs relating to the assistance provided by an independent mediator.

31.5 The language to be used in the arbitration, if it was to occur, will be English.

31.6 If the parties are unable to resolve the dispute through mediation then the matter may proceed to Arbitration.

31.7 In the occurrence of arbitration, for the avoidance of doubt, the High Court of Mumbai will be considered to have unilateral jurisdiction.

लेजर व्हिजन लि., यांचे आलेले उपरोक्त पत्र मा. समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांना जा.नं.२११९/२०१७ दि.१९/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये माहितीस्तव पाठविणेत आले आहेत. सदरहू प्रस्तुत प्रकरणी मार्गदर्शन मिळणेकामी मा. विश्वस्त, मोहन जयकर यांना जा.नं.२१६२/२०१७ दि.२१/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

दि.०५/०८/२०१७ रोजी संस्थान पॅनल वरील ॲड. श्री. भवर यांची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समवेत झालेले चर्चेमध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार मे. लेजर व्हिजन लि., यांचेवर Arbitration कार्यवाही सुरु करणेबाबत निर्देश दिले आहेत. तरी प्रस्तुत प्रकरणीसंस्थानचे विधी विभागामार्फत ॲड. श्री. भवर यांचे सल्ल्याने Arbitrator ची नेमणूक करुन Arbitration बाबतची पुढीलकार्यवाही करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेपुर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲडरमेश सोनी यांना चर्चेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.४५** **साईभक्तांच्या सुविधेसाठी असलेल्या सर्व निवासस्थानांच्या "निवासस्थान वितरण" नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असुन त्यात अनेक प्रकारचे साईभक्त दर्शनासाठी येत असतात. अशा सर्व साईभक्तांची निवासव्यवस्थासंस्थान अधिनस्त विविध भक्तनिवास विभागामध्ये करण्यात येते.

परंतु असे निर्दशनास आले आहे की, निवासव्यवस्था करतांना निवासव्यवस्थेचे नियमांना प्रशासकिय मान्यता नसल्याने सुरक्षेच्या दृष्टीने निवासव्यवस्था नाकारलेले बरेच भक्त वाद उपस्थित करतात. म्हणून साईभक्तांची निवासव्यवस्थाकरतांना येणा-या अडचणी व प्रशासकिय कामकाज जलद गतीने होणेकामी,तसेच भक्तांना सुरक्षित सेवा देण्याच्या दृष्टीने दि.१५/०५/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला असुन त्यावर,

"सर्व निवासस्थानांसाठी रुम देणेसंदर्भात सविस्तर नियमावली तयार करुन त्यास व्य.स. ची मान्यता घ्यावी" असे निर्देश देण्यात आले. त्यानुसारजा.नं.एसएसएस/साईआश्रम भक्तनिवास/१४०९/२०१७ दि.१९/०६/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये संस्थान अधिनस्त सर्व निवासस्थान विभागांना सविस्तर नियमावली तयार करणेकामी आप-आपले विभागातील निवासव्यवस्थेसंबंधी आवश्यक ते सर्व नियम इकडील विभागास कळविणेबाबत सुचित करण्यात आले.

**प्रस्तावः-** सर्व निवासस्थान विभागांचे अभिप्राय घेऊन साईभक्तांना सुरक्षित निवासव्यवस्था देण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक अशी सविस्तर नियमावली तयार करण्यात आली असुन ती पुढील प्रमाणे.

**साईभक्तांसाठी निवासव्यवस्थेची नियमावलीः- (Accommodation rules for sai Devotees)**

१) कृपया स्पॉट बुकींग करतांना हॉल/खोलीमागणी फॉर्ममध्ये सर्व सदस्यांची नावे, नाते, वय, इ.अचुक माहीती नमुद करुन सर्वांचे ओळखपत्र जसे पॅनकार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन, इत्यादी शासकीय ओळखपत्र असणे गरजेचे आहे. तसेच सदर माहीती चुकीची किंवा खोटी आढळल्यास खोली त्वरीत खाली करुन घेण्यात येईल.

- While doing current booking please, fill upthe right information of all members (name, relation, age, etc.) and submit all members I.D cardslike pan card, aadhar card, driving licence etc. If the above information is not correct or true the room will be immediately vacated.

२) साईभक्तांसाठी उपलब्धतेनुसार कमीत कमी २४ तासांकरीता व जास्तीत जास्त ४८ तासांकरीता हॉल/खोलीदिली जाते.

- Hall/ Room will be allotted for minimum 24 hours and maximum 48 hours.

३) संस्थान निवासस्थानांमध्ये एक किंवा दोन व्यक्तींसाठी (पुरुष अगर स्त्रीया) खोली देणेत येणार नाही. त्यांचेसाठी साईबाबा भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागात हॉलची सुविधा उपलब्ध आहे.

- Rooms will not be allottedfor one or two persons. (Male or female). In such caseshallfacility is madein Saibaba Bhaktaniwas and Saidharmshala department.

४) एक पुरुष व एक स्त्री असल्यास दोघांचे ओळखपत्र तपासुन त्यांच्या नात्यामधील खात्री पटल्याशिवाय संस्थान निवासस्थानांमध्ये खोलीदेणेत येणार नाही.

- Rooms will be allotted only, if identity of male and female is matched as only family members.

५) संस्थान निवासस्थानांचा सेवा आकार, सेवा आकार पावतीवर दिलेल्या वेळेप्रमाणे आकारला जातो. त्यात कोणताही बदल ग्राह्य धरला जात नाही. पावतीवरील संगणकीय वेळ भक्तास बंधनकारक राहील.

- Sanitation and other charges will be charged as per the time slot written on the receipt. The service charges of the room are fixed as per the time duration mentioned on the receipt. No changes will be made thereafter on any grounds.

६) संस्थान निवासस्थानांमधील हॉल/खोली मध्ये अथवा बाहेर आपल्या मौल्यवान वस्तु, रोख रक्कम, मोबाईल इ. वस्तुस्वतःच्याजबाबदारीवर सांभाळाव्यात.

- In your room and outside keep your valuable articles, cash, mobile etc. at your own risk.

७) पावतीवर दिलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे साई भक्तांनी वेळेत खोली खाली करुन, रुमची चावी माळ्यावरील मदतनिसाच्या ताब्यात द्यावी. अन्यथा दुस-या दिवसाचा सेवाआकार भरावा लागेल. याबाबत कोणीतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही.

- Devotees are requested to vacate the room at particular time as mentioned on the receipt and handover the keys to the floor attendant. Otherwise service charges for the next day will be charged.

८) खोलीमध्ये काही गैरप्रकार आढळून आल्यास खोली ताबडतोब खाली करुन घेणेत येईल.

- If any kind of abuse or misrule is found in a room, room will be immediately vacated.

९) ऑनलाईनव्दारे रुम बुकींग असलेल्या साईभक्तांना उपलब्धतेनुसार अदा करण्यात आलेल्या सेवा आकारात चेक-ईन वेळेच्याअगोदर जास्तीत जास्त ३ तास खोली दिली जाईल.

- For online booking, Rooms will be allotted maximum three hours before of booking, only on availability basis.

१०) स्पॉट बुकींगसाठी साईभक्तांना ऑनलाईन बुकींग व availability यांचा विचार करुन उपलब्धतेनुसार "फस्टकम टु फस्टसर्व" या नियमानुसारखोली दिली जाईल.

- In case of spot booking,ifrooms are available, they will be allotted by "first come to first serve" basis.

११) खोली वाटप संदर्भात काही वादातील प्रसंग उपस्थित झालेस निवासस्थान प्रशासकिय अधिकारी/ प्र.अधिक्षक यांचा निर्णय अंतिम राहील.

- The decision of the Administrative Officer/Superintendent will be final for some issues related to the allocation.

१२) खोलीमध्ये फर्निचर, पलंग, गादी, उशी, बेडशीट, इत्यादी वस्तु खराब करु नयेत अथवा फाडु नयेत, तसेच खोलीच्याभिंती स्वच्छ ठेवाव्यात त्यावर लिहू नये. या वस्तूंचे नुकसान झालेले आढळल्यास त्वरीत नुकसान भरपाई भरुन घेतली जाईल व ताबडतोब खोली खाली करुन घेतली जाईल.

- Please do not misuse the furniture availed in the room, do not scribble anything on the walls. In case of damages/loss, a fine will be charged from the occupants and the room will have to vacate immediately.

१३) खोलीमध्ये मद्यपान/ मादक पदार्थाचे सेवन करण्यास सक्त मनाई आहे. तसेच पान, सिगरेट, गुटखा, तंबाखु, इ. खाऊन खोलीमध्ये अथवा संस्थान परिसरात थुंकल्यास दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

- Drinking, Smoking, and Chewing of tobacco or Gutkha is strictly prohibited inside the room as well as in Sansthan premises.

१४) भक्ताने खोली/ हॉल दोन दिवसांचा सेवाआकार भरुन घेतल्या नंतर जर कमीत कमी वेळ खोलीचा वापर केला आणि काही कारणास्तव एकाच दिवसात खोली खाली केली तर आकारणी केलेली सेवा आकाराची रक्कम कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

- No service charges (Amount paid) will be returned on any grounds in case even if the room is vacated prior to the fixed schedule.

१५) रुम मधील गरम पाण्याची वेळ पहाटे ३.०० ते गरम पाणी उपलब्ध असेपर्यंत असेल.

- Hot water time will be 3.00a.m.to till hot water is available.

१६) साईभक्तांच्या काही सुचना/तक्रार असल्यासsaibaba@sai.org.in/support@sai.org.in. दुरध्वनी क्र- ०२४२३-२५८९५६/ २५८९६३,मोबा-७७२००७७२०३ यावर संपर्क साधावा.

- Sai devoteeshave any suggestion/complaint regarding this please contact the following address- saibaba@sai.org.in/support@sai.org.in. Telephone- ०२४२३-२५८९५६/ २५८९६३, Mobile- ७७२००७७२०३.

विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः- सदर नियमावली साईभक्त व संस्थानचे सुरक्षिततेच्यादृष्टीकोनातुन महत्वपुर्ण असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर, सदर नियमावली माहीती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थान संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन, साईभक्तांचे माहीतीसाठी बांधकाम विभागामार्फत योग्य त्याआकाराचे फ्लेक्स बोर्ड बनवुन ते सर्व निवासस्थानांमध्ये दर्शनी भागात लावता येतील.

करीता उपरोक्त प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुविधेसाठी असलेल्या सर्व निवासस्थानांच्या प्रस्तावित "निवासस्थान वितरण" नियमावलीचे अवलोकन करणेत आले व त्यामधील अट क्र.३ मध्ये एका व्यक्तीस खोली देता येणार नाही, अशी सुधारणा करणेत येऊन, सदरहू नियमावली अंतीम करणेत आली. तसेच अंतीम करण्यात आलेली "निवासस्थान वितरण" नियमावली साईभक्तांच्या माहितीसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व फ्लेक्स बोर्ड तयार करुन ते सर्व निवासस्थानांमध्ये दर्शनी भागात लावण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.४६** **श्री.सुधीर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना संस्थान हेलिपॅड वापरास परवानगी देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६.

**प्रस्ताविक –** श्री.सुधिर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांनी त्यांचे दिनांक २३.०९.२०१७ चे पत्रात, "आम्ही आपणास कळवू इच्छितो की, पुणे येथील मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चरकडे रॉबिन आर-६६ हे हेलिकॉप्टर आहे. सदरचे हेलिकॉप्टर आम्ही संस्थानच्या साईभक्तांना जॉयराईड सुविधा देणेसाठी शिर्डीला पाठवत आहे. सदरची सुविधा दिनांक २८.०९.२०१७ ते ३०.०९.२०१७ या कालावधीत सुरु करणेचा आमचा विचार आहे. तरी आम्हास संस्थानचे हेलिपॅड वापरास परवानगी मिळावी तसेच हेलिपॅडवर फायर फायटर व ॲम्ब्युलन्सची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी. " असे कळविलेले आहे. तर त्यांचे दिनांक ०३.१०.२०१७ रोजीचे पत्रात, "वरील विषयास अनुसरुन आम्ही आपणाकडे विनंतीपूर्वक अर्ज करतो की, शिर्डी साईबाबा संस्थान येथील हेलिपॅड वुरन दि.१२ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान साई भक्तांना हेलिकॉप्टर मधून हवाई सफर घडवून आणण्याचा कंपनीचा मानस आहे. तरी त्यासाठी दिवसातून ५ तास हेलिपॅड वापर होणार आहे. तसेच सदर हेलिपॅडवर अग्निशामक वाहन व ॲम्ब्युलंस उपलब्ध करुन सहकार्य करावे, ही विनंती." असे कळविले आहे.

श्री.मांडके यांनी त्यांचे पत्रात शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना जॉयराईड/हवाई सफर सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थानचे हेलिपॅड वापरास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ मध्ये संस्थान मालकीच्या हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करुन देणेत यावा असा निर्णय झालेला

आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६ अन्वये संस्थानचे हेलिपॅड वापर आकार रुपये २०००/- ऐवजी रुपये ५०००/- व अॅब्युलन्ससाठी प्रति तास रुपये १०००/- ऐवजी रुपये १५००/- आणि नाईट हॉल्टसाठी हेलिपॅड वापर आकार रुपये ५०००/- अधिक रुपये २०००/- असा एकूण रुपये ७०००/- इतका आकार आकारण्यात यावा असे असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २३.०३.२०१५ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच हेलीपॅडवर संरक्षणाचे दृष्टीने संरक्षण विभागामार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने हेलीकॉप्टार कंपन्याच्या मागणीनुसार व संस्थानच्या उपलब्धतेनुसार विविध खाजगी कंपन्या/व्यक्तींना संस्थान हेलीपॅड वापरास परवानगी देण्यात येते. जनसंपर्क विभागामार्फत हेलीकॉप्टर लॅण्डींगची कार्यवाही दिनांक ०१.१०.२००८ पासून सुरु करण्यात आलेली असून माहे.जानेवारी -२०१६ ते डिसेंबर – २०१६ या एक वर्षाचे कालावधीत संस्थान हेलिपॅडवर झालेल्या लॅण्डींगची माहिती पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | कालावधी | दिलेल्या परवानग्या | झालेले लॅण्डींग | प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी – २०१६ | १० | ०७ | ३५,०००/- |
| २ | फेब्रुवारी – २०१६ | ०७ | ०५ | २७,०००/- |
| ३ | मार्च – २०१६ | ०५ | ०३ | १५,०००/- |
| ४ | एप्रिल – २०१६ | ११ | ०४ | २२,०००/- |
| ५ | मे – २०१६ | १२ | ०६ | ३०,०००/- |
| ६ | जून – २०१६ | ०० | ०० | -- |
| ७ | जुलै – २०१६ | ०० | ०० | -- |
| ८ | ऑगस्ट - २०१६ | ०२ | ०० | -- |
| ९ | सप्टेंबर – २०१६ | ०१ | ०१ | ५,०००/- |
| १० | ऑक्टोबर – २०१६ | ०५ | ०३ | १५,०००/- |
| ११ | नोव्हेंबर – २०१६ | ०९ | ०८ | ४६,०००/- |
| १२ | डिसेंबर – २०१६ | ०८ | ०६ | ३०,०००/- |
| **एकुण-** | | **७०** | **४३** | **२,२५,०००/-** |

माहे जानेवारी – २०१६ ते डीसेंबर – २०१६ या कलावधीत हेलीपॅड वापर आकार रुपये २,२५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पंचवीस हजार मात्र) इतके उत्पन्न संस्थानला या सेवेतून प्राप्त झाले आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५९ अन्वये संस्थान अग्नीशमन वाहन वापरासाठी पहिले तीन तास रुपये ४,०००/- त्यानंतर प्रती तास रुपये १,०००/- या प्रमाणे तसेच फोमचा, सि.ओ.टू. व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे दर आकारणी करण्यात यावी असा निर्णय झालेला असून त्यानुसार अॅम्ब्युलन्स व अग्नीशमन वाहन हेलिपॅडवर उपलब्ध करुन देणेबाबत वैद्यकीय संचालक व फायर अॅण्ड सेफ्टी विभागाचा अभिप्राय मागीतल असता त्यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

**<u>अ) वैद्यकीय संचालकः-</u>** मनुष्यबळाचा अभाव असल्याने श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाची अॅम्ब्युलन्स आठवडयातील ०३ दिवस संस्थान हेलिपॅडवर उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

**<u>ब) फायर अॅण्ड सेफ्टी विभागः-</u>** श्री साईबाबाच्या समाधीस १०० वर्षे पुर्ण होणार असल्याने संस्थानमार्फत दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव म्हणून साजरे केले जाणार आहे. सदर कालावधीत देशविदेशातून साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्याने संस्थानचे अग्नीशमन सेवा नियमित सज्ज ठेवणे आवश्यक आहे. तसेच शिर्डी विमानतळाकरीता संस्थानची अग्नीशमन सेवा दि.०१ ऑक्टोबर २०१७ पासून सहा महिने कालावधीकरीता सशुल्क देणेबाबत संस्थान व महाराष्ट्र विमान विकास लि., मुंबई यांचेमध्ये करारनामा करणेत आलेला आहे. त्यामुळे संस्थानचे फोम टेंडर शिर्डी विमानतळाकरीता पाठविणेत येणार आहे. संस्थानचे फोन टेंडर वाहन शिर्डी विमानतळाकरीता पाठविणेत येणार असल्याने संस्थानचे मिनी टेंडर वाहन संस्थान परिसरात घडणा-या घटनांकरीता सदैव सज्ज ठेवावे लागणार आहे. त्यामुळे श्री.सुधीर मांडके, पुणे यांनी जॉयराईडसाठी केलेल्या मागणीनुसार संस्थानची अग्नीशमन सेवा पुरविता येणार नाही.

**<u>क) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार व खालील अटी/ शर्तीस अधिन राहून श्री.सुधिर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना फक्त हेलीपॅड वापरास परवानगी देता येईल.</u>**

१. वैद्यकीय संचालक व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने ॲम्ब्युलन्स व फायर फायटर सेवा उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविल्यामुळे फक्त संस्थान नियमानुसार हेलिपॅड वापरास परवानगी देता येईल.

२. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी आवश्यक सर्व स्थानिक/शासकीय/निमशासकीय परवानग्या हेलीकॉप्टर कंपनीला घेणे बंधनकारक राहील.

३. लॅण्डींग रद्द करावयाचे असेल तर एक दिवस आधी तसे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना कळविणे आपणास बंधनकारक राहील.

४. हेलीकॉप्टर लॅण्डींग व टेक ऑफ करतांना अपघात होऊन जिवित हानी अथवा इतर प्रकारची कोणतीही हानी झाल्यास त्यास कंपनी जबाबदार राहील. याबाबत संस्थानची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

५. अति महत्वाचे व्ही.आय.पी.चे शिर्डी भेटीच्या दरम्यान अथवा आपत्कालीन परिस्थितीत सदर हेलीपॅडचा वापर करणे आवश्यक असेल त्यावेळेस लॅण्डींग रद्द किंवा वेळ बदलणे ही बाब कंपनीवर बंधनकारक राहील. तशी पुर्व सुचना संस्थान कंपनीस देईल.

६. प्रत्येक लॅण्डींगपुर्वी किमान दोन दिवस आगोदर जनसंपर्क विभागाकडे हेलीकॉप्टर लॅण्डींगबाबत फॅक्स पाठवून कळविणे, परवानगी घेणे हेलीकॉप्टार कंपनीस बंधनकारक राहील.

७. संरक्षण विभागामार्फत हेलीपॅडवर सुरक्षा रक्षकची नेमणूक करण्यात येते. याव्यतिरिक्त इतर वाढीव सुरक्षा व्यवस्था संबंधीत कंपनीने करावी.

८. आपले हेलिकॉप्टरला समाधी मंदिरावर घिरटया घालता येणार नाही, याबाबत पायलटला सुचना देण्याची जबाबदारी आपले कंपनीची राहील.

९. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी परवानगी देणे अथवा रद्द करणेबाबतचे सर्व अधिकारी संस्थान राखून ठेवत आहे.

श्री साईबाबा संस्थानचे हेलिपॅड वापरास विविध खाजगी कंपन्या/व्यक्ती नेहमीच मागणी करतात. तसेच सदरचे हेलिपॅडवर ब-याचवेळा मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.राष्ट्रपती, केंद्रीय मंत्री, विविध राज्याचे मंत्री आदि महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या मागणीनुसार हेलिपॅड वापरास आयत्यावेळी परवानगी द्यावी लागते. श्री.सुधिर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना इतर खाजगी कंपन्याप्रमाणे संस्थान नियमाप्रमाणे रुपये ५०००/- इतका हेलिपॅड वापर आकार आकारुन त्यांचे मागणीअंती व संस्थानच्या उपलब्धतेनुसार वेळोवेळी परवानगी देणे उचित होईल. श्री.मांडके यांनी रुग्णवाहीका व अग्नीशमनची मागणी केलेली आहे. याबाबत वैद्यकीय संचालक व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने ॲम्ब्युलन्स व फायर फायटर सेवा उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे. तेव्हा श्री.मांडके यांना फक्त संस्थान नियमानुसार हेलिपॅड वापरास परवानगी देता येईल असे मत आहे. तथापि यासर्व बाबींवर विचार होणेसाठी सदरच्या विषयास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे उचित होईल असे वाटते.

**विभागाची मागणी-** श्री.सुधिर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांसाठी जॉयराईड सेवा सुरु करणेसाठी संस्थानचे हेलिपॅड वापरणेस परवानगी देणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** श्री साईबाबा संस्थानचे हेलिपॅड वापरास विविध खाजगी कंपन्या/व्यक्ती नेहमीच मागणी करतात. तसेच सदरचे हेलिपॅडवर ब-याचवेळा मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.राष्ट्रपती, केंद्रीय मंत्री, विविध राज्याचे मंत्री आदि महत्वाच्या व्यक्तींच्या मागणीनुसार हेलिपॅड वापरास आयत्यावेळी परवानगी द्यावी लागते. तसेच संस्थानचे हेलिपॅडवर जॉयराईडसाठी आजतागायत कोणत्याही कंपनीला परवानगी दिलेली नाही. श्री.मांडके यांनी रुग्णवाहीका व अग्नीशमनची मागणी केलेली आहे. याबाबत वैद्यकीय संचालक व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाने ॲम्ब्युलन्स व फायर फायटर सेवा उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविले आहे. तेव्हा श्री.सुधिर मांडके, मांडके ॲण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना जॉयराईड/ हवाई सफरीसाठी संस्थानचे फक्त हेलिपॅड वापरास परवानगी देणेबाबत निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या शिर्डी येथील विमानतळ सुरु झालेले असून तेथे हवाई सेवेसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध आहेत, याकरीता श्री.सुधिर मांडके, मांडके अॅण्ड मांडके इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे यांना साईभक्तांसाठी शिर्डी येथे जॉयराईड सेवा सुरु करणेकामी शिर्डी विमानतळ यांचेशी संपर्क करणेबाबत कळविणेत यावे.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.४७** **सेवेच्या कालावधीत साईसेवक कै.प्रमोद उपाध्ये, रोहा, रायगड यांचा अकस्मित मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती मिनाक्षी प्रमोद उपाध्ये, मु.पो.ता.रोहा,जि.रायगड यांचा विनंती अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झाला असुन सदर अर्जात त्यांनी व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा, जि.रायगड यांच्यातर्फे दि. २४ सप्टेबर २०१७ ते ३० सप्टेबर २०१७ या कालावधीत २२ सेवेकरी श्री साई मंदीर,शिर्डी येथे सेवेसाठी आले होते. या सेवेक-यांना ४ दिवस प्रसादालय व ३ दिवस मंदीरातसेवा करण्याची संधी मिळाली होती. सर्व सेवेकरी दि.२९-०९-२०१७ रोजी पहाटे काकड आरतीसाठी मंदिरात येत असतांना श्री साईबाबांचे निस्सिमभक्त माझे पती कै. प्रमोद हरीभाऊ उपाध्ये हे प्रसादालयाच्या मागील बाजुस चक्कर येऊन पडले व त्यांचे आकस्मित निधन झाले. त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तांनी त्यांचे पार्थीव रोहा,रायगड मुक्कामी पोहोचविण्यासाठी अत्यंत मोलाची मदत केली. त्याबद्दल मी त्यांची कायम दिलगीर आहे.

माझ्या कुटुंबात माझे पती हेच कमवती व्यक्ती होते. आमच्या दोन्ही मुलांचे शिक्षण अजुन पुर्ण झालेले नाही. आणि दोन्ही मुले अभ्यासात मेहनत करुन चांगले गुण मिळवित आहे. आमची मुलगी कु.ऋतुजा ही एस.एस.सी. (१० वी) परीक्षेत ९७.४० टक्के गुण मिळवुन रायगड जिल्हयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तर तिने बी.एम.सी.सी. पुणे येथील ज्युनिअर कॉलेलमध्ये एच.एस.सी. ( १२ वी) परिक्षेत ९० टक्के गुण मिळविले आहेत. तसेच सी.पी.टी परिक्षेत २०० पैकी १५३ गुण मिळविले आहेत. हे सर्व शिकत असतांना ती स्वतः देखील मेहनत करतच होती. या पुढे तिची सी.ए करण्याची इच्छा आहे. परंतू पुण्यामध्ये सी.ए . चा खर्च रु.९०,०००/- प्रति वर्ष आहे. शिवाय राहण्याचाही खर्च आहेच.

आमचा मुलगा कु. वेदांत हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यालय, लोणेरे, ता.मानगाव जि.रायगड येथे डिप्लोमाच्या पहिल्या वर्षात शिक्षण घेत आहे. माझ्या पतीच्या अकस्मीत निधनामुळे माझ्यावर दोन्ही मुलांच्या शिक्षणाचा भार पडलेला आहे.

आमची दोन्ही मुले गुणवंत आणि मेहनती असल्यामुळे माझे दिवंगत पती प्रमोद हरीभाऊ उपाध्ये यांची दोन्ही मुलांचे शिक्षण पुर्ण करण्याची इच्छा होती. आता ती जबाबदारी माझ्यावर आली आहे. तरी मी आपणास विनंती करते की, श्री साई संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडून माझ्या मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षण पुर्ण होईपर्यंत आर्थिक मदत मिळावी.मी आपल्या विश्वस्थव्यवस्थेची कायम ऋणी राहील. असे नमूद आहे.

श्री साईबाबा यांच्या समाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्याने त्यांचे औचीत्य साधुन श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दिनांक १ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशीमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. तसेच श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीने श्री साईबाबा संस्थानमध्ये श्री क्षेत्र गजानन महाराज देवस्थान, शेगाव येथील सेवेक-यांच्या धर्तीवर साई पालखी मंडळाचे पदयात्री सभासद यांचे करीता, मोफत" साईसेवक" उपक्रम राबाविण्याचा निर्णय घेतलेला आहे. तरी सदर "साईसेवक"योजनेमध्ये २० पालखी सभासद मिळुन एक गट प्रमुख असे २१ साईसेवकांचा गट तयार करुन, त्यांना वर्षातुन ७ दिवस संस्थान परिसरात सदरचे योजने अंतर्गत विनामुल्य सेवा करण्याची संधी देण्यात येते.

दि.२४/०९/२०१७ ते दि. ३०/०९/२०१७ (७ दिवस) या कालावधीत साईसेवक म्हणुन सेवेसाठी आलेल्या श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगड यांनी ३ दिवस प्रसादालय विभाग येथे सेवा पूर्ण केली. त्यानंतर दि. २८/०९/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ याकालावधीत संरक्षण विभाग येथे दुपारी २ ते १० या कालावधीतश्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगड त्यांची सेवा होती. परंतु दि. २९/०९/२०१७ रोजी काकड आरती करणेकामी पहाटे ३.०० वाजता त्यांचे गटासोबत येत असतांना श्री प्रमोद हरीभाऊ उपाध्ये, साई सेवक, श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगड हे अचानक रस्त्यात मागे राहीले. त्यांचा रस्त्यात अकस्मीत मृत्यु झाला.

**विभागाचा अभिप्राय–** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील साई सेवक नियमावलीतील विषय नं. १०६ निर्णय क्र. ६२६ मधील साई सेवकांकरीता बनविण्यात आलेल्या **अ.नं. ३२** सेवेच्या कालावधीत घडलेल्या कोणत्याही कृतीसाठी, घटनेसाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई संस्थानकडे मागता येणार नाही. तसेच अ.नं. ३६ साईसेवक यांचे स्वतःचे कृतीने अथवा निष्काळजीपणाने काही

अपघात ,इजा अगर गंभीर दुखापत झाल्यास त्याची जबाबदारी संस्थान घेणार नाही. सदर जबाबदारी ही सर्वस्वी साई सेवकांची राहील. असे नमूद आहे.त्यामुळे कोणतीही आर्थिक मदत देता येणार नाही.

तथापि, अर्जदार श्रीमती.मीनाक्षी प्रमोद उपाध्ये यांचे मागणीप्रमाणे त्यांना मुलाच्या शिक्षणासाठी सेवेच्या कालावधीत साईसेवक कै. प्रमोद उपाध्ये, रोहा,रायगड यांचा अकस्मीत मृत्यु झाल्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळावी असा आशयाचा विनंती अर्ज मा. अध्यक्ष सो. यांचे नावे आलेला आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे सेवेच्या कालावधीत साईसेवक कै.प्रमोद उपाध्ये, रोहा, रायगड यांचा अकस्मित मृत्यु झालेला असल्यामुळे एक विशेष बाब म्हणून त्यांच्या कुटूंबास रु.२५,०००/- मात्र आर्थिक मदत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.४८** **सेवेच्या कालावधीत साईसेवक म्हणून आलेल्या सेवेकऱ्यांच्या अपघाती विमा उतरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, दि.२९ जुलै २०१७ पासुन संस्थानचे विविध विभागात मोफत सेवा देणेकामी **"साईसेवकयोजना"** सुरु करण्यात आलेली आहे.

त्याकामी पालखीची वैयक्तिक माहिति कामगार विभागाकडे प्राप्त झाली असून आज अखेर ५२० पालख्यांनी रजिष्ट्रेशन केलेले आहे. या साई सेवकांचा २१ व्यक्तींचा ०१ गट तयार करण्यात आला असून रविवार ते शनिवार ०१ गट काम करेल असे एका आठवडयात सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १० यावेळेत प्रत्येकी ५ याप्रमाणे १० गटातून २१० साई सेवक आठवडाभर सेवा देतील. या गटांना मंदिर परिसर, प्रसादालय,हॉस्पीटल व निवासस्थाने याठिकाणी वर्षातून सलग ७ दिवस साई सेवेची संधी दिली जाईल. साई सेवकांनी सेवाभावी वृत्तीने भक्तांचा आदर करुन, सन्मान करुन **"ओम साई राम"** म्हणुन साईभक्तांच्या अडचणी सोडविण्याचे काम साई सेवेक-यांनी करावयाचे आहे.

सेवेच्या कालावधीत दि.२९-७-२०१७ ते आजपावेतो घडलेल्या घटनाः-

अ) श्री साई सेवा मित्र मंडळ, देगलुर , ता.देगलुर, जि.नांदेड यांचे उपरोक्त संदर्भीय दि.५/९/२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्या पत्रात त्यांनी साई सेवक असताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी अ.नं. ३ मध्ये असे नमूद आहे की,साई प्रसादालयापासुन ते आम्ही थांबलेल्या निवासस्थानी साईआश्रम -२ (साई धर्मशाळा) हया ठिकाणी साई सेवकांस रात्री १०.०० नंतर पायी जाणे प्राणावर बेतण्याची शक्यता आहे. कारण पायीमार्गावरुन जात असतांना दिवाबत्तीची सोय नाही. दिवाबत्तीची सोय होणे गरजेचे वाटते. कारण तसा प्रसंगही स्थानिककाही गुंडानी मद्यप्राशान करुन पालघर मुंबईच्या साई सेवकास त्रास दिले होते. रात्रीच्या वेळेस संस्थेचे गार्ड पायी मार्गावर नेमणे गरजेचे वाटते. यामुळे साई सेवकांच्या स्वः रक्षणास त्यांची मदत होईल. "असे म्हटले आहे, सोबत पत्र जोडलेले आहे.

ब) दि.२४-०९-२०१७ ते दि.३०-०९-२०१७ (७ दिवस) या कालावधीत साई सेवक म्हणुन सेवेसाठी आलेल्या श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगड यांनी तीन दिवस प्रसादालय विभाग येथे सेवा पुर्ण केली. त्यानंतर दि.२८-०९-२०१७ ते दि.३०-९-२०१७ या कालावधीत संरक्षण विभाग येथे दुपारी २.०० ते १०.०० या कालावधीत श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा, रायगड त्यांची सेवा होती. परंतू दि.२९-९-२०१७ रोजी काकड आरती करणेकामी पहाटे ३.००वाजता त्यांचे गटासोबत येत असतांना श्री प्रमोद हरीभाऊ उपाध्ये , साई सेवक , श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा, रायगड हे अचानक रस्त्यात मागे मागे राहीले. त्यांचा रस्त्यात अकस्मित मृत्यु झाला.

क) साई सेवकांचा अपघात विमा- संस्थान परिसरामध्ये साई सेवकांना काही अपघात झाल्यास एका वेळेस २१० साई सेवकांना विमा संरक्षण मिळावे, सेवेच्या कालावधीत ७ दिवस सेवेसाठी आलेल्या २१० साई सेवकांचा संस्थान लेखाशाखेमार्फत अपघाती विमा उतविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपनीचे कोटेशन मागवून न्युनतम दराने साईसेवकांचा अपघती विमा उतरविता येईल.

विभागाचा अभिप्राय- प्रास्ताविकातील **"अ"** व **"ब"** मधील घटना लक्षात घेता, सेवेसाठी साई सेवकांचा ०१ गट तयार करण्यात आला असून रविवार ते शनिवार ०१ गट कामकरेल असे एका आठवडयात सकाळी ६ ते दुपारी २ व दुपारी २ ते रात्री १० यावेळेत प्रत्येकी ५ याप्रमाणे १० गटातून २१० साई सेवक आठवडाभर सेवा देतील. दर आठवडयात सेवेच्या कालावधीत ७ दिवस सेवेसाठी आलेल्या २१० साई सेवकांचा

संस्थान लेखाशाखेमार्फत अपघाती विमा उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपनीचे कोटेशन मागवून न्युनतम दराने साई सेवकांचा अपघाती विमा लेखाशाखा विभागामार्फत उतरविता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.९६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवेच्या कालावधीत साईसेवक म्हणून आलेल्या सेवेकऱ्यांचा प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सामुहिक अपघाती विमा उतरविणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४९** **सेवेच्या कालावधीत साईसेवक म्हणून उपस्थित असलेल्या सेवेकऱ्यांची निवास व इतर व्यवस्था साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार, दि.२९ जुलै २०१७ पासुन संस्थानचे विविध विभागात मोफत सेवा देणेकामी " साई सेवक योजना " सुरु करण्यात आलेली आहे.

साई सेवकांना प्रसादालय विभागातून रात्री १०.०० वा. साई आश्रम -२ (साई धर्मशाळा) येथे मुक्कामी जाताना प्रसादालय ते साई आश्रम -२ दरम्यानच्या रस्त्यावर रात्री रहदारीची वर्दळ नसते, किंबहुना रस्ता पुर्णतः निर्मनुष्य असतो. तसेच रस्त्यावर पथदिवे नसतात. अशा परिस्थीतीचा गैरफायदा घेऊन काही समाज कंटक / भुरटे चोर नशापाणी करुन साई सेवकांना धमकवण्याच्या एक-दोन घटना घडलेचे मनोगत व्यक्त केलेले आहे.

श्री साईसेवा मित्र मंडळ, देगलुर,जि.नांदेड यांचे उपरोक्त संदर्भीय दि.५/९/२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून त्या पत्रात त्यांनी, मी साई योजनेचा साई सेवक आपणास अतिशय नम्रपणे ओम साईराम करतो, मी स्वतःला इतका भाग्यवान समझतो की, आपल्या कल्पनेतून तीर्थक्षेत्र शेगाव ,तिरुपतीच्या धर्तीवर श्री साईबाबा समाधी सोहळा २०१८ च्या निमित्ताने श्री साईसेवा मित्र मंडळ, देगलुर, ता.देगलुर, जि.नांदेड, अध्यक्ष, श्री गंगाधर दाऊलवार यांचे नेतुत्वाखाली साई पालखी प्रमुख या नात्याने प्रत्यक्षात साईबाबांच्या चरणी दि.६ ऑगस्ट २०१७ ते १२ ऑगस्ट २०१७ या कालावधीत दुसऱ्याच टप्प्यात प्रसादालय सात दिवस सेवा करण्याची संधी प्राप्त झाली.

मी साईबाबाची सेवा आजतागायत अप्रत्यक्षपणे केली पण या योजनेअंतर्गत साईबाबांच्या भक्तांची सेवा करण्याची संधी मला मिळाली.हामाझ्यासाठी व माझ्या परिवारासाठी साईबाबांचा अनमोल प्रसाद आहे. असे मला वाटते. ते साई सेवक असताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी अ.नं. ३मध्ये असे म्हटले आहे की,साई प्रसादालयापासुन ते आम्ही थांबलेल्या निवासस्थानी साईआश्रम -२ (साई धर्मशाळा) हया ठिकाणी साई सेवकांस रात्री १०.०० नंतर पायी जाणे प्राणावर बेतण्याची शक्यता आहे. कारण पायी मार्गावरुन जात असतांना दिवाबत्तीची सोय नाही. दिवाबत्तीची सोय होणे गरजेचे वाटते. कारण तसा प्रसंगही स्थानिक काही गुंडानी मद्यप्राशान करुन पालघर मुंबईच्या साई सेवकास त्रास दिले होते. रात्रीच्या वेळेस संस्थेचे गार्ड पायी मार्गावर नेमणे गरजेचे वाटते. यामुळे साई सेवकांच्या स्वःरक्षणास त्यांची मदत होईल." असे म्हटले आहे, सोबत पत्र जोडलेले आहे.

दि.२४-०९-२०१७ ते दि.३०-०९-२०१७ (७ दिवस) या कालावधीत साई सेवक म्हणुन सेवेसाठी आलेल्या श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा, रायगड यांनी तीन दिवस प्रसादालय विभाग येथे सेवा पुर्ण केली. त्यानंतर दि.२८-०९-२०१७ ते दि.३०-९-२०१७ या कालावधीत संरक्षण विभाग येथे दुपारी २.०० ते १०.०० या कालावधीत श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा, रायगड त्यांची सेवा होती. परंतू दि.२९-९-२०१७ रोजी काकड आरती करणेकामी पहाटे ३.०० वाजता त्यांचे गटासोबत येत असतांना श्री प्रमोद हरीभाऊ उपाध्ये , साई सेवक , श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगडहे अचानक रस्त्यात मागे मागे राहीले. त्यांचा रस्त्यात अकस्मित मृत्यु झाला.

याबाबत, दि.२९-९-२०१७ रोजी श्री व्दारकामाई मित्र मंडळ, रोहा,रायगड साई सेवक श्री प्रमोद हरीभाऊ उपाध्ये यांची रस्त्याने येतांना अकस्मित मृत्युची घटना व श्री दाऊलवार यांचे सूचनेनुसार साई सेवकांना निवासव्यवस्था ही साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे केल्यास सुरक्षितेच्या दृष्टीने योग्य राहील. त्याकठिकाणी प्रसादालय असल्यामुळे भोजनाची व्यवस्था होईल, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम ) हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे सेवेकऱ्यांना सेवेसाठी जाणे-येणे सोईचे होईल. त्यामुळे साई सेवकांना होणारा त्रास वाचेल, कोणतीही अनुचित घटना घडणार नाही, तसेच त्यांचे सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होणार नाहीअसे मत आहे, तसेच सेवेकऱ्यांचे गणवेष, स्टेशनरी साहित्य ठेवणेकामी एक स्टोअर रुम व साधारण २२५ साई सेवकांसाठी

(पुरुष व महिला रुम वेगवेगळी देणे.) तसेच फक्त शनिवारी ७ दिवस सेवा दिलेल्या साधारण २२५ साई सेवक तसेच पुढील आवठवडयात सेवा देण्यासाठी आलेल्या नविन साधारण २२५ अशा एकुण ४५० साई सेवकांना साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे मोफत निवासव्यवस्था व तसेच प्रसादालयामार्फत मोफत भोजन, नाष्टा व कॅन्टीन विभागामार्फत दोन वेळचे चहाची मोफत व्यवस्था होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये विनामुल्य सेवा करणाऱ्या साईसेवकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांची निवासव्यवस्था साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे करण्यात यावी. यासाठी प्रथमत: २१ जणांच्या ५ ग्रुपची साईबाबा भक्तनिवासस्थान येथे निवासव्यव्सथा करण्यात यावी व त्यांच्या अभिप्रायानुसार उर्वरित साईभक्तांची निवासव्यव्सथा साईबाबा भक्तनिवासस्थान येथे करणेबाबतचा निर्णय घेण्यात यावा.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.५०** **आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यास सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३) (C)(V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे :-

"Provided also that the fund of trust or institution [or any university or other educational institution or any hospital or other medical institution] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [or sub-clause (vi) or sub-clause (VIA)]

a) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

संस्थानचे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरण आयकर कार्यालयाकडे दाखल करावयाचे आहे. सदर आयकर विवरणासोबत सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल या बाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असते. सन २०१६-२०१७ आर्थिक वर्षांच्या अखर्चित उत्पन्नाच्या ५ वर्षाच्या खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा खालीलप्रमाणेः-

(रुपये कोटीमध्ये)

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | नियोजित दर्शन रांग प्रकल्प उभारणेसाठी | १५७ |
| २ | निळवंडे पाईपलाईन प्रकल्पासाठी | १४० |
| ३ | साई सृष्टी प्लानेटेरियमसाठी | १४१ |
| ४ | मल्टीमिडीया थीम पार्क-लेझर शो सिव्हील वर्कसाठी | ७२ |
| ५ | भक्त निवासस्थान इमारत नुतनीकरणासाठी | १४ |
| ६ | वाढीव पाणी पुरवठा योजना साठवण तलाव व जलशुध्दी करणासाठी | ५८ |
| ७ | सुरक्षा तथा निगणाराणी यंत्रणासाठी | २० |
| ८ | विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनसाठी | २५ |

| | | |
|---|---|---|
| ९ | साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाचे निवासव्यवस्थासाठी | २६ |
| १० | वाहनतळ शौचालयांसाठी | १२ |
| ११ | शिर्डी नगरपंचायत अंदाजित निधी | २५ |
| १२ | बहुउद्देशीय हॉल बांधकामांसाठी | ४३ |
| १३ | साईसिटी प्रकल्प निर्मीतीसाठी | १८० |
| १४ | वाहनतळ भुसंपादन व बहुमजली विकासीकरणासाठी | १६ |
| १५ | शिर्डी विकास योजनेतील ९ रस्ते भुसंपादनासह विकसीत करणेसाठी | ८६ |
| १६ | सांडपाणी व्यवस्थेसाठी | २२ |
| १७ | घनकचरा व्यवस्थापनासाठी | २७ |
| १८ | विकासकामांकरीता जमिन खरेदीसाठी | ११० |
| १९ | सुपर स्पेशॅलिटी रुग्णालय बिल्डींगसाठी | २४५ |
| | एकूण | १,२७७ |

तरी संस्थानचे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्रक आयकर कार्यालयाकडे दाखल करण्याकरीता उपरोक्त नमुद अखर्चित उत्पन्नाच्या ५ वर्षांच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा जोडणे बंधनकारक असल्याने, सदर मसुदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.९६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायद्यातील तरतुदीन्वये सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली व संस्थानचे सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्रक आयकर कार्यालयाकडे दाखल करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५१** **आयकर कायदा १९६१ चे तरतूदीनुसार दिनांक ३१.०३.२०१७ अखेर एकूण शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सर्व माध्यमांव्दारे मिळणारे एकूण उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३) (C)(V) अन्वये संपूर्ण करमुक्त आहे. सन २००२ मधील सुधारित तरतूदींनुसार संबंधित आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी एकूण ८५% उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते खर्च न झाल्यास या उत्पन्नापैकी अखर्चीत राहिलेली रक्कम पुढील ५ वर्षांत खर्च करता येईल. दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल व पुढील ५ वर्षांनंतर ६ व्या वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाऊन त्यावर लागू असलेल्या महत्तम दराने आयकर आकारणी केली जाते.

अशा प्रकारे दि.३१ मार्च २०१७ अखेर आयकर विवरणे भरुन अखर्चीत राहिलेली रक्कम व ती खर्च करण्याचे अंतिम आर्थिक वर्ष खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चित रक्कम रु. | खर्च करावयाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | १५५,००,५३,९२९/- | ३१.०३.२०१८ |
| २ | २०१३-१४ | ३४३,९१,४२,४२५/- | ३१.०३.२०१९ |
| ३ | २०१४-१५ | २३०,८४,२६,८४३/- | ३१.०३.२०२० |
| ४ | २०१५-१६ | २२४,५५,८९,३७७/- | ३१.०३.२०२१ |
| ५ | २०१६-१७ | ३०२,३२,७६,६०२/- | ३१.०३.२०२२ |
| एकूण अखर्चित उत्पन्न | | १२५६,६४,८९,१७६/- | |

अशा प्रकारे संबंधित आर्थिक वर्षात एकूण उत्पन्नाच्या ८५% रक्कम खर्च न झाल्यामुळे एकूण अखर्चीत उत्पन्न वाढत गेले असून दि.३१.३.२०२२ अखेर रु.१२५६.६४ कोटी अखर्चीत उत्पन्न विहित पध्दतीने खर्च करण्यासाठी उपलब्ध आहे पैकी रु.१५५ कोटी दि.३१.३.२०१८ अखेर खर्च करणे आवश्यक आहे अन्यथा त्यावर महत्तम दराने आयकर आकारणी होईल.

मागील आर्थिक वर्षाच्या आयकर विवरणानुसार अखर्चित रु.१५५/- कोटी मधून दि.१.४.२०१७ ते ३१.१०.२०१७ या कालावधीत रु.४० कोटी खर्च झाल्याचे दिसून येत आहेत. पुढील नोव्हेंबर २०१७ ते ३१

मार्च २०१८ या कालावधीत उर्वरीत रु.११५/- कोटी अखर्चीत रक्कम टप्प्याटप्याने खर्च करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. सदर बाब मा.व्य.स.चे निदर्शनास आणून देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.९६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा १९६१ चे तरतूदीनुसार दिनांक ३१.०३.२०१७ अखेर एकूण रु.११५/- कोटी मात्र शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नामधून काही रक्कम शिर्डी नगरपंचायती हद्दीतील रस्त्यांच्या कामांसाठी व काही रक्कम संस्थानसाठी शेती महामंडळाची जमीन खरेदी करणेसाठी वापरणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५२** **GST कायद्याअंतर्गत संस्थानच्या व्यवहारांवर दर आकारणी करुन वाढीव किंमतीनुसार अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१ जुलै, २०१७ पासून संपूर्ण भारतात वस्तू व सेवाकर (GST) लागू करण्यात आला आहे. मा.व्य.स.निर्णय क्रं.५०१/१५.६.२०१७ अन्वये संस्थानच्या सनदी लेखापालांचा अभिप्राय घेण्यात यावा व इतर देवस्थानांकडून माहिती घेण्यात यावी तसेच कायदेतंज्ञ समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानुसार वस्तू व सेवाकर (GST) नोंदणीबाबत कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय संमत झाला आहे. त्यास अनुसरुन संबंधितांना संस्थानच्या आर्थिक व्यवहारांची उपलब्ध माहिती पुरविण्यात आली होती. संस्थानच्या सनदी लेखापालांनी नोंदणी घेणेबाबत कळविले होते. इतर देवस्थानांनी उदा. तिरुपती बालाजी देवस्थान, आंध्र प्रदेश व श्री सिध्दी विनायक देवस्थान, मुंबई यांनी सुध्दा GST अंतर्गत नोंदणी दाखला घेतला आहे. तसेच कायदेतंज्ञ समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांनी प्रख्यात चार्टर्ड आकौंटंट श्री.शैलेश हरिभक्ती यांचा कायदेशीर अभिप्राय घेतला आहे. अंतिमतः GST अंतर्गत संस्थानने नोंदणी करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यास अनुसरुन आवश्यकमाहिती पुरविण्यात येऊन संस्थानचे कर सल्लागार यांचेमार्फत दि.२७.०७.२०१७ रोजी GST नोंदणी क्रमांक 27AAATS2581C1ZN घेण्यात आला आहे.

GST नोंदणी क्रमांक घेतल्यानंतर संस्थानमध्ये व्यवहारांवर प्रत्यक्षपणे GST लागू करणेबाबत दि.१९.९.२०१७ रोजी संस्थान कर सल्लागार श्री.श्रेणीक गांधी, चार्टर्ड आकौंटंट, पुणे यांचेकडे प्रत्यक्ष भेट देण्यात आली आहे. आयुक्त, केंद्रीय सिमाशुल्क व सर्व्हीस टॅक्स व जीएसटी, नाशिक यांचेकडे संस्थानच्या व्यवहारांवर जीएसटी लागू होणेबाबत विचारणा केली आहे. तथापि अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रख्यात चार्टर्ड आकौंटंट श्री.शैलेश हरिभक्ती, मुंबई यांनी दिलेल्या अभिप्रायात नमूद केलेल्या जीएसटी दरानुसार काही ठळक व्यवहार जीएसटी दर नमूद करुन जीएसटी लागू केल्यानंतर होणारी किंमत व मागील आर्थिक वर्षात प्राप्त झालेली रक्कम नमूद करुन खालीलप्रमाणे विवरण प्रस्तावित केले आहेः-

## I. GST Applicable Revenue Activities

| Sr. No. | Particular | Present Rate (Rs.) | GST% | GST Rs. | Rate after GST |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **Accounts Department** | | | | |
| | Gold Coin 10 gm | 32500 | 3 | 975.00 | 33,475.00 |
| | Gold Coin 5 gm | 16350 | 3 | 490.50 | 16,840.50 |
| | Gold Coin 2.5 gm | 8550 | 3 | 256.50 | 8,806.50 |
| | Silver Coin 20 gm | 1000 | 3 | 30.00 | 1,030.00 |
| | टिपः- साईभक्तांनी देणगी स्वरुपात दिलेले सोनेचांदी वस्तू शासनमान्य मिंट व नॅशनल रिफायनरी येथे वितळविण्यात येऊन बाबांची प्रतीमा व पादूका असलेली सोने व चांदी नाणी भक्तांना प्रसाद रुपाने वेळोवेळी असलेल्या सर्वसाधारण बाजारभावाप्रमाणे विक्रीस उपलब्ध करुन दिली जातात. त्यामध्ये मेल्टींग चार्जेस, पॅकेजींग चार्जेस, विमाखर्च इ. समाविष्ठ केल्याने बाजारभावापेक्षा काही प्रमाणात रक्कम जास्त असते. अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.१,९९,२६,५०० /- इतकी रक्कम जमा झाली होती | | | | |
| **2** | **Security Department** | | | | |
| | Fees from Gym (Vyayam Shala) | 100 | 18 | 18.00 | 118 |
| | टिपः- संस्थानमार्फत एक व्यायामशाळा चालविण्यात येते त्यामध्ये प्रत्यक मेंबरकडून मासीक रु.१००/- देखभाल खर्च म्हणून जमा केले जातात अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.५,०८,४६०/- इतकी रक्कम जमा झाली होती. | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **3** | **Education Institutions** | | | | |
| | **A.** Kanya Vidya Mandir | | 18 | - | Fee+18% |
| | **B.** English Medium School | | 18 | - | Fee+18% |
| | **C.** Jr.College | | 18 | - | Fee+18% |
| | **D.** I.T.I. | | 18 | - | Fee+18% |
| | टिपः- शैक्षणिक संस्थांमध्ये वेगवेगळी फी आकारली जाते या फी वर १८% जीएसटी लागू आहे | | | | |
| **4** | **Publication Department** | | | | |
| **(a)** | **Photo** | | | | |
| 1 | Baba Sit On Stone | 4 | 12 | | |
| 2 | Baba Sit On Stone | 5 | 12 | | |
| 3 | Standing Saibaba(Wall) | 8 | 12 | | |
| 4 | Dwarkamai Baba | 5 | 12 | | |
| 5 | Old Dwarkamai Photo | 5 | 12 | | |
| 6 | Moorti Photo | 3 | 12 | | |
| 7 | BABA SITTING 0N STONE | 8 | 12 | | |
| 8 | Dwarkamai Photo | 7 | 12 | | |
| 9 | Dwarkamai Photo Old | 8 | 12 | | |
| 10 | Palakhi Photo | 7 | 12 | | |
| 11 | Samadhi Photo | 7 | 12 | | |
| 12 | 3D-PHOTO-0F-SAIBABA | 5 | 12 | | |
| 13 | 3D-PHOTO-SAIBABA-ACRLC-STND | 175 | 12 | | |
| 14 | 3D-PHOTO-SAIBABA-FIBRE-FRAME | 175 | 12 | | |
| 15 | 3D-PHOTO-SAIBABA-FIBRE-FRAME | 245 | 12 | | |
| 16 | 3D-PHOTO-SAIBABA-FIBRE-FRAME | 400 | 12 | | |
| 17 | 3D-PHOTO-SAIBABA-FIBRE-FRAME | 530 | 12 | | |
| 18 | 3D-PHOTO-PALKHI PKET | 5 | 12 | | |
| 19 | 3D-PHOTO-STONE PKET | 5 | 12 | | |
| 20 | 3D-SAIFLIP-PHOTO | 5 | 12 | | |
| 21 | GURUSTHAN-PHOTO | 15 | 12 | | |
| 22 | Dwarkamai PHOTO MET/PET | 15 | 12 | | |
| 23 | OLD.DWARKAMAI.PHOTO.MET/PET | 15 | 12 | | |
| 24 | PALAKHI-PHOTO-MET/PET | 15 | 12 | | |
| 25 | STATUE-PHOTO-MET/PET | 15 | 12 | | |
| 26 | GURUSTHAN-PHOTO-MET/PET | 25 | 12 | | |
| 27 | DWARKAMAI-PHOTO-MET/PET | 25 | 12 | | |
| 28 | OLD.DWARKAMAI.PHOTO.MET/PET | 25 | 12 | | |
| 29 | PALAKHI-PHOTO-MET/PET | 25 | 12 | | |
| 30 | STATUE-PHOTO-MET/PET | 25 | 12 | | |
| 31 | SHRI.SAIBABA.3D.WALL.PHOTO | 220 | 12 | | |
| 32 | SHRI.SAIBABA.3D.WALL.PHOTO | 220 | 12 | | |
| | टिपः- प्रचार प्रसाराकरीता संस्थनमार्फत भक्तांना पुस्तके व फोटो विक्री केली जाते पुस्तकांवर जीएसटी लागू नाही फोटो विक्रीवर लागू आहे. अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.२,०६,४३,०००/- इतकी रक्कम जमा झाली होती. उत्पादन खर्च गृहित धरुन विक्री किंमत ठरविल्यास जास्तच्या रकमेवर जमा केलेली जीएसटी रक्कम मात्र आदा करावी लागेल. | | | | |
| **(b)** | **CD** | | | | |
| 1 | Guru path Abhang CD | 45 | 18 | | |
| 2 | Compact Disk (Shree Saibaba) | 50 | 18 | | |
| 3 | Arati & Mantrocchar | 40 | 18 | | |
| 4 | Shirdi Darshan | 50 | 18 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Glimpse Of Saibaba DVD/VCD | 55 | 18 | | |
| 6 | Sai Satcharitra | 70 | 18 | | |
| 7 | Saicharitra | 100 | 18 | | |
| 8 | Saicharitra DohowaliMP3 | 90 | 18 | | |
| 9 | Shri Saibaba Arati | 25 | 18 | | |
| 10 | Sai Ki Arti | 180 | 18 | | |
| 11 | Saicharitra | 40 | 18 | | |
| | टिपः- संस्थानमार्फत भक्तांना कॅसेट, सीडी विक्री केली जाते. अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.१२,८०,००० /- इतकी रक्कम जमा झाली होती. उत्पादन खर्च गृहित धरुन विक्री किंमत ठरविल्यास जास्तच्या रकमेवर जमा केलेली जीएसटी रक्कम मात्र आदा करावी लागेल. | | | | |
| **(c)** | **Diary & Calendar** | | | | |
| 1 | SAI DIARY-2018 | 86 | 18 | | |
| 2 | SAI DIARY-2018 (POCKET) | 10 | 18 | | |
| 3 | SAIBABA CALENDER- 1 PAGE | 15 | 18 | | |
| 4 | SAIBABA DELUXE WALL | 202 | 18 | | |
| 5 | SAIBABA METPET CAL | 224 | 18 | | |
| 6 | SAIBABA 3D WALL | 237 | 18 | | |
| 7 | SAIBABA 3D DESK CAL | 122 | 18 | | |
| 8 | SAIBABA DESK CALEN | 54 | 18 | | |
| | टिपः- संस्थानमार्फत भक्तांना नवीन वर्षाची डायरी विक्री केली जाते अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.२,८३,३६,०००/- इतकी रक्कम जमा झाली होती. उत्पादन खर्च गृहित धरुन विक्री किंमत ठरविल्यास जास्तच्या रकमेवर जमा केलेली जीएसटी रक्कम मात्र आदा करावी लागेल. | | | | |
| **5** | **Hospitals Department** | | | | |
| | Pharmacy shop Rent -Saibaba Hospitals | 838,897 | 18 | 151,001.46 | 989,898 |
| | Pharmacy shop Rent -Sainath Hospitals | 282,486 | 18 | 50,847.48 | 333,333 |
| **6** | **Record Department** | | | | |
| | Sale of waste and Scrape,Bldg. Material Etc. | | 18 | - | Basic+18% |
| **7** | **Canteen Serves** | | | | |
| | Mineral Water 1 ltr | | 18 | | 10 |
| | Mineral water 500 ml. | | 18 | | 5 |
| | Biscute Parle -100 | | 18 | | 5 |
| | Parle-150 | | 18 | | 10 |
| | Manico | | 18 | | 5 |
| | Krackjack | | 18 | | 5 |
| | Mari | | 18 | | 5 |
| | टिपः- संस्थानमार्फत भक्तांना अत्यल्प दरात मिनरल वॉटर व विस्कीटे विक्री केली जाते. अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.४,५१,५३,९२५/- इतकी रक्कम जमा झाली होती. उपरोक्त नमुद केलेली विक्री किंमत असून त्यामध्ये १८% जीएसटी गृहित आहे. | | | | |

## II. GST Exempted Revenue Activities

| Sr. No. | Item Name | Rate (Rs) | GST % | GST Rs. | Rate after GST |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **Canteen Serves** | | | | |
| | Ladu prasada | 25 | NA | - | 25 |
| | Nasta packet | 5 | NA | - | 5 |
| | Tea | 2 | NA | - | 2 |
| | Coffee | 3 | NA | - | 3 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Milk | 3 | NA | - | 3 |
| | टिपः- संस्थानमार्फत भक्तांना अत्यल्प दरात चहा, कॉफी, दुध विक्री केली जाते. अर्थिक वर्षात २०१६-१७ मध्ये रु.१,५८,३९,९९३/- इतकी रक्कम जमा झाली होती. | | | | |
| **2** | **Bhakta Niwas 500 Rooms*** | | | | |
| | A/C Rooms | 550 | NA | - | 550 |
| | Non A/C Rooms | 400 | NA | - | 400 |
| | | | | | |
| 3 | **Dwarawati Bhaktaniwas*** | | | | |
| | A/C Rooms | 900 | NA | - | 900 |
| | Non A/C Rooms | 500 | NA | - | 500 |
| | | | | | |
| 4 | **Saiashram No.1 (1000 Rooms)*** | | | | |
| | A/C Rooms | 500 | NA | - | 500 |
| | Non A/C Rooms | 200 | NA | - | 200 |
| | | | | | |
| **5** | **Sai DharmaShala*** | | | | |
| | Halls 20 per person | 500 | NA | - | 500 |
| | | | | | |
| **6** | **Property Dept.** | | | | |
| | Service Stall given on rent- less than Rs.10,000/- Per month | | NA | | - |
| | | | | | |
| **7** | **Prasadalaya** | | | | |
| | General Holl | 0 | NA | | - |
| | VIP | 50 | NA | | 50 |
| | | | | | |
| **8** | **Public Relation** | | | | |
| | Kakad Aarati | 600 | NA | | 600 |
| | Maddhan, Dhoop, Shej Aarati | 400 | NA | | 400 |
| | Darshan Pass | 200 | NA | | 200 |
| | | | | | |
| **9** | **Information Technology** | | | | |
| | Live Darshan Via Tata Sky | 2.18 crore PA | NA | | 2.18 crore PA |
| **10** | Live Darshan Via TV 9<br>**Power House** | 23.50 lakh PA | NA | | 23.50 lakh PA |
| | Wind mill receipt- Generation of Electricity | | NA | - | - |
| | | | | | |
| **11** | **Vehicle Dept.** | | | | |
| | Bus Charges Nagarsul | 26 | NA | - | 26 |
| | | | | | |
| **12** | **Publication Department** | | | | |
| | **Books** | | | | |
| 1 | Shri Saicharitra | 100 | NA | | 100 |
| 2 | Saicharitra | 45 | NA | | 45 |
| 3 | Saicharitra | 40 | NA | | 40 |
| 4 | Saicharitra | 45 | NA | | 45 |
| 5 | Saicharitra | 60 | NA | | 60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | Saicharitra | 60 | NA | | 60 |
| 7 | Saicharitra | 60 | NA | | 60 |
| 8 | Sai Charitra Pothi - Hindi | 110 | NA | | 110 |
| 9 | Saicharitra | 80 | NA | | 80 |
| 10 | Saileela Amrit | 35 | NA | | 35 |
| 11 | Saileela Amrit | 20 | NA | | 20 |
| 12 | Saileela Amrit | 25 | NA | | 25 |
| 13 | Saibaba Awatar Karya | 14 | NA | | 14 |
| 14 | Sainath Sagunopasna | 5 | NA | | 5 |
| 15 | Sainath Sagunopasna- | 12 | NA | | 12 |
| 16 | Sainath Sagunopasna | 15 | NA | | 15 |
| 17 | Sainath Sagunopasna | 7 | NA | | 7 |
| 18 | Sainath Pujavidhi | 11 | NA | | 11 |
| 19 | Sainathstwan Manjiri | 3 | NA | | 3 |
| 20 | Sainathstwan Manjiri | 3 | NA | | 3 |
| 21 | Sainathstwan Manjiri | 5 | NA | | 5 |
| 22 | Sainathstwan Manjiri | 5 | NA | | 5 |
| 23 | Four Adhyay | 7 | NA | | 7 |
| 24 | Shri Sai Rudradhay | 5 | NA | | 5 |
| 25 | Four Adhyay | 6 | NA | | 6 |
| 26 | Sainath Bhajanmala | 35 | NA | | 35 |
| 27 | Sainath Bhajanmala | 40 | NA | | 40 |
| 28 | Four Adhyay | 14 | NA | | 14 |
| 29 | Childrens Saibaba | 10 | NA | | 10 |
| 30 | Childrens Saibaba | 7 | NA | | 7 |
| 31 | Childrens Saibaba | 7 | NA | | 7 |
| 32 | Childrens Saibaba | 10 | NA | | 10 |
| 33 | Childrens Saibaba | 10 | NA | | 10 |
| 34 | Childrens Saibaba | 10 | NA | | 10 |
| 35 | Childrens Saibaba | 7 | NA | | 7 |
| 36 | Saibaba Of Shirdi | 10 | NA | | 10 |
| 37 | Khaparde Diary | 9 | NA | | 9 |
| 38 | Pictorial Saibaba | 10 | NA | | 10 |
| 39 | Gurupath Abhang | 3 | NA | | 3 |
| 40 | Sai Charitra Gujarathi - Pothi | 90 | NA | | 90 |
| 41 | SHRI SAI SATCHARITRA | 115 | NA | | 115 |
| 42 | Saileela Magazine | 8 | NA | | 8 |
| 43 | Saicharitra | 50 | NA | | 50 |
| 44 | Sai Stvanmanjiri | 3 | NA | | 3 |
| 45 | Khaparde Diary | 10 | NA | | 10 |
| 46 | Sainath Sagunopasana | 15 | NA | | 15 |
| 47 | Sainath Sagunopasna | 10 | NA | | 10 |
| 48 | Khaparde Diary | 20 | NA | | 20 |
| 49 | Dainandin Saibodh | 75 | NA | | 75 |
| 50 | Khaparde Diary | 20 | NA | | 20 |
| 51 | Sagunopasana | 10 | NA | | 10 |
| 52 | Shiladhi | 10 | NA | | 10 |
| 53 | Shri Saibaba Shikvan Tatva. | 15 | NA | | 15 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 54 | Sainath Sagunopasana | 11 | NA | | 11 |
| 55 | Saicharitra | 70 | NA | | 70 |
| 56 | Shri Saisatcharitra | 100 | NA | | 100 |
| 57 | Childrens Saibaba | 75 | NA | | 75 |
| 58 | Saicharitra | 70 | NA | | 70 |
| 59 | Shri Matrusai Charitra | 40 | NA | | 40 |
| 60 | Sainath Sagunopasana | 15 | NA | | 15 |
| 61 | Sai Samarth Satcharitra | 135 | NA | | 135 |
| 62 | Sai Satyacharitra | 130 | NA | | 130 |
| 63 | Sai Charitra | 78 | NA | | 78 |
| 64 | Shri Saicharitra | 50 | NA | | 50 |
| 65 | Dainandin Saibodh | 70 | NA | | 70 |
| 66 | SHIKVAN TATWADNYAN | 30 | NA | | 30 |
| 67 | Avatar Karya | 45 | NA | | 45 |
| 68 | Shildhi | 11 | NA | | 11 |
| 69 | Sai Satyacharitra | 175 | NA | | 175 |
| 70 | Shree Saicharitra | 55 | NA | | 55 |
| 71 | Saiki Aur Mera Pehla Kadam | 105 | NA | | 105 |
| 72 | Sainath Stawanmanjiri | 3 | NA | | 3 |
| 73 | Shri Saicharitra | 60 | NA | | 60 |
| 74 | Shri Saicharitra | 105 | NA | | 105 |
| 75 | Sainath Stavanmanjari | 10 | NA | | 10 |
| 76 | Sainath Sagunopasana | 20 | NA | | 20 |
| 77 | Four Adhyay | 16 | NA | | 16 |
| 78 | SHRI SAICHARITRA | 40 | NA | | 40 |
| 79 | Sri Sainath Stawanmanjiri Jerman | 18 | NA | | 18 |
| 80 | Sri Sainath Sagonopasana Arti Zerman | 18 | NA | | 18 |
| 81 | Four Adhyay | 10 | NA | | 10 |
| 82 | Delux Pothi Marathi | 200 | NA | | 200 |

प्रख्यात चार्टर्ड आकौंटंट श्री.शैलेश हरिभक्ती, मुंबई यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार जीएसटी दर गृहीत धरुन मागील आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या रकमेनुसार सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे जीएसटीसाठी देय होतो. जीएसटी कायद्यांतर्गत खरेदीवर आदा करण्यात आलेला जीएसटी व विक्रीवर जमा करण्यात आलेला जीएसटी यातील फरक देय होतो. तथापी काही बाबी उदा.सोने चांदी नाणी, शैक्षिणक फी, व्यायामशाळा फी इ. वर जीएसटी आदा केलेला नसल्याने त्यावर जीएसटी लावून जमा केलेली रक्कम पुर्णपणे जीएसटी म्हणून भरावी लागेल तर काही पुर्नविक्री होणा-या वस्तू उदा. बीस्कीट, पॅकेजड् मिनरल वॉटर्स, यावर मात्र थेट जमा केलेल्या रकमेतून आदा केलेल्या जीएसटी व्यतीरिक्तच रक्कम जीएसटी म्हणून देय होईल. काही ठळक बाबींवर जीएसटी दर आकारणी केल्यास त्यामध्ये खालीलप्रमाणे वाढ होईल त्याप्रमाणे भक्तांकडून आकारण्यात आलेल्या जीएसटीची रक्कम जमा करावी लागेलः-

| Sr No. | Particulars | F.Y.2016-17 Revenue | Add GST % Amt | Total Revenue after GST |
|---|---|---|---|---|
| 1 | Gold Coin | 1,58,14,626 | **4,74,439** | 1,62,89,065 |
| 2 | Silver Coin | 40,45,350 | **1,21,361** | 41,66,711 |
| 3 | Gym receipt | 5,08,460 | **91,522** | 5,99,983 |
| 4 | Sales of books and Photo | 2,06,43,212 | **24,77,185** | 2,31,20,397 |
| 5 | Sales of Cassets and CD | 12,80,000 | **2,30,400** | 15,10,400 |
| 6 | Sales of Diary and Calender | 2,83,36,995 | **51,00,659** | 3,34,37,654 |
| | | 7,06,28,643 | 84,95,566 | 7,91,24,210 |

अशा प्रकारे जीएसटी लागू केल्यास त्याप्रमाणात किंमतीमध्ये वाढ होते त्यानुसार भक्तांना दर आकारणी करावी लागेल. रुग्णालये विभागात ओपीडी रुग्णांना औषध विक्री केली जात नसल्याने जीएसटीचा प्रश्न येत नाही तथापी आय.पी.डी.रुग्णांना बीलात औषधांची आकारणी केली जाते खरेदी किंमतीपेक्षा ती जीतक्या जास्त किंमतीने आकारली जाईल त्या प्रमाणात जीएसटीची जास्तची रक्कम देय राहील. जीएसटी कायद्यात अद्यापही वेळोवेळी बदल होत आहेत त्याप्रमाणे होणा-या बदलानुसार संस्थानच्या आर्थिक व्यवहारांवर लागू होत असलेल्या दराने जीएसटी लागू होईल. आज अखेर जीएसटी अंतर्गत काही रक्कम देय होणार असल्यास ती संस्थानमार्फत भरावी लागेल. सध्याचे कर सल्लागार हे VAT व आयकर वजावटीची कामे पाहतात. मात्र जीएसटी हा नवीन कायदा असल्याने व त्यात वेळोवेळी बदल होत असल्याने ते संस्थानला वेळीच कळण्यासाठी त्यानुसार कार्यप्रणालील बदल करणे त्यासाठीची वैधानिक विवरणे वेळेवर सादर करणे इत्यादीसाठी जीएसटी मधील माहितीगार सनदि लेखापाल यांची विहित पध्दतीने नेमणूक करुन जीएसटी कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी जीएसटी दर लागू करुन त्याप्रमाणे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यास व त्याकरीता स्वतंत्र कर सल्लागार नियुक्ती करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, GST कायद्याअंतर्गत संस्थानच्या व्यवहारांवर जीएसटी दर लागू करुन त्याप्रमाणे त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे व विहीत पध्दतीने स्वतंत्र कर सल्लागाराची नियुक्ती करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५३** **साईलिला व साई अर्पणसेवा द्वैमासिकांचे संपादकीय कामकाजकामी कार्यकारी संपादकीय पदावर कंत्राटी पध्दतीने कामगार विभागामार्फत घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रसाविक:-** जुने साईलीला व नवीन साई अर्पण सेवा व्दैमासिक सुरु करणेकामी आवश्यक ०६ पदांना मंजूरी प्राप्त होणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली होती.

आस्थापना विभागास वरील पदांच्या मंजूरी कार्यवाहीबाबत पत्र देऊन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

आस्थापना विभागाने मा. विधी व न्याय विभाग यांचेकडे पाठविणेकामी आवश्यक पदांचा मंजूरी प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला असता, सदर टिपणीवर मा. उपजिल्हाधिकारी साहेब यांनी सदरचे काम आऊट सोर्स पध्दतीने करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थानचे मुंबई कार्यालय अस्थापनेवर पदनिहाय आकृतीबंधास खालील प्रमाणे मान्यता आहे.

| अ.नं. | पदनाम | स्थायी मंजूर पद संख्या | सद्स्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | कार्यकारी संपादक | ०१ | रिक्त |
| ०२ | सहा. संपादक | ०१ | स्थायी कर्मचारी कार्यरत |
| ०३ | डिटीपी ऑपरेटर | ०१ | रिक्त / सध्या मानधन तत्वावर |

वरील अं.नं. ०१ ते ०३ यापदांना आकृतीबंधात मान्यता असून, अं. नं. ०१ व ०२ सध्या रिक्त आहे., अं.नं. ०२ वर कायम कर्मचारी यांची नेमणूक आहे व अ.नं. ०३ डिटीपी ऑपरेटरचे कामकाज कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर करुन घेण्यात येत आहे.

**प्रस्ताव:-** साईलीला व साई अर्पण सेवा कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने कार्यकारी संपादक पद भरणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार साईलीला संपादकीय कामकाज चांगल्या पध्दतीने होणेसाठी मा. श्री. मोहन जयकर साहेब, विश्वस्त यांनी देखील साईलीला कामकाजासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणेस तयार असल्याने, रिक्त असलेल्या कार्यकारी संपादक पदावर कंत्राटी पध्दतीने संपादक पदाची नेमणूक करणे आवश्यक आहे. यापूर्वी दि.०१.१०.१९९६ ते दि.३०.०९.२००५ पर्यंत श्री. विद्याधर ताठे, पुणे यांची श्री साईलीला व्दैमासिकाचे "कार्यकारी संपादक" या पदावर करारपध्दतीने (कॅक्ट्रक्ट बेसीसवर) दरमाह रु. ७,०००/-

(अक्षरी रुपये. सात हजार मात्र.) एकत्रित मानधनावर + पुणे ते मुंबई जाणे-येणे करिता रेल्वेच्या प्रथम वर्गाच्या पास खर्चासह आठवडयातून किमान ०३ दिवस मुंबई कार्यालयात काम करण्याच्या अटीवर नेमणूक करण्यात आलेली होती.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** वरील प्रमाणे संपादकीय कामकाज पदाचा प्रदीर्घ अनुभव असलेले श्री. विद्याधर ताठे कार्यकारी संपादक पदाचे कामकाज पहाणेस तयार आहेत.

तथापी, महाराष्ट्र शासन न्याय व विधी विभाग क्र. सासंवि-२०११/५३८/ प्र.क्र.६९/पुर्नबांधणी-१२ दि. २३.०१.२०१३ चे पत्रातील अ.नं. ०५ मध्ये श्री साईबाबा संसथानचे आस्थापनेवर मंजुर करण्यात आलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन कोणत्याही पदावर भरती करण्यात येऊ नये तसेच शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्त कर्मचा-यास सेवेत मुदतवाढ, पुर्ननियुक्ती, सेवानिवृतीनंतर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येऊ नये. असे आदेश प्राप्त आहेत.

करिता उपरोक्त मुद्याचे अनुषंगाने श्री. ताठे यांची करार पध्दतीने नियुक्तीबाबतच्या विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीपुढे सदर विषय निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.९६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईलिला व साई अर्पणसेवा हि द्वैमासिके निर्धारित वेळेत प्रसिध्द व्हावीत, याकरीता साईलिला द्वैमासिकाचे संपादकीय कामकाजकामी श्री.विद्याधर ताठे, पुणे व साई अर्पणसेवा द्वैमासिकाचे संपादकीय कामकाजकामी श्री.भगवान दातार, पुणे यांची कंत्राटी पध्दतीने प्रति माह एकत्रित रु.२५,०००/- मात्र मानधनावर दोन वर्ष कालावधीसाठी नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५४** **संस्थान कर्मचाऱ्यांसाठीच्या "गृहकर्ज व्याज सवलत योजना" नियमावलीस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साधारणतः सन १९९६-९७ च्या काळात संस्थानकडे उपलब्ध असणा-या निवासस्थानांची संख्या खुपच कमी होती. तसेच संस्थानकडे निवासस्थाने बांधणेकामी पुरेशी जागाही उपलब्ध नसल्याकारणाने बाहेर गावावरुन नोकरीसाठी आलेल्या कर्मचा-यांची खुप हाल होत असत. त्यामुळे कर्मचा-यांच्या संस्थान निवासस्थानासाठी (Staff Quarter) वाढत्या मागण्या लक्षात घेता संस्थानमार्फत गृहकर्ज घेणा-या कर्मचा-यांना व्याजाच्या दरात सवलत दिल्यास कर्मचा-यांना घर मिळेल तसेच कर्मचारी संस्थानकडे निवासस्थानची मागणीही करणार नाही अशा स्वरुपाची योजना तत्कालीन अध्यक्ष तसेच कार्यकारी आधिकारी यांनी कर्मचा-यांसाठी प्रस्तावीत केली. सदर योजनेसाठी तयार करण्यात आलेला प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.२/१०/१९९८ रोजी झालेल्या सभेत सादर केली असता निर्णय क्र.२१७ अन्वये संस्थान कर्मचा-यांना स्वतःचे मालकीचे घरे निर्माण करण्यास उद्युक्त करण्याच्या उद्देशाने कर्मचा-यांकरवी गृहनिर्माण सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्यास तिला एचडीएफसी वा तत्सम गृहकर्ज संस्थेकडून अर्थसहाय्य उपलब्ध होण्यास मदत करावी व त्यावरील ६% च्या पुढील व्याजाचा आर्थिक भार संस्थानने उचलावा असा निर्णय झाला.

तसेच बहुतेक संस्थान कर्मचारी स्थानिक वा परिसरातील रहिवासी असून, बहुसंख्य कर्मचा-यांनी घर बांधण्याच्या उद्देशाने शिरडी वा परिसरात जागा खरेदी करुन ठेवल्या होत्या. अशा सुमारे ७०० कर्मचा-यांनी एकत्रित निवेदनाच्या स्वरुपात विनंतीपुर्वक अर्ज केलेला होता त्यानुसार कर्मचा-याच्या श्रेणीनुसार त्याला सरळ संस्थानकडून ६% सवलतीच्या व्याजदराने गृहकर्जासाठी कर्ज उपलब्ध करुन दयावे म्हणून सदर निवेदनात विनंती केलेली होती.

त्यास अनुसरुन दिनांक २०-२१.०४.२००२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३२ अन्वये गृहकर्ज पुरविणा-या वित्तीय संस्थेकडून घेण्यात येणा-या गृहकर्जावर संस्थान कर्मचाऱ्यांना स्वतःचे मालकीचे जागेत घराचे बांधकामासाठी ६ % वरील व्याजाचा आर्थिक भार संस्थानने उचलण्याचे तत्वावर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून तसेच वैयक्तिक स्वरूपाच्या स्वतंत्र सदनिका बांधणीसाठी अथवा तयार स्वरूपाची सदनिका खरेदी करणेकामीची योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तदनंतर दिनांक २२ जून, २००४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२१९ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना वैयक्तिक गृहबांधणी कर्जाच्या व्याजातील संस्थानच्या अनुदानरुपी सहभागामध्ये ५० % पर्यंत वाढ (संस्थान हिस्सा ५० % व कर्मचारी हिस्सा ५०%) करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. सदर योजनेत गृहकर्जाची रक्कम एकुण पगाराच्या (मुळ वेतन+महागाई भत्ता) ४० पट किंवा रु.१० लाख यापेक्षा जी कमी असेल ती रक्कम बॅंकेकडून कर्ज म्हणून घेणेकामी हमी दिली जाते. तसेच दिनांक १५.११.२००८

रोजीच्या झालेल्या मा.व्यवस्थापन समितीत निर्णय क्र.८३७ नुसार संस्थान कर्मचा-यांसाठी सवलतपात्र गृकर्जाच्या सुधारीत नियम व अटी अधिक्रमीत करण्यात आल्या.

"गृहकर्ज व्याज सवलत योजना" सुरु झाल्यापासून आतापर्यंत ३५० कर्मचा-यांनी यात भाग घेतला आहे. (श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी, ११९, श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटी, ५१ तसेच टप्प्याटप्प्याने वैयक्तीक गृहकर्ज, १८०). सदर योजनेत संस्थानने व्याजाच्या सवलतीपोटी आतापर्यंत रक्कम रु.३,९३,००,७००/-मात्र कर्मचा-यांनी गृहकर्ज घेतलेल्या बॅंकेला आदा केलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२०-२१.०४.२००२ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२३२ तसेच दि.१५.११.२००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८३७ नुसार गृहकर्ज व्याज सवलत योजनेची नियमावली अधिक्रमित करण्यात येऊन खालीलप्रमाणे सुधारीत नियमावली प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१) या योजनेअंतर्गत राष्ट्रीयीकृत बॅंकेकडून घेतलेल्या कर्जासाठी वेळोवेळी लागु असलेल्या व्याजाच्या रक्कमेच्या ५० % रक्कम संस्थानकडून अनुदान म्हणून थेट बॅंकेला कर्मचा-याच्या मासिक हप्त्याच्या वसुलीसोबत आदा करण्यात येईल.

२) सदर कर्मचारी हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याची सेवा ही किमान ५ वर्ष झालेली असावी.

३) गृहकर्जासाठी द्यावयाचा जामीनदार हा संस्थानचा कायम कर्मचारी असावा व त्याचीही सेवा ५ वर्ष पुर्ण झाली असली पाहिजे.

४) कर्जदाराकडुन गृहकर्जाची परतफेड झाली नाही तर त्याला संस्थानकडून देय असलेल्या रक्कमेतून वसूल करुन बॅंकेस भरण्यात येईल त्यातून परतफेड झाली नाही तर जामिनदाराकडून वसूल करण्यात येईल.

५) ज्या कर्मचा-याचे सध्या स्वतःचे नांवे घर नाही त्यालाच या योजनेचा लाभ घेता येईल.

६) ज्या कर्मचा-यांना गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यायचा आहे त्यांचे स्वतःचे नांवावर (७/१२ उतारा) जागा असेल तरच त्याला व्याजाची सवलत देता येईल. इतरांकडून घेतलेले संमतीपत्र चालणार नाही.

७) संस्थान कर्मचा-यांस गृहकर्जावर व्याजाची सवलत ही त्याच्या पगाराच्या *(Pay in Pay Band+Grade pay+DA)* ४० पट किंवा जास्तीत जास्त रु.१0 लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम बॅंकेडून घेणेकामी हमी देण्यात येईल.

८) संपुर्ण सेवाकालावधीत एका कर्मचा-यास या योजनेचा एकदाच लाभ घेता येईल. पती व पत्नी दोघेही सेवेत असतील तर त्यापैकी एकालाच (विहीत मर्यादेतच) घरबांधणी /खरेदीकामी या योजनेचा लाभ घेता येईल.

९) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर करण्याकरीता घर/फ्लॅट अर्जदा-याच्या स्वतःच्या नावावर असणे आवश्यक राहिल व ते महाराष्ट्रात कोठेही असले तरी या योजनेचा लाभ घेता येईल.

१०) दि.१ मे, २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणा-या अर्जदारास *(दुस-या वेळेस जुळया अपत्यांचा अपवाद वगळता)* या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

११) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे गृहकर्ज वसुली पुर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे दोन्हीबाबींची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.

१२) कर्मचारी /अधिका-याने संस्थानकडून गृहकर्ज व्याज सवलत योजनेचा लाभ घेतल्यानंतर मंजुरी दिनांकापासून ६ महिन्यात घराचे काम सुरु करणे आवश्यक आहे. कमाल १८ महिन्यात बांधकाम पुर्ण करणे आवश्यक राहिल. १८ महिने किंवा घराचे/फ्लॅटचे बांधकाम/ताबा मिळविण्याचा दिनांक यापैकी जे आगोदर घडेल त्या दिनांकापासून संस्थानचे निवासस्थान खाली करुन द्यावे लागेल. अन्यथा संबंधीत कर्मचा-यावर पुढीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करणेत येईल

अ) जर कर्मचारी संस्थान निवासस्थानात राहत असेल तर संस्थान घराचे बाजार मुल्यानुसार भाडे वसुल करण्यात येईल.

आ) सदर कर्मचा-याने गृहकर्ज संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संस्थानने दिलेली व्याजाची सवलत प्रचलित व्याजदरापेक्षा २.७५ प्रतिशत जास्त दराने दंडनीय व्याजाची आकारणी करुन ती रक्कम त्याचे वेतनातून समान हप्त्यामध्ये वसूल करण्यात येईल.

१३) काही योग्य कारणामुळे घर बांधणीस विलंब झाल्यास/होत असल्यास सदर कारणे नमूद करुन घर बांधणीसाठी १८ महिन्यापेक्षा जास्त लागणा-या कालावधीस विशेष बाब म्हणून मुदतवाढ देणेबाबत निर्णय गृहकर्ज व्याज सवलती मंजुर करण्यास सक्षम कमिटिस राहिल. मात्र अशी वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१४) संपुर्ण गृहकर्जाची परतफेड होईपर्यंत घराची/फ्लॅटची मालमत्ता तारण ठेऊन त्यावर कर्ज उभारणी करता येणार नाही अथवा विक्री करता येणार नाही.

१५) संस्थान संमतीशिवाय गृहकर्ज बॅकेकडून परस्पर घेतले असेल तर त्यांना व्याजाची सवलत देण्यात येणार नाही. अशा प्रकरणात गृहकर्जाचा हप्ता वसूल करुन बॅकेत भरणा करण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

१६) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ घेतलेल्या अधिकारी/कर्मचा-याला सेवा समाप्तीपर्यंत संस्थानची संमती घेतल्याशिवाय घर/सदनिकेची विक्री करता येणार नाही किंवा अन्यप्रकारे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही.

१७) गृहकर्जधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास, अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही गृहकर्जाच्या मासिक हप्ता बॅकेस नियमित परतफेड करण्यास संबंधित कर्मचारी स्वतः जबाबदार राहील. कर्ज हप्ता भरणा केल्याचे चलन सादर केल्यानंतरच संस्थान स्वहिस्स्याची व्याजाची रक्कम भरणा करेल. विलंब आकारास कर्मचारी जबाबदार राहिल.

१८) गृहकर्ज व्याज सवलत योजना मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन किमान १५ वर्ष किंवा सेवानिवृत्ती यापैकी जी घटना आगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत संस्थानमध्ये सेवा करणे बंधनकारक राहिल. अगोदर राजीनामा दिल्यास किंवा सेवा सोडून गेल्यास, संस्थानने आदा केलेल्या व्याजाच्या रक्कमेची पुर्ण वसुली त्याचे रजा वेतन, ग्रॅच्युटीद्वारे मिळणा-या रक्कमेतून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

१९) या योजनेचा लाभ घेणारा कर्मचारी मयत झाल्यास त्याच्या वारसांना देय असलेल्या कुठल्याही रक्कमेतून त्यावेळेस शिल्लक असलेल्या कर्जाची एकुण (व्याजासह) रक्कम सदर गृहकर्ज पुरविणा-या बॅकेस वर्ग करुन त्याचे कर्जखाती भरण्यात येईल.

२०) या योजनेअंतर्गत भाग घेणा-या कर्मचा-यांनी फक्त राष्ट्रीयीकृत बॅकेकडूनच गृहकर्ज घेण्याचा प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा. इतर बॅकां/संस्थेकडून घेतलेल्या गृहकर्जास संस्थान हमी देणार नाही.

२१) या योजनेअंतर्गत गृहकर्ज पुरविणा-या राष्ट्रीयीकृत बॅकेस, तसेच संस्थानला आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कर्मचाऱ्याची राहिल.

२२) संबंधीत राष्ट्रीयीकृत बॅकांच्या धोरणानुसार गृहकर्ज व्याजासाठी असणारा प्रचलीत व्याजदरानुसार गृकर्जावरील व्याजाची सवलत परिगणित करण्यात येईल.

२३) गृहकर्ज व्याज सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी कर्मचा-याला खालील कागदपत्रे संस्थानकडे सादर करावे लागतील.

१. अर्ज २.प्रतिज्ञापत्र (१००रु.स्टॅम्पवर) ३. जामिनदाराचे संमतीपत्र ४. संस्थान सेवेत पाच वर्षे सेवा झाल्याचा आस्थापनेचा दाखला ५. स्वत:चे नांवे तसेच पत्नीच्या नांवे घर नसल्याचानगरपंचायत/ ग्रामपंचायतचा दाखला. ६. जर जुने वीट माती पत्र्याचे घर असेल तर ते मोडून त्याजागी नवीन घर बांधणेबाबतचे प्रतिज्ञापत्र ७. स्वत:चे नांवे 7/12 चा उतारा ८. प्लॅन (मुख्याधिकारी /ग्रामसेवकाची सही असलेला) ९. इस्टिमेट १०.बांधकाम परवाना ११. नवीन घर खरेदी करावयाचे असल्यास इसार पावती/ साठेखताची प्रत. १२. रेशन कार्डची झेरॉक्स १३.कर्मचारी सोसायटी निरंक दाखला १४. मागिल महिन्याची पगारस्लीप

२४) गृहकर्ज व्याज सवलत मंजुर करण्याचे अधिकार **"गृहकर्ज व्याज सवलत योजना"** समितीस राहतील व त्या समितीचे खालील सदस्य असतील.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी

२. संबंधीत उपजिल्हाधिकारी

३. उपकार्यकारी अधिकारी

४. मुख्य लेखाधिकारी

५. सर्व प्रशासकीय अधिकारी.

सदरची "गृहकर्ज व्याज सवलत योजना" हि नव्याने लाभ घेणा-या प्रकरणांसाठी लागू राहिल. यापुर्वीचे प्रकरणे जून्या नियमात राहतील.

तथापि, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सासंवि २०११/५३८/प्र.क्र.६९/पुर्नबांधणी-१२/का-सोळा, विधी व न्याय विभाग, दि.२३/०१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान सेवेतील अधिकारी/कर्मचा-यांना अधिनियमातील तरतूदीनुसार अनुज्ञेय असलेल्या वेतन भत्त्याशिवाय कोणतेही लाभ लागू करण्यापुर्वी त्यास शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी, असे कळविलेले आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त प्रस्तावीत "गृहकर्ज व्याज सवलत योजना" संस्थान कर्मचा-यांना लागु करणेपूर्वी त्यास शासनाची परवानगी घ्यावी लागणार आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावीत गृहकर्ज व्याज सवलत योजनेच्या नियमावलीस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस, तसेच मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी मिळाल्यानंतर सदरची नियमावली शासनाकडे मान्यतेस्तव पाठविणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांसाठीच्या प्रस्तावित "गृहकर्ज व्याज सवलत योजना" नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, ती अंतीम करणेस मान्यता देण्यात आली. यावेळी सदस्यांनी अशाही सुचना केल्या की, कर्मचाऱ्यांना शिर्डी परिसरातच नव्हे तर शिर्डी व्यतिरिक्त इतरही घर बांधावयाचे असल्यास पहिल्या घराच्या वेळेस या योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच गृहकर्जाचा विमा उतरविणेत यावा व संबंधीत कर्मचाऱ्याने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे उपविधी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.५५** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेस संस्थान परिसरात पादत्राणेगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुन, प्रसाद, नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉलसाठी जागा/ गाळे उपलब्ध होऊन मिळणेकामी मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.०६.०९.१७ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव–** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेस संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे संस्थेला विविध प्रकारच्या व्यवसायासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबत..

**प्रस्तावना-** मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडीनल जा.नं. श्रीसासंएक्रेसो/१६२/२०१७ दि.०६/०९/२०१७ अन्वये संस्थान मालकीच्या विविध ठिकाणच्या परिसरातील जागा/गाळे पादत्राणेगृह,क्लोकरुम,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम, प्रसाद, नॉव्हेल्टी, दूध व दुधजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉलसाठी भाडेतत्वावर उपलब्ध होवून मिळणेसाठी इकडेस विनंतीपत्र सादर केलेले आहे.

त्यास अनुसरुन इकडील दि.०७/१०/२०१७ व दि.३०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये संबंधीत विभागांकडून सोसायटीने मागणी केलेली जागा/गाळे सोसायटीस भाडेतत्वावर देणेकामीचे अभिप्राय मागविणेत आले.त्याप्रमाणे संबंधीत विभागांनी खालीलप्रमाणे इकडेस अभिप्राय सादर केलेले आहेत.

| अ.नं. | सोसायटीने मागणी केलेले जागा/गाळयाचे ठिकाण | जागा/गाळे वापराचे प्रयोजन | संबंधित विभागाचे नाव | उक्त सोसायटीस जागा/गाळे वापरासाठीचे विभागाचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | दुधजन्य पदार्थ,थंडपेय, व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर. | साईआश्रम-०१ (H- विंगसमोर) | साईआश्रम-१ या भक्तनिवास परिसरात ए ते जी या सात इमारत परिसरात सदर संस्थेस तीन गाळे भाडेतत्वावर दिलेले असुन पहाटे ०४ ते १२ या वेळेत सदर गाळयामध्ये निवासी परिसरात मोठया प्रमाणात साईभंक्ताची गर्दी असते. येथे सकाळचे वेळी एच ते एल या पाच इमारतीतील साईभक्तांना साबण, पिण्याचे पाणी, ब्रश, पेस्ट इ.आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे या करीता तात्पुरत्या स्वरुपात एक स्टॉलची आवश्यकता आहे. तरी प्रशासकीय इमारतीचे (आर-ब्लॉक) दक्षिण बाजूस लांडू विक्री कांऊटर आहेत्या शेजारील जागा संस्थान नियमाप्रमाणे प्रस्तावित केलेप्रमाणे सोसायटीचे मालकीचा एक स्टॉल वाढवावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | साईआश्रम-२ धर्मशाळा (श्री साईबाबा ज्यु.कॉलेजचे दक्षिण बाजूस) | दुधजन्य पदार्थ,थंडपेयविक्री स्टॉल | साईआश्रम धर्मशाळा | श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेजचे दक्षिण प्रवेशव्दारा जवळ दुधजन्य पदार्थ,थंडपेय, विक्री स्टॉलसाठी पार्किंग परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देता येईल. |
| ३. | व्दारावती भक्तनिवासस्थान | नॉव्हेल्टी स्टोअर | व्दारावती | नॉव्हेल्टी स्टोअर बरोबरच क्लोकरुम सुविधा उपलब्ध करुन देणेत यावी. |
| ४ | साईबाबा भक्तनिवासस्थान | प्रसाद व नॉव्हेल्टी स्टोअर | भक्तनिवासस्थान | भक्तनिवास - डी गाळा नं.२,३, व ४ यामध्ये यापुर्वी सोसायटी मार्फत नॉव्हेल्टी स्टोअर व प्रसाद स्टोअर चालविले जात होते.सद्यस्थितीमध्ये सदर गाळयाचा वापर लाडू विक्री कांऊटर, सा.भ.नि. गादी स्टोअर व कॅन्टीन विभाग या विभागीय कामासाठी होत आहे.तथापी पर्यायी व्यवस्था करुन सोसायटीस देता येईल. |
| ५. | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टोअर | श्री साईप्रसादालय | प्रसाद विक्री स्टॉलसाठी श्री साईप्रसादालय IN गेटजवळ एक स्टॉल करिता जागा दिलेली असुन सदर स्टॉल साईभक्तांस अपुरा पडत असल्याने प्रसादालय परिसरात वाढीव जागा देणेस हरकत नाही. |
| ६. | साईप्रसाद निवासस्थान (सेवाधाम इमारतीमधील प.कडिल रुम नं.५४,५५ व ५६ मध्ये किंवा कानिफनाथ मंदिरासमोर सध्या असलेल्या सेवाधाम इमारतीचे रुममध्ये) | प्रसाद, नॉव्हेल्टी ,थंडपेय व दुधजन्य पदार्थ. | साईप्रसाद निवास | सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील रुम नं.५४ हा संस्थान कर्मचारी श्री.नाना गुरुव यांना निवासाकरीता देण्यात आला आहे.रुम नं.५५ श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना (श्री.राजेद्र जगताप) यांचे कार्यालयासाठी देण्यात आला आहे. रुम नं. ५६ श्री साईनाथ कर्मचारी गृह तारण संस्थेसाठी देण्यात आला आहे. तसेच कानिफनाथ मंदिरासमोरील रुम नं.६८ व ६९ श्री साईबाबा कर्मचारी संघटना (श्री.रामराव शेळके) यांना देण्यात आले आहे.रुम नं.७० होमगार्ड कार्यालय व रुम नं.७१ एम.एस.ई.बी कार्यालयास देण्यात आले आहे. |
| ७. | मंदिर परिसर शनिमहाराज जवळील (पुर्वी शनिअप्पा यांचेकडे असलेला जागा/गाळा) | तेल,रुईचा हार व प्रसाद विक्री | मंदिर विभाग | सदरची खोली सत्यनारायण महाप्रसाद बनविणेकामी व प्रसाद सत्यनारायण हॉलपर्यंत पोहचकरणेकामी सोईचे असल्याने तसेच सत्यनारायण प्रसाद बनविणेकामी जवळपास कुठलेही जागा उपलब्ध नसल्याने जागा देता येणार नाही. |
| ८. | मंदिर विभाग (अब्दुलबाबा समाधीचे मागील बाजूस असलेला जागा/ गाळा ) | प्रसाद विक्री स्टॉल | मंदिर विभाग | अभिप्राय प्राप्त नाही. |
| ९. | शैक्षणिक संकुल | शालेय साहित्य अल्पदराने विक्री करणेसाठी | १.औ.प्र.संस्था, शिर्डी | संस्थेच्या प्रांगणात एकही गाळा नाही. तथापि मोकळया जागेमध्ये गाळा सुरु करणेचे अनुषंगाने मुख्य गेटजवळ उपलब्ध जागेमध्ये सदर सोसायटीस जागा उपलब्ध करुन देता येईल. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | २. इं.मि.स्कूल<br><br>३. कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | शैक्षणिक संकुलाचे प्रवेशद्वार उत्तर बाजूचे भिंतीलगत पूर्व बाजूने स्टॉलसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल.<br><br>प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| १०. | श्री साईनाथ रुग्णालय (रुग्णालय परिसरातील कॅन्टीनसमोरील रिकामे जागेत) | जनरल स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय स्टोअर. | साईनाथ रुग्णालय | श्री साईनाथ रुग्णालयात गाळा उपलब्ध नसुन चहा कॅन्टीन समोरच्या मोकळया जागेत सोसायटी स्टॉलसाठी जागा देता येईल. |
| ११ | साईनाथ मंगल कार्यालयाचे उत्तर पूर्व बाजूस | दुधजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल | लाडू व बर्फी निर्मिती विभाग | मंगल कार्यालयाचे आतमध्ये जागा उपलब्ध नाही. मात्र मंगल कार्यालयाचे पश्चिम बाजूस असणारी संरक्षक भिंत व मंगल कार्यालय यांच्यामध्ये लिंबाचे झाडाखाली साधारणत: अंदाजे ८फूट X १० फूटाची त्रिकोणी जागा उपलब्ध आहे. सदरील मोकळया जागेत साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी, शिर्डी यांना दुधजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टॉल सुरु करण्यास इकडील विभागाची कोणतीही हरकत नाही. |

विभागाचा अभिप्राय– **अ)** (१) उपरोक्त अ.नं.६ साईप्रसाद निवासस्थान या इमारतीत सोसायटीस वापरास देणेसाठी सध्यस्थितीत गाळा/जागा उपलब्ध नाही. (२) उपरोक्त अ.नं.७ व ८ मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव यापूर्वी दिलेली जागा/गाळे खाली करुन घेण्यात आलेले आहेत. त्यामुळे या बाबीचा पुन:श्च विचार करता येणार नाही.

**ब)** उपरोक्त अ.नं.१ साईआश्रम भाग-१, अ.नं.२ साईआश्रम-२ (धर्मशाळा),अ.नं.३ द्वारावती भक्तनिवास, अ.नं.५ साईप्रसादालय विभाग, अ.नं.१० साईनाथ रुग्णालय, अ.नं.११ साईनाथ मंगल कार्यालय परिसरात प्रत्येकी सुमारे १०X१० ची मोकळी जागा आणि अ.नं.९ शैक्षणिक संकुलात एकूण तीन ठिकाणी १०X१० आकाराची मोकळी जागा तसेच अ.नं.४ साईबाबा भक्तनिवासस्थान मधील तीन गाळयांचे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडे निश्चिती करुन घेवून शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेने ११ महीन्यांचे कराराने सोसायटीस वापरास देता येतील.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी या संस्थेस संस्थान परिसरात पादत्राणेगृह, क्लोकरुम, मोबाईल कॅमेरा क्लोकरुन, प्रसाद, नॉव्हेल्टी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय विक्री स्टॉलसाठी जागा/ गाळे उपलब्ध करुन देणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव प्रथमत: स्थानिक उपसमिती सभेसमोर सादर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५६** **संस्थान आस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना भरपाई सुट्टी देणेकामी सेवाविनियमामध्ये दुरुस्ती करणे.**

**प्रस्ताव-** **(अ)** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांनी निर्णय क्र.सासंवि-२०१२/प्र.क्र.१९/पुर्नबांधणी-७/का.सोळा, दि.२८ ऑक्टोबर,२०१३ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी चे आस्थापनेवरील कर्मचा-यांसाठी सेवा विनियम तयार करणेत आले असुन सदरचे सेवाविनियम जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४४६०/ २०१४ दि.२७ डिसेंबर,२०१४ रोजीचे आदेशान्वये दि.०१ जानेवारी, २०१५ पासुन संस्थानसाठी लागू करणेत आलेले आहे.

सदर सेवाविनियमातील सर्व साधारण सेवा अटी विनियम-२०१३, प्रकरण-४ मधील (४) सुट्टया यामधील मुद्दा क्रमांक २१. भरपाई सुट्टी यामध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

"(१) गट क आणि ड मधील संस्थानाच्या ज्या कर्मचा-याला त्याच्या नजीकच्या वरिष्ठ प्राधिका-यांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही सुट्टीच्या दिवशी कर्तव्यावर उपस्थित रहाण्याचे निर्देश दिले असतील अशा कर्मचा-याला समितीने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधिन राहुन अशा प्रकारे गमावलेल्या साप्ताहिक सुट्टी किंवा सुट्टयांच्या संख्येएवढया भरपाई सुट्टया घेण्यास अनुमती दिली जाईल.

(२) एका वेळेस तिन दिवसापेक्षा जास्त भरपाई रजा साचविता येणार नाही.

(३) परिस्थीतीची निकड त्याचप्रमाणे संस्थानाच्या कर्मचा-याची सोय लक्षात घेऊन नजीकच्या वरिष्ठ प्राधिकाराच्या इच्छेनुसार भरपाई सुट्टया घेण्यास अनुमती घेता येईल.

(४) ज्या दिवशी भरपाई सुट्टी नियत झाली असेल त्या दिवसापासुन दोन महिन्याच्या कालावधीत भरपाई सुट्टी घेता येईल.

(५) भरपाई सुट्टी नियमीत रजेच्या किंवा सुट्टयांच्या मागे किंवा पुढे जोडली जाऊ शकते. "

सेवा विनियमातील उपरोक्त अटी-शर्ती संस्थानचे फक्त **गट क व ड** संवर्गातील कर्मचा-यांना लागू करणेत आलेल्या आहेत. तथापि, सरकारी सुट्टीच्या दिवशी शिर्डीमध्ये श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असल्याने संस्थानमधील सर्वच संवर्गातील कर्मचा-यांना कर्तव्यावर हजर राहुन शिर्डीमध्ये आलेल्या साईभक्तांची / शासकीय कर्मचा-यांची दर्शन, निवास, भोजन, रुग्णालय, इ. व्यवस्था करावी लागते. वेळ प्रसंगी जास्त वेळ थांबुनही साईभक्तांना सेवा पुरवाव्या लागतात.

**(ब)** शासकीय सेवेतील कर्मचा-यांना क्वचित प्रसंगी साप्ताहिक सुटी किंवा इतर कोणत्याही सट्टीचे दिवशी कर्तव्यावर हजर रहावे लागते, मात्र संस्थानमधील सर्वच संवर्गातील कर्मचा-यांना वरिष्ठांच्या निर्देशानुसार प्रत्येक सरकारी सुटीचे दिवशी शिर्डीमध्ये साईभक्तांची होणा-या गर्दीचे नियोजन करणे, सेवा पुरविणे इ. साठी कर्तव्यावर उपस्थित राहावे लागत असल्याने सदर दिवशी कर्मचा-यांना शक्यतो रजा / सुट्टी दिली जात नाही.

**(क)** उपरोक्त प्रमाणे साईभक्त व कर्मचा-यांचे सोईचे दृष्टीने संस्थानमधील सर्वच संवर्गातील कर्मचा-यांना साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी अगर कोणत्याही सुट्टीच्या दिवशी कर्तव्यावर हजर राहावे लागल्यास त्यांना बदली सुटी देणेबाबत सेवाविनियमातील सर्वसाधारण सेवा अटीं विनियम-२०१३, प्रकरण-०४ मधील (४) सुटया मधील मुद्दा क्र.२१ " (१) गट क आणि ड मधील संस्थानच्या ज्या कर्मचा-याला त्याच्या नजीकच्या वरिष्ठ प्राधिका-यांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही सुट्टीच्या दिवशी कर्तव्यावर उपस्थित रहाण्याचे निर्देश दिले असतील अशा कर्मचा-याला समितीने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अटींच्या अधिन राहुन अशा प्रकारे गमावलेल्या साप्ताहिक सुट्टी किंवा सुट्टयांच्या संख्येएवढया भरपाई सुट्टया घेण्यास अनुमती दिली जाईल. "ऐवजी– "(१) संस्थान आस्थापनेवरील सर्व संवर्गातील कर्मचा-यांना त्याच्या नजीकच्या वरिष्ठ प्राधिका-यांने साप्ताहिक सुट्टी अगर इतर कोणत्याही सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कर्तव्यावर उपस्थित राहाण्याचे निर्देश दिलेस अशा कर्मचा-यांना समितीने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या अटिंच्या अधिन राहुन अशा प्रकारे गमावलेल्या साप्ताहिक सुट्टी अगर सार्वजनिक सुट्टीच्या संख्येएवढया भरपाई सुट्टया घेण्यास अनुमती दिली जाईल." आणि (०४) ज्या दिवशी भरपाई सुट्टी नियत झाली असेल त्या दिवसापासुन दोन महिन्याच्या कालावधीत भरपाई सुट्टी घेता येईल. त्या ऐवजी ज्या दिवशी भरपाई सुट्टी नियत झाली असेल त्या दिवसापासुन एक महिन्याच्या कालावधीत भरपाई सुट्टी घेता येईल. असा बदल करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे सेवाविनियमात दुरुस्ती करणेकामी सदरचा प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा होणेस, तसेच व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर सेवाविनयमात दुरुस्तीचा प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करणेसाठीच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना एक महिन्याच्या कालावधीत भरपाई सुट्टी देणेबाबत सेवाविनियमामध्ये दुरुस्ती करणेकामीचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.५७** **साई पादुका दर्शन सोहळयाकरीताचे बसमध्ये अंतर्गत बदल व बाहेरील बाजुस स्टिकर लावणेकामी आलेल्या खर्चाची रक्कम ND's Art World Pvt. Ltd., Mumbai यांना आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व

प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ चे सभेतील निर्णय क्र.६२७ नुसार,"साई पादुका दर्शन सोहळयाकरीता महाराष्ट्रातील पुर्ण जिल्हयांमध्ये श्रींच्या पादुका दर्शनासाठी घेऊन जाणेसाठी एक व बाहेरील राज्यांकरीता एक अशा ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेसाठी टाटा, अशोक लेलंण्ड व भारतबेंज या तीन कंपन्यांच्या बसेसबाबत तपशीलवार चर्चा करणेत येऊन, त्यामधील भारतबेंज या कंपनीची (917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB)०२ ए.सी. बस खरेदी करणेकामी भारतबेंज कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व सदरहू बसमध्ये श्रींच्या पादुका ठेवणेसाठी आवश्यक असलेली बॉडीबिल्डींग करणेस तसेच त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली",असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, भारतबेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB या मॉडेलच्या अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेकामीप्राप्त झालेली दरपत्रके दि.३०/०८/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आली. यावेळी सर्व अधिकृत विक्रेत्यांनी भारत बेंज कंपनीचे ए.सी. बस करीता समान दर दिलेले होते. त्यामुळे शिर्डी विभागाकरीता भारत बेंजचे अधिकृत डिलर,घाडगे ट्रकींग,KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे)यांना जा.नं.एसएसएस/वाहन/२९०५/२०१७ दि.३०/०८/२०१७ अन्वये खालील तपशिला प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०९/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं. ५ व निर्णय क्र.७७२ नुसार, भारत बेंज कंपनीचे एक ए.सी. प्रवासी बस खरेदी करणे कामी देण्यात आलेल्या पुरवठा आदेश व अग्रिम रक्कमेस कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे) यांचेकडून दि०४/१०/२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे.

दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६९० अन्वये,साई पादुका सोहळयाकरीता कमी कालावधीत बसमध्येअंतर्गत फेरबदल करणेसाठी प्रति बस रु.१० लाख मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली. तथापि, प्रथम एक बस घेऊन, त्यात प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेत यावा. सदर बसला पादुका दर्शन सोहळयासाठी मिळणारा प्रतिसाद पाहून आवश्यकतेनुसार दुसरी बस खरेदी करुन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फेरबदल करणेत यावा, असे ठरले.

तसेच दि.२५/०९/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ७९३ अन्वये, पादुका दर्शन सोहळयासाठीची नवीन बस संस्थानच्या ताब्यात मिळाल्यानंतर सदरहू बसचे RTO पासींग करणेसाठी ३ ते ४ दिवसाचा कालावधी लागणार आहे व पासींग झालेनंतर समाधी शताब्दी वर्षामधील पहिल्या पादुका दर्शनसोहळयासाठी दि.११/१०/२०१७ रोजी गोवा येथे बस पाठवावयाची आहे. त्यामुळे पादुका दर्शन सोहळयासाठी या बसमध्ये आवश्यक फेरबदल करणेकामी ४ ते ५ दिवसाचा कमी कालावधी असलेमुळे प्रचलित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवुन काम करुन घेणे शक्य होणार नाही. याकरीता या बसच्या फेर बदलाचे काम ND's Art World Pvt. Ltd. Mumbai यांचेकडून करुन घेण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे रु.८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

**विभागाचा अभिप्रायः-** दि.०६/१०/२०१७ रोजी मा. उप जिल्हाधिकारी, श्री मनोज घोडेपाटील यांनी सदर बसवर पेटींग काम करणे व अंतर्गत बदल करणे करीता सदर बस ND's Art World Pvt. Ltd. Mumbai कर्जत, (शहापुर, मुंबई) येथे पाठविणे बाबत दुरुध्वनी वरुन वाहन विभागास कळविले होते. त्यानुसार दि.०७/१०/२०१७ रोजी सदर बसवर पेटींग काम करणे व अंतर्गत बदल करणे करीता सदर बस ND's Art World Pvt. Ltd. Mumbai कर्जत, (शहापुर, मुंबई) येथे पाठविणेस मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार ND's Art World Pvt. Ltd. Mumbai कर्जत, (शहापुर, मुंबई) यांनी बसवर पेटींग व अंतर्गत बदल करुन दि.१०/१०/२०१७ रोजी संस्थानचे ताब्यात दिलेले आहे. सदर कामी एकुण रु.७,५०,०००/- मात्र खर्च आलेचे मा. उप जिल्हाधिकारी, श्री. घोडेपाटील यांनी कळविले आहे. सदर खर्च मोटारकार वाहन खरेदी खर्च या अंदाजपत्रकातुन करता येईल.

**मागणीः-**तरी उपरोक्त प्रमाणे साई पादुका दर्शन सोहळ्या करीताचे बस मध्ये अंतर्गत बदल व बाहेरील बाजुस स्टिकर लावणे कामी आलेल्या एकुण रु.७,५०,०००/- मात्रची रक्कम ND's Art World Pvt. Ltd. Mumbai यांना अदा करणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साई पादुका दर्शन सोहळ्याकरीताचे बस मध्ये अंतर्गत बदल व बाहेरील बाजुस स्टिकर लावणेकामी आलेल्या एकुण रु.७,५०,०००/- मात्रची रक्कम ND's Art World Pvt. Ltd. Mumbai यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५८** **श्री साईबाबा संस्थानचे नुतनीकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटनाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:**

1) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 30/11/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 865.

2) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 23/05/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 445.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबांचे जीवनकार्य शिकवणुक याचा प्रचार प्रसार होणेकरीता तसेच साईभक्तांना मार्गदर्शन तथा सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेकामी संस्थानची अधिकृत वेबसाईट www.sai.org.in विकसित करुन कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. सदर वेबसाईटवर साईबाबांविषयी सर्व माहिती, साईचरित्र संस्थानचे अधिकृत प्रकाशने व ऑनलाईन देणगी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन सदर वेबसाईटचे अद्यायावतीकरण व मोबाईल ऑप्लीकेशन विकसित करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.30.11.2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 865 अन्वये, मान्यता घेण्यात आली होती.

उपरोक्त निर्णयान्वये सदरकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबवून, मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/07/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 523 (10) अन्वये वेबासाईट अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसित करणेकामी निम्नत्तम दरधारक M/s Web Werks, Mumbai यांना जा.नं. 1987 /2017 दि. 13/07/2017 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत M/s Web Werks, Mumbai यांना देण्यात आलेल्या कार्यादेशानुसार त्यांनी वेबासाईट अद्यायावतीकरणाचे कामास सुरुवात केलेली असून, सदरचे काम दि. 05/12/2017 पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

दि.23 नोव्हेंबर, 2017 रोजी श्री साईबाबा जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे उद्घाटन समारंभ मा. उपराष्ट्रपती महोदय यांचे हस्ते करण्याचे नियोजीत आहे. सदरचे कार्यक्रमामध्ये नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटन मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे शुभहस्ते करता येईल, जेणेकरुन संस्थानचे वेबसाईटची प्रशिद्धी होऊन, जास्तीत-जास्त साईभक्तांना यामार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ घेता येईल. सबब, दि.23 नोव्हेंबर, 2017 रोजी मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे हस्ते होणा-या श्री साईबाबा जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे उद्घाटन समारंभाचे कार्यक्रमात संस्थानचे नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटनाचे कार्यक्रमाचा समावेश होणेसाठी मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** संस्थानचे नुतनिकृत वेबसाईटची प्रशिद्धी होऊन, जास्तीत-जास्त साईभक्तांना यामार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ घेता यावा या करिता, दि.23 नोव्हेंबर, 2017 रोजी मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे शुभहस्ते होणा-या श्री साईबाबा जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे उद्घाटन समारंभाचे कार्यक्रमात संस्थानचे

नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटनचा समावेश होणेसाठी मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** संस्थानचे नुतनिकृत वेबसाईटची प्रशिद्धी होऊन, जास्तीत-जास्त साईभक्तांना यामार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ घेता यावा याकरिता, दि.23 नोव्हेंबर, 2017 रोजी मा. उपराष्ट्रपती महोदय यांचे शुभहस्ते होणा-या श्री साईबाबा जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे उद्घाटन समारंभाचे कार्यक्रमात संस्थानचे नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटनचा समावेश होणेसाठी मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२३ नोव्हेंबर, २०१७ रोजी मा.उपराष्ट्रपती महोदय यांचे शुभहस्ते होणाऱ्या श्री साईबाबा जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषदेचे उद्घाटन समारंभाचे कार्यक्रमात संस्थानचे नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशनचे उद्घाटनचा समावेश करणेत मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू नुतनीकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्लीकेशन साईभक्तांचे सोयीसाठी सुरु करणेत यावे, जेणेकरुन उद्घाटन करणेपुर्वी त्यामधील अडी-अडचणी समजतील व त्यांचे निवारण करता येईल, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.५९** **व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाजासाठी पाठविलेल्या या क्षेत्रातील तज्ञ व सहकारी यांचेमार्फत सदरकामी करणेत आलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१)भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९.

**प्रास्ताविक:-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंट अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावरील चर्चेअंती देण्यात आलेल्या निर्णयामध्ये साईटेक प्रकल्प देखभालीसंदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे, यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास, सदरहू कार्यप्रणाली सुरळीत चालू ठेवणेसाठी नवीन कंपनीची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी व त्यास "साईटेक प्रकल्प टप्पा-१ दुरूस्ती देखभाल" असे संबोधण्यात यावे व सध्या साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालीसाठी नवीन कंपनीची नेमणूक करणेकामी चालू असलेली ई-निविदा प्रक्रियाही पुढे चालू ठेवणेत यावी व त्यास "साईटेक प्रकल्प-२" असे संबोधण्यात यावे.

मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी पुणे, यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये व प्रशासकीय कामकाजात अडचणी येऊ नये, याकरीता समिती सदस्य मा.श्री प्रताप भोसले यांनी या क्षेत्रातील तज्ञ व त्यांचे सहकारी यांना दि.११.०७.२०१७ पासून करावयाच्या कार्यवाहीबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करणेकामी शिर्डी येथे पाठविले आहे. सदरहू तज्ञ व त्यांचे सहकारी हे काम विनामुल्य करणार असल्याने त्यांची, त्यास साईटेक प्रकल्प-१ दुरूस्ती देखभाल निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत द्वारावती निवासस्थान येथे २ वातानुकूलीत खोल्यांमध्ये मोफत निवासव्यवस्था, प्रसादालयामधील विशेष बैठक कक्षामध्ये मोफत भोजनव्यवस्था, याचबरोबर शिर्डी येथे अंतर्गत दळणवळणासाठी मोफत वाहनव्यवस्था करणेत यावी. एक महिन्यामध्ये त्यांनी प्रकल्प देखभालीसाठी काय काम करता येईल याचा अभ्यास करुन पुढील सभेसमोर त्याचे सादरीकरण करावे. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, ई-निविदा प्रकियेशिवाय अशा प्रकारे या क्षेत्रातील तज्ञ व त्यांचे सहकारी यांचेवर काम सोपविणे तसेच संस्थानची माहिती त्यांना देणे योग्य नाही. परंतू समिती सदस्यांनी त्यांना विनामोबदला काम करणेस परवानगी दिली.

याचबरोबर मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अशीही माहिती दिली की, प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) हे शिर्डी येथे भेट देणार असून त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे साईटेक प्रकल्प टप्पा-२ चे टेंडर तयार करावे, यास समिती सदस्यांनी सहमती दर्शविली. त्यानुसार सद्यस्थितीत राबविणेत येत असलेल्या साईटेक प्रकल्प टप्पा-२ साठी फेर

ई-निविदा प्रसिद्ध करणेपुर्वी ई-निविदेची तपशिलवार माहिती (हार्डवेअर,सॉफ्टवेअर,मनुष्यबळ इ.) अंदाजीत रक्कम तसेच ओरॅकल ईआरपी व इतर कार्यप्रणाली यांची तुलनात्मक माहितीही समीतीसमोर सादर करावी, त्याप्रमाणे संस्थानचे कामकाजात गतिमानता व सुसुत्रता यावी याकरीता संस्थानमध्ये SOP (Standard Operating Procedure) कार्यान्वीत करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी."

उपरोक्त निर्देशान्वये, पुढीलप्रमाणे कार्यवाही सद्यस्थितीत इकडील विभागामार्फत चालू आहे.

1. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास, सदरहू कार्यप्रणाली सुरळीत चालू ठेवणेसाठी नवीन कंपनीची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी ई-निविदा मसुदा तयार करणेची कार्यवाही इकडील विभागामार्फत अंतीम टप्प्यात आहे.
2. मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा.प्रताप भोसले यांनी पाठविलेल्या या क्षेत्रातील तज्ञ व त्यांचे सहकारी यांचेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

उपरोक्त निर्णयामध्ये नमुद केलेप्रमाणे श्री.अजित प्रधान व त्यांचे ०४ सहकारी हे माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये दि.११.०७.२०१७ पासून येत आहेत. नमुद केलेप्रमाणे त्यांचे निवासासाठी द्वारावती निवासस्थान येथे वातानुकूलीत खोल्या विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच आवश्यकतेनुसार वाहन विभागामार्फत दळणवळणासाठी विनामुल्य वाहन उपलब्ध करुन देणेत येते.

उपरोक्त निर्देशानुसार सदरचे तज्ञांमार्फत मेकॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांनी साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास याकामी त्यांचेमार्फत काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करणे अपेक्षीत होते, परंतू आजपावेतो अशा प्रकारचा कोणताही अहवाल त्यांचेमार्फत प्राप्त झालेला नाही. सद्यस्थितीत मे.कॉग्नीझंट यांचेमार्फत प्रकल्पअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले हेल्पडेस्क, डेटा सेंटर, नेटवर्क, हार्डवेअर व सॉफ्टवेअर याबाबत देखभालीचे कामकाज पाहिले जाते. याकामी मे.कॉग्नीझंट यांचेमार्फत शिर्डी येथे २१ तांत्रिक कर्मचारी व पुणे येथे ४ तज्ञ पुर्णवेळ कार्यरत आहेत.

आजपावेतो त्यांचेमार्फत फक्त खरेदी व भांडार विभाग येथे माल आवक/जावक व्यवहारांच्या नोंदी घेणेकामी प्रणाली (Data Entry Form & Reports)विकसीत करुन त्याचे प्रात्यक्षीक संबंधीतांना आयटी विभागाचे उपस्थितीत दाखविण्यात आलेले आहे. प्रत्यक्षात सदर प्रणालीमार्फत घेण्यात आलेल्या व्यवहारांच्या नोंदींचे परीणाम Oracle ERP कार्यप्रणालीमध्ये अकाऊंटच्या दृष्टीने (Trial Balance, Balance Sheet)योग्य प्रकारे होतात अथवा नाही,Oracle ERP या कार्यप्रणालीशी त्यांचे प्रणालीची जोडणी (Integration)होणे तांत्रिक शक्य आहे किंवा नाही याबाबत खातरजमा होणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात कार्यप्रणालीबाबत काही तांत्रिक अडचणी येऊ नये याकरीता सदरची प्रणाली कार्यान्वीत करणेपुर्वी Oracle कंपनीचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत खरेदी, भांडार विभागाबरोबरच इतरही विभागांसाठी एकूण ३७ कार्यप्रणाली विकसीत करुन संबंधीत विभागांमध्येकार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सदर कार्यान्वीत कार्यप्रणालींमध्ये देणगी कार्यालय, ऑनलाईन सर्व्हिसेस, प्रसादालय, रुम बुकींग, पुस्तक विक्री इ.सारख्या साईभक्तांना संस्थानमार्फत देण्यात येणा-या सेवा-सुविधा संदर्भातील तसेच पगारबील, आवक/जावक इ.सारख्या प्रशासनासंदर्भातील कार्यप्रणालींचा समावेश आहे. सदरच्या कार्यप्रणाली ह्या पुर्णवेळ कार्यान्वीत राहणे अत्यावश्यक असते. तसेच कार्यप्रणालींचे अनुषंगिक डेटा सेंटर, नेटवर्क व हार्डवेअर इ. संदर्भातील आलेल्या अडचणींचे निरसण वेळेवर होणे व यासाठी संबधीत पुरेसे तांत्रिक कर्मचारी पुर्णवेळ उपलब्ध अत्यावश्यक असते.

उपरोक्तप्रमाणे सर्व माहिती सदरहू तज्ञ व त्यांचे सहकारी यांना दिलेली आहे तसेच त्यांनीही सदरची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांचेमार्फत कशी चालते हे पाहिलेले आहे. परंतू आवश्यक कार्यवाहीबाबतचा अहवाल आजपावेतो सादर केलेला नाही अथवा सदरकामी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ त्यांनी शिर्डी येथे उपलब्ध केलेले नाही. सबब, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाज थांबविल्यास आवश्यक कार्यवाही सदरहू तज्ञांमार्फत होईल याबाबत साशंकता आहे

मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदरहू तज्ञांसाठी द्वारावती निवासस्थान येथे करणेत आलेल्या विनामुल्य निवास व्यवस्थेपोटी द्वारावती निवासस्थान यांनी संदर्भ क्र.०२ अन्वये कळविलेप्रमाणे आजपावेतो रक्कम रुपये ८१,९००/- मात्र इतका सेवाआकार झालेला आहे. तसेच वाहन विभागाने सदरहू तज्ञांसाठी आवश्यकतेप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना भेट देणेकामी आवश्यकतेप्रमाणे विनामुल्य वाहन उपलब्ध करुन देणेत येते.

3. साईटेक प्रकल्प टप्पा-२ साठी राबविणेत येणा-या ई-निविदा प्रक्रियेविषयी मा.प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेत येत असून, प्रक्रियेविषयी त्यांना पुर्ण माहिती देणेत आलेली आहे. तसेच त्यांचे प्रतिनिधींनी शिर्डी येथे प्रत्यक्ष येऊन साईटेक प्रकल्प व ई-निविदा प्रक्रियेविषयी पुर्ण माहिती घेतलेली आहे. त्यानुसार मा.प्रधान सचिव यांनी याकामी संस्थानने नेमलेले कंन्सल्टंट केपीएमजी व संस्थानचे आयटी विभाग यांची संयुक्त बैठक त्यांचे कक्षात दि.२२.०९.२०१७ रोजी आयोजित केलेली होती. सदरचे बैठकीमध्ये मा.प्रधान सचिव यांनी सुचित केलेप्रमाणे प्रकल्प अहवालामध्ये सुधारणा/बदल करण्याची कार्यवाही केपीएमजी यांचेमार्फत चालू आहे. तसेच ओरॅकल कंपनीचे प्रतिनिधींनीही शिर्डी येथे येऊन प्रकल्प विषयक माहिती घेतलेली असून आवश्यक कार्यवाहीबाबतचा अहवाल संस्थानला सादर करणार आहेत.
4. संस्थानचे कामकाजात गतीमानता व सुसुत्रता यावी याकरीता संस्थानमध्ये SOP (Standard Operating Procedure) कार्यान्वीत करणेकामी ई-निविदा राबविणेकरीता आवश्यक माहिती संकलीत करणेची कार्यवाही इकडील विभागामार्फत सुरू करणेत आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ नुसार मा.प्रधान सचिव यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या साईटेक प्रकल्प निविदा प्रक्रियेविषयी व साईटेक प्रकल्प दूरूस्ती देखभालीकामी करावयाच्या कार्यवाही बाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणेकामी पाठविणेत आलेल्या तज्ञांमार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अवलोकनार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ नुसार मा.प्रधान सचिव यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या साईटेक प्रकल्प निविदा प्रक्रियेविषयी व साईटेक प्रकल्प दूरूस्ती देखभालीकामी करावयाच्या कार्यवाहीबाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणेकामी पाठविणेत आलेल्या तज्ञांमार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अवलोकनार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छानना, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ नुसार मा.प्रधान सचिव यांचे मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या साईटेक प्रकल्प निविदा प्रक्रियेविषयी व साईटेक प्रकल्प दुरूस्ती देखभालीकामी करावयाच्या कार्यवाहीबाबतचा अभ्यास करुन अहवाल सादर करणेकामी पाठविणेत आलेल्या तज्ञांमार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अवलोकनार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव, सविनय सादर.

**निर्णय क्र.९७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्यवस्थापन समिती सदस्यांनी साईटेक प्रकल्प देखभालीचे कामकाजासाठी पाठविलेल्या या क्षेत्रातील तज्ञ व सहकारी यांनी यांचेमार्फत सदरकामी करणेत आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल मागवून समितीस अवगत करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.६०** **पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर बाटली विक्रीचे दराबाबत.**

**प्रस्ताव-** कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना चहा, कॉफी, दुध, बिस्किटे विक्री करणे बरोबरच पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर ची विक्री करण्यात येते, नोव्हेंबर २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत आवश्यक असलेल्या पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर १ ली. व ५००मिली. बॉटल अनुक्रमे रू.६.२०/- ,रु ४.७०/- या दराने खरेदी केलेल्या आहेत. त्यांची विक्री रू.८.००/- व रु ६.००/- या दराने होत होती.

मा.व्यवस्थापन समिती दि. १६/२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११७ - " यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साईभक्तांशी आर्थिक व्यवहार करतांना नाणे टचाईची समस्या व सुट्टया पैशांच्या देवाण – घेवाणी बाबतच्या तक्रारी याचा विचार करता,कॅन्टीन विभागामार्फत एक लिटर पाणी बाटली रु.८/- ऐवजी रु.१०/- व ५००मि.लि.पाणी बाटली रु.६/-ऐवजी रु.५/- या दराप्रमाणे साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावी असे ठरले " त्यानुसार दि. ०७/०४/२०१६ रोजी दुपारी १२ वाजे पासुन पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर १ लि.रु. १०/- व ५००मिली ची रु. ५.०० या दराने विक्री चालु करण्यात आलेली आहे.

सन २०१६/२०१७ मध्ये आवश्यक असलेल्या पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर १ लि. व ५००मि.ली च्या बॉटल अनुक्रमे रु. ५.९५ व रु.४.५० पैसे या दराने त्या खरेदी झालेल्या आहेत. व त्यांची विक्री रू.१० व रू ५.०० या दराने होत होती. सदर कालवाधीमध्ये १ लि.पाणी बाटल्यांची एकुण १६,७९,३०१ नगांची विक्री झालेली आहे. त्यांची खरेदी किंमत रू.१०,०७८,८२७/- होती तर त्यांची विक्री किंमत रू.१६,७३०,६८८/- प्राप्त झालेली आहे. तसेच ५०० मि.लि बाटल्यांची एकुण ५,६३,८५२ नगांची विक्री झालेली आहे. त्यांची खरेदी किंमत रू. २५,६४,४७९/- होती तर त्यांची विक्री किंमत रू. २८,४३,४२८/- प्राप्त झालेली आहे.

आता, सन २०१७/२०१८ करीता आवश्यक असलेल्या पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल वॉटर १ लि. व ५००मि.ली बॉटल रु. ५.२५ व ३.९५ पैसे या दराने खरेदी होत आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६०- " यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला दरवर्षी बाटलीबंद पिण्याचे पाणी खरेदी करणेसाठी किती खर्च येतो व संस्थान मार्फत बाटली बंद पाण्याचा प्रकल्प उभारणीस किती खर्च येईल,त्याचबरोबर संस्थानला बाटलीबंद पाण्याची विक्री करता येईल का,याचा उल्लेख उपरोक्त प्रस्तावामध्ये दिसुन येत नाही ,सबब सदरहु प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा.तसेच साईभक्तांना सध्या विक्री करणेत येत असलेले बाटली बंद पाणी खरेदी मुल्यामध्येच उपलब्ध करुन देण्यात यावे.त्याचबरोबर विविध कंपन्यांना आवाहन करणेत येऊन,त्याचे पिण्याचे वेडीग मशिन्स रॉयल्टी बेसीसवर संस्थान परिसरामध्ये बसविणेस परवानगी देण्यात यावी,असे ठरले " सदर निर्णयातील कॅन्टीन विभागाशी संबधीत असलेला ' तसेच साईभक्तांना सध्या विक्री करणेत येत असलेले बाटली बंद पाणी खरेदी मुल्यामध्येच उपलब्ध करुन देण्यात यावे' उपरोक्त निर्णयांनुसार १ लि. पाणी बाटली रू.५.२५ व ५०० मि.लि बाटली रू.३.९५ पैसे या खरेदी दराने विक्री केली तर १ लि. पाणी बाटली बाजारात रू.२० व ५०० मि.लि पाणी बाटली रू.१० या भावाने विक्री केल्या जातात. त्यामुळे या पाणी बाटल्या संस्थानकडुन घेऊन त्याची बाजारात पुर्न:विक्री होऊ शकते.

कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांना चहा,कॉफी,दूध,बिस्कीटे,पाणी बाटल्या यांची विक्री केली जाते. माहे एप्रील २०१७ ते माहे जून २०१७ असे या तिमाहीत एकुण विक्री रू. १,४५,६२,१६२ झाली त्यामध्ये १ लि.पाणी बाटली ३,६४,८७४ व ५००मि.लि पाणी बाटली ३५,३७० असे एकुण ४००२४४ नगांची विक्री झालेली आहे. उपरोक्त तिमाहीचा एकुण आस्थापना खर्च रू.९०९६४६२/- इतका झाला असुन त्यातील १०% खर्च हा पाणी बाटली विक्रीसाठी धरला आहे. त्यानुसार प्रति बाटली करीता रू.२.२७ पैसे आस्थापना खर्च विचारात घेऊन १ लि. पाणी खरेदी दर रू ५.२५ पैसे +आस्थापना खर्च रू. २.२७ पैसे = रू ७.५२ पैसे तसेच ५०० मि.लि बाटली खरेदीचा दर रू३.९५ पैसे + आस्थापना खर्च रू. २.२७ पैसे मिळुन = रू६.२२पैसे अशी त्यांची किंमत होते.

सध्या विक्री करण्यात येत असलेल्या बाटल्यांवर उत्पादकाकंडुन "FOR SSSव विक्री किंमत ५०० मि.लि रू.०५ व १ लि. रू.१० असे प्रिटेंड आहे. व त्याच दराने सध्या विक्री करण्यात आहे. दि.१५/०६/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४६० नुसार साईभक्तांना सध्या विक्री करण्यात असलेले बाटली बंद पाणी खरेदी मुल्यामध्येच विक्री करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि. १६/२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ११७ चे निर्णयानुरूप उत्पादकाकडुन फक्त संस्थानला पुरविण्यात येणा-या १ लि. बाटल्यांवर रू.१०/- व ५००मि.लि बाटल्यांवर रू.५/- अशी विक्री किंमत दर्शविण्यात येत आहे. त्याप्रमाणे १ लि.पाणी बाटली रू.१०/- व ५००मि.लि पाणी बाटली रू.५/- या दराने विक्री करण्यात येत आहे. आस्थापना खर्च धरून ५००मि.लि पाणी बाटलीचे विक्रीतील घटीची भरपाई १ लि.पाणी बाटलीचे विक्रीतुन मिळु शकेल. ना नफा-ना तोटा यास अनुसरून १ लि.पाणी बाटली रू.१०/- व ५००मि.लि बाटली रू.५/- या दराने विक्री करण्यात यावी असे मत आहे. सदर विक्रीवर आता लागु असलेला GST सुध्दा भरावा लागणार आहे.

तरी १ लि. पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल पाणी बाटली रू.१०/- व ५०० मि.ली पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल पाणी बाटली रू.०५/- या दराने विक्री करण्यास मान्यता मिळावी. यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर विषय सविनय सादर.

**निर्णय क्र.९७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील बाबींचा विचार करता, १ लिटर पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल पाणी बाटली रु.१०/- मात्र व ५०० मि.ली पॅकेज्ड ड्रिंकिंग मिनरल पाणी बाटली रु.०५/- मात्र या दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६१** **भाजीपाला पुरवठा आदेशातील निम्नतम दरधारक मे.जे.के. आलू भांडार, राहाता हे कांदा पुरवू शकत नाहीत याकरीता त्यांची अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचे नावाचा संस्थान खरेदी प्रक्रियेमधील काळया यादीत समावेश करणे.**

**प्रस्ताव-** मे.जे.के. आलू भंडार, राहाता यांनी दिनांक १४.१०.२०१७ रोजीचे पत्रान्वये, "मला प्रसादालयासाठी बटाटा, कांदा, लिंबु, आद्रक, भाजीपाला पुरविणेसाठी ऑर्डर मिळालेली आहे.

महोदय आजपर्यंत मी आपल्या मागणीनुसार ना नफा ना तोटा सहन करुन वरील भाजीपाला पुरविला आहे.

परंतु मध्यंतरीच्या काळात पावसाचे प्रमाण जास्त झालेने बाहेरील राज्यातुन कांद्याची आवक बंद झाली. तसेच येथील कांदा बाहेर जावु लागला पर्यायाने कांद्याच्या किंमतीत दररोज भरमसाठ वाढ होत आहे. मी एक छोटा व गरीब भाजीपाला व्यापारी आहे मी आजपर्यंत आपले मागणीनुसार अल्पदरात भाजीपाला त्वरीत पुरविलेला आहे.

परंतु माझी आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने रोज होणारे कांद्यामधील नुकसान मी सहन करुन शकत नाही तरी सदर कालावधीसाठी मला कांद्याच्या दरामध्ये वाढ मिळावी," अशी विनंती केलेली आहे.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेसाठी प्रस्ताव सादर केला होता.

प्रसादालय विभागाने दिनांक २४.१०.२०१७ चे पत्रान्वये मे.जे.के. आलू भंडार, राहाता यांचेकडून कांद्याचा मागणीप्रमाणे पुरवठा होत नसलेबाबत कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

मे.जे.के.आलू भंडार, राहाता यांनी ऑक्टोबर महिन्यामध्ये खालीलप्रमाणे कांदा पुरविलेला नसल्याचे कळविले आहे.

| अ.नं. | मालाचा तपशिल | मागणी दिनांक | मागणी केलेला माल किलोमध्ये | पुरवठा केलेला माल किलोमध्ये |
|---|---|---|---|---|
| १ | कांदा | ०८.१०.२०१७ | १५०० | १०५० |
| २ | | १२.१०.२०१७ | २००० | ९०३ |
| ३ | | १५.१०.२०१७ | २००० | १४८० |
| ४ | | १९.१०.२०१७ | १५०० | ११२० |
| ५ | | २२.१०.२०१७ | २५०० | ७४६ |

याबाबतही प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

जे.के.आलू भंडार, राहाता यांनी दि.२८.१०.२०१७ चे पत्रान्वये "मला प्रसादालयासाठी बटाटा, कांदा, लिंबू, आद्रक, भाजीपाला पुरविणेसाठी ऑर्डर मिळालेली आहे. आजपर्यंत मी आपल्या मागणीनुसार ४ महिन्यापासून तोटा सहन करत असुन, वरील भाजीपाला पुरविला आहे. परंतु मध्यंतरीच्या काळात पावसाचे प्रमाण पुर्ण राज्यामध्ये जास्त झालेने बाहेरील राज्यातून कांद्याची आवक बंद झाली. तसेच येथील कांदा बाहेर जाऊ लागला पर्यायाने कांद्याच्या किंमतीत दररोज भरमसाठ वाढ होत आहे. मी एक छोटा व गरीब भाजीपाला व्यापारी आहे. मी आजपर्यंत आपले मागणीनुसार अल्पदरात भाजीपाला त्वरीत पुरविलेला आहे. परंतु माझी आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने रोज होणारे कांद्यामधील नुकसान मी सहन करु शकत नाही. तरी उपरोक्त कालावधीत मला दिलेला भाजीपाला आदेश त्वरीत रद्द करावा, ही विनंती. मी दिनांक ०१.११.२०१७ पासुन माल पाठवू शकत नाही. क्षमस्व. परंतु साईबाबा चरणची सेवा करीता होतो व करीत राहिल. परंतु मार्केट लिलाव बाजारभावप्रमाणे मला दर देण्यात यावे व त्याप्रमाणे मी माल पुरविण्यास तयार असुन तसेच साईबाबा चरण ची सेवा करण्यास तयार आहे व राहिल," अशी विनंती केली आहे.

सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

संस्थानने सन २०१७-१८ वर्षासाठी तीन-तीन महिन्यांचे चार टप्यामध्ये भाजीपाला खरेदीचे टेंडर काढले होते. यामध्ये जुलै ते सप्टेंबर-२०१७, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१७, जानेवारी ते मार्च-२०१८ या कालावधीसाठी मे.जे.के.आलू भंडार, राहाता यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. यापैकी जुलै ते सप्टेंबर-२०१७ या कालावधीत त्यांनी संस्थानला आवश्यकतेप्रमाणे भाजीपाला पुरविलेला आहे.

तिसरा टप्पा ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१७ या कालावधीमध्ये मे.जे.के.आलू भंडार, राहाता यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

| Sr.No | Tender Sr.No | Description of Items | No.of Qty | Units | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| | **1.00** | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | |
| 1 | 1.01 | बटाटा- चांगल्या प्रतीचा व मोठा | 37,500.00 | किलो | 12.00 | 4,50,000.00 |
| 2 | 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 10.00 | 3,75,000.00 |
| 3 | 1.14 | लिंबू - चांगल्या प्रतीचे | 50.00 | किलो | 25.00 | 1,250.00 |
| 4 | 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 20.00 | 20,000.00 |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | | | 8,46,250.00 |
| | | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **25,387.50** |

चौथा टप्पा जानेवारी ते मार्च-२०१८ या कालावधीमध्ये मे.जे.के.आलू भंडार, राहाता यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश दिलेला आहे.

| Sr.No | Tender Sr.No | Description of Items | No.of Qty | Units | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| | **1.00** | **अ) सर्व हंगामात उपलब्ध असलेला भाजीपाला** | | | | |
| 1 | 1.01 | बटाटा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 75,000.00 | किलो | 9.00 | 6,75,000.00 |
| 2 | 1.02 | कांदा - चांगल्या प्रतीचा व मोठा | 37500.00 | किलो | 11.00 | 4,12,500.00 |
| 3 | 1.15 | आद्रक (आले) - चांगल्या प्रतीचे | 1000.00 | किलो | 20.00 | 20,000.00 |
| | | **एकुण रक्कम रुपये** | | | | **11,07,500.00** |
| | | **3% सुरक्षा अनामत रक्कम रुपये** | | | | **33,225.00** |

संस्थानने भाजीपाला खरेदीकामी काढलेल्या निविदेतील दरवाढबाबतची अटी-शर्ती खालीलप्रमाणे -

**निविदा अट-शर्त क्र.३०** - निविदेतील मंजुर दराने भाजीपाला पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने भाजीपाला पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने भाजीपाला खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

तसेच याबाबत सदर निविदाधारकांशी दिनांक ०८ जुलै, २०१७ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. त्यातील दरवाढी व पुरवठा नाकारलेसंबंधीच्या अटी-शर्ती खालीलप्रमाणे -

**करारनाम्यातील अट-शर्त क्र.९** - वर नमूद कालावधीपर्यंत पार्टी नं.२ यांनी मंजुर दराने भाजीपाल्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

**अट-शर्त क्र.१०** - पार्टी नं.२ यांनी भाजीपाल्याचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा प्रक्रिया करुन भाजीपाला खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडून वसुल केली जाईल. तसेच भाजीपाला पुरवठ्यासाठी पार्टी नं.२ यांना पुढील तीन वर्षासाठी काळ्या यादीत समाविष्ट केले जाईल. सुरक्षा अनामत रक्कम जमा करण्यात येईल.

**अट-शर्त क्र.१८** - निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारका भाजीपाल्याचा पुरवठा करुन शकला नाही व तसे पार्टी नं.२ निविदाधारकाने त्वरील पार्टी नं.१ यांना लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

**अट-शर्त क्र.२३** - उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार पार्टी नं.१ संस्थानचे व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. पार्टी नं.१ निविदाधारकाची कोणतीही अट/अटी पार्टी नं.२ संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**अट-शर्त क्र.२४** - सदर करारनाम्यातील सर्व शर्ती व अटी पार्टी नं.२ यांचे वर बंधनकारक राहतील, मात्र कोणत्याही एका अटीचा भंग पार्टी नं.२ यांनी केल्यास सदरचा करार पार्टी नं.१ यांना कोणतीही लेखी सुचना

न देता रद्द करण्याचा अधिकार राहिल व तशा परिस्थितीत पार्टी नं.२ यांचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी पार्टी नं.१ यांनी पत्करलेली नाही.

सदर पुरवठयापोटी मे. जे.के.आलु भंडार, राहाता यांची खालीलप्रमाणे बीले आदा करावयाची बाकी आहेत.

| अ.नं. | बील.नं.दिनांक | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | २३८/८.१०.२०१७ | २६,०५०/- |
| ०२ | २३९/१२.१०.२०१७ | १९,०८०/- |
| ०३ | २४०/१५.१०.२०१७ | २३,७५०/- |
| ०४ | २४२/२२.१०.२०१७ | १९,६६०/- |
| ०५ | २४३/२६.१०.२०१७ | १२,७५०/- |
| ०६ | २४४/२९.१०.२०१७ | ३७,३८२/- |
| | **एकुण रक्कम** | **१,३८,६७२/-** |

तसेच साईभक्तांना प्रसाद भोजनाची सेवा देण्यात अडचण येऊ नये म्हणुन भाजीपाल्यातील वरील चार आयटेम्सस कृषी उत्पन्न बाजार समिती, राहाता येथुन खरेदी करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती व जे.के.आलु भंडार, राहाता यांना दिलेल्या पुरवठा आदेशातील व करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार कांदा पुरवठा करणेकामी त्यांना दरवाढ देता येणार नाही तसेच कांदा वगळता इतरही आयटेम्स त्यांचेकडून खरेदी करता येणार नाहीत असे वाटते.

तरी,

१. जे.के.आलु भंडार, राहाता यांची सदर पुरवठयापोटी जमा असलेली ३ सुरक्षा अनामत रक्कम आक्टोबर- १७ ते डिसेंबर-१७ रु. २५,३८८/- व जानेवारी-१७ ते मार्च-१८ रु. ३३,२२५/- अशी एकुण रक्कम रुपये ५८,६१३/- दंड म्हणून संस्थान खाती जमा करुन घेणेबाबत,

२. जे.के.आलु भंडार, राहाता यांची वर नमुद बीले आदा करणेबाबत,

३. जे.के.आलु भंडार, राहाता यांनी पुरवठा आदेश व करारनाम्यास अधीन राहून संस्थानला भाजीपाल्याचा पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्यांचा तीन वर्षांसाठी काळ्या यादीत समावेश करणेबाबत,

४. प्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी अडचण येऊ नये म्हणून जे.के.आलु भंडार, राहाता यांना पुरवठा आदेश दिलेला भाजीपाला पुर्वीचे प्रचलित पद्धतीनुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, राहाता येथुन लिलावाव्दारे खरेदी करणेस,

५. उर्वरीत चार महिन्यांचे कालावधीसाठी सदरचे ४ आयटेम्ससाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस,

वरील अ.नं.१ ते ५ बाबींबाबत उचीत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भाजीपाला खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेच्या वेळेसचे कांद्याचे दर व सध्याचे बाजारभावामधील दर यामध्ये खुपच वाढ झालेली असल्यामुळे, सहानुभूतीच्या दृष्टीने मे.जे.के. आलू भांडार, राहाता यांची विनंती मान्य करण्यात येऊन, त्यांची यापुर्वीची बीले व अनामत रक्कम परत करणेत यावी. तसेच यापुढील कालावधीसाठी भाजीपाला खरेदीकामी नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी व सदरहू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जे.के.आलु भंडार, राहाता यांना पुरवठा आदेश दिलेला भाजीपाला पुर्वीचे प्रचलित पद्धतीनुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, राहाता येथुन लिलावाव्दारे खरेदी करणेत यावा, असेठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे सालाबादप्रमाणे मान्यवरांना श्री साई दैनंदिन व दिनदर्शिका- २०१८ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र१४ कलम नं. १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणेतरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थान मार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. दरवर्षी मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय,मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,मा.उप जिल्हाधिकारी , मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication Expenses) खर्ची टाकली जाते.

सन २०१८ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०१८ रु.८६/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका (१ पाने) २०१८ रु.१५/- नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मा.अध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १०० | १०० |
| ०२ | मा.उपाध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १०० | १०० |
| ०३ | मा.सदस्य, मा.व्यवस्थापन समिती | ९०० | ९०० |
| ०४ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | १०० | १०० |
| ०५ | मा.उप जिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ५० | ५० |
| ०६ | मा.उप जिल्हाधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ५० | ५० |
| ०७ | मा.उप कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ५० | ५० |
| ०८ | सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा. कार्यकारी अभियंता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी (प्रत्येकी २५ नग प्रमाणे X ०६ व्यक्ती) | १५० | १५० |
| | **एकुण नग** | **१५००** | **१५००** |
| | **एकुण किंमत** | **१,२९,०००/-** | **२२,५००/-** |

श्री साई दैनंदिनी मोफत वाटप किंमत रु. १,२९,०००/- + श्री साई दिनदर्शिका मोफत वाटप किंमत रु. २२,५००/- एकूण रुपये. १,५१,५००- (अक्षरी रुपये. एक लाख एक्कावन हजार पाचशे मात्र.)

संस्थानतर्फे वेळोवेळो प्रकाशने/ फोटो/ सीडी उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.१२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता प्राप्त आहे. करिता वरीलप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१८ विनामूल्य भेट देणेकामी तसेच प्रकाशने विभाग खाती किंमतीसह खर्ची टाकणेस मान्यता मिळणेस विषय मा.व्यवस्थापन सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे सालाबादप्रमाणे मान्यवरांना खालीलप्रमाणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका- २०१८ विनामूल्य भेट देणेस व त्याचा खर्च प्रकाशने विभाग खाती किंमतीसह खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.**

| अ.नं | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०१८ रु.८६/- नग संख्या | श्री साई दिनदर्शिका (१ पाने) २०१८ रु.१५/- नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मा.अध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १५० | १५० |
| ०२ | मा.उपाध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १५० | १५० |
| ०३ | मा.सदस्य, मा.व्यवस्थापन समिती | १३५० | १३५० |
| ०४ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | १५० | १५० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५ | मा.उप जिल्हाधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०६ | मा.उप जिल्हाधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०७ | मा.उप कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | ७५ | ७५ |
| ०८ | सर्व प्रशासकीय अधिकारी आणि मा.कार्यकारी अभियंता,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी<br>(प्रत्येकी ३५ नग प्रमाणे X ०६ व्यक्ती) | २१० | २१० |
| ०९ | विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन | ५० | ५० |

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६३** **सन- २०१८ साठीचे मराठी व हिंदी-इंग्रजी श्री साईलिला द्वैमासिक अंक छपाई करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीव्दारे श्री साईलीला व्दैमासिक अंक सन-१९२३ पासून प्रकाशित करुन वर्गणीदारांना पाठविले जातात. श्री साईलीला अंकात साईबाबांचे भक्तांना आलेले अनुभव, संस्थानमार्फत घेण्यात आलेल्या नवीन योजना, सुधारणा, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील कार्यक्रम व संस्थानचे उत्सव आदी विशेष घटनांच्या वर्तालेप यात छपाई करण्यात येत असल्याने त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे अधिकृत नियतकालिक असेही म्हटले जाते.

आज अखेर सभासद होणेकरिता (०६ अंकासाठी) भारतात वार्षिक रु.५०/- व अजीवन सभासदासाठी रु. १०००/- व विदेशात वार्षिक रु. १०००/- देणगी मूल्य आकारणी केली जाते.

मागील सन-२०१७ च्या ०१ वर्ष कालावधीसाठी साईलीला अंक छपाईचा कार्यादेश मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई व मे. प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई यांना पारित करण्यात आलेला होता त्याचा तपशिलखालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अ. नं. | तपशिल | व्दैमासिक छपाई संख्या | एकूण वार्षिक प्रती छपाई संख्या | मागील मंजूर दर रुपये. पैसे. | एकूण रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला अंक मराठी (०५ अंक) ३२+४ पाने = ३६ पाने | ९००० | ४५,००० | ११.०० | ४,९५,०००/- |
| ०२ | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक (०१ अंक) ६४+४ पाने= ६८ पाने | ९००० | ९००० | १६.०० | १,४४,०००/- |
| ०३ | श्री साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (०५ अंक) ३२+४ पाने = ३६ पाने | १७५०० | ८७५०० | ११.०८ | ९,६९,५००/- |
| ०४ | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४+४ पाने= ६८ पाने | १७५०० | १७५०० | १६/- | २,८०,०००/- |
| | | | | एकूण रु. | १८,८८,५००/- |

**प्रस्ताव:-** माहे जानेवारी २०१८ पासून पुढे ०१ वर्ष अंक सभासदांना छपाई करुन वितरण करणेकामी कार्यवाही करावे असे दि. ०३.११.२०१७ चे पत्राने सहा. संपादक, श्री साईलीला, मुंबई कार्यालय यांनी कळविले आहे. त्यानुसार छपाईचा तपशिल खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | व्दैमासिक अंदाजे छपाई संख्या | एकूण वार्षिक प्रती छपाई संख्या | अंदाजे रक्कम रुपये. पैसे. | एकूण रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईलीला अंक मराठी (०५ अंक) ३२+४ पाने = ३६ पाने | ७००० | ३५,००० | १६.०० | ५,६०,०००/- |
| ०२ | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक (०१ अंक) ६४+४ पाने= ६८ पाने | ७००० | ७००० | २०.०० | १४००००/- |
| ०३ | श्री साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (०५ अंक) ३२+४ पाने = ३६ पाने | १५००० | ७५,००० | १६.०० | १२०००००/- |
| ०४ | श्री पुण्यतिथी (दसरा) विशेषांक हिंदी-इंग्रजी (०१ अंक) ६४+४ पाने= ६८ पाने | १५००० | १५००० | २०.०० | ३०००००/- |
| | | | | एकूण रु. | **२२,००,०००/-** |

(अक्षरी रुपये. बावीस लाख मात्र.)

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागणीकरुन निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना छपाई कार्यादेश पारित करण्यात येईल. याकामी येणा-या अंदाजे रु. २२,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकात श्री साईलीला अंक छपाईसाठी केलेल्या रु. २७,००,०००/- अंदाजपत्रकीय तरतूद करण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रस्तावित सन-२०१८ साठीचे श्री साईलीला व्दैमासिक अंक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.
२) जनसंपर्क विभागाव्दारे वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना प्रसिध्दी व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.
३) संस्थान संकेतस्थळावर ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता असावी.
४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून मा.खरेदी समिती सभेपुढे तांत्रिक बीड उघडून, प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा पुर्व पात्रते विषयकागदपत्रांची छाननी करणे, त्यातील पात्र निविदाकारांचा तक्ता तयार करुन त्यांचे व्यवसायिक बीड उघडणे, त्यानंतर मा. उपसमिती सभेपुढे निम्नत्तम दर (L-1) देऊ केलेल्या निविदाकारांना कार्यादेश पारित करणेबाबत मान्यता घेणे इ. कामकाज पध्दतीस मान्यता असावी.

सबब सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१८ साठीचे मराठी व हिंदी-इंग्रजी श्री साईलिला द्वैमासिक अंक छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे हिंदी व इंग्रजी श्री साईलिला द्वैमासिक अंक स्वतंत्र छापणेत यावेत व साईभक्तांच्या मागणीप्रमाणे ते हिंदी अथवा इंग्रजी भाषेतील श्री साईलिला द्वैमासिक उपलब्ध करुन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.६४** **मंदिर परिसरातील देणगी कार्यालय नं.१ चे विस्तारीकरणासह फर्निचर व इंटेरीअरचे कामाचे ठेकेदार मे.कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे यांचे अंतिम बील आदा करणे.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरातील देणगी कार्यालय नं.१ चे विस्तारीकरणासह फर्निचर व इटेरीअरचे काम ठेकेदार कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हिसेस, पुणे यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्यापहिले व अंतिम बिलाची आर्किटेक्ट यांचेमार्फत सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावतक्ता स्वरूपात खालीलप्रमाणेसादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- मंदिर परिसरातील देणगी कार्यालय नं.१ चे विस्तारीकरणासह फर्निचर व इटेरीअरचे काम करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे |
| मंजूर निविदा रक्कम | रु.७,३९,६१०/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.५६७(१) दि.१७/०७/२०१४ |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.६,७३,०९४/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | -- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.६,७३,०९४/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.६६,५१६/- (८.९९३%)कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०२ महिने,दि.१२.११.२०१६ अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२८.१०.२०१६ |
| ठेकेदार कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेट सर्व्हिसेस, पुणे यांनी दि२८.१०.२०१६ अखेर सदरचे काम मूदतीत पूर्ण केलेले आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल**रु.६,७३,०९४/-** मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**निर्णय क्र.९७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.कार्पोरेट इन्फ्रास्ट्रक्चर मॅनेजमेंट सर्व्हीसेस, पुणे यांनी मंदिर परिसरातील देणगी कार्यालय नं.१ चे विस्तारीकरणासह फर्निचर व इंटेरीअरचे काम पुर्ण केलेले असल्यामुळे त्यांच्या कामाचे रु.६,७३,०९४/- मात्र अंतिम बील आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.६५** **बांधकाम ठेकेदार यांची विविध बांधकामांचीअंतीम देयके आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत खालील कामे पूर्ण करण्यात आली असून, पूर्ण केलेल्या कामांची ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलांची बांधकाम विभागामार्फत तपासणी करण्यत्त आली आहे. सदरहु बिले अदा करणेबाबचा प्रस्ताव तक्त्याचे स्वरुपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

**(१) श्री साईनाथ रुग्णालयाजवळील कॅन्टीन इमारतीमध्ये ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन्स, इमारतीचे आतिल रंगकाम व इतर अनुषंगीक कामे करणे**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | **श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता.** |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | १४,२८,२३५/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | निर्णय क्र.२२४ (६), दि.२७/०३/२०१७ |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | १४,०३,२१३/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | ८,४१,०००/-(ॲडव्हान्स) |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | २५,०२२/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | १३% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ४५ दिवस,दि.१३/०५/२०१७ ते दि.२७/०६/२०१७ |
| प्रत्यक्षकाम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.२७/०६/२०१७ |
| रिटेंशन रक्कम एक वर्षांसाठी | ७१,४१२/- |
| **शेरा –** ठेकेदार यांनी निविदेनुसार काम पूर्ण केले असुन त्यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची रक्कम रु.१४,०३,२१३/- मात्र मंजूर होवून ठेकेदार श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता यांना देण्यात आलेला ॲडव्हान्स वजा जाता रु.५,६२,२१३/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**(२) साईनगर कर्मचारी वसाहत परिसरात साईनगर, समर्पन व साईध्यान इमारतीचे भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | **मे.एन. एस. बनकर पाटील ॲन्ड कं. श्रीरामपूर** |
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | १२,१८,२०६/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |

| | |
|---|---|
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | निर्णय क्र.५८४ (११), दि.३१/०८/२०१७ |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | १२,१८,०२६/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | -- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | १८०/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | १३% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०३ महिने, दि.२१/१०/२०१६ ते २०/०१/२०१७ |
| प्रत्यक्षकाम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.३१/०५/२०१७ |
| रिटेंशन रक्कम सहा महिन्यांसाठी | ६०,९१०/- |
| **शेरा** –ठेकेदार यांना ऑक्टोबर २०१६ मध्ये काम सुरु करणेसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली होती. सदरचे काम करतांना खोदाईचे वेळी ड्रेनेजलाईन व चेंबर्स दुरुस्ती करणेत वेळ गेला आहे. ठेकेदार यांनी निविदेनुसार काम पूर्ण केले असुन त्यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची रक्कम रु.१२,१८,०२६/- येते. त्यांनी सदर काम १३० दिवस उशिराने केले आहे. त्यासाठी त्यांना रु.५००/- प्रतिदिन दराने रु. ६५,०००/-मात्र दंडआकारणी होत आहे. ठेकेदार यांनी दि.१८/०४/२०१७ रोजीचे पत्राने सदरहु परिसरातील पाईपलाईन खराब असल्याने पेव्हींग ब्लॉक बसविणेपुर्वी संस्थानमार्फत ड्रेनेज दुरुस्ती करणेस वेळ लागला असल्याने प्रत्यक्षात सदरचे काम सुरु करणेची दि.२४/०२/२०१७ पासून पुढे ३ महिने ग्राह्य धरणेबाबत विनंती केली आहे. तरी पहिले व अंतिम बिलाची रक्कम रु.१२,१८,०२६/- मंजूर होवून ठेकेदार मे.एन. एस. बनकर पाटील ॲन्ड कं. श्रीरामपूर यांना अदा करणेबाबत तसेच त्यांचे विनंतीनुसार त्यांना दि.३१/०५/२०१७ अखेर मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**(३) संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्यगटातील सहारस्ते विकसन करणे.**

| ठेकेदाराचे नांव | **टारमॅट लि, नवी मुंबई**<br>**(पुर्वीची रोमन टारमॅट लि, नवी मुंबई)** |
|---|---|
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | ३३,८३,२६,१९९/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.५३४, दि.०४/०७/२०१० |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | १०वे व अंतिम बिल - १९,८७,३८,८६१/-<br>१०वे व अंतिम भावफरक बिल - ४,४६,१८,४९६/-<br>एकुण २४,३३,५७,३५७/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | ९ वे बिल - १९,६८,३४,३०६/-<br>९ वे भावफरक बिल - ४,३५,८१,४०७/-<br>एकुण २४,०४,१५,७१३/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | ९,४९,६८,८४२/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | १०% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | १५ महिने, दि.६/०८/२०१०तेदि.५/११/२०११ |
| प्रत्यक्षकाम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.३१/०८/२०१५ |
| रिटेंशन रक्कम तीन वर्षांसाठी | १,२१,६७,८६८/- |
| टिपणी- शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०६ रस्ते संस्थान निधीतुन ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेमार्फत विकसित करणेत आलेआहेत.मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील त्यावर निर्णय क्र.२५९ खालीप्रमाणे झाला आहे.<br>“… यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रथम प्राधान्य गटातील सहा रस्ते विकसन करणे कामाचे ठेकेदार कंपनीचे नावात रोमन टारमॅट लि. ऐवजी टारमॅट लि. असा बदल झालेला असल्याने, त्यांचे विनंतीनुसार त्यांची देयके व अंतीम बीलाची रक्कम टारमॅट लि. या नावाने आदा करणेत यावी. तसेच सदरहू ठेकेदाराने कंभमेळा-२०१५ चे कालावधीमध्ये वाहतुकीचे नियोजन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीने रस्ता क्र.०५ चे काम केलेले असल्यामुळे त्यांना सदर कामासाठी दि.३१.०८.२०१५ अखेर मुदतवाढ देण्यात यावी व या रस्त्याचे (रस्ता क्र.०५) उर्वरीत काम समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर तातडीने करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने अल्प मुदतीच्या ई-निविदा मागविण्यात याव्यात.” | |

| |
|---|
| त्यानुसार रस्ता क्र. ०५ चे उर्वरीत कामासाठी नव्याने ई-निविदा मागविण्यात आल्या असुन निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला आहे. ठेकेदार रोमन टारमॅट लि, नवी मुंबई यांनी दि.३१/०८/२०१५ पुर्वी काम पूर्ण केले असुन त्यांनी सादर केलेल्या दहावे व अंतिम बिलाची(भावफरक बिलासह) रक्कम रु.२४,३३,५७,३५७/-मात्र मंजूर होवून ठेकेदार टारमॅट लि., नवी मुंबई (पुर्वीची रोमन टारमॅट लि ,नवी मुंबई)यांना यापुर्वी देण्यात आलेली रक्कम रु. २४,०४,१५,७१३/-वजा जाता रु.२९,४१,६४४/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. |

**(४) संस्थानचे मौजे शिर्डी येथिल स.नं.१२५ (पैकी) साईनगरमैदानाचे उत्तर बाजूने चेनलिंक जाळीचे फेन्सिंग करणेबाबत.**

| ठेकेदाराचे नांव | **रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार** |
|---|---|
| मंजूर निविदा रक्कम (रु.) | २,३३,६२५/- |
| मंजूर आराखडा व प्रत्यक्ष आराखड्यात काही बदल आहे काय ? | नाही. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | निर्णय क्र.१३६(२८), दि.२५/०२/२०१७ |
| अंतिम बिलाची रक्कम (रु.) | १,४६,७०२/- |
| आजपर्यंत झालेला पेमेंट (रु.) | -- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च (रु.) | ८६९२२/- (कमी) |
| निविदा टक्केवारी (+) (-) | ९.९९% कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०२महिने, दि.२०/०४/२०१७ ते १९/०६/२०१७ |
| प्रत्यक्षकाम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.३०/०९/२०१७ |
| रिटेंशन रक्कम तीन महिन्यांसाठी | ७,३३५/- |
| **शेरा–** ठेकेदार यांनी सदर काम दि.३०/०९/२०१७ अखेर१०३ दिवस उशिराने केले आहे. त्यासाठी त्यांना रु.१००/- प्रतिदिन दराने रु.१०,३००/-मात्र दंडआकारणी होत आहे. तरी ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची रक्कम रु.१,४६,७०२/- मात्र मंजूर होवून ठेकेदार रविंद्र साहेबराव शिंदे, कोल्हार यांना अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**प्रस्ताव**: तरी उपरोक्तप्रमाणे पूर्ण झालेल्या कामांची अंतिम बिले अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.१, २ व ४ या बांधकाम ठेकेदार यांची कामे पुर्ण झालेली असल्यामुळे त्यांच्या अंतीम बीलांची रक्कम संबंधीतांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच अ.नं.३ चे टारमॅट लि, नवी मुंबई या ठेकेदाराने काम पुर्ण करण्यास खुप विलंब केला आहे. त्यामुळे सदर विलंबाबाबत स्थानिक उपसमितीने छाननी करावी. त्यासाठी संबंधीत ठेकेदाराला उपसमिती सभेसमोर बोलवून त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे व स्थानिक उपसमितीच्या शिफारशीनंतर त्यांचे अंतीम बीलाबाबत पुढील व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय घेण्यात येईल.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.६६** **शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावर लक्ष्मीनगर वसाहत ते साईआश्रम या भागातील दुभाजकामध्ये रेलिंग बसविणे, खराब झालेले पेव्हींग ब्लॉक्स बदलणे तसेच दुभाजक व कर्ब स्टोनचे रंगकाम करणे याबाबत उपलब्ध पर्यायांवर चर्चा होऊन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:**

०१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व परंपरा प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

०२. अधिनियमाचे कलम २१ मधिल पोट कलम (१क) अन्वये, विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्याअधिन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व

विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा या सारख्या पायाभुत सुविधा पुरविणेसाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना साहाय्यक अनुदान देता येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईचे समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ आहे. श्रींचे दर्शनासाठी दरारोज हजारो भक्त देशविदेशातून श्री क्षेत्र शिर्डी येथे येत असतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या मोठया प्रमाणात असते.श्री क्षेत्र शिर्डी हे सिन्नर अहमदनगर या-राष्ट्रीय महामार्गांतर्गत (NH160)वर वसलेले असून, या राज्यमार्गाने दक्षिण व उत्तर बाजूकडून हजारो साईभक्त पालखी पदयात्रेबरोबरच, खाजगी व सरकारी प्रवासी बसेस, खाजगी वाहनांव्दारे, रेल्वे प्रवासाव्दारे येत असतात. त्यामुळे सदर मार्गावर नेहमीच भक्तांच्या खाजगी व प्रवासी वाहनांची मोठया प्रमाणावर वर्दळ व वाहतुक सुरु असते.या रस्त्याचे लक्ष्मीनगर वसाहत ते संस्थानचे शैक्षणिक संकुल या भागातील सुमारे १६०० मी. लांबीत (रुंदी-३०मी.)रु.३.६५ कोटी खर्चाचे विकसन काम संस्थान निधीतून सन २००३ मध्ये करण्यात आले आहे. त्यानंतर वेळोवेळी सदर रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत डांबरीकरणाचेकाम करण्यात आले आहे.

शिर्डी शहरातुन जाणारा अहमदनगर–मनमाड महामार्ग आता सिन्नर–अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० झालेला असुन शिर्डी शहरातील लक्ष्मीनगर वसाहत ते साईआश्रम या एकूण २१०० मी. भागातील सुमारे१३०० मी. लांबीतील दुभाजक (Divider) रेलिंग बसविणेतसेच झेब्रा क्रॉसिंगचे रंगकाम,खराब झालेले पेव्हींग ब्लॉक्स बदलणे तसेच दुभाजक व कर्बस्टोनचे रंगकाम करणे इत्यादी कामे करणेआवश्यक आहे.त्यानुसार या रस्त्याचे फुटपाथ व त्यालगतचे ६० मि. मी. व ८० मि.मी. जाडीचे सर्व पेव्हींग ब्लॉक्स काढणे व नविन पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, डिव्हायडर दुरुस्ती व रंगकाम,डिव्हायडरचे दोन्ही बाजूस रेलिंग बसविणे,झेब्रा क्रॉसिंगचे रंगकाम करणे, खालील ८ ठिकाणचे चौकाचे सुशोभिकरणासाठी सर्कल तयार करणे प्रस्तावीत आहे.

| | |
|---|---|
| १. श्री साई प्रसादालयाकडे जाणा-या रस्त्यासमोर (निमगांव शिव रस्त्याचे चौफुली जवळ) | ५. शिर्डी बसस्थानकाजवळ (श्रीसाईबाबा हॉस्पीटल चौफुलीजवळ) |
| २. जुनेसाईप्रसाद इमारतीचे उत्तरेकडील गेटजवळ | ६. वळणरस्ता क्र.५ व नगर-मनमाड रस्ता (रत्नाकर बॅकेजवळ) |
| ३. श्री साई समाधीमंदिराकडे गेट नं.१ जवळ | ७. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) प्रवेशद्वारासमोर |
| ४. नविन पिंपळवाडी रस्त्यासमोर (श्रीहरी कॉम्प्लॅक्स/ कनकुरी रस्त्याचे चौफुलीजवळ) | ८. श्री साई आश्रम दक्षिण बाजू –रस्ता क्र.०७ चौक |

सदरहु कामासाठी संस्थानकडून निधी उपलब्ध करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ पोट कलम १ (क) अन्वये राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे.या कामासाठी प्राथमिक / ढोबळमानाने केलेल्या अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | फुटपाथ व त्यालगतचे पेव्हींग ब्लॉक्स काढून नविन पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, डिव्हायडर दुरुस्ती व रंगकाम करणे. | १,२७,०५,३०६/- |
| ०२ | डिव्हायडरचे दोन्ही बाजूस रेलिंग बसविणे | ५७,७५,४८०/- |
| ०३ | लॉन व झाडे लावणे. | ५,००,०००/- |
| ०४ | चौकाचे सुशोभिकरणासाठी सर्कल तयार करणे. | १,२०,००,०००/- |
| | एकुण रु. | ३,०९,८०,७८६/- |
| | कॉन्टिन्जन्सीज व इ. ५% | १५,४९,०३९/- |
| | एकूण अंदाजपत्रकीय खर्च रु. | **३,२५,२९,८२५/-** |

तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनीही दि१९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिर्डी शहरातील चौकांचे सुशोभिकरण करणेबाबत कळविले आहे.परंतु दि.२१/०८/२०१७ रोजी मा. अध्यक्ष, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. विश्वस्त यांचे उपस्थितीत शिर्डी ग्रामस्थांसमवेत झालेल्या मा. नगराध्यक्षा, पदाधिकारी व मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करून द्यावा. शिर्डी शहरातील नगर-मनमाड महामार्ग विकसन व सुशोभिकरणाचे काम शिर्डी नगरपंचायतमार्फत करणेत येईल अशी विनंती केली आहे.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनीही दि१९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये शिर्डी शहरातील चौकांचे सुशोभिकरण करणेबाबत कळविले आहे.परंतु दि.२१/०८/२०१७ रोजी मा. अध्यक्ष, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा. विश्वस्त यांचे उपस्थितीत शिर्डी ग्रामस्थांसमवेत झालेल्या मा. नगराध्यक्षा, पदाधिकारी व मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करून द्यावा. शिर्डी शहरातील नगर-मनमाड महामार्ग विकसन व सुशोभिकरणाचे काम शिर्डी नगरपंचायतमार्फत करणेत येईल अशी विनंती केली आहे

**प्रस्ताव:**

अ) सदर रस्त्याची शहरातील लांबी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांचे अखत्यारीत असल्याने शासनामार्फत निधी उपलब्ध करून त्यांनी रस्ता विकसीत करणे.

**अथवा**

ब) सदरहु रस्त्याकरीता शासनाकडून निधी उपलब्ध करणे शक्य नसल्यास संस्थानमार्फत निधी उपलब्ध करून देणे व जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांनी रस्ता विकसीत करणे.

**अथवा**

क) याकामी सल्लागाराची नेमणूक करून कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांची रस्ता विकसीत करणेसाठी ना-हरकत/ परवानगी घेवून संस्थानकडून निधी उपलब्ध करून संस्थानमार्फत सदरहु काम करता येईल.

त्यानुसार प्रस्ताव 'अ''ब' अथवा 'क' बाबत निर्णय होणेस तसेच अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महामार्गावर लक्ष्मीनगर वसाहत ते साईआश्रम या भागातील दुभाजकामध्ये रेलिंग बसविणे, खराब झालेले पेव्हींग ब्लॉक्स बदलणे तसेच दुभाजक व कर्ब स्टोनचे रंगकाम करणेकामी प्रस्तावातील क मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच शिर्डी शहरामधील इतरही चौकांचे सुशोभिकरण करणेकामी शिर्डी नगरपंचायतीकडून प्रस्ताव मागविणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.६७** **साईआश्रम भक्तनिवास इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्ती करणेकामी ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन करणे,'' अशी तरतूद आहे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (२) च्या खंड (ख) अन्वये, "भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे," अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन एप्रिल- २०१३ मध्ये सदर प्रकल्प साई भक्तांकरीता खुला करणेत आला आहे. सदर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत देणगीदाखल करणेत आले आहे. त्यांचेमार्फत इमारतींचे बांधकामासाठी ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांची नेमणूक करणेत आली होती व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. डॉर्श कन्सल्ट (इं) प्रा. लि., मुंबई यांची नियुक्ती करणेत आली होती. सदरहू प्रकल्पाचे बांधकाम सन-२००८ मध्ये सुरु होवून सन-२०१२ मध्ये पूर्ण झाले आहे. काम पूर्णत्वानंतर ०१ वर्षाचे दोषदायीत्व कालावधीत ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांनी सदर इमारतींचे दुरूस्ती देखभालीचे काम केले आहे.

साई आश्रम भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | इमारतीचा तपशिल | इमारत संख्या | प्रत्येक इमारतीतील रुम संख्या | एकुण रुम संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ए-जी ब्लॉक (कमोड भांडे) | ०७ | १२८ | ८९६ |
| २ | एच-एल ब्लॉक (इंडीयन भांडे) | ०५ | १२८ | ६४० |
| ३ | आर ब्लॉक (बुकींग ऑफिस) | ०१ | -- | -- |
| ४ | ओएटी (ॲम्पीथिएटर) | ०१ | -- | -- |
| | | | एकुण | १५३६ |

साईभक्तांकरीता सदर प्रकल्प खुला होऊन चार वर्षांचा कालावधी पूर्ण झालेला आहे. साईआश्रम भक्तनिवास विभागाने सदरहू खोल्यांचे रंगकाम व दुरुस्तीचे काम करुन मिळणेबाबत कळविले आहे. साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील खोल्यांची पाहणी करणेत आली असता सततच्या वापराने इमारतींमधील आतील रंगकाम, काही रूममधील टॉयलेट व बाथरुमचे दरवाजे, काही खोल्यांचे कन्सील्ड फ्लश व्हॉल्व, आरशे, सहा इमारतींचे स्कायलाईट डोमचे पॉलीकार्बोनेट शिट इ. बाबी खराब झालेल्या आहेत. सदर कामांकरीता सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आले असून खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | एकूण १३ इमारतींचे अंतर्गत रंगकाम करणे. | ४,८०,३४,४८८.०० |
| ०२ | ३८४ फ्लश व्हाल्व बदलणे व टाईल्स बदलणे | ३५,३६,६४०.०० |
| ०३ | संडास बाथरुमचे सध्याचे खराब झालेले फ्लश डोअर काढून त्या ठिकाणी पीव्हीसी पॅनल डोअर बसविणे. (११०० नग) | ८३,४८,१५०.०० |
| ०४ | सध्याचे आरशे खराब झालेले असल्याने अॅल्युमिनिअम फ्रेम असलेले नविन आरशे बसविणे. (१५३६ नग ) | ७,८३,३६०.०० |
| ०५ | ०६ इमारतींचे स्काय लाईट डोमचे पॉलीकार्बोनेट शिट बदलणे. | १३,६८,०००.०० |
| | रक्कम रुपये - | ६,२०,७०,६३८.०० |
| | कंटीनजन्सी ५% | ३१,०३,५३२.०० |
| | **एकूण रक्कम रुपये -** | **६,५१,७४,१७०.००** |

उपरोक्तकामी एकूण रक्कम रु.६,५१,७४,१७०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:-** साई आश्रम भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीकामी वरीलप्रमाणे एकूण रक्कम रु.६,५१,७४,१७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्चास व या कामासाठी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.९८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचे अंतर्गत रंगकाम व दुरुस्तीकामी करणेकामी अंदाजीत खर्चामधून २०% रक्कम कमी करणेत येऊन, विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**विषय नं.६८** **प्रसिध्दी अधिकारी व कनिष्ठ अभियंता, (बांधकाम) ही पदभरती प्रक्रिया रद्द झालेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मंजूर आकृतीबंधानुसार रिक्त कार्यकारी संपादक व प्रसिध्दी अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४५९(०२) खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईलीला व श्री साईसेवा व्दैमासिकासाठी संपादक मंडळ नेमणेबाबत कार्यवाही चालू असल्यामुळे प्रस्तावीत पदापैकी कार्यकारी संपादक हे पद न भरता फक्त प्रसिध्दी अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी रु.२५,०००/- मानधनावर घेणेत यावे. तसेच कुशल, अनुभवी प्रसिध्दी अधिकारी मिळणेसाठी या पदाच्या पात्रतेमधील वयाची अट शिथील करण्यात यावी. प्रस्तावीत केलेले सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्दी करण्यात यावी. व विहीत मुदतीत अर्ज मागविणेत येऊन पात्र अर्जदारांच्या थेट मुलाखती (Walk in Interview) घेण्यात याव्यात. यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करणेत आलेली आहे. ०१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, ०२.मा.उपकार्यकारी अधिकारी, ०३.प्रशासकीय अधिकारी, ०४. जनसंपर्क अधिकारी या समितीने पात्र उमेदवारांची निवड करुन नियुक्ती आदेश दयावे असे ठरले."

**(ब)** तसेच मंजूर आकृतीबंधानुसार कनिष्ठ अभियंता, बांधकाम हे पद सरळ सेवेने भरणेबाबतच्या विषयावर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४५९(०३) खालील प्रमाणे घेतलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या विविध विकास कामांसाठी तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी सहा कनिष्ठ अभियंत्याना

रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. याकामी प्रस्तावीत केलेले सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहीरात प्रसिध्द करण्यात यावी. व विहीत मुदतीत अर्ज मागविणेत यावेत. या अर्जामधील पात्र अर्जदारांच्या थेट मुलाखती (Walk in Interview) घेण्यात याव्यात. यासाठी पुढील प्रमाणे समिती गठीत करणेत आलेली आहे. ०१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, ०२.कार्यकारी अभियंता, शताब्दी कक्ष, ०३. उपकार्यकारी अधिकारी या निवड समितीने पात्र उमेदवारांची निवड करुन नियुक्तीआदेश द्यावे असे ठरले."

त्यानुसार वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन संबंधीत उमेदवारांना दि. २६/०७/२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थानचे साईनिवास अतिथीगृह येथे थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) बोलविण्यात आले होते. त्यानुसार प्रसिध्दी अधिकारी या पदासाठी ३३ व कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदासाठी १४० उमेदवारांनी नावे नोंदवून प्रत्याक्षात १३५ उमेदवारांनी अर्ज व कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

**(क)** प्राप्त झालेले अर्ज व उपस्थित उमेदवारांची संख्या पहाता सदर दिवशी उपरोक्त पदाच्या उमेदवारांची नोंदणी करुन मुलाखती घेणे शक्य नसल्याने संस्थानचे वतीने सर्व उपस्थित उमेदवारांना एकत्रित बोलावून पुढील ०७ ते ०८ दिवसांत नोंदणी केलेल्या उमेदवारांची लेखी व तोंडी परिक्षा घेणेबाबत संबंधीतांना कळविण्यात येईल असे सांगिलेले आहे. तरी प्रसिध्दी अधिकारी वगळता, कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या जास्त असल्याने निर्णय घेणेपुर्वी बांधकाम विभागाकडील अभिप्राय घेणेत आलेला आहे. त्यात "०३ कंत्राटी कनिष्ठ अभियंत्याची पदे आऊटसोर्सिंग पध्दतीने ०२ वर्षाचे कालावधीसाठी भरुन, त्यांना एकुण प्रारंभीक वेतनाइतके रु. ३१,५५२/- एकत्रित मानधनावर घेण्यात यावे." असा अभिप्राय देण्यात आलेला आहे.

आता, मा.विधी व न्याय विभागाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीस क्र.सासंवि -०९-४३३ (३७/०९) का.१६ मंत्रालय मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ अन्वये आकृतीबंधास मान्यता देण्यात आलेली आहे. मान्यता देतांना पदभरती बाबत खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.

***अट-शर्त क्र.०३*** *सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.*

***अट-शर्त क्र.०४*** *सेवाप्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.*

***अट-शर्त क्र.०६*** *समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.*

***अट-शर्त क्र.०८*** *समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.*

तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाने क्र.सासंवि-२०११/५३८/प्र.क्र.६९/पुर्नबांधणी-१२/का-सोळा. दि.२३/०१/२०१३ रोजीचे पत्रातील अ.नं.०५ अन्वये श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर मंजूर करणेत आलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन कोणत्याही पदावर भरती करु नये असे आदेश दिलेले आहे.

आता, जाहिरातीत नमुद प्रसिध्दी अधिकारी व कनिष्ठ अभियंता, बांधकाम हि पदे मंजूर आकृतीबंधातील आहे. मंजूर आकृतीबंधातील पदे Walk in Interview पध्दतीने भरणे उचित होणार नाही. त्यामुळे प्रसिध्दी अधिकारी -०१ व कनिष्ठ अभियंता, बांधकाम -०३ ह्या पदांसाठीची शैक्षणिक अर्हतेप्रमाणे सदर पदाचे पात्र कर्मचारी पुरविणेबाबत कॉन्ट्रक्टर (Agency) ला पत्रान्वये कळविता येईल.

सबब, प्रसिध्दी अधिकारी, व कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदांसाठीच्याथेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) आलेल्या सर्व उमेदवारांना सदर पद भरती प्रक्रीया रद्द झालेबाबत संस्थानचे www.sai.org.in या वेबसाइट प्रसिध्द करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार प्रसिध्दी अधिकारी, व कनिष्ठ अभियंता, बांधकाम या पदांसाठीच्या थेट मुलाखतीसाठी (Walk in Interview) आलेल्या सर्व उमेदवारांना सदर पद भरती प्रक्रीया रद्द झालेबाबत कळविणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच ०३ कनिष्ठ अभियंता, बांधकाम ही पदे यापुर्वी मान्यता दिलेल्या मानधनावर बाहययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन घेणेत यावे व ०१ प्रसिध्दी अधिकारी पद भरणेऐवजी त्याकामी पी.आर. एजन्सीची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.६९** **संस्थानचे कर्मचाऱ्यांना साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणुक व इतर अनुषंगीक बाबींचे जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेमार्फत देणेत आलेल्या प्रशिक्षणाचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) मा.त्रिसदस्य समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१८ मा.विश्वस्तांच्या सुचनांमध्ये, संस्थान कायम कर्मचा-यांना साईभक्तांशी नम्रतेने, आदरपुर्वक व सेवाभाव वृत्तीने काम करणेबाबतचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना देणेत आलेल्या होत्या. त्यासअनुसरुन सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७६ नुसार, जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत पहिल्या टप्यात मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागातील एकूण २०८ कायम कर्मचा-यांकरीता शिर्डी येथे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेस व त्याकामी प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु.४००/- प्रमाणे शुल्क अदा करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागाकडील १९९ कर्मचारी दि.१७/०१/२०१७ ते दि.१४/०२/२०१७ अखेर पाच बॅचमध्ये प्रत्येकी दोन दिवस प्रशिक्षण देणेत आलेले आहे व त्यानुसार जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनीचे अंतीम बील अदा करणेत आलेले आहे.

त्यानंतर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचे दि.१०/०४/२०१७ रोजीचे पत्रास अनुसरुन दुस-या टप्यामध्ये ज्या विभागातील कर्मचा-यांचा दैंनदिन कामानिमित्त थेट साईभक्तांशी संबध येतो असे कॅन्टिन विभाग, सर्व निवासस्थाने व लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील गट-ड कर्मचारी व कुपन विक्रेते अशा एकूण २२४ कायम कर्मचा-यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु.४००/- प्रमाणे दोन दिवसीय सशुल्क (अनिवासी) प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्र.५७१ अन्वये, यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७७६ अन्वये मान्यता मिळालेनुसार मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागाकडील १९९ कर्मचा-यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेकडून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, त्यांचा अहवाल समितीसमोर सादर करावा व तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा. असा निर्णय संमत झालेला आहे.

**(ब)** जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत दि.१७/०१/२०१७ ते दि.१४/०२/२०१७ अखेर प्रत्येक बॅच मध्ये सरासरी ४० कर्मचा-यांप्रमाणे पाच बॅचमध्ये प्रत्येकी दोन दिवसीय प्रशिक्षण घेणेत आलेले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये खालील मुद्दयांबाबत प्रशिक्षण देणेत आलेले आहे.

पहिला दिवस

| अ.नं | वेळ | | विषय | साधन व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०९.०० | १०.०० | नाव नोंदणी, प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश व प्रशिक्षणाची ओळख | सत्र समन्वयक व सत्र सहाय्यक |
| ०२ | १०.०० | १०.३० | उदघाटन समारंभ | प्रमुख पाहुणे |
| ०३ | १०.३० | ११.३० | श्री साईबाबा संस्थानमध्ये काम करण्यासाठी माझी प्रेरणा, कार्य संस्कृती, सेवा मूल्ये, उत्तम कर्मचा-याचे गुण | श्री.ज्ञानेश्वर कांबळे |
| ०४ | ११.३० | ११.४५ | चहापान | - |
| ०५ | ११.४५ | ०१.१५ | माझ्या जीवनाचे तत्वज्ञान, माझे आरोग्य व गट बांधणी | श्री.सुधाकर मलिक |
| ०६ | ०१.१५ | ०२.१५ | माध्यन्ह भोजन | - |
| ०७ | ०२.१५ | ०३.४५ | माझा विचार, सेवाभाव, कृती, माझे कुटूंब, श्री साई संस्थानप्रती माझी भूमिका व कर्तव्य | श्री.योगेश गायके |
| ०८ | ०३.४५ | ०४.०० | चहापान | - |
| ०९ | ०४.०० | ०५.१५ | श्री साईभक्तांशी संवाद, वर्तणूक, निर्णय शक्ती, समस्या निराकरण, सकारात्मक दृष्टिकोन | श्री.योगश गायके |
| १० | ०५.१५ | ०६.०० | चित्रपट (चिंतन व चर्चा) | सम समन्वयक व सत्र सहाय्यक |

दुसरा दिवस

| अ.नं | वेळ | | विषय | साधन व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०९.३० | १०.०० | पहिल्या दिवसाचा आढावा | सत्र समन्वयक व सत्र सहाय्यक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | १०.०० | ११.३० | माझे व कामाच्या वेळेचे व्यवस्थापन | श्री.मेहरे डी. |
| ०३ | ११.३० | ११.४५ | चहापान | - |
| ०५ | ११.४५ | ०१.१५ | श्री साई भक्तांशी– तडजोड, भावनांक, भावनांचे व्यवस्थापन | श्रीमती स्मितल मोरे |
| ०६ | ०१.१५ | ०२.१५ | माध्यन्ह भोजन | - |
| ०७ | ०२.१५ | ०३.०० | ताण तणाव व्यवस्थापन | श्रीमती स्मितल मोरे |
| ०८ | ०३.०० | ०४.१५ | संस्थान परिसरातील स्वच्छता, वैयक्तिक व सामुदायिक स्वच्छता | श्री.ज्ञानेश्वर कांबळे |
| ०९ | ०४.१५ | ०४.३० | चहापान | - |
| १० | ०४.३० | ०५.३० | प्रशिक्षणाचे मूल्यमापन, प्रमाणपत्र वाटप, समारोप | प्रमुख पाहुणे |

**क)** अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणासाठी उपस्थित असणा-या कर्मचा-यांकडून प्रशिक्षणाबाबतचा मूल्यमापन अहवाल (Feed Back Form) भरुन घेणेत आलेले आहेत. त्याचा अहवाल खालील प्रमाणे.

| अं.क्र | कर्मचा-याचे नाव | सर्वसाधारण अभिप्राय | | | | | प्रशिक्षण विषयक इतर सुचना /अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **उत्कृष्ट** | **निश्चित चांगले** | **समाधान कारक** | **साधारण** | **वाईट** | |
| ०१ | श्री.अरुण म्हसु भोकरे | ✓ | | | | | प्रशिक्षण ०५ दिवसाचे असावे व प्रत्येक वर्षी घ्यावे. |
| ०२ | श्री.ज्ञानेश्वर कचरु सोनवणे | ✓ | | | | | बैठक व्यवस्था सुधारणा करावी व प्रशिक्षण दर सहा महिन्यात घेणेत यावे व किमान १० दिवसाचे असावे. |
| ०३ | श्री.नानासाहेब कारभारी कालेकर | ✓ | | | | | प्रशिक्षण कमीत-कमी १० दिवसाचे असावे व प्रत्येक वर्षी घ्यावे. |
| ०४ | श्री.रावसाहेब रावसाहेब गुंड | ✓ | | | | | प्रशिक्षण उत्कृष्ठ आहे. दर वर्षी घेणेत यावे. प्रशिक्षण दिलेबद्दल अधिका-यांचे धन्यवाद. |
| ०५ | श्री.हरीभाऊ गंगाधर बनकर | ✓ | | | | | प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये चांगले ज्ञान मिळाले. प्रत्येक वर्षी प्रशिक्षण राबिविणे गरजेचे आहे. |
| ०६ | श्री.किसन मारुती डांगे | ✓ | | | | | प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये ज्ञान मिळाले, असे प्रशिक्षण वेळोवेळी ठेवावे. आपल्या कामामध्ये, जीवनामध्ये बदल होतो. |
| ०७ | श्रीमती अनिता अनिल गोसावी | | ✓ | | | | प्रशिक्षणामुळे दैनंदिन कामामध्ये असलेल्या अडीचणी सोडविणेस मदत होते. |
| ०८ | श्रीमती सविता विठ्ठल कोते | | ✓ | | | | प्रशिक्षणामुळे चांगले ज्ञाने मिळाले असे प्रशिक्षण वेळोवेळी आयोजित करावे. |
| ०९ | श्री.चंद्रकांत भाऊसाहेब सुरळे | | ✓ | | | | प्रशिक्षणाचा कालावधी जास्त दिवसाचा असावा. मिळालेली माहिती अतिउत्कृष्ट आहे. |
| १० | श्री.चंद्रभान फक्कडराव बनकर | | ✓ | | | | प्रशिक्षणाचा काळ जास्त दिवसाचे असावे. चांगले ज्ञान मिळाले. |
| ११ | श्री.प्रविण भाऊसाहेब भिसे | | ✓ | | | | बैठक व्यवस्था सुधारावी. प्रशिक्षण कालावधीमध्ये वाढ करावी. प्रशिक्षणामुळे ज्ञान, कौशल्य वाढीस मदत होईल. |
| १२ | श्री.एकनाथ गेंदा सोनवणे | ✓ | | | | | प्रशिक्षण उत्कृष्ट आहे. दरवर्षी देणेत यावे. |
| १३ | श्री.प्रकाश तुकाराम गायकवाड | ✓ | | | | | प्रशिक्षण उत्कृष्ट आहे. दर वर्षी प्रशिक्षण घेणेत यावे. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | श्री.दादासाहेब भाऊसाहेब कोते | ✓ | | | | | | प्रशिक्षण वर्षातून एकदा घ्यावे. |
| १५ | सौ.उषा रावसाहेब भोसले | | ✓ | | | | | प्रशिक्षणामुळे वर्तणूकीत बदल होता आणि बरचसे काही शिकायला मिळते. वर्षातून एकादा प्रशिक्षण द्यावे. |

प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या एकूण १९९ कर्मचा-यांपैकी उपरोक्त प्रमाणे १५ कर्मचा-यांचे मूल्यमापन अहवालामधील (Feed Back Form) मचकूर माहितीस्तव सादर करणेत आलेले आहेत. मूल्यमापन अहवालामध्ये जवळजवळ सर्व कर्मचा-यांनी प्रशिक्षण उत्कृष्ठ किंवा निश्चित चांगले असल्याचे लिहले आहे. तसेच ब-याच कर्मचा-यांनी असे प्रशिक्षण वेळोवेळी आयोजित केले जावे असे अभिप्राय मत नोंदविलेले आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७१ नुसार, जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेमार्फत पहिल्या टप्यामध्ये मंदिर विभाग, संरक्षण विभाग व जनसंपर्क विभागाकडील १९९ कर्मचा-यांना देणेत आलेला प्रशिक्षणाचा अहवाल उपरोक्त प्रमाणे माहितीस्तव सादर करणेत आलेला आहे. त्यासअनुसरुन दुस-या टप्यामध्ये कॅन्टिन विभाग, सर्व निवासस्थाने व लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागातील गट-ड कर्मचारी व कुपन विक्रेते अशा एकूण २२४ कायम कर्मचा-यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेमार्फत पुर्वीप्रमाणेच प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिन रु.४००/- प्रमाणे दोन दिवसीय सशुल्क (अनिवासी) प्रशिक्षण शिबीर आयोजित करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणुक व इतर अनुषंगीक बाबींचे जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेमार्फत देणेत आलेल्या प्रशिक्षणाचे अहवालाचे अवलोकन करणेत आले व यापुढेही सदरहू प्रशिक्षण सुरु ठेवण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७०** **डॉ.मधुकर गिरी, लातुर यांचा खातेचौकशी अधिकारी नेमणुकीकामी प्राप्त झालेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार " यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री.ए.एम.देशमुख यांची गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशीकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करणेस व याकामी त्यांना शासन निर्णयाप्रमाणे मानधन तसेच इतर चार्जेस देणेस मान्यता देण्यात आली. तसेच शासनाच्या पॅनलवरील आणखी खातेचौकशी अधिकारी संस्थानला सेवा देण्यास तयार असतील, त्यांनाही विचारणा करणेत येऊन, तसा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा असे ठरले." असा ठराव पारीत झाला आहे. त्यास अनुसरुन श्री.ए.एम.देशमुख, यांची जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ वशी-७ए/ १५६१/ २०१७, दि.०१-०७-२०१७ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तन करणा-या संस्थान कर्मचा-यांचे खाते चौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे.

आता श्री.मधुकर गिरी, लातूर, यांनी दि.२७.०६.२०१७ रोजी संस्थानला दिलेल्या पत्रामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१. मी, डॉ.मधुकर गिरी, लातूर येथे आहे.
२. वरील संदर्भानुसार माझी विभागीय चौकशी अधिकारी या पदावर महाराष्ट्र शासनाने नियुक्ती केली आहे.
३. ही नियुक्ती कर्मचा-यांच्या खातेनिहाय चौकशी संदर्भांत चौकशी करण्यासाठीची आहे.
४. माझी नियुक्ती महाराष्ट्रातील मंत्रालयातील सर्व विभागास व सर्व जिल्ह्यातील व सर्व खात्यातील शासकीय कर्मचा-यांच्या संदर्भात विभागीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली आहे.
५. आपल्या खात्यातील ज्या कर्मचा-यांच्या खातेनिहाय चौकशीसाठी प्रस्तावित आहेत किंवा खातेनिहाय चौकशीसाठी प्रकरणे तयार आहेत किंवा खातेनिहाय चौकशीसाठी प्रलंबित आहेत अशी प्रकरणे माझी विभागीय चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केल्यामुळे आपण सदरील प्रकरणे माझ्याकडे पाठवावित.
६. आपण पाठविलेली चौकशी प्रकरणे त्वरीत निकाली काढून आपल्या खात्यास सहकार्य केले जाईल.
७. चौकशी प्रकरणे पाठवून सहकार्य करावे, ही विंनती.

तसेच सदर पत्राचे सोबत क्र.संकिर्ण-१०१४/प्र.क्र.२४/११-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई दि.३० मार्च २०१५ रोजीचे महाराष्ट्र शासनाचे नियुक्ती पत्र जोडले आहे.

**खातेचौकशी अधिकारी यांना द्यावयाचे मानधनाबाबत माहिती :-**

खातेचौकशी अधिकारी यांचे मानधनाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ.५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

**शासन निर्णय-**

१. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करुन एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु.८०००/- इतक्या मानधना ऐवजी रु.१२,०००/- इतके मानधन देण्यात यावे. सुधारीत मानधन या आदेशाच्या दिनांका पर्यंत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहील.

२. एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रु १२,०००) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल.

३. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्यासेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर करावी.

या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानमध्ये नेमणूक करण्यात येणारे खाते चौकशी अधिका-यास प्रति खाते चौकशी एक आरोपीकरीता रु.१२,०००/- एकापेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रती आरोपी रु.१५,००/- इतकी वाढ तसेच तसेच प्रत्येक खाते चौकशी करीता टंकलेखन कामाकरीता नियुक्त केलेल्या लिपीक-टंकलेखक यांच्या सवेपोटी अतिरीक्त रु.२०००/- प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

श्री साईबाबा संस्थानमधील गैरशिस्तवर्तन करणारे कर्मचा-यांचे सन २०१७ मध्ये पुर्ण झालेल्या खातेचौकशींबाबत माहिती खालिलप्रमाणे आहे.

| अ.नं. | खातेचौकशी करण्यात आलेल्या कर्मचा-यांची नांवे | खाते चौकशी अधिकारी | अहवाल प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.संतोष गणपत गुठळे, मदतनीस, श्री साईप्रसादालय | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.२३-०१-२०१७ |
| ०२ | श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कामगार, आरोग्य विभाग | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.२२-३-२०१७ |
| ०३ | श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ,मदतनीस, श्री साईप्रसादालय | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.२४-०३-२०१७ |
| ०४ | श्री.बबन छबु अडांगळे मदतनीस, कॅन्टीन विभाग | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.२४-३-२०१७ |
| ०५ | श्री.सुभाष सुर्यकांत तुरकणे, मदतनीस श्री साईप्रसादालय | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.०२-०५-२०१७ |
| ०६ | श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.२२-०५-२०१७ |
| ०७ | डॉ.अनिल विठ्ठलराव घरटे, सी.एम.ओ.श्री साईबाबा हॉस्पीटल | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.०२-०५-२०१७ |
| ०८ | श्री.दिनकर हनुमंता डोखे, सेवानिवृत्त वॉर्डबॉय, श्री साईनाथ रुग्णालय | ॲड.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव | दि.३०-०५-२०१७ |
| ०९ | डॉ.हरिष हुकुमचंद बजाज, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट | श्री.जे.एल.देशपांडे, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे | दि.१८-०७-२०१७ |
| १० | डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट | | दि.१८-०७-२०१७ |

श्री साईबाबा संस्थानमधील गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे सध्या सुरु असलेल्या खातेचौकशीबातची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | कर्मचा-यांचे नांव, हुद्दा व विभाग | खातेचौकशी अधिकारी | आरोपपत्र दिनांक | गैरवर्तन | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.अनिल दत्तात्रय देशमुख, वाहन चालक, वाहन विभाग | ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव | दि.१६.०२.२०१६ | सतत गैरहजेरी | चौकशी पुर्ण, अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. |
| ०२ | श्री.दिगंबर यादवराव गायकवाड, मदतनीस, श्री साईप्रसादालय | ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव | दि.०२.०५.२०१६ | हॅन्डीकॅप गेटमधून इतर भक्त सोडले | साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविणेचे काम चालु आहे |
| ०३ | श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभि., मॅकेनिकल विभाग | ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव | दि.२९.०४.२०१७ | आर्थिक वसूली व कर्मचा-यांचे तक्रारी | साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविणेचे काम चालु आहे |
| ०४ | डॉ.किरण रामकृष्ण गोरे, श्री साईबाबा हॉस्पीटल | ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव | दि.२३.१२.२०१३ | दि.२७.०६.२०१३ व दि.११.१०.२०१३ चे | साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविणेचे काम चालु आहे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तक्रार अर्ज व विनापरवानगी गैरहजर | |
| ०५ | श्री.साहेबराव पांडुरंग लंके, तत्कालीन वित्त व्यवस्थापक, श्री साईबाबा हॉस्पीटल | ॲड.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव | दि.२५.०८.२०१६ | ०८ गंभीर गैरशिस्तवर्तन | साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविणेचे काम चालु आहे |
| ०६ | श्री.विजय बळवंत शेलार, सुरक्षा रक्षक, संरक्षण विभाग | श्री.ए.एम.देशमुख, नाशिक | दि.०७.०८.२०१७ | साईभक्तास १००/- रुपये घेऊन उदी पॅकेट दिले. | प्राथमिक जबाब नोंदविले आहे. |
| ०७ | श्री.लक्ष्मण राधोजी पवार, मदतनीस, पाणीपुरवठा विभाग | श्री.ए.एम.देशमुख, नाशिक | दि.११.०८.२०१७ | सतत गैरहजेरी | प्राथमिक जबाब नोंदविले आहे. |
| ०८ | श्री.रंभाजी काशिनाथ गागरे, मदतनीस, श्री साईनाथ रुग्णालय | श्री.ए.एम.देशमुख, नाशिक | दि.२८.०८.२०१७ | श्री.१४.०५.२०१७ रोजी येऊन कंत्राटी कर्मचारी श्री.संजय सयाजी कुहिले यांचे बरोबर बाचाबाची करुन मारामा-या केलेल्या आहेत. | अभिकथन पत्र बजाविणेत आलेले आहे. |

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी श्री.मधुकर गिरी, लातूर यांची गैरशिस्त वर्तन करणारे संस्थान कर्मचा-यांचे खातेचौकशी कामी कंत्राटी पद्धतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस तसेच त्यांना प्रति खाते चौकशीकरीता शासन निर्णयाप्रमाणे मानधन व इतर चार्जेस देणे बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.मधुकर गिरी, लातूर यांची गैरशिस्त वर्तन करणाऱ्या संस्थान कर्मचाऱ्यांची खातेचौकशी करणेकामी कंत्राटी पद्धतीने खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस व त्यांना प्रति खाते चौकशीकरीता शासन निर्णयाप्रमाणे मानधन मान्यता देण्यात आली. श्री.मधुकर गिरी, लातूर यांनी शिर्डी येथे येऊन, खातेचौकशीचे कामकाज करावे व त्यासाठी त्यांना कोणतेही इतर वेगळे भत्ते अदा करु नये, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७१** **श्री.विनायक केशव कुलकर्णी, सहाय्यक पुजारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअन्वये फेरवेतन निश्चिती करणे व अतिप्रदान केलेली रक्कम वसुल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** पदोन्नतीची संधी नसलेल्या एकल पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेडवेतनामध्ये सुधारणा करणेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी/आस्था/२२५३/२०१६ दि.१३ सप्टेबर,२०१६ अन्वये आदेश पारित करणेत आलेला आहे. या आदेशाची कार्यवाही करताना सामान्य प्रशासन पगारबील कक्षास खालील बाब निदर्शनास आलेली आहे.

**(अ)** श्री.विनायक केशव कुलकणी, सहाय्यक पुजारी, मंदिर विभाग यांची दि२०/०३/१९७८ रोजी रु. १५०/ या नियत वेतनावर (फिक्स पे) शिपाई या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. तदनंतर दिनांक०१/०७/१९८० पासून २००-३-२३०-५-२५५ वि.५-२८० या वेतन श्रेणीमध्ये रु.२०० या मुळवेतनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. ४थ्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१/०१/१९८६ ला ७५०-१२-८७०-ईबी-१४-९४० या सुधारीत वेतन श्रेणीमध्ये वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे.

श्री.कुलकर्णी यांची शिपाई पदावरुन सहा. पुजारी या पदावर नेमणूक करण्यात आलेबाबत कुठलाही आदेश त्यांचे वैयक्तीक धारणीमध्ये उपलब्ध नाही तसेच सेवापुस्तकामध्येही तशी नोंद आढळुन येत नाही. मात्र, सन १९९० मध्ये त्यांचे वार्षिक वेतनवाढ प्रमाणपत्रात त्यांचे नांवासमोर सहाय्यक पुजारी अशी नोंद दिसून येते.

श्री.कुलकर्णी यांना दि०१/१०/१९९४ पासून १२ वर्षाच्या नियमीत सेवेनंतर कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत ७७५-१२-९५५-ईबी-१५-१०३०-२०-११५० ही वरीष्ठ वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. त्यानंतर

दिनांक ०१/०१/१९९६ पासून पाचव्या वेतन आयोगानुसार २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० या वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती केलेली आहे.

दिनांक ०१/०१/२००६ पासून सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० या वेतनश्रेणीमध्ये १४५० ग्रेडवेतन देण्यात आलेले असून त्यानुसार वेतन निश्चिती करण्यात येऊन त्याप्रमाणे माहे नोव्हेंबर २०१३ अखेर वेतन आदा केलेले आहे. दरम्यान जा.क्र.एसएसएस-वशी-०१-१७४१-२०१३ दि. २१ ऑगस्ट २०१३ अन्वये कालबध्द पदोन्नती/ सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचा-यांना पूर्ण ग्रेड वेतन लागू करणेबाबत आदेश पारीत झालेला आहे. सदरचे आदेशानुसार ग्रेडवेतन १४५० वरुन ग्रेडवेतन १९०० नुसार वेतन निश्चिती करण्यात येऊन त्यानुसार फरक आदा केलेले आहे.

जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३९५९/२०१४ दिनांक २८/०२/२०१४ अन्वये संस्थान कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (दुसरा लाभ) दिनांक ०१/१०/२००६ पासून लागू करुन दि. ०१/१०/२००६ ते दि. ३१/०३/२०१० पर्यंत काल्पनिक वेतन निश्चिती करुन प्रत्यक्ष लाभ दि. ०१/०४/२०१० पासुन देण्यात येऊन त्यानुसार फरकाची रक्कम अदा करणेबाबत आदेश पारीत झालेला आहे. सदर आदेशामध्ये श्री कुलकर्णी यांना खालीलप्रमाणे वेतन देणेबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

PAY BAND 4440-7440 + GRADE PAY 1600

PAY BAND 5200-20200+ GRADE PAY 1900+ 300

असे नमूद करण्यात आलेले असून वेतननिश्चिती मात्र

PAY BAND 4440-7440 + GRADE PAY 1900

PAY BAND 5200-20200+ GRADE PAY 1900+ 300

अशी करण्यात येऊन त्यानुसार फरक व वेतन आदा करण्यात आलेले आहे.

**(ब)** मा.श्री. त्र्यंबक अंबादास खैरे, सेवानिवृत्त लेखाधिकारी, महाराष्ट्र व लेखासेवा, विभागीय आयुक्त कार्यालय, नासिक यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीकडे **"व्हिजीटींग पध्दतीने"** आस्थापना विषयक व बिंदूनामावली कामकाजासाठी नेमणुक करण्यात आलेली असल्याने श्री.कुलकर्णी यांचेबाबत त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले असुन त्यांनी खालीलप्रमाणे लेखी अभिप्राय दिलेला आहे.

"श्री. कुलकर्णी यांची वेतननिश्चितीच्या संदर्भात मागील नस्ती पाहिली असता, शिपाई/मदतनिस आणि सहाय्यक पुजारी या पदांच्या वेतनश्रेण्या ३१ डिसेंबर २००५ पर्यंत सारख्याच होत्या (७५०-९४०/२५५०-३२००) मात्र दिनांक ०१/०१/२००६ पासून सहाय्यक पुजारी या पदाची वेतनश्रेणी (२६१०-४०००) ४४४०-७४४० ग्रेड वेतन रु १६०० अशी करण्यात आलेली आहे. आणि त्यानुसार सुधारित आकृतीबंधामध्ये देखील सहाय्यक पुजारी या पदाची वेतनश्रणी शिपाई/मदतनिस या पदापेक्षा उच्च दाखविण्यात आलेली आहे. आता,श्री विनायक केशव कुलकर्णी यांचे बाबतीत दुसरी सेवांतर्गत आश्वसित प्रगती योजना दिनांक ०१/१०/२००६ लागू करतांना पुजारी या पदाच्या वेतन श्रेणीमध्ये वेतन निश्चिती करणे आवश्यक आहे (दिनांक ०१/१०/२००६ पासून वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००)

जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/ ३९५९/२०१४ दिनांक २८/०२/२०१४ अन्वये त्यांना मंजूर करण्यात आलेले ग्रेडवेतन रु २२०० चे आदेश सुधारीत करणे आवश्यक आहे."

**(क)** दिनांक ०१/०१/१९८६ पासून श्री. कुलकर्णी यांची ७५०-१२-८७०-ईबी-१४-९४०/२५५०-३२०० या वेतनश्रेणीनुसार वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. शासन निर्णयानुसार दि.०१/१०/१९९४ पासुन कालबध्द पदोन्नती योजना सुरु झाली आहे. त्यानुसार श्री कुलकर्णी यांना १२ वर्षाचे सेवेनंतर ७७५-१२-९५५-ईबी-१५-१०३०-२०-११५० /२६१०-४००० ही वेतन श्रेणी देण्यात आलेली आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१/०१/२००६ नंतर ७७५-११५०/२६१०-४००० या वेतन श्रेणीस ४४४०-७४४०-१६०० ही सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्यात आलेली आहे.

श्री.कुलकर्णी यांचे सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत २४ वर्षाचे सेवेनंतर दुसरा लाभ देताना सहाय्यक पुजारी या पदाला पदोन्नतीचे पद पुजारी असुन या पदाची वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० दि.०१/१०/२००६ पासून देणे अपेक्षीत होते. सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजुर करणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेसाठीचे टिपणी सोबत सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ देणे बाबत कर्मचारी यादीचे परिशिष्ठामध्ये श्री. कुलकणी यांना द्यावयाचे लाभाबाबत खालील प्रमाणे नमूद केलेले होते.

ASSTT.POOJARI
Payband 4440-7440 + Grade Pay 1450
Payband 5200-20200 + Grade Pay 1900

परंतू मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८ जानेवारी,२०१४ रोजीचे सभेत खालील प्रमाणे निर्णय समंत झालेला आहे. "उपरोक्त पात्र कर्मचा-यांपैकी अ.क्र.०१ श्री. कुलकणी विनायक केशव, सहाय्यक पुजारी,मंदिर विभाग यांना सदरचा दुसरा लाभ मंजूर झालेनंतर पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने, त्यांना मंजूर केलेल्या ५२००-२०२०० या वेतनबॅण्डमध्ये ग्रेड पे रु.१९००+ अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० मात्र देण्यात यावा." त्यानुसार श्री.कुलकर्णी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत २४ वर्षाचे सेवेनंतर ५२००-२०२००ग्रेड वेतन १९०० + अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० देणेबाबत आदेश पारित झालेला असल्याचे दिसुन येते. यामुळे श्री कुलकर्णी यांना एकाच वेळी दोन फायदे दिले गेलेले आहेत.

श्री.कुलकर्णी यांना देण्यात आलेले अतिरिक्त ग्रेड वेतन रु.३००/- मा.व्यवस्थापन समितीने मंजुर केलेले असल्याने सदरचे ग्रेड वेतन व अतिप्रदान झालेली रक्कम मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वसुल करावी लागेल, असे मत आहे.

तरी, श्री. विनायक केशव कुलकर्णी यांना २४ वर्षाचे सेवेनंतर महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम २००९ कलम १४ मधील तरतुदीनुसार दि. ०१/१०/२००६ पासुन ५२००-२०२०० ग्रेड वेतन १७५० व दि.०१ सप्टेंबर,२००९ पासुन ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० देणेकामी फेरवेतन निश्चिती करणेत येऊन अतिप्रदान झालेली रक्कम समान हप्त्यात वसुल करणेकामीचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विनायक केशव कुलकर्णी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वसित प्रगती योजनेअंतर्गत २४ वर्षाचे सेवेनंतर ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० + अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० आदेश पारित झालेला असल्याचे दिसुन येते. यामुळे श्री कुलकर्णी यांना एकाच वेळी दोन फायदे दिले गेलेले आहेत, त्यामुळे याबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत येऊन, श्री. विनायक केशव कुलकर्णी यांना २४ वर्षाचे सेवेनंतर महाराष्ट्र नागरी सेवा सुधारित वेतन नियम २००९ कलम १४ मधील तरतुदीनुसार दि. ०१/१०/२००६ पासुन ५२००-२०२०० ग्रेड वेतन १७५० व दि.०१ सप्टेंबर, २००९ पासुन ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० देणेकामी फेरवेतन निश्चिती करणेत येऊन अतिप्रदान झालेली रक्कम समान हप्त्यात वसुल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७२ शैक्षणिक संकुलाकडील कंत्राटी शिक्षीका कर्मचारी यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परताव्यासाठीच्या हजर दिवसांची अट शिथील करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ चे सभेतील निर्णय क.८१० व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.सासंवि १०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६ दि.१५ एप्रिल, २०१७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील स्थायी कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक फीचा परतावा करण्यात येतो, त्याच धर्तीवर सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागात कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचा-यांना (एकुण २७३६) पाल्यांचा शैक्षणिक फीचा परतावा करण्यास आणि त्याकरिता होणा-या अंदाजे ८० लक्ष इतक्या खर्चास शासन मान्यता मिळालेली आहे.

सदर मान्यतेनुसार संस्थानचे विविध विभागात कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परताव्याकामी जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-०६/७३२/२०१७ दि.०८ मे, २०१७ अन्वये परिपत्रक पारित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकामध्ये पुढीलप्रमाणे अटी व शर्तीची पालन करणेबाबत नमुद केलेले आहे.

१. स्थायी कर्मचा-यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करतांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे, त्याच नियमावलीचे अधीन राहून कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परतावा अदा करण्यात येईल.
२. जे कंत्राटी कर्मचारी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) या आर्थिक वर्षात **किमान २४० दिवस** हजर आहेत, असेच कर्मचारी त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फि परतावा मिळणेस पात्र असतील.

३. सदर शैक्षणिक शुल्क परताव्याच्या आधारे भविष्यात संस्थानच्या कंत्राटी कर्मचा-यांना इतर कोणताही सेवाविषयक किंवा आस्थापनाविषयक लाभ अथवा स्थायित्वाच्या अन्य सुविधांसाठी संस्थानवर दावा करता येणार नाही.

४. शासन आदेशात नमुद केल्यानुसार सोबतच्या मसुद्याप्रमाणे संबधीत कंत्राटी कर्मचा-यांकडून हमीपत्र भरुन घ्यावे.

परिपत्रकातील अटी व शर्तींचे बाबत, श्रीमती योगिता गोरक्ष डांगे व इतर ०४ कंत्राटी शिक्षिका, श्री साईबाबा इंग्लिश मिडीमय स्कुल यांनी त्यांचेकडील दि.२०.०५.२०१७ रोजीचे अर्जान्वये "आम्ही श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये कंत्राटी शिक्षिका/शिक्षक म्हणून कार्यरत आहोत. मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णयानुसार व शासनाच्या आदेशानुसार स्थायी कर्मचा-याप्रमाणेच कंत्राटी कर्मचा-यांचे पाल्यांना सन २०१६-१७ या वर्षाचे शैक्षणिक फी परतावा करणेस मान्यता मिळालेली आहे. त्याप्रमाणे संस्थानमार्फत जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ वशी-०६/ ७३२/२०१७ दि.०८ मे, २०१७ रोजी परिपत्रक पारित करण्यात आलेले आहे. सदर परिपत्रकातील अटी व शर्ती अ.क्र.२ मध्ये जे कंत्राटी कर्मचारी सन २०१६-१७ (एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७) या आर्थिक वर्षात किमान २४० दिवस हजर आहेत, असेच कर्मचारी त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फि परतावा मिळणेस पात्र असतील असे नमुद आहे. मात्र आम्ही सर्व कंत्राटी शिक्षिका म्हणून कार्यरत आहोत. आम्हांस शाळेच्या कामाच्या दिवशीच शाळेमध्ये हजर राहावे लागते, इतर दिवशी आम्हांला सुट्टी घ्यावी लागते. (उदा.सर्व सार्वजनिक सुट्टया, नाताळ सुट्टी, दिवाळी सुट्टी, उन्हाळी सुट्टी) त्यामुळे आमचे कामाचे दिवस हे २४० दिवसांपेक्षा काही अंशी कमी (२२० ते २३० दिवस) भरतात. आम्ही जाणीवपुर्वक कमी दिवस काम केलेले नाही. शाळेच्या कामाच्या दिवशी आम्ही पुर्णपणे कामावर हजर आहोत. त्यामुळे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा देतांना आम्ही खाली सह्या करणा-या कर्मचा-यांच्या हजर दिवसांबाबतची अट शिथिल करुन आमच्या साठी विशेष बाब म्हणून किमान २२० ते २३० दिवस कामावर हजर असणा-या कर्मचा-यांच्या पाल्याचा फी परतावा मिळावा, अशी विनंती केलेली आहे.

याबाबत प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल (पुर्व प्राथमिक विभाग) यांना इकडील कार्यालयाकडील दि.२९ मे, २०१७ रोजीचे पत्रान्वये वस्तुस्थितीबाबत अहवाल सादर करणेस कळविलेले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचेकडील दि.३१.०५.२०१७ रोजीचे पत्रान्वये पुढीलप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

"शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये शाळेत विद्यार्थ्यांना शिकविणे एकुण कामकाजाचे दिवस हे २२१ इतके झाले आहे. संपुर्ण शैक्षणिक वर्षात एकुण सार्वजनिक सुट्टी, उन्हाळी दिर्घ सुट्टी, नाताळ सुट्टी तसेच दिवाळी दिर्घ सुट्टी अशा सुट्टया देण्यात येत असल्याने त्या दिवशी शालेय कामकाज बंद असते यामुळे शिक्षकांनाही या दिवशी सुट्टी देण्यात येते. तसेच या सर्व महिला कंत्राटी शिक्षिका कर्मचारी यांना दिर्घ सुट्टीचे कालावधीत सक्तीने सुट्टी घ्यावी लागते. इतर पुरुष कंत्राटी शिक्षक व मदतनिस यांना दिर्घ रजा/ सुट्टीचे कालावधीत इतर विभागाकडे कामासाठी वर्ग केले जाते.

शालेय कामकाज २२१ दिवस व संपूर्ण वर्षभरातील सार्वजनिक सुट्टी, उन्हाळी सुट्टी, नाताळ सुट्टी तसेच दिवाळी सुट्टी विचारात घेता विशेष बाब म्हणून हजर दिवसांची अट शिथिल करुन २२० ते २३० दिवस कामावर हजर असलेल्या कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना शैक्षणिक शुल्क परतावा देणेत यावा. परंतू सदरची अट ही शैक्षणिक वर्ष २०१६-१७ शैक्षणिक फी परताव्यापुरती मर्यादीत ठेवावी जेणेकरुन इतर कंत्राटी कर्मचारी अशा सवलतीचा गैरफायदा घेणार नाहीत असे नम्र मत आहे. तरी उपरोक्त परिस्थिती विचारात घेता अशा प्रकारची अट शिथिल करुन शैक्षणिक शुल्क फी परतावा देण्याची तरतुद असेल तर त्या तरतुदीनुसार श्रीमती डांगे व इतर ०४ कंत्राटी शिक्षक कर्मचारी यांना फी परतावा देणेत यावा" असा अभिप्राय दिलेला आहे.

अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेली विनंती तसेच प्राचार्य, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांचेकडील अभिप्राय याचा विचार करता अर्जदार महिला कंत्राटी शिक्षिका यांना शाळेकडील शालेय कामकाजाचे दिवस वगळता सर्व सार्वजनिक सुट्टया, उन्हाळी सुट्रया, दिवाळी सुट्टया, नाताळ सुट्टया इत्यादी सक्तीने घ्याव्या लागतात. त्यामुळे त्यांचे २४० हजर दिवस पुर्ण होत नाहीत. बहुतांशी करुन हीच परिस्थिती शैक्षणिक संकुलाकडील कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये देखील असू शकते.

त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील फक्त महिला कंत्राटी शिक्षिका यांचे पाल्यांचा फी परतावा आदा करणेकामी परिपत्रकात नमुद असलेली किमान २४० दिवस हजर असण्याची अट काही अंशी

शिथिल करुन, किमान २२० ते २३० दिवस कामावर हजर असलेल्या महिला कंत्राटी शिक्षिका यांच्या पाल्यांचा फी परतावा करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.६११ अन्वये शैक्षणिक संकुलाकडील कायम व कंत्राटी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रजा/ सुट्टयांबाबतच्या शासन निर्णयांसह प्रस्ताव फेर सादर करणेत यावा, असा निर्णय पारित झालेला आहे.

सदर निर्णयानुसार शैक्षणिक संकुलाकडील दि.०५.०५.२०१० चे संयुक्तिक टिपणीवरील मान्यतेनुसार शाळा संहिता व शासन निर्णयानुसार शिक्षण विभागातील दीर्घ सुट्टी विभागात काम करणा-या शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या वार्षिक रजा व सुट्टयांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे

| **अ.क्र.** | **रजा सुट्टी तपशिल** | **रजा-सुट्टी दिवस** |
|---|---|---|
| ०१. | किरकोळ/नैमित्तिक रजा | १२ दिवस |
| ०२. | अर्जित रजा | १० दिवस |
| ०३. | वार्षिक दीर्घ सुट्टया | ३६ दिवस - उन्हाळी सुट्टी<br>१८ दिवस दिवाळी, नाताळ सुट्टी |
| ०४. | प्रासंगिक व सावर्जनिक सुट्टया | २२ दिवस |
| **एकुण रजा/सुट्टी दिवस** | | **९८ दिवस** |

या व्यतिरिक्त अंदाजे ०९ महिन्यांच्या आठवडा सुट्टया प्रति महिना सरासरी ०४ दिवस या प्रमाणे ३६ दिवस अशा ९८+३६ = **१३४ दिवस वार्षिक रजा/सुट्टी असतात.**

उपरोक्त रजा व सुट्टयांचा तपशिल हा कायम शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांचे बाबतीत लागू आहे. कंत्राटी शिक्षकांनाही त्याचप्रमाणे रजा/सुट्टया दिल्या जातात. त्यामुळे एक वर्षाचे ३६५ दिवस – १३४ दिवस = २३१ दिवस कामावर असतात. तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांना संस्थान सेवा विनियमाप्रमाणे रजा व सुट्टया दिल्या जातात.

उपरोक्त रजा/ सुट्टींचा तपशिल पाहाता शिक्षक व प्रयोगशाळा सहाय्यक यांचे कामाचे दिवस हे २३१ असल्यामुळे ते तेवढेच दिवस कामावर हजर राहातात. परिणामी कंत्राटी महिला शिक्षिका यांचेही कामाचे दिवस २३१ चे भरतात. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये शैक्षणिक फी परतावा करणेकामी त्यांचेसाठी २४० दिवस कामावर हजर असणेची अट ठेवणे उचित होणार नाही, असे नम्र मत आहे.

सबब शैक्षणिक संकुलाकडील महिला कंत्राटी शिक्षिका यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी २४० दिवस कामावर हजर असण्याची अट शिथिल करुन त्यांचेसाठी किमान २२० दिवस कामावर असणे आवश्यक असलेबाबत अट ठेऊन, त्यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परतावा आदा करता येईल, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलाकडील महिला कंत्राटी शिक्षिका यांचे पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी २४० दिवस कामावर हजर असण्याची अट शिथिल करुन त्यांचेसाठी किमान २२० दिवस कामावर असणे आवश्यक असलेबाबत अट ठेऊन, त्यांच्या पाल्यांचा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचा फी परतावा आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७३** **श्री.संतोष गणपत गुठळे, मदतनीस, श्री साईप्रसादालय यांचे गैरशिस्त वर्तनाबद्दल द्यावयाचे शिक्षेबाबत फेरविचार होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.संतोष गणपत गुठळे, हे दि.०५-१२-२००६ पासून संस्थान सेवेत कार्यरत आहेत. १) श्री.गुठळे हे श्री साईप्रसादालय विभागात वर्ग-४ कर्मचारी या पदावर कार्यरत असून त्यांची दि. ११-५-२०१४ रोजी आठवडा सुट्टी होती. त्यांनी दि.०९-५-२०१४ ते दि.१०-५-२०१४ रजा घेतलेली असून त्यांनी त्यास जोडून दि. ११-०५-२०१४ रोजी आठवडा सुट्टी जोडून घेतलेली आहे. त्यांचा वरील कालावधीचा रजा अर्ज मंजूर करणेत आलेला असतांना देखील त्यांनी आठवडा सुट्टीचे दिवशी हजेरी मस्टरवर स्वाक्षरी केलेली आहे. तसेच त्यांनी परस्पर श्री साईप्रसादालयातील रात्रपाळी चावी जमा नोंद रजिस्टरवर स्वत:च्या हाताने नाव टाकून स्वाक्षरी केलेली आहे. ते सुट्टीवर असतांना कामावर हजर असलेबाबत हजेरी मस्टरला स्वाक्षरी करणे हे त्यांचे कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

२) दि.१२-०५-२०१४ ते दि.३१-०३-२०१६ तसेच ते दि. ०१-०४-२०१६ पासून ते आतापर्यंत अखेरपर्यंत या कालावधीत पुर्व परवानगीशिवाय कामावरुन गैरहजर राहिले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री. गुठळे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री. गुठळे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

म्हणून उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री गुठळे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६२६/२०१४, दि.२२-०५-२०१४, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/८१०/२०१४, दि.३१-०५-२०१४, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/१३१०/२०१४, दि.१७-०६-२०१४, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१३४०/२०१४, दि.१९-०६-२०१४, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/१६०३/२०१४, दि.०५-०७-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३०१/२०१४, दि.०९-०८-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३३०३/ २०१४, दि.१३-१०-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३७४९ / २०१४, दि.१०-११-२०१४,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४४०९/२०१४, दि.१५-१२-२०१४, जा.नं. एसएसएस / वशी-७ए/ ४९९०/२०१५, दि.१२-०१-२०१५, जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/५७७७/२०१५, दि.२३-०२-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६४१३/२०१५, दि.२६-०३-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२३९/२०१५, दि.१५-०४-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/९२७/२०१५, दि.१६-०५-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१४५७ / २०१५, दि.११-०६-२०१५,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१९१७/२०१५, दि.०६-०७-२०१५, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ २६८९/२०१५, दि.१२-०८-२०१५,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३२३४/२०१५, दि.०७-०९-२०१५, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/३८५२/२०१५, दि.१०-१०-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४५११/२०१५, दि.१२-११-२०१५,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४९७०/२०१५, दि.०५-१२-२०१५, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ५५४१/ २०१६, दि.०७-०१-२०१६, जा.नं.एसएसएस//वशी-७ए/६१९१/२०१६, दि.०९-०२-२०१६, जा.नं.एसएसएस/ वशी-७ए /६७९०/२०१६, दि.०३-०९--२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०३/२०१६, दि.११-०४-२०१६,अन्वये कारणे दाखवा नोटीसा काढून त्यांचे लेखी खुलासे मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन श्री गुठळे यांनी दि.१७-०३-२०१६ रोजीचा लेखी खुलासा सादर केला असुन तो लेखी खुलासा असमाधानकारक आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी ) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य :-**

१) :- संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

i. संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

ii. सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि

iii. संस्थानाच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

उपरोक्तप्रमाणे सेवा वर्तणुक विनिमयांचे उल्लंघन,हे गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते. सदर गैरशिस्त वर्तन श्री. गुठळे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवण्यात आलेले होते. म्हणूनसदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री गुठळे यांना जा.नं.एसएसएस//वशी-७ए/५४६/२०१६, दि.१६-०५-२०१६ अन्वये अभिकथनपत्र देवून, त्यांचेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी ) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ (१) अन्वये त्याप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते. श्री.गुठळे यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.२३-०१-२०१७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे. कसुरदार श्री.गुठळेयांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे. खातेचौकशी अहवालानुसार श्री. गुठळे यांनी कायदेशिर तरतुदीचा भंग करुन गैरशिस्त वर्तन केल्याचे नि:संशयीतपणे शाबीत झाले आहे.

**<u>आदेश</u>**

१) श्री. संतोष गणपत गुठळे दोषी आहेत.

२) श्री. गुठळे यांनी श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम २०१३ चे कलम ३(१) नुसार गैरशिस्त वर्तन केले आहे.

३) रजेशिवाय गैरहजेरीचे काळात मे. ॲडीशनल सेशन जज्ज सो., कोपरगाव कोर्टातील सेशन केस नं. ४८/ २०१४ यात श्री.गुठळे दि.१४/५/२०१४ चे निकाल तारीख दि.१६-०२-२०१६ अखेर संशयीत आरोपी म्हणून

अटकेत होते, जेलमध्ये होते. सदर खटल्याचा निकाल दि.१६/२/२०१६ रोजी होवुन श्री. गुठळे यांची निर्दोष मुक्तता झाली, याचा विचार व्हावा.

तसेच श्री. संतोष गणपत गुठळे यांना यापुर्वी जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४२७६/२०१३ दि.२३/१/२०१३ अन्वये दि.२९-१२-२०१२ रोजीचे गैरशिस्त वर्तनाबाबत ताकीद देण्यात आलेली आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ विनियम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी ,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

श्री.संतोष गणपत गुठळे, मदतनीस, श्री साईप्रसादालय याचे विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले आहेत. तथापी चौकशी अहवाल आदेशातील क्र.३ नुसार रजेशिवाय गैरहजेरीचे काळात श्री.गुठळे संशयीत आरोपी म्हणून अटकेत होते, जेलमध्ये होते. सदर खटल्यात श्री. गुठळे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे.

श्री.संतोष गणपत गुठळे, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थानसेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेकामी निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेमध्ये विषय नं.५४ अन्वये गुठळे, यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर संमत झालेल्या निर्णय क्र.५७४ नुसार "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.संतोष गणपत गुठळे, वर्ग-४ कर्मचारी, श्रीसाई प्रसादालय विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचे खातेचौकशीमध्येही ते दोषी आढळून आलेले आहेत. त्यामुळे श्री.संतोष गणपत गुठळे, वर्ग-४ कर्मचारी, श्रीसाई प्रसादालय विभाग यांना सेवा(शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले." आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेमध्ये संमत झालेल्या निर्णय क्र.५७४ नुसार श्री.संतोष गणपत गुठळे, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभागयांना यांना उपरोक्त (८) नुसार सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फकरणे बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर करणेत आलेला होता. तथापी, गैरहजेरीचे काळात श्री.गुठळे संशयीत आरोपी म्हणून अटकेत होते, जेलमध्ये होते. सदर खटल्यात श्री. गुठळे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. त्यामुळे प्रस्तावित करण्यात आलेली शास्ती ही

दोषारापांच्या तुलनेत मोठया स्वरुपाची आहे. त्यामुळे भविष्यकाळात न्यायालायात प्रकरण टिकणार नाही. त्यामुळे श्री गुठळे यांना एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवणेबाबत शिक्षा देता येईल असे मत आहे.

तरी श्री.संतोष गणपत गुठळे, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ कलम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थानसेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षेऐवजी किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत कलम ५(४) वेतनावाढी रोखुन धरणेअंतर्गत त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठवणे ही शिक्षा देणेबाबत फेरविचार होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या विभागाच्या अभिप्रायाचा विचार करता यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.५७४ निरस्त करणेत येऊन, श्री.संतोष गणपत गुठळे वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ कलम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थानसेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षेऐवजी किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत कलम ५(४) वेतनावाढी रोखुन धरणेअंतर्गत त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठवणे ही शिक्षा देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७४** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांचे गैरशिस्त वर्तनाबद्दल द्यावयाचे शिक्षेबाबत फेरविचार होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय, मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे गैरशिस्तवर्तन घडलेले आहे.

श्री. राणे हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या आस्थापनेचे मुंबई कार्यालय येथे सहाय्यक संपादक या पदावर कार्यरत आहेत. श्री साईलिला (मराठी) व श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) या मासिकांची संपादकीय कामाची जबाबदारी त्यांचेवर नेमून देण्यात आलेली आहे. सदर साईलिला मासिक प्रत्येक महिन्याचे १५ तारखेस नियमानुसार विहीत वेळेत प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच सदर साईलिला मासिकांचे वितरण साईभक्तांना विहीत वेळेत होणे आवश्यक आहे व ते त्यांचेवर बंधनकारक आहे असे असतांनाही श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) माहे नाव्हेंबर/डिसेंबर २०१४ चे मासिक दि.१५-१२-२०१४ अखेर विहीत वेळेत प्रसिद्ध होणे आवश्यक होते. सदर साईलिला मासिक विहीत वेळेत प्रसिद्ध करणेकामी व साईभक्तांना वितरीत करणेकामी त्यांना वरिष्ठांनी अनेकवेळा समक्ष व दुरध्वनीवरुन सुचना दिलेल्या आहेत. तरी देखील त्यांनी नाव्हेंबर/डिसेंबर २०१४ चे श्री साईलिला (इंग्रजी/हिंदी) हे मासिक अद्यापर्यंत प्रसिद्ध केलेले नाही. सदर साईलिला मासिक साईभक्तांना अद्यापर्यंत प्राप्त न झाल्यामुळे ते इकडील कार्यालयास वारंवार दुरध्वनीवरुन विचारणा करतात. श्री साईलीला मासिक प्रत्येक वेळेस विहीत वेळोपेक्षा एक ते दिड महिना उशिराने प्रसिद्ध होत असल्याने त्याबाबत साईभक्तांनी प्रशासनकडे नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी नेमून दिलेल्या कामात ढोबळ निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केलेला आहे. तसेच त्यांना वरिष्ठांनी वेळोवेळी सुचना देऊन देखील ते वरिष्ठांचे सुचना व आदेशाचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. श्री राणे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांची उपरोक्तप्रमाणे,प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य इत्यांदीचे उल्लंघन केलेले आहे.

१. संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

२. पर्यवेक्षी पद धारण करणारा संस्थानचा प्रत्येक कर्मचारी तात्पुरते त्याच्या नियंत्रणाखाली आणि प्राधिकाराखाली असलेल्या संस्थानाच्या सर्व कर्मचा-यांचा प्रामाणिकपणा आणि सेवेशी एकनिष्ठता कायम राहील याची काळजी घेण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना अमलात आणेल.

३. आपली अधिकृत कर्तव्य पार पाडतांना किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करताना संस्थानाचा कोणताही कर्मचारी आपल्या सर्वोत्कृष्ट निर्णयशक्तीच्या वापराशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने कृती

करणार नाही, अपवाद म्हणजे जेव्हा तो आपल्या अधिकृत वरिष्ठांच्या निर्देशानुसार कृती करीत असेल आणि तो अधिकृत वरिष्ठांच्या निर्देशानुसार कृती करीत असेल आणि जेव्हा अशा निर्देशानुसार कृत्य करीत असेल तर त्यानं असे निर्देश लेखी प्राप्त केले पाहिजे, त्याने लवकरात लवकर लेखी पृष्टी प्राप्त करणे आवश्यक आहे.

४. पोटनियम (३) मधील कोणत्याही गोष्टीचा तदनुसार असा अर्थ लावता येणार नाही कि जेवूहा शक्ती आणि दायित्वाच्या वितरणाच्या योजनेखाली अशा सुचनांची आवश्यकता नसेल तेव्हा वरिष्ठ अधिका-याच्या किंवा प्राधिका-याच्या सुचना मागवून संस्थानच्या आपल्या दायित्वाचे पालन करण्यात कर्मचा-याला टाळाटाळ करण्याची शक्ती प्राप्त होणार नाही.

श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहा.संपादक, मुंबई कार्यालय यांनी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे विनियम ३ चे उल्लंघन केलेले आहे. उपरोक्त कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री. राणे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते. सदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री राणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६४/२०१५, दि.२५-०४-२०१५ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आले होते.

श्री.राणे यांचेवर ठेवण्यात आलेल्या अभिकथनपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.२२-०५-२०१७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे.

कसुरदार श्री.राणे यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे. खातेचौकशी अधिकारी यांनी दि.२२.५.२०१७ रोजीचे दिलेल्या अहवालातील निष्कर्ष आदेश खालीलप्रमाणे आहे.

आदेश

१. श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना दिनांक २५/४/२०१५ रोजी दिलेल्या अभिकथनपत्रातील आरोप नि:संशयीतरित्या शाबीत झाल्याने श्री.राणे दोषी आहेत.

२. श्री. राणे यांनी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) सेवा (वर्तणुक) विनियम २०१३ चे कलम ३ (१), (२), (३) व (४) नुसार गैरशिस्त वर्तन केले म्हणुन दोषी आहेत.

तसेच श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना यापुर्वी जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/ ३५७२/२०११ दि.७-११-२०११ अन्वये संस्थानला सेवेची आवश्यकता नसल्याने दि.०९.११.२०११ पासुन संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करण्यात आले होते. त्यानंतर जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२९१०/ २०१२ दि.२९.९.२०१२

अन्वये दि.०१.१०.२०१२ रोजी सहाय्यक संपादक श्री साईलीला या पदावर श्री.राणे यांना पुर्ववत संस्थान सेवेत हजर करण्यात आले. त्यानंतर श्री.राणे यांना गैरशिस्त वर्तनाबाबत आजपर्यंत लेखी सुचना- १ वेळा, ताकीद- १ वेळा, चार दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-१ वेळा, ठपका-१ वेळा अशा एकुण-४ वेळा शिक्षा झालेली असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनात सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या

अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

श्री. सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५(८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेबाबतनिर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेमध्ये विषय नं.३२ अन्वये श्री.राणे,यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर संमत झालेल्या निर्णय क्र.४८९ नुसार "यावर सविस्तर चर्चा होऊन श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे सेवेत व वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय, मुंबई यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५(८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले. तसेच, त्यासाठी नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली" असे ठरले होते.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेमध्ये संमत झालेल्या निर्णय क्र.४८९ नुसार श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना उपरोक्त (८) नुसार सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फकरणे बाबतचा आदेश स्वाक्षरीसाठी सादर करणेत आलेला होता. तथापी, संस्थानचे सोईचे दृष्टीने व साईलिला मासीकाचे कामकाजाकरीता दुसरा पर्याय उपलब्ध नसल्यामुळे श्री राणे यांना बडतर्फ करण्याऐवजी यापुढे त्यांचेकडून असे गैरवर्तन पुन्हा घडू नये याबाबत अंडरटेकींग घेता येईल. तसेच त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखून ठेवणेबाबत शिक्षा देता येईल.

तरी, श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ कलम ५(८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षेऐवजी किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत कलम ५(४) वेतनावाढी रोखुन धरणे अंतर्गत त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन ठेवणे ही शिक्षा देणेबाबत फेरविचार होणेस विनंती आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या विभागाच्या अभिप्रायामध्ये नमुद केलेनुसार, श्री.राणे यांना बडतर्फ केल्यास संस्थानचे सोईचे दृष्टीने व साईलिला मासीकाचे कामकाजाकरीता दुसरा पर्याय उपलब्ध नाही, याकरीता श्री.राणे यांना बडतर्फ करण्याऐवजी यापुढे त्यांचेकडून असे गैरवर्तन पुन्हा घडू नये याबाबत अंडरटेकींग घेण्यात यावे व यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.४८९ निरस्त करणेत येऊन, श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, मुंबई कार्यालय यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ कलम ५(८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे या शिक्षेऐवजी किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत कलम ५(४) वेतनावाढी रोखुन धरणे अंतर्गत त्यांची एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी रोखुन ठेवणे ही शिक्षा देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७५** **साईपालखी निवारा येथील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये विद्युतीकरणाचे काम करणे व वीज जोडणी करणेकरीता कराव्या लागणाऱ्या प्राथमिक ई-निविदा, इस्टिमेट, ड्राईंग वगैरेसाठी कन्सल्टंट नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

२१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थानला शिर्डी नजीक निघोज निमगांव येथील साई पालखी निवा-यातील B व D या दोन इमारती संस्थानला देणगी म्हणून मिळालेल्या आहे. इमारत क्र. B मध्ये विद्युतीकरणाचे काम करण्यात आलेले असून यासर्व रुममध्ये फॅन, टयुबलाईट व ए.सी.बसविण्यात आलेले आहेत.

इमारत क्र.D मध्ये १ला माळा व २ रा माळा याठिकाणी वायरींग काम करण्यात आलेले असून ३ रा माळा याठिकाणचे वायरींग काम अपुर्ण आहे. ४ था, ५ वा व ६ वा मजला याठिकाणी वायरींग काम करण्यात आलेले नाही. या दोन्ही इमारतींच्या इलेक्ट्रिकल लोडचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**विद्युतभाराचा तपशिल :- इमारत क्र.B**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | वॅट | एकुण वॅट |
|---|---|---|---|---|
| १ | ए.सी. | ६४ | २००० | १२८००० |
| २ | फॅन | ६६ | ६० | ३९६० |
| ३ | टयुब | ११० | ३६ | ३९६० |
| ४ | सी.एफ.एल. | १८० | १५ | २७०० |
| ५ | बल्ब | ९१ | १५ | १३६५ |
| ६ | टि.व्ही. | ६४ | ६० | ३८४० |
| ७ | | | **एकुण वॅट :-** | **१४३८२५** |
| | | | **किलो वॅट :-** | **१४३.८२५** |

**विद्युतभाराचा तपशिल :- इमारत क्र.D**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | वॅट | एकुण वॅट |
|---|---|---|---|---|
| १ | ए.सी. | ३२० | २००० | ६४०००० |
| २ | फॅन | ३८० | ६० | २२८०० |
| ३ | टयुब | ३८० | ३६ | १३६८० |
| ४ | सी.एफ.एल. | ३२० | १५ | ४८०० |
| ५ | बल्ब | ३२० | १५ | ४८०० |
| ६ | टि.व्ही. | ३२० | ६० | १९२० |
| ७ | स्ट्रिट लाईट शेड (LED) | १८ | १५० | २७०० |
| ७ | | | **एकुण वॅट :-** | **७०७९८०** |
| | | | **किलो वॅट :-** | **७०७.९८०** |

उपरोक्त B व D इमारतींचा एकुण लोड १४३.८२५ + ७०७.९८० = ८५१.८०५ kw इतका होत असून लवकरच आय.ए.एस.ॲकेडेमी चालू झाल्यानंतर यात वाढ होऊ शकते.

सध्याचा लोड ८५१.८०५ kw / थ्री फेज = २८४.०० kw

+ भविष्यातील लोड = १००.०० kw

-----------------------------------------------------

३८४ kw

say ४००.०० kw

i.e.५०० kva

याबाबत दि.१७-०९-२०१७ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर खालील शेरे नमूद झाले होते. (०१) इलेक्ट्रिकल कामे, सिव्हिलचे अपूर्ण कामे, IAS acading चे रचना व Infrastructure चे कामे, Interior ची कामे यासाठी एकच सल्लागार नेमणे उचित राहील. (०२) वरील सर्व कामे संबधीत देणगीदार देणार करुन देणार आहे काय ? याबाबत प्रथम विचारणा करावी. त्यांचा नकार आल्यास विहीत प्रक्रीया राबवावी असे मत आहे.

वरील शे-यांना अनुसरुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत.

(०१). इमारत क्र.D चे बाकी राहिलेले काम हे संबंधीत देणगीदार साईभक्तयांचे मार्फत पुर्ण करुन देणार असल्याचे त्यांचे दानपत्रात नमूद केले आहे.

(०२). दोन्ही इमारतींना उच्चदाब विद्युतपुरवठा जोडणी करुन घेणे, सबस्टेशनची उभारणी करणे, भूमिगत केबल टाकणे, जनरेटरसेट खरेदी करुन बसविणे, जनरेटर रुमचे बांधकाम करणे ही कामे संस्थानमार्फत करावी लागणार आहे. या कामासाठी ई-निविदा तयार करुन, मागवून ते काम पूर्ण होईपर्यंत साधारणत: ६ ते ९ महिन्याचा कालावधी लागू शकतो.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे पर्यायी वीजपुरवठयाकरीता ५०० के.व्ही.ए. क्षमतेचे जनरेटरसेट बसविणे, इमारतीकरीता पॅनेल बसविणे, ५०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविणे, साधारणत: ६०० मीटर अंतर केबल अंडरग्राऊंड टाकणे, जनरेटर रुमचे बांधकाम करणे इ. विद्युतीकरणाची कामे तातडीने करावी लागणार आहेत. त्यासाठी सदरील विद्युतीकरणाचे कामासाठी सल्लागार यांची नियुक्ती करावी लागणार आहे. सल्लागार यांची नियुक्ती करणेकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईपालखी निवारा येथील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये विद्युतीकरणाचे काम करणे व वीज जोडणी करणेकरीता कराव्या लागणाऱ्या प्राथमिक ई-निविदा, इस्टिमेट, ड्राईंग वगैरेसाठी कन्सल्टंटची नियुक्ती करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.७६** **साईधर्मशाळा विभागासाठी नवीन बेडशीट, उशी कव्हरसह खरेदी करणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) विश्वस्तव्यस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पहाणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा –अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** निरंक

**प्रस्ताविक:-** साई धर्मशाळा विभाग दि.१८/०७/२०१३ रोजी पासुन साई भक्तांचे निवासव्यसस्थेसाठी सुरु करण्यात आलेला आहे. या विभागात एकुण ६ इमारतीत प्रत्येकी ३२ हॉल या प्रमाणे एकुण १९२ हॉल आहेत, पैकी डी' इमारत ही कनिष्ठ महाविद्यालयास वापरण्यास देण्यात आलेली आहे. उर्वरीत ५ इमारतीतील १६० हॉल मध्ये पदयात्री. पालखीधारक व सहलीमध्ये सहभागी होणा-या साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येत आहे.

निवासासाठी येणा-या साईभक्तांना गादी, चादर, बेडशिट, उशीकव्हर इत्यादी वस्तु हॉल मध्ये वापरास देण्यात येतात. साई धर्मशाळा निवासस्थान इमारतीमध्ये एकुण १६० हॉलमध्ये एकुण २८८० लोखंडी कॉट वापरात आहेत. हॉलमधील कॉटसाठी प्रत्येकी ०१ याप्रमाणे एकुण २८८० नग बेडशिट, उशीकव्हर दैनंदिन वापरले जातात व १००० नग धुण्यासाठी देण्यात येतात, असे एकुण ३८८० नग बेडशिट उशीकव्हर एका वेळी वापरात असतात. हॉल खाली झाल्यावर लगेचच बेडशिट/ उशीकव्हर बदलले जातात. चेकींग टाईम २४ तासांचा असल्याने ज्याप्रमाणात हॉल खाली होतात त्याप्रमाणात बेडशिट/उशीकव्हर बदलली जातात. साई धर्मशाळा विभागामध्ये मोठया प्रमाणात पालखीधारक, ग्रुप येणारे साईभक्त तसेच सहलीने येणारे विद्यार्थी या साईभक्तांची निवासासाठी मोठया प्रमाणावर गर्दी असते. ६० ते ७० टक्के हॉल भक्तांना प्रतिदिन निवासासांठी दिलेले असतात. त्यामुळे बेडशिट व उशीकव्हर दोन ते तीन दिवसातुन नेमलेल्या ठेकेदारास धुण्यास देण्यात येवून परत त्यांचे मार्फत धुवून /इस्त्री करुन विभागास मिळतात. प्रतिदिन वापरामुळे व होणा-या रासायनीक प्रक्रीयेमुळे तसेच काही साईभक्त कॉटवर बसुन चहा नाष्टा करतात, त्यामुळे बेडशीटवर चहा व खाद्यपदार्थाचे डाग पडतात सदर डाग धुवून सुध्दा जात नाही त्यामुळे असे बेडशिट साईभक्तांना न देता निरुपयोगी म्हणुन बाजुला ठेवली जातात व इतर विभागांचे मागणी नुसार ते स्वच्छतेकामी वापरासाठी दिली जातात.

दि.०८/०१/२०१४ मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३१ नुसार संस्थान भक्तनिवासस्थान मधील बेडशिट, उशीकव्हर व गादीकव्हर दर दिड वर्षानी (१८ महिने) बदलणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर कापडी वस्तूचे वयोमान हे दिड वर्ष (१८ महिने) निश्चित केले आहे. बेडशीट उशिकव्हर सतत वापरामुळे

खराब झाले आहेत. ब-याच बेडशिटवर डाग पडले आहेत. धुवून सुध्दा डाग जात नाहीत त्यामुळे साईभक्त नाराजी व्यक्त करतात.

सन २०११-१२ मध्ये जा.नं. एसएसएस/ वशी– खरेदी/ २८११/२०११ दि.०२/०९/२०११ नुसार मे.बांठीया एंटरप्रायजेस, पुणे यांना खरेदी विभागामार्फत पुरवठा आदेश देवुन खरेदी करण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.नं | नावं | तपशिल | संख्या | दर प्रति नग | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशिट | बेडशिट (प्रिंटेड) मफतलाल १०० % कॉटन ५४''X ९०'' | १०५६० | १४१/- | १४,८८,९६०/- |
| २ | पिलोकव्हर | १०० % कॉटन प्रिंन्टेड | १०५६० | ३९.९९ | ४,२२,२९४/- |
| | | | | एकुण रु.- | १९,११,२५४/- |

साई धर्मशाळा विभागाकडे असलेल्या एकुन १०५६० नग बेडशिट पैकी दि. १८/१२/२०१३ रोजी साईप्रसाद निवासस्थान विभागासाठी ३००० नग बेडशिट वर्ग करण्यात आले आहेत. तसेच साई धर्मशाळातील हॉल साठी ४८०० नग बेडशिट वापरण्यात देण्यात आले. तसेच ५३२ नग बेडशिट खराब झाल्याने स्टॉक मधुन कमी केले व १०२४ नग खराब बेडशिट जमा करुन नविन बेडशिट वापरण्यास दिले आहे. सध्या विभागाकडे नविन १२०४ नग बेडशिटचा साठा शिल्लक आहे. तसेच उशीकव्हर नविन २००० नग शिल्लक आहेत.

श्रीं चा महाशताब्दी २०१८ सोहळा सुरु झालेला आहे. साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी नविन ५००० नग बेडशिट उशी कव्हरसह खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. जेणेकरुन साईभक्तांची बेडशिट उशी कव्हरसह अभावी गैरसोय होणार नाही.

विभागाकरीता बेडशिट उशी कव्हरसह खरेदी कामी काही ट्रेडींग कंपनीचे सध्याचे बाजारभावाचे सर्वकरासह दर मागविण्यात आले आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.नं. | पार्टीचे नाव | मालाचे वर्णन | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| १ | फॅशन पॉलीकेशन, वजे बिल्डींग, सुभाष रोड, नाशिक रोड. नाशिक. | पिंटेड बेडशिट उशि कव्हरसह (ब्रॅन्डेड कंपनीचे उदा. बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.) साईज (इंचामध्ये) बेडशिट – ६०" X ९०", उशीकव्हर – १८" X २७" | २९०.०० (सर्व करासह शिर्डी येथे पोहोच) |
| २ | अमित एन्टरप्राईज, ३८/४० चंम्पा गल्ली, एक्स लेन, पहिला मजला, रु.नं.११/ए ,कलबादेवी रोड, मुंबई. | पिंटेड बेडशिट उशी कव्हरसह (ब्रॅन्डेड कंपनीचे उदा. बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.) साईज (इंचामध्ये) बेडशिट – ६०" X ९०", उशीकव्हर – १८" X २७" | २९०.०० (सर्व करासह शिर्डी येथे पोहोच) |
| ३ | जय भवानी टेड्र्स कं., ४५/४७, चम्पा गल्ली, तळमजला, मुंबई, | पिंटेड बेडशिट उशी कव्हरसह (ब्रॅन्डेड कंपनीचे उदा. बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.) साईज (इंचामध्ये) बेडशिट – ६०" X ९०", उशीकव्हर – १८" X २७" | २९०.०० (सर्व करासह शिर्डी येथे पोहोच) |

**विभागाची मागणी:-** श्रीं चा महाशताब्दी सोहळा कालावधीत बेडशिट साठा कमी पडु नये , भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणुन नविन बेडशिट उशी कव्हरसह खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | तपशिल | नग | अंदाजे दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| **१** | पिंटेड बेडशिट उशिकव्हर सह (ब्रॅन्डेड कंपनीचे उदा. बॉम्बे डाईंग, मफतलाल, प्रकाश कॉटन मिल इ.) साईज (इंचामध्ये) बेडशिट – ६०" X ९०", उशिकव्हर – १८ X २७ | **५०००** | **२९०/-** | **१४,५०,०००/-** |

त्यानुसार सर्व करासह अंदाजे रु. २९०/- रुपये प्रतिनग प्रमाणे बेडशिट उशीकव्हर सह साठी खर्च अपेक्षित असुन असे एकुण ५००० नग बेडशिट व उशीकव्हर साठी सरासरी रु. १४,५०,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

विभागासाठी आवश्यक ५००० नग प्रिंटेड बेडशिट उशिकव्हर सह खालील स्पेशिफीकेशन प्रमाणे खरेदी करावे लागणार आहेत.

**Technical Specification**

| Sr.No | Bed Sheet | Pillow Cover |
|---|---|---|
| 1 | Cotton 100 % ( सुती) | Cotton 100 % ( सुती) |
| 2 | E.P.I. – 64/66 (कापडातील उभे धागे) | E.P.I. – 64/66 (कापडातील उभे धागे) |
| 3 | P.P.I.- 54/56 (कापडातील आडवे धागे) | P.P.I.- 54/56 (कापडातील आडवे धागे) |
| 4 | Warp Count – 20 S Ne<br>( कापडात वापरलेले उभे सुत) | Warp Count – 20 S Ne<br>( कापडात वापरलेले उभे सुत) |
| 5 | Waft Count – 20 S Ne<br>( कापडात वापरलेले आडवे सुत) ( जाळे) | Waft Count – 20 S Ne<br>( कापडात वापरलेले आडवे सुत) ( जाळे) |
| 6 | Washing Fastness – above 4 – 5<br>(कापड धुतल्यानंतर पडणार फरक) | Washing Fastness – above 4 – 5<br>(कापड धुतल्यानंतर पडणार फरक) |
| 7 | Light Fastness- above 4 – 5<br>(सुर्यप्रकाशात कापडावर पडणार फरक) | Light Fastness- above 4 – 5<br>(सुर्यप्रकाशात कापडावर पडणार फरक) |
| 8 | Weight – 430 grams/no. | Weight – 65 grams/no. |

**छाननी करुन अनुमानः-** महाराष्ट्र शासनाने पारीत केलेला अधिनियम व मा. व्यवस्थापन समितीचा समंत ठरावानुसार नविन बेडशिट उशि कव्हरसह खरेदी करता येतील.

**विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मतः-**

वरील प्रमाणे प्राप्त बेडशिट वस्त्र समिती, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार, वस्त्र प्रयोग शाळा व अनुसंधान केंद्र, पी बालु रोड, प्रभादेवी चौक, प्रभादेवी मुंबई – ४०० ०२५ यांचेकडुन तपासणी करुन खरेदी कराता येईल. सदर खरेदीकामी येणा-या खर्चास सन – २०१७/१८ चे सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करुन खरेदी करता येईल.

१) नमुदप्रमाणे ५००० नग प्रिंटेड बेडशिट उशी कव्हरसह खरेदीकामी येणा-या रु.१४,५०,०००/- (अक्षरी रु. चौदा लाख पंन्नास हजार मात्र ) अपेक्षित खर्चास.

२) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस, तसेच शासनाचे वेबसाईट व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करणेस.

३) सदरील खरेदी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग-४ दि. ०१डिसेंबर २०१६ अन्वये खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने खरेदी करता येईल. किंवा ज्या संस्थाना आरक्षण आहे त्यांचेकडुन खरेदी करता येईल.

तरी सदर प्रस्तावास येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ प्रस्ताव सादर.

निर्णय क्र.९८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तवात नमुद केलेप्रमाणे साईधर्मशाळा विभागामध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेसाठी ५००० नग नवीन बेडशीट, उशी कव्हरसह खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१४,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा)

---

**विषय नं.७७ मोतीचुर लाडू प्रसाद पाकिटे साईभक्तांना विक्री करताना प्रत्येक भक्तास देण्यात येणाऱ्या पाकिटांची संख्या मर्यादित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक -** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार " श्रींचे दर्शन झालेनंतर बाहेरुन येणा-या साईभक्तांना प्रसाद म्हणुन एखादा पदार्थ घरी नेता यावा, या उद्देशाने शुध्द गावराण तुपापासुन मोतीचुर लाडु बनविण्याचे ठरले. सदरचे मोतीचुर लाडु शुध्द गावराण तुपात बनविलेले असल्याने

सकस व पौष्टीक असतात, त्यामुळे प्रथतमः दर्शन रांगेमधून साईभक्तांना प्रसाद लाडूचे मोफत वितरण करण्यास मान्यता देण्यात आली होती. साईभक्तांना त्याचा अल्पोपहार/ प्रसाद म्हणूनही उपयोग करता येईल, असा मा.त्रिसदस्यीय समितीचा हेतु होता. या सर्व बाबींचा विचार करुन मा. त्रिसदस्यीय समितीने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयास अधीन राहुन दि.१५ ऑगस्ट २०१३ पासुन साईभक्तांना प्रथमतः दर्शन रांगेमध्ये मोफत लाडू प्रसाद वाटप करणेस मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे निर्णयामध्ये असे स्पष्ट नमुद आहे की, "दर्शन रांगेमध्ये प्रत्येक साईभक्तांस प्रत्येकी ५० ग्रॅमचे दोन लाडू हातात धरणे सोपे होईल, अशा कागदी पिशवीमधुन वाटप करण्यात यावेत. तसेच ज्या साईभक्तांना याव्यतिरीक्त जास्त लाडू प्रसाद पाकिटांची आवश्यक्ता असेल, अशा साईभक्तांसाठी लाडू विक्री काऊंटर चालू ठेवण्यात येऊन, या काऊंटर्सवर प्रत्येकी ५० ग्रॅमच्या तीन लाडूचे एक पाकिट विक्रीसाठी ठेवणेत यावे व सशुल्क लाडू पाकिटाची किंमत रू.१०/- ऐवजी रू.२०/- मात्र प्रति पाकिट ठेवण्यात यावी आणि एका साईभक्तास फक्त दोन लाडू प्रसाद पाकिटे देण्यात यावीत. आपल्याकडील एका दिवसासाठी असलेल्या साठयामधून हि विक्री करणेत यावी. त्या दिवसाचा साठा संपुष्टात आल्यास सशुल्क लाडू विक्री काऊंटर्स त्या दिवसापुरते बंद ठेवण्यात यावे."

परंतु भक्तांची वाढती गर्दी व तयार होणारे लाडु प्रसाद पाकीटे यांचा साठा लक्षात घेता, उपरोक्त संदर्भीय क्र.०२ नुसार "दर्शन रांगेमध्ये भक्तांना १०० ग्रॅम वजनाचे दोन लाडूंचे पाकिट वाटप करण्याऐवजी त्याच वजनाच्या सुटी (लुज) बुंदीचे पाकिट प्रसाद रुपाने देणेस मान्यता देण्यात आली. मात्र प्रसाद लाडू विक्री काऊंटरवर पुर्वीप्रमाणे १५० ग्रॅम वजनाचे ०३ नग लाडूंचे पाकिट विक्रीसाठी ठेवणेत यावे, असे ठरले.

त्याचप्रमाणे उपरोक्त संदर्भीय क्र.०३ अन्वये, दर्शन रांगेत वाटप होणारे सदरहु बुंदी प्रसादाचे पाकिट उघडल्यानंतर साईभक्ताकडून पुर्णपणे प्रसाद खाल्ला जात नाही व तो इतरत्र पडून पायाखाली येतो याकरीता, दर्शनरांगेमधील भक्तांना १०० ग्रॅमच्या बुंदी प्रसाद पाकीटाऐवजी ५० ग्रॅम वजनाच्या बुंदी प्रसाद पाकिटाचे वाटप करण्यात यावे." असे ठरले आहे, त्यानुसार सदरची कार्यवाही दि.०३/०९/२०१६ पासुन सुरु आहे.

मोतीचूर लाडू व सुटी बुंदी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे किराणा मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) इ. संस्थानचे मध्यवर्ती खेरदी विभागामार्फत खेरदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्र देऊन त्यांचेकडुन सदरचे मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येते.

**सन २०१६-१७ मधील मोतीचुर लाडु बाबत तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | दिवसाला सरासरी मोतीचुर लाडु विक्री | २५००० ते ३०००० पाकीटे |
| २ | वार्षिक सरासरी मोतीचुर लाडु विक्री पाकीटे संख्या | ९०,६१,१०० पाकीटे |
| ३ | मोतीचुर लाडु विक्रीव्दारा होणारा आर्थिक भार (तोटा) | रु.१,९२,६४,२४२/- |

सन **२०१६-१७** करीता किराणा मालाचे दर खालीलप्रमाणे आहेत-

| **तपशिल** | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दर** | ३९.०१ | ७६.०० | ३५४.०० | ६९३.०० | १६३.०० | ९५०.०० | १४३.०० | १२९.०० |

माहे मार्च २०१६ ते डिसेंबर २०१६ अखेर ०३ नग लाडु पाकीटाची विक्री किंमत रु.२०.०० इतकी ठेवण्यात आली होती. त्यावेळी ०३ नगाचे (प्रती नग ५० ग्रॅमचा) एक लाडु पाकीट तयार करणेसाठी किराणा मटेरीयल व मजुरी मिळुन सरासरी रु.२०.५३पैसे इतका खर्च आलेला आहे. सन २०१६-१७ मध्ये मोतीचुर लाडु बनविणेकामी मे २०१६ ते डिसेंबर २०१६ या ०८ महिन्यांमध्ये एकुण रुपये रु.१,९२,६४,२४२/- इतका तोटा झाला होता. त्याचप्रमाणे माहे एप्रिल २०१६ मध्ये रु. ६,९०,७६८/- याप्रमाणे, तर माहे जाने.२०१७ ते मार्च २०१७ अखेर ०१ लाडु पाकीटाची किंमत रु.२५/- केल्याने मटेरीयल व इतर खर्च वजा जाता रक्कम रु.२३,३२,९२८/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त (नफा) झालेली आहे.

**सन २०१६-१७ मधील लाडु प्रसाद पाकीटे विक्री संख्या व रक्कम**

| अ.नं. | महिना (सन २०१६-१७) | एका लाडू पाकीटास आलेला खर्च | एका लाडू पाकीटाची विक्री किंमत | विक्री पाकीटे X झालेला नफा/तोटा | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | १८.९६ | २०.०० | ६६४२०० X ०१.०४ | ६,९०,७६८.०० |
| २ | मे २०१६ | २०.२८ | २०.०० | ७०११०० X -००.२८ | -१,९६,३०८.०० |
| ३ | जुन २०१६ | २३.९१ | २०.०० | ६७७००० X -०३.९१ | -२६,४७,०७०.०० |
| ४ | जुलै २०१६ | २४.७८ | २०.०० | ७५८४०० X -०४.७८ | -३६,२५,१५२.०० |
| ५ | ऑगस्ट २०१६ | २४.३० | २०.०० | ७४८४०० X -०४.३० | -३२,१८,१२०.०० |
| ६ | सप्टेंबर २०१६ | २४.८४ | २०.०० | ६३६५००X-०४.८४ | -३०,८०,६६०.०० |
| ७ | ऑक्टोंबर २०१६ | २३.६७ | २०.०० | ६५८४००X-०३.६७ | -२४,१६,२३८.०० |
| ८ | नोव्हेंबर २०१६ | २२.२० | २०.०० | ८१०५००X-०२.२० | -१७,८३,१००.०० |
| ९ | डिसेंबर २०१६ | २२.४४ | २०.०० | ९४१६००X-०२.४४ | -२२,९७,५०४.०० |
| १० | जानेवारी २०१७ | २४.९० | २५.०० | ९९६५००X००.१० | ९९,६५०.०० |
| ११ | फेब्रुवारी २०१७ | २३.३७ | २५.०० | ७०४८००X०१.६३ | ११,४८,८२४.०० |
| १२ | मार्च २०१७ | २३.५८ | २५.०० | ७६३७००X०१.४२ | १०,८४,४५४.०० |

तसेच माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ अखेर दर्शन लाईनमध्ये साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटे वाटप करण्यात आली, त्यापासुन वार्षिक रक्कम रु.१९,८०,०७,३२३/- इतका संस्थानला तोटा झाला आहे. सदरची रक्कम अन्नदान खाती खर्ची टाकण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल व त्यासाठी आलेला खर्च पुढीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना (सन २०१६-१७) | ०१ बुंदी पाकीटासाठी खर्च | पाकीटाचे वजन *(ग्रॅममध्ये)* | वाटप पाकीटे | एकुण (रु.) *(वाटप पाकीटे X खर्च)* |
|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०१६ | १३.४५ | १०० | १२१७७०० | १६३७८०६५.०० |
| २ | मे २०१६ | १३.३३ | १०० | १६९३०५० | २२५६८३५६.५० |
| ३ | जुन २०१६ | १६.०९ | १०० | १६५१२०० | २६५६७८०८.०० |
| ४ | जुलै २०१६ | १४.९८ | १०० | १४१५७०० | २१२०७१८६.०० |
| ५ | ऑगस्ट २०१६ | १५.८५ | १०० | १२९६४५० | २०५४८७३२.५० |
| ६ | सप्टेंबर २०१६ | ८.६५ | ५० | ११६९७०० | १०११७९०५.०० |
| ७ | ऑक्टोंबर २०१६ | ८.५८ | ५० | १२३३६०० | १०५८४२८८.०० |
| ८ | नोव्हेंबर २०१६ | ८.३२ | ५० | १५७१२०० | १३०७२३८४.०० |
| ९ | डिसेंबर २०१६ | ८.९९ | ५० | १७४३८०० | १५६७६७६२.०० |
| १० | जानेवारी २०१७ | ९.४९ | ५० | १८२४४०० | १७३१३५५६.०० |
| ११ | फेब्रुवारी २०१७ | ९.०७ | ५० | १२४९८०० | ११३३५६८६.०० |
| १२ | मार्च २०१७ | ९.७१ | ५० | १३०१४०० | १२६३६५९४.०० |
| | **एकुण** | **----** | **----** | **१७३६८०००** | **१९,८०,०७,३२३.००** |

त्याचप्रमाणे सन **२०१७-१८** करीता खेरेदी विभागाकडुन किराणा मालाचे खालीलप्रमाणे सुधारीत दर प्राप्त झाले आहेत-

| **तपशिल** | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **दर** | ४१.९० | ८२.८२ | ३९६.०० | ८६१.०० | १४९.०० | १०८०.०० | १८६.०० | १५९.०० |

माहे ऑगस्ट २०१७ पासुन उपरोक्त सुधारीत दरानुसार किराणा मालाची खरेदी करुन लाडु निर्मिती विभागास पुरविले जात आहे. सदरचे सुधारीत दरांनुसार ०१ लाडु पाकीट (१५० ग्रॅम वजनाचे) तयार करणेसाठी (सर्व खर्च ग्राह्य धरुन) रक्कम रु.२६.७४ पैसे इतका खर्च येत आहे. मात्र सध्या ०१ लाडु पाकीटाची विक्री किंमत

रु.२५/- इतकी असल्याने वार्षिक सरासरी होणारी विक्री लाडु पाकीटे (९०,००,००० पाकीटे) X विक्री रक्कम वजा जाता पाकीटासाठीचा अतिरिक्त खर्च (रु.०१.७४ पैसे) = वार्षिक सरासरी रक्कम रु. १,५६,६०,०००/- इतका आर्थिक भार संस्थानवर पडणार आहे.

मात्र उपरोक्त सदर्भीय क्र.०४ नुसार, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.३० निर्णय क्र.७८४ अन्वये, "सध्या लाडू प्रसाद पाकिटे विक्रीसाठी एकाच ठिकाणी काऊंटर्स आहेत व एका साईभक्तांस फक्त २ लाडूप्रसाद पाकिटे देण्यात येतात, लाडू प्रसाद पाकिटे विक्री केंद्रावर साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते या ठिकाणी लाडूप्रसाद पाकिटे मिळणेसाठी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता संस्थानच्या इतर ठिकाणी (जसे- प्रसादालय व निवासस्थाने) लाडूप्रसाद विक्री केंद्र सुरू करणेत यावीत व साईभक्त मागणी करतील तेवढी लाडू प्रसाद पाकिटे त्यांना उपलब्ध करून देण्यात यावीत. याचबरोबर लाडूप्रसाद पाकिटांचा गैरवापर होऊ नये, याकरीता लाडू प्रसाद पाकिटाची किंमत दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन रू. २५/- मात्र करणेत यावी." असे ठरले आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन माहे जानेवारी २०१७ पासुन ०३ नगाचे ०१ लाडु पाकीट रु.२५/- इतक्या किंमतीस विक्री करण्यात येत आहे व साईभक्तांना पाहीजे तेवढी (मागणी केल्याप्रमाणे) लाडु प्रसाद पाकीटे विकत देण्याच्या कार्यवाहीस सुरुवात करणेत आली, मात्र मागणी केल्यानुसार लाडु प्रसाद पाकीटे उपलब्ध होत असल्यामुळे व सदरचे शुध्द तुपातील लाडु पाकीटे स्वस्तात मिळत असल्याने लोकांनी सदरचे प्रसाद पाकीटांचा "प्रसाद" म्हणुन वापर करण्याऐवजी अनेकविध कार्यक्रम/उत्सव (उदा. वाढदिवस, जयंत्या, पुण्यतिथी, वास्तुशांती व श्राध्द) साजरे करणेसाठी वापर सुरु केल्याचे आढळुन आलेले आहेत/मागणी करतांना दिसत आहेत. त्यामुळे पाहिजे तेवढी मुबलक लाडु प्रसाद पाकीटे मिळत असल्यामुळे साईप्रसादाचे महत्व दिवसेंदिवस कमी होतांना दिसत आहे. मोतीचुर लाडु प्रसाद बनविणेकामी कमीत कमी ०४ तासांचा अवधी लागतो, त्यामुळे लाडु विक्री काऊंटरवर एका साईभक्तांस जास्तीत जास्त ०२ लाडु पाकीटांची विक्री केल्यास होणा-या गर्दीवर व वाढत्या मागणीतुन प्रसादाचे होणा-या गैरवापरावर नियंत्रण ठेवता येईल. तसेच दर्शन लाईनमध्ये साईभक्तांना वाटप करणेत येत असलेला मोफत बुंदी प्रसादासाठी लागणारे मटेरीयल व त्याचा खर्चही विचारात घ्यावा लागेल. सदरचा प्रसाद बनविणेसाठीही भांडार विभागास आगाऊ मागणी कळवावी लागते. त्यानुसार भांडार विभाग किराणा मालाचा पुरवठा करत असते. त्याचप्रमाणे लाडु निर्मिती करीता शुध्द गावराण तुप, काजु, खिसमिस हिरवी विलायची, साखर व हरभरा दाळ अशा महागड्या किराणा मालाचा वापर केला जात आहे. तसेच किराणा मालाच्या दरांमध्ये वाढ झालेली आहे, तरी देखील मोतीचुर लाडु प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ घेता यावा या दृष्टीने उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेही अनिवार्य आहे. मात्र दिवसेंदिवस भक्तांची वाढती गर्दी व पाहीजे तेवढी लाडु प्रसाद पाकीटांची मागणी आणि लाडु प्रसाद निर्मिती प्रक्रीयेसाठी लागणार वेळ यामध्ये तफावत पडत आहे. पाहीजे तेवढी लाडु प्रसाद पाकीटे देण्याचा मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार दि.०१/०१/२०१७ पासुन पाहिजे तेवढी पाकीटे देण्यास सुरुवात केल्याने त्या प्रसादाचा वापर वाढदिवस, जयंत्या, पुण्यतिथी व भंडारा इ.साठी उपयोग केला जाऊ लागला आहे. तसेच साईभक्तांची दिवसेंदिवस वाढती संख्या व लाडु प्रसाद निर्मिती यामध्ये खुपच तफावत (फरक) पडत असल्याने साईभक्तांना विक्री करण्यात येत असलेल्या लाडु पाकीटांवर नियंत्रण ठेवुन प्रत्येक साईभक्तांस ०२ लाडु प्रसाद पाकीटे वाटप केल्याने सर्व साईभक्तांना त्याचा लाभ घेता येईल.

तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ पासुन सुरु होत असल्यामुळे साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी वाढण्याची दाट शक्यता आहे. येणा-या साईभक्तांचे संख्येनुसार सर्वांना लाडुचा प्रसाद वितरीत करता यावा या हेतुने लाडु प्रसाद पाकीट विक्रीवर नियंत्रण ठेवणेही गरजेचे आहे. सदरचे काम हे मनुष्यबळाव्दारे (Man Power) करुन घेतले जात असल्याने, व होणा-या संभाव्य गर्दीच्या प्रमाणात लाडु निर्मितीसाठी आवश्यक हवेशिर जागा व साधनसाम्रगीचा अभाव या दृष्टीने विचार केल्यास लाडु पाकीटे विक्रीवर नियंत्रण ठेवणे योग्य राहील असे विभागाचे नम्र मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** लाडु निर्मिती करीता शुध्द गावराण तुप, काजु, खिसमिस हिरवी विलायची, साखर व हरभरा दाळ अशा महागड्या किराणा मालाचा वापर केला जात असुन, सन २०१७-१८ मध्ये किराणा मालाचे दरांमध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे सुधारीत दराने किराणा माल खरेदी करणेत येत असल्याने लाडु प्रसाद निर्मिती कामी येणारा खर्च वाढला आहे. मात्र मोतीचुर लाडु प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ घेता यावा या दृष्टीने लाडुंचे उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेही गरजेचे आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता मोतीचुर लाडु प्रसादाचा जास्तीत जास्त साईभक्तांना लाभ मिळावा या हेतुने,

अ) प्रत्येक साईभक्तांस ०३ नग लाडुचे जास्तीत जास्त ०२ प्रसाद पाकीटे विक्री करता येईल,

ब) लाडु पाकीट तयार करणेसाठी येणारा खर्चाचा विचार करता संस्थानवर पडणारा आर्थिक भार कमी करणेसाठी ०१ लाडु पाकीटाची (१५० ग्रॅम वजनाचे) किंमत रु.३०/- करता येईल.

तरी उपरोक्त "अ" व "ब" प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मोतीचुर लाडु प्रसादाचा सर्व साईभक्तांना लाभ घेता यावा या दृष्टीने लाडुंचे उत्पादनात वाढ करणेसाठी प्रयत्न करणेत करावेत व लाडू प्रसाद विक्री काऊंटरवरुन साईभक्तांना प्रत्येकी ०५ लाडू प्रसाद पाकिटे विक्रीद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.७८** **श्री साई प्रसादालयातील माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर तेल, तूप व काजूचे रिकामे डब्यांचा अहवाल.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमन २००४ कलम १७ (४) नुसार निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:-** १. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२.
२. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०६/२०१७ मधील निर्णय क्र.४७५.

**प्रास्ताविक:-** संस्थानचे साईप्रसादालयामध्ये सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत साईभक्तांन प्रसादभोजनाची सुविधा पुरविली जाते. प्रसादभोजनामध्ये चपाती, पुरी, भाजी, बर्फी इ.पदार्थ दिले जात असून सदरील पदार्थ बनविण्यासाठी खाद्यतेल, गावरान तूप, वनस्पती तूपाचा वापर होत असतो. सदर डब्यांचा मध्यवर्ती भांडार विभागाकडून पत्र्याच्या नविन डब्यात पुरवठा होत असून रिकामे झालेल्या डब्यांची अभिलेख कक्षामार्फत विक्री केली जाते.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७/०७/२०१४ मधील निर्णय क्र.५९२ अन्वये तेला-तूपाचे एकुण डबे, रिकामे झालेले डबे तसेच रिकामे डबे कोठे वापरण्यात आले त्याच्या नोंदी ठेवणेत येऊन, त्याचा मासिक अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचे समोर व वार्षिक अहवाल मा.त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेत यावा असे ठरलेले आहे. त्यानुसार मासिक अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सादर करणेत येत आहे.
माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर डब्यांचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०६/२०१७ मधील निर्णय क्र.४७५ अन्वये, "संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल/तूप/काजूचे डबे व रिकामे डबे याच्या ताळमेळासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ठरले आहे.

खाद्यतेल, वनस्पती तूप, गावरान तूप व काजूचे रिकामे झालेले डबे अभिलेख कक्षामार्फत विक्री करण्यात येतात. तसेच संस्थानमधील इतर विभागांना त्यांचे मागणीनुसार व वापराकामी आवश्यकतेनुसार डबे दिले जातात व प्रसादालयाचे गिरण्या पॅकींगकरीता काही डबे वापरले जातात.

खरेदी करणेत आलेल्या व विक्री तसेच वापरणेत आलेल्या डब्यांचा ताळमेळाचा तपशिल खालीलप्रमाणे-

| तपशिल | खरेदी व मागील शिल्लक एकुण डबे | | | विक्री व वापरणेत आलेले डबे | | एकुण खर्च डबे | ०१ एप्रिल-२०१७ रोजी शिल्लक रिकामे डबे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ०१ एप्रिल-१६ रोजी शिल्लक रिकामे डबे | संस्थानसाठी खरेदी करणेत आलेले तेल,तूप व काजूचे डबे (मध्यवर्ती भांडार विभागामार्फत) | | प्रसादालय, स्वच्छता,मंदिर विभागासाठी वापरणेत/ देणेत आलेले डबे | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले डबे | | |
| | | आवक डबे | एकुण जमा डबे | | | | |
| खाद्यतेल | ८०२ | १७६४१+ ५९(देणगी) | १८५०२ | ९५ | १८२८३ | १८३७८ | १२४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वनस्पती तूप | १७८७ | ३५६०+ १३(देणगी) | ५३६० | २३७ | ४८६७ | ५१०४ | २५६ |
| काजू डबे | २३ | २०(भांडार)+ २६(लाडू विभाग) | ६९ | ४७ | ०० | ४७ | २२ |
| गावरान तूप प्रसादालय खर्च | ०३ | ०७ (भांडार)+ २९ लाडू विभाग | ३९ | २९ | ०० | २९ | १० |

| अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेले एकुण डबे | अभिलेख कक्षामार्फत विक्री करणेत आलेल्या रिकाम्या डब्यांची रक्कम |
|---|---|
| १८२८३ + ४८६७ = २३१५० डबे | रु.३,६७,७६३/- |

**मागणी:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०६/२०१७ मधील निर्णय क्र.४७५ अन्वये संस्थानसाठी माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर खरेदी करणेत आलेले तेल/तूप/काजूचे रिकामे झालेले डबे यांच्या अहवालाचा फेरप्रस्ताव सादर.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर एकुण खरेदी करणेत आलेल्या मालाचे रिकामे डबे तसेच विक्री करणेत व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी उपरोक्त विषयाची टिप्पणी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या, माहे एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ अखेर एकुण खरेदी करणेत आलेल्या मालाचे रिकामे डबे तसेच विक्री करणेत व दैनंदिन वापरणेसाठी देण्यात आलेल्या रिकाम्या डब्यांच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.७९** **साईभक्तांकरीता उद्यानाची निर्मिती करणे व त्यासाठी लँडस्केप आर्कीटेक्टची नेमणूक करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद-17 (1) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणी पार पाडण्यासाठी योगय ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवायाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**प्रस्तावना-** ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी अखेर) या कालावधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष असल्याने सदर कालावधीत शिर्डीत श्रींचे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात साईभक्तांची गर्दी अपेक्षीत आहे. श्री साईबाबांचे समाधीचे दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांना गर्दीचे प्रमाणात अनेक सोयीसुविधा मंदिर परिसरात पुरविण्यात आलेल्या आहे. समाधीचे दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी मंदिर परिसरात असते. या गर्दीत दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भक्तांची भर पडत आहे. यासाठी मंदिर परिसरातील भक्तांची गर्दी अन्यत्र वळविणे आवश्यक आहे.

शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांसाठी नविन आकर्षण केंद्र निर्माण व्हावे याकरीता साईगार्डन मध्ये साईसृष्टी, वॅक्स म्युझीयम, लेजरशो सह विकसीत करणे प्रस्तावीत आहे. तसेच साई गार्डन मध्ये उद्यान तयार करणे या ठिकाणी लॉन, शोभेची झाडे, साईभक्तांच्या मनोरंजनाकरीता संगीत कारंजा, लहान मुलांना खेळणेसाठी चिल्ड्रेन पार्क इत्यादी सोयी सुविधांचा समावेश आहे. साईसृष्टी, वॅक्स म्युझीयम इत्यादी बाबी कलात्मक आहेत. यासाठी कालावधी लागेल करीता या व्यतिरिक्त असलेले गार्डनची कामे त्वरीत सुरु करुन पुर्ण करता येईल. याकरीता खालील दोन पर्यायाचा विचार करता येईल.

पर्याय क्रं.1 साईसृष्टीसाठी सल्लागार यांची नेमणुक करणेसाठी निवीदा मागविणेबाबत कार्यवाही चालु आहे. साईसृष्टी सह गार्डन विकसीत करणेस वेळ लागेल. करीता या सर्व कामांचा एकत्रीत लेआऊट करुन गार्डनचे काम प्राथमिकतेने सुरु करता येईल.

पर्याय क्रं.2 साई आश्रम नं.2 येथील उत्तरेकडील गट नं.172 मधील एकुण 5 एकर जागेत विविध उपयोगी (multipurpose Hall) हॉलचे बांधकाम प्रस्तावीत आहे. आता दर्शन रांगेकरीता बांधण्यात येणाऱ्या

इमारतीमध्ये ऑडीटोरीयम बांधकाम प्रस्तावीत आहे करीता सदरहु जागेत नविन गार्डन (उद्यान) तयार करता येईल.

**मागणी-** तरी वरील दोन पर्याय पैकी एका पर्यायाची निवड होणेस व याकामी आराखडा व अंदाजपत्रक तयार करणेसाठी लँडस्केप आर्कीटेक यांची नेमणुक करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**विभागाचा अभिप्राय-** साईसृष्टी प्रकल्पासाठी आर्कीटेक/ कन्सल्टंट यांची नेमणुक करणेसाठी कार्यवाही सुरु आहे. याकामी आर्कीटेक यांची नेमणुक झालेनंतर त्यांचेकडुन साईगार्डन प्रकल्पातील साईसृष्टी म्युझीयम, प्लेनोरोरीयम बाबीसह गार्डनचा आराखडा तयार करता येईल. सदरहु जागेत बगीचासाठी पुरेशी जागा उपलब्ध झाल्यास बगीचाचे काम सर्व्हे नं. 198, 199, 200, 201 मध्ये प्राथमिकतेने घेता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बगीचा तयार करणेसाठी प्रस्तावित करणेत आलेल्या जागांचे झोन कोणते आहेत याच्या माहितीसह, ग्रीन झोनमधील जागा निवडून त्यावर बगीचा तयार करणेचा समावेशक करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.८०** **शालेय विद्यार्थी दैनंदिन अभ्यासक्रम नोंद घेणेकामी नवीन डायरी छपाई करुन विद्यार्थ्यांना विक्री करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद–** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक– नविन प्रस्ताव

प्रास्ताविक –उपरोक्त संदर्भान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी ही शाळा महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने श्री साईबाबा संस्थान यांचेकडून कायम विनाअनुदानीत तत्वावर चालविली जाते. सन १९९० पासून सुरु करण्यात आली तेव्हापासून आपल्या शाळेत पुर्वप्राथमिक ( ज्यु. व सि. केजी. विभाग), इयत्ता १ ली ते ७ वी प्राथमिक व इयत्ता ८ वी ते १० वी माध्यमिक असे तीन विभाग कार्यरत आहेत. शाळेत एकूण अंदाजे २६२० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

वर्गात विद्यार्थ्यांना शिक्षकांमार्फत विविध उपक्रम, स्पर्धा, परीक्षा व होमवर्क दिला जातो. सदरच्या अभ्यासाची नोंद ठेवणेकामी दिलेले उपक्रम पालकांना कळावे, पालकांनी आपल्या पाल्यांकडून अभ्यासाची तयारी करुन घ्यावी हा यामागचा हेतू आहे. जेणेकरुन आपला पाल्य शाळेत काय अभ्यास करतो हे पालकांनाही कळते. या उपक्रमासाठी इतर शाळेप्रमाणे आपल्या स्कुलची प्रत्येक विद्यार्थ्यांकडे दैंनदिन डायरी असावी असे मत आहे. या डायरी मध्ये विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल अशी माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. सदरची डायरी प्राथमिक स्वरुपात नमुन्यासाठी बनवून घेण्यात आली असून सदर डायरी (210 Art Card Cover 4 Colour – 1 side, 70 Map Paper Matter- 1 Colour – B / W, PVC-Transparent Cover, Perfect Binding , Size- 7 " x 5 ") अशी आहे. सदर डायरीत पाठपोठ प्रिंट केलेली अंदाजे एकूण १२८ पाने आहेत. सदरचे नमुन्याप्रमाणे डायरी छपाई करुन खरेदी करावयाची असल्याने परिसरातील पुरवठाधारक यांना डायरी नमुना दाखवून खर्चाबाबत चौकशी केली असता किमान २६०० नग डायरी खरेदी केल्या तर एका डायरीचे छपाईसाठी अंदाजे प्रति नग रु.२५/- (अक्षरी रुपये पंचवीस मात्र) खर्च अपेक्षित आहे असे पुरवठाधारकांनी सांगीतले आहे याकामी संबधितांकडून इ- मेल द्वारे दरपत्रके मागविलेली आहेत. सदरची डायरी ही ज्यु.केजी, सिनीयर केजी तसेच इयत्ता १ ली ते १० वी विद्यार्थ्यांसाठी वापरली जाणार असून एकूण २६५० नग डायरी खरेदी करावयाच्या आहेत. या स्कुल डायरी साठी अंदाजे प्रति नग खरेदी रु. २५/- प्रमाणे खर्च असून अंदाजे एकूण २६५० डायरी खरेदीसाठी अंदाजे रु. ६६,२५० /- इतका खर्च अपेक्षित आहे.

स्कुल डायरी छपाई करुन घेतलेनंतर विद्यार्थ्यांना ना नफा ना तोटा या त्त्वावर प्रति विद्यार्थी प्रति नग रुपये २५/- (अक्षरी रुपये पंचवीस मात्र) याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांला स्कुल डायरी शाळेमार्फत विक्री करता येईल. याप्रमाणे कार्यवाही केल्यास संस्थानवर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार/ बोजा पडणार नाही.

मागणीः- आपल्या शाळेत गरीब घरातील मुले / मुली शिक्षण घेत असून इतर शाळेच्या तुलनेत अत्यंत अल्प दरात शिक्षण दिले जात आहे व माफक स्वरुपात शैक्षणिक व स्कुलबस शुल्क आकारले जात आहे. ज्यू. केजी वर्ग प्रवेशासाठी एका विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी रु. ३६७०/- घेतले जाते व इयत्ता १० वीचे वर्ग प्रवेशासाठी

एका विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी रु. ५२८०/- घेतली जाते . विद्यार्थ्यांकडून शाळा सोडल्याचा दाखला फी फक्त रु. १०/- आकारली जाते. विद्यार्थ्यांना देण्यात येणारे बोनाफाईड सर्टीफीकेट साठी कुठलीही फी आकारली जात नाही.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी करुन अनुमान:-** शालेय प्रशासनाचा भाग म्हणून डायरी छापाई करुन घेणे गरजेचे आहे. सदर प्रक्रीयेत संस्थान खर्चावर कुठलाही आर्थिक बोजा पडणार नाही.

**विभागाचा अभिप्राय-** सदरचा विषय हा धोरणात्मक असून शालेय विद्यार्थ्यांसाठी स्कुल डायरी छपाई करुन घेणे आवश्यक आहे. स्कुल डायरी छपाई करुन प्राप्त झालेनंतर विद्यार्थ्यांना ना नफा ना तोटा या तत्वावर प्रति नग रुपये २५/- (अक्षरी रुपये पंचवीस) या प्रमाणे विक्री करता येईल व डायरी विक्री पोटी विद्यार्थ्यांकडून जमा झालेली रक्कम लेखाशाखेमध्ये भरणा करता येईल. सबब नमुन्याप्रमाणे संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात देऊन सबंधित पुरवठाधारकांकडून बंद कोटेशन दरपत्रके मागवून विहित पद्धतीने छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.९९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शालेय विद्यार्थी दैनंदिन अभ्यासक्रम नोंद घेणेकामी नवीन डायरी छपाई करुन विद्यार्थ्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले. सदरहू डायरी छपाई करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.८१** **निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची तसेच जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणे.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र अधिनियम २००५ तरतूद-** अधिनियमातील कलम १४(२) (ग) व कलम १७ (४) .

**प्रस्तावीक:-** महाराष्ट्र शासन मान्यतेतील निर्देशाप्रमाणे संस्थानकडील दैनंदिन वापराने निरूपयोगी/ खराब झालेल्या डेडस्टॉक साहित्याची तसेच जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी संदर्भीय ३ चे प्रस्तावानुसार प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. महाराष्ट्र शासन अधिनियम २००५ मधील कलम १४ (२) (ग) मध्ये " समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्यास अधिन राहून अशाप्रकाच्या नाशवंत अर्पण वस्तूंची लिलावद्वारे किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे आणि त्याचे उत्पन्न विश्वस्त संस्थेच्या निधीमध्ये जमा करण्याचे वगैरे अधिकार आहेत. तसेच कलम १७(४) मध्ये "विश्वस्त संस्थेमध्ये निहीत केलेले पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरी असेल त्याखेरीज समितीतकडून विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाहीत." अशी तरतूद आहे. वापरून निरूपयोगी / खराब झालेल्या भंगार साहीत्याचा जडजवाहीर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता या प्रकारात समावेश होत नाही, असे स्पष्ट मत आहे.

सध्या इकडील कार्यालयाकडे मेकॅनिकल विभाग, कन्याशाळा (कनिष्ठ महाविदयालय व सामान्य प्रशासन शाखा(झेरॉक्स विभाग) यांनी त्यांचेकडील निरूपयोगी दैनंदिन वापराने खराब झालेले भंगार डेडस्टॉक साहित्याची विहीत पध्दतीने, जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेसाठी मान्यता घेतलेली आहे. पुढील वर्षी श्री समाधी शताब्दी वर्षानिमित्त संभाव्य गर्दी लक्षात घेता, उपरोक्त संदर्भीय ४ अन्वये सध्या इतर विभागांकडे रू.५०,०००/- पेक्षा जास्त किंमतीचे काही डेडस्टॉक साहित्य पडून असलेल्या त्यांची प्रस्तावीत जाहीर लिलावात विक्री/विल्हेवाट लावणेसाठी अभिलेख कक्ष विभागाकडे १५ दिवसांत कळविणेबाबत परिपत्रक पारीत करण्यात आलेले आहे. परंतू आज दि.१९.०९.२०१७ अखेर कुणाचाही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

मान्यता मिळालेल्या डेडस्टॉक साहित्याची अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडून दि३१.०३.२०१७ अखेर पर्यंत घसारा वजा जाता किंमतीचा तसेच तयार करणेत आलेल्या लॉटचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विभागाचे नांव | साहित्याचे लॉटचा तपशिल | साहित्यांची दि.३१.०३.२०१७ अखेर एकुण घसारा किंमत |
|---|---|---|---|
| १. | मेकॅनिकल विभाग | **लॉट नं.१)-** एअर कंडीशनर- एकूण-६२ नग,<br>**लॉट नं.२)-** वॉटर कुलर-१७ नग,<br>**लॉट नं.३)-** ॲटोमॅटिक सनशाईन चपाती मशिन- ०५ नग. | ४४,८६९.५३<br>१७,०७८.४०<br>२०,१९,६३३.४५ |
| २. | सामान्य प्रशासन वशी-१२ (झेरॉक्स) | **लॉट नं.४)-** झेरॉक्स मशिन-०१ नग | ६,४१९.७४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | कन्या शाळा (कनिष्ठ महाविदयालय) | **लॉट नं.४)-** झेरॉक्स मशिन-०२ नग | १६,५४२.६३ |
| | | **साहित्याची एकूण किंमत-** | **२१,०४,५४३.७५** |

निरूपयोगी भंगार साहित्याचे लिलावासोबतच वाहन विभागाकडील जुन्या २३ वाहनांचा लिलाव करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ. नं. | गाडीचे वर्णन | गाडी नंबर | वाहनाची रजि.दिनांक (मॉडेल) | टॅक्स | विमा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टोयोटा इनोव्हा | MH-17-V-9977 | 22.12.2008 | O.T.T. | 31.03.2018 |
| ०२ | महिंद्रा लोगान, सी.डी.प्लेअरसहर | MH-17-Y-3636 | 10.12.2007 | O.T.T. | 31.03.2018 |
| ०३ | टोयोटा इनोव्हा,टेपसह | MH-17-V-9988 | 22.12.2008 | O.T.T. | 31.03.2018 |
| ०४ | महिंद्रा झायलो,टेपसह | MH-17-V-8483 | 20.01.2009 | O.T.T. | 31.03.2018 |
| ०५ | टाटा सुमो, कार टेपसह | MH-17-V-1701 | 15.12.2006 | O.T.T. | 31.03.2018 |
| ०६ | टाटा विंगर रूग्णवाहीका | MH-17-AG-2418 | 26.04.2011 | टॅक्स माफ | 31.03.2018 |
| ०७ | टाटा-४०७ शववाहीका | MH-17-AG-2420 | 11.04.2011 | टॅक्स माफ | 31.03.2018 |
| ०८ | टाटा-४०७ शववाहीका, टेपसह. | MH-17-T-7101 | 08.09.2006 | टॅक्स माफ | 31.03.2018 |
| ०९ | टाटा विंगर रूग्णवाहीका | MH-17-AG-2419 | 26.04.2011 | टॅक्स माफ | 31.03.2018 |
| १० | तवेरा रूग्णवाहीका | MH-17-AG-2031 | 01.02.2011 | टॅक्स माफ | 31.03.2018 |
| ११ | महिंद्रा कॅम्पर बॉडीसह | MH-17-K-9909 | 09.03.2005 | O.T.T. | 31.03.2018 |
| १२ | टाटा-४०७ | MH-17-T-6801 | 03.07.2006 | O.T.T. | 31.03.2018 |
| १३ | महिंद्रा मॅक्स बॉडीसह | MH-17-K-9910 | 09.03.2005 | O.T.T. | 31.03.2018 |
| १४ | प्रवासी बस | MH-17-T-8504 | 13.04.2007 | ३१.०३.२०१८ पर्यंत | 31.03.2018 |
| १५ | प्रवासी बस | MH-17-T-8505 | 13.04.2007 | ३१.०३.२०१८ पर्यंत | 31.03.2018 |
| १६ | प्रवासी बस | MH-17-T-7109 | 02.09.2006 | २८.०२.२०१८ पर्यंत | 31.03.2018 |
| १७ | प्रवासी बस | MH-17-T-7110 | 08.09.2006 | २८.०२.२०१८ पर्यंत | 31.03.2018 |
| १८ | स्कुल बस | MH-17-C-8851 | 22.02.2002 | ३१.०१.२०१८ पर्यंत | 31.03.2018 |
| १९ | हिरो होंडा सुपर स्प्लेंडर | MH-17-W-8541 | 16.12.2006 | O.T.T. | 31.03.2018 |
| २० | हिरो होंडा स्प्लेंडर | MH-17-H-3282 | 20.08.1999 | O.T.T. | 31.03.2018 |
| २१ | TVS Flame | MH-17-Z-8201 | 09.09.2008 | O.T.T. | 31.03.2018 |
| २२ | वालेकर ई-मोटर्स | बॅटरी बाईक स्कुटी | 09.12.2010 | लागु नाही. | 31.03.2018 |
| २३ | TVS Santro | MH-17-Q-5601 | 03.02.2004 | O.T.T. | 31.03.2018 |

**मागणी:-**

१) डेडस्टॉक भंगार साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेसाठी उपरोक्त विभागांनी कळविले प्रमाणे प्रत्येक लॉटची अपेक्षित किंमत ठरविणेकामी समिती गठीत करणे, तसेच जाहीर लिलावासाठी ऐनवेळी येणा-या प्रस्तावांचा विचार करणे..

२) वाहन विभागाकडील जा.क्र.एसएसएस/वशी-वाहन/१९८२/२०१७ ,दि.०७.०८.२०१७ चे पत्राने जुन्या २३ वाहनांचा तसेच अभिलेख कक्ष विभागाकडे आलेल्या मान्यता प्राप्त प्रस्तावांतील निरूपयोगी भंगार साहित्याचा जाहीर लिलाव एके दिवशी करणेसाठी तारीख निश्चित करणे..

३) प्रस्तावीत जाहीर लिलावात स्पर्धा निर्माण व्हावी करिता, जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहीरात देणे व आयटी विभागामार्फत संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे..

४) जाहीर लिलाव कामी स्थानिक मा.विश्वस्तांना निमंत्रित करणे..

५) शासनाकडील निर्देशाप्रमाणे विक्री करण्यात आलेल्या डेडस्टॉक साहित्याचा व जुन्या वाहनांचे जाहीर लिलावाबाबतचा पूर्तता अहवाल महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभागास कळविणे..

उपरोक्त अनं.०१ ते ०५ प्रस्तावांना मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, निरुपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची तसेच जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच समाधी शताब्दी वर्षाचे अनुशंगाने दैनंदिन कामकाजासाठी व समिती सदस्यांच्या वापरासाठी वाहने उपलब्ध होण्यास अडचणी येत असल्याचे दिसते, सबब संस्थान कामासाठी नवीन कार्यालयीन वाहने खरेदी करणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष/ प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.८२** **संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या जादा वैद्यकिय बीलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी–** पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| १ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे<br>विभाग-द्वारावती<br>हुद्दा- मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.सचिन बागडे | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | १७२७५.०० | १७२७५.०० | |
| २ | श्री. विलास आप्पा मते<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा- लिपिक | वडील | Aplastic Anemia | डॉ. कांदळकर | सह्याद्री हॉस्पिटल नाशिक | १०२८०८.०० | ९१०५३.०० | |
| ३ | श्री. अनिल गंगाधर थोरात<br>विभाग-सभा कामकाज<br>हुद्दा- टंकलेखक | वडील | Ca | डॉ. बोरुडे | श्री गुरुजी रुग्णालय नाशिक | १२९९५६.०० | १२९७५२.०० | |
| | **ब. संस्थान मान्य यादीत नसलेले व रेफर नकेलेले** | | | | | | | |
| ४ | श्री. किशोर केशव क्षिरसागर<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा- वरीष्ठ लिपिक | वडील | Asthma | डॉ. संजय पृथ्वी | लाईफ लाईन हॉस्पिटल, मुंबई | ३८४५१.०० | २३०३३.०० | रुग्णाचे वास्तव्य बाहेरगावी असल्या मुळे ८०% रक्कम द्यावी असे मत आहे. |
| ५ | श्री. मधूकर जयराम महाजन<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा- प्र. कार्यालय अधिक्षक | स्वतः | Hypertension | डॉ. दिलीप पाटील | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | २९८४५.०० | २०७०६.०० | |
| | | | | | **एकूण** | **३१८३३५.००** | **२८१८१९.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.रु.२,८१,८१९/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेचरुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

---

**(ब)** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १)** जा.नं.एसएसएस- वशी रुग्णालय ५८२- ९७ दि. १६/०१/१९९९. २) मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | |
| १ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे विभाग-द्वारावती हुद्दा- मदतनीस | स्वतः | Ca | डॉ.देवरे | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | ३६३९१.०० | ३२१३१.०० |
| २ | श्री. शेषराव राधाकृष्ण कुलभैया विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-कॅथ्लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ८२०१८.०० | ८१८६८.०० |
| ३ | श्रीमती सुनंदा तात्यासो बावके विभाग-बगीचा हुद्दा – मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.राम नाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी | ४८९८९.०० | ४८८८९.०० |
| ४ | श्री.बाळासाहेब बन्शी डांगे विभाग-साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- ओटी असिस्टट | स्वंतः | Ca | डॉ.रामनाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी | १२९७६.०० | १२९७६.०० |
| ५ | श्री.सुभाष मल्हारी बंदावणे विभाग-ध्वनिक्षेपन हुद्दा-ध्वनिक्षेपक पर्यवेक्षक | मुलगा | Kidney Transplant | डॉ.देसाई | रुबी हॉल,पुणे | ५१३८३.०० | ५१३८३.०० |
| | | | | | **एकूण** | **२३१७५७.००** | **२२७२४७.००** |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.२२७२४७.०० इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रूग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही,असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

---

**(क)** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १)** जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –** पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | |
| १ | श्री.बाबासाहेब काशिनाथ थेटे विभाग-द्वारावती हुद्दा- मदतनीस | स्व:त | Ca | डॉ.सचिन बागडे | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | २४२३४९.०० | २३४७९५.०० |
| २ | श्री. शेषराव राधाकृष्ण कुलभैया विभाग- साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-कॅथलॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ३७३४१०.०० | ३७३४१०.०० |
| ३ | श्री.परसराम सोमाजी भालेराव विभाग-संरक्षण हुद्दा –पहारेकरी | पत्नी | Dengue NS 1 Reactive | डॉ.काटे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | ७४३०.०० | ७४३०.०० |
| ४ | श्री. बाळासाहेब बन्सी डांगे विभाग-साईनाथ रूग्णालय हुद्दा-ओ.टी. असिस्टंट | स्वंतः | Ca | डॉ.राम नाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी | १९२६६.०० | १९२६६.०० |
| | | | | | **एकूण** | **६४२४४५.००** | **६३४९०१.००** |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.६,३४,९०१./- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ, ब व क प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची, वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे, अ, ब व क प्रस्तावातील तक्त्यामध्ये कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम, त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८३** **सौ.संगिता संजय थोरात, इनचार्ज सिस्टर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे वैद्यकिय बीलाचा परताव्याबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९/१०/२०१६ निर्णय क्र.६९० (०६) तसेचमा. व्यवस्थापन समिती सभा दि.२३/०५/२०१७ निर्णय क्र.४४०

**प्रास्ताविक:-** सौ. संगिता संजय थोरात, इनचार्ज सिस्टर,श्री. साईबाबा हॉस्पिटल यांचे पतीश्री. संजय थोरात हे ®OA Hip या आजाराने त्रस्त असल्यामुळे त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल मधील डॉ. काळे यांना दाखविले होते. डॉ. काळे यांनी सदर रुग्णास Hip Joint Replace ची शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिलेला होता. त्यानूसार श्री. संजय थोरात यांनी दि०१/०६/२०१७ ते ०७/०६/२०१७ पर्यंत श्री साईबाबा रुग्णालयात अंतर्रुग्ण म्हणून उपचार घेतलेले असून दि.०३/०६/२०१७ रोजी डॉ. काळेयांनी THR ची शस्त्रक्रिया केलेली आहे.

सदर शस्त्रक्रिया करतांनी लागणारे Implant औषध भांडार विभागामध्ये उपलब्ध नव्हते त्यामुळे त्यांनी सदर Implant हे M/s. Biomedicon System (I) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून विकत घेतलेले आहे. सदर Implant खरेदीकामी सौ. थोरात यांना रक्कम रु.८०,०००/- इतका खर्च आलेला आहे.

**मागणी–** सौ.थोरात यांनी दि.२२/०७/२०१७ रोजीचे विंनती अर्जान्वये सदर बीलाचा परतावा मिळणेकामी विंनती केलेली आहे

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९/१०/२०१६ निर्णय क्र.६९० (०६) अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकिय बिलात देण्यात येणा-या सवलतींची सुधारीत नियमावली सादर करण्यात आलेली आहे. त्यामधील मुद्दा क्र.१९ नुसार रुग्णाने किंवा रुग्णाचे नातेवाईकाने Implant वापरण्याची मागणी केल्यास, त्या रुग्णाला Implant चे बीलामध्ये सवलत दिली जाणार नाही, तसेच उच्च प्रतीचे Implant वापरावयाचे झाल्यास हॉस्पिटलचे बील यामध्ये कोणतीही सवलत लागू राहणार नाही.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२३/०५/२०१७ निर्णय क्र.४४० अन्वयेडॉ. रामाराव व वैद्यकिय संचालक यांचे शिफारशीनुसार श्री. कुमावत रविंद्र शिवाजी यांचे बिलाचे व मंजूर रक्कमेतील फरकाची रक्कम रु.२०,१००/-सवलत मिळणेकामीच्या प्रस्तावावर निर्णय होणेकामीचा तसेच M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून सदर Implant खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु. १,००,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन सदर प्रस्तावास व खर्चास कार्यात्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.८०,०००/- इतकी आहे. सदर बीलाचे रक्कमेचा परतावा देणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापनसमितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही,असे मत आहे.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.संगिता संजय थोरात, इनचार्ज सिस्टर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी सादर केलेल्या बीलाची, वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे त्यांना देय असलेली रु.८०,०००/- मात्र रक्कम, त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८४** **डॉ.मनोहर शिंदे, इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे नेमणूकीस १ वर्ष पुर्ण झाल्याने त्यांची पुन्हा तात्पुरते स्वरुपात नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ तदतुद-** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजाररूपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात्त येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शती क्र ३- सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्तअ नं ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-**

१) दि. ०३/०६/२००६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३२८ (२).

कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | Doctors Charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note:1. Anaesthist's share-30% of the Surgeon's Charges 2. Assistant Surgeon 10% of the Surgeon's Charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५० % हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५ % हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

२) दि. २२/०९/२००७ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ७७०.

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रतिकेसनुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

3) दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र २७५.

मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने देण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणूकास मान्यता देण्यात आली.

तसेच, कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि.०१/०४/२०१४ पासून प्रति एन्जीओग्राफीसाठी रू.३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रू.३०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेंटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

४) दि. ११/०९/२०१४ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ७८५.

याकामी सिव्हील अॅप्लीकेशन मा उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सहा महिन्याचे मुदतीवर तदर्थ म्हणून मा उच्च न्यायालयाची प्रस्तावित कार्डीओलॉजीस्ट यांना ०६ महिन्यासाठी मंजुरी असूनही मुदत संपल्यानंतर सदरहू कार्डीओलॉजीस्ट यांना सेवामुक्त करावे लागेल. तेव्हा ताबडतोब सिव्हील अॅप्लीकेशन चालवून घेऊन, त्यांना पुढील ०६ महिन्याची मुदत वाढवून घेण्यात यावी, याबाबत संस्थान वकिलांना तसेच सांगणेत यावे.

५) दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३७८.

डॉ मनोहर शिंदे, कार्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी डॉ बजाज, डॉ वर्मा यांचे पश्चात कार्डीओलॉजी विभाग सुरळीतपणे चालू ठेवण्यात संस्थानला मदत केलेली आहे. तसेच डॉ शिंदे यांची मागणी मान्य न झाल्यास ते राजीनामा देणार असून त्यामुळे कार्डीओलॉजी विभागास अडचण निर्माण होईल. तरी डॉ शिंदे यांच्या मागणीवर निर्णय होणेसाठी त्यांच्या कामाचे स्वरूप, पेशंटची संख्या, होणा-या शस्त्रक्रिया याचा समावेशकरणेत येऊन, संस्थान वकिलामार्फत मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.

६) दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ३७९.

प्रस्तावात नमुद केलेल्या कार्डीओलॉजीस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीच्याच अटी/शर्तीस अधीन राहून पुनर्नेमणूक देणेकामी मा मुं उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली.

७) दि. ३०/११/२०१६ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ८७७.

डॉ.मनोहर शिंदे, कंत्राटी कार्डीओलॉजीस्ट यांची मुदत संपुष्टात येत असलेमुळे, त्यांना मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता व दरमहा रू. ६१,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले

**प्रस्ताविक-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील स्थायी पध्दतीने कार्यरत इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट डॉ हरीष बजाज व डॉ गौरव वर्मा यांना निलंबित केल्यामे इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिका-यांची नेमणूक करणेसाठी मंजुरी मिळणेकामी सिव्हील ॲप्लिकेशन नं २७९७/२०१४ मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करणेत आले होते. सदर सिव्हील ॲप्लिकेशनवर मा न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

Considering the urgency and essentiality of such life saving facilities at the Sansthan, we allow the Ad hoc Committee to nominate the experts / cardiologists in the field on ad hoc basis for a period of six months. The committee shall follow procedure as is required for appointment of ad hoc employees or experts in the hospitals.

मा न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार कमिटी स्थापन करून इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर नोकरी मिळणेकरीता कार्यालयात असलेल्या अर्जदारांच्या मुलाखती घेऊन दि. २७/०३/२०१४ रोजी व्हिजीटींग पध्दतीने ०५ (डॉ हिरण, डॉ विजन, डॉ काळे, डॉ ठेंगे, डॉ बजाज) व कंत्राटी पध्दतीने ०२ (डॉ शिंदे, डॉ पवार) वैद्यकीय अधिका-यांना इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर ०६ महिने कालावधीसाठी नेमणूका देणेत आल्या. मा त्रिसदस्य समिती दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७५ नुसार उपरोक्त नेमणूकांस मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त समितीमध्ये, डॉ शिंदे यांनी मुलाखतीच्या वेळी पूर्ण वेळ कार्डीओलॉजीस्टचे नेमणूकीकरीता मासिक रू. ४,००,०००/- एकत्रित मानधनाची मागणी केली होती त्यांना सर्वसमावेशक मासिक रू. ३,००,०००/- मासिक मानधन देता येईल असे समितीने त्यांनासांगितले व याबाबतचा आपला निर्णय कळवावा जेणेकरून त्यांचे नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करता येईल डॉ शिंदे यांनी याबाबतकळविलेनंतर त्यांचे नेमणूकीचा विचार करता येईल असे ठरले.

तदनंतर डॉ शिंदे यांचादि २८/०४/२०१४ रोजीचे मेलद्वारे As per interview and subsequent discussion, I am ready to accept post of Consultnat Cardiologist with montly renumeration of INR 3lakh in the beginning. I shall be waiting for appointment letter before joining my duties असे कळविलेनंतर डॉ शिंदे यांची दि ३०/०४/२०१४ रोजी कंत्राटी पध्दतीने इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर ०६ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करणेत आली होती. मा व्यवस्थापन समिती दि. ०५/०६/२०१४ रोजीचे सभेत निर्णयक्र ३५८ नुसार डॉ शिंदे यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने पुन्हा नेमणूक करणेकामी मा व्यवस्थापन समिती दि. ११/०९/२०१४ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ७८५ नुसार, याकामी सिव्हील ॲप्लीकेशन मा उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सहा महिन्याचे मुदतीवर तदर्थ म्हणून मा उच्च न्यायालयाची प्रस्तावित कार्डीओलॉजीस्ट यांना ०६ महिन्यासाठी मंजुरी असूनही मुदत संपल्यानंतर सदरहू कार्डीओलॉजीस्ट यांना सेवामुक्त करावे लागेल. तेव्हा ताबडतोब सिव्हील ॲप्लीकेशन चालवून घेऊन, त्यांना पुढील ०६ महिन्याची मुदत वाढवून घेण्यात यावी, याबाबत संस्थान वकिलांना तसेच सांगणेत यावे, असे ठरले. सदर निर्णयानुसार सिव्हील ॲप्लिकेशन नं २९०/२०१५ मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करणेत आले होते. सदर सिव्हील ॲप्लिकेशनवर मा न्यायालयाने दि. १२/०१/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

The doctors, whose appointments are continued on Ad hoc basis, shall continue to work for one more year or until the departmental enquiry proposed against Dr. Harish Bajaj and Dr Gaurav Verma is concluded, whichever is earlier.

मा न्यायालयाचे उपरोक्त दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशानुसार ०६ महिन्याचे मुदत संपुष्टात आलेल्या कार्डीओलॉजीस्ट यांना दि. १९/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये दि. ०२/११/२०१४ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक आदेश देण्यात आले होते.

डॉ शिंदे यांनी दि ११/०७/२०१५ रोजीचे अर्जान्वये मानधन वाढीबाबत मागणी केली होती त्यानुसार मा व्यवस्थापन समिती दि. २३/०७/२०१५ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र २११ नुसार डॉ शिंदे यांना एकत्रित मासिक रू ३०००००/- मात्र मानधनऐवजी प्रती माह रू. ६१०००/- मात्र मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देणेस मा अध्यक्ष व सदस्य यांची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे त्याची नोदं घेण्यात येऊन समितीच्या या निर्णयाची दि. ०१/०८/२०१५ पासून अंमलबजावणी करणेत यावी असे ठरले.

तदनंतर डॉ शिंदे यांनी दि २५/९/२०१५ रोजीचे अर्जान्वये, उपरोक्त निर्णय क्र २११ ची अंमलबजावणी दि. ०२/११/२०१४ पासून करणेबाबतची मागणी केली होती त्यानुसार २७/१०/२०१५ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र ३७८ नुसार, डॉ शिंदे यांचे दि २५/०९/२०१५ रोजीचे मागणीवर निर्णय होणेसाठी त्यांच्या कामाचे स्वरूप, पेशंटची संख्या, होणा-या शस्त्रक्रीया याचा समावेश करणेत येऊन संस्थान वकिलामार्फत मा मुं उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयास अनुसरून मा मुं उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं १६०९०/२०१५ दाखल करणेत आले त्यावर मा न्यायालयाने दि. ११/१२/२०१५ रोजी आदेश दिलेला आहे. सदर आदेशास अनुसरून डॉ शिंदे यांना दि ११/१२/२०१५ पासून एकत्रित मासिक रू. ३०००००/- मानधना ऐवजी प्रतीमाह रू. ६१०००/- मात्र मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देणेबाबत दि. १९/०१/२०१६ रोजी आदेश पारीत करणेत आला.

डॉ शिंदे यांची नेमणूक दि ०१/११/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नेमणूक देणेकामी दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादरकरणेत आला त्यावर निर्णय क्र ३७९ नुसार, पुनर्नेमणूक देणेकामी मा मुं उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली. सदर निर्णयानुसार मा औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लिकेशन नं १६५२१/२०१५ दाखल करणेत आले त्यावर मा न्यायालयाने दि. १८/१२/२०१५ आदेशान्वये कार्डीओलॉजीस्ट पदावर तात्पुरत्या स्वरूपात दिलेल्या नेमणूका चालु ठेवणेस परवानगी दिली. त्यानुसार डॉ शिंदे यांना दि ०२/११/२०१५ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो नेमणूक देण्या त आली.

डॉ शिंदे यांनी दि १८/०१/२०१६ रोजीचे अर्जान्वये, दि. १९/०१/२०१६ रोजीचे आदेशातील वेतन दि. ०२/११/२०१४ पासून लागु करणेबाबत मागणी केली होती. सदर अर्जास अनुसरून मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला त्यावर निर्णय क्र ७१ नुसार, सिव्हील ॲप्लीकेशन नं १६०९०/२०१५ वरील दि. ११/१२/२०१५ रोजीची झालेल्या आदेशानुसार डॉ शिंदे यांना दि ०२/११/२०१४ पासून रू. ६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले. त्यानुसार डॉ शिंदे यांना एकत्रित मासिक रू ३,००,०००/- मानधनाऐवजी प्रती माह रू ६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता दि. ०२/११/२०१४ पासून देणेबाबत दि. १३/०४/२०१६ रोजी आदेश पारीत केला आहे.

डॉ शिंदे यांची दि ०२/११/२०१५ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो देणेत आलेली नेमणूक संपुष्टात आल्याने पुन्हा नेमणूक देणेकामीचा प्रसताव मा व्यवस्थापन समिती दि. ३०/११/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ८७७ नुसार, डॉ मनोहर शिंदे यांची मुदत संपुष्टात येत असलेमुळे, त्यांना मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्षकालावधीसाठी अथवा पुढील आदेशहोईपावेतो यापैकी जे अगोदरघडेल तोपर्यंतसंस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता व दरमहा रू.६१०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. सदर निर्णयानुसार डॉ मनोहर शिंदे यांना इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/एचआर/२३१२/२०१६ दि. ०७/०१/२०१७ अन्वये

दि. ०२/११/२०१६ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक दिलेली आहे. सदर नेमणूक कालावधी दि. ०१/११/२०१७ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी मंजुर आकृतीबंधानुसार इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदांची मंजुर संख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | मंजूर पदसंख्या | भरलेली पदसंख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | तात्पुरत्या स्वरूपात | व्हिजीटींग | |
| इंटरव्हेंशनल कार्डीओ-लॉजीस्ट | ०२ | ०२<br>डॉ हरिष बजाज, डॉ गौरव वर्मा | ०२<br>डॉ देवरे<br>**डॉ शिंदे** | ०४<br>डॉ मुकुंद बजाज, डॉ ठेंगे, डॉ काळे, डॉ थोपटे | डॉ हरिष बजाज व डॉ गौरव वर्मा सध्या सेवानिलंबित आहेत. |
| क्लिनीकल असिस्टंट | 10 स्पेशालिटी नुसार | ०० | ०२<br>डॉ पाडगावकर<br>डॉ महाले | ०० | डॉ महाले हे क्लिनीकल असिस्टंट (कार्डीओलॉजी) पदावर ११ महिने कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे सेवा देत आहे. |

**मागणी-** डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांची इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर दि. ०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान-** दरमहा मासिक मानधन रू. ६१,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** डॉ.मनोहर विश्वासराव शिंदे यांची इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर दि.०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करता येईल तसेच त्यांना दि. ०२/०२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१ नुसार दरमहा मासिक मानधन रू.६१,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.मनोहर शिंदे, इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांची दि.०२/११/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येतअसल्यामुळे, त्यांना दि.०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी, दरमहा मासिक मानधन रु.६१,०००/- मात्र व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येऊन, कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८५** **बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स) श्री साईनाथ रुग्णालयात एक ईएनटी सर्जनची सेवा उपलब्ध करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद-** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवाकर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र.

८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

**मा व्यवस्थापन समितीचा ठराव क्र-**

१. मा व्यवस्थापन समिती दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७०.

संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे भरतीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कामाची तात्पुरती व्यवस्था म्हणून व्हिजीटींग पध्दतीने **तीन** ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करणेत येऊन, त्यांना प्रति व्हिजीट सर्व समावेशक रू. ५,०००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले.

२. मा व्यवस्थापन समिती दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९४४.

श्री साईनाथ रूग्णालय हे धर्मदाय रूग्णालय म्हणून संस्थानमार्फत चालविले जात असून त्याचा जास्तीत जास्त फायदा गोरगरीब रूग्णांना होत आहे यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या चिकन गुनिया व गोचिडताप या तपासण्या श्री साईनाथ रूग्णालयामध्ये मोफत करण्यात याव्यात, असे ठरले.

याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, श्री साईबाबांनी त्यांच्या ह्यातीमध्ये स्वताच्या हाताने अनेक रूग्णांची सेवा सुश्रुषा करून त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी सुरू केलेले हे रूग्णसेवेचे कार्य संस्थान व्यवस्थापनाने अविरतपणे पुढे सुरू ठेवलेले आहे हे रूग्णसेवेचे कार्य असेच पुढे चालू ठेवून त्याची व्याप्ती वाढविणेकरीता दि. ०१ जानेवारी २०१७ पासुन श्री साईनाथ रूग्णालयामध्ये होत असलेले सर्व प्रकारचे वैद्यकिय उपचार सर्वांसाठी मोफत करणेत यावे. याबाबतचा धोरणात्मक निर्णय आजचे सभेत घेण्यात आला. तसेच श्री साईनाथ रूग्णालयामध्ये रूग्णांकडून प्रवेशासाठी फक्त रू. १०/- मात्र पुर्वीप्रमाणेच आकारणेत यावे, असे ठरले.

३) मा व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४९३.

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालीटी याचा विचार करून तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपुर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनयांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पुर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन / प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावा.

याचबरोबर संस्थान रूग्णालये चालविणेसाठी कन्सल्टंन्सी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रस्तावनाः-** वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रूग्णालय यांनी दि. १४/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये,डॉ रविंद्र बाळकृष्ण कुलकर्णी, माजी वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (ईएनटी सर्जन) यांनी एक महिना पूर्व राजीनामा लेखी नोटीस दिल्याने ईएनटी सर्जनची तातडीने नेमणुक करणेबाबत कळविले होते. सदरचे पत्रास अनुसरून श्री साईनाथ रूग्णालयात तीन ईएनटी सर्जनची नेमणूक करून त्यांना प्रति व्हिजीट सर्वसमावेशक रू. ५०००/- मानधन देणेबाबतचा प्रस्ताव दि. १८/०२/२०१५ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ७० नुसार संस्थान रूग्णालयातील रिक्त पदे भरतीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कामाची तात्पुरती व्यवस्था म्हणून व्हिजीटींग पध्दतीने तीन ई.एन.टी. सर्जनची नेमणूक करणेत येऊन, त्यांना प्रति व्हिजीट सर्व समावेशक रू. ५,०००/- मात्र मानधन देण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार एच आर दि. १७/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये दि. १८/०२/२०१५ पासून ईएनटी सर्जन पदाकरीता नविन कर्मचा-यांची जाहिरातीद्वारे नियुक्ती होईपर्यंत एक ईएनटी सर्जनची मंजूरी कामगार विभागामार्फत घेणेस मंजुरी मिळाली होती. सदर मंजुरीनुसार जा.नं.एसएसएस/वशी-७ए/६२/२०१५दि. ०२/०४/२०१५ अन्वये जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे, कॅम्प-शिर्डी यांचेमार्फत प्रती व्हिजीट रू ५,०००/- याप्रमाणे एक (डॉ जोशी) ईएनटी सर्जन कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून पुरविणेत येत असुन ते सध्या काम करत आहेत.

दि. ०९/०६/२०१७ पासून जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचे करारनामा संपुष्टात येऊन दि. १०/०६/२०१७ पासून मे बीव्हीजी इं लि यांचेकडे संस्थानला कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देणेत आले आहेत. मात्र दि. १०/०६/२०१७ रोजी कामगार विभागामार्फत मे बीव्हीजी यांना श्री साईनाथ रूग्णालयात एक ईएनटी सर्जन पुरविणेचा आदेश न दिल्याने दि. १०/०६/२०१७ पासून सध्या कार्यरत इएनटी सर्जनचे बिल अदा केलेले नाही.

प्र.वैद्यकीय अधिक्षका, श्री साईनाथ रूग्णालय यांनी जा.नं.एसएसएस/एसएसएच/८७/२०१७ दि. ०७/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये कामगार अधिकारी यांना लेबर कॉन्ट्रॅक्टर मे बीव्हीजी इं लि. पुणे यांचेमार्फत श्री साईनाथ रूग्णालयास प्रति व्हिजीट मानधन रू ५,०००/- या दराने कंत्राटी पध्दतीने एक ईएनटी सर्जन पुरविणेबाबत त्वरीत आदेश होणेस विनंती जेणेकरून सध्या कार्यरत ईएनटी सर्जनचे दि. १०/०६/२०१७ पासूनचे प्रलंबित बिल त्वरीत अदा करता येईल असे कळविले आहे. मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. असे नमुद केले आहे.

तरी मा व्यवस्थापन समिती दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९४४ नुसार दि. ०१ जानेवारी २०१७ पासुन श्री साईनाथ रूग्णालयामध्ये होत असलेले सर्व प्रकारचे वैद्यकिय उपचार सर्वांसाठी मोफत करणेत आल्याने रूग्णांची संख्या वाढलेली आहे.

ईएनटी विभागातील माहे डिसेंबर २०१६ व जुलै २०१७ ची रूग्णसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| महिना | बाह्यरूग्ण संख्या | आंतररूग्ण संख्या | शस्त्रक्रीया |
|---|---|---|---|
| डिसेंबर २०१६ | ९५५ | ३७ | ७४ |
| जुलै २०१७ | १३४६ | ७६ | ८५ |

श्री साईनाथ व श्री साईबाबा रूग्णालयासाठी सन २००९ चे मंजुर आकृतीबंधात ईएनटी सर्जनची मंजुर पदे व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| रूग्णालय | मंजुर पदसंख्या | भरलेली पदे | | |
|---|---|---|---|---|
| | | स्थायी | अस्थायी | बाह्ययंत्रणेद्वारे (व्हिजीटींग) |
| साईबाबा | ०२ | ०० | ०० | ०० |
| साईनाथ | ०१ | ०० | ०१<br>डॉ कोल्हे | ०१<br>डॉ जोशी |

ईएनटी विभाग फक्त श्री साईनाथ रूग्णालयात असल्याने ईएनटी सर्जनची आवश्यकता श्री साईनाथ रूग्णालयात आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** प्रति व्हिजीट रू.५,०००/-

**मागणी–** कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स) पध्दतीने श्री साईनाथ रूग्णालयात दि. १०/०६/२०१७ पासून प्रति व्हिजीट मानधन रू.५,०००/- या दराने एक ईएनटी सर्जनची सेवा पुरविणेस मंजुरी मिळणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** मा व्यवस्थापन समिती दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७० नुसार कामगार विभागामार्फत बाह्ययंत्रणेद्वारे (आऊटसोर्स) पध्दतीने श्री साईनाथ रूग्णालयास दि. १०/०६/२०१७ पासून प्रति व्हिजीट मानधन रू ५,०००/- या दराने एक ईएनटी सर्जनची सेवा पुरविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.९९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.८६ **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावरील व्हिजीटींग वैद्यकिय अधिकाऱ्यांचा १ वर्षाचा नेमणूक कालावधी संपुष्टात आल्याने त्यांनी पुन्हा व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद–** कलम १३(४) नुसार समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचाऱ्यांची नेमणूक समितीकडून असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करता येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी– शर्ती क्र.३ – सदर पदांवर नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व

अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही असे नमुद आहे.

**व्यस्थापन समितीचा ठराव क्र. –**

**१)** दि. ०३/०६/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ३२८ (२).

कॅथलॅब व हृदय शस्त्रकियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub-Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH – LAB | Sansthan | Doctors charges | Sansthan | Doctors Charges |
| Coronary Angiography | 6,000 | 1,000 | 6,000 | 1,000 |
| Coronary Angioplasty | 50,000-75,000 | 8,000 | 50,000-75,000 | 8,000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6,000 | 1,000 | 7,500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty | 50,000 | 8,000 | 50,000 | 8,000 |
| BMV | 25,000 | 7,500 | 25,000 | 7,500 |
| Permanent Pacemaker Charges | 1,25,000-2,00,000 | 2,000 | 1,25,000-2,00,000 | 2,000 |
| Temporary Pacing | 4,000 | 500 | 4,000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80,000 | 8,000 | 60,000 | 8,000 |
| Single Valve Replacement | 1,00,000 | 12,000 | 1,00,000 | 12,000 |
| Double Valve Replacement | 1,50,000 | 18,000 | 1,50,000 | 18,000 |
| ASD/VSD/TOF | 1,10,000 | 12,000 | 1,00,000 | 12,000 |
| BT Shunt | 25,000 | 2,500 | 25,000 | 2,500 |
| PDA Ligation | 25,000 | 5,000 | 25,000 | 5,000 |

Note: 1 Anaesthist's share 30% of the Surgeon's Charges, 2. Assistant Charges 10% of Surgeon's Charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रुग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५०% हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भुलतज्ञ यांना नफ्याच्या १५% हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

**२)** दि. २२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७७० -

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सल्टेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६० % वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५% भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३% पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व हृदय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रती केसनुसार मासिक वेतनाव्यतिरिक्त मोबदला, इंन्टेसिव्हिस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रती केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

**३)** दि. १२/०४/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. २७५ -

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार प्रस्तावित केलेप्रमाणे इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या नेमणूकांस मान्यता देण्यात आली.

तसेच, कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि. ०१/०४/२०१४ पासून प्रती अॅन्जीओग्राफी रु.३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रु.३,०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

**४)** दि. ११/०९/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ७८५ -

याकामी सिव्हील अॅप्लीकेशन मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सहा महिन्याचे मुदतीवर तदर्थ म्हणून मा. उच्च न्यायालयाची प्रस्तावित कार्डीओलॉजिस्ट यांना ०६ महिन्यासाठी मंजूरी असुनही मुदत

संपल्यानंतर सदरहू कार्डीओलॉजिस्ट यांना सेवामुक्त करावे लागेल. तेव्हा ताबडतोब सिव्हील ॲप्लीकेशन चालवून घेऊन, त्यांना पुढील ०६ महिन्यांची मुदत वाढवून घेण्यात यावी, याबाबत संस्थान वकीलांना तसे सांगण्यात यावे.

**५)** दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ३७९ -

प्रस्तावात नमुद केलेल्या कार्डीओलॉजिस्ट यांना त्यांची मुदत संपलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच अटी / शर्तीस अधीन राहून पुनर्नेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलांमार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली.

**६)** मा. व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७५(५) -

संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

**७)** मा. व्यवस्थापन समिती दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४९३ -

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयासाठी व्हिजीटींग डॉक्टरांची शैक्षणिक पात्रता व स्पेशियालिटी याचा विचार करुन तयार करणेत आलेल्या प्रस्तावित नियमावलीस मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू नियमावलीची अंमलबजावणी करणेपूर्वी त्यास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत व्हिजीटींग डॉक्टरांना त्यांच्या पूर्वीच्या नेमणूक आदेशाप्रमाणे मानधन / प्रोत्साहन भत्ता अदा करणेत यावा.

याचबरोबर संस्थान रुग्णालये चालविणेसाठी कन्सल्टंसी कंपनीची नेमणूक करणेसाठीचा अभ्यासपूर्वक प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**प्रास्ताविक–** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील स्थायी पद्धतीने कार्यरत इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांना निलंबीत केल्यमे इंटरव्हेशनल कार्डीओलॉजिस्टची मंजूरी मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं. २७९७/२०१४ मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करणेत आले होते सदर सिव्हील ॲप्लीकेशनवर मा.न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

Considering the urgency and essentiality of such life saving facilities at the Sansthan, we allow to Ad hoc Committee to nominate the experts / cardiologists in the field on ad hoc basis for a period of six months. The committee shall follow procedure as is required for appointment of ad-hoc employees or experts in the hospitals.

मा. न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार कमिटी स्थापन करुन इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट पदावर नोकरी मिळणेकरीता कार्यालयात असलेल्या अर्जदारांच्या मुलाखती घेऊन दि. २७/०३/२०१४ रोजी व्हिजीटींग पद्धतीने ०५ व कंत्राटी पद्धतीने ०२ वैद्यकीय अधिका-यांना इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट पदावर ०६ महिने कालावधीसाठी नेमणूका देणेत आल्या. मा. त्रिसदस्य समिती दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ नुसार उपरोक्त नेमणूकांस मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याने पुन्हा नेमणूक करणेकामी मा. व्यवस्थापन समिती दि. ११/०९/२०१४ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ७८५ नुसार, याकामी सिव्हील ॲप्लीकेशन मा. उच्च न्यायालयामध्ये प्रलंबीत आहे. सहा महिन्याचे मुदतीवर तदर्थ म्हणून मा. उच्च न्यायालयाची प्रस्तावित कार्डीओलॉजिस्ट यांना ०६ महिन्यासाठी मंजूरी असुनही मुदत संपल्यानंतर सदरहू कार्डीओलॉजिस्ट यांना सेवामुक्त करावे लागेल. तेव्हा ताबडतोब सिव्हील ॲप्लीकेशन चालवून घेऊन, त्यांना पुढील ०६ महिन्यांची मुदत वाढवून घेण्यात यावी, याबाबत संस्थान वकीलांना तसेच सांगणेत यावे, असे ठरले. सदर निर्णयानुसार सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करणेत आले होते. सदर सिव्हील ॲप्लीकेशनवर मा.न्यायालयाने दि.१२/०१/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

The doctors, whose appointments are continued on Ad-hoc basis, shall continue to work for one more year or until the departmental enquiry proposed against Dr. Harish Bajaj and Dr. Gaurav Verma is concluded, whichever is earlier.

मा.न्यायालयाचे उपरोक्त दि. १२/०१/२०१५ रोजीचे आदेशानुसार ०६ महिन्याचे मुदत संपुष्टात आलेल्या कार्डीओलॉजिस्ट यांना दि. १९/०१/२०१५ रोजीचे आदेशान्वये दि. ०२/१०/२०१४ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक आदेश देण्यात आले होते. सदर नेमणूक कालावधी संपुष्टात आल्याने त्यांची पुन्हा नेमणूक करणेकामी मा. व्यवस्थापन समिती दि. २७/१०/२०१५ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ३७९ नुसार, प्रस्तावात नमुद केलेल्या कार्डीओलॉजिस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पूर्वीच्याच अटी / शर्तींस अधीन राहून पुर्नेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलांमार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली. उपरोक्त निर्णय क्र. ३७९ नुसार सिव्हील ॲप्लीकेशन नं. १६५२१/२०१५ दाखल करणेत आले त्यावर औरंगाबाद खंडपीठाने दि. १८/१२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

The visiting cardiologists who are already working, their tenure has already come to an end. It is submitted that, no complaints are received as against them. As such, the applicant is permitted to continue three visiting cardiologists and two cardiologists on contract basis on the same terms and conditions.

दि. १८/१२/२०१५ रोजीचे मा. न्यायालयाचे आदेशानुसार उपरोक्त कार्डीओलॉजिस्ट यांना दि. १९/०१/२०१६ रोजीचे आदेशान्वये दि. ०२/१०/२०१५ पासून पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक आदेश देण्यात आले होते.

तदनंतर, मा. व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७५(५) नुसार, संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आल्याने उपरोक्त कार्डीओलॉजिस्ट यांना दि. ०३/१०/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दि. २१/१२/२०१६ रोजीचे आदेशान्वये दि. ०२/१०/२०१६ पासून पुढे एक वर्ष अथवा सदर पदावर स्थायी स्वरुपात उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत.

| **अ.नं.** | **वैद्यकीय अधिका-याचे नाव** | **नेमणूक प्रकार** | **नेमणूक तारीख** | **०१ वर्ष नेमणूक कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख** |
|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** |
| ०१. | डॉ. मुकुंद रामप्रसाद बजाज | व्हिजीटींग इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट | ०२/१०/२०१६ | ०१/१०/२०१७ |
| ०२. | डॉ. देवराम रामराव ठेंगे | व्हिजीटींग इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट | ०४/१०/२०१६ | ०३/१०/२०१७ |
| ०३. | डॉ. गिरीश भास्करराव काळे | व्हिजीटींग इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट | ०७/१०/२०१६ | ०६/१०/२०१७ |

उपरोक्त नेमणूकींचा कालावधी संपुष्टात येत असल्याने डॉ. बजाज, डॉ. ठेंगे व डॉ. काळे यांनी अनुक्रमे दि. १५/०९/२०१७ व दि. १८/०९/२०१७ चे अर्जान्वये पुन्हा व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक मिळणेबाबत विनंती अर्ज केलेले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट पदावर कार्यरत वैद्यकीय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | मंजूर पदसंख्या | भरलेली पदसंख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | तात्पुरत्या स्वरुपात | व्हिजीटींग | |
| इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट | ०२ | ०२ डॉ. हरिष बजाज, डॉ. गौरव वर्मा | ०२ डॉ. देवरे, डॉ. शिंदे | ०४ डॉ. मुकुंद बजाज, डॉ. ठेंगे, डॉ. काळे, डॉ. थोपटे | डॉ. हरिष बजाज व डॉ. गौरव वर्मा सध्या सेवानिलंबीत |
| क्लिनीकल असिस्टंट | १० स्पेशालिटीनुसार | ०० | ०२ डॉ. पाडगावकर डॉ. महाले | ०० | डॉ. महाले हे क्लिनीकल असिस्टंट (कार्डीओलॉजी) पदावर ११ महिने कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे सेवा देत आहे. |

**मागणी–** इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट पदावर ११ महिने अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक करणे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश,तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** तरी, सिव्हील अॅप्लीकेशन नं.१६५२/२०१५ मध्ये दि. १८/१२/२०१५ रोजीचे मा.औरंगाबाद खंडपीठाचे मंजूरीनुसार, प्रस्तावातील नमुद इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट यांचे व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणूकीचा ०१ वर्षाचा कालावधी संपुष्टात येत असल्याने, त्या लगतचे दिनांकापासून प्रस्तावातील वैद्यकीय अधिका-यांची पुन्हा इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजिस्ट पदावर ११ महिने अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करता येईल व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील नमुद इंटरव्हेश्नल कार्डीओलॉजिस्ट यांचे व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या नेमणूकीचा ०१ वर्षाचा कालावधी संपुष्टात येत असल्याने, त्या लगतचे दिनांकापासून प्रस्तावातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पुन्हा इंटरव्हेंश्नल कार्डीओलॉजिस्ट पदावर ११ महिने अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करता यावी व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८७** **M/s Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून खरेदी केलेल्या Implant चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मंजुरीघेणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक विभागात रुग्णांवर वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यानूसार श्री जेजूरकर काशिनाथ गणपत या रुग्णाची शस्त्रक्रिया व औषधोपचाराकरीता होणारा खर्च भागविण्यासाठी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून अर्थसहाय्य मंजूर केलेले असून सदरहू रक्कम श्री साईबाबा रुग्णालयाच्या नावे काढलेला स्टेट बॅंकचे खात्यावर RTGS द्वारे जमा करण्यात आलेली आहे.

त्यानूसार मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर केलेले रक्कम रु.१,००,०००/- इतके अर्थसहाय्य संस्थानचे वित्त विभागात जमा आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | UTR No. | Amount |
|---|---|---|---|
| 1 | Jejurkar KashinathGanpat | SBIN217096567760 Dt -06/04/2017 | 1,00,000.00 |

त्यानुसार श्री जेजूरकर काशिनाथ गणपत या रुग्णावर डॉ.जपे यांनी THR (Total Hip Replacement) ची शस्त्रक्रिया केलेली आहे.

सन २०१५-१६ चे वार्षिक औषधे खरेदीमध्ये सदर Implant चे दर प्राप्त झालेले नव्हते. त्यामुळेया अगोदर अशाप्रकारे तातडीने सदर Implant खरेदी करण्यात येऊन त्यास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/०६/२०१६ निर्णय क्र.३६१ अन्वये मान्यता घेण्यात येऊन M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचे रु.५,५८,७००/- मात्रचे बील अदा करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणेJ & J कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांचेकडून सदर Implant खरेदी करण्यात आलेले आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| S. N. | Name of Item | Bill No. &Dt. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Gurukrupa Enterprises, Nashik | 98-11/07/2017 | 95000.00 | 95000.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **95000.00** |

उपरोक्त रुग्णावर शस्त्रक्रिया करणेकरीता J & J कंपनीचे Implant खरेदीकामी रक्कम रु.95000/- इतका खर्च आलेला आहे.

मागणी – नाही

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- सन २०१५-१६ मध्येImplant (THR Set) करीता कुठल्याच पुरवठाधारकाने ई- निविदा भरलेली नसल्यामुळे J & J कंपनीचे Implant हे चांगल्या दर्जाचे असल्यामुळे तातडीने खरेदी करण्यात आले.

तरी उपरोक्त Implant (THR Set) चे केलेल्या खरेदी व याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Implant (THR Set) चे खरेदीस व याकामी आलेल्या रु.९५,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८८** **Inj. Heparel 100 IU चे खर्चाचे प्रतिपूर्तीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३/१२/२०१३ निर्णय क्र.९५४

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयात सौ. घुले लक्ष्मीबाई प्रकाश, वय– ५४ वर्षे आय. पी. नं. १३६३४५ या Valve Replacement करिता कार्डीयाक ऑपरेशन थिएटर मध्ये ॲडमिट झालेल्या होत्या. सदर रुग्ण हा $HB_SA_g$ Positive होता. सदर रुग्णांची Valve Replacement चे ऑपरेशन चालू असतांना पेशंटला वापरलेली Needle ही तिथे काम करणारी कंत्राटी कर्मचारी, श्री. साईनाथ भागवत (ब्रदर) श्री राहूल थोरात (मदतनीस) यांना लागली होती, सदर रुग्ण हा $HB_SA_g$ Positive असल्यामुळे सदर कर्मचा-याला डॉक्टरांनी Inj. Heparel 100 IU हे तातडीने घेण्यास सांगितले होते.

सदर मटेरियल करीता आपण आज पर्यंत निविदेद्वारे दर मागणी करण्यात आले होते. परंतू सदर इंजेक्शन करीता कुठल्याही निविदा धारकाने ई निविदा दिलेली नसल्यामुळे तसेच सदर इंजेक्शन Life Saving औषधांमध्ये येत असल्यामुळे ते तातडीने खरेदी करणे गरजेचे असते. त्यामुळे सदर दोन्ही कर्मचा-यासाठी लागणारे Inj. Heparel 100 IU हे दि.०९/०४/२०१७ रोजी M/s. Caitanya Healthcare, Pune येथून प्रती नग रक्कम रु.३६००/- याप्रमाणे ०९ नग रक्कम रु. ३२४००/- (अक्षरी रु. बत्तीस हजार चारशे मात्र) इतक्या रक्कमेचे खरेदी केलेले असून सदर बीलाची रक्कम ही श्री. साईनाथ भागवत (ब्रदर) यांनी रक्कम रु.१४४००/- तर

श्री राहूल थोरात (मदतनीस) यांनी रक्कम रु.१८०००/- इतकी M/s. Caitanya Healthcare, Pune यांना अदा केलेली आहे.

**मागणी –** श्री. साईनाथ भागवत (ब्रदर) श्री राहूल थोरात (मदतनीस) यांचा बीलाची रक्कम परत मिळणेबाबतचा विनंती अर्ज.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/१२/२०१३ निर्णय क्र.९५४ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील काही कर्मचा-यांना Inj. Immunoglobin Rabbies खरेदी करुन देण्यात येऊन आलेल्या खरेदीस खर्चास कार्योत्तर मान्यता मिळालेली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा रुग्णालयात दि.०८/०४/२०१७ रोजी Valve Replacement चे ऑपरेशन चालू असतांना तेथे On Duty असणारे दोनळी कर्मचा-यांना रुग्णास वापरण्यात आलेली Needle टोचल्यामुळे दोन्ही कर्मचा-यास पुढील २४ तासात प्रतिबंधक लस घेण्यास डॉक्टरांनी सांगितले होते. सदर Inj. Heparel 100 IU हे औषध भांडार विभागात उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी स्वतः तातडीने खरेदी केलेले आहे. सदर Inj. Heparel 100 IU २४ तासात न दिल्यास रुग्णाच्या जिवाला धोका असून शकतो त्यामुळे त्यांनी सदर इंजेक्शन तातडीने घेतलेले आहे. सदर बीलाची रक्कम सदर कर्मचा-यांनी स्वतः दिलेली असून सदर कर्मचारी हे On Duty असल्यामुळे त्यांनी खरेदी केलेल्या बिलाची रक्कम त्यास परत द्यावी लागेल.

उपरोक्त प्रमाणे कर्मचारी यांनी खरेदी केलेले Inj. Heparel 100 IU ची रक्कम रु. ३२४००/- (अक्षरी रु. बत्तीस हजार चारशे मात्र) त्यांना परत देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, Inj. Heparel 100 IU ची रु.३२,४००/- मात्र रक्कम, संबंधीतकर्मचाऱ्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८९** **कार्पोरेशन बँक, शिर्डी मधील आय.पी.एफ. खाते क्र.१४६४००११०१००४४४४ व १४६४००११०१००३३३३ चे नावात बदल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम – १९५० च्या कलम १४ अ व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका (पी आय एल) क्रमांक ३१३२/२००४ अनुसार.

प्रास्तविक:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयातील निरीक्षक यांचे आदेशावरुन दोन्ही रुग्णालयासाठी दि.२७ डिसेंबर २०१४ रोजी कार्पोरेशन बॅंक शाखा,शिर्डी येथे The Executive Officer SaibabaSansthan Trust या नावाने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी खाते क्रमांक १४६४००१०१००४४४४ व श्री साईनाथ रुग्णालयासाठी खाते क्रमांक १४६४००१०१००३३३३ असे स्वतंत्र आयपीएफ खाते उघडण्यात आलेली असून त्यांचे सुचनेप्रमाणे एकुण बिला पैकी गरीब (निर्धन) रुग्ण व आर्थिकदृष्टया दुर्बल रुग्णाचे बिल वजा करुन ठरलेली बिलातून २% रक्कम आय.पी.एफ. खातेला दरमहा निधीची तरतुद करुन व निधी वापरल्याच्या नोंदी घेऊन मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयातील निरीक्षक यांचेकडे विवरण सादर केली जातात.

मागणी:- मा.धर्मादाय कार्यालयातील निरीक्षक यांनी रुग्णालयांची महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१ अ अ व मा.उच्च् न्यायालय, मुंबई यांचे रिट याचिका (पीआयएल) क्रमांक ३१३२/२००४ मधील मंजूर योजनेच्या अंमलबजावणी बाबत दि.२३/१२/२०१७ व दि.२१/०४/२०१७ रोजी निरीक्षण/ तपासणी करुन अहवालामध्ये सांगितले आहे की, कार्पोरेशन बॅंक शिर्डी येथे दोन्ही रुग्णालयासाठी The Exe. Officer Saibaba Sansthan Trust या नावाने स्वतंत्र आयपीएफ खाते आहे., परंतु सदरचे खाते हे रुग्णालयाच्या नावाने (उदा.श्री साईबाबा हॉस्पिटल आय.पी.एफ.खाते) असे असणे आवश्यक असलेबाबत सुचविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- मा.धर्मादाय कार्यालयातील निरीक्षक यांनी निरीक्षण अहवालामध्ये सुचविलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कार्पोरेशन बॅंक शाखा शिर्डी The Exe. Officer Saibaba Sansthan Trust या नावाने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी असलेले खाते

क्र.१४६४००१०१००४४४४ व श्री साईनाथ रुग्णालयासाठी असलेले खाते क्र.१४६४००१०१००३३३३ या खात्यांच्या नावात अनुक्रमे Shri Saibaba Hospital IPF A/c व Shri Sainath Hospital IPF A/c या प्रमाणे बदल करणेसाठी मा.व्यवस्थापन समीतीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१००२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कार्पोरेशन बॅंक शाखा शिर्डी The Exe. Officer Saibaba Sansthan Trust या नावाने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी असलेले खाते क्र.१४६४००१०१००४४४४ व श्री साईनाथ रुग्णालयासाठी असलेले खाते क्र.१४६४००१०१००३३३३ या खात्यांच्या नावात अनुक्रमे Shri Saibaba Hospital IPF A/c व Shri Sainath Hospital IPF A/c या प्रमाणे बदल करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.९०** **सन २०१४- १५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षातील मुदतबाहय झालेली औषधे नष्ट करणेस व संगणकातूननोंदी निर्लेखित करणेस मंजुरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि. ०१/०४/२०१४ ते दि. ३१/०३/२०१५, दि. ०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ व दि. ०१/०४/२०१६ ते दि. ३१/०३/२०१७ या कालावधीमध्ये तिन्ही वर्ष मिळून एकूण रक्कम रु. ११६१३७.७३ इतक्या रक्कमेची औषध मुदतबाह्य झाली आहे. परंतु, सदर औषधांची खरेदी ही मागील ०३ वर्षात टप्प्या - टप्प्याने खरेदी करण्यात आली आहे.

**१) दि. ०१/०४/२०१४ ते दि. ३१/०३/२०१५ या कालावधीतील औषधांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे :-**

**अ) मुख्य औषध भांडारातील एकूण औषधे :-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | Main Store – Expired Medicine / Surgical | 15216.77 |
| | Total Amt. in Rs. | 15216.77 |

**ब) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकूण औषधे :-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | All Wards – Saibaba Hospital | 5566.06 |
| 2. | Sub – Store & Wards – Sainath Hospital | 320.00 |
| | Total Amt. in Rs. | 5886.06 |

अ) = रु. १५२१६.७७ + ब) = रु. ५८८६.०६ = पूर्णाकींत एकूण रक्कम रु. २११०३/-

**2) दि. ०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीतील औषधांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे:-**

**क) मुख्य औषध भांडारातील एकूण औषधे:-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | Main Store – Expired Medicine / Surgical | 127130.00 |
| | Recover Total Amt. in Rs. | 107434.00 |
| | Balance Amt. in Rs. | 19696.00 |

**ड) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकूण औषधे :-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | All Wards – Saibaba Hospital | 33400.00 |
| 2. | Sub – Store & Wards – Sainath Hospital | 46174.00 |
| | Total Amt. in Rs. | 79574.00 |
| | Recover Total Amt. in Rs. | 58441.00 |
| | Balance Amt. in Rs. | 21133.00 |

क) = रु. १९६९६ + ड) = रु. २११३३ = पूर्णांकींत एकूण रक्कम रु. ४०८२९/-

**३) दि. ०१/०४/२०१६ ते दि. ३१/०३/२०१७ या कालावधीतील औषधांची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे :-**

**इ) मुख्य औषध भांडारातील एकूण औषधे:-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | Main Store – Expired Medicine / Surgical | 311219.93 |
| | Recover Total Amt. in Rs. | 271110.32 |
| | Balance Amt. in Rs. | 40109.61 |

**ई) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकूण औषधे:-**

| Sr. No. | Name of Wards / Section | Total Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1. | All Wards – Saibaba Hospital | 12145.85 |
| 2. | Sub – Store & Wards – Sainath Hospital | 1950.44 |
| | Total Amt. in Rs. | 14096.29 |
| | Balance Amt. in Rs. | 14096.29 |

इ) = रु. ४०१०९.६१ + ई) = रु.१४०९६.२९ = पूर्णांकींत एकूण रक्कम रु. ५४२०६/-

श्री साईबाबा रुग्णालयातील मुख्य औषध भांडार/ श्री साईनाथ सब स्टोअर/ विविध वॉर्ड मिळून मागील तीन वर्षात रककम रु. ५,५३,१२३.०५ इतक्या रक्कमेची औषधे मुदतबाह्य झाली होती. त्यातून संस्थानचे निविदा व करारनाम्याचे नियम व अटीनुसार रक्कम रु. ४,३६,९८५.३२ इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

Expired Drugs will have to be replaced, if desired by the Sansthan at the supplier's cost or will have issue credit note of return material. Sansthan will buy any other medicines in lieu of credit note amount. The minimum expiry of Drugs should not be less than for the period of 3 years or 2 years or years as the case may be.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदरचे मुदतबाह्य झालेले मटेरियल हे संस्थानमार्फत घेण्यात येणा-या विविध मोफत कॅम्पसाठी तसेच बरेचसे मटेरियल हे पेशंटला तातडीचे म्हणजेच Life Savings म्हणून घेण्यात आले होते., जर हे मटेरियल रुग्णालयाकडे उपलब्ध नसल्यास रुग्णांच्या जीवितास हानी पोहचू शकते.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता औषधांची वार्षिक खरेदी ही दरवर्षी अंदाजे रु ५० कोटी इतकी आहे. मागील तीन वर्षात औषधे/ सर्जिकल साहित्यांची खरेदी एकूण रक्कम रु. ७०,५५,४४,६१७/- इतकी करण्यात आली होती. सदरची रक्कम पाहता मुदतबाह्य झालेल्या औषधांची रक्कम ही ०.०१९% इतकी आहे. तसेच सदर मटेरियल हे संस्थान नियमाप्रमाणे परत घेऊन जाण्यास संबंधीत पुरवठाधारकांना विनंती करण्यात आलेली होती. परंतु, सदर मटेरियल हे तातडीने तसेच यातील काही मटेरियल हे Generic असल्यामुळे परत न घेण्याच्या बोलीवरच दिलेले असल्याबाबत सांगण्यात आले तसेच सदर पुरवठाधारकांची अनामत रक्कम आपल्याकडे जमा नसल्यामुळे वसूल करण्यात आली नाही. सदरचे मटेरियलची खरेदी ही फार जुन्या कालावधीमध्ये केलेली आहे, त्यामुळे पुरवठाधारक सदरचे मटेरियल घेऊन जाण्यास तयार नाहीत. सदरचा औषधांचा साठा जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधांचा साठा (रक्कम रु. १,१६,१३८/-) भांडारातील संगणकातून कमी करणेसाठी सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**विषय नं.९१** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरोपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ओ.टी.चे अतिशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झालेले आहेत. सदरचे लिनन रोजच्या वापरामुळे खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१६ ते ३१/१२/२०१६ पर्यंतचे सर्व वॉर्डी/ओ.टी.चे लिनन मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक १७/०२/२०१७ नि.क्र१४ अन्वये नष्ट केलेले असुन, सदर लिननची किंम्मत रु.४,१३,७८६/- (चार लाख तेरा हजार सातशे स्याऐंशी मात्र) इतकी होती, त्यानंतर दि.०१/०१/२०१७ ते ३०/०६/२०१७ पर्यंतचे विविध वॉर्डी/ओ.टी.तुन खराब लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.३,५१,००८/- (अक्षरी रु. तीन लाख एकावण्ण हजार आठ मात्र) इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सदय परिस्थितीत त्याची किंमत निरंक आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची सहा.अधिसेविका व वैदयकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखित करणे गरजेचे आहे.

तरी सोबतच्या तक्त्यातील लिनन हे साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करुन ते जाळून नष्ट करणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१००३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त विषय नं.९० मधील सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षातील मुदतबाहय झालेली औषधे नष्ट करुन, त्यांच्या संगणकातून नोंदी निर्लेखित करणेस व विषय नं.९१ मधील निरोपयोगी लिनन नष्ट करुन, त्याचा साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक ०९.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१००४** दिनांक ०९.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी साई मंदिरांकरीता उपलब्ध करुन द्यावयाच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्मचे मसुद्यास व सदरचा फॉर्म वेबसाईटवर प्रकाशित करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-**कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रारुप धार्मिक, सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रकास मान्यता देणेत आलेली आहे. त्या अनुषंगाने, समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरांमध्येएकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि.२३ डिसेंबर, २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्याविश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेचा निर्णय दि.२०.०८.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत घेतलेला आहे.

दि.२३.१२.२०१७ रोजी आयोजित जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणा-या साईमंदिर विश्वस्तांसाठी संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत इकडील विभागास निर्देशीत करणेत आलेले आहे.

उपरोक्त निर्देशानुसार जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणा-या साईमंदिर विश्वस्तांकरीता संस्थानचे वेबसाईटवर नोंदणी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतची कार्यवाही इकडील विभागामार्फत सुरू करणेत आलेली आहे. त्यानुसार वेबसाईटद्वारे साईमंदिरांचे विश्वस्तांना नोंदणी करणेकामी आवश्यक फॉर्मचा मसुदा सोबत जोडलेप्रमाणे इकडील विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे. साईमंदिरांचे विश्वस्तांना चर्चासत्रामध्ये भाग घेणेकामी संस्थानचे वेबसाईटवर सदरचे नोंदणी फॉर्मद्वारे ऑनलाईन नोंदणी करता येईल. सबब, साईमंदिरांचे विश्वस्तांना नोंदणीकामी वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावयाचे फॉर्मचे पुढीलप्रमाणे मसुदयास व फॉर्म संस्थानचे वेबसाईटवर प्रकाशीत करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi | | | | | | | |
| Second Global Summit of Shri Saibaba Temple Trustees | | | | | | | |
| Saturday, 23rd December, 2017 | | | | | | | |
| Place : Shirdi | | | | | | | |
| Registration Form | | | | | | | |
| A) Information of Saibaba Temple | | | | | | | |
| 1 | Name of Saibaba temple | | | | | | |
| 2 | Address of Saibaba Temple : | | | | | | |
| City : State : | | Country : | | | | | |
| 3 | Mobile Number | | | | | | |
| 4 | E-Mail | | | | | | |
| 5 | Temple Registration Number : | | | | | | |
| 6 | We hereby declare that we haven't installed model of Saibaba Samadhi in our Temple | | Accept/Decline | | | | |
| 7 | There is no any legal case registered against our Trust or Trustees | | Accept/Decline | | | | |
| B) Information of Sai Temple Representative-1 | | | | | | | |
| 1 | Name of Representative | Gender | First | Middle | Last | | upload Photograph of 256 KB size |
| 2 | Designation | | | | | | |
| 3 | Address of Representative | | | | | | |
| 4 | Mobile Number | | | | | | |
| 5 | E-Mail | | | | | | |
| 6 | Signature | | Uploade scanned image of signature of size 56 KB size | | | | |
| C) Information of Sai Temple Representative-2 | | | | | | | |
| 1 | Name of Representative | Gender | First | Middle | Last | | upload Photograph of 256 KB size |
| 2 | Designation | | | | | | |
| 3 | Address of Representative | | | | | | |
| 4 | Mobile Number | | | | | | |
| 5 | E-Mail | | | | | | |
| 6 | Signature | | Upload scanned image of signature of size 56 KB size | | | | |
| | **Attachment :** | | 1. Scanned copy of Temple Registration Certificate | | | | |
| | | | 2. Scanned copy of ID Proof of Representative1 | | | | |
| | | | 3. Scanned copy of ID Proof of Representative2 | | | | |
| | | | 4. Authorization letter from the Temple Organization if favor of Representatives. | | | | |

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणा-या साईमंदिर विश्वस्तांना नोंदणीकामी वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावयाचे फॉर्मचे मसुदयास व फॉर्म संस्थानचे वेबसाईटवर प्रकाशीत करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणा-या साईमंदिर विश्वस्तांना नोंदणीकामी वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावयाचे फॉर्मचे मसुदयास व फॉर्म संस्थानचे वेबसाईटवर प्रकाशीत करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणा-या साईमंदिर विश्वस्तांचे नाव नोंदणीकामी वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावयाचे फॉर्मच्या मसुदयावर विस्तृत चर्चा होऊन, खालीलप्रमाणे साईमंदिर विश्वस्त नोंदणी फार्म अंतीम करणेत आला.

**Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

**Second Global Summit of Shri Saibaba Temple Trustees**

**Saturday, 23rd December, 2017**

**Place : Shirdi**

**Participation Form (eligible only for Temple Summit, Dtd.23/12/2017)**

**A) Information of Saibaba Temple**

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of Saibaba temple | |
| 2 | Address of Saibaba Temple : | |
| City : | State : | Country : |
| 3 | Mobile Number | |
| 4 | E-Mail | |
| 5 | Trust Registration Number : | |
| 6 | We hereby declare that we haven't installed model of Saibaba Samadhi in our Temple. | Accept/Decline |
| 7 | There is no any legal case registered against our Trust or Trustees for the activities related to Temple Trust. | Accept/Decline |

**B) Information of Sai Temple Representative-1**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Name of Representative | Gender | First | Middle | Last | Uploade Photograph of 256 KB size |
| | | | | | | |
| 2 | Designation | | | | | |
| 3 | Address of Representative | | | | | |
| 4 | Mobile Number | | | | | |
| 5 | E-Mail | | | | | |
| 6 | Signature | Uploade scanned image of signature of size 56 KB size | | | | |

**C) Information of Sai Temple Representative-2**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Name of Representative | Gender | First | Middle | Last | Uploade Photograph of 256 KB size |
| | | | | | | |
| 2 | Designation | | | | | |
| 3 | Address of Representative | | | | | |
| 4 | Mobile Number | | | | | |
| 5 | E-Mail | | | | | |
| 6 | Signature | Uploade scanned image of signature of size 56 KB size | | | | |

Attachment : 1. Scanned copy of Temple Registration Certificate
2. Scanned copy of ID Proof of Representative1
3. Scanned copy of ID Proof of Representative2
4. Authorisation letter from the Temple Organisation if favour of Representatives.
5. Program List

Note : 1. This registration is only for Global Summit. Trust should not misuse this form or any other correspondence from SSST.

2. Program to be held during Centenary year by your trust should be uploaded as Program List

3. Help/ Involvement of Saibaba Sansthan, Shirdi if needed should be informed in advance.

**तसेच उपरोक्तप्रमाणे अंतीम करणेत आलेला, साईमंदिर विश्वस्त नोंदणी फॉर्मच्या मसुदा व अटी/ शर्ती पुढील मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेऊन, साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी उपस्थित राहणाऱ्या साईमंदिर विश्वस्तांना नाव नोंदणी करणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०२ **श्री साईप्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचनमधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामाचे ठेकेदार मे.आर.के. सावंत, नाशिक यांचे जी.एस.टी मधील फरकाचे अनुषंगाने होणारे बदलाबाबत चर्चा करुन निर्णय घेणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः**

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.३९६.

०२.मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.७४०.

०३.मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.१०.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.९०२.

**प्रस्तावना :-** श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरिंग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी विहित पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या रु.२,२४,६२,७५०/- मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३९६ अन्वये मान्यता देणेत आलेली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामीवृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.०६/०७/२०१७ ते दि.०१/०८/२०१७ या कालावधीमध्ये निविदा सादर करणेची मुदत देणेत आली होती. याकामासाठी दि.१४/०७/२०१७ रोजी झालेल्या निविदापूर्व बैठकीमध्ये (प्री–बीड मिटींग) सदरहू कामासाठी द्यावयाचे दर हे जीएसटीसह देण्यात यावेत असे Common set of deviations मध्ये नमूद केले होते. त्यानुसार याकामी खालील ठेकेदारांनी ईनिविदा अपलोड केल्या होत्या.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik |

वरील प्राप्त ई-निविदांचे तांत्रिक लिफाफे मा खरेदी समितीचे दि.०४/०८/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आले असुन ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता उपरोक्त तीनही ठेकेदार पात्र झाले आहेत. ठेकेदार यांनी सादर केलेल्या ई-निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.१९/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आला असुन त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | ठेकेदाराचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | C4 Infrastructure Pvt. Ltd. Nashik | रु. २,१०,३४,७४०/- | -- |
| २ | Shri D.S. Shewale, Junnar, Pune | रु. २,००,६३,१५५/- | -- |
| ३ | Shri R.K. Sawant, Nashik | **रु. १,८९,६२,२२३/-** | निम्नतम |

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४० अन्वये निम्नतम दर देऊ करणारे ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांना कार्यादेश देणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मध्ये सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉंक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामीआर. के. सावंत, नाशिक यांचे रु.१,८९,६२,२२३/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले."

तथापि, GST अंमलबजावणी नंतर कंत्राटात होणाऱ्या बदलाबाबत महाराष्ट्र शासनाचा दि. ११/०९/२०१७ रोजीचा आदेश खरेदी विभागाने दि.१५/०९/२०१७ रोजीच्या पत्रासोबत दिलेला आहे. सदर आदेशात खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

"*२(अ) निविदा दाखल करतांना कंत्राटदार त्या दिनांकास अस्तित्वातल्या कराचा दर लक्षात घेऊन कंत्राटाची किंमत* Quote *करत असतात. निविदा जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर व दि. २८/०८/२०१७ पुर्वी दाखल केली असल्यास, कंत्राटदाराने जीएसटीचा सर्वसाधारणपणे* Construction service *वरील अस्तित्वातल्या कराचा दर एकत्रित १८% (०९ %* CGST+*०९%* SGST) *लक्षात घेऊन किंमत* Quote *केली असेल, मात्र सदरचा कराचा दर दि. २२/०८/२०१७ रोजीच्या अधिसूचना क्र. २०/२०१७* Central Tax Rate *व २०/२०१७* State *२०/२०१७ अन्वये, बहुतशः शासकिय कार्यकंत्राटावर १२% (०६%* CGST+*०६%* SGST) *झाला आहे. त्यामुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा.*"

उपरोक्त शासन आदेशतील बदलामुळे ठेकेदार यांनी देऊ केलेले दराबाबत त्यांचेशी चर्चा / वाटाघाटी करणेसाठीमा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर निर्णय क्र.९०२ अन्वये,विषयांकीत कामासाठी ठेकेदार मे. आर. के. सावंत, नाशिक यांना पुढील मा. व्यवस्थापन समितीचे सभेपढे बोलविण्यात यावे असे ठरले.

उपरोक्त शासन आदेशानुसार ठेकेदार यांचेकडून जीएसटी बदलामुळे होणारे कंत्राट बदलाबाबत माहिती मागविणेत आली असता, ठेकेदार आर के सावंत यांनी सदरहू कामासाठी देऊ केलेले दर हे जीएसटीसह असल्याचे तसेच याकामासाठी जीएसटी पोटी त्यांचेकडून भविष्यात जीएसटी मागणी केली जाणार नाही असे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. तसेच ठेकेदार यांनी जमा केलेली निविदा हि जीएसटी अंमलबजावणी नंतर व दि.२२/०८/२०१७ पुर्वी असल्याने कार्य कंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करणेसाठी विचारणा करण्यात आली होती. त्यावर ठेकेदार यांनी त्यांचे दि.३०/१०/२०१७ रोजीच्या पत्राने ठेकेदार यांनी निविदेमध्ये देऊ केलेले रु.१,८९,६२,२२२.९० मात्र रकमेवर रु.५,६७,९७३/- (२.९९५%) सवलत देऊ केली असून, सदरचे सवलतीचे दराने काम करणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

**प्रस्ताव:** तरी श्री साई प्रसादालय मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रिमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नविन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांनी देऊ केलेले निविदा दर जी. एस. टी. (GST) मधील फरकाचे (१८% ऐवजी सुधारीत १२% प्रमाणे) अनुषंगानेकमी करणेबाबत त्यांचेशी मा. उपसमितीचे सभेत चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होऊन, मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**प्रस्तावित कामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेने दि.१९.०९.२०१७ रोजीचे शासन आदेशानुसार, शासकीय कार्यकंत्राटासाठी जीएसटीचा दर १८% वरुन १२% झालेला असल्याने आर.के.सावंत, नाशिक यांना त्याप्रमाणे दर कमी करणेबाबत विचारणा केली असता, ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांनी जीएसटी काऊंसिलचे नोटिफिकेशन सभेसमोर सादर केले. त्यानुसार फक्त हिस्टोरिकल मुव्हमेंटस्, पाणी पुरवठा योजना इ. ठराविक कामांसाठीच फक्त १२% जीएसटीचा दर आहे, असे उपसमितीच्या निदर्शनास आणून दिले. यावर उपसमिती सभेने याबाबतीत विधी व न्याय विभाग यांचे मार्गदर्शन घेण्याचे ठरविले व शासनाच्या मार्गदर्शनास अधीन राहून कार्यारंभ देण्यात येईल, असे आर.के.सावंत, नाशिक यांना कळविले असता, त्यांनी ते मान्य केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रिमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नविन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी आर.के. सावंत, नाशिक यांचे रु.१,८९,६२,२२२.९० मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत व या कामावरील जीएसटीबाबत महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येऊन, या मार्गदर्शनास अधीन राहून, आर.के. सावंत, नाशिक यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच यापुढे जीएसटी दर वाढल्यास ठेकेदार यांना जास्तीत जास्त १८% पर्यंत वाढीव जीएसटीची रक्कम अदा करणेत यावी. मात्र जीएसटीची कमी झाल्यास त्या प्रमाणातील रक्कम ठेकेदार यांचेकडून वसूल करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०३ **बांधकाम ठेकेदार यांचे व्हॅट (VAT) व जीएसटी (GST) मधील फरकाचे अनुषंगाने ठेकेदार यांनी मागणी केलेल्या वाढीव मागणीबाबत.**

प्रस्तावना :- संस्थानमार्फत विविध कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे विवीध निर्णयानुसार ई-निविदा सूचना प्रसिध्द करुन निम्नतम (L-1) दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री साईबाबा भक्त निवास (५०० रुम) इमारतीचे उर्वरीत ३८६ खोल्यांसह नुतनिकरण करणे.:- श्री साईबाबा भक्त निवासस्थान (५०० खोल्या) इमारतीमधील उर्वरीत ३८६ खोल्या व इमारतीचे नुतनीकरणातील सिव्हील कामांसाठी रु.१२,३७,६१,६५९/- मात्र खर्चाच्या कामासाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.१७/०७/२०१७ अखेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरहु ई-निविदांचे तांत्रिक माहितीचे लिफाफे दि.०४/०८/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले असुन त्यातील कागदपत्रांची छाननी करून पात्र सात ठेकेदारांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार क्लासिक असोशिएट्स, नाशिक यांना सदरहु काम देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.७४१ खालीलप्रमाणे झाला आहे.

“.. प्रस्तावीत कामीचे निम्नतम दरधारक Klassic Associates, Nashik हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी समितीने विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली व या कामासाठी पुर्वी १२% VAT लागू होता, परंतु आता १८% जी.एस.टी. करप्रणाली लागू झालेली असल्यामुळे यामधील ६% फरकाची रक्कम मिळावी, अशी विनंती केली. तसेच त्यांनी ई-निविदेमध्ये डिफेक्ट व लायबलीटी कालावधी ६ महिन्यांचा दिला होता. तो २ वर्षाचा करण्यास सभेसमोर संमती दिली. यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील उर्वरीत ३८६ खोल्यांचे नूतनीकरण करणेकामी Klassic Associates, Nashik यांचे रु.१०,९८,२७,२९९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच त्यांचेबरोबर झालेल्या चर्चेप्रमाणे Klassic Associates, Nashik यांना ६% फरकाची रक्काम वेगळी आदा करणेत यावी व त्यांचेकडून २ वर्ष डिफेक्टालायबलीटी कालावधी घेण्यात यावा असे ठरले.”

ठेकेदार यांनी दि.१०/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वनये, दर कमी केलेले नाहीत.

२) रस्ता क्र.०५ चे उर्वरीत डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे.:- मा.व्यवस्थापन समितीचे समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५९ अन्वये, शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील रस्ते विकसित करणेत येत आहेत. या प्रकल्पातील रस्ता क्र.५ या रस्त्यांचे उर्वरीत काम पूर्ण करुन घेणेकामी ई-निविदा मागविणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार दि.१५/०५/२०१७ ते ०८/०६/२०१७ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या ई-निविदेवर मा.व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. नि. क्र. ५२४ (अ) १३ खालीलप्रमाणे झाला आहे.

“...संस्थान निधीतून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्ता क्र.०५ चे उर्वरीत काम करून घेणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s.Amol Construction & Co., Devlali Pravara यांना दराबाबत चर्चा करणेसाठी आतचे उपस्मितीसमोर बोलविणेत आले होते. परंतु सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते. यावर सविस्तबर चर्चा होवून संस्थायन निधीतून शिर्डीनगरपंचायत हद्दीतील रस्तात क्र.०५ चे उर्वरीत काम करून घेणेकामी M/s. Amol Construction & Co., DevlaliPravara यांचे एकत्रित रु.१,४२,६२,६५५.९० मात्र निम्मितम दर स्विकारण्यात येवून त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्यन करण्यातत आली. ”

त्यानुसार ठेकेदार मे.अमोल कन्ट्रक्शन ॲण्ड. कंपनी, देळाली प्रवरा यांना जा. क्र.२९२३/ २०१७ दि. ०१/०९/२०१७ अन्वये कार्यादेश देणेत आला आहे. ठेकेदार यांनी दि.०६/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वनये खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. संपूर्ण देशात दि.०१/०७/२०१७ पासून नवीन करप्रणाली सेवा व वस्तुकर (GST) लागु झालेमुळे या करप्रणालीमध्यी कार्य व कंत्राट (Works Contract) साठी नवीन करवाढ लागु झालेली आहे. या नवीन GST कराचा समावेश आपले वरील निविदेमध्ये केलेला नसल्यामुळे होणारी GST कराची फरकाची रक्कीम निविदेमध्ये समाविष्ट करणेबाबत कळविले आहे.."

३) संस्थान कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतींचे आतिल व बाहेरील रंगकाम करणेबाबत:- याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.९१ अन्वये, रु.४१,७६,२२०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू कामी दि.०१/०६/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ याकालावधीमध्ये ई-निविदा मागविणेत आल्या असून, त्यासाठी ठेकेदार सी ४ इन्फ्रास्ट्रक्च्र प्रा.लि., नाशिक यांनी रु.३६,९३,५७४.९५ मात्र निम्नतम दर देऊ केले आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.६७७ (२) खालीलप्रमाणे झालेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थातन कर्मचारी निवासस्थान साईनगर, समर्पण व साईध्यान नं.०१ व ०२ इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी सी ४ इन्फ्रास्ट्ररक्चर प्रा.लि., नाशिक यांचे दर रु.३५,००,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

ठेकेदार यांनी दि.१९/०९/२०१७ रोजीचे पत्रान्व ये, संबंधीत कामासाठीजीएसटी वेगळा मिळणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त अ. नं. ०१ ते ०३ चे कामांसाठी माहे जुलै, २०१७ पूर्वी निविदा मागविणेत आल्या आहेत. मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त विविध निर्णयानंतर, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. जीएसटी-१०१७/ प्र.क्र.८१/ कराधान-१ दि.१९/०८/२०१७ मध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

दिनांक २२ ऑगष्ट २०१७ पूर्वी स्विकृत करण्यात आलेल्या निविदा मात्र कंत्राटाकरिता Work order अद्याप न दिलेली कंत्राटे: दिनांक २२ ऑगष्ट २०१७ पूर्वी स्विकृत करण्यारत आल्या आहेत, परंतु त्या बाबत कार्यारंभ आदेश (work order) देण्यात आलेले नाहीत अशा प्रकरणांमध्ये निविदा प्रक्रियेमध्ये कंत्राटदाराने जीएसटीपूर्व करांच्या (बोज्याचा विचार करून निविदा दाखल केलेली असल्याने जीएसटी नंतरच्या कराच्या बोज्याचा त्यामध्ये विचार झालेला नाही असे गृहित धरून सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात व पुन:श्च short tender notice देवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी. तथापि, अति तात्काळ स्वरुपांच्या कामाबाबत उदाहरणार्थ (रस्यावरील खड्डे भरणे) निविदांची प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून त्यांचे कार्यारंभ आदेश देण्यात यावेत. मात्र सदर निविदा स्वीकृत करतांना जीएसटीअंतर्गत येणा-या कराचा बोजा लक्षात घेवून कंत्राटदारांशी वाटाघाटी करून दर कमी करण्याचा प्रयत्न करावा."

त्यानंतर वित्त विभाग, महाराष्ट्रच शासन यांचेकडील शासन परिपत्रक जीएसटी-१०१७/ प्र.क्र.१५५/ कराधान-१, दि. ११/०९/२०१७ अन्वये जीएसटी अंमलबजावणी नंतर शासकीय कंत्राटात होणारे बदलांबाबत दि. १९/०८/२०१७ चे परिपत्रका संदर्भात विविध विभागांनी उपस्थित केलल्या अडचणीसंदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

".. २. ...निविदा रद्द करून पुन:श्च Short Tender Notice दिल्यास निविदा प्रक्रीयेमध्ये कालापव्यय होण्याची शक्यता असल्याने सदर कालापव्यय टाळण्याकरीता विभागाने खालील मार्गदर्शक तत्वे विचारात घेवून कंत्राटदारांशी कंत्राटाच्या रकमेबाबत वाटाघाटी कराव्यात....

अ) निविदा दाखल करताना कंत्राटदार त्या दिनांकास अस्तित्वातल्या कराचा दर लक्षात घेऊन कंत्राटाची किंमत Quote करत असतात. निविदा जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर व दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ पूर्वी दाखल केली असल्यास, कंत्राटदाराने जीएसटीचा सर्वसाधारणपणे Construction Service वरील अस्तित्वातल्या कराचा दर एकत्रित १८ टक्के (९% CGST +९% SGST) लक्षात घेऊन किंमत Quote केली असेल, मात्र सदर कराचा दर दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ च्या अधिसूचना क्र.20/2017 Central Tax Rate व

20/2017 State 20/2017 अन्वये, बहुतश: शासकीय कार्यकंत्राटावर १२% (६% CGST + ६% SGST) झाला आहे. त्यामुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करावा.

तसेच वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील उपरोक्त शासन परिपत्रकाचे अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे Govt.Circular No. Sankirna-2017/ C.R.121 (Part-II)/ Building-2 Dated- 19th September, 2017 अन्वतये स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

उपरोक्त निम्नवतम दराचे ठेकेदार यांचेकडून शासन आदेशात नमूद केलेनुसार GST मुळे कार्यकंत्राटावर कमी झालेल्या कराचा दर लक्षात घेऊन किंमत कमी करण्याचा प्रयत्न करणेसाठी ठेकेदार यांचे समवेत चर्चा करुन दर कमी करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.९०३ अन्वये, उपरोक्त कामाचे ठेकेदार यांना दर कमी करणेबाबत त्यांना पुढील सभेसमोर बोलविणेत यावे असे ठरले. शासन आदेशानुसार उपरोक्त कामाचे ठेकेदार यांचेकडून माहिती मागविली असता, वरील अ. नं.०१ ते ०३ चे कामाचे ठेकेदार यांनी दर कमी करणे ऐवजी वाढीव जीएसटी रकमेची मागणी केली आहे. त्यामुळे याकामी फेर ई-निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत आहे.

प्रस्ताव:- बांधकाम ठेकेदार यांचे व्हॅट (VAT) वजीएसटी (GST) मधील फरकाचे अनुषंगाने ठेकेदार यांनी वाढीव जी. एस. टी. मागणी केली असल्याने, याकामी फेर निविदा मागविणेची कार्यवाही करणेत येत असल्याने, वरीलप्रमाणे अ. नं.०१ ते ०३ च्या कामांसाठी मागविणेत आलेल्या निविदा रद्द करणेस मा. उपसमितीचे सभेत निर्णय होऊन, मा. व्यवस्थावपन समितीकडे शिफारस करणेस निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चचा्र होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या १ ते ३ कामांसाठीचे निम्नतम दरधारक ठेकेदार जीएसटीच्या वाढीव रक्कमेची मागणी करत असल्यामुळे, सदरहूकामी नव्याने ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०४ **श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट यांना सर्व्हीस टॅक्स ऐवजी जीएसटी देणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:**

**०१.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८९०.

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ (अ) ०४.

**०३.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०३.

**प्रस्तावना**: श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी प्रकल्पाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेकामी दि.११/०३/२०१७ अखेर ऑनलाईन Request for proposal मागविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पात्र आर्किटेक्ट यांचे प्रस्तावाचा लिफाफा क्र.०२ (Commercial bid) दि.१७/०६/२०१७ रोजी उघडणेत आला असून, त्यांमध्ये Design Associates INC, Noida (U.P.) यांनी प्रकल्प किमतीवर निम्नतम १.५०% दर दिले आहेत. दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.५२४ (अ) ०४ नुसार निम्नतम दराचे आर्किटेक्ट यांचे १.३०% दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेस मान्यता दिलेली आहे.

सदरहू कामासाठी मागविलेले प्रस्तावामध्ये (RFP) सर्व्हीस टॅक्स वेगळा दिला जाईल असे नमूद करणेत आले आहे. त्यानुसार सल्लागार डिझाईन असोशिएट्स आयएनसी, नोयडा यांनी DAI/ DRL/ BD/ GEN/ 2017-18 चे पत्रान्वमये "..After rebate our quoted percentage rate will be 1.30% + Service tax /GST. GST applicable from 01/07/2017 instead of service tax." असे कळवून प्रस्ताव नमूद केलेनुसार जीएसटीची (सर्व्हिस टॅक्स) रक्कम वेगळी मागितली आहे.

प्रस्ताव:- तरी सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठी निम्नतम दराचे आर्किटेक्ट Design Associates INC, Noida (UP) यांना प्रस्तावात नमूद केलेनुसार सर्व्हीस टॅक्स ऐवजी जी.एस.टी.

देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेसाठी मा. उपसमितीचे सभेत निर्णय होऊन, मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेस निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे नं.१४८ मधील जागेत नवीन इमारतीचे बांधकामासाठीचे निम्नतम दरधारक आर्किटेक्ट Design Associates INC, Noida (UP) यांना प्रस्तावात नमूद केलेनुसार सर्व्हीस टॅक्स ऐवजी जी.एस.टी.ची रक्कम देणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०५ **समाधी मंदिर परिसर, साईउद्यान व साईनाथ मंगल कार्यालय इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या कमर्शियल ई-निविदा उघडणे.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे "* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४९ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, पहिल्या टप्प्यामध्ये समाधी मंदिर, तसेच मंदिर परिसरातील इमारती, साईउद्यान व साईनाथ मंगल कार्यालय या इमारतींचे आतिल तसेच बाहेरील भागाचे रंगकाम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने ई – निविदांची मागणी करणेस व त्याकामी अंदाजे रु.८६,६०,६१८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

*त्याचप्रमाणे यामधिल उर्वरीत साईनिवास अतिथीगृह व मध्यवर्ती भांडार या इमारतींच्या आतिल व बाहेरील भागाचे रंगकाम दुस-या टप्प्यामध्ये करुन घेण्यात यावे, असे ठरले. दुस-या टप्प्यातील इमारतीच्या रंगकामासाठी विहीत पध्दतीने ई– निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.२९,४२,५७०/- मात्रचे खर्चासही मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावना:-** समाधी मंदिर व मंदिर परिसरातील इमारती तसेच साईउदयान, साईनाथ मंगल कार्यालय, साईनिवास अतिथीगृह, मंध्यवर्ती भांडार, या इमारतीचे रंगकाम सन २००८-२००९ या वर्षी झालेले आहे. सदर रंगकामास ०९ वर्ष झालेले आहे. सततच्या वापराने रंगकाम खराब झालेले आहे. संस्थानमार्फत ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालवधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत येणार आहे. या कालावधीत देश-विदेशातुन लाखो साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येणार आहे. संस्थानमार्फत साईभक्तांना मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत संस्थान प्रयत्न करीत आहे. शिर्डी येथे साईचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांना प्रसन्न वाटावे यासाठी समाधी मंदिर व परिसरातील इमारतींचे रंगकाम करणे आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार रंगकाम करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.२६/०९/२०१७ पर्यंत ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. सदर मुदतीत एकूण खालील १० ठेकेदारांनी ऑनलाईन ई - निविदा अपलोड केल्या होत्या .

| अ.न. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १. | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान जि. सातारा |
| २. | सी – ४ इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक |
| ३. | डिसेंन्ट डेकोरेटर, चिंचवड, पुणे |
| ४. | डयुरोलॅक एमक्युलम, केरला |
| ५. | आर.के. सावंत,पंचवटी, नाशिक |
| ६. | रुद्र कन्स्ट्रक्शन, पदमपुरा, औरंगाबाद |
| ७. | मे.एस.व्ही.चंदन, वर्धमाननगर, मुंबई |
| ८. | साई एन्टरप्रायजेस, औरंगाबाद |
| ९. | सौरव डेकोरेटर्स, बिबवेवाडी, पुणे |
| १०. | श्री.डी.बी.फोपसे,वैजापूर |

उपरोक्त प्राप्त ई– निविदांचे तांत्रिक माहीतीचे लिफाफा दि०४/१०/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आलेले आहे. उघडणेत आलेल्या टेक्नीकल बीडमधील कागदपत्राची छाननी केली असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|
| १. | भिवाई कन्स्ट्रक्शन, शिंगणापूर, ता. मान जि. सातारा | अपात्र |
| २. | सी – ४ इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक | अपात्र |
| ३. | डिसेंन्ट डेकोरेटर, चिंचवड, पुणे | **पात्र** |
| ४. | डयुरोलॅक एमक्युलम, केरला | अपात्र |
| ५. | आर.के. सावंत,पंचवटी, नाशिक | **पात्र** |
| ६. | रुद्र कन्स्ट्रक्शन, पदमपुरा, औरंगाबाद | अपात्र |
| ७. | मे.एस.व्ही.चंदन, वर्धमाननगर, मुंबई | **पात्र** |
| ८. | साई एन्टरप्रायजेस, औरंगाबाद | अपात्र |
| ९. | सौरव डेकोरेटर्स, बिबवेवाडी, पुणे | **पात्र** |
| १०. | श्री.डी.बी.फोपसे,वैजापूर | **पात्र** |

उपरोक्त पात्र निविदाधारकांचे वाणिज्यीक लिफाफे (Commercial Bid) दि.०९/११/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपूढे उघडणेत आलेले आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.न.** | **निविदाधारकाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** | **निविदा टक्केवारी** | **एकूण रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १. | आर.के. सावंत,पंचवटी, नाशिक | ८६,६०,६१८.२५ | ४.२१ | ९०,२५,२३०.२८ | - |
| २. | श्री.डी.बी.फोपसे,वैजापूर | ८६,६०,६१८.२५ | -१३.७७ | ७४,६८,०५१.१२ | - |
| ३. | डिसेंन्ट डेकोरेटर, चिंचवड, पुणे | ८६,६०,६१८.२५ | ८.८२ | ९४,२४,४८४.७८ | - |
| ४. | मे.एस.व्ही.चंदन,वर्धमाननगर, मुंबई | ८६,६०,६१८.२५ | **-२७.००** | **६३,२२,२५१.३२** | **निम्नतम** |
| ५. | सौरव डेकोरेटर्स,बिबवेवाडी, पुणे | ८६,६०,६१८.२५ | -२०.०० | ६९,२८,४९४.६० | - |

वर नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसरातील समाधी मंदिर, लगतच्या इमारती, साईउदयान व मंगल कार्यालय, या इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी ठेकेदार एस.व्ही.चंदन,वर्धमाननगर, मुंबई यांचे दर निम्नतम असून, सदरचे रंगकाम त्यांचेकडून करुन घेणेकामी रक्कम रु.६३,२२,२५१/- मात्र खर्च येईल. प्रस्तावात नमूद केलेल्या इमारतींपैकी समाधी मंदिराचे आतिल भागाचे रंगकाम श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव – २०१७ निमित्त सौरव डेकोरेटर्स, पुणे यांचेकडून देणगीदाखल करणेत आलेले आहे. सदर भागाचे रंगकाम श्री साईबाबा समाधी शताब्दी (पुण्यतिथी) उत्सव २०१८ पुर्वी ठेकेदार मे.एस.व्ही.चंदन,वर्धमाननगर, मुंबई यांचेकडून निविदा दरात करुन घेता येईल.

**प्रस्ताव**:- सदर निम्नतम निविदेचा देकार हा अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा १०% पेक्षा अधिक दराचा असल्याने महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएटी२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.१२/०४/२०१७ चे कलम ४.६ अन्वये ठेकेदार एस.व्ही. चंदन, मुंबई यांचेकडून अंदाजपत्रकीय किंमतीचे१८% प्रमाणे होणारी रक्कम रु.१५,५८,९११/- एवढया किंमतीची बॅकेची प्रतीपुर्ती हमी घेणे आवश्यक आहे. तरी मंदिर परिसरातील समाधी मंदिर, लगतच्या इमारती, साईउदयान व मंगल कार्यालय या इमारतींचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी ठेकेदार एस.व्ही.चंदन, वर्धमाननगर, मुंबई यांचे निम्न्तम दरानुसार येणारे रक्कम रु.६३,२२,२५१/- मात्रचे खर्चास व याकामी त्यांचेकडून वर नमूद किंमतीची बॅकेची प्रतीपुर्ती हमी प्राप्त झालेनंतर त्यांना कार्यादेश देणेसाठी मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर परिसर, साईउद्यान व साईनाथ मंगल कार्यालय इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेकामी प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामधील मे.एस.व्ही.चंदन, वर्धमाननगर, मुंबई यांचे एकत्रित रु.६३,२२,२५१/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच समाधी मंदिरामधील रंगकाम देणगीदार साईभक्ताने, देणगी स्वरुपात करुन दिलेले आहे. याकरीता समाधी मंदिराच्या रंगकामाचे दर स्विकारणेत यावे. परंतु आवश्यकतेनुसार कालांतराने सदरहू रंगकाम करुन घेण्यात यावे तसेच दि.१२/०४/२०१७ रोजीच्या**

**शासन निर्णयानुसार त्यांचेकडून अंदाजपत्रकीय किंमतीचे १८% प्रमाणे होणारी रक्कम रु.१५,५८,९११/- मात्र किंमतीची बॅंकेची प्रतीपुर्ती हमी घेणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

०६ **संस्थानमधील विविध विभागांच्या दैनंदिन झेरॉक्स कामासाठी झेरॉक्स मशिन खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उघडणे.**

संस्थानचे दैनंदिन झेरॉक्सच्या कामासाठी खालील वर्णनाचे/क्षमतेचे दोन नग अद्यावत, नामांकित कंपनीचे झेरॉक्स मशीन मागील मंजुर दराने खरेदी करणेस अथवा विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | वर्णन/क्षमता | मागणी |
|---|---|---|---|
| ०१. | Digital Multifunctional Copier- Machines | **55PPM,** Print – **600 X 600dpi**, Copy/Print/Scan, DADF Duplex, 100 Sheet bypass, 400 Sheet OCT, 4 X 500 Sheet Trays, | ०२ नग |

त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०८.०९.२०१७ चे सभेत निर्णय क्र.७६० पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानचे दैनंदिन झेरॉक्स कामासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे ०२ नग अद्यावत झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली".*

सदर खरेदीकामी अंदाजे रु.७,००,०००/- किंवा त्यापेक्षा जादा खर्च अपेक्षित असल्याने शासन नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. शासन नियमावलीनुसार ई-निविदेची फी रु.२,०००/- मात्र व बयाणा रक्कम रु.१०,०००/- मात्र ठेवणेत येऊन सोबत तांत्रिक निविदेमध्ये दुकान नोंदणी दाखला, GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा GST क्रमांक पावती, पॅनकार्ड, कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबत प्रमाणपत्र तसेच निविदा फी व बयाणा रक्कमचे UTR Number/बॅंक भरणा पावती इ. कागदपत्रे ऑनलाईन स्कॅन करुन मागणी करण्यात आलेले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

| अ.नं. | कार्यवाहीचा तपशिल | दिनांक/ कालावधी |
|---|---|---|
| ०१. | वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दी | दि.१४/१०/२०१७ |
| ०२. | वेबसाईटवर ई-निविदा प्रसिध्द करण्याची दिनांक व वेळ | दि.१४/१०/२०१७ सकाळी ११.०० वा. |
| ०३. | ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम दिनांक व वेळ | दि.२४/१०/२०१७ सायं.०५.०० वा. |
| ०४. | तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक (खरेदी समितीचे सभेत) | दि.३१/१०/२०१७ |
| ०५. | मुळ निविदा उघडण्याची दिनांक (खरेदी समितीचे सभेत) | दि.०९/११/२०१७ |

सदर खरेदीकामी एकुण ०४ निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर निविदेमधील तांत्रिक निविदा दि.३१.१०.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या होत्या. त्यातील कागदपत्रांची पडताळणी केली असता, सर्व निविदाधारक पात्र ठरलेले होते. त्यामुळे ०४ निविदाधारकांच्या निविदेतील वाणिज्यीक (Commercial) निविदा दि.०९.११.२०१७ रोजीचे सभेत उघडण्यात आल्या. त्यातील दरांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | मागणी | ओम साई मार्केटींग, औरंगाबाद | इंडिग्रेटड सिस्टीम, नाशिक | केसेरॉ डॉक्युमेंट सोल्युशन इं.प्रा. लि., नाशिक | जय श्री सेल्स कार्पोरेशन, नांदेड |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर प्रती नग सर्व करांसहित | | | |
| ०१. | **Digital Multifunctional Copier-Machines** **55PPM,** Print – **600 X 600dpi**, Copy/ Print/ Scan, DADF Duplex, 100 Sheet bypass, 400 Sheet OCT, 4 X 500 Sheet Trays, | ०२ नग | ३,७१,२००/- | ४,९४,०८०/- | **३,६८,८००/-** | ४,९९,२००/- |

उपरोक्त तक्यातील तुलनात्मक तपशिलाचे अवलोकन करता मे.केसेरॉ डॉक्युमेंट सोल्युशन इंडिया प्रा.लि., यांचे प्रति नग रु.२,६८,८००/- मात्र हे दर न्युनतम आहेत. न्युनतम दराने दोन मशिन खरेदी केल्यास रक्कम रु.५,३७,६००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर न्युनतम दरधारक मे.केसेरॉ डॉक्युमेंट सोल्युशन इंडिया प्रा.लि. यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन, सामान्य प्रशासन विभागास आवश्यक ०२ नग झेरॉक्स मशिन खरेदीकामी अंतिम निर्णय होणेस व येणारे एकुण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील विविध विभागांच्या दैनंदिन झेरॉक्स कामासाठी झेरॉक्स मशिन खरेदी करणेकामी मे.केसेरॉ डॉक्युमेंट सोल्युशन इंडिया प्रा.लि., नाशिक यांचे प्रति नग रु.२,६८,८००/- सर्व करांसहीत मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना ०२ नग झेरॉक्स मशिनचा पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, झेरॉक्स विभाग)

---

०७ **सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद बनवुन पॅकींग करणेकरीता नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी प्राप्त ई-निविदांमधील Commercial Bid उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक-** श्री साईभक्तांना प्रसादरुपी वितरण करण्यात येणारे मोतीचुर लाडु, मंदिर दर्शन रांगेत वाटप करण्यात येणारी सुटी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात व अन्नपाकीटामध्ये मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसाद बनविणेकामी सन २०१७-१८ करीता ऑनलाईन फेर ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार खालील तपशिलाप्रमाणे एकुण चार ई निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. श्री जोशी केटर्स, व्दारा श्री शंकर दयारामजी जोशी, श्रीरामपुर
२. रणजीत हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस, व्दारा श्री प्रमोद रामचंद्र सोनवणे,पुणे
३. श्री साई केटरर्स, व्दारा शकुंतला नामदेव शिंदे, श्रीरामपूर
४. दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, व्दारा सौ.संगिता अनिल दशपुते , नासिक

उपरोक्तप्रमाणे संस्थानला प्राप्त झालेल्या चारही निविदाधारकांच्या ई निविदांचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.३१/१०/२०१७ रोजी खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात आली आहेत. त्यामधे प्राप्त झालेल्या चारही ई- निविदा पात्र ठरल्या आहेत.

आता सदरहु चारही निविदाधारकांचे व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) खरेदी समितीच्या दि.०९/११/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडून न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास सन २०१७-१८ करीता कार्यादेश देता येईल.

उपरोक्तप्रमाणे चारही निविदाधारकांचे व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) आजचे दि०९/११/२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर व उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे—

| अ.नं | तपशील | श्री जोशी केटर्स, श्रीरामपुर | रणजीत हॉस्पिटॅलिटी सर्व्हीसेस,पुणे | श्री साई केटरर्स, श्रीरामपुर | दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक |
|---|---|---|---|---|---|
| **निविदेमधील दर रूपये** | | | | | |
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू ) हाताने पॅकिंग करणे | ५०८/- | ४३९/- | **२७०/-** | ३६८/- |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग लाडूस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू ) मशिनने पॅकिंग करणे | ४९४/- | ३३९/- | **२२०/-** | ३३२/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकेट) हाताने पॅकिंग करणे | ५०८/- | ४५९/- | **२८८/-** | ३८६/- |
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ.चा दर प्रती १००० नग पाकिटास (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकेट) मशिनने पॅकिंग करणे | ४९४/- | ३४९/- | **२२०/-** | ३६८/- |
| ५ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | २५००/- | ७४९/- | ३१५/- | **२७८/-** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** तरी सन २०१७-१८ मध्ये साईभक्तांना प्रसादरूपी वितरण करण्यात येणारे व मोतीचुर बुंदीचे लाडू, मंदीर दर्शन रांगेतील मोफत वाटण्यात येणारी सुट्टी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात मिष्ठान्न म्हणुन बनवुन देण्यात येणारी बर्फी बनविणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व आधोरेखीत केलेले न्युनतम दरधारकाबरोबर झालेल्या चर्चा वाटाघाटीन्वये, निर्णय होऊन त्यानुसार कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू, सुट्टी बुंदी व बर्फी प्रसाद बनवुन पॅकींग करणेकरीता नवीन ठेकेदाराची नेमणूक करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. उपसमिती सभेने त्यांचेबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक यांनी बर्फी प्रसाद बनविणेकामी प्रति क्विंटल रु.२७०/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता मोतीचुर लाडू व सुट्टी बुंदी बनवुन पॅकींग करणेकरीता श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांचे प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. तसेच बर्फी प्रसाद तयार करणेकामी दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक यांचे प्रति क्विंटल रु.२७०/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची होती.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना, श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांनी बयाना रक्कम संस्थान खात्यात जमा न केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निविदा उघडण्याची कार्यवाही सदोष झालेली आहे. याकरीता सदर ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फीप्रसाद निर्मिती विभाग)

---

०८ **मंदिर विभागाकरीता नॉन वोवन कापडी पिशवी खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदांमधील Commercial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे मंदिर विभागासाठी नॉनवोवन कापडी पिशव्या खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.०२०१७ सभेत रक्कम रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

वरील निर्णयास अनुसरुन ऑनलाईन ई-निविदा मागविन्यात आल्या होत्या. यामध्ये पाच ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर ५ निविदाधारकांच्या तांत्रीक निविदा (Technical Bid) दि.३१.१०.२०१७ रोजी उघडण्यात आल्या होत्या. यापैकी ४ निविदाधारक तांत्रीक निविदेमध्ये पात्र ठरले होते. सदर पात्र ४ निविदाधारकांचे Commercial Bid दि.०९.११.२०१७ रोजी मा.खरेदी समिती सभेत उघडण्यात आलेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| Sl.No | Description of Work/ Item(s) | No.of Qty | Units | CLASSIC STATIONERS, CO. | ASPIRE INDIA FACILITY SERVICES PRIVATE LIMITED | **sai agro nonwoven fabrics** | Shree Padmavati Enterprises |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | **Rate** | Rate |
| 1.00 | कापडी पिशवी- नॉन वोवन– छपाईसह (सत्यनारायण पुजेकरीता) साईज- १०"X१२", गेझ– ६० gsm (As Per Matter enclosed) | 100000.00 | Nos | 6.25 | 4.48 | **2.50** | 7.10 |
| 2.00 | कापडी पिशवी- नॉन वोवन– छपाईसह (मान्यवर सत्कारासाठी) साईज- १२"X१६", गेझ– ६० gsm (As Per Matter enclosed) | 100000.00 | Nos | 7.45 | 5.25 | **3.50** | 8.52 |
| 3.00 | कापडी पिशवी - नॉन वोवन– छपाईसह (मान्यवर सत्कारासाठी) साईज - १५"X१८", गेझ– ६० gsm (As Per Matter enclosed) | 25000.00 | Nos | 9.35 | 7.05 | **4.40** | 10.53 |

तरी उपरोक्त Online प्राप्त तुलनात्मक तक्त्यांतील गडद व अधोरेखित केलेल्या न्युनतम दराबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**मंदिर विभागाकरीता नॉन वोवन कापडी पिशवी खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक साई ॲग्रो नॉनवोवन फॅब्रीक्स हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. एकूण खरेदीवर त्यांचे रु.७,१०,०००/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले होते. चर्चेअंती त्यांनी एकूण रकमेमध्ये रु.१०,०००/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागाकरीता नॉन वोवन कापडी पिशवी खरेदी करणेकामी साई ॲग्रो नॉनवोवन फॅब्रीक्स यांचे चर्चेअंतीचे एकत्रित रु.७,००,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०९ नोव्हेंबर-डिसेंबर २०१७ महिन्यांसाठी गाईचे शुद्ध तुप खरेदी.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ चे निर्णयाप्रमाणे, दोन महिन्यांसाठी १५०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप खरेदी करण्यासाठी दिनांक ०७.११.२०१७ पर्यंत दोन लिफाफा पद्धतीने दरपत्रके मागविण्यात आली होती.

याकामी मुदतीत खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

१. कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर
२. गोदावरी नामदेवरावजी परजणे पाटिल तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव
३. एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., संगमनेर
४. इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी
५. सावत्ता फुड प्रॉडक्ट, दमण

६. प्रभात डेअरी लिमीटेड, टिळकनगर
७. समप्राश फुड्स लि., अलिगड
८. स्टर्लिंग ॲग्रो इंडिया लिमीटेड, ग्वालियर
९. व्ही.एस.पी.कॉर्पोरेशन, मुंबई
१०. अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले
११. गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण
१२. मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रो.प्रा.लि., निघोज, ता.पारनेर
१३. चरणामृत डेअरी ॲण्ड फुड प्रॉडक्टस् उमरगांव, जि. वलसाड, गुजरात
१४. श्री श्री मिल्क ॲण्ड फुड प्रॉडक्टस्, पुणे

**नोव्हेंबर-डिसेंबर २०१७ महिन्यांसाठी १५०० क्विंटल गाईचे तुप खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या १४ दरपत्रकांचा तांत्रिक लिफाफा क्र.१ आजचे सभेत उघडण्यात येऊन त्याची छाननी केली असता, यामध्ये १४ दरपत्रकधारक पात्र ठरले. त्यानंतर पात्र १४ दरपत्रकधारकांचा कमर्शियल लिफाफा क्र.२ उपस्थित दरपत्रकधारकांसमोर उपसमिती सभेत उघडण्यात येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला.**

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नाव | ब्रॅण्ड | दरपत्रकामधील मुळ दर प्र.क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापुर जिल्हा दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापुर | गोकुळ | ४५,४००/- |
| २ | गोदावरी नामदेवरावजी परजणे पाटिल तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव | गोदावरी | ३९,०००/- |
| ३ | एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., संगमनेर | गगणगिरी | ४२,६६६.६७ |
| ४ | इंदापुर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स लि., गोखळी | सोनाई | ३९,२९०/- |
| ५ | सावत्ता फुड प्रॉडक्ट, दमण | सावत्ता | ३७,८००/- |
| ६ | प्रभात डेअरी लिमीटेड, टिळकनगर | प्रभात | ३९,६००/- |
| ७ | समप्राश फुड्स लि., अलिगड | समप्राश | ३८,५००/- |
| ८ | स्टर्लिंग ॲग्रो इंडिया लिमीटेड, ग्वालियर | करमास | ३९,२००/- |
| ९ | व्ही.एस.पी.कॉर्पोरेशन, वलसाड | सुभाग | **३४,८७२/-** |
| १० | मे.अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले | अगस्ती | ४२५० + १२% जीएसटी |
| ११ | गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा.लि., फलटण | गोविंद | ४६,२००/- |
| १२ | मळगंगा मिल्क ॲण्ड ॲग्रो प्रो.प्रा.लि., निघोज, ता.पारनेर | कन्हैय्या | ४१,८९९/- |
| १३ | चरणामृत डेअरी ॲण्ड फुड प्रॉडक्टस् उमरगांव, जि. वलसाड, गुजरात | मधुर | ३९,४००/- |
| १४ | श्री श्री मिल्क ॲण्ड फुड प्रॉडक्टस्, पुणे | अभिरा | ४५,०००/- |

**यामध्ये अ.नं.१० चे मे.अमृतसागर सहकारी दुध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित, अकोले यांनी रु.४,२५०/- + GST असे दर दिले होते. यामध्ये चुकून एक शुन्यनमुद करण्याचा राहीला आहे. असे त्यांनी सभेत सांगितले होते. त्यामुळे आमचे दर रु.४२,५००/- प्रती क्विंटल असे विचारात घेणेची विनंती केली होती, ती सभेने मान्य केली.**

**यानंतर तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांचेशी चर्चा केली असता, त्यांनी TTD देवस्थान, तिरुपती व सिद्धीविनायक देवस्थानला सध्या तुप पुरवित असल्याचे समक्ष सांगितले व TTD देवस्थानने दिलेला पुरवठा आदेश ई-मेलव्दारे सादर केला, त्याची नोंद घेण्यात आली.**

**राज्यातील पुरवठाधारकांना प्राधान्य या सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतूद क्र.३.१.२.८ नुसार राज्यातील निम्नतमदरधारक मे. गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटिल तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव (दरपत्रकामधील दर रु.३९,०००/- मात्र प्रती क्विंटल) यांना**

**एकुण पुरवठा आदेशाच्या ५०% क्वांटिटी इतके तूप, या प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकाचे प्रती क्विंटल रू.३४,८७२/- या दरामध्ये संस्थानला तूप पुरविणेची तयारी आहे का? याबाबत मा.उपसमितीने विचारणा केली असता, त्यांनी निम्नतम दरधारकाच्या दरामध्ये ५०% म्हणजेच ७५० क्विंटल तूप पुरविणेची तयारी दर्शविली आहे व तसे ते पत्र देणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला तूपाची तातडीने गरज असल्यामुळे मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांनी दरपत्रकासोबत सादर केलेला नमुना NABL लॅबकडून तपासणी करुन घेऊन त्याचा रिपोर्ट FSSAI Norms प्रमाणे असल्यास त्यांना १५० क्विंटल तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश त्वरीत देण्यात यावा. तसेच त्यांच्या प्लॅन्टचे Vendor Audit ची तारीख निश्चित करणे, पुढील पुरवठा आदेश देणे व मे.गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगाव यांना सुधारीत नियमावलीतील तरतुदीनुसार ५० टक्के तूप पुरवठा आदेश देणे या सर्व बाबींबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत निर्णय घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस होती.**

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना असे ठरले की, गाईचे तुप पुरवठा करणाऱ्या मे.व्हीएसपी कॉर्पोरेशन, उमरगाव, जि.वलसाड (गुजरात) यांच्या प्लँटचे संस्थान अधिकाऱ्यांसह व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष व समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी इन्सपेक्शन करावे व त्यानंतर उर्वरित पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**दरम्यानचे कालावधीत खराब तुपाचा पुरवठा झालेबाबत, स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांना नोटीस देण्यात आलेली होती. या नोटीसीच्या खुलाशासाठी ते या चर्चेच्या वेळी सभेमध्ये उपस्थित होते, त्यांनी सभेस विनंती केली की, मला पुर्ववत पुरवठा आदेश देण्यात यावा. यावर सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीमध्ये समावेश करणेची अट शिथील करणेत येऊन, यापुढील गाईचे तुप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रकियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी, असे समितीने ठरविले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१० मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे शिफारस केल्या.**

**(अ)** डॉ.राम चिलगर, प्लास्टीक सर्जन, औरंगाबाद हे आजचे सभेमध्ये उपस्थित होते. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे प्लास्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करण्याचा आमचा मानस असून त्याबाबत संस्थानने सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी सभेसमोर केली व तसे लेखी पत्र दिले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.राम चिलगर, प्लास्टीक सर्जन, औरंगाबाद यांचे सहयोगाने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अनुशंगाने श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे प्लास्टीक सर्जरी शिबीराचे आयोजन करणेकामी येणाऱ्या खर्चाचा सविस्तर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालिका, श्री साईनाथ रुग्णालय)

---

**(ब)** वार्षिक भाजीपाला खरेदी प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.जे.के.आलु भंडार, राहाता यांनी भाजीपाल्यामधील कांदा पुरवू शकत नसलेबाबत संस्थानला लेखी स्वरुपात कळविलेले आहे व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर केलेला आहे. या प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत, मे.जे.के.आलु भंडार, राहाता यांची यापुर्वीच्या खरेदीची बीले आदा करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **दिनांक १३.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१००५** दिनांक १३.११.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्य/ On Consignment साहित्य (Part "A"व"B") खरेदीकामी तिस-यांदा दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीकामी दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावास अनुसरुन दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२४/०३/२०१७ ते दि.१५/०४/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या, तसेच शासन नियमानुसार दि.२४/०४/२०१७ पर्यंत पहिल्यांदा व दि.०१/०५/२०१७ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात येऊन तांत्रिक सिलबंद निविदा (Hard Copy) दि.०५/०५/२०१७ पर्यंत स्विकारण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या १४८ तांत्रिक सिलबंद व ऑनलाईन निविदा दि.११/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करुन वित्त विभाग व अंतर्गत लेखापरिक्षण विभाग यांचेकडून तपासून घेण्यात आलेला असून पात्र १०० ऑनलाईन कमर्शिअल ई– निविदा दि.०७/०६/२०१७ रोजी खरेदी समिती सभेपुढे पुरवठाधारकांचे समक्ष उघण्यात येऊन PART "A" व "B" एकुण ३०३६ आयटम पैकी ७५३ आयटमकरीता एकुण ५१ पुरवठाधारकांना दि.२५/०७/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयान्वये पुरवठा आदेश देण्यात आलेले असून उर्वरीत २२८३ आयटमकरीता फेर ई-निविदा / कोटेशन मागविण्यास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.१४/०७/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.२४/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या, त्यास अनुसरुन १४१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या, परंतु जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली त्यास अनुसरुन एकुण १६१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या, प्राप्त झालेल्या १६१ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडून ई-निविदेतील तांत्रिक बाबी वित्त विभागामार्फत तपासून घेण्यात आलेल्या असून प्राप्त तांत्रिक बाबींचे तक्त्यानुसार एकुण ४३ पार्टपैकी पार्ट नं.१९ करीता एकुण ०७ निविदाधारकांपैकी ०३ निविदाधारक तांत्रिक बाबी प्रमाणित असल्यामुळे त्यांच्या कमर्शियल बाबींच्या निविदा दि.०६/०९/२०१७ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून उर्वरीत ४२ पार्टमधील आयटमकरीता फेर ई-निविदा मागविण्याकामी दि.२९/०९/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.११/१०/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक सन २०१७-१८ या वर्षाकरिता लागणारे औषधे / सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली असुन त्यास अनुसरुन प्राप्त (पार्ट A व B मिळून) एकुण १०७ Online ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. दि.०३.११.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष प्राप्त १०७ तात्रीक ई-निविदा उघडण्यात आलेल्या होत्या. यातील कागदपत्रांची खरेदी विभाग,

वित्त विभाग तसेच संस्थानचे लेखाशाखेमार्फत छाननी केली असता १६ निविदाधारक अपात्र ठरले आहेत. तर ९१ निविदाधारक पात्र ठरले आहेत. यांमधील पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड दि.०९.११.२०१७ उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. सदर तुलनात्मक तक्ताचे अवलोकन करता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. Online प्राप्त दरांमध्ये ब-याच औषधे/सर्जिकल साहित्यासाठी एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. परंतू सदरची ई-निविदा प्रक्रिया ही तिस-यांदा राबविल्यामुळे व शासकीय नियमानुसार तसेच रुग्णालयातील औषधे

साठ्याच्या तुटवडयाचा विचार करता प्राप्त झालेल्या एकाच निविदाधारकाचे दर स्विकारावेत अशी शिफारस करण्यात येत आहे.तसेच प्राप्त निम्नत्तम दर हे दोन्ही निविदाधारकांचे सारखेच असल्यास त्याठिकाणी दोन्ही निविदाधारकांना ५० % मागणी विभागुन सारखेच प्रमाणात मागणीची शिफारस केलेली आहे.

२. Inj. Anti Hemophilia factor कामी निविदा प्राप्त न झाल्यामुळे सध्या Baxter, Reliance अथवा उपलब्ध कंपनींचे इंजेक्शन दि. ०८/०९/२०१५ निर्णय क्र. ३१२ अन्वये मे. हिमोफिलीया सोसायटी नाशिक यांचेकडून खरेदी करणेत येत होते त्यानुसार मागील मंजुर दर रु.१०/- अथवा त्यापेक्षा कमी दराने ज्याकंपनीचे उपलब्ध होईल ते खरेदी करावे अशी शिफारस करण्यात येत आहे.

३. Gauze Radiopaque-Qty.३८७०, R/O Spongs- Qty.8675, Adhesive Roll- Qty.9056 व Paediatric Triple Lumen- Qty.730 ची वार्षिक मागणी ही वापरणा-या डॉक्टरांकडून जास्त आलेली असल्याने त्याचा खप पाहता ती फारच जास्त असून त्याकामी सदर ई-निविदेमध्ये प्राप्त निम्नत्तम दरान्वये निविदाधारकास विचारणा केली असता त्यांचे मतानुसार जास्तीच्या मागणीमुळे पुरवठा धारकास जास्तीची सुरक्षा रक्कम वर्षाभरासाठी संस्थानकडे भरावी लागत असल्यामुळे पुरवठा धारकांचे आर्थिक नुकसान होत असल्यामुळे निविदाधारक देखील सदरची मागणी कमी करण्यास तयार असल्यामुळे उपरोक्त Item ची मागणी Gauze Radiopaque-Qty.१०००, R/O Spongs-Qty.५०००, Adhesive Roll- Qty.५००० व Paediatric Triple Lumen- Qty.२०० याप्रमाणे कमी करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. Liquid Microbicidal Hand Wash Soap (Like Hitmax/Bactoline) व Multienzymatic detergent for Automated systems & manual cleaning (Like- cleanzyme/cidzyme extra) ची मागणी केली होती त्यानुसार सदरकामी प्रत्येकी तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहे परंतु प्रत्यक्षात आपली मागणी पाहता दैनंदिन वापरासाठी Hitmax व Clenzyme ची मागणी करण्यात आलेली होती तसेच Cardiac surgery साठी Bactoline व Cidzyme extra ची मागणी करण्यात आली होती त्यामध्ये तिस-या निविदाधारकांनी दिलेले Item हे आपल्या मागणीप्रमाणे नसल्याने त्यानुसार त्यांचे दरांचा विचार न करता उर्वरीत दोन निविदाधारकांना ५० % मागणी विभागुन खरेदीची शिफारस केलेली आहे.

५. खालील औषधांची आपली मुळ मागणी पाहता प्राप्त निम्नत्तम दर हे दुस-या कुठल्यातरी Item साठी दिलेले असून ते आपल्या Specification प्रमाणे नसल्यामुळे त्याठिकाणी आपले Specification नुसार प्राप्त दुस-या क्रमांकाचे प्राप्त निम्नत्तम दर घेण्याची शिफारस केलेली आहे.

| Sr. No. | Name of Item | Reason for Rejection Item |
|---|---|---|
| 1 | Cath-Mount | निम्नत्तम दर हे Suction Catheter चे आहे. |
| 2 | Gauze Radiopaque | प्राप्त निम्नत्तम दरांचे M/s. Disha कंपनीचे मटेरिअलची सन २०१३-१४ मध्ये वारंवार लेखी स्वरूपात तक्रार आलेली आहे त्यामुळे त्यांचे दराचा विचार करण्यात आलेला नाही. |
| 3 | Bododex forte | प्राप्त निम्नत्तम दरांचे Item मधील असलेले Contain आपले मागणी प्रमाणे नाही. |
| 4 | Shoes for O.T. & I C U staff | प्राप्त निम्नत्तम दर हे दुस-या वेगळयाच Item चे असून त्याबाबत निविदाधारकाने चुकीचे भरल्याबाबत कळविले आहे. |
| 5 | Disp.bag (Trush bag) for biomedical waste yellow, Blue, Red | सदरकामी प्राप्त निविदाधारकांचे दर हे Govt. rule प्रमाणे 50 Micron व ISO नामांकित नसल्याने त्यानंतर प्राप्त दर Govt. rule नुसार घेण्याची शिफारस केलेली आहे. |
| 6 | Sonography paper roll (USG) size 110mm X 18mm Type V/100 | प्राप्त निम्नत्तम दर हे आपले मागणीचे size प्रमाणे नसून निविदाधारक त्याबाबत समक्ष येऊन चुका मान्य केल्याने त्यानंतर प्राप्त निम्नत्तम दरांची शिफारस केलेली आहे. |
| 7 | Iomeron 400 mg 100 ml | प्राप्त निम्नत्तम दर हे आपले मागणी 400mg प्रमाणे नसल्याने त्यानंतर प्राप्त निविदाधारकांचे दर आपले मागणीप्रमाणे असल्याने तेथे त्याची शिफारस केलेली आहे. |

६. Foldable Cap व Mask साठी आपण Packing चे दराची मागणी केली होती परंतु प्रत्यक्षात M/s. Displayer, Mumbai यांनी प्राप्त निन्मतम दर हे प्रती नगाप्रमाणे दिल्याने ते स्विकारल्यास त्याठिकाणी साठा करुन ठेवणे व जुळवणे शक्य होणार नाही. तसेच आपले मागणीनुसार प्राप्त निम्नत्तम दर हे M/s. Displayer, Mumbai यांचे असून त्यांना प्रती नगाचे प्राप्त दरानुसार Packing चे दर देणार का ? याबाबत विचारणा केली असता ते त्या दराने देण्यास तयार असल्याने त्यामध्ये सदर निविदाधारकाने दिलेले प्रती नगाचे दर Packing मटेरिअल स्विकारण्याची शिफारस करण्यात येत आहे.

७. पार्ट B On Consignment items करीता Permanant Pacemaker करीता St. Jude कंपनीच्या VVI, VVIR, व DDDR साठी प्राप्त निन्मतम दर तथा Valve कामी सुध्दा प्राप्त निन्मतम दराने खरेदी करण्याची व इतर उर्वरीत सर्व Consignment items साठी प्राप्त निन्मतम दराची शिफारस करण्यात येत आहे.

८. प्राप्त निविदाधारकांमध्ये काही जुने पुरवठाधारक व कांही नविन पुरवठाधारकांचे निन्मतम दर प्राप्त झालेले असुन आपला मागील अनुभव पाहता संस्थानचे ई-निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रथम टप्प्यातील मालाचा पुरवठा हा आदेश दिलेनंतर २१ दिवसात पुर्ण करावयाचा आहे. परंतु प्रत्यक्षात कांही पुरवठाधारक हे विहित मुदतीत मालाचा पुरवठा करत नसल्याने आपले मुदतीत मटेरियल न दिल्यास सदर पुरवठाधारकाचे मटेरीयल हे इतर ब्रॅण्डेड कंपनीचे बाजारभावाने खरेदी करणेत येऊन त्यासाठी लागणारी जास्तीची रक्कम ही सदर पुरवठाधारकाच्या देय असलेल्या कुठल्याही बीलातुन किंवा सुरक्षा रकमेतून वसुल करण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे.

९. बरेच औषधे/सर्जिकल साहित्यांची वार्षिक मागणी ही वार्ड/विभागाने दैनंदिन खपानुसार केलेली असते परंतु विविध संसर्गजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे तसेच विविध प्रकारचे शिबीर आणि रुग्णांच्या दिवसेंदिवस वाढत्या गर्दीमुळे अथवा नवीन डॉक्टर संस्थान सेवेत रुजू होत असतात, त्यामुळे दिलेलीमागणी कमी पडते. त्यासाठी वारंवार मंजुर दराने अतिरिक्तमागणीसाठी मंजुरी घ्यावी लागते. त्यासाठी बराच कालावधी लागतो. तसेच त्या साहित्याचा त्या कालावधीत तुटवडासुध्दा निर्माण होऊन, रुग्णांची गैरसोय होते. तसेच आपणाकडे राजीव गांधी योजने अंतर्गत रुग्णांच्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया होऊन, त्या रुग्णांना सर्वच औषधे मोफत पुरवावी लागतात. जर औषधांचा तुटवडा असल्यास राजीव गांधी अंतर्गतचे रुग्ण नाराजी व्यक्त करतात, तसेच काही रुग्ण वरिष्ठांकडे तक्रारी करतात. कधी कधी सदरच्या औषधाच्या तुटवड्यामुळे वर्तमानपत्रात बातम्या येऊन, संस्थानबाबत गैरसमज निर्माण केला जातो. बहुतांशी वेळा त्या वर्षासाठी मंजुर असलेल्या आर्थिक तरतुदींच्या रक्कमेच्या प्रमाणात खरेदी न होता कमीत कमी १०% ते २०% रक्कम शिल्लक राहाते. अशा परिस्थितीमध्ये वेगळी मंजुरी न घेता, तातडीची गरज पाहाता व रुग्णांची गैरसोय टाळणेसाठी सदरच्या शिल्लक बजेट तरतुदींमधून मंजुर दराने अतिरिक्त नग संख्या वाढवून शासकीय नियमावली ३.३.२ पुनर्प्रत्ययी आदेश :- पुर्वी दिलेल्या आदेशाच्या संदर्भात पुनर्प्रत्ययी आदेश, सुरवातीचा आदेश दिल्यानंतर सहा महिन्याच्या कालावधीच्या पुर्वी देता येईल. पुनर्प्रत्ययी आदेश देताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

(अ) पुनर्प्रत्ययी आदेश फक्त एकदाच देता येईल आणि त्याचे मुल्य आणि संख्या सुरवातीच्या आदेशाच्या ५०% किंवा रूपये दहा कोटी (रू. १० कोटी) यापैकी जे कमी असेल, त्यापर्यंतची खरेदी कराता येईल.

त्यानुसार औषधांच्या खरेदीचा प्रस्ताव मा.वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१०. प्राप्त निविदाधारकांचे निम्नतम दरान्वये शिफारस केलेल्या औषधे/सर्जिकल साहित्य व्यतिरिक्त ज्या औषधे/ सर्जिकल साहित्याकामी दर प्राप्त झालेले नाहीत. त्या औषधे/सर्जिकल साहित्यासाठी आपणामार्फत ठरविलेली किमंतीनुसार ज्या प्रत्येकी औषधे/ सर्जिकल साहित्याची (Itemची) एकुण किमंत रु.३ लाखापेक्षा कमी आहे असे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी शासकीय नियमावलीनुसार दरपत्रक मागणी करुन खरेदी करता येईल. त्यासाठी विविध वर्तमानपत्र, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच विविध पुरवठाधारकांना मागणीपत्र पाठवून तसेच दुरध्वनीवरुन व ई-मेलव्दारे अवगत करुन खरेदी केल्यास त्यात पारदर्शकता येईल, असे मत आहे तसेच ज्या प्रत्येकी औषधे/सर्जिकल साहित्याची एकुण किमंत रु.३ लाखापेक्षा जास्त आहे ते विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करता येईल. यामुळे रुग्णालयासाठी लवकरात लवकर औषधे/सर्जिकल साहित्य उपलब्ध होऊन रुग्णांची गैरसोय टाळता येईल असे मत आहे.

वरील सर्व बाबींची शिफारस करण्यात येऊन, प्राप्त निम्नतम निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन घेतल्यास बाजारभावापेक्षा कमी दराने साहित्य प्राप्त होऊन, संस्थानला जास्तीत जास्त आर्थिक फायदा होऊन, खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता निर्माण होईल.

**विभागाचा अभिप्राय–** वरील सर्व बाबींचा विचार करता निम्नतम दर स्विकारुन, नामांकित कंपनींची औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी केल्यास रुग्णांच्या दृष्टीने फायद्याचे होईल असे नम्र मत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्य/ On Consignment साहित्य (Part "A"व"B") खरेदीकामी निम्तनम दरधारकांकडून प्राप्त झालेल्या अंतीम दरांचा तक्ता तयार करणेत येऊन, तो सोबत सादर करणेत आला व या खरेदी प्रक्रियेच्या अनुशंगाने खालीलप्रमाणे शिफारशी, या उपसमितीने केल्या, त्या मान्य करण्यात येऊन, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी, असे ठरले.**

1. ज्या औषधे/ सर्जिकल साहित्यासाठी तिसऱ्यांदाही एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत. ते स्विकारणेत यावे. तथापि, प्राप्त झालेले दर वाजवी/ योग्य असलेबाबत वैद्यकिय संचालक व खरेदी व्यवस्थापक यांनी खात्री केल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात यावा.
2. Inj. Anti Hemophilia factor कामी निविदा प्राप्त न झाल्यामुळे सध्या Baxter, Reliance अथवा उपलब्ध कंपनींचे इंजेक्शन मागील मंजुर दर रु.१०/- अथवा त्यापेक्षा कमी दराने ज्याकंपनीच्या उपलब्ध होतील, त्या स्विकारणेत याव्यात.
3. Gauze Radiopaque, R/O Spongs, Adhesive Roll व Paediatric Triple Lumen ची वार्षिक मागणी ही वापर करणाऱ्या डॉक्टारांकडून जास्त आलेली असल्याने त्याचा खप पाहाता ती कमी करणेत यावी.
4. Liquid Microbial Hand Wash Soap व Clean Zyma Extra साठी आपले मागणी प्रमाणे निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असल्यामुळे, त्यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.
5. खालील औषधे सर्जिकल साहित्यासाठी न्युनतम प्राप्त दर हे आपले मागणी पेक्षा वेगळे (Not as per Demand) आलेले असल्याने सदरचे दर अमान्य करुन, अशा परिस्थतीमध्ये त्यानंतर प्राप्त द्वितीय निम्नतम दरधारक, निम्नतम दरधारकांचे दरात पुरविण्यात तयार असल्यास ते स्विकारण्यात यावे.

| Sr. No. | Name of Item | Reason for Rejection Item |
|---|---|---|
| 1 | Cath-Mount | निम्नत्तम दर हे Suction Catheter चे आहे. |
| 2 | Gauze Radiopaque | प्राप्त निम्नत्तम दरांचे M/s. Disha कंपनीचे मटेरिअलची सन २०१३-१४ मध्ये वारंवार लेखी स्वरूपात तक्रार आलेली आहे त्यामुळे त्यांचे दराचा विचार करण्यात आलेला नाही. |
| 3 | Bododex forte | प्राप्त निम्नत्तम दरांचे Item मधील असलेले Contain आपले मागणी प्रमाणे नाही. |
| 4 | Shoes for O.T. & I C U staff | प्राप्त निम्नत्तम दर हे दुस-या वेगळयाच Item चे असून त्याबाबत निविदाधारकाने चुकीचे भरल्याबाबत कळविले आहे. |
| 5 | Disp.bag (Trush bag) for biomedical waste yellow, Blue, Red | सदरकामी प्राप्त निविदाधारकांचे दर हे Govt. rule प्रमाणे 50 Micron व ISO नामांकित नसल्याने त्यानंतर प्राप्त दर Govt. rule नुसार घेण्याची शिफारस केलेली आहे. |
| 6 | Sonography paper roll (USG) size 110mm X 18mm Type V/100 | प्राप्त निम्नत्तम दर हे आपले मागणीचे size प्रमाणे नसून निविदाधारक त्याबाबत समक्ष येऊन चुका मान्य केल्याने त्यानंतर प्राप्त निम्नत्तम दरांची शिफारस केलेली आहे. |
| 7 | Iomeron 400 mg 100 ml | प्राप्त निम्नत्तम दर हे आपले मागणी 400mg प्रमाणे नसल्याने त्यानंतर प्राप्त निविदाधारकांचे दर आपले मागणीप्रमाणे असल्याने तेथे त्याची शिफारस केलेली आहे. |

6. Foldable Cap व Mask साठी प्राप्त निन्मतम निविदाधारकाने दिलेले सुट्टे दर हे स्विकारल्यास त्याठिकाणी साठा करुन ठेवणे व जुळवणे शक्य होणार नाही. त्यामध्ये सदर निविदाधारकाने दिलेले पॅकिंगचे दर स्विकारण्यात यावेत.
7. पार्ट B On Consignment items मधील Permanant Pacemaker करीता St. Jude कंपनीच्या VVI, VVIR, व DDDR साठी प्राप्त निम्नतम दर तथा Valve कामी सुध्दा प्राप्त निम्नतम दराने खरेदी करण्यात यावे व इतर उर्वरीत सर्व Consignment items साठी प्राप्त निम्नतम दर स्विकारणेत यावेत.

8. प्राप्त निविदाधारकांमध्ये काही जुने पुरवठाधारक व कांही नविन पुरवठाधारकांचे निम्नतम दर प्राप्त झालेले असुन आपला पुर्वानुभव पाहता संस्थानचे ई-निविदेतील अटी व शर्तीनुसार प्रथम टप्प्यातील मालाचा पुरवठा हा आदेश दिलेनंतर २१ दिवसात पुर्ण करावयाचा आहे. परंतु प्रत्यक्षात कांही पुरवठाधारक हे विहित मुदतीत मालाचा पुरवठा करत नसल्याने आपले मुदतीत मटेरियल न दिल्यास सदर पुरवठाधारकाचे मटेरीयल हे इतर ब्रॅण्डेड कंपनीचे बाजारभावाने खरेदी करणेत येऊन त्यासाठी लागणारी जास्तीची रक्कम ही सदर पुरवठाधारकाच्या देय असलेल्या कुठल्याही बीलातुन किंवा सुरक्षा रकमेतून यावी.

9. ज्या औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी दर प्राप्त झालेले नाहीत परंतु त्यांची प्रत्येकी किंमत रु.३ लाखापेक्षा कमी आहे अशी औषधे/सर्जिकल साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रकांची मागणी करावी व ज्या औषधे/सर्जिकल साहित्याची एकुण किमंत प्रत्येकी रु.३ लाखापेक्षा जास्त आहे ते खरेदी करणेकामी विहित पद्धतीने ई-निविदा मागविणेत याव्यात.

सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना, उपरोक्त शिफारशी मान्य करण्यात आल्या व त्याबरोबरच Oxygenator व Valve संबंधीत निम्नतम दरधारकाच्या साहित्याच्या गुणवत्तेबद्दल काही तांत्रिक मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्याबाबत वैद्यकिय संचालक व संबंधीत डॉक्टर यांचे अभिप्राय घेऊन, अंतिम निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **माहे डिसेंबर २०१७ महिन्यात मध्यप्रदेशातील इंदौर, रतलाम व हरदा येथे साई पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.१००६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री.आदि नारायण रेड्डी, हैद्राबाद, देणगीदार यांना दि.२४.१२.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत अखंड साईनाम भजनाच्या कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. आदि नारायण रेड्डी, हैद्राबाद, देणगीदार यांनी दि. २०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबा सेवेसाठी आम्ही दरवर्षी शिर्डी नगरपंचायतचे खुल्या नाट्यगृहामध्ये द्वारकामाई मंदीराशेजारी अखंड भजनाचा कार्यक्रम करीत असतो. सदर कार्यक्रमासाठी माझ्या समवेत दक्षिणेकडीलअनेक साईभक्त या ठिकाणी उपस्थित असतात. याही वर्षी दिनांक २४.१२.२०१७ ते दि. ३१.१२.२०१७ पर्यंत अखंड साईनामाचे भजन करण्यास परवानगी मिळावी तसेच याकामी अखंड विजपुरवठा आणि स्वच्छता कर्मचारी देण्यात यावेत अशी विनंतीकेली आहे.

सदरहू विषयाची पार्श्वभूमी व वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

श्री.आदि नारायण रेड्डी (ShriAadinarayan Reddy) हे संस्थानचे मोठे देणगीदार असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१० नुसार सन २००८ व २००९ साली लेंडीबागेतील दत्तमंदिरा समोरील मोकळी जागा अखंड साईनाम भजनासाठी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात आली होती. परंतु शिर्डी ग्रामस्थ यांनी दर्शनासाठी दिवसेंदिवस वाढत जाणारी गर्दी यांचा विचार करुन यापुढे लेंडीबागेत भजनाच्या कार्यक्रमासाठी जागा देण्यात येऊ नये असे विनंती अर्जान्वये कळविले होते. तसेच याबाबत वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिध्दी झाल्या होत्या. त्यामुळे श्री. आदि नारायण रेड्डी यांनी वेळोवेळी दिलेले अखंड साईनाम भजनाचे विनंती अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आले. त्यावर वेळोवेळी खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

अ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७९ अन्वये संस्थानचे लेंडीबागेत पालखी, भजन इत्यादींसाठी परवानगी देऊ नये तसेच शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परिसरात आकार घेऊन मोकळे मैदान द्यावे व विजपुरवठा करणेत यावा असे ठरले.

ब) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०३.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६८ नुसार लेंडीबाग वा समाधी मंदिर परिसरात कोणासही परवानगी देण्यात येऊ नये असे ठरले.

क) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०३.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१५ नुसार श्री.ए.एन.रेड्डी, हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदीर परिसरात तसेच लेंडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येऊ नये,असे ठरले.

ड) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४.०९.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७३५ नुसार श्री. आदि नारायण रेड्डी, यांना मागील वर्षाप्रमाणे खुले नाट्यगृह येथे अखंड भजनाचे कार्यक्रमास परवानगी देण्यात यावी असे ठरले.

ई) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.११.२०१३व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.११.२०१४ रोजीचे सभेत श्री.ए.एन.रेड्डी, यांना खुले नाट्यगृह व त्या समोरील जागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगी देण्यात आली आहे.

**प्रस्तावः-** श्री.आदि नारायण रेड्डी यांना उपरोक्त निर्णय क्र."**ड**"व "**इ**"नुसार व्दारकामाई मंदिराशेजारील खुलेनाटयगृह भजनाच्याकार्यक्रमासाठी देण्यात येत होते परंतु आता खुलेनाट्यगृहामध्ये संस्थानचे लाडु विभागामार्फत लाडु काऊंटर सुरु करण्यात आले आहे.

श्री. आदि नारायण रेड्डी यांना दि.१०.११.२०१७ रोजी दुरध्वनीवरुननाटयगृहाची जागेत संस्थानचे लाडूकाऊंटर सुरु केले असल्याने दि.२४.१२.२०१७ ते दि. ३१.१२.२०१७ पर्यंत अखंड साईनामाचे भजनासाठी जागा आता उपलब्ध होऊ शकणार नाही असे कळविण्यात आले आहे.

त्यावर त्यांनी लेंडीबागेजवळील दत्तमंदिरा समोरील मोकळी जागा किंवा लेंडीबागेत मोकळी जागा साईनामाचे भजनासाठी मिळावी अशी विनंती केली आहे.

श्री. आदि नारायण रेड्डी (ShriAadinarayan Reddy) यांनी संस्थानला सोन्याचे सिंहासन देणगी स्वरुपात अर्पण केले आहे. तसेच समाधी मंदिराच्या मुख्य गाभ्या-यातही भिंतीवर तसेच खांबावर सोन्याचे काम देणगी स्वरुपात अर्पण केले आहे. तसेच शताब्दी महोत्सवाकरीता ध्वजाचा स्तंभ देणगी स्वरुपात दिलेला आहे.

उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, श्री.आदि नारायण रेड्डी (ShriAadinarayan Reddy) यांना दि.२४.१२.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत अखंड साईनामाचे भजनाचे कार्यक्रमासाठी जागा देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१००७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.आदि नारायण रेड्डी संस्थानचे देणगीदार असल्यामुळे, त्यांना श्री साई समाधी मंदिर शताब्दी मंडपामध्ये अखंड साईनाम भजन कार्यक्रम करणेकामी दि.२४.१२.२०१७ ते दि.२६.१२.२०१७ पर्यंत ०३ दिवसासाठी परवानगी देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे धरण उद्धव घेऊन प्रस्तावित योजनेत शिर्डी व कोपरगाव शहराचा समावेश करुन योजना दोन टप्प्यात राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाहीसाठी होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.२८२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

"..यावर सविस्तर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून शिर्डी पर्यंत येणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरासाठी आणणेसंदर्भात मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तातील नमुद केलेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच याचवेळी मा.नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत तथा व्यवस्थापन समिती सदस्या यांनी शिर्डीसाठीही या पाईपलाईनमधून पिण्याचे पाणी मिळावे, असे लेखी पत्र संस्थानला दिले.

यावर चर्चा होऊन, निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगाव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकामी, कोपरगाव व शिर्डी नगरपंचायतींना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक बाबींची पुर्तता करुन सविस्तर आराखडा संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगांव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकामी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक बाबींची पुर्तता करुन सविस्तर आराखडा संस्थानकडे सादर करणेत यावा व कोपरगांव नगरपरिषद व शिर्डी नगरपंचायतीकरीता पाणी पुरवठा होणेसाठी निळवंडे धरणात यासाठी पाणी आरक्षण उपलब्ध आहे काय किंवा पाणी आरक्षण उपलब्ध नसल्यास जलसंपदा विभागाकडे पाणी

आरक्षण प्रस्ताव सादर करणे गरजेचे असलेने पाणी आरक्षण करुन घेणेबाबतची कार्यवाही करणेत येवुन सदरहू माहिती संस्थानकडे सादर करणेबाबत मुख्याधिकारी, कोपरगांव नगरपरिषद यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ १७८७/ २०१७, दि.०३/०७/२०१७ व जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/४११८/२०१७, दि.०८/११/२०१७ अन्वये व मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ १७८६/२०१७, दि.०३/०७/२०१७ व जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/४११९/२०१७, दि.०८/११/२०१७ अन्वये तसेच निळवंडे धरणात कोपरगांव नगरपरिषद व शिर्डी नगरपंचायत यांचेकरीता पाणी आरक्षण उपलब्ध आहे काय किंवा उपलब्ध करुन देता येईल काय याबाबतची माहिती सादर करणेसाठी अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, अहमदनगर यांना एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/ १७८८/ २०१७, दि.०३/०७/२०१७ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७३९ अनुसरुन, निळवंडे धरण उद्भव घेवून, प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेपैकी,

१) शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे.

२) टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे.

३) सदर योजनेसाठी आवश्यक असणारा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन संपुर्ण योजना संस्थानमार्फत राबविण्यात येवून याकामी तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांची नियुक्तीकरुन त्यांना मागणी केलेप्रमाणे या कामासाठी मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी देणे.

सदरहू योजनेबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी जा.क्रं.एसएसएस/वशी/पाणी पुरवठा/२४६७/२०१७, दि.०५/०८/२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. याबाबत महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७/ प्र.क्र.१७७/ का.१६, दि.०१ सप्टेंबर, २०१७ अन्वये वाढीव शिर्डी संस्थान, पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ आणि रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (निळवंडे धरण हिस्यासाठी होणारी रक्कम वगळून) इतक्या किमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधीन राहून, सदर योजनेची अंमलबजावणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत करणेसाठी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मोजमाप नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी आदा करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी सदरहू योजना तातडीने पूर्ण होवून कार्यान्वित होणे गरजेचे आहे.

सदरहू योजनेबाबत शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Rising main, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे इ. कार्यवाही तातडीने सुरु करावी लागणार आहे. यासाठी करावयाच्या कार्यवाहीची रुपरेषा ठरविणे, आवश्यक जागेची निश्चिती तसेच योजनेसंदर्भात व योजनेसाठीचे पाणी आरक्षण प्रस्तावाबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अभियंत्यासह मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे अध्यक्षतेखाली दि.१२/०९/२०१७ व दि.२५/१०/२०१७ रोजी बैठक घेण्यात आली.

दि.२५/१०/२०१७ रोजीचे बैठकित वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी प्रस्तावित पाणी पुरवठा योजनेविषयी चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण यांनी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीसाठी योजनेचे काम तातडीने पुर्ण करणेसाठी कार्यवाही करावी.

२) निळवंडे धरणातून संस्थानसाठी येणाऱ्या पाण्याच्या पाईपलाईनमधून कोपरगाव व शिर्डी शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८२ नुसार आवश्यक ती कार्यवाही करणेस मान्यता देणेत आलेली असून त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी योजनेचे सुधारित संकल्पने, अंदाजपत्रक व आराखडे सादर करावे.

३) श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ करीता सदरहू योजना कार्यान्वित करणेसाठी योजनेची निकड व काम पुर्ण होण्याच्या दृष्टीने प्रस्तावित योजनेची निविदा तयार करण्यात यावी. यामध्ये शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Rising main, Distribution Network व संस्थान परिसरातील सर्व पाईपलाईनची कामे करणे व टप्पा क्रं.२ मध्ये निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद्र ही अंदाजे ८० कि.मी.ची पाईपलाईन टाकणे तसेच निळवंडे धरणांतून संस्थानसाठी येणा-या पाण्याच्या पाईपलाईनमधुन शिर्डी व कोपरगांव शहरासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेबाबत ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी. त्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दोन टप्प्यात कामे करावयाची असल्याने निविदेमध्ये त्यानुसार अटी-शर्ती टाकणे. याबाबत त्वरीत प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा.

४) निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद पाईपलाईनसाठी वेळ लागेल. यासाठी पहिल्या टप्पा Internal System Develop करणे, यापुर्वीची जूनी पाईपलाईन खराब झालेली आहे. असे नमुद करुन योजना राबविणेकामी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी. सदर प्रस्ताव सादर करताना सध्याचा दारणा धरणातून संस्थानकरीता मंजुर असलेला ५३.३२०५ MCFT उद्भव व श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीसाठी यात वाढ करुन ७० MCFT करणेबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर व जिल्हाधिकारी नाशिक यांना प्रस्ताव सादर करणेत आलेला असलेने या बाबी विचारात घेवून पाणी उपलब्ध असल्याने दि.०१/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील अट क्रं.२- सदर योजना केवळ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता राबविणेत येईल व अट क्रं.६ - योजनेचा उद्भव विकसीत केल्याशिवाय इतर कामे करु नयेत ही अट शिथिल करणेत यावी यासाठी प्रस्ताव शासनास पाठवावा.

५) टप्पा क्रं.१ मधील WTP साठी व संस्थानला वाढीव पाणी उपलब्ध करुन घेणेसाठी तातडीने करावयाच्या नविन साठवण तलावाचे डिझाईन व इस्टिमेट तयार करणेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन करणेत यावी. यासाठी तातडीने आवश्यक जागेची निश्चिती करणे. तसेच यापुर्वी इतर ठिकाणी राबविण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांचा अभ्यास करुन DPR व निविदा तयार करण्यात यावी.

६) शिर्डी परिसरात करावयाची टप्पा क्रं.१ मधील WTP, ESR, Distribution Network व संस्थान परिसरातील व संस्थान मालकीचे जागेतील सर्व पाईपलाईनची कामे करणे व टप्पा क्रं.२ मध्ये शिर्डी नगरपंचायत व कोपरगांव नगरपरिषद यांचा समावेश करुन वाढीव योजनेचे अंदाजपत्रक आराखडे तांत्रिक मान्यतेस्तव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सादर केलेनंतर सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या मंजुरीसाठी घेणेत यावा.

७) पाईपलाईन ज्या मार्गाने येणार आहे याबाबतचे ना हरकत दाखले, इतर अनुषंगिक परवानग्या घेणे व पाईपलाईन रुट प्लॅन सादर करणे इ.बाबतची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडुन करणेत यावी.

८) निळवंडे धरण ते शिर्डी पर्यंत टाकावयाची पाईपलाईन व अंतर्गत टाकावयाच्या पाईपलाईन या DI पाईप प्रस्तावित असलेने याबाबतचा तांत्रिक अहवाल सादर करणेत यावा.

९) प्रकल्प तातडीने सुरु करावयाचा असलेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेसाठी संस्थान परिसरात कामाचे कालावधी पुरते सेक्शन ऑफिस करीता जागा उपलब्ध करुन देणेबाबतची कार्यवाही करणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर करणेत यावा.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे सध्या असणारी पाण्याची कमतरता विचारात घेता श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सवाच्या कालावधीमध्ये शिर्डीमध्ये येणा-या साईभक्तांना पाण्याची कमतरता भासू नये आणि त्यांना मुबलक स्वरुपात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना, ता.राहाता, जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव घेऊन) या योजनेच्या रु.१६३,४२,९५,५५५/- निव्वळ व रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (निळवंडे धरण हिस्यासाठी होणारी रक्कम वगळून) इ.किमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून, सदर योजनेची अंमलबजावणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत करणेसाठी प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन मोजमाप

नोंदणी शुल्क २% व प्रकल्प व्यवस्थापन सेवा शुल्क ३% अशी ५% फी आदा करणेस महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.सार्सवि-२०१५/ १००७/ प्र.क्र.१७७/का.१६, दिनांक ०१/०९/२०१७ अन्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडील दि.१०/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये त्यांनी दि.२५/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकिच्या अनुषंगाने योजनेत पुन्हा सुधारणा करुन कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे रु.२७८.९० कोटी किमतीचे अंदाजपत्रके व आराखडे सादर केलेले आहेत. याबाबत कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. सदरहू संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे रु.२७८.९० कोटी किमतीचे अंदाजपत्रके व आराखडे यांना नव्याने तांत्रिक मान्यता घेवून प्रस्ताव प्रशासकिय मान्यतेसाठी शासनास सादर करावा लागेल. यामुळे पुर्वीची तांत्रिक व प्रशासकिय मान्यता रद्द होणार असलेने, नव्याने तांत्रिक व प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर DPR व निविदा तयार करुन प्रत्यक्ष योजनेचे कामास सुरुवात करावी लागेल.

तरी याबाबत निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१००८** **श्री साईबाबा संस्थान शिर्डीकरीता निळवंडे धरण उद्भव घेऊन पाणी पुरवठा योजनेसाठी यापुर्वी रु.१९१,९१,३९,५००/- ढोबळ (निळवंडे धरण हिस्यासाठी होणारी रक्कम वगळून) इ.किमतीच्या अंदाजपत्रकास अटी व शर्तीच्या अधिन राहून, सदर योजनेची अंमलबजावणी करणेस शासनाने मान्यता दिलेली होती. परंतु त्यानंतर कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे रु.२७८.९० कोटी किमतीचे अंदाजपत्रके व आराखडे महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचेकडून प्राप्त झाल्याचे तसेच अंदाजपत्रक व प्रशासकीय मान्यता एकत्रित असल्यास टप्पा-०१ व टप्पा-०२ याप्रमाणे स्वतंत्र निविदा काढता येणार नाही. संपुर्ण कामाची एकच निविदा काढावी लागे, ही बाब मा.मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानला पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन खुप जुनी झालेली असल्यामुळे ती बऱ्याचवेळा फुटते/ लिकेज होते व पाणी पुरवठा करणेस अडचण निर्माण होते. याकरीता कोपरगांव व शिर्डी शहरासह शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टप्पा-०१ (शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनची कामे करणे) टप्पा-०२ (निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जलशुध्दीकरण केंद या अंदाजे ८० कि.मी.पाईपलाईन टाकणे) असे वर्गीकरण करणेत येऊन, त्याचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेत यावा व त्याप्रमाणे टप्पा-०१ व टप्पा-०२ अशी स्वतंत्रपणे मान्यता देण्यासाठी शासनास विनंती करावी.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **मौजे निमगाव को-हाळे व मौजे कनकुरी येथील श्री साईबाबा संस्थान मालकीच्या जमीनीचा सन २०१७-१८ या वर्षाचा शेतसारा भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव–** मौजे निमगाव-को-हाळे व मौजे कनकुरी येथील श्री साईबाबा संस्थान मालकीच्या जमीनींचा सन २०१७-१८ या वर्षाचा शेतसारा भरणेबाबत..

**प्रस्तावना–** कामगार तलाठी मौजे निमगाव-को-हाळे यांनी त्यांचेकडील जा.क्रं.१२७२/२०१७ दि.२६/०९/२०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थानकडे सन २०१७-१८ या वर्षाचा शेतसारा खालील नमूद केलेप्रमाणे मिळणेकामी विनंती केलेली आहे.

| जमीन बाब | नियत | जिल्हा परिषद सेस | ग्रामपंचायत सेस | वाढीव जमीनबाब | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| बिनशेती | ४६,२२५/- | ३,६९,८००/- | ४६,२२५/- | - | **४,६२,२५०/-** |
| जमीन बाब | २३/- | १८४/- | २३/- | - | **२३०/-** |
| वाढीव जमीन बाब | - | - | - | ४६,२४८/- | **४६,२४८/-** |
| **एकुण रु.** | **४६,२४८/-** | **३,६९,९८४/-** | **४६,२४८/-** | **४६,२४८/-** | **५,०८,७२८/-** |

तसेच मौजे कनकुरी येथील संस्थान मालकीच्या जमीनीचा सन २०१७-१८ या वर्षाचा शेतसारा खालीलप्रमाणे मिळणेस विनंती केलेली आहे.

| जमीन बाब | जिल्हा परिषद सेस | ग्रामपंचायत सेस | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| २१/- | १६८/- | २१/- | २१०/- |

उपरोक्तप्रमाणे मौजे निमगाव-को-हाळे येथील जमीन महसुलाची एकूण रक्कम रु.५,०८,७२८/- आणि मौजे कनकुरी येथील जमीन महसुलाची रक्कम रु.२१०/- अशी एकूण रक्कम रु.५,०८,९३८/- इतकी जमीन महसुलाची रक्कम देय होत आहे.

सदरची रक्कम खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे मिळणेकामी कामगार तलाठी यांनी संदर्भांकित पत्रात विनंती केलेली आहे.

| अ.नं. | बाब | रक्कम रु. | रक्कम अदा करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | बिनशेती नियत | ४६,२२५/- | स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखेचा धनादेश |
| २ | जिल्हा परिषद सेस व ग्रामपंचायत सेस | ४,१६,०२५/- | स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखेचा धनादेश |
| ३ | वाढीव जमीनबाब | ४६,२४८/- | स्टेट बॅंक ऑफ इंडीया,शाखेचा धनादेश |
| ४ | जमीन बाब (निमगाव को-हाळे) | २३०/- | रोख स्वरुपात |
| ५ | जमीन बाब (कनकुरी) | २१०/- | रोख स्वरुपात |
| | **एकुण रक्कम रु.** | **५,०८,९३८/-** | |

**विभागाचा अभिप्राय-**

१) उपरोक्तप्रमाणे निमगाव-को-हाळे व कनकुरी येथील सन २०१७-१८ ची महसुलाची एकूण रु.५,०८,९३८/- इतकी उपरोक्त तपशिलाप्रमाणे लेखाशाखेमार्फत शासनास अदा करता येईल. त्यासाठीचा तसेच

२) यापुढे संस्थान मिळकतीचे संबंधातील शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा शासनास अदा करणेबाबतचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर घेणेबाबतचे अधिकार प्रदान करणेच्या निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.१००९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे व मौजे कनकुरी येथील श्री साईबाबा संस्थान मालकीच्या जमीनीचा सन २०१७-१८ या वर्षाचा रु.५,०८,९३८/- शेतसारा शासनास आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे संस्थम मिळकतीचे संबंधातील नियमानुकूल शासकीय अथवा निमशासकीय कर, भाडे, भरपाई, आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर शासनास अदा करावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०७** **शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मी.रुंदीकरण संबधीत भूसंपादन एलएक्युएसआर २१/२००३, दि.२५.११.२००३ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं.८/२००४, ९/२००४ आणि १/२००४ व १०/२००४ तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६, ६६८८/२०१७ व ३६४२५/२०१६ मधील वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मे.कोर्टात जमा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ (२)(च) मध्ये विश्वस्तव्यवस्थेशी संबंधीत असे कोणतेही दावे,खटले व इतर कायदेशीर कार्यवाही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापूढे किंवा इतर प्राधिकरणापूढे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील आणि कलम २१(१) (छ) मध्ये कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्याय निर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव -** शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मी.रुंदीकरण संबंधीत भूसंपादन एलएक्यूसआर २१/२००३ दि.२५/११/२००३ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं.८/ २००४, ९/२००४ आणि १/२००४ व १०/२००४ तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६, ६६८८/२०१७ व ३६४२५/२०१६ मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मे.कोर्टात जमा करणे..

**प्रस्तावना–**शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता ९.०० मी.रुंदीकरणाकरीता जमीन संपादनासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन देणेकामी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी यापूर्वी सन २००२-०३ मध्ये संस्थानकडे विनंती केली होती. सदर रस्ता रुंदीकरणासाठी संपादीत होणा-या जमीनीची व त्यावर असलेल्या बांधकामांची मुल्यांकनानुसार होणारी एकूण रक्कम रु.१,५४,२७,८३१/- इतकी येत असून त्यापैकी भूसंपादनासाठी ८०% प्रमाणे रक्कम रु.१,२३,४२,२६५/- मात्र मा.उपविभागीय अधिकारी यांचे प्रस्तावानुसार महसुल विभागाकडे आगाऊ भरणेसाठी मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी सदर रकमेची संस्थानकडे मागणी केली होती. याबाबत दि.२८-२९/०९/२००२ रोजीचे मा.व्यवस्थापन मंडळ सभेत चर्चा करणेत येऊन निर्णय क्रं.४६८ अन्वये उपरोक्त ८०% आगाऊ रक्कम रु.१,२३,४२,२६५/- शिर्डी नगरपंचायतला त्यांचे विनंतीनुसार देणेसाठी खालील अटीवर मान्यता देणेत आली.

१) सदर रस्त्याच्या रुंदीकरण केलेल्या भागावर पक्का डांबरी अथवा सिमेंट क्रॉक्रीटचा रस्ता तयार करण्याची पूर्ण जबाबदारी (त्यावरील खर्चासह) शिर्डी नगरपंचायतीची राहील. तसेच सदर पूर्ण रस्त्याची व देखभालीची जबाबदारी व खर्च शिर्डी नगरपंचायतीचाच राहील.

२) सदर रुंद रस्त्यावर अतिक्रमण होणार नाही याची खबरदारी घेण्याची व दुर्देवाने ते झाल्यास तात्काळ ते काढण्याची जबाबदारी शिर्डी नगरपंचायतीची राहील.

त्याप्रमाणे सदरची ८०% आगाऊ रक्कम रु.१,२३,४२,२६५/- इतकी संबंधीत तत्कालीन भूसंपादन अधिकारी मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचेकडेस दि.३०/०५/२००३ रोजी धनादेशाद्वारे जमा करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे रथ पालखी रस्त्यावरील अतिक्रमणे काढणे व संपादीत केलेली बांधकामे काढणेसाठी झालेला खर्च उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर तथा तत्कालीन भूसंपादन अधिकारी यांचेमार्फत अदा करणेकामी त्यांनी मागणी केलेल्या रक्कम रु.१५,००,०००/- या रकमेस निर्णय क्रं.२९० दि.२९-३०/०५/२००४ अन्वये तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने सदर खर्चाची रक्कम अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. तद्नुषंगाने उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांना रक्कम रु.१४,००,०००/- इतकी दि.२१/१०/२००४ रोजी चेकद्वारे अदा करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत शिर्डी विकास योजनेतील पालखी रस्ता रुंदीकरण प्रयोजनासाठीचे भूसंपादन निवाडा मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांचेकडील एलएक्यूएसआर/२१/२००३ दि.२५/११/२००३ अन्वये घोषित करण्यात आलेला आहे. सदर निवाडयातील संपादीत केलेल्या मिळकतींचे ताबे दि.०८/०५/२००४ रोजी घेण्यात आलेले आहेत.

दरम्यानचे काळात सदर निवाडयातील संबंधीत जमीन मालक १) श्री.दिलीप कन्हैयालाल संकलेचा २) सौ.निर्मला कुंदनमल लुनावतव श्रीमती पुनम दिलीप संकलेचा ३) सौ.निर्मला कुंदनमल लुनावत व श्रीमती सुरजाबाई कन्हैयालाल संकलेचा यांनी प्रस्तुत प्रकरणी भूसंपादन कायदा १८९४ चे कलम १८ सह कलम ३० अन्वये भूसंपादन निवाडा जाहीर होवून देय असलेल्या नुकसान भरपाई पेक्षा जास्त नुकसान भरपाई मिळावी म्हणून मा.दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅण्ड रेफरन्स नं.अनुक्रमे ७/२००४, ८/२००४ आणि ९/२००४ चे दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे श्री.रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर १ यांनी लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ चा दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेला आहे. आणि श्री.प्रकाश बाबुराव माळवे यांनी लॅण्ड रेफरन्स नं.१०/२००४ चा दि.१८/०६/२००४ रोजी दाखल केलेला आहे.

उपरोक्त लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ व लॅण्ड रेफरन्स नं.१०/२००४ मध्ये मे.कोर्टाने दि.२५/१०/२०१२ रोजी आणि लॅण्ड रेफरन्स नं.७/२००४,८/२००४ आणि ९/२००४ मध्ये दि.२८/०२/२०१३ रोजी संबंधीत जमीन मालकांस मोबदला रक्कम वाढवून देण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी मे.कोपरगाव कोर्टात रेग्युलर दरखास्त क्रं.१०७/२०१५,१०५/२०१५ व १०६/२०१५ च्या दाखल आहेत.

मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचेकडील उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.२/६५९/ २०१६ दि.२९/१०/२०१६ अन्वये उपरोक्त लॅण्ड रेफरन्स मध्ये वाढीव नुकसान भरपाईची रक्कम रु.२८,८३,७८८/- इतकी जमा करणेबाबत नगरपंचायत,शिर्डी यांना पत्र निर्गत करुन प्रत संस्थानला निर्गत केलेली आहे. नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.नपं/टि.क्र.८/२९०६/२०१६ दि.०७/११/२०१६ अन्वये सदरची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडेस जमा करणेकामी इकडेस विनंती केलेली आहे. दरम्यानचे काळात संस्थानने उपरोक्त लॅण्ड रेफरन्स नं.७/२००४, ८/२००४ आणि ९/२००४ मधील निर्णयाविरुध्द संस्थानचे विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात ॲड.नितीन भवर यांचेमार्फत खालील फर्स्ट अपील दाखल केलेले आहेत.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द दिलीप कन्हैयालाल संकलेचा फर्स्ट अपील एसटी ३६४२८/२०१६.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द निर्मला कुंदनमल लुनावत फर्स्ट अपील एसटी ६६८८/२०१७.

३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी विरुध्द निर्मला कुंदनमल लुनावत फर्स्ट अपील एसटी ३६४२५/२०१६.

उर्वरित लॅण्ड रेफरन्स नं.१/२००४ व १०/२००४ मध्ये संस्थानला प्रतिवादी केलेले नसलेने सदर प्रकरणी अपील दाखल केलेले नाहीत.

उपरोक्त फर्स्ट अपीलपैकी फर्स्ट अपील नं.६६८८/२०१७ CA No.10170/2017 मध्ये मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दि०५/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

This an application for stay to the execution of the impugned award.

2. Heard learned counsel for the appellant and learned A.G.P.for respondent no.3.

3. Learned counsel for the applicant points out that the claimants are not entitled for the interest under Section 34 of the Land Acquisition Act, because the possession of the acquired land was taken after passing of the award. Therefore, prima facie, it appears that in view of the provisions of Section 34 of the Land Acquisition Act the claimants are not entitled for the interest under Section 34 of the Land Acquisition Act.

4. In view of above,the execution and operation of the impuged award is stayed on the condition that the appellant shall deposit entire amount of compensation together with interest, except interest under Section 34 of the Land Acquisition Act in this Court within a period of 12 weeks from today.

5. Civil Application is disposed of.

उपरोक्त आदेशात नमूद केलेप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मे.कोर्टात जमा करणेकामी प्रस्तुत प्रकरणी व्याजासह वाढीव नुकसान भरपाईची रक्कम हिशोबित करुन मिळणेकामी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग,शिर्डी यांना इकडील दि.१०/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले.

त्याप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.कावि/ २/८६६/ २०१७ दि.१०/११/२०१७ अन्वये प्रस्तुत प्रकरणी "मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी फर्स्ट अपील क्रं.६६८८/२०१७ मधील सिव्हील ॲप्लीकेशन क्रं.१०१७०/२०१७ मध्ये दि.०५/१०/२०१७ रोजी स्थगिती आदेश पारीत केलेला आहे. सदर स्थगिती आदेशात कलम ३४ खालील व्याजाची रक्कम वगळून उर्वरित रक्कम १२ आठवडयाच्या आत जमा करणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल करुन स्थगिती आदेश प्राप्त झालेला आहे त्या प्रकरणात खालीलप्रमाणे परिगणीत केलेली रक्कम मे.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडेस तात्काळ जमा करणेत यावी. तसेच ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल केलेले आहे. परंतु स्थगिती आदेश मिळालेले नाहीत अशा प्रकरणात स्थगिती आदेश मिळाल्यानंतर दि.२४/११/२०१७ पर्यंत हिशोबित केलेली रक्कम मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस जमा करावी व ज्या प्रकरणात पहीले अपील दाखल केलेले नाही (भूसंदर्भ क्रं.१/२००४ व १०/२००४) अशा प्रकरणात वाढीव मोबदल्याची रक्कम मे.कोपरगाव कोर्टात तात्काळ जमा करणेत यावी व तसे केलेबाबत या कार्यालयास कळवावे" वगैरेबाबत नमूद केलेले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मोबदल्याची प्रकरणवार परिगणीत केलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | भूसंदर्भ क्रं. | वाढीव मोबदला रक्कम | कलम २८ अन्वये व्याज (दि.२४/११/२०१७ पर्यंत) | दि.२४/११/२०१७ पर्यंत हिशोबित करुन येणारी रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ०१/२००४ | १८,१५०/- | ३७,०२६/- | ५५,१७६/- |
| २ | ०७/२००४ | ३,२५,८९७/- | ६,६४,८२९/- | ९,९०,७२५/- |
| ३ | ०८/२००४ | १,६२,०४६/- | ३,३०,५७४/- | ४,९२,६२१/- |
| ४ | ०९/२००४ | १,८३,८४६/- | ३,७५,०४५/- | ५,५८,८९१/- |
| ५ | १०/२००४ | ६,१८७/- | १२,६२१/- | १८,८०८/- |
| | | ६,९६,१२६/- | १४,२०,०९६/- | २१,१६,२२२/- |

विभागाचा अभिप्राय- १) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील क्रं.६६८८/२०१७ मधील दि.०५/१०/२०१७ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग, शिर्डी यांनी उपरोक्त तक्त्यातील अ.नं.३ प्रमाणे भूसंदर्भ क्रं.८/२००४ मध्ये परिगणित करुन दिलेली रक्कम रु.४,९२,६२१/- इतकी मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेकद्वारे जमा करता येईल.

२) तसेच मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे उर्वरित प्रकरणी म्हणजेच उपरोक्त तक्त्यातील अ.नं.२ व ४ मधील भूसंदर्भ क्रं.७/२००४ व ९/२००४ चे विरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल असलेले फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६ व ३६४२५/२०१६ मध्ये मे.कोर्टाकडून स्थगिती आदेश मिळाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणातील दि.२४/११/२०१७ पर्यंतची हिशोबित केलेली रक्कम अनुक्रमे रु.९,९०,७२५/- व रु.५,५८,८९१/- अशी एकूण रक्कम रु.१५,४९,६१६/- इतकी रक्कम मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडेस संस्थानचे लेखाशाखेमार्फत जमा करणेची तरतूद करुन ठेवता येईल.

३) तसेच मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे ज्या प्रकरणात फर्स्ट अपील दाखल केलेले नाहीत म्हणजेच भूसंदर्भ क्रं.१/२००४ व १०/२००४ या प्रकरणात वाढीव मोबदल्याची रक्कम अनुक्रमे रु.५५,१७६/- व रु.१८,८०८/- अशी एकूण रक्कम रु.७३,९८४/- इतकी रक्कम मे.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात संस्थानचे लेखाशाखेमार्फत चेकद्वारे जमा करता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विकास योजना पालखी रस्ता ९.०० मी.रुंदीकरण संबधीत भूसंपादन एलएक्युएसआर २१/२००३, दि.२५.११.२००३ मध्ये मा.दिवाणी न्यायाधीश,वरिष्ठ स्तर,कोपरगाव यांचे कोर्टात लॅन्ड रेफरन्स नं.८/२००४, ९/२००४ आणि १/२००४ व १०/२००४ तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील फर्स्ट अपील नं.३६४२८/२०१६, ६६८८/२०१७ व ३६४२५/२०१६ मधील वाढीव नुकसान भरपाईची प्रस्तावात नमुद केलेली रक्कम मे.कोर्टात जमा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री साई भक्तांना सोईसुविधा पुरविण्यासाठी शिर्डी शहरात शौचालय बांधकामासाठी रक्कम रु.१६,९५,७८५/- अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सौ. योगिता अभय शेळके पाटील, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पत्र पाठवून श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१८ मध्ये साईभक्तांना सोईसुविधा पुरविण्यासाठी शिर्डी शहरात शौचालय बांधकाम करणेसाठी अनुदान उपलब्ध करून देणेची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावात स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीमधील येथील कायम रहिवासी कुटूंबांना वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी शिर्डी नगरपंचायतीद्वारे अनुदान वितरीत केले जाते. शिर्डी शहराला हगणदारी मुक्त झालेबाबतचा दर्जा देखील प्राप्त झाला आहे. स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत वैयक्तीक

शौचालय बांधकाम करणेसाठी प्राधान्याने निधी वितरीत करणेबाबत शासनाकडून निर्देश आहेत. यामध्ये सार्वजनिक शौचालय अगर सुलभ शौचालय बांधणेसाठी मर्यादा आहे.

शिर्डी शहर हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे तीर्थक्षेत्र आहे. येथे लाखो भाविक श्री साईबाबांचे दर्शनासाठी येत असतात. या सर्व भाविकांना मुलभुत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत करीत असतात. मात्र शिर्डी नगरपंचायतीला आर्थिक निधीची कमतरता असल्याने भाविकांना परिपूर्ण व जलद सोयी सुविधा देण्यात मर्यादा येतात. भाविकांना सार्वजनिक /सुलभ शौचालय उपलब्धता करून देणे ही मुलभुत सुविधा आहे.

सद्यस्थितीत नगरपंचायतीचे बाजारतळ व लक्ष्मीनगर येथे सार्वजनिक शौचालय उपलब्ध असून नगर मनमाड हायवे लगत व नगरपंचायत प्रशासकीय इमारतीचे बाजूला रक्कम रु. २५ लक्षचे दोन सार्वजनिक शौचालय पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. सदर शौचालय नगरपंचायत पे अन्ड युज तत्वावर चालविणेस देणार आहे. याशिवाय नगरपंचायतीद्वारे नांदुर्खी रोड श्री साईबाबा संस्थानचे व्यायामशाळेचे बाजूला व बाजारतळ येथे सर्व सुविधायुक्त १६ + १६ असे ३२ शौचालयाचे काम प्रस्तावीत असून सदर कामाची निविदा देखील प्रसिद्ध झालेली आहे. मात्र निधी अभावी सदर काम करता आलेले नाही, असे प्रस्तावात नमूद केले आहे.

**मागणी:-** बाजारतळ येथील प्रस्तावीत नविन शौचालयासाठी रक्कम रु.१६,९५,७८५/- अशी शिर्डी नगरपंचायतीस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत उपलब्ध करून देण्याची विनंती केली आहे.

तसेच नांदुर्खी रोड येथील संस्थानचे व्यायामशाळेचे बाजूला नविन शौचालयासाठी रक्कम रु. १६,९५,७८७/- ची मागणी मा. व्यवस्थापन समितीचे समोर अलहिदा सादर केलेली आहे.

**संस्थानतर्फे अनुदान देणेबाबत अधिनियमातील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ चे कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्यशासनाच्या पुर्व मंजूरीने, स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी परिणामी संस्थानांच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्याची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** (१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत श्री साईबाबा शताब्दी महोत्सव तृतीय आढावा बैठक दि.०६.०७.२०१७ रोजी झाली सदर बैठकीत दिलेल्या निर्देशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी नगरपंचायतीच्या विविध प्रकल्पांसाठी निधी देतांना कर्ज स्वरुपात न देता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४, मधील तरतूदीप्रमाणे अनुदान स्वरुपात द्यावा. असे निर्देश दिलेले आहेत.

(२) शिर्डी नगरपंचायतीने शिर्डी विकास आराखडयानुसार व नगरविकास विभागाची तांत्रिक मान्यता घेऊन शौचालयाचे बांधकाम करणे आवश्यक आहे.

(३) प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर छाननी समिती व विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेऊन अनुदान देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**निर्णय क्र.१०११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई भक्तांना सोईसुविधा पुरविण्यासाठी शिर्डी शहरात शौचालय बांधकामासाठी शिर्डी नगरपंचायतीस रु.१६,९५,५८७/- मात्र अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्व परवानगीने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील कर्मचा-यांना मंजूर करण्यात आलेल्या दोन नॉन एसी खोल्यासंदर्भात फेरप्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवायचा आहे, ती उदिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, हि समितीची कर्तव्ये असतील.

२१ चा (१) चा (ग) - भक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव :-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.८२, निर्णय क्र.८२

**प्रस्ताविक:-** शिर्डी आकाशवाणी केंद्र् यांचे एएनआर-१(२)/शिर्डी प्रोजेक्ट्-२०१७ दि.३१ जानेवारी २०१७ रोजीचे पत्रान्वये आकाशवाणी केंद्र्, शिर्डी येथील कर्तव्यावरील कर्मचा-यांना दोन वेस्टर्न टॉयलेट नॉन एसी खोल्या उपलब्ध् करुन देणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार व्दारावती भक्तनिवास जा.नं.३४/२०१७ दि.०७/०२/२०१७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील कर्मचा-यांना व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये दोन नॉन एसी खोल्या देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.८२, निर्णय क्र.८२ अन्वये दि.०२/०२/२०१७ पासुन विनामुल्य् उपलब्ध् करुन देणेबाबतचे प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली असून सामान्य् प्रशासन विभाग जा.क्र. एसएसएस/साप्रशा-आस्था/४४८८/२०१७ दि.२७/३/२०१७ चे आदेशाने संस्थान अधिनियम २००४ नुसार दि.२/२/२०१७ पासून पुढील ११महिने कालावधीसाठी दोन नॉन ए सी खोल्या विनाशुल्क् उपलब्ध करुन देण्यात याव्यात.अधिक्षक व्दारावती भक्तनिवास यांनी अधिक्षक मालमत्ता विभाग यांचे समन्वयाने संबंधिताकडून ताबेपावती व करारनामा करुन घ्यावा, तसेच करारनामा व्दारावती भक्तनिवास विभागाचे दप्तरी ठेवण्यात यावा,असे म्हटले आहे. शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील कर्मचा-यांना दि.२/२/२०१७ पासून व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये एक नॉन एसी खोली देण्यात आली आहे.

संदर्भ क्र.३ पत्रान्वये प्रसार भारती आकाशवाणी अ.नगर कार्यक्रम विभाग प्रमुख यांनी शिर्डी आकाशवाणी केंद्रातील ४ अभियांत्रिकी कर्मचा-यांसाठी एक खोली आवश्यक आहे.तसेच बाहेर गावाहून ऑफिस कामानिमित्ताने कार्यालयीन दौ-यावर येणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी आणखी एक खोलीची आवश्यकता आहे, असे कळविले आहे.

करारनामा करणेकामी मालमत्ता विभागास पत्रव्यवहार केला असता त्यांनी संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये नॉन ए सी खोलीचे दर प्रतिदिन रु.५००/- असल्याने दोन खोल्यांचे दरमहा रुपये-३०,०००/- होतात.तेव्हा दुस-या पर्यायाचा विचार व्हावा अथवा एकच खोली देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरप्रस्ताव सादर करणेत यावा.असे म्हटले आहे.

**विभागाची मागणी :-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्र.८२, निर्णय क्र.८२ अन्वये सध्या शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील कर्मचा-यांसाठी दि.२/२/२०१७ पासून एक नॉन ए सी खोली विनामुल्य देण्यात आलेली आहे. संदर्भ क्र.२ नुसार विनामुल्य देण्यात आलेल्या एक नॉन ए सी खोलीचा दि.२/२/२०१७ पासून ११ महिने कालावधीसाठी मालमत्ता विभागामार्फत करारनामा करुन घेता येईल. प्रसार भारती आकाशवाणी अ.नगर कार्यक्रम विभाग प्रमुख यांनी अनर-१(२) / शिर्डी प्रोजेक्ट -२०१७/१८० दि.२४/७/२०१७ चे पत्रात म्हटले प्रमाणे त्यांचेकडील वेळोवेळी बाहेर गावाहून ऑफिस कामानिमित्ताने कार्यालयीन दौ-यावर येणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांचे तात्पुरते कालावधीसाठी नियमाप्रामाणे सेवाआकार घेऊन प्राधान्याने खोली उपलब्ध करुन देता येईल,असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** संदर्भ क्र.२ नुसार शिर्डी आकाशवाणी केंद्रातील कर्तव्यावरील कर्मचा-यांना दि.०२/०२/२०१७ पासून विनामुल्य देण्यात आलेल्या एक नॉन ए सी खोलीचा ११ महिने कालावधीसाठीचा मालमत्ता विभागामार्फत करारनामा करुन घेता येईल. तसेच त्यांचेकडील वेळोवेळी बाहेर गावाहून ऑफिस कामानिमित्ताने कार्यालयीन दौ-यावर येणा-या अधिकारी आणि कर्मचा-यांचे तात्पुरते कालावधीसाठी नियमाप्रमाणे सेवाआकार घेऊन प्राधान्याने खोली उपलब्ध करुन देता येईल.असे नम्र मत आहे.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमार निर्णयार्थ फेर सादर .

**निर्णय क्र.१०१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी आकाशवाणी केंद्र संस्थानला सहकार्य करत नाही, संस्थानचे विविध कार्यक्रम व सेवा-सुविधांचीमाहिती प्रसारीत करीत नाहीत, याकरीता त्यांचे कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या दोन नॉन एसी खोल्या देणेसंदर्भात, शिर्डी आकाशवाणी केंद्राच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना चर्चेसाठी पुढील सभेसमोर बोलविणेत यावे व त्यावेळेस सदरहू विषय सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **शिर्डी येथे होणाऱ्या २३ डिसेंबर २०१७ रोजी देश विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र कार्यक्रमाची फोटोग्राफी व्यावसायीक फोटोग्राफर यांचेकडून करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद –** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५७ – (ठ).

श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** निरंक

**<u>प्रास्ताविक</u> –** श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ आक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये साजरे केले जाणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जिवन कार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदर चर्चासत्राचे कार्यक्रमाकरीता मा. उपराष्ट्रपती महोदय, भारत सरकार हे उपस्थित राहणार आहे. त्या अनुषंगाने सदर चर्चासत्राकरीता विविध विभागांनी करावयाचे कामाचे नियोजनाबाबत दि.२६/१०/२०१७ रोजी मा.उपजिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या सभेचे इतिवृत्तातील अ.नं. ९ मध्ये व दि. २७/०९/२०१७ रोजीचे आदेशातील अ.नं. १० मध्ये **" चर्चासत्र कार्यक्रमाचे ठिकाणी फोटो काढणेबाबत "** नमुद केलेले आहे. त्यास अनुसरुन दि. २३ डिसेंबर २०१७ रोजीचे चर्चासत्राचे कार्यक्रमाचे फोटोग्राफी करणेकरीता सीसीटीव्ही विभागाकडील ०५ कर्मचा-यांमार्फत करण्यात येणार आहे. परंतु, या व्यतिरीक्त सदर कार्यक्रमाचे फोटोग्राफी व्यवसायीक फोटोग्राफर यांचेकडुन करणेकामी अंदाजे रक्कम रु. ५०,०००/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये पन्नास हजार) मात्र खर्च येईल.

तरी, दि. २३ डिसेंबर २०१७ रोजीचे चर्चासत्र कार्यक्रमाचे फोटोग्राफी व्यवसायीक फोटोग्राफर यांचेकडुन करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु ५०,०००/- मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**<u>मागणी</u>–** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जिवन कार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेत येणार आहे. सदर चर्चासत्र कार्यक्रमाचे फोटोग्राफी व्यवसायीक फोटोग्राफर यांचेकडुन करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु ५०,०००/- मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर करत आहे.

**<u>संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान</u> -** तांत्रिक व आर्थिक.

**<u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय</u> –** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा समाधी शताब्दी कालावधीमध्ये करावयाचे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम जगभरातील साईमंदिरामध्ये एकाच वेळी राबविले जावेत, तसेच संपुर्ण वर्षभर साईबाबांच्या जिवन कार्याचा व विचारांचा प्रचार प्रसार व्हावा व संपुर्ण वर्षभर भक्तीमय वातावरण रहावे यासाठी चर्चा करणे, नियोजन करणे यासाठी दि. २३ डिसेंबर २०१७ रोजी जगभरातील सर्व साईमंदिरांच्या विश्वस्तांचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित करणेत येणार आहे. सदर चर्चासत्र कार्यक्रमाचे फोटोग्राफी व्यवसायीक फोटोग्राफर यांचेकडुन करणेकामी येणारे अंदाजे रक्कम रु ५०,०००/- मात्रचे खर्चाचे मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर करत आहे.

**निर्णय क्र.१०१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक २३ डिसेंबर २०१७ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या देश विदेशातील साई मंदिराचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी यांचे चर्चासत्र कार्यक्रमाची फोटोग्राफी विहीत पध्दतीने व्यावसायीक फोटोग्राफर यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोलसेलप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे सोईसाठी मंडप व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम , २००४ मधिल तरतूद –**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरा प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे " या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेसाठी दि.३१/१०/२०१७ अखेर ठेकेदार रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचेकडून मंडप व्यवस्था करुन घेण्यात आली होती. सदर व्यवस्थेचा कालावधी पुर्ण झालेला असलेने मंडप काढण्यात येत आहे. परंतु सध्याही दुपारचे वेळेस साईभक्तांना उन्हाचा त्रास होत असल्याचे संरक्षण विभागाने कळविले आहे.

संस्थानमार्फत वर्षभरात साजरे करण्यात येणारे उत्सव तसेच उन्हाळा व पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करुन मंडप ठेकेदार रुतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे निम्नतम दराने येणारे रक्कम रु. ३६,९९,०१५/- मात्रचे खर्चास व याकामी त्यांना कार्यादेश देणेस तसेच ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व त्याअनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सादर करणेस मा. उपसमिती चे सभेत निर्णय झालेला आहे. मंडप ठेकेदार रुतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांनी सदर केलेले ई-निविदेमध्ये उन्हाळयाचे कालावधीत १०७ दिवसांकरीता एम.एस.पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले मंडपासाठी रु. ३५/- प्रती चौ.फुट (०.२३३ प्र.दि.प्र.चौ.फुट ) हे दर आहेत. करीता सदरचे मंजुर दराने ठेकेदार यांचेकडून खालीलप्रमाणेचे मंडप उभारणीचे काम करुन घेता येईल.

**<u>अ) दि.१५/११/२०१७ ते दि.३०/११/२०१७ अखेर एकूण १६ दिवसांकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे</u>**

| **अ.नं.** | **मंडपाचे ठिकाण व तपशिल** | **परीणाम (चौ.फुट)** | **कालावधी** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अ) | **एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप -** | | | | |
| १. | समाधी मंदिर उत्तर बाजू – २७०'X१८' | ४८६०.०० | दि.१५/११/२०१७ ते दि.३०/११/२०१७ अखेर **१६ दिवस** | ०.३२७ प्र.दि.प्र.चौ. फुट | ३३,९४५.२२ |
| २. | गुरुस्थान मंदिर येथे – ३७''X४४' | १६२८.०० | | | |
| | एकूण (अ) | ६४८८.०० | | | |
| ब) | **बांबु व बल्ल्याचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप –** | | | | |
| १. | पीआरओ समोर - ९०'X१०'<br>४०'X१८'<br>४५'X१८' | ९००.००<br>७२०.००<br>८१०.०० | दि.१५/११/२०१७ ते दि.३०/११/२०१७ अखेर **१६ दिवस** | ०.२३३ प्र.दि.प्र.चौ. फुट | ४२,६८१.८७ |
| २. | दर्शन रांग पश्चिम बाजू - ४६'X१५'-०"<br>दर्शन रांग पुर्व बाजू - ७७'-०" X३१'-०" | ६९०.००<br>२३८७.०० | | | |
| 3. | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजु फुटपाथ -३९८X८ | ३१८४.०० | | | |
| ४. | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजु फुटपाथवर- ३९४ X७ | २७५८.०० | | | |
| | एकूण (ब) | ११४४९.०० | | | |
| | | | | एकूण (अ+ब) रुपये - | ७६,६२७.०९ |
| | | | | **एकूण पुर्णांकित रक्कम रुपये -** | **७६,६२७.००** |
| | | | | **(अक्षरी रुपये शहात्तर हजार सहाशे सत्तावीस मात्र)** | |

**ब) <u>दि.१५/११/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर पर्यंत एकूण ४० दिवसांकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे</u> –**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | परीणाम (चौ.फुट) | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| अ) | **एम.एस. पाईपचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप -** | | | | |
| १. | समाधी मंदिर उत्तर बाजू - २७०'X१८' | ४८६०.०० | दि.१५/११/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर **४० दिवस** | ०.३२७ प्र.दि.प्र.चौ .फुट | ८४,८६३.०४ |
| २. | गुरुस्थान मंदिर येथे - ३७''X४४' | १६२८.०० | | | |
| | एकूण (अ) | ६४८८.०० | | | |
| ब) | **बांबु व बल्ल्याचे स्ट्रक्चर व ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप -** | | | | |
| १. | पीआरओ समोर - ९०'X१०'<br>४०'X१८'<br>४५'X१८' | ९००.००<br>७२०.००<br>८१०.०० | दि.१५/११/२०१७ ते दि.२४/१२/२०१७ अखेर **४० दिवस** | ०.२३३ प्र.दि.प्र.चौ .फुट | १,०६,७०४.६८ |
| २. | दर्शन रांग पश्चिम बाजू - ४६'X१५'-०"<br>दर्शन रांग पुर्व बाजू - ७७'-०" X३१'-०" | ६९०.००<br>२३८७.०० | | | |
| 3. | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजु फुटपाथ -३९८X८ | ३१८४.०० | | | |
| ४. | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजु फुटपाथवर- ३९४ X७ | २७५८.०० | | | |
| | एकूण (ब) | ११४४९.०० | | | |
| | | | | एकूण (अ+ब) रुपये - | १,९१,५६७.७२ |
| | | | | **एकूण पुर्णांकित रक्कम रुपये -** | **१,९१,५६८.००** |
| | | | | **अक्षरी रुपये दोन लाख पंचवीस हजार ब्यान्नव मात्र** | |

प्रस्ताव– तरी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होण्याचे दृष्टीने अ) प्रमाणे नोहेंबर अखेर १६ दिवसांकरीता मंडप व्यवस्था करुन घेणेकामी रु. ७६,६२७.०० मात्र खर्च येईल अथवा ब) प्रमाणे डिसेंबर अखेर ४० दिवसांकरीता मंडप व्यवस्था करुन घेणेकामी रु. १,९१,५६८.००मात्र खर्च येईल.

तरी सदरचे काम अ) अथवा ब) प्रमाणे ठेकेदार रुतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचेकडून करुन घेणेकामी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या सोईसाठी प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेप्रमाणे ठेकेदार रुतूजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचेकडून मंजुर दराने डिसेंबर अखेर४० दिवसांकरीता मंडप व्यवस्था करुन घेणेस व त्याकामी रु.१,९१,५६८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.५४,५५ मधील जमीनीत जाणेसाठी रस्तयावर सी.डी.वर्क करणे, जमीनीस प्रिकास्ट कुंपन करणे व मैदान विकसीत करणेसाठी मुरुम टाकणे बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:** अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना–** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्त मौजे शिर्डी सर्वे नं. ५४**,**५५ मध्ये संस्थान मालकीचे सुमारे २ हेक्टर क्षेत्र आहे. यापैकी काही जमिन बेघरांसाठी घरे याकरीता आरक्षित आहे. सदरहू जमिन शिर्डी शहराच्या पूर्वेस व नविन पिंपळवाडी रस्त्यापासून जवळ आहे. या जमिनीला कॉक्रीट पोलसह तारेचे कुंपन करण्यात आले आहे. या जमिनीत साईभक्तांकरीता आपत्ती व्यवस्थापनाचे दृष्टीने इतर जमिनी भाडेतत्वावर

घेणेऐवजी सदरहू जमिन रिफ्युज एरिया म्हणून वापरासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरहू जमिनीत जाणेसाठी चारी क्र.१२ वरुन जाणेसाठी यापुर्वी अडीच फुट व्यासाचा आर.सी.सी. पाईप टाकून रस्ता तयार करण्यात आला होता. परंतू सदरहू रस्ता हा अतिशय अरुंद व खराब असल्याने सदरहु जमिनीत वाहने जाणेसाठी अडचण निर्माण होते. करीता सदरहू ठिकाणी असलेल्या चारीवरती सी.डी.वर्क करुन रस्ता करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू जमिन ब-याच दिवसांपासून पडीत असलेने बरचसे परिसरातील रहिवासी या जागेचा वापर शौचालयासाठी करतात. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण झालेली असल्याने परिसरातील नागरीकांनी याबाबत तक्रारी केलेल्या आहे. करीता सदरहू जमिनीचे चारही बाजुने प्रिकास्ट कुंपन करुन समोरील बाजुने मेकॅनिकल विभागामार्फत लोखंडी गेट तयार करुन घेता येईल तरी उपरोक्त कामे करुन घेणेसाठी सन २०१७-२०१८ चे ई.एस.एस.आर. नुसार खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **रक्कम रु.** |
|---|---|---|
| ०१ | सर्व्हे नं.५४, ५५ मधील जागेत प्रवेश करणेसाठी चारी क्र.१२ वर १००० एम.एम. जाडीचे एन.पी.२ क्लास पाईप टाकून सी.डी. वर्क करणे. | ८५,०५३/- |
| ०२ | प्रवेशद्वारावर एम.एस. ग्रील गेट बसविणे. | ३२,८४७/- |
| ०३ | संपूर्ण क्षेत्राला एम-२५ ग्रेडचे ६ फुट उंचीचे प्रिकास्ट कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | २९,८९,०८९/- |
| ०४ | सर्व्हे नं.५४, ५५ मधील २ एकर क्षेत्र रिफ्युज एरिया म्हणून विकसीत करणेसाठी ६ इंच जाडीचा मुरुम टाकून जमिन सपाटीकरण करणे. | ९,३३,५११/- |
| | **एकुण रक्कम रु.** | ४०,४०,५००/- |

उपरोक्त नमूद अ.नं.१ व २ मधील कामे अग्रक्रमाने करणे आवश्यक आहे. यासाठी अंदाजे रक्कम रु.१,१७,९००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच अ.नं.३ व ४ मधील कामे करणेसाठी अंदाजे रक्कम रु.३९,२२,६००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे एकुण अंदाजे रक्कम रु.४०,४०,५००/- इतक्या खर्चास व याकामी विहीत पद्धतीने कोटेशन व ई-निविदा प्रसिध्द करणेस मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.५४,५५ मधील जमीनीत जाणेसाठी रस्तयावर सी.डी.वर्क करणे, जमीनीस प्रिकास्ट कुंपन करणे व मैदान विकसीत करणेसाठी मुरुम टाकणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मध्ये संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेसाठी अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम– २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०२/२०१७ रोजीचे सभेत सेवाधाम इमारतीचे नूतनीकरण करुन साईभक्तांच्या निवासाकरीता वापर सुरु करणेबाबत येणारे खर्चास व ई- निविदा मागविणेस मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेत निर्णय क्र. ५४ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, असे ठरले की, ठिकठिकाणाहुन पालखी सोबत येणा-या पदयात्रींना साईसेवक म्हणुन संस्थानमध्ये सेवा करणेस देणेचे प्रस्तावित असुन या सेवेक-यांच्या निवासासाठी सेवाधाम या इमारतीचा वापर होऊ शकतो, या दृष्टीने सेवाधाम इमारतीचे नुतनीकरण व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा "*

**प्रस्तावना**: संस्थानचे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं. ११९ मध्ये साईभक्तांचे निवासासाठी सेवाधाम इमारतीचे आर.सी.सी. मध्ये तळमजला, पहीला व दुस-या मजल्याचे बांधकाम सन १९५६ मध्ये पूर्ण करणेत आलेले आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम क्षेत्र १५१२.६४ चौ. मी. आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम होवून ६० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असून इमारत जुनी झालेली आहे.

संस्थानचे मा. अध्यक्ष, त्रिसदस्य समिती तथा जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांनी रविवार दि.१३/०३/२०१६ रोजी संस्थानच्या संपूर्ण मालमत्तेची तसेच आस्थापनेवर कार्यरत असणा-या सर्व विभागांची समक्ष स्थळपहाणी केली आहे. सदरहू स्थळपाहणीचे वेळेस सेवाधाम इमारतीचे बांधकामास ५० वर्षापेक्षा जास्त वर्षे झालेली असल्यामुळे त्या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेण्यात यावे. या ठिकाणी नवीन इमारत बांधकामाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा अशी सूचना केलेली असल्याचे दि.१५/०३/२०१६ रोजीचे परिपत्रकाअन्वये कळविणेत आले होते. याबाबत नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर, यांचेकडून कोटेशन्स मागविणेत येवून, निम्नतम दरात स्ट्रक्चरल इंजिनिअर बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांचेकडून सेवाधाम इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन घेणेत आलेले आहे.

त्यानुसार बर्वे कन्स्टल्टंट, मुंबई यांनी दि२७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात नमूद केलेल्या बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

- **आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर** : **-** इमारतीचे कॉलम, बीम, स्लॅब, व स्टील चांगल्या स्थीतीत असून, काही ठिकाणी कॉक्रीटला क्रॅक गेलेले असून, ते दुरुस्त करणे आवश्यक आहे.
- **वीट बांधकाम** :- इमारतीचे वीट बांधकाम सुस्थीतीत आहे.
- **बाहेरील प्लास्टर** :- बाहेरील प्लास्टर चांगल्या स्थीतीत आहे. लिकेजच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार प्लास्टर करुन घेणेत यावे.
- **टेरेस वॉटर प्रुफींग** :- टेरेस स्लॅबचे काही ठिकाणी लिकेज असून, चायना मोझ्याक वॉटर प्रुफींग करणेबाबत सुचविले आहे.
- **इमारतीचे अंतर्गत बाबींबाबत**:**-** आर.सी.सी. कॉलम, बीम, स्लॅबला असलेले किरकोळ क्रेक दुरुस्ती करणेबाबत सुचविले आहे.
- **ड्रेनेज लाईन व पिण्याचे पाण्याची पाईप लाईन** :**-** ड्रेनेजसाठी व पिण्याचे पाण्यासाठी वापरणेत आलेले पाईप खराब झालेले असून, बदलणे आवश्यक आहे.

स्ट्रक्चरल इंजिनिअर, बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी सेवाधाम इमारतीचे उपरोक्त नमुद केलेल्या कामांसाठी रक्कम रु.४६ लक्ष मात्रचा खर्च कळविला आहे. बर्वे कंन्सलटंट, स्ट्रक्चरल ऑडीटर, मुंबई यांनी दिलेल्या अहवालानुसार सेवाधाम इमारतीची दुरुस्ती करुन इमारत निवास व्यवस्थेसाठी वापणेस योग्य असलेबाबत कळविले आहे. सदर कामासाठी त्यांनी मुंबई येथील दर विचारात घेऊन ढोबळ मानाने अंदाजपत्रक दिलेले आहेत. इकडील विभागामार्फत याकामासाठी सन- २०१६-१७ चे दरसुचीमधील दरानुसार अंदाजपत्रक तयार केले असुन याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description of Item | Estimated Amount |
|---|---|---|
| A) | Structural repairs | 9,57,209/- |
| B) | Water proofing of Terraces | 2,68,450/- |
| C) | Plumbing Works | 4,36,668/- |
| D) | External and Internal Painting Work | 9,41,265/- |
| E) | Flooring | 8,87,513/- |
| F) | Renovation of Toilet Block | 5,38,387/- |
| | Total ( A+B+C+D+E+F) | 40,29,492/- |

उपरोक्त प्रमाणे सेवाधाम इमारतीचे दुरुस्तीकामी बर्वे कन्सल्टंटस्, मुंबई यांनी वर नमूद केलेल्या कामासाठी तसेच याव्यतिरिक्त सेवाधाम इमारतीचे तळमजला व पहिल्या मजल्यावरील टॉयलेटच्या फ्लोरींग व डॅडोच्या टाईल्स बदलणे, संडास भांडे व दरवाजे बदलणे, तसेच इमारतीचे दुस-या मजल्यावर पुर्वेकडील भागात नवीन ६ संडासचे बांधकाम करणे. इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम, तसेच रुममधील व पॅसेज मधील

शहाबाद फरशी काढून सदर ठिकाणी व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे इ. किरकोळ कामे करणे आवश्यक आहे. याकामी एकूण रक्कम रु.४०,२९,४९२/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२५/०७/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सदर इमारतीत साईसेवक यांची निवास व्यवस्था करणेसाठी प्रथम इमारतीचे नुतनीकरण करणेसाठी येणारे रु.४०,२९,४९२/- मात्र खर्चास व ई – निविदामागविणेस मान्यता देणे अथवा शिर्डी बस स्थानक भक्तनिवास व साई धर्मशाळा यापैकी एका ठिकाणी साईसेवक यांची निवासव्यवस्था करणे याबाबत निर्णय होणेकरीता प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्याबाबत सदरहू सभेत खालिलप्रमाणे निर्णय क्र.६५० संमत करणेत आलेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमध्ये राबविण्यात येणा-या साईसेवक योजनेमध्ये सहभागी होणा-या साईसेवकांची निवासव्यवस्था साईधर्मशाळा इमारतीमध्ये करण्यात यावी, असे ठरले. "*

वर नमुद मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सध्या साईसेवक यांची निवास व्यवस्था साईधर्मशाळा येथे करण्यात येत आहे.

प्रस्तावः- सेवाधाम ही इमारत मदिर परिसराजवळ असल्याने ती साईभक्ताचे निवासाकरीता उपयुक्त आहे. तरी त्यासाठी सदर इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेसाठी अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम रु.४०,२९,४९२/- मात्र इतक्या खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने ई निविदा मागविणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी सिटी सर्व्हे नं.११९ मध्ये संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४०,२९,४९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी चर्चा विनिमय करुन निर्णय होणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे सर्व वार्ड / विभागांसाठी लागणारे Liquid Medical Oxygen Gas Plant साठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०१/२०१२ निर्णय क्र.३० अन्वये सदर प्लॅन्टची क्षमता वाढवून 13KL करण्यात येऊन त्यांचे दरमहा भाडे रक्कम रु.३४८७५/- सर्व करांसह असे ठरवून सदर प्लॅन्ट ०५ वर्षाकरीता रुग्णालयात बसिवण्यात यावे असे ठरले होते त्यानूसार M/s.Praxair India Pvt. Ltd., Navi Mumbai यांना इकडील पत्र क्र.५७०८ दि.०१/०२/२०१२ रोजी नविन कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानूसार दि.३१/०८/२०१२ पासून सदर Liquid Medical Oxygen Gas Plant श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वित करण्यात आलेला आहे. दि.३०/०८/२०१७ रोजी सदर Liquid Medical Oxygen Gas Plant चा ०५ वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे. त्यामुळे सदर Liquid Medical Oxygen Gas Plant नव्याने बसवावा लागणार आहे. सदर Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी ०3 अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूध्वनीद्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानूसार त्यांनी खालील प्रमाणे दर कळविलेले आहे.

| Description | Inox Air, Mumbai | Linde (I) Ltd., | Balaji, Sangamner | Total | Avg. Rate | Less 20% | Per Month Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **Oxygen Gas** | 16.80 / sm3 | 18.76/sm3 | 12.40 / sm3 | 47.960 | 15.987 | 12.78 | 192365.00 |
| **Rental** | 31500.00 Per Month | 26105.00 Per Month | 13620.00 Per Month | 71225.00 | 23741.67 | 18993.00 | 18993.00 |
| **Installation Charge** | Nil | 1.5 Lakh | | | | | |

त्यामुळे उपरोक्त Liquid Medical Oxygen Gas Plant विहित पध्दतीने ई - निविदा मागवून बसविणेस व त्याकरीता येणा-या प्रस्तावित प्रती महिना रक्कम रु. .१८,९९३/- याप्रमाणे भाडे कळविलेले आहे. त्यांचे दरानूसार पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.११,३९,५८०/- (अक्षरी रु.– अकरा लाख एकोणचाळीस हजार पाचशे ऐंशी मात्र) इतका खर्च भाडेकरीता अपेक्षित आहे. तसेच गॅस सिलेंडरसह खरेदीकामी Per Cubic करीता १२.७८/ sm3 इतके रुपये दर असून सध्याच्या वापरानूसार प्रती महिना रक्कम रु.१,९२,३६५/- या प्रमाणे एकूण पाच वर्षाकरीता अंदाजे पूर्णांकित रक्कम रु.१,१५,४१,९००/- (अक्षरी रु. – एक कोटी पंधरा लाख एक्केचाळीस हजार नऊशे मात्र) असे एकूण रक्कम रु.१,२६,८१,४८०/- (अक्षरी रु. – एक

कोटी सव्वीस लाख एक्यांशी हजार चारशे ऐंशी मात्र) चे खर्चास तसेच ई- निविदा मागवून खरेदीस मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.१०४ अन्वये उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दि.२६/०६/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२६/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्यानूसार दि. १०/०८/२०१७ पर्यंत दोन ई निविदा प्राप्त झालेल्या होत्या. तसेच Prebid Meeting मधील बदल हे उशीराने अपलोड झाल्यामुळे निविदाधारकांना निविदा भरता आलेल्या नाहीत त्यामुळे निविदाधारकांनी मुदतवाढ देणे बाबत दूध्वनीद्वारे विनंती केलेली होती

त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरहू ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यास अनूसरुन एक ई निविदा प्राप्त झाली अशा एकूण तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदरहू प्राप्त झालेल्या ०३ Online तांत्रिक ईनिविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून सदर तीनही निविदांमधील तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून बायोमेडीकल विभागामार्फत तपासून घेण्यात आलेला आहे. त्यानुसार तीनही निविदा पात्र असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Supplier |
|---|---|
| 01 | M/s. Inox Air Products Pvt.Ltd., Navi Mumbai |
| 02 | M/s. Linde India Ltd., Navi Mumbai |
| 03 | M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai |

तरी वरीलप्रमाणे पात्र तीनही Online कमर्शियल ई-निविदा दि.३१/०१/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या अूसन सदर निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे –

| **Sr. No.** | **Description of Work / Item(s)** | **No. of Qty** | **Units** | **Inox Air Products Pvt. ltd.** | | **Praxair India Pvt. ltd.** | | **Linde India Limited** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **Rate** | **Amount** | **Rate** | **Amount** | **Rate** | **Amount** |
| 1 | Basic Gas Price, Per SM3 | 1 | Sm3 | 16.23 | 16.23 | 14.00 | 14.00 | 16.73 | 16.73 |
| 2 | Facility Charge per month | 1 | Per Month | 26845.00 | 26845.00 | 23600.00 | 23600.00 | 0.00 | 0.00 |
| 3 | One Time Installation Charges | 1 | 1 Unit | 118000.00 | 118000.00 | 0.00 | 0.00 | 118000.00 | 118000.00 |
| 4 | Total Gas Cost for 5 Year (App. 15000.00 SM3 Per Month * 60) | | | | 14607000.00 | | 12600000.00 | | 15057000.00 |
| 5 | Facility Charges for 5 Years (for 60 Month) | | | | 1610700.00 | | 1416000.00 | | 0.00 |
| | **Total amt for 5 Years (for 60 Month) (3+4+5)** | | | | 16335700.00 | | **14016000.00** | | 15175000.00 |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे दर निम्नतम येत असून M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचा Liquid Medical Oxygen Gas Plant सन २०१२ पासून संस्थानमध्ये कार्यान्वित केलेला आहे परंतू सध्या आपण नविन Liquid Medical Oxygen Gas Plant करीता निविदा मागविलेल्या असून सदर निविदेमध्ये दर देतांनी त्यांनी One Time Installation Charges हे ०.०० (शुन्य) दाखविलेले आहे. त्यामुळे M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे सोबत खालील दोन बाबींवर मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा विनिमय करण्यात यावा असे मत आहे.

१. Liquid Medical Oxygen Gas चे SM3 दराबाबत.

२. M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांनी मागितलेल्या दर महा भाडे बाबत.

तरी उपरोक्त बाबींवर M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचेशी चर्चा विनिमय करणेकरीता त्यांना आजचे सभेपुढे बोलविण्यास तसेच सदर Liquid Medical Oxygen Gas Plant बसवून व्यवस्थित कार्यान्वित होईपर्यंत मागील मंजूर दराने Liquid Medical Oxygen Gas हा M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचेकडून गॅस खरेदीस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०१७** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे प्रतिनिधी चर्चेसाठी आजचे सभेत उपस्थित होते. सभेसमोर त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या दरावर रु.१,४०,०००/- मात्र सुट देऊ केली. यावर सभेने त्यांना सांगितले की, नवीन Liquid Medical Oxygen Gas Plant चा पुरवठा आदेश देईपर्यंत जुना Gas Plant सुरु ठेवून जुन्या दराने श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी Oxygen Gas चा पुरवठा करावा, तसेच पुरवठा आदेश दिल्यानंतर नवीन Gas Plant सुरु होईपर्यंत जुन्या प्लँटमधून सुधारित दराने Oxygen पुरवविणेत यावा, यास त्यांनी संमती दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Liquid Medical Oxygen Gas Plant बसविणेकामी M/s. Praxair India Pvt.Ltd., Navi Mumbai यांचे रु.१,३८,७६,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच नवीन Liquid Medical Oxygen Gas Plant ची उभारणी होईपर्यंत संबंधीतांबरोबरउपरोक्तप्रमाणे झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.१०१८** दि. २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी तालकटोरा स्टेडीयम, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या साईभजन संध्यामध्ये साईभक्तांचे दर्शनाकरीता श्रींच्या चांदीच्या पादुका उपलब्ध करुन दिल्या होत्या. परंतु या पादुका दिल्ली विमानतळावर एका साईभक्ताने डोक्यावर घेऊन, फोटो काढले अशा तक्रारी काही ग्रामस्थांनी अध्यक्ष महोदय यांचेकडे केल्या होत्या. या बाबीची सत्यता पडताळून पाहणेसाठी सदरहू पादुका दिल्ली येथे घेऊन जाणेकामी नेमणूक करणेत आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना आजचे सभेसमोर बोलविणेत येऊन, विचारणा केली असता, त्यांनी सभेसमोर अशी माहिती दिली की, श्रींच्या चांदीच्या पादुका ठेवणेसाठी नक्षीदार लाकडी बॉक्स तयार करणेत आलेला होता. परंतु विमान प्रवासादरम्यान सदरहू लाकडी बॉक्स सामानामध्ये जमा करावा लागतो. यामुळे त्या बॉक्समधील श्रींच्या पादुका शबनम पिशवीत रेशमी वस्त्रामध्ये आच्छादुन आमच्या सोबत घेतलेल्या होत्या. दिल्ली विमानतळावर पादुका दर्शन सोहळयाचे आयोजक, आम्हाला घेण्यासाठी आले, त्यावेळेस त्यांनी सदरहू मोकळा नक्षीदार लाकडी बॉक्स डोक्यावर घेऊन, आमच्या नकळत फोटो काढला. परंतु त्या बॉक्समध्ये श्रींच्या पादुका नव्हत्या.

यावर विस्तृत चर्चा झाली व चौकशी अंती या बाबीमध्ये काहीही तथ्य आढळून आले नाही, त्यामुळे सदरहू प्रकरण बंद करणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.१०१९** साई पालखी निवारा, निघोज येथे दानशुर साईभक्तांनी बी व डी या दोन इमारती संस्थानला देणगी स्वरुपात दिलेल्या असून या इमारतींचा ताबाही झालेला आहे. परंतु ताबा मिळणेपुर्वी देणगीदारांनी श्री कचरुलाल हिरालाल सारडा, रा अंबाजोगाई, जि.बीड यांना दि.०२/१२/२०१७ ते दि.०३/१२/२०१७ अखेर दोन दिवसांकरीता ॲडव्हांस बुकिंग दिलेली आहे. बी व डी इमारती पैकी वापरा योग्य असलेल्या बी इमारती मधील ६४ ए.सी. रुम्स दि.०२/१२/२०१७ ते दि.०३/१२/२०१७ अखेर दोन दिवसांकरीता संस्थान नियमाप्रमाणे सेवाआकार आकारुन व सदर कालावधीत लाईट व पाण्याची व्यवस्था संबंधीतांनी स्वत: करावी, या अटीवर उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच यापुढे संस्थानच्या परवानगीशिवाय या इमारती परस्पर कोणासही वापरासाठी देण्यात येऊ नये, असे देणगीदारांना लेखी स्वरुपात कळविणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**निर्णय क्र.१०२०** दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४२ अन्वये संस्थानचे विविध विभागांमध्ये कंत्राटदारामार्फत काम करत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची हजेरी कमी असल्यामुळे, इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी किमान वेतनावरील ४०% वाढ त्यांना देण्यात आलेली नव्हती. त्यांच्या हजेरीचे प्रमाण सुधारल्यास ०६ महिन्यानंतर त्यांना किमान वेतनावरील ४०% वाढ देण्याचे ठरले होते. त्यासाठी १०% गैरहजेरीचे प्रमाण ठेवणेत आलेले होते. परंतु आजारीपणा किंवा कौटूंबिक अडचणीमुळे कंत्राटी कर्मचारी सुट्टया घेतात, त्यासाठी गैरहजेरीचे प्रमाण १०% ऐवजी १५% करणेत यावे. तसेच यामधून मॅटर्निटी लिव्ह वगळणेत यावी व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**निर्णय क्र.१०२१** श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतीचे बांधकामास परवानगी देण्यासाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी विकास शुल्क, उपकर, प्रिमियम चार्जेस व सुरक्षा ठेव मिळून एकूण रु.४,२९,३२१६८/- मात्र रक्कम जमा करणेस कळविले आहे.

याबाबत चर्चा करणेसाठी या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.उदय काप्रे हे आजचे सभेपुढे उपस्थित होते. त्यावेळी सदर प्रकल्पाचे आराखडयांबाबत सविस्तर चर्चा करणेत येऊन, असे ठरले की, नियोजित इमारतीचे दुसऱ्या मजल्यावर प्रस्तावित करण्यात आलेले ऑडीटोरीअम वगळणेत यावे व त्या ठिकाणी दर्शन रांग हॉल प्रस्तावित करण्यात यावेत. तसेच पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर दर्शविणेत आलेल्या ए.सी. प्लान्ट रुम हया बांधकाम विकास आणि प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार बांधीव क्षेत्रातून (For FSI Caleculation) वगळणेत याव्यात. त्यामुळे आता प्रस्तावित बांधीव क्षेत्र कमी होणार असल्याने प्रिमियम चार्जेस पडणार नाहीत. तरी याप्रमाणे सुधारित नकाशांनुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी घेणेसाठी नियमाप्रमाणे आवश्यक विकास शुल्क, उपकर व सुरक्षा ठेव रक्कम अदा करणेत यावी. तसेच नकाशांमध्ये झालेल्या बदलांनुसार प्रकल्पाचे अंदाजपत्रकात सुधारणा करुन प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता घेणेसाठी आवश्यक कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

**निर्णय क्र.१०२२** शिर्डी सर्व्हे नं.४ मधील श्रीराम पार्किंग येथील जागेत बायोमेट्रीक बेस टाईम स्लॉट दर्शन पास व्यवस्थेसाठी ८ ते १० काऊंटर्स सुरु करणेसाठी शेडची व्यवस्था करणेत आलेली आहे. तथापि, सदर ठिकाणी जाऊन पास घेणेसाठी साईभक्तांना जास्त अंतर पायी चालावे लागेल. तसेच नवीन दर्शन रांग इमारत बांधकामासाठी सर्व विहीत मान्यता व निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, प्रत्यक्ष बांधकाम सुरु होणेस अजून सुमारे तीन महिन्यांचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे साईभक्तांची गैरसोय टाळण्यासाठी जुने प्रसादालय परिसराचे ईशान्य कोपऱ्यातील वापरात नसलेले जुने एल.पी.जी. टँक काढून त्याठिकाणी १० ते १२ टाईम स्लॉट दर्शन पास काऊंटर्स करणेसाठी आवश्यक व्यवस्था (वीट बांधकाम, पत्राशेड, मंडप) करणेत यावी, असे ठरले. तसेच त्यासाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम)

---

वरील निर्णय क्र.९१४ ते १०२२ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**